गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे समग्र वाङ्मय

# गौतम बुद्धांचे चरित्र

## कृष्णराव अर्जुन केळूसकर



संपादक

**राजन गवस**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# गौतम बुद्धांचे चरित्र

(गायकवाड ओरिएंटल सिरीजमध्ये प्रसिद्ध झालेले)

**कृष्णराव अर्जुन केळूसकर**

संपादक - राजन गवस

प्रस्तावना - प्रकाश पवार

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

वाय ६५५-१

⏩ **पुस्तकाचे नाव :** गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे समग्र वाङ्मय
गौतम बुद्धांचे चरित्र

⏩ **लेखक :** कृष्णराव अर्जुन केळूसकर

⏩ **संपादक :** डॉ. राजन गवस

⏩ **पुनर्मुद्रण :** २०१९

⏩ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

⏩ © **प्रकाशकाधीन :**

⏩ **मुखपृष्ठ :** सरदार जाधव

⏩ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३.

⏩ **किंमत : १८६/-**

---

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

महाराष्ट्राचे वाङ्मयमहर्षी




**गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर**

# अध्यक्षांचे मनोगत

## गौतम बुद्धांचे चरित्र हा मराठी भाषेतील उत्कृष्ट ग्रंथ आहे

गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर हे गेल्या शतकातील एक महत्त्वाचे चरित्रकार आहेत. संत तुकाराम महाराज, गौतम बुद्ध आणि छत्रपती शिवाजी महाराज या युगपुरुषांचे ते मराठी भाषेतील पहिले चरित्रकार आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात २० ऑगस्ट, १८६० रोजी जन्मलेल्या केळूसकरांचे शिक्षण सावंतवाडी व नंतर मुंबईत झाले. विल्सन हायस्कूलमधून मॅट्रिक झालेल्या कृष्णरावांनी पुढे या शाळेत अध्यापन करत असताना लेखन, वाचनाच्या गोडीतून मराठी-इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवून वेगवेगळ्या विषयात अभ्यास करून प्रगती केली.

सत्यशोधक समाज, कामगार, शेतकरी, मागासवर्ग आणि दलित यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणाऱ्यांसोबत ते काम करू लागले. सामाजिक सुधारणाबद्दल निर्भीडपणे लिहू लागले, विचार मांडू लागले. त्यामुळे गेल्या शतकातील राजकीय ऋषी मामा परमानंद, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे या विचारवंतांनी त्यांच्या लेखणी व विचारांची प्रशंसा केली. मुंबईच्या विल्सन हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम करताना त्यांनी लेखन, सामाजिक कार्य आणि प्रबोधनाचे काम सुरू ठेवले. यातून शिक्षणशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, बालवाङ्मय या चौफेर क्षेत्रांत लेखन-वाचन, अभ्यास सुरू ठेवला. या साधनेतून गीता आणि बौद्ध धर्माचे भाष्यकार होत धर्मशास्त्रातही त्यांनी आपले वेगळेपण दाखवून दिले.

गुरुवर्य केळूसकर हे गहन विषयांवर लिहिणारे प्रकांड पंडित बनले; परंतु त्याकाळात सर्वच बहुजन समाजाच्या लेखकाच्या वाट्याला येणारी उपेक्षा आणि फरपट त्यांच्याही वाट्याला आली. महाराष्ट्राने या वाङ्मयमहर्षीकडे दुर्लक्षच केले. जनात जनार्दन पाहणारे ते ऋषितुल्य प्रज्ञावंत होते. महात्मा जोतीराव फुले यांची सत्यशोधक समाज चळवळ आणि मराठा ऐक्येच्छू सभेसाठी त्यांनी आयुष्यभर कार्यकर्ता म्हणून काम केले. त्यांच्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे नेते समाजास मिळाले.

संत चरित्रे कशी लिहावीत, हे केळूसकरांनी तुकाराम बावांचे चरित्र आणि

गौतम बुद्धाचे चरित्र लिहून महाराष्ट्रास दाखविले. सत्यनिष्ठा, चिकित्सा व माहिती पडताळून पाहणे हे त्यांच्या चरित्रलेखन आणि एकूणच लेखनाचे गुणवैशिष्ट्ये आहेत. ते लिहिताना जितका भाग ऐतिहासिक व खरा भासायचा, तेवढाच ते घेत असत.

महाराजा सयाजीराव गायकवाड या दूरद्रष्टी राजाने देशभरातील नव्हे तर जगभरातील वेगवेगळ्या विषयांतील तज्ज्ञ अभ्यासकांना ओळखून त्यांना बडोद्यात बोलावून त्यांच्या ज्ञानाचा उपयोग रयतेसाठी करून घेतला. गुणवंताचे पारखी असलेल्या मामा परमानंदांनी गुरुवर्य केळूसकरांचे लेखन गुण लक्षात येताच त्यांची शिफारस महाराज सयाजीरावांकडे केली. महाराजांनी केळूसकरांना मुंबईत भेटीस बोलावले. त्यांना प्रश्न विचारून त्यांची चाचपणी केली. केळूसकरांची वाचन-विचारातील प्रगल्भता बघून त्यांना समाधान वाटले आणि त्यांनी केळूसकरांना फ्रान्सचा जुना इतिहास या ग्रंथाच्या भाषांतराचे काम सोपविले. बहुजनाच्या एका शूद्र माणसाला महाराजांनी लेखन काम सोपविले, ही गोष्ट बडोद्यातील विद्वानांना आवडली नाही; पण महाराज आपल्या निर्णयावर खंबीर राहत त्यांनी केळूसकरांना आणखी प्रोत्साहन दिले. महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरातील हुशारी ओळखून जशी चार वेळेस त्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन मदत केली, तशीच मदत केळूसकरांनाही करीत राहिले.

फ्रान्सचा जुना इतिहास (१८८३), तुकाराम बावांचे चरित्र (१८९६), सेनेका व एपिक्टेट्सची बोधवचने (१८९७), गौतम बुद्धाचे चरित्र (१८९८), सात उपनिषदांचे भाषांतर (१८९८) आणि श्रीमद्‌भगवतगीता हा ११०० पृष्ठांचा ग्रंथ (१९०२) यासारखे चौफेर लेखन गुरुवर्य केळूसकरांनी केले. या काळात त्यांचे बडोद्यात येणे-जाणे वाढले. बडोद्याचे दिवाण-महात्मा जोतीरावांचे स्नेही रामचंद्र विठोबा धामणसकर केळूसकरांचे चाहते मित्र होते. केळूसकर शिक्षकाची नोकरी, वेगवेगळ्या मासिकांचे संपादन, कौटुंबिक आर्थिक ओढाताण, त्यासाठी शिकवण्या घेणे आणि राहिलेल्या वेळात झंझावातासारखे लेखन करीत होते. लोकमान्य टिळकांनी गीतारहस्य लिहिण्याअगोदर गुरुवर्य केळूसकरांनी गीतेवर भाष्य करणारा ग्रंथ लिहिला. बावीस वर्षे तो प्रकाशकाविना पडून राहिला. गुरुवर्य केळूसकरांनी लहान मोठी एकोणचाळीस पुस्तके लिहिली, असा उल्लेख आहे; परंतु ते सर्व ग्रंथ उपलब्ध होऊ शकले नाहीत. संस्कृत धातुरूप कोश, इंग्रजी मराठी कोशाची नोंद आहे; पण तेही मिळू शकले नाहीत. केळूसकर गुरुजींच्या नातवांकडे-

स्नेह्यांकडे अप्रकाशित लेखन शोधण्याचा मी प्रयत्न केला. ग्रंथालयात जे ग्रंथ उपलब्ध होऊ शकले त्यावरच समाधान मानावे लागत आहे.

बडोद्याचे प्रज्ञावंत राजे सयाजीराव गायकवाड यांनी सर्व धर्मांचा बारकाईने अभ्यास केला होता. प्रत्येक माणूस ईश्वराचे लेकरू आहे. ईश्वराची प्रार्थना, पूजा करण्याचा प्रत्येकास अधिकार आहे. ती कोणत्याही एका जातीची मत्तेदारी नाही. सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी बडोद्यात धर्मखाते सुरू केले. हिंदू धर्मासोबत जैन, बौद्ध, इस्लाम, ख्रिश्चन, झोरास्ट्रियन धर्मांची पुस्तके मराठी, गुजरातीत भाषांतरित केली. या धर्मांतील समान तत्त्वे शिकविणारा वर्गही सुरू केला. यावर उपाय म्हणून इ. स. १८९६ ला ब्राह्मणेत्तरांसाठी मराठीतून वेदोक्त शाळा सुरू केली.

गुरुवर्य केळूसकरांचे बडोद्यात दिवाण रामचंद्र धामणसकर आणि खासेराव जाधवांकडे येणे वाढले होते. महाराजा सयाजीरावांनी जगातील महत्त्वाच्या दहा ग्रंथांच्या मराठी भाषांतरांचे काम सुरू केले, त्यावेळी फ्रान्सचा जुना इतिहास या ग्रंथांचे काम कृष्णरावांकडे सोपविले. इ. स. १८८३ मध्ये तो ग्रंथ बडोद्यातून प्रकाशित झाला. इ. स. १८९६ ला तुकाराम बावांचे चरित्रही सयाजी चरित्रमालेत प्रकाशित झाले.

कृष्णरावांचे मित्र विनायक दादाजी यांनी गौतम बुद्धांचे चरित्र लिहा, असा सल्ला दिला. बडोद्याचे दिवाण रमेशचंद्र दत्त यांचा 'एन्शन्ट सिविलायझेशन ऑफ इंडिया' या ठांथातील बुद्धांच्या गृहत्यागाची चित्तवेधक गोष्ट वाचून दाखविली. ती केळूसकरांना आवडली. एशियाटिक लायब्ररीतील गौतम बुद्धांसंबंधी अठरा पुस्तकांचा आधार घेऊन त्यांनी गौतम बुद्धाचे चरित्र लिहिले. लक्ष्मणराव पांडुरंग नागवेकर यांच्या ''आध्यात्मिक ज्ञानरत्नावली'' या नियतकालिकात क्रमश: प्रसिद्ध झाले. पुढे इ. स. १८९८ मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या गायकवाड ओरिएंटल सिरीजमध्ये ते प्रकाशित झाले.

गुरुवर्य केळूसकरांचे गौतम बुद्धांचे चरित्र हा ग्रंथ पुढे मराठी भाषेतील एक उत्कृष्ट चरित्रग्रंथ ठरला. धर्मानंद कोसंबी, डॉ. नायर आणि पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वाचला. हे सर्व मान्यवर पुढे बौद्ध धम्माचे अनुयायी बनले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहून ठेवले, ''दादा केळूसकरांनी दिलेल्या पुस्तकामुळे मी बुद्धाकडे वळलो. त्या लहान वयातसुद्धा रिकाम्या डोक्याने मी बुद्धाकडे गेलो

नाही. मला पार्श्वभूमी होती आणि बुद्धाच्या जीवनावरील पुस्तक वाचताना मी तुलना व भेद करीत असे. बुद्ध आणि त्याचा धम्म यांच्यातच रस घेण्याची माझी ही सुरुवात होती.''

कृ. अ. केळूसकर हे गेल्या शतकातील मोठे विचारवंत, विख्यात चरित्रकार होते. त्यांच्यामुळेच डॉ. आंबेडकरांसारखे नेते समाजास मिळाले. जनात जनार्दन पाहणारे ते ऋषितुल्य प्रज्ञावंत होते. मामा परमानंद, न्या. रानडे या विचारवंतांनी त्यांच्या लेखणीची व विचारांची त्या काळात प्रशंसा केली. धर्मशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, शिक्षणशास्त्र या चौफेर विषयांतील ते पंडित होते. महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ व मराठा ऐक्येच्छू सभेसाठी त्यांनी आयुष्यभर काम केले. ते गीता आणि बौद्ध धर्माचे मोठे भाष्यकार होते; पण या पुरोगामी महाराष्ट्राने केळूसकर गुरुजींच्या एकूण लेखनाची म्हणावी तशी दखल न घेतल्याने हा बहुजन समाजाचा वाङ्मयमहर्षी उपेक्षितच राहिला.

गुणग्राहक सयाजीरावांनी जसे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गुण हेरून शिष्यवृत्तीच्या निमित्ताने चार वेळेस बडोद्यातील नियम मोडून मदत केली. तशीच मदत गुरुवर्य केळूसकरांच्या ग्रंथ प्रकाशनास केली. गायकवाड ओरिएंटल सिरीजमध्ये केळूसकरांचे 'गौतम बुद्धांचे चरित्र' हा मराठीतला पहिला ग्रंथ प्रकाशित केला. त्यामुळेच पहिल्यांदा गौतम बुद्धांची ओळख ठळकपणे मराठी वाचकास झाली.

अशा या वाङ्मयमहर्षीची ओळख महाराष्ट्राने आज करून घेण्याची गरज असल्याने मी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा अध्यक्ष होताच कार्यकारी मंडळाच्या पहिल्या बैठकीत समग्र कृ. अ. केळूसकरांचे प्रकाशन शासनाने करावे असा निर्णय घेतला. या वाङ्मयीन जबाबदारीचे काम आमचे मित्र श्री. राजन गवस यांच्याकडे सोपविले. त्यांनी ही महत्त्वाची जबाबदारी पार पाडून मराठी भाषेतील उत्कृष्ट ग्रंथ असलेल्या गौतम बुद्धाचे चरित्राचे संपादन केले, याचा मला खूप आनंद आहे.

१३ जून, २०१८

अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई.

## संपादकीय...

गुरुवर्य केळूसकरांनी लिहिलेल्या चरित्रात गौतमबुद्धांचे चरित्र हे त्यांचे आवडते चरित्र होय. गौतमबुद्धांचे चरित्र त्यांनी 'आध्यात्मिकज्ञानरत्नावली' या मासिकात क्रमश: लिहिलेले असले तरी ग्रंथ म्हणून तो सरस असल्याचा निर्वाळा स्वत: गुरुवर्य केळूसकरांनीच दिलेला आहे. याबाबत ते स्वत:च म्हणतात, 'गौतमबुद्धांचे चरित्र लिहिण्याचे मनात आणून त्यावर प्रसिद्ध झालेले काही ग्रंथ मी वाचून काढले. आणि त्याच्या आधाराने मी त्या महापुरुषाचे चरित्र लिहिले. त्या चरित्रासाठी एकंदर अठरा पुस्तकांचे आधार मी घेतले. ही पुस्तके मी रॉयल एशियाटिक लायब्ररी येथून मिळवली. जसजसा मी या सत्पुरुषसंबंधाने वाचीत गेलो, तसतसा त्याच्याविषयीचा पूज्यभाव माझ्या ठायी वाढत गेला आणि त्यांचे चरित्र मी अत्यंत प्रेमाने लिहिले. त्यामुळे त्याची भाषा व रचना माझ्या मते अतिसुंदर झाली. एवढ्या आवडीने व प्रेमाने मी दुसरा कोणताही ग्रंथ लिहीला नाही?' या त्यांच्या निवेदनावरून त्यांनी हा ग्रंथ किती आस्थापूर्वक लिहिला आहे हे आपल्या ध्यानात येते. गुरुवर्य केळूसकर बुद्धचरित्राकडे वळले ते मुळात विनायक दादाजी यांच्यामुळे. त्यांच्याकडे रमेशचंद्र दत्त यांनी लिहिलेला 'एन्शन्ट सिविलायझेशन ऑफ इंडिया' नावाचा एक ग्रंथ होता. त्यातील बुद्धांच्या गृहत्यागाची गोष्ट गुरुवर्य केळूसकरांच्या मनावर खोलवर परिणाम करून गेली आणि त्यांनी या चरित्रग्रंथाचे लेखन केले. गुरुवर्य केळूसकरांनी हे चरित्र लिहित असताना गौतमबुद्धांच्या जन्मापासूनचे सर्व तपशील परिश्रमपूर्वक गोळा केले. याबाबत ते स्वत:च नोंदवतात, 'हा ग्रंथ लिहिताना ज्या मोठमोठ्या युरोपियन पंडितांनी या विषयावर दीर्घकाळ परिश्रम करून ते ग्रंथरुपाने जगास सुगम व सुलभ केले आहे. त्यांचा आधार आम्ही घेतला आहे. त्याचप्रमाणे जे संस्कृत ग्रंथ या विषयावर आजवर प्रसिद्ध झाले आहे, त्या सर्वांचे सहाय्य घेतले आहे.' गुरुवर्य केळूसकर प्रत्येक लेखनाआधी त्या संदर्भातील सर्व संदर्भसाहित्य सखोलपणे अभ्यासून मगच त्या लेखनाकडे वळलेले दिसतात. यामुळे त्यांच्या ग्रंथात टीपा, तळटीपा यांचा वापर विशेषत्वाने केलेला दिसतो. याबरोबरच सांख्यिकी माहितीसुद्धा आपल्या लेखात

अचूकपणे देण्याचा त्यांचा प्रयत्न विशेष उल्लेखनीय आहे. जगभरात बौद्ध धर्म, बौद्ध धर्माचे लोक अदमासे ५० कोटी असल्याचे नोंदवून त्यांनी वेगवेगळ्या देशातील बौद्ध धर्मीयांची संख्याही दिलेली आहे. ही माहिती देत असताना इतर धर्माची तुलनात्मक माहिती द्यायला ते विसरत नाहीत. गौतमबुद्धाने बौद्ध धर्माची स्थापना का केली? हे सांगताना ते लिहितात, 'पूर्वकाली जे विधी मनापासून पाळले जात असत त्याला पुढे पराकाष्ठेची कृत्रिमता आली. ऋग्वेदातील देवतांची आराधना व पूजा प्राचीन ऋषी जशी प्रेमाने व उत्कंठेने करीत असत. तशी आता मुळीच होईनाशी झाली. इंद्र, उषा, वरुण इ. देवतांच्या नामोच्चाराने प्राचीन आर्यांच्या हृदयाच्या वृत्ती व कल्पना उत्पन्न होत असत. तशा आता कोणाच्याही मनात येत नसत. साधी अर्पणाची पुरातन रीती जाऊन तिच्या जागी बिकट व नियमांचे अवडंबर माजून निरर्थक अशा प्रज्ञादिकांच्या पद्धती सुरू झाल्या. साध्या सरळ भावाने व केवळ प्रेमाने अर्पणाच्याद्वारे स्वदेवतार्पण करणाऱ्या प्राचीन ऋषींचे वंशज यावेळी एक मोठी जात होऊन वसली. ही जात असा हक्क सांगू लागली की, यज्ञादी विधी करणेचा अधिकार केवळ आपणासच आहे.' यातूनच अनिष्ट स्थिती निर्माण झाली. या स्थितीविरुद्ध अनेकांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. बुद्धांच्या आगमनापर्यंत असे पुष्कळ लोक झाले. यामध्ये सांख्यमतवाद्यांचाही उल्लेख होतो. बुद्धाने या परिस्थितीवर मात करण्यासाठी आपले धर्ममत स्थापित केले. त्याचे स्वरुप सांगताना गुरुवर्य केळूसकर लिहितात, 'तुम्ही जे काही ऐकत आला ते सारे सत्य असे मानू नका, ज्या गोष्टी पितृपुत्र परंपरेने चालत आलेल्या असतात किंवा ज्या केवळ दंतकथारुपाने जनात रुढ झालेल्या असतात, त्यावर श्रद्धा ठेवू नका. कोणत्याही गोष्टी पुष्कळ लोकांच्या तोंडी आहेत म्हणून त्या खऱ्या आहेत असे सहसा मानू नका. एखाद्या पुरातन साधूने एखादी गोष्ट लिहून ठेवली आहे म्हणून तीवर भरवसा ठेवावा असे कदापि समजू नका. नुसत्या पोकळ अनुमानावर किंवा निराधार कल्पनांवर विश्वास ठेवू नका. केवळ अभ्यासास्तव जी गोष्ट तुमच्या अंगवळणी पडलेली असते ती खरी असली पाहिजे असे कदापि समजू नका. कोणतीही गोष्ट तुमचे गुरू किंवा वडील माणसे सांगतात म्हणून खरी वाटून घेऊ नका. तर योग्य अवलोकन व सत्यासत्य विमर्षन करून जे विवेकास अनुसरुन आहे असे सिद्ध होईल व जे सदाचारप्रवृत्ति वाढवणारे असून एकंदर जनसमाजाचे हित करणारे आहे असे दिसेल त्याचा अंगिकार करून तद्नुसार स्ववर्तन ठेवण्याचा प्रयत्न करा.' गौतमबुद्धाने वरील उपदेश करून ग्रंथप्रामाण्य व आत्मवचन प्रामाण्य यावषयीचा

निकाल लावून केवळ विवेकशक्तीस प्राधान्य दिले हे गौतमबुद्धाचे सर्वात मोठे काम आहे असे गुरुवर्य केळूसकर नोंदवतात.

गौतम बुद्ध या अलौकिक धर्मसंस्थापकाने कोणत्या गोष्टी केल्या याचे निरुपण गुरुवर्य केळूसकर ग्रंथाच्या सुरुवातीलाच करतात. यामध्ये उपाध्याय वर्गाचा जो जुलूम वाढलेला होता, त्यावर गौतम बुद्धाने हल्ला केला. जातीचे जे प्रचंड बंड माजले होते. त्याला बुद्धांच्या उपदेशामुळे प्रतिकार होऊ लागला. एका पुरुषाने अनेक स्त्रियांशी विवाह करण्याची पद्धत ही अनीतीची आहे. दास्याची पद्धत सदोष व अन्यायकारक आहे. स्त्री ही पुरुषाची मालमत्ता नसून सहचारिणी आहे असा उपदेश केला. गौतम बुद्धांनी यज्ञातील पशूहिंसेस विरोध केला. प्रत्येकाने आपल्यापुरते धर्माचरण करावे ही जी रीत होती, तिच्याऐवजी धर्माचरण संघ करून करावे. स्वत:स संमत असलेल्या धर्मपंथाचा उपदेश करीत फिरावे. इतक्या गोष्टी गौतम बुद्धाने पहिल्यानेच जगामध्ये प्रविष्ट केल्या असे नोंदवून, जगभरात बौद्ध धर्माचा झालेला प्रसार गुरुवर्य केळूसकर तपशीलाने नोंदवतात आणि मग गौतम बुद्धांच्या चरित्राची कहाणी सांगायला सुरुवात करतात.

चरित्रकहाणी सांगत असताना पूर्ववय, संसारत्याग, मोक्षमार्गप्राप्ती, धर्मोपदेश, बुद्धधर्मसंस्थापना, धर्मबोधपद्धती, आयुष्यक्रम, बुद्धधर्माचे संक्षिप्त निरुपण, बुद्धधर्म प्रसाराचा इतिहास अशा विभागांमध्ये हे चरित्र मांडलेले आहे. प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीस अश्वघोषकृत बुद्धचरित्र यातील अवतरणे स्वीकारलेली आहेत. पूर्ववय या प्रकरणात उपलब्ध माहितीच्या आधारे बुद्धजन्माची कथा मांडलेली आहे. संसारत्याग या प्रकरणात बुद्धांच्या ठायी संसारद्वेष दृढ होण्यास कारण झालेल्या गोष्टींचा तपशील जसा येतो तसाच गौतमबुद्धांच्या मनातील चाललेली विचारशृंखला कधी संवादातून, तर कधी निवेदनातून गुरुवर्य केळूसकर कथन करतात. या प्रकरणाची मांडणीच उत्कंठावर्धक आणि चिंतनशील स्वरूपाची झालेली आहे. 'मोक्षमार्गप्राप्ती' या प्रकरणात तर्काआधारे बुद्धतत्त्वज्ञानाची चर्चा गुरुवर्य केळूसकरांनी केलेली आहे. या प्रकरणात 'बोधीसत्त्व तपश्चर्या करितो' या उपशीर्षकाखाली बोधीसत्त्वाने दिव्यज्ञानप्राप्तीसाठी केलेली तपश्चर्या, झालेले संवाद गुरुवर्य केळूसकर अत्यंत शैलीदार पद्धतीने वाचकांसमोर ठेवतात. आपल्याला कळालेले गहनतत्व जनास सांगण्यासाठी गौतमबुद्धाने विकसित केलेल्या उपदेशपद्धतीबाबतचे विवेचन धर्मोपदेश या प्रकरणात सविस्तर मांडले आहे. बुद्धधर्म संस्थापना या प्रकरणात भिक्षुसंघ आणि भिक्षुणीसंघ यांची आचार, व्यवहार

याबरोबरच प्रतिमोक्ष, शिष्यांना केलेले उपदेश सविस्तरपणे गुरुवर्य केळूसकरांनी नोंदवलेले आहेत. धर्मबोध पद्धती या प्रकरणात संवादाचा वापर करुन व वेगवेगळ्या कथांचा दृष्टांत देऊन गुरुवर्य केळूसकर धर्मबोध पद्धती विश्लेषित करतात. नंतरच्या प्रकरणात गौतमबुद्धाचा आयुष्यक्रम मांडलेला आहे. नवव्या प्रकरणात बुद्ध धर्माचे संक्षिप्त निरुपण करून बुद्ध धर्मप्रसाराचा इतिहास नोंदवलेला आहे.

गुरुवर्य केळूसकरांनी या चरित्राची बांधणी अत्यंत विचारपूर्वक व गोळीबंद स्वरूपात केली आहे. कोणाही वाचकास गौतम बुद्धाचा जीवनक्रम तर कळावाच, पण त्याबरोबरच बौद्ध धर्माचा इतिहास, तत्त्वे आणि आचारप्रणाली यांचीही तपशीलासह माहिती मिळावी अशी दक्षता हे चरित्र घेते. कोणाही सामान्य माणसास गौतम बुद्ध आणि त्याचा धम्म अत्यंत सोप्या व लक्षवेधी पद्धतीने सांगणारे हे चरित्र आहे. गुरुवर्य केळूसकर या चरित्रात भाषेचे बहुविध प्रयोग करतात. उपोद्घातातील भाषा आणि प्रत्यक्ष जीवनवृत्तांत कथनातील भाषा यामध्ये हेतूत: वेगळेपण निर्माण करून एका गंभीर व महत्त्वाच्या विषयास सहज सोपेपण प्राप्त करून देतात. वाचणाऱ्याचे मनपरिवर्तन करून वर्तन बदल घडवण्याचे सामर्थ्य या चरित्रग्रंथात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौथीची परीक्षा पास झाल्यानंतर त्यांच्या समाजाने केलेल्या सत्कारात समारंभाचे अध्यक्ष असणाऱ्या गुरुवर्य केळूसकरांनी त्यांच्या हातात गौतम बुद्धाचे चरित्र या ग्रंथाची प्रत भेट म्हणून दिली, आणि या ग्रंथाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चित्त वेधले व बौद्ध धर्माच्या अधिक अभ्यासास प्रवृत्त केले, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वत:च नोंदवून ठेवले आहे. यावरून या ग्रंथाचे महत्त्व अधोरेखित होते.

वाङ्मयमहर्षी गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकरांचे वाङ्मयातील व सामाजिक कार्यातील असामान्य कर्तृत्व जाणून घेऊन महाराष्ट राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मा. बाबा भांड व मंडळातील त्यांचे सहकारी, मंडळाच्या सचिव मिनाक्षी पाटील यांनी ह्या महत्त्वकांक्षी प्रकल्पाची जबाबदारी महाराष्ट्र शासनाच्या वतीने माझ्यावर सोपवून माझ्यावर जो विश्वास दाखवला त्या बद्दल त्यांच्या ऋणातच असणे मी पसंत करतो. महाराष्ट्र शासनाच्या उदार व वाङ्मयप्रेमी दृष्टिकोणाचा मी कृतज्ञपूर्वक उल्लेख करतो.

हा प्रकल्प पूर्ण करताना अनेकांचे सहकार्य लाभले. सतीश बडवे, प्रकाश पवार, अवनीश पाटील, प्रवीण बांदेकर, नीतीन रिंढे, रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे, अरुण शिंदे, नीला जोशी यांनी गरुवर्य केळूसकरांच्या ग्रंथांना अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहून

दिल्या. त्यासाठी त्यांनी बरेच परिश्रम घेतले. तसेच रफिक सूरज, शोभा नाईक, सुजय पाटील, अनिल गवळी, रमेश साळुंखे, गोमटेश्वर पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांचे आभार मानणे त्यांना आवडणार नाही. कारण हे सर्व अभ्यासक व्रतस्थ वाङ्मय सेवक आहेत. या ग्रंथाचे संकलन करण्यात साकेत बाबा भांड यांनी केलेली मदत मोलाची आहे. याबरोबर हे प्रकल्प काम पूर्ण करण्यास आप्पासाहेब बुडके, तेजस चव्हाण, राजेश पाटील, नवनाथ गोरे, संदीप मुंगारे, प्रदीप पाटील, निहाल शिपुरकर यांची मदत झाली. त्यांचे मनःपूर्वक आभार. त्या बरोबरच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयचे ग्रंथपाल, सा.वा.ना. नाशिक, श्रीराम वाचन मंदिर सावंतवाडी, करवीर नगर वाचन मंदिर कोल्हापूर, बॅ. खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर या बरोबरच महाराष्ट्रातील अनेक ग्रंथालयाच्या ग्रंथपालांनी विशेष मदत केली. त्यांचे मनःपूर्वक आभार. या शिवाय या प्रकल्पास मदत करणाऱ्या सर्व ज्ञात अज्ञातांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतो. ह्या प्रकल्पाचे वाचक मनापासून स्वागत करतील अशी खात्री आहे. या प्रकल्पात काही त्रुटी असेल तर ती माझी असेल मात्र चांगल्याचे सर्व श्रेय बाबा भांड आणि त्यांचे सहकारी यांचे आहे. धन्यवाद!

**– राजन गवस**

## प्रस्तावना...

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी गौतम बुद्धाच्या अभ्यासाला सुरूवात झाली. नेमक्या त्याच काळात कृष्णराव केळूसकरांनी यांनी गौतम बुद्ध चरित्र लिहिले. त्या काळात पूर्व भारतातील आणि पश्चिम भारतातील उच्च वर्गीय लोक बुद्ध परंपरेकडे वळले होते. तेंव्हा सत्यशोधक चळवळ कृतीशील होती. तसेच त्यानंतर ब्राह्मणेत्तर चळवळ कृतीशील झाली. गुरूवर्य केळूसकर सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेत्तर चळवळ, बुद्ध चळवळीला जोडणारे महाराष्ट्रातील महत्त्वाचे दुवा होते. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बौद्ध विचारांचे मर्म ओळखले होते. त्यांनी बौद्ध धर्माला त्यांच्या वाड्यात मदतीचा हात पुढे केला होता. महाराजा सयाजीराव गायकवाडाप्रमाणे ब्राह्मणेत्तर चळवळीत बुद्ध विचारांचा गंभीरपणे विचार करणारे गुरूवर्य केळूसकर हे महत्त्वाचे विचारवंत होते. गुरूवर्य केळूसकरांनी अगदी सुरूवातीला बुद्ध चरित्रांच्या साधनांचे संकलन केले. तसेच काळाच्या पडद्याआड गेलेले सर्जनशील व्यक्तिमत्व त्यांनी अध्यात्मिकज्ञानरत्नावली या मासिकात मांडून दाखवले त्याचेच रुपांतर गौतम बुद्ध चरित्रात झाले. विशेष म्हणजे गायकवाड ओरिएंटल सिरीजमध्ये हे चरित्र प्रकाशित झााले. या चरित्राशी गुरूवर्य केळूसकर आणि सयाजीराव गायकवाड हे या चरित्राशी जैव पद्धतीने जोडले गेलेले आहेत. त्यांना मुख्य परंपरेचे आत्मभान होते. म्हणून त्यांनी हा वारसा जतन केला. पुढे हे चरित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना गुरूवर्य कृष्णराव केळूसकर यांनी भेट दिले. या संदर्भानुसार सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेत्तर चळवळ, दलित चळवळ, बुद्ध चळवळ यांना जोडण्याचे काम गुरूवर्य केळूसकर व गायकवाड ओरिएंटल सिरिजने केले आणि त्यांनी उच्च वर्गात अडकलेले गौतम बुद्ध त्यांनी ब्राह्मणेत्तर समाजात आणले. त्यांचे धार्मिक कार्य मानवी समाजाला वळण देणारे ठरले.

गौतम बुद्ध चरित्र उपोद्घातासह दहा प्रकरणामध्ये कृष्णराव अर्जुन केळूसकरांनी मांडले. प्रकरण क्रमांक चार ते नऊ मध्ये संस्थांची पुनर्रचना व मूल्यांची पुनर्मांडणी केळूसकरांनी केली आहे (मोक्षमार्गप्राप्ती, धर्मोपदेश, बुद्ध धर्म संस्थापना, धर्मबोध

पद्धती, आयुष्यक्रम आणि बुद्ध धर्माचे संक्षिप्त निरुपण). 'पूर्ववय' व 'संसारत्याग' ही आरंभीची दोन प्रकरणे नवनिर्मितीची दिशासूचक आहेत. तर शेवटचे प्रकरण विस्तार व ज्ञानाच्या शुद्धीकरणाचा आशय मांडते (बुद्ध धर्म प्रसाराचा इतिहास). केळूसकरांनी अशी या चरित्राची संरचना (रूपबंध) केली होती. हे चरित्र केळूसकरांनी जनांसाठी (मासेस) लिहिले होते. चरित्र नायकाची व्यक्तिरेखा (गौतम बुद्ध) जनवादी (समूहलक्षी) अशी उभी केली आहे. चरित्र नायकाचे ध्येय जन दु:खमुक्तीचे आहे. जन (मासेस) आणि अभिजन असा मर्मभेदी फरक चरित्रामध्ये झाला आहे. या दोन्ही संकल्पनापैकी जनांसाठीची नीतितत्त्वे या चरित्र नायकाच्या व्यक्तिरेखेमध्ये खच्चून भरली आहेत. चरित्र नायकाच्या खेरीज इतर व्यक्तिरेखांमध्येदेखील अनुभववादी ज्ञानाचा उगम दिसतो. या चरित्रामध्ये 'जन' ही संकल्पना सातत्याने वापरलेली आहे. जनांच्या बद्दलची परहितनिष्ठा चरित्रामध्ये वेगवेगळ्या प्रकारे अभिव्यक्त झाली आहे. अभिजात आणि अभिजनवादी व्यक्तिरेखा या हतबल झालेल्या म्हणून चरित्रामध्ये येतात. त्या व्यक्तिरेखा अउपयुक्तज्ञानाच्या वाहक आहेत (देहदंड, होमहवनादी वैदिक विधी इत्यादी). चरित्र नायकाच्या उद्देशाचा प्रचार व प्रसार प्रचंड झाला. म्हणजे चरित्र नायक सामाजिक, नीतिवादी, राजकीय क्रांती घडवतो. त्यांची प्रभाव क्षमता प्रचंड आहे. त्यास अभिजात व अभिजन वर्गांतून प्रचंड विरोध सुरू झाला. अल्पमात्र ज्ञान एकोणिसाव्या शतकामध्ये शिल्लक राहिले नाही, असे केळूसकरांचे परखड आणि स्पष्ट मत आहे. म्हणजेच चरित्र नायकाच्या विरोधात प्रतिक्रांती घडली. त्या प्रतिक्रांतीला केळूसकरांनी विरोध केला. प्रतिक्रांतीशी संघर्ष करून त्यांनी दु:खमुक्तीच्या जनांच्या नायकाची कथा या चरित्रामध्ये नव्याने मांडली. त्यामुळे चरित्राचे लेखक स्वत: सांस्कृतिक क्रांतीकारक आहेत. या त्यांच्या क्रांतीकारी रूपामुळे ते अपरिचित राहिले.

माहितीचा स्फोट झालेल्या युगातदेखील कृष्णराव अर्जुन केळूसकरांचे विचार आणि कार्य अपरिचित राहिले. परंतु, धावता आढावा घेतला तरी असे लक्षात येते की, केळूसकरांच्या वैचारिक कार्यांची व्याप्ती प्रचंड मोठी होती. ते सत्यशोधक, ब्राह्मणेत्तर चळवळीतील एक नेते होते. त्यांनी गीता आणि बुद्ध नीतीवर भाष्य केले. या अर्थाने ते गीता व बुद्ध नीतिचे भाष्यकार होते. एकोणिसाव्या शतकामध्ये त्यांनी चरित्र लेखन केले. त्यामुळे ते चरित्र लेखक होते. केळूसकर हे व्यक्ती, समेष्टी (जातीसंस्था, धर्मसंस्था, कुटुंबसंस्था) व राजकारण (राज्यसंस्था, राजकारण, सत्ताकारण, नेतृत्व, चळवळी), विज्ञान यांचे सर्जनशील अभ्यासक होते. भौतिक आणि सांस्कृतिक जीवनातील सहसंबंधाचे आत्मभान त्यांच्या साहित्यामध्ये सुस्पष्टपणे दिसते. समग्र

मानवी जीवनाच्या विविध अंगाचे सूक्ष्म अनुभववादी निरीक्षण त्यांचे होते. या गोष्टी त्यांच्या समग्र साहित्यामध्ये दिसतात. त्यांनी लिहिलेल्या गौतम बुद्धाचे चरित्राची मुख्य चौकट ही संस्थांची पुनर्रचना (व्यक्ती, समाज, राज्य) व मूल्यांची (स्वतंत्र्य, समता, बंधुभाव) पुनर्मांडणी अशी दुहेरी आहे. दुसऱ्या शब्दांत या दोन चरित्रामधील केळूसकरांच्या मुख्य दोन संकल्पना आहेत. या चौकटीमध्ये जुन्या संरचनाबद्दल त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांची मानवी जीवनातील उपयुक्तता तपासली. त्यांच्या कार्य व अधिकारांची सीमारेषा या चरित्रामध्ये निश्चित केली आहे. किंबहुना जुन्या संस्थांचे सत्ता व अधिकार कमी केले. एवढेच नव्हे तर अप्रत्यक्षपणे त्यांचे सत्ता व अधिकार काढून घेतले गेले. त्यांचे मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठत्व नाकारण्यात आले. या पुनर्रचनेच्या सोबत या चरित्रामध्ये जुन्या श्रद्धा व विषमतावादी मूल्यांबद्दल प्रश्नचिन्ह उभे केले. जुन्या विषमतायुक्त मूल्यांचे निमूर्लन करून त्या जागी नवीन मानवतावादी मूल्यांची पुनर्मांडणी या चरित्रामध्ये केली. यामुळे व्यक्ती, समाज, राज्यसंस्था, धर्मसंस्था, कुटुंबसंस्था यांची पुनर्व्याख्या झाली. त्यांच्यातील संबंधाचीदेखील पुनर्व्याख्या झाली. मूल्यांचे अर्थ बदलले गेले. मूल्यांना नवीन मानवतावादी अर्थ प्राप्त झाले. संस्थांची पुनर्रचना व मूल्यांची पुनर्मांडणी या गोष्टी या चरित्राचा मध्यवर्ती आशय केळूसकरांनी ठरविला होता, असा अर्थ लागतो. संस्थांची पुनर्रचना व मूल्यांची पुनर्मांडणीचा मुख्य उद्देश सामाजिक सलोखा आणि भौतिक दु:खमुक्ती करण्याचा चरित्रामध्ये केळूसकरांनी मांडलेला आहे. या चौकटीमध्ये गौतम बुद्धाचे चरित्र केळूसकरांनी मांडले आहे. सत्यशोधक, ब्राह्मणेतर चळवळीतील मोजक्या नेत्यांपैकी केळूसकर हे एक विचारवंत होते. त्यामुळे या चरित्राचा सारांश आणि दोन ओळीच्यामधील अर्थबोध हा त्या चळवळीतील एका राजकीय विचारांचे प्रतिनिधित्व करणारा म्हणूनही व्यक्त होतो. या चरित्राला त्या काळाची आणि वासहतिक राज्यांची मर्यादा होती (Time and Pace). परंतु, गौतम बुद्ध चरित्रामधून मांडलेला दृष्टिकोन, संकल्पना या सिद्धांताच्या स्वरूपातील देखील आहेत. सिद्धांताचा येथे अर्थ नियम किंवा तत्त्व असा होतो. या चरित्रातील सिद्धांत किंवा तत्त्व पुढे विकसित होत गेली. उदा. शांततावाद, सत्य, अहिंसा, सत्यागृह, धम्म (नीती), प्रतिकार, सत्याचा आग्रह (सनदशीर संघर्ष) इत्यादी. या सर्वच सिद्धांताची आरंभीची रूपे केळूसकरांच्या गौतम बुद्ध चरित्रात व्यक्त झाली आहेत. पुढे ती महर्षी वि. रा. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, डी. डी. कोसंबी यांनी शास्त्रशुद्धपणे विकसित केली.

एवढेच नव्हे तर केळूसकरांच्या लेखनाची दखल न्या. महादेव गोविंद रानडे, भांडारकर यांनी समकालीन युगात घेतली होती. सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ आणि बुद्ध यांची सांधेजोड महर्षी वि. रा. शिंदे, महाराज सयाजीराव गायकवाड, नारायण नवलकर यांनी केली होती. महाराज सयाजीराव गायकवाडांनी तर बडोद्यात बुद्ध जयंती साजरी केली. तसेच बौद्ध धर्माच्या अभ्यासाला व बौद्ध ग्रंथाच्या प्रकाशनाला मदत केली. महर्षी वि. रा. शिंदे यांनी १९०६ पासून बुद्ध जयंती दरसाल साजरी केली. १९३३ साली वाई येथे ब्राह्मो समाजाची स्थापना बुद्ध जयंतीच्या दिवशी केली होती. ब्राह्मो समाजाच्या कलकत्ता येथील मेळाव्यात शिंदेनी बुद्धिस्ट असल्याचा दावा केला होता. (मी बुद्धिस्ट आहे) नवलकरांनी गौतम बुद्धाला पहिला सत्यशोधक वीर संबोधिले होते. ब्राह्मणेतरांच्या राजकारणात ही परंपरा मध्यवर्ती झाली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधुनिक मूल्याची प्रेरणा बुद्धापासून घेतली. त्यांनी 'बुद्ध आणि त्याचा धम्म' हे पुस्तक लिहिले आणि बौद्ध धर्म स्वीकारला. धर्मानंद कोसंबी व दामोदर कोसंबी हे बौद्ध परंपरेचे अभ्यासक झाले. देहू परिसरातील लाकडी नांगर बौद्धांनी महाराष्ट्रात आणलेला आहे, असे त्यांचे मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धर्मानंद कोसंबी व दामोदर कोसंबी यांचे विचार आणि कार्य केळूसकरांच्यापेक्षा स्वतंत्रपणे विस्तारत गेले. परंतु, आरंभीचे केळूसकरांचे गौतम बुद्धाचे चरित्र चित्तवेधक ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेमधील संस्थांची व मूल्यांची पुनर्मांडणी करताना बुद्धाची दृष्टी त्यामध्ये फेरबदल करून सामील केली. अशा या बौद्ध स्कूलचे आधुनिक महाराष्ट्राच्या राजकीय विचाराचे आद्य शिल्पकार कृष्णराव अर्जुन केळूसकर हे ठरतात. असे असूनही ते आरंभी नोंदविल्याप्रमाणे अपरिचित राहिले.

## अभ्यासाची पद्धती

गौतम बुद्धांच्या चरित्राचे नीटनेटके आकलन होण्यासाठी केळूसकरांच्या या चरित्र लेखनाची अभ्यासपद्धती समजून घ्यावी लागते. चरित्रामध्ये अभ्यास पद्धती नोंदविलेली नाही. परंतु चरित्राची जी मांडणी झाली आहे, त्या मांडणींतर्गत चरित्राची अभ्यासपद्धती व्यक्त होत जाते. या अभ्यासपद्धतीची मुख्य तीन वैशिष्ट्ये दिसतात. (ज्ञानमीमांसा, मूल्यमीमांसा, सत्तामीमांसा) केळूसकर अप्रत्यक्षपणे ज्ञानमीमांसा करतात. (Epistemology) ज्ञान म्हणजे काय? आणि ज्ञान कसे प्राप्त होते? या प्रश्नांच्या मुळाशी केळूसकर त्यांच्या साहित्यामध्ये जातात. जार्ज बर्कले, जॉन लॉक, डेविड ह्यूम यांची ज्ञानमीमांसा आणि केळूसकरांची ज्ञानमीमांसा यांच्या काही मुद्यांवर साम्यस्थळे

दिसतात. ही साम्यस्थळे म्हणजे अनुभववाद आणि मानवी प्रकृतीमधून ज्ञानाचा शोध घेतलेला दिसतो. ज्ञान, ज्ञाता आणि ज्ञेय यांचे संबंध केळूसकरांच्या साहित्यामध्ये व्यक्त झाले आहेत. अनुभवानुसार विश्लेषण केळूसकरांनी केले आहे. गौतम बुद्ध चरित्रामध्ये केळूसकरांनी एका अनुभवापेक्षा इतरांचे अनुभव प्रमाण मानलेले आहेत. व्यक्तिगत अनुभवाबरोबर सामाजिक अनुभवाला त्यांनी ज्ञानमीमांसेत स्थान दिले. त्यामुळे केळूसकरांचे गौतम बुद्ध चरित्र ही केवळ व्यक्तिगत चेतना राहत नाही, तर ती सामाजिक चेतना होते. ज्ञानापेक्षा वेगळा ज्ञाता आहे. ज्ञान हे एकापेक्षा जास्त ज्ञातांच्या अनुभवाचा परिणाम आहे. ज्ञानाचा विषय ज्ञानापेक्षा वेगळा आहे. या तीन गोष्टी गौतम बुद्ध चरित्रात येतात. अनुभवी व्यक्तीचा अनुभव म्हणजे सत्य किंवा ज्ञान होय. अनुभव अनुभवीच्या क्रियेतून बनतो. गौतम बुद्ध चरित्रामध्ये प्रपंच म्हणजे अनुभवीचा अनुभव होय. या चरित्रामधील ज्ञान हे प्रभाव (गुणाचा बोध) आणि त्यांच्या प्रतिकृतीमध्ये (प्रतिबिंब) दिसते. या चरित्रामध्ये अनुभवामधून ज्ञानाचा आरंभ होऊन देखील त्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न केळूसकरांचा दिसतो. अनुभवाच्या जडणघडणीत विवेकाला महत्त्व या चरित्रामध्ये दिले गेले आहे. चरित्रामध्ये अभ्यासाच्या शिस्तीमधील ज्ञान आणि व्यवहारी ज्ञान यामध्ये फरक केला गेला आहे. अभ्यासाची शिस्त किंवा पद्धती ज्ञान देते परंतु, त्यापेक्षा वेगळा मनुष्य आहे. वेगळा म्हणजे मनुष्य हा नैतिक प्राणी आहे. नैतिक निवडीचे स्वातंत्र्य येथे गाभ्याचे आहे. म्हणजेच कशाची निवड करावी आणि कोणता भाग सोडून द्यावा, हा मुद्दा चरित्रामध्ये येतो. म्हणून केळूसकरांच्या चरित्र विवेचनामध्ये नीतीचा मुद्दा विस्तारत जातो. चरित्रामध्ये नीतीचा मुद्दा समाविष्ट केला गेला आहे. म्हणून या चरित्रामध्ये सदाचार आणि सुख यांची सांधेजोड केलेली दिसते. या अर्थाने केळूसकरांनी अभ्यासाच्या शिस्तीमधील ज्ञानापेक्षा व्यवहारी ज्ञानाला जास्त महत्त्व दिले आहे, ही केळूसकरांची सत्य किंवा ज्ञानाला प्रमाण मानण्याची पद्धती आहे. केळूसकरांनी या चरित्रामध्ये विषयवस्तूचे दोन भागात विश्लेषण केले आहे. विषयवस्तूचा आरंभीचा भाग हा तथ्य म्हणून वर्णनात्मक स्वरूपात येतो. तर विषय वस्तूचे निरुपण किंवा विवेचन हे मूल्य म्हणून चरित्रात आले आहे. त्यामुळे गौतम बुद्ध चरित्रामध्ये मूल्यमीमांसा केली गेली आहे. नीतिच्या मूल्यांचे मापदंड केळूसकरांनी या चरित्रामध्ये वापरले आहेत. मतितार्थ, ज्ञानमीमांसा, सत्तामीमांसा आणि मूल्यमीमांसा केळूसकरांनी या चरित्रामध्ये केली आहे. हा मुद्दा केळूसकरांच्या अभ्यासपद्धतीत अलक्षित राहिलेला आहे. या मुद्याला समजून घेतले तरच केळूसकरांच्या गौतम बुद्ध चरित्राचे समतोल आकलन होऊ शकते.

केळूसकरांनी ज्ञानमीमांसा, सत्तामीमांसा आणि मूल्यमीमांसा समजून घेऊन एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी गौतम बुद्धाचे चरित्र लिहिले. त्या दरम्यान केळूसकरांनी संत तुकाराम आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिले. म्हणजे या तीन चरित्र लिहिण्याचा कालावधी एकोणिसाव्या शतकातील शेवटचे दशक आणि विसाव्या शतकातील आरंभीचे दशक हा होता. या दोन दशकामध्ये त्यांनी ही तीन चरित्रे लिहिली. यापैकी गौतम बुद्धाचे चरित्र संत तुकाराम आणि छत्रपती शिवाजी महाराज या दोन चरित्राच्यामध्ये लिहून झाले. त्यामुळे एकूण तीन चरित्रामध्ये प्रबोधनाची दृष्टी दिसते. ते पर्व प्रबोधनाचे होते (Renaissance). म्हणजेच सांस्कृतिक चळवळीचे होते. या चळवळीमध्ये व्यक्ती ही साध्य आहे. (साधन नव्हे) सर्व सृष्टीमध्ये माणूस हाच केंद्रस्थानी असून बुद्धी, सद्‌गुण, संशोधकता आणि प्रायोजकतेचा उद्‌गाता मनुष्य आहे. सर्व मूल्यांचा कर्ता किंवा निर्माता हा माणूस आहे. अशा विचारांचा या पुस्तकावर प्रभाव खोलवर पडलेला आहे. मानवी कर्तृत्वावर भर दिल्यामुळे कोणत्याही अमानवी श्रद्धेला या चरित्रामध्ये विरोध झाला आहे. अमानवी श्रद्धा नाकारली आहे. माणसाच्या ज्ञान ग्रहन करण्याच्या क्षमतेवर केळूसकरांचा विश्वास दिसतो. अंगभूत सद्‌गुणावर भिस्त ठेवली गेली. या अंगभूत सद्‌गुणाच्या आधारे मानवी जगातील दुःखाचा परिहार करता येतो. मानवी जगातील दुःखाचा परिहार मानव करेल, असा आशावाद मानतावादामध्ये आहे. यावरील केळूसकरांचा ठाम विश्वास व्यक्त झाला आहे.

## प्रबोधन पर्वातील दृष्टी

केळूसकरांनी प्रबोधनातून आलेल्या आधुनिकतेच्या आधारे व्यक्ती, समष्टी आणि राज्य यांची नव्याने पुनर्मांडणी या चरित्रामध्ये केली आहे. प्रबोधन पर्वातील आधुनिक दृष्टी असण्याबरोबर त्यांनी भारतीय परंपरेमधील आधुनिक मूल्यांचा शोध घेतला आहे. प्रबोधन पर्वातील आधुनिक मूल्यांनी दिपून न जाता ती मूल्ये भारतीय परंपरेमध्ये होती. याचे आत्मभान केळूसकरांना दिसते. त्यामुळे केळूसकर पाश्चिमात्य आधुनिकतेशी भारतीय परंपरेचा सांधा जोडतात. केळूसकर संपूर्ण भारतीय परंपरा त्याज्य ठरवत नाहीत. आधुनिकता आणि परंपरा याचे द्वैत उभे न करता या दोन्हीमध्ये संवाद केळूसकर घडवितात. कर्मसिद्धान्त, पुनर्जन्म, अध्यात्म या गोष्टी गौतम बुद्ध चरित्रामध्ये आलेल्या आहेत. परंतु, या गोष्टी केळूसकरांनी नाकारलेल्या दिसतात. अहिंसा, मनपरिवर्तन, सामाजिक उत्तरदायित्व (डेलळरश्र जलश्रळसरींळेप), मानवी जीवनातील प्रत्यक्ष दुःखमुक्ती या गोष्टी चरित्राचा मध्यवर्ती विषय आहेत. मानवाची

काळजी, मानवाला आकार देणे, मानवाची दुःखापासून मुक्ती, मानवाची हिंसेपासून मुक्ती, कर्मकांड–यज्ञ, तंत्र, मंत्रापासून मुक्ती, शास्त्रापासून मुक्ती, सामाजिक संबंधाची नीतिच्या आधारे पुनर्रचना, जातसंस्थेपासून मुक्ती हा त्यांचा भौतिक आणि सांस्कृतिक असा दुहेरी नवरचनेचा विचार होता. तोच या चरित्राचा मुख्य आशय आहे. याअर्थी, केळूसकरांचा गौतम बुद्ध चरित्र लेखनाचा हा प्रयत्न नवनिर्मितीचा आहे. नवा माणूस व नवा समाज घडविण्याचा आहे. आंतोनिओ ग्रामची या इटालियन मार्क्सवादी विचारवंताच्या प्रिझन नोटबुक्समध्ये वैचारिक प्रभुत्वाचे क्षेत्र, अशी एक संकल्पना आढळते. हेजेमनी हे संमतीचे क्षेत्र आहे. या संकल्पनेप्रमाणे केळूसकरांनी प्रस्थापित राज्यकर्त्या वर्गाचे वैचारिक क्षेत्रातील प्रतिनिधित्व करणारे घटक नाकारले आहेत. त्या जागी बहुजनांचे वैचारिक प्रभुत्वाचे पर्यायी क्षेत्र या चरित्रामध्ये मांडलेले आहे. मतितार्थ, भौतिक घटकांच्याबरोबर केळूसकरांनी पर्यायी वैचारिक प्रभुत्वाच्या क्षेत्राला आधोरेखित केले आहे. ही त्यांची भूमिका त्यांच्या लेखनामधून दाखविता येते. कारण, कृष्णाजी अर्जुन केळूसकरांनी विपूल लेखन केले. तसेच समाजकारणावर व राजकारणावर प्रभाव टाकणाऱ्या ग्रंथाचा मराठी अनुवाद केला. धार्मिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अशा नानाविध क्षेत्रांची चिकित्सा केली. त्याबरोबरच त्या क्षेत्रामध्ये एक दृष्टी, अंतरदृष्टी आणि दूरदृष्टी विकसित केली. याअर्थी, कृ. अ. केळूसकरांची वर नोंदविलेल्या नानाविध क्षेत्रामध्ये सुस्पष्ट अशी एक भूमिका होती. गीता विवरण असो की गौतम बुद्ध, संत तुकाराम आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र त्यामध्ये त्यांची सुस्पष्ट अशी भूमिका दिसते. त्यामुळे ते तटस्थवृत्तीचे केवळ लेखक नव्हते, तर एक विशिष्ट असा नानाविध क्षेत्रात हस्तक्षेप करणारे सर्जनशील विचारवंत होते. सत्यशोधक–ब्राह्मणेतर चळवळीतील कार्यकर्ते व नेतेदेखील होते. या अर्थाने कृ. अ. केळूसकरांची वैचारिक जडणघडण तत्त्वविचार आणि चळवळ यांचा सांधेजोड करणारी होती. पाश्चिमात्य आणि भारतीय अशा दोन्ही विचारांचे त्यांचे सखोल आकलन होते. *गीता विवरण, उपनिषदांचे विवरण, गौतम बुद्ध व संत तुकाराम चरित्र* हे सर्व ग्रंथ मराठीत पहिल्यांदाच लिहिले गेले होते. चरित्र लेखनाचे पद्धतीशास्त्रदेखील आधुनिक भारतात नीटनेटके विकसित झाले नव्हते. ईश्वराच्या संकल्पनेची सांधेजोड भौतिक जीवनाशी करण्याची परंपराही विकसित होण्याचा हा प्रारंभीचा काळ होता. उपलब्ध साहित्य आणि संस्कृतीचा अन्वयार्थ लावण्यास नुकतीच सुरुवात झाली होती. एवढेच नव्हे तर भारतीय समाजमन मध्ययुगातून

आधुनिक युगात येऊनही फार काळ गेलेला नव्हता. व्यक्ती, समाज, राज्य अशा विविध गोष्टी मध्ययुगातील ताज्य होत्या. आधुनिक युगामध्ये प्रवेश करूनही ज्ञानाच्या संकलनाची, ज्ञानाच्या जोपासनेची, ज्ञानाचा व्यवहार करणारी साधनसामुग्री अत्यंत तुटपुंजी होती. याबरोबर कृ. अ. केळूसकर हे ज्ञानाची जिज्ञासा असलेले बहुजन होते. त्यांना ज्ञानाची फार चांगली परंपरा नव्हती. तरीही त्यांनी एकाच वेळी नानाविध क्षेत्रांमध्ये रस घेतला. त्या क्षेत्रांमध्ये त्यांनी आरंभी भर तर घातली याशिवाय एक नवीन दूरदृष्टी दिली. ते बहुजन समाजातील मोजक्या विचारवंतापैकी एक होते. त्यांचे वेगळे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांना वि. रा. शिंदे प्रमाणे समाजशास्त्रीय अंतर्दृष्टी व दूरदृष्टी होती. चळवळ, धर्म, समाज, साहित्य, संस्कृती अशा नानाविध क्षेत्रातील ज्ञान उपासनेमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व समग्र आणि सेंद्रिय अशा प्रकारचे होते. तरी ते नास्तिक होते. तसेच बुद्धिवादी आणि नीतिवादी होते. एवढेच नव्हे तर नीतिप्रसार मंडळी स्थापन करून त्यांनी धर्म आणि नीती यांची फारकत करण्याचा प्रयत्न केला. हा सर्व तपशील देण्याचे कारण म्हणजे कृ. अ. केळूसकरांची दृष्टी सखोल होती. त्यामुळे गौतम बुद्धाचे चरित्र सकस झाले आहे. त्यामध्ये धार्मिक, सामाजिक नीती विषयक अंतर्दृष्टी-दूरदृष्टी आहे, हे वेगळे सांगण्याची गरज पडत नाही.

## ज्ञानाची उत्पत्ती

गौतम बुद्ध चरित्रात ज्ञानाची जिज्ञासा स्पष्ट दिसते. ज्ञानाची जिज्ञासा दुःखमुक्तीसाठी महत्त्वाची आहे. ज्ञान कशासाठी याचे साधे उत्तर दुःखमुक्तीसाठी, असे चरित्रामध्ये स्पष्ट केले आहे. दुःखमुक्तीची व्याख्या मरण, रोग, जरा, कामनांविषयी प्रीती अशा संदर्भात कृ. अ. केळूसकरांनी स्पष्ट केली आहे. तृप्तीविषयी लालसा, कामनांविषयी प्रीती, मरण, जरा, रोग या गोष्टी भौतिक स्वरूपाच्या आहेत. तसेच राज्यसंस्था (राजा), सैनिक (सरसेनापती) या गोष्टी थेट भौतिक नाहीत. परंतु, भौतिक गोष्टी आणि भौतिकेतर गोष्टी यांचा सहसंबंध या चरित्रात त्यांनी स्पष्ट केला आहे. राज्यसंस्था आणि राज्यसंस्थेचे उपअंग म्हणजे सरसेनापती यांची सत्ता, अधिकार कमी करण्याचा अन्वयार्थ चरित्रामध्ये लावलेला आहे. यामुळे ज्ञान कोणासाठीची लेखकाची व्याख्या व्यापक आहे. या चरित्रामध्ये व्यक्ती, समाज, राज्यसंस्था यांच्यासाठी ज्ञान महत्त्वाचे मानले आहे. या अर्थाने ज्ञान कशासाठी तर, दुःखमुक्तीसाठी होय. परंतु, दुःखाचे कारण भौतिक असण्याबरोबरच राज्यसंस्थेची सत्ता व अधिकार हे देखील दुःखाचे मुख्य कारण स्पष्ट केले आहे. या खेरीज तिसरे महत्त्वाचे दुःखाचे कारण संपत्तीदेखील

असल्याची चर्चा केली गेली आहे. म्हणजेच व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समाज, व्यक्ती-धर्म, व्यक्ती-राज्यसंस्था, व्यक्ती-संपत्ती यांच्यातील संबंधाची पुनर्रचना करण्याची मांडणी चरित्रामध्ये येते. ज्या परिस्थितीमध्ये व्यक्ती, समाज, धर्म, राज्यसंस्था, संपत्ती, नीती आहे, त्यापेक्षा जास्त उन्नत व प्रगत अवस्थेत घेऊन जाण्याचा विचार चरित्रामध्ये सहजपणे येतो. याअर्थी, हे चरित्र शोषणमुक्तीकडे लक्ष वेधून घेते. ज्ञानाची उत्पत्ती लेखक कशी शोधतात, ज्ञानाचा उगम त्यांना कोठे दिसतो, हे प्रश्न चरित्रात अलिखित स्वरूपात शोषणमुक्तीशी संबंधीत आले आहेत.

ज्ञानाची उत्पत्ती लेखकाला या चरित्रामध्ये औपचारिक ज्ञान साधनेमध्ये दिसत नाही. त्यामुळे संपूर्ण चरित्रामध्ये प्रस्थापित औपचारिक संरचनेमधील ज्ञानाच्या उत्पत्तीचा प्रतिवाद लेखक करत जातात. गौतम बुद्धाचे चरित्र म्हणजे औपचारिक ज्ञान साधनेची संरचना (योग, ज्ञान, यज्ञ, अध्यात्म इ.) आणि कार्यपद्धती (योगमार्ग, कर्ममार्ग, तंत्रमार्ग) नाकारणारे चरित्र असे स्वरूप लेखक मांडतात. औपचारिक ज्ञान साधनेची संरचना, कार्यपद्धती आणि दुःखमुक्ती यांचा संबंध काहीही दिसत नाही. याअर्थी, ज्ञान साधनेची संरचना दुःखमुक्ती करू शकत नाही. उलट ज्ञानाची संरचना व कार्यपद्धती दुःखाची तीव्रता वाढवते, असे विवेचन चरित्रामध्ये केले गेले आहे. थोडक्यात ज्ञानाची संरचना व कार्यपद्धती दुःखमुक्तीसाठी ज्ञानाची उत्पत्ती करत नाही. म्हणून केळूसकरांनी पर्यायी ज्ञानाची उत्पत्ती या चरित्रामध्ये मांडली. कृ. अ. केळूसकरांनी ज्ञानाची उत्पत्ती वर्ग रचनेतील कनिष्ठ स्तरामधून होते, अशी भूमिका घेतली. (पशुपालक, शुद्र आणि स्त्री). भारतीय समाज व्यवस्थेमध्ये पशूपालक, स्त्री-शुद्र यांचे सामाजिक स्थान कनिष्ठ पातळीवरील आहे. सत्ता, अधिकार, संपत्ती, प्रतिष्ठा नाही, असे हे दोन वर्ग आहेत. त्यांच्याकडून गौतम बुद्धाला ज्ञानप्राप्ती होते. म्हणजेच ज्ञानाची उत्पत्ती कनिष्ठ स्तरामधून होते, अशी लेखकाची भूमिका या चरित्रामध्ये दिसते. कनिष्ठ स्तर थेट व्यवहार करतो, त्या प्रपंचामधून ज्ञानाचा उगम होतो. तसेच प्रपंचामधून दुःखाची मुक्ती होते, अशी दुहेरी भूमिका त्यांची दिसते तसेच (प्रपंच म्हणजे ईश्वराची पूजा). दुसऱ्या भाषेत शास्त्रात ज्ञानाचा उगम नाही, तर प्रपंचात ज्ञानाचा उगम आहे. योगी, मुनी (अराड मुनी), राजा (बिंबीसार) यांच्याकडे ज्ञान नाही. मुनी व राजा यांचे ज्ञान दुःखमुक्तीसाठी उपयुक्त नाही. उलट धर्म आणि राज्य दोन्ही संस्था ज्ञानाच्या क्षेत्रात आटलेल्या आहेत. त्यांच्याकडे ज्ञानाचा प्रवाह दिसत नाही असा चरित्र नायकाचा युक्तीवाद आहे. कृ. अ. केळूसकरांना ज्ञान हे प्रपंच

करणाऱ्या स्त्रियांमध्ये दिसते (नंदबाला ही गवळ्यांच्या राजाची कन्या, सुजाता, सतार वाजविणारी नृत्यांगना). एक गवळ्याची मुलगी, दुसरी व्यापाऱ्याची पत्नी आणि तिसरी नृत्यांगना या सर्वच भारतीय वर्गव्यवस्थेत कनिष्ठ आहेत तशाच त्या स्त्रिया आहेत. गौतम बुद्धांच्या परिभाषेत त्या बहुजन आहेत. तर गौतम बुद्धाला ज्ञान प्राप्ती करू देणारा पुरुष हा पेशाने पशूपालक आहे (धनगर). गौतम बुद्ध आणि उप चरित्रे यांचा संवाद जाती व वर्गव्यवस्थेच्या विषमतेविरोधीचा आहे. तसेच तो संवाद बंधुभाव वाचक स्वरूपाचा आहे (दया). म्हणजेच चरित्रांची शोषणमुक्तीची संरचना चरित्र नायकाने मांडली.

(१) शरीराची मुख्य गरज अन्नाची आहे. अन्नाची गरज पूर्ण झाली की दुःखमुक्ती होते, हे ज्ञान नंदबाला व पशुपालक या दोघांकडून मिळालेले चरित्रात दिसते. (२) सत्ता, संपत्ती, अधिकार, प्रतिष्ठा यांचा मानवी जीवनातील संबंध मध्यममार्गी आहे, मध्यम मार्ग हाच प्रपंचाचा धर्म आहे, हे ज्ञान गौतम बुद्ध चरित्रात सतार वाजविणाऱ्या नृत्यांगनांकडून प्राप्त होते. मर्यादित गरजांचे ज्ञान सुजाताकडून मिळते (तुला या संसारात सुख पुरेसे वाटते काय? माझी हाव अगदी मर्यादित आहे.). (३) मनुष्य आणि देव यांच्या संबंधाचा संवाद सुजाता आणि गौतम बुद्धामधील धर्माचे ऐहिकिकरण करणारा आहे. प्रपंच म्हणजे ईश्वर, असे आकलन होते. या अर्थाने धर्माचे ऐहिकीकरण म्हणजे भौतिकीकरण या चरित्रात होते. (४) पृथ्वीतलावर प्रत्येक मनुष्यप्राणी दुसऱ्या मनुष्य प्राण्यासारखा आहे. म्हणजेच कोणी देव आणि कोणी मानव असा फरक नाही. व्यक्ती-व्यक्तीमधील संबंध बंधुभावाचे आहेत. उच्च-निच्चतेचे नाहीत. दैवत्ववादी संबंध व्यक्ती-व्यक्तीचे नाहीत. (५) या संवादासोबत गौतम बुद्धांचा सुजाताशी संवाद करतानाचा आग्रहपूर्वक दावा असा आहे की, स्त्री-पुरुषाचे नाते बंधुभावाचे आहे (बाई मी काही देव नव्हे, मी तुझ्यासारखाच मनुष्य जातीचा प्राणी असून तुझा बंधू आहे, असे समज). (६) पशूपालक (धनगर) मुलगा आणि गौतम बुद्ध यांच्यातील संवादात जातिविषमता दुःखाचे कारण दिले गेले आहे. जातीय विषमतेच्याऐवजी समता, दया, बंधू असे संबंध म्हणजे दुःखमुक्ती होय. थोडक्यात, दुःखमुक्तीचे ज्ञान अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार, मध्यममार्ग, ऐहिक व भौतिककेंद्री जीवनदृष्टी, व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समाज (धर्म, राज्य) यांचे संबंध बंधुभाव आणि नीतिवादी असण्यामध्ये आहे. म्हणून दुःखमुक्तीच्या ज्ञानाची उत्पत्ती, प्रपंच, ऐहिक व भौतिककेंद्री जीवनदृष्टीमध्ये आहे, अशी या चरित्रामध्ये भूमिका

कृ. अ. केळूसकरांची सुस्पष्टपणे दिसते. थोडक्यात ज्ञानाची निर्मिती कष्टकरी समूहामधून होते. ज्याचा कष्टाशी संबंध येतो, त्यांचा प्रत्यक्ष अनुभव म्हणजेच ज्ञानाची उत्पत्ती होय. म्हणून अनुभववादातून ज्ञानाची उत्पत्ती लेखक दाखवितात.

## मनुष्याची संकल्पना

कृ. अ. केळूसकरांनी गौतम बुद्धांच्या चरित्रामध्ये मनुष्याची व्याख्या व्यापक केली आहे. मनुष्य या संकल्पनेची व्याप्ती त्यांनी वाढविली आहे. 'अभिजन वर्गा'चा समावेश मनुष्य संकल्पनेत होत होता (ऋषी, मुनी, राजा). सर्वसामान्यांचा समावेश मनुष्य संकल्पनेत होत नव्हता (स्त्री, शूद्र, पशूपालक, दास, प्रापंचिक लोक इत्यादी). कृ. अ. केळूसकरांनी सर्वच मानव प्राण्याचा समावेश मनुष्य संकल्पनेत केला. ग्रीक आणि रोमन काळात प्लेटो, ॲरिस्टॉटलनेदेखील बुद्धीजीवी/तत्त्वज्ञानी व्यक्तीचा समावेश नागरिक या संकल्पनेत केला होता. बुद्धीजीवी/तत्त्वज्ञानेतर व्यक्ती नागरिकत्वाच्या बाहेर होत्या. गौतम बुद्धांच्या चरित्रातील मुख्य दृष्टिकोन हाच आहे की, मनुष्य संकल्पनेत कोणाचा समावेश होईल. या मुख्य प्रश्नाचे चर्चाविश्व कृ. अ. केळूसकरांनी या चरित्रामध्ये उभे केले आहे. कारण नंदबाला, सुजाता, नृत्यांगना, पशूपालक मुलगा (धनगर) हे सामान्य जन आहेत. ते बुद्धीजीवी किंवा प्रपंचातील तत्त्वबोध झालेले आहेत. अशा व्यक्तिरेखा या चरित्रात आलेल्या आहेत. तर अभिजनामधील ऋषी, मुनी, राजा बिगर बुद्धीजीवी किंवा बिगर तत्त्वज्ञानी अशा व्यक्तिरेखा या चरित्रात आल्या आहेत. तरीही सामान्यजन आणि अभिजन या दोन्हींचा समावेश मनुष्यत्वाच्या व्याख्येमध्ये केला गेला आहे. पाश्चिमात्य राजकीय विचारांमध्ये हॉब्ज, लॉक, रूसो यांच्या काळात प्रबोधन युग सुरू झाले. तेव्हा विवेकवाद स्वीकारला गेला. परंतु, स्त्री-पुरुषाचा समावेश असलेली मनुष्यत्वाची व्याख्या झाली नव्हती. भारतात १८१८ नंतर प्रबोधन युगाची सुरुवात झाली. तेव्हा अगदी आरंभीच महात्मा फुलेंनी स्त्री-पुरुष या दोघांचाही समावेश असलेली मनुष्यत्वाची पुनर्व्याख्या केली. तशीच व्याख्या कृ. अ. केळूसकरांनी गौतम बुद्ध चरित्रामध्ये केली आहे.

या चरित्रामध्ये स्त्री-पुरुष, उच्च वर्णीय, शूद्र अशा सर्वांचा मनुष्यत्वाच्या संकल्पनेत समावेश केला आहे. त्याबरोबर बंधुभाव, दयाबुद्धी, दुःखमुक्तीचा सातत्याने प्रयत्नशील स्वभावधर्म म्हणजे मनुष्यत्व होय. अशी चर्चा कृ. अ. केळूसकरांनी केली आहे. बंधुभाव, दयाबुद्धी, दुःखमुक्तीचा प्रयत्न ही मनुष्यत्वाची वैशिष्ट्ये म्हणजेच मानव हा

विवेकी, सामाजिक, बंधुभाव, दया व बुद्धीनिष्ठ कृतीशील प्राणी असतो. अशा व्यक्तिरेखा चरित्रामध्ये रेखाटलेल्या आहेत (Man is rational animal, Man is Social animal). अशा बौद्ध चरित्रातील बुद्धासह इतर व्यक्तीरेखांची मांडणी म्हणजे व्यक्तीचा विकास मानवतावादीदृष्टीने करणे होय. मनुष्य हा स्वतः साध्य आहे. कोणताही मनुष्य साधन होऊ शकत नाही. म्हणून सामान्य जनांची दुःखमुक्ती म्हणजे मनुष्यत्वाचा शोध होय. गौतम बुद्ध सामान्य जनांमध्ये दुःखमुक्तीच्या ज्ञानाचा प्रचार, प्रसार करतात. त्यासाठी सत्ता, अधिकार, प्रतिष्ठा आणि संपत्तीचा त्याग करतात. म्हणजेच लोकांच्यामधील मानवतेची जाणीव विकसित करण्याचे मिशन गौतम बुद्ध राबवितात. गौतम बुद्धाची ही व्यक्तिरेखा म्हणजे मनुष्याला मनुष्य बनविणाऱ्या शिक्षणाचा प्रयोग आहे. तशीच व्यक्तिरेखा महात्मा फुलेंची होती. ज्ञान म्हणजे बळ नव्हे. तर ज्ञान व्यक्तीला मनुष्य बनविण्यासाठी आहे. म्हणून विद्येचा प्रचार व प्रसार महात्मा फुले करत होते. अविद्येमुळे अनेक गोष्टी घडल्या. हाच आशय कृ. अ. केळूसकरांनी मांडलेल्या बुद्ध चरित्रामध्ये खोलवर अभिव्यक्त झाला आहे. थॉमस पेनच्या *राईट ऑफ मॅन* पुस्तकाचा महात्मा फुलेंवर प्रभाव होता हा विचार दिसतो. कृ. अ. केळूसकरांकडे मानवतावादाची दूरदृष्टी दिसते. तसेच गौतम बुद्ध, महात्मा फुले, थॉमस पेन या व्यक्तिरेखांना मानवतेच्या रसायनाद्वारे जोडतात. ही अंतरदृष्टी अभिव्यक्त करतात. मतितार्थ, म्हणजे कृ. अ. केळूसकरांनी मनुष्य संकल्पनेचा विस्तार या चरित्रामध्ये केला. त्यास मानवतावादाच्या धाग्यादोऱ्यांनी जोडून घेतले. गौतम बुद्धांच्या सोबत आई-वडील, पत्नी, राजा, सेनापती, ऋषी, व्यापारी अशा अनेक व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. त्या व्यक्तिरेखांची सांगड मनुष्यत्वाशी आरंभीपासून शेवटापर्यंत घातलेली दिसते. गौतम बुद्ध कोणत्याही व्यक्तिरेखेला मनपरिवर्तनासाठी पुरेसा वेळ देतात. जबरदस्ती, मनाविरोधी कृती करत नाहीत. परंतु, मनपरिवर्तनाचा प्रयोग सतत करत राहतात. या चरित्रात चर्चा, वाद, विवाद, संवाद या पद्धतीने सार्वजनिक पातळीवर मनपरिवर्तनाचा विचार प्रस्तुत केला गेला आहे.

## मानवी स्वभाव

मानवी स्वभाव आणि वित्त यांचे संबंध केळूसकरांनी स्पष्ट केले आहेत. वित्तप्रीती अनावर असलेला मानवी स्वभाव असतो. अशा मानवी स्वभावाच्या व्यक्तींनी वित्ताचा सर्वस्वी त्याग करावा. या खेरीज मानवी स्वभावात वित्ताभिलाषा यत्किंचितही नसेल, त्यांनी अर्थप्राप्तीच्या उद्योगाचा त्याग करू नये. वित्तसंचयाचा योग्य विनियोग म्हणजे

सार्वजनिक कल्याण होय (देशबंधूंच्या सुखास अनेक प्रकारे कारण होईल). उद्योगधंदा सार्वजनिक कल्याणासाठी करावा. उद्योगामधून निवृत्ती घेऊ नये. उद्योगाची लवमात्रही हेळसांड करू नये. या विवेचनामध्ये ज्यांचा मानवी स्वभाव स्वार्थी असतो, त्यांनी उद्योगधंद्यातून निवृत्ती घ्यावी. तसेच ज्यांचा मानवी स्वभाव निःस्वार्थी असतो, त्यांनी उद्योगधंद्यातून निवृत्ती घेऊ नये. मानवी स्वभावाच्या निःस्वार्थी प्रारूपाचे समर्थन गौतम बुद्ध चरित्रात केळूसकरांनी केले आहे. मानवी स्वभाव स्वार्थी (Selfishness) व परहितनिष्ठा (Altruism) असतो. ही दोन्ही तत्त्वे जीवशास्त्रीय आहेत (Biological). या दोन्ही तत्त्वांपैकी परहितनिष्ठा (Altruism) तत्त्वांची निवड या चरित्रात उद्योजकांनी करण्याचा विचार मांडला आहे. परहित करण्यामधून मोक्षमुक्ती होते. म्हणून अर्थप्राप्तीचा संसार कनिष्ठ किंवा दुःखदायी नाही. अर्थप्राप्तीचा प्रपंच परहिताच्या मार्गाने मुक्तीकडे घेऊन जातो. स्वजीवितरक्षणासाठी कोणताही उद्योग करावा. पण उद्योग करताना द्वेष, मत्सर करू नये. द्वेष, मत्सर हा मानवी स्वभावाचा भाग आहे. द्वेष, मत्सर या मानवी स्वभावातील गोष्टी नियंत्रित करता येतात. मानवी स्वभावात बदल करता येतो. मानवी स्वभाव स्वतः व्यक्ती बदलू शकते. असा मानवी स्वभाव आहे. या चरित्रात मानवी स्वभावाचे गौतमबुद्ध प्रणित प्रारूप केळूसकरांनी मांडलेले दिसते. (१) मानवी स्वभाव स्वार्थी आहे, त्या स्वार्थी स्वभावापासून मानवाला मुक्ती मिळू शकते. (२) मानवी स्वभावात परहिताचा आशय असतो. तो आशय सामाजिक आहे. म्हणून हा मानवी स्वभाव असलेल्या व्यक्तींनी वित्तसंचय करावा. त्यांचा वापर परहितासाठी करावा. (३) मानवी स्वभाव हा व्यक्तीनिष्ठ अमान्य करून त्यांनी समाजनिष्ठ मानवी स्वभाव स्वीकारला आहे.

संपत्तीची चरित्रामध्ये पुनर्व्याख्या केली आहे. राज्य, भूमी, पाणी, स्त्री, दास यांच्यावरील अधिकार म्हणजे संपत्ती अशी परंपरागत संपत्तीची व्याख्या होती. या चरित्रात यशोधरा, राहुल, गौतम बुद्ध यांच्यातील संवाद हा संपत्तीची पुनर्व्याख्या करतो (सत्यचतुष्टयरूप निधी). नश्वर वित्त आणि बिगर नश्वर वित्त असा फरक केला आहे. ज्ञानाला वित्ताचे स्थान या चरित्रात दिले आहे. नश्वर वित्त चरित्र नायक दुःख व चिंता निर्मितीचे कारण मानतो. तर बिगर नश्वर वित्त हे नीतिस्वरूपातील म्हणून समर्थन केले गेले आहे. परहितासाठी संपत्तीचा वापर करावा. संपत्तीचा मोह मात्र नाकारला गेला आहे. यामुळे राज्यसंस्थेने संपत्तीचा वापर परहितनिष्ठने करावयाचा आहे. या मुद्यामध्ये राज्याची कल्याणकारी भूमिका केळूसकरांकडून स्पष्ट होते. मानव

आणि संपत्ती (राज्य, भूमी, पाणी) या दोन्हीमध्ये मानवी संपत्तीचा विकास करणे, तिचे संरक्षण व संवर्धन करण्यास प्राधान्य दिले गेले आहे. यामुळे कनिष्ठ जाती, स्त्री आणि दास या घटकांनादेखील माणूस म्हणून स्थान चरित्र नायक देतो. कनिष्ठ जात, स्त्री आणि दास यांच्यावरील नियंत्रण चरित्र नायक संपुष्टात आणतो. याअर्थी, वर्चस्वाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक संरचनाचा ऱ्हास चरित्रनायक करतो. कनिष्ठ जाती, स्त्री आणि दास यांना अभिजनांची संपत्ती संबोधलेले नाही. वर्चस्वाच्या विचारांमधून त्यांची मुक्ती घडवली आहे.

## सत्ता व अधिकारांचा कमीत कमी वापर

राज्यसंस्थेच्या सत्तेला अनेक मर्यादा आहेत, या मुद्याचे निरुपण चरित्रामध्ये येते. राज्यसंस्था दु:खमुक्ती करू शकत नाही. राज्यकर्ता वर्ग (राजा) आणि राज्यसंस्थेतील बुद्धिजीवी वर्गांकडे दु:खमुक्तीचे ज्ञान नाही. याअर्थी, राज्यसंस्थेतील दोन्ही वर्ग मानवी जीवनातील दु:खाला भिडू शकत नाहीत. राज्यकर्ता वर्ग ज्ञान नसल्याची कबुली देतो. राज्यसंस्थेच्या बाहेर दु:खमुक्तीचा मार्ग या चरित्रामध्ये शोधला गेला. राज्यसंस्थेच्या खेरीज स्वायत्त संघाची (भिक्षु संघ, भिक्षुणी संघ, भिक्षुमंडळे) संकल्पना कल्पिली गेली होती. ही संस्था राज्यसंस्थेपासून स्वायत्त स्वरूपाची आहे. त्या संस्थेवर राज्याचे फार नियंत्रण नाही. परंतु, ही संस्था मानवी दु:खमुक्तीचे कार्य करते. यामुळे सामाजिकदृष्ट्या कनिष्ठ स्तरातील नवीन बुद्धिजीवी वर्ग आणि नवीन संस्था या दोन घटकांची संकल्पना अभिव्यक्त होते. या दोन्ही संस्था सांस्कृतिक स्वरूपाच्या आहेत. तसेच या दोन्ही संस्था अभिजनेतर समूहामधून उदयास येतात. म्हणजेच, सर्वसामान्य जनांची भागीदारी या संस्थामध्ये दिसते. जनांचे व राज्यसंस्थेचे, व्यक्तीचे व समष्टीचे संबंध या चरित्रामध्ये स्पष्ट केले गेले आहे. राज्यसंस्थेचे व्यक्तीवरील नियमन कमी केले आहे. व्यक्तीची संकल्पना ही नैतिक मानली आहे. नैतिक व्यक्तीला निवडीचे स्वातंत्र्य मान्य केले आहे. त्यामुळे नैतिक व्यक्तीची निवड ही विवेकी या चरित्रामध्ये दिसते. विवेकी निवड व्यक्ती करते, त्यास पुरेसा वेळ देण्याचे तत्त्व चरित्रामध्ये अनुस्युत आहे. त्यामुळे व्यक्तीच्या जीवनात राज्यसंस्थेचा कमीत कमी हस्तक्षेप असा मुद्दा पुढे येतो. या मुद्यांचा संबंध अभिजात किंवा नव अभिजात उदारमतवादी नाही. तर हा मुद्दा वेगळ्या अर्थाने अराज्यवादी आहे. कारण अहिंसेचा पुरस्कार करण्यामुळे हिंसा आणि हिंसेच्या सर्व साधनांना नाकारले गेले आहे. हा मुद्दा गांधीवाद आणि मार्क्सवादामध्ये येतो. व्यक्ती-व्यक्तीच्या संबंधाचे नियमन

राज्यसंस्थेच्याऐवजी भिक्कू संघ आणि नीतिमूल्य करतात. व्यक्ती–समाजाच्या संबंधाचे नियमनदेखील नीतिमूल्य करतात. त्यामुळे व्यक्ती–व्यक्ती व व्यक्ती–समाज यांच्या जीवनातील राज्यसंस्थेच्या सत्तेचा व अधिकारांचा ऱ्हास या चरित्रामध्ये होतो. बलपूजक राज्यसंस्थेची संकल्पना या चरित्रामध्ये दिसत नाही. मानवतावादी व्यक्ती व समाजाची संकल्पना अभिव्यक्त होते. त्यामुळे राज्यसंस्थेचे क्षेत्र फारच मर्यादित शिल्लक राहते. महाराष्ट्रात वसाहतवादी काळात राज्यसंस्थेचा विकास होत होता. राज्यसंस्थेची उपयुक्तता व गरज महत्त्वाची मानली जात होती. तेव्हा राज्याबद्दलचे हे कमीत कमी सत्ता व अधिकारांचे प्रारूप केळूसकर या चरित्रामध्ये मांडत होते. या अर्थाने केळूसकर हे गांधीपूर्व अराज्यवादाचे सूतोवाच या चरित्रामध्ये करतात. सत्ता व अधिकारांचा कमीत कमी वापर हा सिद्धांत सत्यशोधक–ब्राह्मणेतर चळवळीत केळूसकर मांडत होते. हा केळूसकरांचा वैचारिक प्रवाह होता. म्हणून गौतम बुद्ध चरित्र हे चित्तवेधक ठरते. ते जाणीवपूर्वक लिहिले गेले आहे. त्यांचा उद्देश संस्थाची पुनर्रचना व मूल्यांची पुनर्मांडणी करण्याचा आहे. सत्ता आणि अधिकारांचा समतोल साधण्याचा हा मानवी प्रयत्न आहे.

**– प्रकाश पवार**

कोल्हापूर

# अनुक्रमणिका


**पार्श्वभूमी – गौतम बुद्धांचे चरित्र** .. १

**प्रस्तावना – कृष्णराव अर्जुन केळूसकर** .. ६

१. उपोद्घात .. ७

२. पूर्ववय .. २६

३. संसारत्याग .. ३५

४. मोक्षमार्गप्राप्ती .. ६०

५. धर्मोपदेश .. ८८

६. बुद्ध धर्म संस्थापना .. १२९

७. धर्म बोधपद्धती .. १४८

८. आयुष्यक्रम .. १७२

९. बुद्ध धर्माचे संक्षिप्त निरूपण .. १८५

१०. बुद्ध धर्म प्रसाराचा इतिहास .. २०७

# गौतम बुद्धांचे चरित्र : पार्श्वभूमी

''बुद्धचरित्र'' हा चरित्रात्मक ग्रंथ वाचल्यावर मी गौतम बुद्धाचे चरित्र लिहावयास घेतले. ह्या महापुरुषाचे चरित्र लिहावयाची प्रवृत्ती मला माझे मित्र विनायक दादाजी यांच्यामुळे झाली. यांच्यापाशी रोमेशचंद्र दत्त यांनी लिहिलेला 'एन्शन्ट सिव्हिलायझेशन ऑफ इंडिया' ह्या नावाचा एक ग्रंथ होता. त्यातून त्यांनी मला बुद्धाच्या गृहत्यागाची चित्तवेधक गोष्ट वाचून दाखविली. ती मला अतिशयित आवडली आणि त्या सत्पुरुषाचे साद्यंत चरित्र वाचण्याची प्रबळ इच्छा झाली. त्यांच्याकडून हे पुस्तक नेऊन बुद्धासंबंधाचा सगळा वृत्तांत मी वाचला. तो मला इतका चित्तवेधक वाटला, की त्याचे मराठी रूपांतर करण्याचे मी योजिले. पुढे 'आध्यात्मिक ज्ञानरत्नावली' मासिक पुस्तक मला चालवावयास देऊन गीतेवर टीका लिहावयास दिली आणि तिच्याबरोबर कोणातरी साधुपुरुषांची चरित्रे लिहावयास सांगितली.

त्या मासिकात तुकारामबाबांचे चरित्र लिहिण्याचे संपल्यावर गौतम बुद्धाचे चरित्र लिहिण्याचे मनात आणून त्यावर प्रसिद्ध झालेले काही ग्रंथ मी वाचून काढले आणि त्यांच्या आधाराने मी त्या महापुरुषाचे चरित्र लिहिले. त्या चरित्रासाठी एकंदर १८ पुस्तकांचे आधार मी घेतले. ही पुस्तके मी रॉयल एशियाटिक लायब्ररीतून मिळविली.

जसजसा मी या सत्पुरुषासंबंधाचे वाचीत गेलो तसतसा त्याच्या विषयीचा पूज्यभाव माझ्या ठायी वाढत गेला आणि त्याचे चरित्र मी अत्यंत प्रेमाने लिहिले. त्यामुळे त्याची भाषा व रचना माझ्या मते अति सुंदर झाली. एवढ्या आवडीने व प्रेमाने मी दुसरा कोणताही ग्रंथ लिहिला नाही. तो मासिक पुस्तकात खंडश: द्यावयाचा असून अंक वेळेवर निघावयाचा असल्यामुळे लिहिलेला मजकूर छापखान्यात पाठविण्यापूर्वी तपासण्याला अवधी नव्हता. तरी तो माझ्या मते चांगला उतरला आहे आणि पुढे वर्तमानपत्रकारांनी व परीक्षकांनी त्यावर चांगले अभिप्राय दिले. हे पुस्तक दक्षिणाप्राइज कमिटीकडे पाठविले असता त्या मंडळीने ते फारच चांगले आहे असे सर्वानुमते ठरवून त्याला सर्वांत मोठे बक्षीस दिले.

आता ह्या चरित्रग्रंथासंबंधाने येथे दोन गोष्टी सांगितल्या पाहिजेत त्या अशा : हे पुस्तक तेव्हाचे 'रिपोर्टर ऑफ नेटिव्ह प्रेस' रा. रा. साठ्ये यांच्याकडे गेले असता एके

दिवशी रा. सा. विनायक कोंडदेव ओक हे त्यांच्याकडे मॅट्रिक्युलेशनचे मराठी परीक्षक या नात्याने गेले. त्यावेळी हे माझे पुस्तक त्यांच्या टेबलावर होते. त्यावर रावसाहेबांची दृष्टी जाऊन त्यांनी ते उघडून पाहिले. तेव्हा रा. साठ्ये यांनी त्यांना विचारले की, हे पुस्तक तुम्ही वाचले आहे काय? रावसाहेबांनी म्हटले, 'नाही.' साठ्ये म्हणाले, ''मराठी भाषेतला हा एक उत्कृष्ट चरित्र ग्रंथ आहे. त्याच्या तोडीचा ग्रंथ मराठी भाषेत नाही.''

रा. साठ्ये साहेबांनी घरी येताच आपल्या वडील मुलास, म्हणजे रा. गोपीनाथजी यास हाक मारून सांगितले की, तुझा मित्र केळूसकर याने गौतम बुद्धावर एक उत्कृष्ट ग्रंथ लिहिला तो घेऊन ये. माझ्या मित्रांनी माझ्याकडे येऊन पहिल्याने माझी तारीफ करून हा चरित्रलेख आपल्या वडिलांनी पहावयास मागितला आहे असे सांगितले. त्याची एकही प्रत माझ्याकडे नव्हती. म्हणून हे पुस्तक नागवेकरांकडून मागून त्यांच्याकडे पोचते केले.

## धर्मानंद कोसंबी

दुसरी गोष्ट अशी की, माझे मित्र धर्मानंद कोसंबी[१] यांनी माझे परममित्र श्री. काशीनाथ रघुनाथ मित्र[२] यांच्याकडे माझा पत्ता विचारला. ते म्हणाले की, माझे गौतम बुद्धावरील चरित्र डॉ. भांडारकर[३] यांना वाचून दाखवीत असता आपली बुद्ध धर्माकडे प्रवृत्ती झाली. यास्तव असा ग्रंथ लिहिणाराचे दर्शन घेण्याची मला इच्छा झाली आहे; परंतु ही आपली इच्छा त्यांनी पूर्ण केली नाही. त्यांनी काशीनाथजीकडे आणखी असे सांगितले की, हा चरित्र लेख जरी एका मराठ्याने लिहिला आहे, तरी तो अप्रतिम वठला आहे. याच्या तोडीचे ग्रंथ मराठी भाषेत विरळ सापडतात.

आणखी एक हृदयस्पर्शी गोष्ट येथे नमूद केल्यावाचून माझ्याने राहवत नाही. ती अशी : हे पुस्तक बांधून तयार होताच त्याची एक प्रत माझे परमपूज्य व प्रिय मित्र डॉ. सदाशिवराव वामन काणे, एल. एम. ॲण्ड एस. यांच्याकडे नेऊन त्यांस नजर केली.

---

१ कोसंबी, धर्मानंद (१८७६–१९४७) : बौद्ध धर्मावरील एक पंडित ग्रंथकार, 'निवेदन' हे आत्मवृत्त. 'भगवान बुद्ध', 'बुद्धधर्म आणि संघ' हे प्रसिद्ध ग्रंथ.

२ मित्र, काशीनाथ रघुनाथ (१८७१–१९२०) : मासिक मनोरंजनाचे संपादक. मनोरंजन प्रेसचे मालक, बंगाली कादंबऱ्यांचे अनुवादक.

३ भांडारकर, डॉ. सर रामकृष्ण गोपाळ (१८३७–१९२५) : नामांकित प्राध्यापक. अजोड संस्कृत पंडित. जगमान्य संशोधक. मुंबई विद्यापीठाचे उपकुलगुरू (१८९४). 'अर्ली हिस्टरी ऑफ दि डेक्कन' व 'आउट लाइन्स ऑफ वैष्णविझम् ॲण्ड शैविझम्' हे प्रसिद्ध ग्रंथ.

त्यावेळी त्यांची प्रकृती दम्याच्या विकाराने फारच नरम झाली होती. प्रकृतीला काही आराम व्हावा म्हणून ते नंतर नाशकास जाऊन राहिले. तेथे काही दिवसांनी त्यांचा अंत झाला. त्यांच्या बरोबर त्यावेळी त्यांचे चुलत बंधू गोविंदराव होते. प्रकृती अस्वस्थ असता त्यांनी गोविंदरावांकडून काही पुस्तके वाचून घेतली. त्यामध्ये माझे हे गौतम बुद्धावरचे पुस्तक होते. ते वाचल्यावर त्यांनी गोविंदरावांना असे सांगितले की, तुम्ही मुंबईस गेल्यावर मला भेटून सांगावे की, तुमचे गौतम बुद्धाचे चरित्र अत्युत्तम झाले आहे, ते वाचून मला मोठे समाधान झाले. त्याबद्दल तुमचा अतिशयित आभारी आहे. हा त्यांचा प्रेमाचा निरोप रा. गोविंदरावांनी मला दिला, तेव्हा मला रडू कोसळले आणि त्या सत्पुरुषाच्या पुष्कळ आठवणी माझ्या मनापुढे उभ्या राहिल्या. माझ्या ह्या प्रेमळ परोपकारी व पुण्यशील पुरुषाला पसंत वाटण्यासारखे पुस्तक मी लिहिले, याबद्दल मला धन्यता वाटली.

त्यातून विशेष हे की, रा. गोविंदराव यांनी अर्नोल्डच्या 'लाइट ऑफ एशिया' नावाच्या बुद्ध चरित्रावरील इंग्लिश काव्याचे मराठी भाषांतर केले होते. ते डॉ. साहेबांच्या सांगण्यावरून केले होते. ते माझ्या पुस्तकाशी ताडून पाहता केवळ कमी दर्जाचे होते, असे त्यांच्या निरोपावरून स्पष्ट होते आणि तो निरोप त्या पुस्तकाच्या कर्त्याने बंधूच्या आज्ञेवरून मला द्यावा, हे अधिकच कौतुक करण्यासारखे होते.

ह्या माझ्या पुस्तकासंबंधाने आणखी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, हे पुस्तक माझे परमपूज्य मित्र डॉ. नायर यांच्या वाचनात आले. त्यांचे मरहूम बंधू गणपतराव ऊर्फ बाबूराव ह्यांचा माझा निकट स्नेह होता. त्यांना पुस्तके विकत घेऊन लायब्ररी करण्याचा फार नाद होता. त्यांना हे माझे पुस्तक नजर केले आणि ते लिहिण्यास ज्या पुस्तकांचा आधार घेतला होता त्यापैकी पॉल केरस[१] व रिराडे विटा (?) ह्या दोन विद्वान ग्रंथकारांची बुद्ध चरित्रावरील दोन पुस्तके मी त्यांना पहावयास दिली होती. ती त्यांनी आपल्या लायब्ररीत ठेविली होती. डॉ. नायर साहेबांच्या अवलोकनात ही तिन्ही पुस्तके आली आणि त्यांचे लक्ष बुद्धाकडे लागले. माझे पुस्तक अंमळ कठीण भाषेत लिहिले होते. ते त्यांनी माथेरान येथे धर्मानंद कोसंबींच्या मदतीने वाचले. ते वाचण्यासाठी डॉ. साहेबांनी मला माथेरानला बोलावले होते; परंतु मला जाता आले नाही. म्हणून त्यांनी कोसंबींना बोलावून घेऊन हा ग्रंथ त्यांच्या सहाय्याने वाचला.

१ पॉल केरस : 'दि गॉस्पेल ऑफ बुद्ध' (१८९४) ह्या ग्रंथाचा कर्ता.

कोसंबींनी यावेळी पाली भाषेचे अध्ययन करून बौद्धधर्माची दीक्षा घेतली होती. म्हणून त्यांना त्या धर्माची माहिती डॉक्टर साहेबांच्या मनावर चांगली ठसविता आली. आणि ते स्वत: ऋजू अंत:करणाचे व साधुवृत्तीचे असल्याकारणाने ते बौद्ध धर्मानुयायी होऊन बुद्धाहून थोर असे काहीच नाही असे त्यांना वाटू लागले.

बौद्ध धर्माकडे सर्वांची प्रवृत्ती होऊन ते सदाचारी व्हावे, या हेतूने डॉक्टर साहेबांनी आपल्या घरी एक बुद्ध सोसायटी स्थापन केली आणि तिच्या सभा दर रविवारी भरवून त्यात बौद्ध धर्माची चर्चा चालविली. त्यांनी आपल्या प्रवासात जितक्या बौद्ध धर्माच्या वस्तू व भगवान बुद्धाच्या मूर्ती सापडल्या त्यांचा संग्रह केला. त्यांचा दिवाणखाना अशा वस्तूंनी गच्च भरलेला आहे. त्यांच्या ध्यान करण्याच्या जागी बुद्धाच्या सुंदर मूर्ती आहेत. त्यांनी हजारो रुपये खर्चून एक विहार बांधले आहे. त्यात बुद्ध भिक्षूंना राहावयाची सोय केली आहे आणि बौद्ध धर्माविषयीच्या सभा हल्ली ह्या विहारात प्रति पक्षाला भरत असतात. ह्या चर्चेवर त्यांनी आपल्या खर्चाने एक मासिक पुस्तकही चालविले आहे. त्यात मोठमोठ्या विद्वानांचे सुंदर लेख येत असतात. या सगळ्यांबद्दल मला मोठी धन्यता वाटत असते; कारण त्या साधुपुरुषांचे या सत्कार्याकडे लक्ष पहिल्याने मी लिहिलेल्या बुद्ध चरित्राच्या वाचनाने लागले. ही गोष्ट त्यांनी स्वत: अनेक वेळा बोलून दाखविली आहे. असो.

आता येथे खिन्नता वाटण्यासारखी एवढीच गोष्ट आहे की, माझ्या ह्या ग्रंथाची प्रसिद्धी व्हावी तशी झाली नाही. श्री. नागवेकरांनी मासिक पुस्तकांतून या ग्रंथांची पाने काढून तीनचारशे प्रती बांधून काढून त्या पुस्तक रूपाने विकावयास ठेविल्या; पण त्यांचा खप व्हावा तसा झाला नाही आणि हा व्यापार मी कशाला केला असे त्यांना होऊन गेले.

मी गौतम बुद्धावर काही लिहिले आहे हेसुद्धा पुष्कळांना माहीत नाही. डॉ. नायरसाहेबांच्या ठायी त्या परम विख्यात थोर पुरुषाच्या संबंधाने अत्यादर उत्पन्न होऊन ते त्यांचे पूजन व चिंतन करू लागले. तेव्हा हे माझे चरित्र पुन्हा छापून थोडक्या किमतीत विकावयाला ठेवण्याविषयी मी त्यांना विनंती केली. ती त्यांना मान्य होऊन त्यांनी धर्मानंद कोसंबींकडे माझे ते पुस्तक देऊन त्यात योग्य दिसतील त्या दुरुस्त्या करण्यास सांगितले. त्यांनी ते बरेच दिवस आपल्याकडे ठेवून घेऊन शेवटी असा अभिप्राय दिला की, ह्या पद्धतीने भगवान बुद्धाचे चरित्र प्रसिद्ध होणे इष्ट नाही. त्यांनी स्वत: यावेळी बुद्धलीलामृत नावाचे पुस्तक लिहिले होते. त्यांचा अभिप्राय

डॉक्टरसाहेबांना ते पुस्तक प्रसिद्ध करण्याच्या बाबतीत प्रतिबद्धक झाला.

पुढे हे पुस्तक प्रो. भागवत नावाच्या एका विद्वान गृहस्थाकडे पहावयास दिले. हे प्रोफेसर सेन्ट झेविअर कॉलेजात पाली भाषेचे अध्यापक आहेत आणि त्यांनी गौतम बुद्ध व त्याचा धर्म यावर पाली भाषेच्या अध्यापनाने पुष्कळ माहिती मिळविली आहे. माझ्या दुर्दैवाने त्यांचाही अभिप्राय कोसंबींसारखाच पडला. आणि माझ्या ग्रंथात दुरुस्त्या करण्याऐवजी दुसरे चरित्र हल्लीच्या माहितीच्या आधाराने लिहावे असे त्यांना वाटले आणि श्री. पाध्ये वकिलांचेही असेच मत पडले असून ते काही नवीन अधिक विश्वसनीय आधार घेऊन नवीन चरित्र लिहिण्यात गुंतल्याचे त्यांच्या सांगण्यावरून कळते. तथापि डॉ. नायर साहेबांची मूळची इच्छा जी माझा ग्रंथ छापून काढण्याची ती अद्यापि कायम असल्याचे माझा चौऱ्याहत्तरावा वाढदिवस साजरा करण्यासाठी भरलेल्या सभेचे अध्यक्ष असता त्यांनी प्रसिद्धपणे बोलून दाखविली आहे.

माझ्या चरित्रलेखाची अशी ही हालहवाल आहे. माझ्याकडे द्रव्यबल असते तर हा ग्रंथ थोड्या ऐतिहासिक दुरुस्त्या करून मी छापून काढून नायरसाहेबांना अर्पण केला असता आणि महाराष्ट्रातील लायब्ऱ्यांना फुकट वाटला असता. डॉ. साहेबांची हे पुस्तक छापण्याची प्रबळ इच्छा असली, तरी वर सांगितलेल्या विद्वान मित्रांच्या सांगण्याबाहेर ते बहुश: जाणार नाहीत. काही पुस्तके व महाभारत छापण्याच्या कामी माझे परममित्र श्री. यंदेसाहेब[१] यांचा गुंतलेला हात श्रीमंत महाराजसाहेब गायकवाड यांच्या उदार कृपेने अंमळ सुटा झाला असता, तर त्यांनी हा ग्रंथ नि:संशय छापला असता. कारण याबाबतीत मला काही मिळविण्याची इच्छा किंवा आशा नाही. ह्या माझ्या ग्रंथाची प्रसिद्धी व्हावी एवढीच माझी इच्छा आहे. ती कधी पूर्ण होईल काय? भगवान बुद्धाची जी ही अल्पसेवा मी केली आहे, तिचे योग्य सार्थक व्हावे एवढीच माझी मनीषा आहे. असो.

**– कृष्णराव अर्जुन केळूसकर**

१ यंदे दामोदरपंत सावळाराम : संपादक, नामांकित प्रकाशक, मधुभाषी, लोकसंग्रही, योजनाकुशल, समाजसुधारक, अनेक सार्वजनिक चळवळीत भाग घेतला.

# प्रस्तावना

हा चरित्रलेख पहिल्याने 'आध्यात्मिक ज्ञानरत्नावली' मासिक पुस्तकांत खंडशः प्रसिद्ध झाला असून, तो जशाचा तसा एकवट करून त्याचे प्रकृत पुस्तक बांधिले आहे. ह्या लेखास प्रस्तावरूपाने जे काही लिहिण्यासारखे होते ते बहुतेक उपोद्घातात आले आहे. येथे आणखी एवढेच सांगावयाचे की, हा लेख अनेक विद्वानांनी लिहिलेल्या संस्कृतात व इंग्रजी ग्रंथांच्या आधाराने तयार केला असून, यात बुद्ध व त्याने प्रचलित केलेले धर्ममत यांची बहुतेक महत्त्वाची माहिती संक्षेपाने दिली आहे. एकंदर चरित्राची व्यवस्था अशी केली आहे की, अथपासून इतिपर्यंत सारा लेख बोधप्रचुर व्हावा आणि समग्र ऐतिहासिक भाग वाचकांच्या लक्षात यावा.

उपोद्घात दर्शविल्याप्रमाणे या लेखात बुद्धाच्या चरित्रातला चमत्कारिक अतएव असंभाव्य भाग स्वतंत्र प्रकरण रूपाने देण्याचा मानस आहे; परंतु ग्रंथाचा विस्तार वाढल्यामुळे व हे चमत्कार प्रकरण फारसे बोधप्रदही नसल्यामुळे ते वगळावे लागले. याबद्दल वाचक क्षमा करतील अशी उमेद आहे.

शेवटी वाचकास एवढीच प्रार्थना करावयाची की, हा लेख मासिक पुस्तकात थोडाथोडा छापावा लागल्यामुळे त्याची एकंदर व्यवस्था कशी काय आहे ते पाहण्यास संधी मिळाली नाही, यास्तव यात रचनादिकांचे दोष वाचकांच्या नजरेस येणारे आहेत. तरी या निरुपाय गोष्टीबद्दल त्यांनी लेखकास गय करावी.

**– कृष्णराव अर्जुन केळूसकर**

# भाग पहिला

# उपोद्घात

सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वी आर्यावर्तामध्ये शाक्यराजकुलात गौतमनामे करून एक राजपुत्र निर्माण होऊन तो जगद्गुरूच्या योग्यतेस पावल्याचे कित्येक मराठी वाचकांस फार तर कर्णोपकर्णी ऐकून माहीत असेल. त्याचे विस्तृत चरित्र किंवा त्याने स्थापित केलेली धर्ममते व नीतिसिद्धांत फारच थोड्यांना अवगत असतील. मराठी भाषेत तर या विषयावर एकही नाव घेण्यासारखा ग्रंथ झालेला नाही. या अद्वितीय महापुरुषाचे चरित्र व त्याने स्थापित केलेली मते यांच्या विवेचनपर शेकडो ग्रंथ युरोपातील निरनिराळ्या भाषांत झाले आहेत. तिकडील शोधक पुरुषांना या विषयाचे इतके महत्त्व वाटत आहे की, ते नेहमी काहीतरी नवीन शोध करीत आहेत व पूर्वी प्रसिद्ध न झालेले पाली, संस्कृत वगैरे भाषांतील ग्रंथ भाषांतररूपाने किंवा मुळांत आहेत; तसेच छापून प्रसिद्ध करीत आहेत. त्यांच्या जिज्ञासेमुळे व शोधकबुद्धीमुळे गौतम बुद्धाच्या संबंधाने पुष्कळ माहिती उपलब्ध झाली आहे. याप्रमाणे पाश्चात्त्य विद्वानमंडळाचे लक्ष या विषयाकडे मोठ्या उत्कंठेने लागले असता, आम्ही त्याच्या संबंधाने अपरिमित उदासीनता दर्शवावी हे मोठे वाईट आहे. गौतम बुद्धाचा धर्म आपल्या देशात जरी आज फारसा प्रवृत्त नाही, तरी तो तेथे सुमारे हजार-बाराशे वर्षे एकसारखा चालू होता व त्याच्यामुळे भारतभूमीवरील निरनिराळ्या धर्मपंथावर अनेक परिणाम झाले आहेत. पुन्हा त्याच्या धर्मपंथाचा प्रसार आज सरासरी एक तृतीयांश मनुष्यजातीत कमी-जास्त प्रमाणात झाला आहे आणि कित्येक पाश्चात्त्य पंडितांच्या म्हणण्याप्रमाणे त्याचा पुरातन ख्रिस्ती धर्मावरही पुष्कळ परिणाम झाला आहे. या दोन्ही गोष्टी लक्षात आणल्या म्हणजे आम्हा आर्य लोकांस गौतम बुद्धाविषयी अभिमान वाटणे स्वाभाविक आहे. कारण तो आमच्या लोकांमध्ये निर्माण झाला असून आमच्या पुरातन विद्या व धर्म यांचा त्याच्या मनावर पूर्ण संस्कार झाला होता. त्याने स्थापिलेला धर्मपंथ आमच्या प्राचीन आर्य धर्मरूप जरठ वृक्षाची एक शाखा होय. यास्तव त्याचे चरित्र व त्याची धर्ममते समजून घेण्याविषयी आमच्या मनामध्ये अवश्य उत्कंठा उत्पन्न झाली पाहिजे. गौतम बुद्धाचा धर्मपंथ आम्हास संमत नसला व तो वैदिक धर्माशी कितीही विरोधी असला, तरी त्याचे अल्पमात्र ज्ञान आम्हास नसावे हे मोठेच चमत्कारिक

होय. त्याचप्रमाणे या महापुरुषाचे चरित्र जे नि:पक्षपाती पाश्चात्त्य पंडित वाचतात, त्यांचा अभिप्राय असा पडतो की, एका ख्रिस्ताखेरीज दुसरा कोणीही या महात्म्याच्या योग्यतेचा पुरुष या भूतलावर आजपर्यंत निर्माण झाला नाही. हे असे अलौकिक नररत्न आमच्या या भारतभूमीमध्ये निर्माण झाले असता त्याची काहीच माहिती आम्हा आर्यांचे वंशज म्हणविणाऱ्या जनांस नसावी व ती प्राप्त करून घेण्याविषयीची इच्छा आमच्या मनात उत्पन्न होऊ नये, ही मोठी शरमेची गोष्ट आहे. आमच्या देशातील लोकांच्या ठायी आमच्या पुरातन गोष्टींविषयी बेसुमार उदासीनता वास करीत आहे. तीमुळे आमची खरी योग्यता आम्हांस कळेनाशी झाली आहे. आमच्या प्राचीन चांगल्या गोष्टीविषयी आमच्या ठायी योग्य प्रकारचा अभिमान जागृत झाल्याने आम्हास आमच्या सध्याच्या स्थितीची थोडीबहुत लाज वाटून स्वसुधारणा करण्याची बुद्धी आमच्यामध्ये जागृत होण्याचा संभव आहे. प्राकृत विषय अशातलाच एक आहे. तेव्हा त्याविषयी महाराष्ट्रजनांस थोडीशी माहिती या ग्रंथाद्वारे करून देण्याचा आमचा उद्देश आहे. तो कितपत सिद्धीस गेला आहे, ते अभिज्ञ जनांस क्रमाक्रमाने दिसून येईल.

हा ग्रंथ लिहिताना, ज्या मोठमोठ्या युरोपीय पंडितांनी या विषयावर दीर्घकाळ परिश्रम करून ते ग्रंथरूपाने जगास सुलभ व सुगम केले आहेत, त्यांचा आधार आम्ही घेतला आहे. त्याचप्रमाणे जे संस्कृत ग्रंथ या विषयावर आजपर्यंत प्रसिद्ध झाले आहेत, त्या सर्वांचे सहाय्य घेतले आहे. प्रथमत: प्राकृत भागामध्ये उपोद्घातरूपाने थोडेसे लिहून मग गौतम बुद्धाच्या चरित्राचा ऐतिहासिक तेवढा भाग देऊ. नंतर त्याच्या संबंधाने ज्या कित्येक अद्‌भुत गोष्टी प्रचलित आहेत त्यांचे निरूपण करू. एवढा भाग आटोपल्यानंतर मग बुद्धाचे धर्मविचार व नीतिविचार यांचे सार देऊ. याप्रमाणे प्राकृत विषयाच्या मुख्य अंगांचे विवेचन झाल्यावर बुद्ध धर्माचा आजपर्यंतचा इतिहास संक्षेपत: सांगू. हे असे एकंदर भाग आटोपल्यावर गौतम बुद्धाच्या धर्ममतांचे आमच्या देशावर व ख्रिस्ती वगैरे इतर राष्ट्रांवर कोणकोणते परिणाम झाले आहेत, ते थोडक्यात लिहून उपसंहार करू.

प्रथमत: प्राकृत विषयाचे महत्त्व आमच्या वाचकांच्या ध्यानात चांगले येण्यासाठी बौद्ध धर्माचा सांप्रत काळी किती प्रसार झाला आहे ते आकडे देऊन दाखवितो. बुद्धधर्मानुयायी जनांचे मुख्य दोन वर्ग करतात. एक दक्षिणेकडील वर्ग व दुसरा उत्तरेकडील वर्ग.

**दक्षिणेकडील बौद्धांच्या संख्येचा तपशील येणेप्रमाणे आहे–**

| | | |
|---|---|---|
| सिंहलद्वीप | – | २०,००,००० |
| ब्रह्मदेश | – | ६८,८८,०७६ |
| हिंदुस्थानातील इतर प्रांत | – | २,४३,६७७ |
| सयाम | – | १,००,००,००० |
| आनाम | – | १,२०,००,००० |
| एकंदर सुमारे | – | ३,१०,००,००० |

**उत्तरेकडील बौद्धांच्या संख्येचा तपशील येणेप्रमाणे आहे –**

जावा वगैरे दच लोकांच्या वसाहती व वाली – ५०,०००
आसाम, स्पिटी, हाँगकाँग वगैरे ब्रिटिश वसाहती – ५,००,०००
रशियन प्रांत – ६,००,०००
ल्यू खेन बेटे – १०,००,०००
कोरिआ – ८०,००,०००
भूतान व सिक्कीम – १०,००,०००
काश्मीर – २,००,०००
तिबेट – ६०,००,०००
मोंगोलिया – २०,००,०००
मॅन्चुरिआ – ३०,००,०००
जपान – ४,०४,५३,४६१
नेपाळ – ५,००,०००
चीनदेश – ४१,४६,८६,९९४

---

एकंदर सुमारे – ४७,९०,००,०००

या दोन्ही वर्गातील बौद्धांची गोळाबेरीज केली असता पृथ्वीवर अदमासे पन्नास कोटी बौद्ध आहेत असे दिसून येईल. पृथ्वीतलावरील एकंदर लोकसंख्या सुमारे एकशेतीस कोटी आहे. तेव्हा अर्थात जगातील एकंदर लोकांच्या तिसऱ्या हिश्शाहून जास्त लोक बुद्धानुयायी आहेत. त्याचप्रमाणे आजकाल सर्वत्र प्रसार पावलेला जो ख्रिस्तीधर्म त्याचे अनुयायी अवघे बत्तीस कोटी आहेत. आमच्या हिंदू धर्माचे इतर

वीस कोटी लोक आहेत आणि मुसलमानी धर्माचे सुमारे साडेपंधरा कोटी आहेत. यावरून पाहता बुद्ध धर्माइतका प्रचार दुसऱ्या कोणत्याही धर्माचा नाही आणि कित्येक पाश्चात्त्य पंडित म्हणतात त्याप्रमाणे खुद्द ख्रिस्ती धर्माची बहुतेक उत्कृष्ट तत्त्वे बुद्धधर्मातूनच घेतली असल्यास ख्रिस्ती धर्मपंथ बुद्ध धर्माचीच एक शाखा आहे असे म्हणावे लागते. याप्रमाणे प्राकृत विषयाचे महत्त्व फारच मोठे आहे आणि हा गौतम बुद्धाचा धर्म आमच्या आर्यधर्माची एक उपशाखा आहे हे मनात आले म्हणजे आम्हास त्याबद्दल अभिमानच वाटला पाहिजे.

आता या अलौकिक धर्मसंस्थापकाने या भूतलावर निर्माण होऊन कोणकोणत्या गोष्टी केल्या त्याचे थोडक्यात निरूपण करतो.

१) हिंदुस्थानामध्ये उपाध्यायवर्गाचा जो एवढा प्रचंड व अप्रतिम जुलूम सुरू झाला होता त्यावर गौतम बुद्धाने हल्ला करून तो अगदी कमजोर करून टाकला आणि त्याच्या अनुयायी जनांची सत्ता हिंदुस्थानात जवळ जवळ हजार वर्षे कायम होती.

२) हिंदुस्थानामध्ये जातिभेदाचे जे प्रचंड बंड माजले होते त्याला बुद्धाच्या उपदेशामुळे प्रतिकार होऊन ते बरेच कमी झाले.

३) एका पुरुषाने अनेक स्त्रियांशी विवाह करण्याची जी पद्धती कैक काळापासून चालत आली होती, ती अनीतीची आहे असे त्याने पहिल्याने प्रतिपादन केले व त्याचप्रमाणे दास्याची पद्धती सदोष व अन्याय्य आहे, असा त्याने उपदेश केला. त्यापूर्वी या दोन्ही अनीतीच्या गोष्टीस कोणीच प्रतिरोध केला नव्हता.

४) स्त्री म्हटली म्हणजे पुरुषाची मालमत्तेपैकीच एक चीज असून, तिने ओझी वाहणाऱ्या पशूप्रमाणे त्याच्यासाठी ठरवून असे प्रतिपादन केले की, स्त्री पुरुषाची केवळ सहचारिणी असून, तिची त्याच्याहून कोणत्याही बाबतीत योग्यता कमी नाही. त्याप्रमाणे ती धर्माचरण करण्यास सर्वतोपरी योग्य आहे, असे त्याने स्थापित केले.

५) पूर्वी यज्ञयागादिकांच्या मिषाने उपाध्यायवर्ग पशुहिंसा करीत असे, तिचा निषेध बुद्धाने पहिल्याने केला. इतकेच नव्हे तर देश जिंकून राज्यविस्तार वाढविण्याची हाव धरणाऱ्या नृपतीला त्याने दोष लावून त्याचे ते मनुष्यसंहारमूलक युद्धकर्म सर्वथा निषिद्ध होय, असा उपदेश केला.

६) प्रत्येकाने आपापल्यापुरते धर्माचरण करावे अशी जी रीत पूर्वापार चालत आली होती, तिच्याऐवजी धर्माचरण संघ करून करावेत अशी पद्धती बुद्धानेच प्रथम सुरू केली. त्याचप्रमाणे त्याने असे प्रतिपादन केले की, मनुष्याच्या कर्तव्यकर्माचा

निश्चय, नीती व न्याय यांच्या शाश्वत तत्त्वांस अनुसरून करावा. पशुयज्ञ व उपाध्यायांनी प्रचलित केलेले स्वकपोलकल्पित आचार यात काही एक हाशील नाही. या गोष्टी मनुष्याने केल्या नाहीत, तर तो स्वकर्तव्यच्युत झाला असे सहसा समजू नये.

७) स्वत:स संमत असलेला धर्मपंथ इतरांनी स्वीकारावा अशी इच्छा धरून त्याचा उपदेश करीत फिरण्याचे तत्त्व प्रथमत: बुद्धानेच जगामध्ये सुरू केले आणि या स्वधर्मप्रसारास सहाय्यभूत अशा दोन नव्या संस्था त्याने स्थापित केल्या. एक देशोदेशी हिंडून धर्मप्रसार करणाऱ्यांची व दुसरी धर्मानुयायी जनांस वेळोवेळी धर्मोपदेश करून त्यांची स्वधर्मावरील श्रद्धा दृढ करणाऱ्या उपदेशकांची.

या इतक्या गोष्टी त्याने पहिल्यानेच जगामध्ये प्रविष्ट केल्या असे म्हणण्यास मुळीच प्रत्यवाय नाही. हे एवढे फेरफार एकट्या माणसाच्या हातून व्हावे हे काही लहानसहान काम नव्हे. या गोष्टीमुळे त्याच्या धर्मपंथाचा प्रसार बहुतेक सर्व आशिया खंडात झाला. त्याचप्रमाणे कित्येक शोधक विद्वानांचे असे म्हणणे आहे की, सिकंदर बादशहाच्या वेळी काही बुद्ध धर्मप्रसारक जन आलेक्झॅन्ड्रिया येथे गेले होते. हे म्हणणे या देशात अशोक राजाचे जे कित्येक शिलालेख वगैरे आहेत त्यावरूनही सिद्ध होते. त्याचप्रमाणे दुसऱ्या कित्येक पाश्चात्त्य विद्वानांचे असे म्हणणे आहे की, उच्च प्रतीचा यहुदी धर्मपंथ व हिंदुस्थानातील पशुयज्ञनिषेधकपंथ म्हणजे अर्थात बौद्ध धर्म हे एकरूपच होत. बाबिलोनिया, पालेस्टाइन, मिसर व ग्रीस या देशातील उपाध्याय वर्गांनी प्रवृत्त केलेल्या हिंसामूलक धर्मपद्धती नष्ट करण्याचा प्रयत्न बुद्ध धर्मप्रसारक जनांकडून प्रथमत: झाला होता. या बुद्ध धर्मप्रसारकांनी सदरील देशांमध्ये जाऊन तेथे निरनिराळ्या नावांची मंडळे स्थापन केली होती असे म्हणण्यास पुष्कळ आधार आहे व मंडळांच्या योगाने ख्रिस्ती धर्माच्या प्रसारास अनुकूल अशी स्थिती अगोदरच प्राप्त झाली होती. त्याचप्रमाणे बुद्ध धर्मप्रसारक जनांनी इसवी सनाच्या पाचव्या शतकामध्ये अमेरिकेत जाऊन क्वाझल कोटाल नामक एका राजाकडून पशुयज्ञ बंद करविला, असा पुरावा चिनी लोकांच्या ग्रंथांतून आढळतो व बौद्ध लोक तिकडे गेले होते, याची काही चिन्हेही तेथे आढळून आली आहेत. हत्ती, नाग, बुद्धाची प्रतिमा इत्यादी काही चित्रे तेथील पुरातन अवशेषांमध्ये सापडली आहेत. सर विलिअम जोन्स वगैरे कित्येक विद्वानांचे असे म्हणणे आहे की, युरोपाच्या उत्तरभागी प्राचीन काळी नॉर्स, अँगल, गॉथ वगैरे लोक होते. त्यांच्यामध्ये बुद्ध धर्मप्रसारकजनांनी जाऊन आपल्या धर्म पंथाचा उपदेश त्याला केला होता, असे त्यांच्या कित्येक पुरातन अवशेषांवरून दिसून

येते. आणखी असे की, वोडन म्हणून जे स्कॅन्डिनेविअर लोकांचे उपास्य दैवत होते त्यांचे नाव बुद्ध या नावाचेच अपभ्रष्ट रूप होय. यावरून पाहता बुद्ध उत्तर युरोपातील लोकांचा एकेकाळी देव होता असे वाटते; परंतु यासंबंधाने विद्वान लोकांमध्ये मतभेद आहेत.

या सर्व गोष्टींचा विचार केला असता असे म्हणावे लागते की, या एका अद्वितीय पुरुषाच्या धर्मविषयक विचारांचा प्रभाव सर्व पृथ्वीतलावर प्रमाणाने पसरून त्याच्या अनुयायी जनांनी कोरलेली लेणी, पुतळे, खांब व इतर स्मारके सर्वत्र दृष्टीस पडतात. हा एवढा प्रचंड धर्मविस्तार बुद्ध धर्मानुयायी जनांनी केवळ नीतीवाले करून केला. इतर कित्येक धर्माप्रमाणे त्यांनी कोणावरही जुलूम असा कदापि केला नाही. तेव्हा तात्पर्य काय की, हा एवढा प्रभाव एका महापुरुषाने प्रवृत्त केलेल्या धर्ममताचा व्हावा ही मानवी इतिहासातील अत्यंत आश्चर्यावह गोष्ट होय आणि याबद्दल आम्हा भरतखंडवासी जनांस मोठे भूषण असून आम्ही या अलौकिक पुरुषाच्या चरितामृतपानाविषयी उत्कंठित होणे योग्य होय.

येथवर फक्त प्राकृत विषयाचे महत्त्व किती आहे त्याचे दिग्दर्शन केले. आता बुद्ध या भारतभूमीत निर्माण होण्याच्या सुमारास आर्यधर्माची व समाजाची स्थिती कशी काय होती, तिचे संक्षेपत: विवेचन करू. हिंदुस्थानवासी आर्यांचा प्राचीन धर्म वेदामध्ये दिसून येतो. त्याचे कालांतराने रूपांतर होता होता मूळ स्वरूप पुष्कळच पालटले. पूर्वकाली जे धर्मविधी मनापासून पाळले जात असत त्याला पुढे पराकाष्ठेची कृत्रिमता आली. ऋग्वेदातील देवतांची आराधना व पूजा प्राचीन ऋषी जशी मोठ्या प्रेमाने व उत्कंठेने करीत असत तशी आता मुळीच होईनाशी झाली. इंद्र, उषा, वरुण इत्यादी देवतांच्या नामोच्चाराने प्राचीन आर्यांच्या हृदयात ज्या वृत्ती व कल्पना उत्पन्न होत असत, तशा आता कोणाच्याही मनात येत नसत. या देवता यावेळी केवळ नामशेष झाल्या. सोम, दुग्ध, मांस इत्यादी पदार्थांचे अर्पण प्राचीन ऋषी आपल्या आराध्यदेवतांस जसे केवळ मोठ्या भक्तीने करीत असत तसे आता काहीच होईनासे झाले. ही साधी अर्पणाची पुरातन रीती जाऊन तिच्या जागी मोठ्या बिकट व नियमांचे अवडंबर माजून निरर्थक अशा यज्ञादिकांच्या पद्धती सुरू झाल्या, साध्या सरळ भावाने व केवळ प्रेमाने अर्पणांद्वारे स्वदेवतार्पण करणाऱ्या प्राचीन ऋषींचे वंशज यावेळी एक मोठी जात होऊन बसले. ही जात असा हक्क सांगू लागली की, यज्ञादी विधी करण्याचा अधिकार केवळ आपणासच आहे. देवतांचे आव्हान व आराधना करण्याचे मंत्र

म्हणण्याचा अधिकार अन्य कोणासही नाही. या उपाध्यायवर्गाकडून आपले विधी करून घेतले असता व देवतांची आराधना त्यांच्या मुखाने केली असता आपणास अवश्य पुण्यप्राप्ती होईल, एरवी व्हावयाची नाही, अशी समजूत या उपाध्यायवर्गाने इतर जनांची करून दिली. तात्पर्य काय की, ऋग्वेदतांर्गत स्तोत्रे ज्यांनी प्रारंभी करून स्वाभिमत देवतांची आराधना केली त्यांच्या हृदयात जी धर्मभावना व जी प्रेमळ वृत्ती होती ती नष्ट होऊन लोकांमध्ये मोठमोठे बिकट विधी व निरर्थक यज्ञादी पद्धती उद्भवल्या.

पुढे कालांतराने या अनिष्ट स्थितीस कित्येक विचारशील पुरुषांकडून प्रतिकार होऊ लागला. कित्येकांच्या मते, हा प्रतिकार इसवी सनापूर्वी अकराव्या शतकाच्या सुमारास सुरू झाला म्हणजे अर्थात या पृथ्वीतलावर बुद्ध अवतरण्यापूर्वी सरासरी पाच शतके हा प्रतिकार होऊ लागला होता. वेदकालानंतरचा जो ब्राह्मणकाल त्या काली सर्वत्र रूढ झालेल्या यज्ञादिकांच्या पद्धतीविषयी कित्येक महाशय पुरुषांच्या चित्तात अनादर उत्पन्न होऊन व त्यात गुंतून आयुष्यव्यय केल्याने स्वजीवितसार्थक्य काहीच व्हावयाचे नाही, असे त्यास वाटून ते जीवात्मा व परमात्मा याविषयी विचार करू लागले. त्यांचे तत्त्वविचार उपनिषद्ग्रंथात ग्रंथित केले आहेत. या सर्व विचारांचे सार असे होते की, हे सारे चराचर विश्व एका ब्रह्मापासून निर्माण झाले असून, ते त्यांचे केवळ अंशरूप होय. त्याचप्रमाणे मृत्यू, परलोक, पुनर्जन्म इत्यादी गूढ गोष्टींचे त्यात विवेचन आहे. आमच्या लोकांमध्ये ज्यापुढे निरनिराळ्या तत्त्वज्ञानपद्धती निर्माण झाल्या, त्या सर्वांची बीजे या उपनिषद्ग्रंथात आढळतात.

याप्रमाणे त्या काळच्या आर्यांमध्ये स्वतंत्र विचार जागृत होऊन मोठमोठे गहन तत्त्वविचार निर्माण झाले होते, हे जर खरे आहे तरी त्याकाळी अशा विचारात मग्न होऊन इतर सर्व कर्मकांड विसरणारे पुरुष फारच थोडे असत. त्या काळचे सामान्यजन रूढ असलेल्या यज्ञयागादी कर्मकांडातच आपला काळ घालवीत असत. हे कर्मकांड प्राचीन वेदविहित आहे, यास्तव ते केल्याने पुण्यप्राप्ती होईल असा त्यांचा दृढ विश्वास असे. उपाध्यायवर्गास तरी हेच हवे असे. लोकांची या अप्रयोजक कर्मकांडावरील श्रद्धा कमी होऊ नये म्हणून ते अनेक प्रकारचे उपाय करीत. कर्मकांडप्रशंसापर ते नाना ग्रंथ लिहून जनांत प्रसिद्ध करीत आणि त्यांची त्याकडे सर्वदा प्रवृत्ती राहण्याविषयी नाही नाही त्या युक्ती योजीत.

ही अशी स्थिती इसवी सनापूर्वी सहाव्या शतकात हिंदुस्थानामध्ये होती. खरी

धर्मवासना जनचित्तांतून बहुतेक लोपल्यासारखीच झाली होती. जिकडे तिकडे शुष्क व अप्रयोजक कर्मकांड माजले होते. ब्राह्मणांचे स्तोम मनस्वी माजून त्यास काही विशेष अधिकार व सवलती प्राप्त झाल्या होत्या. शूद्रासंबंधी अतिक्रूर नियम प्रचारात आले होते.

यामुळे तेव्हाच्या कित्येक ग्रंथांतून आढळणारे सामाजिक व नीतीसंबंधी उत्कृष्ट नियम असून नसून सारखेच झाले होते. या वेळच्या ब्राह्मण जातीचे वर्चस्व एवढे मोठे असता त्या जातीचासुद्धा म्हणण्यासारखा उत्कर्ष झाला नाही. त्यांची जात पराकाष्ठेची लोभी, अहंमन्य व अज्ञान, गर्विष्ठ झाली. ती इतकी की, त्या वेळच्या सूत्रकारांनी त्या जातीला याबद्दल फार दोष लाविला आहे. या काळी आर्यांचा आश्रय पत्करून जे इतर जातीचे जन राहिले होते, त्यांस शूद्र म्हणण्याचा परिपाठ पडला होता. या आश्रितजनांस आर्यधर्म ग्रंथ व धर्मविधी करण्याची बंदी असे. त्याचप्रमाणे आर्यांचे कोणतेही धर्मविधी करण्याची त्यांस बंदी असे. त्यांना समाजात कोणत्याही प्रकारचा मान नसे. त्यास हीन लेखून उच्चवर्णाचे जन त्यांचा तिरस्कार करीत. त्या आपल्या हीन स्थितीबद्दल तेव्हाच्या शूद्रजनांस परम खेद होत असे. ही आपली स्थिती पालटावी असे त्यांना अहर्निश वाटे. पुढे पुढे तर या शूद्रवर्णातील लोकांची संख्या वाढून ते निरनिराळे उपयुक्त धनोत्पादक धंदे करू लागले. त्यांच्यापैकी कित्येकांच्या ताब्यात मोठमोठ्या जमिनी व गावे येऊन ते मोठे वजनदार गृहस्थ झाले. असा त्यांच्या स्थितीत चांगला पालट झाला असताही तेव्हाच्या धर्म व व्यवहार ऐतद्विषयक ग्रंथामध्ये त्यांच्याविषयी अत्यंत अन्यायाचे नियम पुन्हा पुन्हा प्रणीत करीत असत.

ज्या पुरुषाच्या ठायी सत्य व न्याय याविषयीची प्रीती वसत असते, ज्याच्या बुद्धीला थोडाबहुत सुसंस्कार होऊन सभोवतालची स्थिती नीट लक्षपूर्वक पाहण्याची शक्ती ज्याच्या अंगी आलेली असते, परदु:ख पाहून ज्याचे हृदय कळवळून जाते आणि ज्यास परोपकार करण्यातच स्वजीवित सार्थक्य आहे असे वाटत असते, त्याच्या दृष्टीस ही या वेळची दु:स्थिती पडली असता त्याला खरोखरीच वाईट वाटल्यावाचून राहत नाही. त्याकाळी आर्यांची जी धर्मसंबंधी व इतर विद्या उपलब्ध होती, ती सारी गौतम बुद्ध पढला होता तरी आपण जे काही शिकलो ते कितपत हितावह व सत्य आहे याचा विचार त्याच्या मनात उत्पन्न झाला. हा विचार करता करता त्याला असे दिसून आले की, मानवामध्ये जे हे जातीसंबंधी निर्बंध रूढ आहेत ते सर्वथा अयोग्य होत आणि त्याच्या दयामय अंत:करणात अशी उत्कट इच्छा उत्पन्न झाली की हीन, दीन व त्रस्त जनांची स्थिती सुधारण्यासाठी काहीतरी उपाय योजावा.

वरती सांगितले आहेच की, यज्ञयागादिकांच्या खटपटीत सर्वदा चूर होण्यात काहीच सार्थक्य नाही असे ज्यास वाटत असे त्यांस कर्मकांडांविषयी व एकंदर संसाराविषयी उपरती होऊन त्यांच्या मनाची प्रवृत्ती याहून काही तरी उच्चतर धर्ममार्ग आहे किंवा कसे याचा विचार करण्याकडे होत असे. असे जन वानप्रस्थ होऊन अरण्याच्या ठायी पर्णकुटिका बांधून एकांतात राहत असत. अशा रीतीने संसाराचा व्याप सोडून मोकळे झाले म्हणजे त्यांचे चित्त आध्यात्मिक विचारांकडे निर्वेधपणे लागत असे. ते सृष्टीचे अवलोकन सतत करून, स्वत:च्या मनाशी तिचा पुन्हा पुन्हा विचार करून आत्मा, परमात्मा, परलोक आदी करून धर्मतत्त्वासंबंधी अनुमाने करीत असत. याप्रमाणे स्वशिष्यांद्वारे केले. यापैकी बहुतेक विचार करणारे ऋषी पुरातन वेदाच्या आधारावरच आपले तत्त्वविचार रचित; परंतु त्या सर्वांचे साधारण धोरण असे असे की, यज्ञादी कर्मे करून स्वकार्यसिद्धीसाठी पशुहिंसा करणे युक्त नव्हे, असे प्रतिपादन करून जनचित्तामध्ये उच्चत्तर धर्मसंकल्पनांचा प्रवेश होईल असे करावे. फार तर काय; पण यज्ञयागादी महाप्रसंगी त्यास इतर ब्राह्मणाप्रमाणे निमंत्रण गेले म्हणजे ते त्या समयी तेथे अवश्य येत आणि मग पूर्वापार चालत आलेल्या क्रमाप्रमाणे यज्ञ चालला असता ते अध्यात्मविषय काढून भवती न भवती करीत आणि आपापल्या विचारांचे मंडन करण्याचा प्रयत्न करीत.

याप्रमाणे तत्त्वविचारांकडे विचारी जनांची प्रवृत्ती झाल्यानंतर यज्ञाविषयी कित्येक ऋषींनी अशी कल्पना बसविली की, यज्ञ करून ईशकृपा संपादन करावयाची ती पशुयज्ञाने कदापि प्राप्त होणे नाही, तर तिच्या प्राप्तीसाठी आपल्या ठायीच्या असद्वृत्तीचा होम केला पाहिजे. आपल्या ठायीच्या ज्या वासना व तृष्णा आपणास पापकर्माकडे प्रवृत्त करणाऱ्या असतात त्यांचा यज्ञ केल्यानेच खरी कैवल्यप्राप्ती होते. याप्रमाणे यज्ञकर्मास आध्यात्मिक स्वरूप प्राप्त होऊन बाह्य कर्मापेक्षा आत्मोन्नती विशेष हितकर असून, वास्तव सुखाची प्राप्ती करून देणारी आहे, असा उपदेश कित्येक धर्मगुरूंकडून होऊ लागला.

या उपनिषत्काली वेदाच्या आधाराने तत्त्वविचार करणारे जे जन निर्माण झाले त्यांचे साधारणत: धोरण पाहिले तर ते अलीकडे ज्यास वेदांतमत म्हणण्याची प्रवृत्ती पडली आहे त्याकडे मुख्यत: होते, असे दिसून येते. सर्व चराचर विश्व एका ब्रह्मापासून उद्भवले असून ते पुनरपि त्यातच लीन होणार आहे. नामरूपभेद जो आज दृग्गोचर होत आहे तो केवळ मायेचा खेळ आहे. ही सारी भ्रांती आहे. हा सर्व पसारा केवळ चंचल व अशाश्वत आहे. वास्तव अचल व शाश्वत असे एक ब्रह्मच आहे. याशिवाय

अन्य काहीच नाही. नामरूपभेद उत्पन्न होऊन आत्म्यास उपाधित्रयाच्या योगाने शोक व जन्ममरणही प्राप्त झाले आहे. यापासून मुक्त होऊ इच्छिणाऱ्यांनी ऐहिक किंवा पारलौकिक सुखविषयांच्या प्राप्तीची लालसा धरू नये. त्याविषयीच्या कामनांचा समूळ उच्छेद करावा. म्हणजे मोक्षसिद्धी सुगम होऊन अंती परमात्म्याच्या ठायी प्रत्यगात्मा या जड कलेवरामुळे प्राप्त झालेल्या बंधनांचा छेद करून लीन होतो.

याप्रमाणे परब्रह्मी लीन होईपर्यंत जीवात्म्यास जन्ममरणरूप संस्मृती भोगावी लागते. नामरूप धारण करणाऱ्या प्रत्येक जीवाच्या कर्माप्रमाणे त्यास उच्च-नीच स्थिती प्राप्त होते. संस्मृतीचा पाश तोडण्याचे उपाय दोन; एक असा की, मनुष्याने कामनांचा जय करावा व प्रारब्ध प्राप्त देहकर्मे फलाशा न धरिता जीवमान आहे तोपर्यंत केवळ अलिप्तपणे करावी, म्हणजे त्यास कर्मसंग न घडून तन्मूलक सुख-दुःखापासून तो मुक्त होतो. दुसरा उपाय असा की, आत्मविषयक अज्ञानामुळे चित्तास भ्रांती होऊन अशाश्वत काय, शाश्वत काय याचा विवेक होत नसतो. तो सत्य ज्ञानाच्या योगाने झाला म्हणजे अज्ञानतिमिरनाश होऊन परब्रह्मप्राप्ती होते. यास्तव मानवाने दुःख व क्लेश यांनी युक्त अशा या ऐहिक जीवनाची मुळीच पर्वा करू नये, तर शाश्वत व सतत परमानंदप्राप्तीचे आस्पद जे परब्रह्म त्याच्या प्राप्तीच्या मार्गाचा अवलंब प्रत्येकाने करावा. क्षणभंगुर संसाराविषयी प्रीती मनात क्षणभरसुद्धा येऊ देऊ नये, तर त्याचा होईल तितक्या लवकर त्याग करून परमात्मप्राप्तीविषयी प्रयत्नशील असावे.

हा असा धर्मविचार व तत्त्वविचार उपनिषत्काली भारतखंडातील कित्येक भागांमध्ये प्रचलित झाला. या विचाराप्रमाणे आपला वर्तनक्रम ठेवणारे पुष्कळ महात्मे वेळोवेळी निर्माण होऊन ते इतर जनांस आपल्यासारखे करण्याविषयी सतत परिश्रम करीत. हा त्यांचा क्रम बुद्धाच्या काळापर्यंत अव्याहतपणे चालला होता. हा तत्त्वविचार केवळ वेदांत आधार घेऊन प्रचलित केला होता, म्हणून त्यास कोणी वेदांत असेही म्हणतात; परंतु बुद्धाच्या वेळी यास ब्रह्मविद्या म्हणत असून, ती प्रतिपादन करणारास ब्राह्मण अशी संज्ञा असे. म्हणून 'ब्रह्म जानति ब्राह्मण' ही ब्राह्मण शब्दाची व्युत्पत्ती पुरातन काळापासून लोकसंमत आहे आणि त्या काळी अशाच ब्रह्मनिष्ठ ब्राह्मणास इहलोकी देवासारखा मान असे.

आता या स्वतंत्र विचाराच्या युगामध्ये वेदाचा आधार न घेता केवळ आपल्या बुद्धीच्या सहाय्याने जो काय होईल तो तत्त्वविचार करणारे कित्येक महात्मे निर्माण झाले, असे दिसून येते. उपनिषत्कालास आरंभ होऊन बुद्धाच्या आगमनापर्यंत असे

स्वतंत्र विचार करणारे लोक पुष्कळ झाले होते. त्यांनी आपापल्या बुद्धीच्या व विचारशक्तीच्या मगदुराप्रमाणे निरनिराळे तत्त्वविचार व धर्मविचार स्वशिष्यांद्वारे त्या काळच्या लोकांत प्रचलित केले होते. उपनिषत्कालानंतर जे मोठमोठे तत्त्वविचार करणारे जन झाले ते बहुतेक असे म्हणत की, आपल्या विचारास उपनिषदांचा आधार आहे आणि हे त्याचे म्हणणे खोटे नसे. कारण उपनिषत्काली सर्व प्रकारचे धर्मविचार व तत्त्वविचार बीजरूपाने किंवा विस्तरत: होऊन चुकले होते. तेव्हा प्रत्येकाने आपल्या मताला उपनिषदग्रंथाचा आधार आहे असे प्रतिपादन करून स्वाभिमत विचारांकडे जनप्रवृत्ती करण्यास फारशी पंचाईत नसे. हल्ली जशी उपलब्ध असलेली सर्व उपनिषदे पाहिजे त्यास सामग्रे करून अवलोकन करावयास मिळणे शक्य झाले आहे तसा काहीच प्रकार पुरातन काळी नसल्यामुळे हा असा घोटाळा वारंवार होत असे. यामुळे परस्परविरोधात्मक मतांचा पुरस्कार व प्रसार, सर्वांस पूज्य व मान्य असे जे उपनिषद ग्रंथ त्यांच्या आधाराने होत असे आणि या विरोधाची मीमांसा करणे त्या काळी बरेच अशक्य असल्यामुळे 'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां महाजनोयेन गत: स पंथ:' अशी तोड सामान्य जनास काढावी लागत असे. याप्रमाणे जे वाटतील ते विचार जनात प्रसिद्ध करण्याची मोकळीक असल्यामुळे आर्यावर्तात त्याकाळी अनेक धर्मग्रंथ व तत्त्वविचारपद्धती निर्माण झाल्या. बौद्ध धर्म हा अशापैकीच एक होय. बुद्धाचे म्हणणे असे की, चालू असलेले यज्ञयागादिकांचे शुष्क कर्मकांड केवळ निरर्थक व अप्रयोजक असून, पुरातन व खरा कैवल्यप्रद जो धर्ममार्ग त्याकडे जनांची प्रवृत्ती होणे इष्ट आहे आणि सांप्रत जी बुद्ध धर्माची मूळची मते उपलब्ध आहेत त्यातील बहुतेकांस उपनिषदांचा आधार आहे. यावरून पाहता बुद्धमत हे काही तरी नवीनच बंड नसून आमच्या पुरातन अगणित धर्मविचारांपैकी व तत्त्वविचारांपैकी काहीकांचे मंडन करणारे होते असे म्हणावे लागते. तरी वेदाविषयी बुद्धाच्या मनात आदरबुद्धी मुळीच नव्हती.

उपनिषत्काळास आरंभ होऊन बुद्धावतारासमयी निदान पाचशे वर्षे तरी लोटली होती असे दिसते. त्याच्या वेळी शेकडो स्वतंत्र रीतीने तत्त्वविचार करणारे जन निर्माण झाले होते. जो तो मनास वाटतील तसे विचार लोकांत प्रसिद्ध करीत असे. यामुळे जिकडे तिकडे घोटाळा उत्पन्न झाला होता. आपले या जगात खरे कर्तव्य कोणते व परलोकप्राप्तीसाठी कोणते उपाय योजावेत याविषयी लोकांची मने साशंक झाली होती. कित्येकांच्या मनात तर परलोक, आत्मा, परमात्मा, पुण्य, पाप इत्यादी धर्मविषयक गोष्टींविषयी अश्रद्धा उत्पन्न होऊन जिकडे तिकडे अनाचार व उच्छृंखलपणा सुरू झाला होता. कित्येकांना असे वाटे की, हा संसार सोडून गिरिकुहरामध्ये जाऊन बसावे

आणि तेथे तपश्चर्या करून देहदंडन करावे. म्हणजे देवास आपली करुणा येऊन तो आपणास मोक्षपदास नेईल. अशा प्रकारे संसारास त्रासलेले कित्येक जन महंत बनून लोकांस असा बोध करीत की, हा संसार केवळ असार आहे. त्याच्या पाठीस लागून कर्ममार्गामध्ये व पापी जनांच्या संगतीत आयुष्य व्यय करण्यात काही एक अर्थ नाही. जगातील एकंदर सुखविषयक अशाश्वत व दुराचाराकडे प्रवृत्ती करणारे असल्याकारणाने त्यांची लालसा धरणे चांगले नव्हे, तर वासनाजय करून व केवळ असंग होऊन आध्यात्मिक उन्नती साधावी. या अशा शोधाचा परिणाम ज्यांच्या मनावर होत असे ते संसार त्याग करून केवळ विरक्त बनून या महंताचे अंतवासित्व स्वीकारीत असत. याप्रमाणे बनलेले गुरू-शिष्य समुदाय बुद्धाच्या वेळी जागोजागी आढळून येत. या विरक्त मंडळ्या भिक्षापात्रावर उपजीवन करीत असत. म्हणून त्यास 'भिक्षू' अशी संज्ञा असे. हे संन्याशांचे समुदाय त्यावेळी प्रचलित असलेल्या निरनिराळ्या मतांचे असत. आपली मते प्रतिपादन करण्यास जे साहित्य अवश्य लागे ते सर्व मिळविण्यासाठी ते मनापासून उद्योग करीत. यामुळे त्यांच्या अंगी वावदूकपणा उत्तम प्रतीचा असून तो ते स्वपक्ष-मंडन व प्रतिपक्षखंडन करण्यामध्ये चांगल्या प्रकारे दर्शवीत असत. वाद-प्रतिवाद करून त्यांची तर्कशक्ती विलक्षण वाढली होती व संपादित ज्ञानाची उपस्थिती त्यास वाखाणण्यासारखी असे.

दुःखनिवृत्ती कशी होईल हा विचार या काळी विवेकी मनुष्यांच्या मनात सतत घोळत असल्यामुळे ते त्यातून मुक्त होण्यासाठी नाना युक्त्या योजीत. केवळ संसारत्याग केल्याने सर्व दुःखविमोचन होत नाही, ते तत्त्व समजण्यास मुळीच विचार लागत नाही. यास्तव एवढाच एक मार्ग कल्पून तेव्हाचे लोक राहिले नाहीत. कित्येकांचे असे म्हणणे असे की, घोर तपश्चरण करून देहदंडन केले असता ईश्वरप्रसादाने मनुष्यास अलौकिक सिद्धी प्राप्त होतात. या सिद्धी मुख्यतः आठ मानल्या होत्या. कित्येकांच्या मते या सिद्धी देहदंडनाने म्हणजे हठयोगानेच केवळ प्राप्त होतात असे नाही, तर मनोजय व वृत्तिजय करून शुद्धाचरण ठेविले असता मानवास त्या प्राप्त होणाऱ्या आहेत. या सिद्धीच्या योगाने मनुष्यास सर्व प्रकारच्या ऐहिक दुःखापासून मुक्त होता येते असे ते म्हणत.

बुद्धाच्या पूर्वी नाव घेण्यासारखी तत्त्वज्ञानीपद्धती म्हटली म्हणजे एक सांख्यमत-वाद्यांचीच होती. या तत्त्वपद्धतीचा मूळ प्रवर्तक कपिल नामे करून एक महामुनी होता. त्याचे विचार वेदधर्मास पुष्कळ सोडून होते. त्याच्या विचारपद्धतीस निरीश्वरसांख्य असे म्हणण्याचा परिपाठ पडला आहे. त्याच्या विचारास निरीश्वरसांख्य म्हणण्याचे

कारण असे आहे की, तो हे विश्व कोणी ईश्वरशक्तीने निर्माण केले आहे असे मुळीच मानीत नसे. कारण त्याचे असे म्हणणे असे की, जेथे मूळचे काहीच नसते तेथे कोणाच्याने काहीएक उत्पन्न करावयाचे नाही, तर पदार्थाच्या ठायीच ही विकास पावण्याची शक्ती असली पाहिजे, ती पदार्थात मूळची नसेल तर ती त्यात कोणालाही घालता येणारी नव्हे. गती पावणे हा परमाणूंचा स्वभावधर्मच आहे. या प्रकृतीरूप परमाणूंच्या ठायी प्रेरकरूपाने पुरुष स्थित आहे. तो त्यापासून अलग असा कदापि व्हावयाचा नाही. यास जड व चैतन्य अशी नावे द्यावयाची, हीच काय ती या विश्वामध्ये सद्रूप आहेत. यांच्या योगाने हे चराचर विश्व निर्माण झाले आहे. सत्त्व, रज व तम या तीन गुणांनी युक्त जी प्रकृती तिचा पुरुष हा केवळ साक्षी आहे. तरी त्याला प्रकृतिसंगाने सुख-दु:खादिकांचा अनुभव घडतो. पुरुष प्रकृतिबद्ध झाल्याच्या योगाने त्यास तीन प्रकारचे दु:ख होते. हे प्रकार अर्थात आधिदैविक, आध्यात्मिक व आधिभौतिक होत. या त्रिविध तापांपासून मुक्त होणे हाच पुरुषास मोक्ष होय. हा मोक्ष पुरुषाची कर्मवासना नष्ट होऊन त्यास स्वरूपाचे ज्ञान झाले म्हणजे व्हावयाचा. याप्रमाणे सांख्यमताचे मुख्य सिद्धांत आहेत. या मताचा यापूर्वी निर्दिष्ट केलेल्या वेदानुसार प्रचलित झालेल्या ब्रह्मविद्येचा बुद्धमतावर पुष्कळ परिणाम झाला होता.

एकंदरीत पाहता बुद्धाच्या पूर्वी आर्यावर्तात पूर्वजन्म व पुनर्जन्म यांची कल्पना, कर्मानुसार बरी-वाईट गती प्राप्त होते हा सिद्धांत, ऐहिक जीवन कष्टमय व असार आहे ही समजूत, अज्ञाननाश होऊन सत्यज्ञानाच्या योगाने संसृतिमूलक दु:खाची निवृत्ती होते हा निर्णय, सर्व ऐहिक सुखाचा त्याग करून देहदंडन केल्याने किंवा मनोजय केल्याने शाश्वतसुखप्राप्ती होते असा उपदेशही सर्वत्र रूढ झाला होता. त्याचप्रमाणे शूद्रादी नीच मानलेल्या जातीस उच्चवर्णसंमत मोक्ष साधण्याचा अधिकार नाही. हीन जातांनी स्वत:ची कितीही सुधारणा केली तरी त्या अस्पृश्य व नीच समजावयाच्या मोक्षसिद्धीस तपश्चरवादी कष्टसाध्य उपायांची आवश्यकता अत्यंत आहे. यज्ञादिकर्मकांड स्वर्गादी आमिष दाखवून चित्तशुद्धीसाठी विहित केले आहे इत्यादी समजुती जिकडे तिकडे पसरल्या होत्या. ह्या अशा सर्वसाधारण समजुती प्रवृत्त झाल्या होत्या तरी आर्यावर्तामध्ये त्या काळी विचारस्वातंत्र्य असल्याकारणाने जो तो आपापल्या बुद्धीप्रमाणे धर्मकल्पना व तत्त्वविचार जनांत प्रकट करीत असे. याचा थोडासा मासला आमच्या वाचकास येथे सादर करितो. कोणी म्हणत की, हे विश्व अनादि व अनंत आहे, कोणी म्हणत की, त्यास आरंभ असून ते सांत आहे. कोणी म्हणत की, आत्मा अनादि आहे. कोणी म्हणत की, त्यास आदि आहे, कोणी या

अनाद्यतत्त्वाची एकवाक्यता प्रतिपादित असत. कोणी तर तसा तर्क चालवीत की, विश्व व आत्मा हे अनादि आहेत तरी सांतही आहेत. जे अनादि नाही ते सांत असू शकेल. कोणी तर असे म्हणत की, अनाद्यनंततत्वाची कल्पना केवळ व्यर्थ आहे. सर्वकाही आदियुक्त व सांत आहे. याप्रमाणे नानाप्रकारे तर्कवितर्क करता करता मुख्यत: दोन विचारपद्धती निर्माण झाल्या. एका विचारपद्धतीप्रमाणे जेवढे काही गोचर होते तेवढेच काय ते सत्य आहे, असा सिद्धांत स्थापित झाला होता आणि दुसऱ्या विचारपद्धतीप्रमाणे जेवढे काही गोचर होते तेवढे सारे चंचलत्वास्तव असत्य होय, हा सिद्धांत रूढ झाला होता. याप्रमाणे तत्त्वविचार व धर्मविचार यामध्ये दुफळी होऊन इहलोकाव्यतिरिक्त परलोक आहे किंवा कसे? मनुष्य मरण पावल्यावर त्याचा आत्मा शेष राहतो किंवा कसे? मनुष्याने केलेल्या पातकाबद्दल त्यास दंड होतो तो कोणत्या प्रकारे होतो? इत्यादी प्रश्न उत्पन्न झाले होते आणि तत्कालीन सर्वविद्यापारंगत पंडितजनांमध्ये या प्रकरणी प्रचंड विवाद माजून राहिला होता. ही अशी स्थिती उपनिषत्कालास प्रारंभ होऊन बुद्धाच्या वेळी सुमारे पाचशे वर्षे लोटली होती त्यावेळी आर्यजनांची होती.

आता बुद्धाने या भारतभूमीत निर्माण होऊन जे धर्ममत स्थापित केले त्याचे धोरण कसे काय होते त्याचे संक्षेपत: निरूपण करून हा उपोद्घातरूप लेख पुरा करू. जे सारे दिसते ते अशाश्वत असून भ्रममूलक व शोकमूलक आहे. त्याची लालसा सर्वत्र रूढ झाल्या कारणाने संसारमूलक दु:खापासून सुटण्याचा खरा मार्ग कोणता याविषयी जो तो विचार करू लागला आणि जो मार्ग आपणास योग्य वाटला त्याचा पुरस्कार करण्याची इच्छा प्रत्येकास स्वभावत: होऊ लागली. बुद्ध अशाच विचारी पुरुषांपैकी एक होता. त्याच्या वेळी मुख्यत: दोन प्रकारचे लोक समाजामध्ये दृष्टीस पडत. एका प्रकारच्या लोकांस असे वाटे की, पुरातन काळापासून चालत आलेली यज्ञयागादी कर्मे करण्यातच जीवितसार्थक्य आहे. या समजुतीचा प्रसार पुष्कळ लोकांमध्ये झाला होता. दुसऱ्या प्रकारच्या लोकांस असे वाटे की, या शुष्क कर्मकांडात काहीच तथ्य नाही, तर या दु:खमय संसाराचा त्याग करून, वनवास पत्करून ध्यानधारणा, तपश्चरण इत्यादिकांमध्ये जीवितक्षय करावा, म्हणजे खरी सौख्यप्राप्ती होईल; परंतु बुद्धाला या उभय प्रकारच्या लोकांच्या समजुतीत व कृतीत काहीच अर्थ नाही असे वाटून त्याने नवाच जीवितसार्थक्याचा मार्ग काढला. तो अर्थात असा की, मनुष्याने यज्ञादी कर्मकांडात किंवा देहदंडमूलक तपश्चरणात आपला अमोलिक जीविताचा क्षय करण्याचे टाकून देऊन स्वत:च्या ठायीच्या वासनांचा जय करून सदाचारी व्हावे. मानवांची

अनीतीकडे ज्या गोष्टींनी प्रवृत्ती होण्यासारखी असते त्याचा बीमोड करण्याचा प्रयत्न करावा. असे केल्याने मनुष्याचे आचरण पवित्र होऊन त्याचे दुःख टळेल आणि त्यास सुखशांतीचा लाभ होऊन व अंती सर्व उपाधींचा क्षय होऊन निर्वाणपदवी प्राप्त होईल.

ही अशी अनैतिक उन्नती प्रत्येक प्राण्याची होणे शक्य आहे, असा बुद्धाच्या मनाचा निश्चय होऊन त्याने मनुष्यजातीस दुःखापासून सोडविण्याच्या या स्वाभिमत मार्गाचा उपदेश करीत फिरण्याचा निर्धार केला. सर्व प्रकारच्या व सर्व जातीच्या स्त्री-पुरुषांस त्याचा असा बोध असे की, तुम्हास दुःखमुक्त व्हावयाचे असेल तर तुम्ही आपली आध्यात्मिक उन्नती करा. ही उन्नती कर्मकांडाच्या किंवा तपश्चरणाच्या योगाने होणे नाही. खरी नीतिमत्ता वाढल्यावाचून आणि सर्व प्रकारच्या विषयवासना व सुखतृष्णा यांचा उच्छेद झाल्यावाचून दुःखनिवृत्ती व्हावयाची नाही. हा दुःखनिवृत्तीचा मार्ग सर्व जातींच्या, वर्णाच्या व दर्जाच्या लोकांस साध्य होणारा असून त्यास अनाधिकारी असा कोणीच नाही.

याप्रमाणे त्या वेळच्या आर्यजन समाजात जो वर्णादिकांचा भेद उत्पन्न झाला होता व जो अधिकारानधिकाराचा बराच प्रकार माजला होता, त्याला प्रतिरोध करण्यास बुद्ध प्रथमतः प्रवृत्त झाला असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. वेदसंहिता, ब्राह्मणे आणि उपनिषदे यामध्ये पुष्कळ टाकाऊ मजकूर आहे. त्यात जेवढा सत्य व हितकर भाग असेल तेवढा आपल्या विवेकबलेकरून निवडून घ्यावा, असा बुद्धाचा जनास उपदेश असे. हे ग्रंथ अपौरुषेय मानून त्यातील सर्वच गोष्टी ईश्वरप्रोक्त आहेत असे म्हणणे व्यर्थ होय. त्या ग्रंथसमुदायात आढळणारा बालिशपणा, विसंवाद, विसंगतपणा व अपयोजकपणा पाहिला म्हणजे सर्वज्ञ, सर्वसाक्षी अशा देवाने ते ग्रंथ मानवास दिले असे म्हणणे चमत्कारिक वाटते, असे बुद्धाचे म्हणणे असे. 'तुम्ही जे काही ऐकत आला आहा, ते सारे सत्य आहे असे मानू नका. ज्या गोष्टी पितृ-पुत्र परंपरेने चालत आलेल्या असतात किंवा ज्या केवळ दंतकथारूपाने जनांत रूढ झालेल्या असतात त्यावर श्रद्धा ठेवू नका. कोणत्याही गोष्टी पुष्कळ लोकांच्या तोंडी आहेत म्हणून त्या खऱ्या आहेत असे सहसा मानू नका. एखाद्या पुरातन साधूने एखादी गोष्ट लिहून ठेवली आहे म्हणून तीवर भरवसा ठेवावा असे कदापि समजू नका. नुसत्या पोकळ अनुमानावर किंवा निराधार कल्पनांवर विश्वास ठेवू नका. केवळ अभ्यासास्तव जी गोष्ट तुमच्या अंगवळणी पडलेली असते ती खरी असली पाहिजे असं कदापि समजू नका. कोणतीही गोष्ट तुमचे गुरू किंवा वडील माणसे सांगतात म्हणून ती खरी वाटून

घेऊ नका, तर योग्य अवलोकन व सत्यासत्यविमर्शण करून जे विवेकास अनुसरून आहे असे सिद्ध होईल व जे सदाचारप्रवृत्ती वाढविणारे असून एकंदर जनसमाजाचे हित करणारे आहे असे दिसेल त्याचा अंगीकार करून तदनुसार स्ववर्तन ठेवण्याचा प्रयत्न करा' असा बुद्धाचा स्वशिष्यांस उपदेश आहे.

यांप्रमाणे बुद्धाने ग्रंथप्रामाण्य व आत्मवचनप्रामाण्य याविषयीचा निकाल लावून केवळ विवेकशक्तीस प्राधान्य दिले. जे अत्यंत गूढ प्रश्न विचारी मनुष्य आपापल्या सामर्थ्यानुसार व चिररूढ पद्धतीप्रमाणे सोडविण्याच्या कामात गुंतले आहेत, त्याचा परिस्फोट व विवेचन करण्याची ही पद्धती प्रथमतः बुद्धानेच रूढ केली, असे म्हणावे लागते. त्या वेळच्या आर्यतत्त्ववेत्त्यास सत्यासत्यविमर्शणाला जी प्रमाणे अवश्य वाटत त्यामध्ये आप्तवचनप्रामाण्याचे माहात्म्य पराकाष्ठेचे असे. ज्या गोष्टी अतींद्रिय असून ज्यांच्याविषयी मानवास काहीच तर्क करिता येत नाही, त्या आप्तवचनाच्या प्रमाणावरून सत्यवत मानावयाच्या, असा त्यांचा साधारण क्रम असे; परंतु बुद्धाने या बहुतेक सर्वसाधारण प्रवृत्तीस प्रतिरोध करून असे स्थापित केले की, ज्या गोष्टी स्वविवेकास अगम्य असतील, त्या श्रुत्यादि परमपूज्य मानलेल्या ग्रंथात सांगितलेल्या असल्या किंवा कोण परम सात्त्विक पुरुषाने उपदेशिलेल्या असल्या, तरी त्या खऱ्या मानू नयेत. याप्रमाणे आत्मविषयक कल्पना, ज्या बुद्धाच्या वेळी सर्वत्र रूढ झाल्या होत्या, त्या त्याने मुळीच मनास आणल्या नाहीत. त्यात सत्याचा अंश असल्यास तो मानवाच्या बुद्धीस विषय होणारा नाही, असे त्याचे मत असे. ईश्वरकल्पनेविषयीही त्याचे विचार याचप्रमाणे होते. संसृतिमूलक दुःखनिवृत्तीरूप मोक्ष तो मानवास इहलोकी स्वतःच्या परिश्रमानेच केवळ प्राप्त व्हावयाचा. तो प्राप्त होण्यास कोणा ईशशक्तीचा किंवा देवतासमुच्चयाचा प्रसाद जोडण्याच्या निरर्थक प्रयत्नात मग्न होण्याचे मुळीच प्रयोजन नाही. हा असा दुःखविमोचनाचा मार्ग मनुष्यजातीस बुद्धानेच प्रथमतः उपदेशिला. आता या मोक्षसिद्धीस ज्ञानाची आवश्यकता आहे असे त्याचे म्हणणे असे. हाच सिद्धांत उपनिषद ग्रंथातूनही प्रतिपादिला आहे; परंतु बुद्धाच्या मते, हे ज्ञान ब्रह्माविषयीचे किंवा देवाविषयीचे नव्हे, तर मानव व इतर वस्तुजात स्वरूपाची जी स्पष्ट व सत्य भावना तिलाच केवळ ज्ञान म्हणावयाचे. याखेरीज आणखी मोक्षसिद्धीस चित्ताची शुद्धता अवश्य व्हावी, असे त्याने प्रतिपादन केले. एकंदरीत पाहता या चित्तशुद्धीवरच त्याचा कटाक्ष विशेष असे. इतर सर्व धर्माचार तीपुढे गौण आहेत असे त्याचे म्हणणे असे. पवित्रता, विनय, आर्जव, शांती, अखिल भूतमात्राविषयीचे निःसीम प्रेम इत्यादी सद्वृत्ती मनुष्याच्या ठायी उत्पन्न झाल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे आपल्या अनुयायीजनांनी

आपल्या मोक्षप्राप्तीच्या सत्यपथावर पूर्ण भरवसा ठेवावा. त्यांनी नेहमी विनयशील असावे. असत्यकर्म करण्याविषयी त्यास लाज वाटावी. त्यांनी सर्व प्रकारची सत्य विद्या संपादन करावी. त्यांनी सदैव उद्योगशील असावे. त्यांनी आपल्या मनाचा उत्साह कमी होऊ देऊ नये. त्यांनी सर्व प्रकारचे अनुभवज्ञान निरलसपणे प्राप्त करून घ्यावे. त्यांनी लौकिकात व एकांतीही आपले आचरण नीतिनियमाप्रमाणे ठेवावे. नीतिनियमांचा भंग कदापि न करिता स्वत:चे आचरण निर्दोष व निर्मळ राखले तरच खरा मोक्ष प्राप्त व्हावयाचा. केवळ ब्राह्म कर्मकांडामध्ये तर्क झाल्याने किंवा कोणा ईशशक्तीची कृपा संपादन करण्याची खटपट करून परलोकप्राप्तीची लालसा धरल्याने दु:खविमोचनरूप मोक्ष कदापि प्राप्त होणे नाही, असा बुद्धाचा स्वशिष्यांस उपदेश असे.

त्यावेळचे गृहस्थाश्रमी जन जे विधी व जी नित्यनैमित्तिक कर्मे करीत असत, ती ज्याप्रमाणे बुद्धास निरर्थक व निष्फळ आहेत असे वाटे, वरती निर्दिष्ट केल्याप्रमाणे पवित्र व निर्दोष आचरण आणि परोपकार यांच्या योगाने मानवी नियतीची पूर्णता प्राप्त होऊन इहलोकास स्वर्गाची योग्यता येईल, असा बुद्धाच्या बुद्धीचा निश्चय होऊन त्याने हे स्वाभिप्रेत धर्मरहस्य इतर मानवी बंधूंस उपदेशिण्याचा क्रम परम उत्साहाने आमरण चालविला आणि आपल्या मागे हा आपला क्रम निरलसपणे अव्याहत चालवावा, असा त्याने आपल्या शिष्यसमुदायास मोठ्या आग्रहाने उपदेश केला. कारण मनुष्यमात्राची विपत्ती नष्ट व्हावी, अशी त्याला पराकाष्ठेची इच्छा होती. आपण योजलेल्या स्वोन्नतीच्या व सदाचरणाच्या मार्गाचा अवलंब केल्याने मनुष्याच्या एकंदर विपत्तीचे व दु:खाचे निर्मूलन होईल असे त्यास मनापासून वाटत असल्यामुळे व हा मोक्षसिद्धीचा मार्ग सर्वांस सुगम व साध्य असल्यामुळे त्याने एकंदर हीन, दीन व त्रस्त जनांस आपल्या मार्गाचे अवलंबन करून दु:खविमोचन करून घ्यावे, असा उपदेश करण्यास आरंभ केला. मुमुक्षु जनांनी आपली नीतिमत्ता वृद्धिंगत करावी. दुर्वृत्तीचे दमन करावे, दुर्वासनांचा जय करावा आणि अखिल मानवजाती आपला बांधववर्ग आहे असे समजून तीविषयी नि:सीम प्रीती मनात वागवावी म्हणजे त्यास मोक्षप्राप्ती सुगम होईल, असे त्याच्या एकंदर बोधाचे सार आहे.

बुद्धाच्या मते ब्राह्मण आणि शूद्र, उच्च आणि नीच, राव आणि रंक असे जे कृत्रिम भेद आहेत त्यात काहीच अर्थ नाही. सर्व मानव येथून तेथून सारखेच आहेत. आपण प्रतिपादलेल्या मोक्षमार्गास अनधिकारी असा कोणीच नाही. हा अर्थ सर्व कृत्रिम भेदाभेद विनष्ट करणारा खऱ्या कळवळ्याचा धर्मरहस्यबोध ज्यांच्या कानी पडला ते

सारे त्याचे अनुयायी झाले आणि काही शतकांच्या अवधीमध्ये त्याच्या धर्माचा प्रसार सर्व आशियाखंडभर झाला. गरीब शेतकरी, साधेभोळे कारागीर, मोठमोठे धनाढ्य सावकार, मोठमोठे बलाढ्य सरदार व राजे वगैरे सर्व दर्जाचे व जातीचे लोक त्याचे अनुयायी झाले. सुशील, सुस्वभावी, सदाचारी, शांत व सौम्य अशा त्या काळाच्या सहस्रविधी आर्यजनांनी त्याच्या मोक्षमार्गाचा अवलंब करून आपले ऐहिक जीवन सत्कर्मात व परोपकार करण्यात वेचले. बुद्धाच्या पूर्वी जे बिकट धर्मविधी व सामान्य जनांसह सहसा न झेपणारी अशी जी यज्ञादिकर्मे वेदविहित म्हणून सर्वत्र रूढ होती, ते विधी व ती कर्मे आपणास स्थिती प्रतिकूल असल्यामुळे किंवा अनधिकारास्तव, असाध्य आहेत असे ज्यास वाटे त्याला हा बुद्धाचा उपदेश हिताचा व सत्य वाटून ते त्याच्या धर्मपंथाचा स्वीकार करीत. त्याचप्रमाणे वनवासाचा अंगीकार करून घोर तपश्चरण केल्याने ऐहिक विपत्तीपासून मनुष्य मुक्त होतोच असे सहसा म्हणवत नाही; कारण वृत्ती व वासना यांचा जय केल्यावाचून विपत्तिनाश व्हावयाचा नाही. हा जय तपश्चर्यादिकेकडून देहदंडन केल्याने निश्चयाने होईलच असे म्हणवत नाही. हा अनुभव त्या काळी जनास अनेक प्रकार येत असल्याकारणाने त्यास हा मोक्षसिद्धीचा दुर्घट मार्ग पसंत न वाटणे साहजिक होते. पुन्हा हे तपश्चरणही सर्वांस साध्य नव्हते. पुष्कळास तर ते अनधिकारास्तव दुर्गम होते. म्हणून त्याला बुद्धाचा धर्मपंथ विशेष हितकर व सत्य वाटणे साहजिक होते.

याप्रमाणे बुद्धाच्या वेळी धर्मसंबंधी साधारणत: स्थिती असल्यामुळे बुद्धाने उपदेशिलेल्या मोक्षमार्गाचे पुष्कळांनी अनुसरण केले; कारण तो आर्यधर्माहून सुगम व सोयीचा असून त्याचे अवलंबन करण्यास सर्व प्रकारच्या मनुष्यास कोणत्याही तऱ्हेचा प्रत्यवाय नव्हता. म्हणूनच त्याच्या धर्माचा प्रसार एवढा मोठा झाला आहे. आणखी असे की, बुद्धाने या भूतलावर स्वधर्मोपदेश करण्यास आरंभ केल्यावर सुमारे पंचेचाळीस वर्षे लोकांमध्ये वागून आपण केलेला उपदेश स्वआचरणाने लोकांच्या चांगला प्रत्ययास आणून दिला. त्यामुळे त्याच्याविषयीची पूज्यताबुद्धी तत्कालीन लोकांमध्ये पराकाष्ठेची असून, पुढेही ती कायम राहिली. एकसारखी पंचेचाळीस वर्षे नेहमी सर्वप्रकारच्या स्त्री-पुरुष संघामध्ये राहून आपले आचरण अत्यंत निर्दोष ठेवणाऱ्या महापुरुषांविषयी लोकांच्या मनामध्ये पराकाष्ठेची आदरबुद्धी व अमर्याद श्रद्धा उत्पन्न होणे साहजिकच आहे.

याप्रमाणे या अद्वितीय व अलौकिक महापुरुषाचे माहात्म्य आहे. आमच्या या भारतभूमीमध्ये हे अप्रतिम नररत्न निर्माण होऊन अखिल मानवजातीस स्वतेजाने दिपविणारे झाले असता, त्याच्या परमपवित्र चरित्राविषयी व बोधामृताविषयी आम्ही

आर्यांचे वंशज म्हणविणाऱ्या जनांनी आजवर उदासीन राहावे हे मोठेच चमत्कारी आहे. हे मनात आणून आम्ही या महापुरुषाचे यथोपलब्ध चरित्र, त्याच्या बोधाचे सार आणि त्याच्या धर्मप्रसाराचा थोडासा इतिहास इतकी प्रकरणे पुढील पृष्ठांत क्रमाक्रमाने लिहिली आहेत. त्यांचे अवलोकन आमचे आर्यबांधव अवश्य करतील अशी उमेद आहे.

आता कित्येक वेदधर्माभिमानी पुरुषांचे असे म्हणणे पडेल की, ज्याने सनातन वेदधर्माशी विरोध करून आत्मा व परमात्मा याविषयीच्या कल्पना विवेकशुद्ध नाहीत असे प्रतिपादन केले, या नास्तिकशिरोमणीचे चरित्र व धर्ममते याविषयी जिज्ञासा उत्पन्न होण्यात काय अर्थ आहे? या शंकेचे समाधान अर्थात असे आहे की, त्याचे बहुतेक तत्त्वविचार व नीतिविचार तत्कालीन आर्यविचार पद्धतीत अनुसरून होते. एवढेच नव्हे, तर तो स्वत: असे म्हणे की, आपण काढलेला मोक्षसिद्धीचा मार्ग पुरातन असून चालू असलेला धर्ममार्ग भ्रममूलक आहे. यावरून पाहता त्याच्या मताचे ज्ञान प्राप्त झाल्याचे अडीच हजार वर्षांपूर्वी आपल्या पूर्वजांच्या मनात कोणते धर्मविचार व तत्त्वविचार घोळत होते त्याची माहिती आम्हास अंशत: होईल. दुसरे असे की, बुद्धकृत धर्मपरिवर्तन या भारतभूमीत सुमारे एक सहस्र वर्षे कायम राहून, पुढे ते हळूहळू निर्मूळ होऊन शेवटी केवळ नामशेष झाले आणि सांप्रत तर त्या धर्माचे अनुयायी नेपाळ व काश्मीर खेरीजकरून हिंदुस्थानाच्या इतर भागात फार तर दोन-अडीच लाख असतील. तेव्हा जो धर्म अशोकासारखा दिग्विजयी चक्रवर्ती राजाचा हस्तालंब मिळून हिंदुस्थानात एके काळी सर्वत्र पसरला होता, त्याचे बहुतेक निर्मूलन युद्धादिमूलक रक्तपातादी घोर प्रसंग घडून न येता व्हावे हे मोठेच विलक्षण आहे. यास्तव बुद्धधर्माच्या प्रसाराचा व पराभवाचा वृत्तांत देवधर्माभिमानी जनांनी अवश्य जाणून घ्यावा असा आहे.

# भाग दुसरा
# पूर्ववय

**विहाय राज्यं विषयेष्वनास्थस्तीव्रैः प्रयत्नैरधिगम्य तत्त्वं ।**
**जगत्ययं मोहतमो निहंतु ज्वलिष्यति ज्ञानमयो हि सूर्यः ।।१।।**

राज्याचा त्याग करून, विषयभोगांची अनास्था करून व तीव्र प्रयत्नांच्या योगाने तत्त्व जाणून जगातील मोहमूलक अज्ञानतमाचा नाश करण्यासाठी हा ज्ञानमय सूर्य प्रकाशित होईल.

**– अश्वघोषकृत बुद्धचरित**

गौतम बुद्धाचा जन्म इसवी सनापूर्वी ५५७[१] व्या वर्षी कपिलवस्तू[२] नामक एका प्राचीन नगरामध्ये झाला. त्याच्या पित्याचे नाव शुद्धोदन व मातेचे नाव मायादेवी असे होते. शुद्धोदन[३] हा त्या काळच्या शाक्य नामक क्षत्रिय वंशाचा प्रमुख असून कपिलवस्तू हे त्याच्या राजधानीचे नाव होते. हा शाक्यवंश कोसलनामक एका मोठ्या प्राचीन क्षत्रिय वंशाची उपशाखा असून शुद्धोदनादी राजे आपणास इक्ष्वाकुराजाचे वंशज म्हणवीत.

---

१ हा सन आम्ही 'सेक्रेड बुक्स आव् दि ईस्ट'नामक ग्रंथमालिकेत प्रसिद्ध झालेल्या धम्मपदाच्या भाषांतरास जोडलेल्या उपोद्घातावरून घेतला आहे; परंतु याविषयी विद्वान शोधकांचा अद्यापि वाद आहे.

२ हे नगर रोहिणी नदीच्या तीरी काशी क्षेत्राच्या ईशान्येस सुमारे शंभर मैलावर आहे. सांप्रत या नगराच्या ठिकाणी हे लहानसे खेडे आहे. हे बुद्धाचे जन्मस्थान. इसवी सन ६३२ च्या सुमारास ह्युएन सँग नामक एक बुद्धधर्मानुयायी चिनी प्रवाशाने पाहून आपल्या प्रवासवृत्तात त्याचे असे वर्णन केले आहे की, या प्राचीन नगरीच्या खाणाखुणा अद्यापि पुष्कळ आहेत. राजाच्या मंदिराच्या व उद्यानाच्या भिंती पडलेल्या अद्यापि दिसत असून त्यांचा घेर तीन मैलाचा आहे. मोडून तुटून पडलेल्या काही भागामध्ये बुद्धाच्या मातेचे निद्रागृह आणि बुद्धाची विद्याभासाची जागा ही ठिकाणे आपणास लोकांनी दाखविली, असे तो प्रवासी म्हणतो. या कपिलवस्तुनगराविषयी अशी दंतकथा आहे की, ते कपिलनामक एका महंताच्या स्मरणार्थ वसविले होते. हा कपिल प्रसिद्ध सांख्यदर्शनाचा प्रवर्तक होता, असा कित्येकांचा तर्क आहे. दंतकथेस अश्वघोषकृत बुद्धचरित्रातील पुढील वचनाचा आधार आहे. 'उदग्रधिष्ण्यं गगनेऽवगाढं पुरं महर्षेः कपिलस्य वस्तु'.

३ याच्या पूर्वजांची मुळीच काही हकीकत सापडत नाही. इतके मात्र कळते की, याच्या आज्याचे नाव जयसेन असे असून याच्या पित्याचे नाव सिंहहनू असे होते.

शाक्यवंशाने बसविलेला प्रांत[१] कोसलदेशात[२] राप्ती[३] नदीच्या उत्तरभागी असून नेपाळ देशातून गेलेल्या हिमालय पर्वताच्या पायथ्यापर्यंत पसरला आहे. या प्रांताच्या पूर्वेस रोहिणी[४] नामे करून एक नदी आहे. या नदीच्या पलीकडे शाक्यांचा ताबा नव्हता. हा शाक्यांचा प्रांत बराच सपाट असून सुपीक आहे. हिमालयावरून वाहत येणाऱ्या लहान-लहान नाल्यांचे पाणी येथे जमा होऊन बरेच मुरत आल्यामुळे येथील जमीन भातशेतीस फारच नामी आहे. आताप्रमाणेच शाक्याच्या वेळीही या प्रांतात भाताचे उत्पन्न उत्तम प्रकारचे होत असे. शाक्यवंशातील मोठमोठे सरदार आपापल्या जमिनी स्वत: नांगरीत-पेरीत असत. खुद्द शुद्धोदन राजाचे खासगीचे वतन असून त्यात तो आपल्या देखरेखीखाली भाताची लागवड करीत असे, असे दिसते. त्याच्या नावावरूनही हा तर्क संभवतो.[५] शाक्यांच्या या प्रांतात आंब्याची व चिंचेची पुष्कळ झाडे असून जिकडे तिकडे झुळझुळ वाहणारे नाले पुष्कळ आहेत. यामुळे तो प्रांत फारच रमणीय झाला आहे. त्याशिवाय हिमालयाची नेपाळी ओळ एकासारखी उंचच उंच लागून राहिल्यामुळे तर तेथला देखावा फारच भव्य दिसतो.

हे शुद्धोदनाचे राज्य अगदी लहान होते तरी तो कोणाचाही मांडलिक नसे. त्यांच्या राज्याच्या आसपास कोसल व मगध ही दोन मोठी बलाढ्य राष्ट्रे होती. तरी त्यांच्या या लहानशा राज्यावर कोणत्याही प्रकारचा शह नसे. शाक्यवंशातील राजे मोठे बाणेदार व अभिमानी असत. त्याला इतर जवळपासच्या राजांशी लढण्याचे जरी सामर्थ्य नसे तरी त्यांना स्वातंत्र्यप्रीती अतोनात असे. तो काळ सतत संगरावस्थेचा असल्याकारणाने त्यांच्या राज्यावर लुटारू लोकांच्या टोळ्या वारंवार हल्ले करीत. त्या टोळ्यांशी लढून आपले स्वत्व कायम राखण्यापुरते सामर्थ्य, शौर्य व ऐक्यही त्यांच्यामध्ये असे. आता कोसल व मगध यापैकी कोणा तरी एका राष्ट्राने त्यास पादाक्रांत न करण्याचे

---

१ या शाक्यांच्या प्रांतांचा समावेश हल्ली गोरखपूर परगण्यातील विनायकपूर व वन्सी आणि हवेली परगण्यात पश्चिमेकडील अर्धा भाग एवढ्यामध्ये झाला आहे.

२ याला सांप्रत अयोध्या प्रांत म्हणतात.

३ ही नदी अयोध्या प्रांतात ईशान्य दिशेकडून वाहत जाऊन गंगा नदीस मिळाली आहे. ही नदी बुद्ध धर्म ग्रंथातून अचिरवती या नावाने प्रसिद्ध आहे.

४ ही नदी गोरखपुराजवळ राप्तीस मिळते. हे संगमाचे ठिकाण काशी क्षेत्राच्या उत्तरेस सुमारे शंभर मैलावर आहे.

५ शुद्ध + ओदन (भात); या राजाच्या दुसऱ्या चार भावांची नावे 'ओदन' या पदास दुसरी विशेषणे लावून बनविली होती. ती नावे होत; शुक्लोदन, अमृतोदन, धौतोदन आणि अगणितोदन.

कारण असल्यामुळे शाक्यांशी कुरापत काढून लढण्याचे धैर्य कोणासही होत नसे; कारण एकाने त्यांच्याशी समरप्रसंग केला असता, दुसरे त्यांच्या साहाय्यास येऊन त्या कुरापत काढणाऱ्या राष्ट्राचा पराभव होण्याचा दृढ संभव असे; परंतु पुढे बुद्धाच्या पश्चात कोसल देशाच्या राजाने शाक्यांवर आपला ताबा बसवून शुद्धोदनाचे राजघराणे बुडविले, असा इतिहास आहे.

शुद्धोदन राजा मोठा संपन्न असून, त्याच्यावर सरदारांची व प्रजेची फारच प्रीती असे. तो मोठा शूर व न्यायी असून आपल्या प्रजेचे पुत्रवत पालन करीत असे. रोहिणी नदीच्या दुसऱ्या तीरी कोलियन नावाच्या एका क्षत्रिय वंशाने वसाहत केली होती. या वंशाचा व शाक्यांचा मूळ पुरुष एकच होता. या कोलियनांशी शाक्यांचे रोहिणी नदीच्या पाण्यासंबंधाने नेहमी कलह होत असत. तरी पुढे त्यांच्यामध्ये साम होऊन ते एकमेकांशी स्नेहभावाने वागत असत. या कोलियनांच्या राजाने[१] शाक्यांच्या शुद्धोदनराजास आपल्या दोन मुली दिल्या होत्या. एकीचे नाव मायादेवी आणि दुसरीचे नाव महाप्रजापती. या दोघींच्याही पोटी संतान नसल्यामुळे राजा नेहमी फार कष्टी असे. पुत्रमुख पाहिल्यावाचून मृत्यू आल्यास आपल्या मागे आपले श्राद्धादी विधी करण्यास आपल्या कुळाचे नाव चालविण्यास कोणी नसल्यामुळे आपणास व आपल्या पूर्वजनास नरकवास घडतो, अशी समजूत हल्लीप्रमाणे त्या काळीही लोकांची असे. त्यामुळे शुद्धोदनराजाचे चित्त मुळीच स्वस्थ नसे. शेवटी मायादेवी आपल्या वयाच्या पंचेचाळिसाव्या वर्षी गर्भवती झाली तेव्हा त्याला मोठा आनंद झाला. स्त्री प्रथम गरोदर झाली असता तिला तिच्या माहेरी प्रसूत होण्याकरिता पाठविण्याचा परिपाठ असे. त्याप्रमाणे मायादेवी आपल्या माहेरी जावयासाठी मोठ्या परिवारानिशी निघाली; परंतु ती वाटेत लुंबिनी नामक एका अतिरमणीय राईमध्ये शाल वृक्षाखाली प्रसूत झाली. ही स्वभार्येच्या प्रसूतीची वार्ता राजास कळताच तो तेथे आला आणि पाहतो तो आपणास एक पुत्ररत्न प्राप्त झाले आहे, असे त्यास आढळून आले. तेव्हा त्याचा आनंद काय विचारता! त्या काळच्या राजेलोकांच्या पद्धतीस अनुसरून पुत्रोत्सवाप्रीत्यर्थ जेवढे काही करावयाचे तेवढे सारे त्याने मोठ्या उत्साहाने व प्रेमाने केले. शुद्धोदनाच्या इतर बांधवांस व प्रजाजनासही त्याबद्दल मोठा हर्ष होऊन त्यांनी आपापल्यापरी उत्सव करून आनंद प्रदर्शन केले. पुत्राचे जातकर्मादी यथोचित विधी होऊन त्याचे नाव सिद्धार्थ असे ठेवले. हाच आमच्या चरित्राचा नायक होय.

---

१ या राजाचे नाव अंजन असे असून त्याच्या पित्याचे नाव देवदाह असे होते. हा कोलियामक प्रांताचा राजा होता.

असे सांगतात की, गौतम बुद्धाची माता तो जन्मल्यावर सातव्या दिवशी मरण पावली. ही माउली परम रूपवती असून त्या काळच्या कुलीन स्त्रियांत आढळणाऱ्या एकंदर सद्गुणांनी मंडित होती. आपणास सुपुत्र होऊन आपल्या कुळाची उन्नती करण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी यावे म्हणून तिने गर्भवती असता नाना व्रते केल्यामुळे तिची प्रकृती बरीच क्षीण झाली होती. त्या कारणाने तिला प्रसूतीनंतर लवकरच मृत्यू आला असे म्हणतात. ती मरण पावल्यावर तिची बहीण, महाप्रजापती हिने गौतमाचे संगोपन केवळ स्वपुत्राप्रमाणे केले.

गौतम बुद्धाच्या बाळपणाचे वृत्त फारसे आढळत नाही. त्याला त्यावेळी उपलब्ध असलेल्या विद्या शिकविण्याकरिता गुरू ठेविले होते. त्यांचा असा अनुभव होता की, तो अतिशय तैलबुद्धी असल्याकारणाने त्याला कोणतीही गोष्ट दोन वेळा सांगावी लागत नसे. त्या काळच्या राजपुत्रास ज्या विद्या व कला शिकविण्याचा परिपाठ असे त्या साऱ्या तो अल्पवयातच शिकून तयार झाला. असे सांगतात की, तो आपल्या बाळपणाच्या सवंगड्यांत मिसळून कधीही फारसा खेळत नसे, त्याला त्यांचे बालिश खेळ मुळीच आवडत नसत. तो सर्वदा आसपासच्या वस्तू व व्यापार यांचे अवलोकन सूक्ष्मपणे करून त्यावर विचार करण्यात गुंग झालेला असे. तो एकटाच कोठे तरी फिरत असे आणि पाहिलेल्या व ऐकलेल्या गोष्टींचे मनन करीत असे. एके समयी तो आपल्या सोबत्यांसह वर्तमान एक शेत पाहण्यासाठी नगरापासून अंमळ दूर गेला. त्यावेळी त्याच्या नजरेत ज्या गोष्टी पडल्या त्यामुळे त्याच्या चित्तास परम उद्विग्नता प्राप्त झाली. प्रथमत: त्याने त्या शेतात दिवसभर खपणाऱ्या शेतकऱ्यांची स्थिती पाहिली आणि तिची आपल्या स्थितीशी तुलना करून पाहता त्याच्या लक्षात आले की, या गरीब, दीनजनांनी शीत, उष्ण, पाऊस याची पर्वा न करता अहर्निश जिवापाड श्रम करावे आणि राजांनी व सरदारांनी स्वस्थ घरी बसून या कंगाल लोकांकडून करानिमित्त घेतलेल्या धनावर यथेष्ट चैन करावी हे काही बरं नव्हे. हा निव्वळ अन्याय आहे. तसेच त्या मुक्या जनावरांनी शेतकऱ्यांच्या आसुडांचे तडाखे बसतील या भीतीने अंगात तकवा नसताही नांगर ओढ ओढ ओढावे आणि त्यांच्या मानेला मोठमोठ्या जखमा पडल्या तरी त्याबद्दल कोणास काहीच वाटू नये हा केवढा निर्दयपणा. पुढे आणखी इकडे तिकडे हिंडून वनापनाची शोभा पाहत असता व पशुपक्ष्यादींकडे निरनिराळे व्यापार अवलोकन करीत असता त्याच्या दृष्टीस जरी वरवरून मोठी मनोरम वनश्री पडली तरी अंमळ खोल विचार करून जेव्हा त्याने आपल्या मनात त्या वनातील प्राण्यांची वास्तविक स्थिती आणली तेव्हा त्याला असे भासले की, ते प्राणी

सकृद्दर्शनी दिसतात तेवढे सुखी नाहीत, त्याला विपत्ती व संकटे यांचा सदा अनुभव घडत असतो. उदाहरणार्थ त्याच्या दृष्टीस असे पडले की, पाली मुंग्या खाऊन उपजीवन करतात. या पाली सर्पाच्या भक्ष्यस्थानी पडतात आणि गरुड तर या दोन्ही जातीचे प्राणी खाऊन निर्वाह करीत असतात. त्याचप्रमाणे बुलबुल पक्षी पतंगावर झेप घालण्यास सर्वदा टपलेले असतात आणि या बुलबुल पक्ष्यांच्या पाठीस बहिरी ससाणा लागलेला असतो. याप्रमाणे चोहोकडे 'जीवोजीवस्य जीवन' अशी स्थिती त्याच्या अवलोकनात आली. आपले उदर भरण्यासाठी एक दुसऱ्याचा प्राणघात करितो आणि त्याचाही तिसराच कोणीतरी जीव घेतो, ही केवढी विपत्ती? अशी विपत्ती चोहोकडे नजरेस पडत असता कोण विचारी पुरुष दुसऱ्यास पीडा होऊन प्राप्त झालेल्या ऐशआरामाचा उपभोग घेईल? हे त्याच्या मनात आलेले विचार त्याने आपल्या सोबत्यास बोलून दाखविले; परंतु त्यांच्या लक्षात त्यातले काहीच न आल्यामुळे त्यांच्याशी आणखी न बोलता त्याला सोडून जवळच्या निबिड अरण्यात तो शिरला. तेथे तो कित्येक तासांपर्यंत विचार करीत फिरत होता. त्याच्याबरोबर आलेल्या मंडळीला तो कोठे गेला व त्याचे काय झाले ते काहीच कळेना. शेवटी त्याच्या पित्यास हे वर्तमान कळून तो त्या ठिकाणी आला आणि आपल्या सेवकजनांसहित त्या रानात त्याचा शोध करू लागला. शेवटी त्यांना तो एका जंबुवृक्षाखाली शांतपणे विचार करीत बसलेला आढळला.

परदु:ख पाहून कळवळून जाण्याचा हा गौतम बुद्धाच्या ठायीचा अप्रतिम स्वभाव लहान वयातच दृष्टोत्पत्तीस आल्याचे दुसरे एक उदाहरण येणेप्रमाणे आहे. एके प्रसंगी तो बागेत बसला असता त्याच्यावरती अंतराळातून उडत जाणाऱ्या एका हंसास त्याचा चुलतभाऊ देवदत्त याने बाण मारला. त्यासरशी तो पक्षी त्याच्यापुढे मृतवत होऊन पडला. तो पक्षी रक्ताने भरलेला असून तो धडपडत आहे असे पाहून तो तात्काळ उठला आणि त्या पक्ष्याकडे जाऊन त्याला वर उचलून त्याची अशी अवस्था कशामुळे झाली ते तो पाहू लागला. तेव्हा त्याला असे दिसून आले की, त्या पक्ष्याला कोणाचा बाण लागून मोठी जखम झाली आहे. मग त्या बिचाऱ्या प्राण्याला मोठ्या ममतेने एका हातात धरून दुसऱ्या हाताने त्याच्या अंगात शिरलेला तो बाण त्याने काढला आणि त्याच्या जखमेत काही औषध भरून त्याला हिरव्यागार पानांमध्ये लपेटून ठेवले. त्या पक्ष्यास हे असे उपचार करीत असता त्याच्या हातास त्या बाणाचे टोक बोचले. त्यासरशी त्याला पुष्कळ वेदना झाली. त्यावरून त्याने ताडले की, त्या पक्ष्याला आपल्यापेक्षा पुष्कळपट अधिक दु:ख होत असावे. असे मनात येऊन तो अतिशय हळहळला आणि त्या पक्ष्याच्या दु:खाचा परिहार करण्यासाठी तो विशेष

झटून प्रयत्न करू लागला. इतक्यात कोणी त्याच्याजवळ येऊन म्हटले की, आमच्या छोटे महाराजांनी या पक्ष्याला बाण मारून खाली पाडले आहे, तरी आपण त्याला माझ्या स्वाधीन करावे. त्यावर सिद्धार्थ म्हणाला, 'नाही, मी तो तुझ्या स्वाधीन करीत नाही. माझ्या बंधूच्या बाणाने हा पक्षी मेला असता तर तो त्याच्याकडे पाठवून देणे ठीक होते; परंतु तो अद्यापही जिवंत आहे. त्याने या बिचाऱ्या पक्ष्याचा पंख आपल्या बाणाने जायबंदी करून त्याची गतीच तेवढी कुंठित केली आहे. एरवी त्याच्या जीवास मुळीच धक्का लागलेला नाही.' ह्या त्याच्या उत्तरावर देवदत्ताने असे प्रत्युत्तर केले की, 'वनपक्ष्यास जो तीर मारून खाली पाडतो त्याची त्या पक्ष्यावर सत्ता असते. मग तो त्याच्या बाणाने मेलेला असो किंवा नसो. नभोमंडलात भ्रमण करणाऱ्या वनपक्ष्यांवर कोणाही मनुष्याची मुळीच सत्ता नाही. अशा एका पक्ष्यास मी खाली पाडले आहे. यास्तव तो माझा आहे. तो तू माझ्या स्वाधीन अवश्य करावा.' तेव्हा बुद्धाने त्या पक्ष्याची मान आपल्या कोमल गालावर ठेवून मोठ्या गंभीरतेने म्हटले, 'नाही, असे मी कदापि करणार नाही. हा पक्षी माझा आहे. यावर मी दया करून याचा जीव वाचविला आहे. याला मी पुन्हा मृत्युमुखी लोटणार नाही. देवदत्ताला जर वाटत असेल की, हा मी त्याच्यावर अन्याय करीत आहे, तर त्याने या गोष्टीचा निर्णय शहाण्या लोकांकडे जाऊन करावा.'

देवदत्तला ही सूचना पसंत वाटून त्याने दरबाराच्या शहाण्या लोकांपुढे हा प्रश्न ठेविला. तेव्हा तेथे त्याची वाटाघाटी झाली; परंतु कोणत्याच गोष्टीचा पक्का निर्णय होईना. शेवटी एक पंडित उठून म्हणाला की, जीव म्हणून काही तरी आहे असे जर आपण मानीत असाल, तर तो कोणी एखादा जीव वाचवितो त्याची त्या जीवावर जितकी सत्ता असते तितकी त्याचा नाश करणाऱ्या मनुष्याची त्यावर नसावी; कारण हिंसा करणारा जीवाची हानी करितो आणि रक्षण करणारा त्याचे परिपालन करितो. यास्तव या पक्ष्याचा ज्याने जीव वाचविला त्यासच हा पक्षी मिळणे रास्त होय. हा निर्णय सर्वांत योग्य वाटला आणि देवदत्ताला आपला हेका सोडावा लागला.

याप्रमाणे बुद्धाच्या ठायीची मननशीलता व मनाची कोमलता अल्पवयातच दृग्गोचर होऊ लागली. त्या काळच्या क्षत्रिय वंशातील तरुण जनांची आयुष्यक्रमणाची रीती म्हटली म्हणजे अशी असे की, सर्व प्रकारचे आहारविहार यथेष्ट करावे, वनोपवनात अश्वारूढ होऊन भ्रमण करावे, मृगया करावी, युद्धादी ज्या कला ते शिकत त्यांची उपस्थिती राहण्याकरिता त्यांचा अभ्यास सतत करावा. यामुळे त्यांच्या अंगात जोम,

हुशारी व धमक कायम राहून युद्धप्रसंग प्राप्त झाला असता त्याच्या हातून मर्दुमकीची कृत्ये होणे शक्य व्हावे. या सर्वसाधारण क्रमाविरुद्ध बुद्धाचे वर्तन पाहून लोकांस मोठे नवल वाटे.

असे सांगतात की, राजालाही आपल्या पुत्राची शांत वृत्ती, सुखोपभोगाविषयीची अप्रीती पाहून वाईट वाटे. त्याने इतर तरुण जनांप्रमाणे आपले वर्तन ठेवावे व त्याचे संसारात मन रमावे म्हणून त्याला कोणत्याही गोष्टीचे उणे पडू न देण्याविषयी तो फारच सावधगिरी ठेवीत असे. त्याने त्याला निरनिराळ्या ऋतूत राहण्यासाठी तीन मंदिरे बांधून त्यांची अंतर्बाह्य रचना अशी मनोरम केली होती की, त्याच्या चित्तास त्यात राहिल्याने सर्वदा करमणूक होऊन त्यास ऐहिक सुखविषयक गोडी लागावी. त्याचप्रमाणे परदु:ख पाहून त्याचे चित्त परम उद्वेग पावते आणि त्यास इहलोकच्या सुखानुभवाचा वीट येतो, असे राजाच्या लक्षात येऊन तो दु:ख व विपत्ती त्याच्या दृष्टीस मुळीच न पडू देण्याविषयी खबरदारी घेत असे. आपल्या पुत्राचे औदासीन्य नाहीसे होऊन संसार सुखलालसा त्याच्या ठायी निर्माण व्हावी म्हणून तो या प्रकारे नाना योजना व उपाय करीत असे. तरी त्याचे ते सर्व प्रयत्न विफल झाले. बुद्धाची उदास वृत्ती दृढावत जाऊन संसाराविषयीचे अप्रेम त्याच्या ठायी क्रमाक्रमाने वृद्धिंगतच होत गेले.

ही त्याची वृत्ती पाहून मुळीच चैन पडेनासे झाले. आपल्या पुत्राचे लक्ष संसाराकडे लागून ऐहिक गोष्टीत त्याचे मन रमल्यावाचून त्याच्या हातून आपल्या मागे आपल्या संस्थानाची व्यवस्था नीट राखणे नाही, असे त्याला वाटत असे. त्याचप्रमाणे त्याकाळी संसारास त्रासून अगदी विरक्त बनून तापस वृत्ती धारण करणाऱ्या लोकांचा जिकडे तिकडे मोठा समुदाय दृष्टीस पडे. त्यामुळे त्याला असे भय वाटे की, आपला पुत्रही संन्यास वृत्ती धारण करून वनात निघून जाईल. अशा विवंचनेत राजा रात्रंदिवस असलेला पाहून त्याच्या मंत्रिमंडळाने त्याला असे सुचविले की, त्याचा एखाद्या लावण्यसंपन्न स्त्रीशी विवाहसंबंध जुळवून दिल्याने त्याच्या वृत्तीत फेर पडून तो ऐहिक सुखानुभवास लुब्ध होईल आणि मग राजाच्या चिंतेस कारण ठरणार नाही. ही त्यांची युक्ती शुद्धोदनराजास पसंत वाटली.

या विवाहसंबंधाने अशी एक गोष्ट सांगतात की, सिद्धार्थाने आपणास आवडेल त्या मुलीशी विवाह करावा म्हणून त्याच्या दृष्टीस निरनिराळ्या सरदारांच्या कन्या पडतील अशी व्यवस्था शुद्धोदनराजाने केली. ती अशी की, काही उत्सवाचे मिषेकरून आपल्या सरदाराच्या रूपवती कन्या राजवाड्यामध्ये बोलावून आणल्या आणि त्या

मुलींना कित्येक प्रकारचे खेळ खेळावयास सांगितल्यावर त्यांना बक्षिसे देण्याचे ठरविले. ती बक्षिसे सिद्धार्थ राजपुत्राने आपल्या हाताने त्यांस द्यावी अशी योजना केली. पिताज्ञेप्रमाणे सिद्धार्थ मुलीस बक्षीस द्यावयास बसला तेव्हा प्रत्येक मुलगी त्याच्याकडे येऊन आपापले बक्षीस घेऊन जाऊ लागली. याप्रमाणे बक्षिसे देण्याचा क्रम चालला असता सिद्धार्थाचे लक्ष कोणत्या मुलीकडे विशेष प्रकारे जाते ते पाहण्यासाठी राजाने कित्येक धूर्त व हुशार सेवक जवळ उभे करून ठेविले होते. त्यांनी राजास असे सांगितले की, 'सुप्रबुद्धाच्या कन्येकडे राजपुत्राने पाहिले तेव्हा त्याच्या चर्येत फरक झाला व तो तिच्याकडे टेहळून पाहू लागला. इतर कोणत्याही मुलीकडे त्याचे लक्ष गेले नाही आणि आम्हालाही वाटते की, ती राजवाड्यात जमलेल्या एकंदर मुलींहून रूपवती व गुणी आहे. तिच्याशी राजपुत्राचा विवाह करून द्यावा हे ठीक दिसते.'

याप्रमाणे सेवकजनांनी सांगितले तेव्हा राजास हर्ष झाला आणि त्याने लागलीच कोलियाचा संस्थानिक सुप्रबुद्ध याजपाशी त्याच्या मुलीविषयी मागणी घातली. त्या संस्थानिकाने राजास येणेप्रमाणे उलट निरोप पाठविला, 'आपल्या क्षत्रियकुलातील परिपाठ असा आहे की, आपली मुलगी ज्यास द्यावयाची त्याच्या अंगात इतर सर्व तरुण क्षत्रिय वीरांहून अधिक बल व बुद्धिकौशल्य आहे अशी आधी खात्री करून घ्यावी; पण आपल्या पुत्राचा जो लौकिक आम्ही ऐकतो त्यावरून असे कळते की, त्याच्या अंगात हे कसोटीस लावावयाचे गुण मुळीच वृद्धी पावलेले नाहीत; कारण तो सदोदित आपल्या महालात आपल्याशीच गुंगत बसलेला असतो. त्याला मर्दुमकीचे खेळ व व्यायाम मुळीच आवडत नाही. अशा स्थितीमध्ये माझ्या मुलीच्या स्वयंवराची योजना करून तिला वरू इच्छिणाऱ्या तरुण क्षत्रियास बोलाविले असता त्या सर्वांवर सरशी करून माझ्या कन्येस वरण्याचे सामर्थ्य सिद्धार्थाच्या अंगी असेल असे आम्हास वाटत नाही. यास्तव आपण या आपल्या मागणीविषयी आग्रह धरू नये, हे आम्हाला योग्य दिसते.' हा सुप्रबुद्धाचा निरोप ऐकून राजा मोठ्या विचारात पडला. त्याला पुढे काय करावे ते सुचेना. ही अशी स्वपित्यास चिंता प्राप्त झाली आहे असे सिद्धार्थाच्या कानी आले तेव्हा त्याने त्यास सांगून पाठविले की, 'सुप्रबुद्धाच्या इच्छेप्रमाणे सर्वकाही व्यवस्था राजाने बेलाशक करावी आणि माझ्या अंगी युद्धकौशल्यादी गुण कितपत आहेत त्याची कसोटी खुशाल पाहावी.' याप्रमाणे राजपुत्राकडून आश्वासन मिळाल्यावर शुद्धोदनराजा सुप्रबुद्धाच्या म्हणण्यास कबूल होऊन त्याने चोहोंकडे अशी दवंडी पिटविली की, 'सिद्धार्थ राजपुत्राच्या मनातून सुप्रबुद्धाच्या मुलीशी विवाह करण्याचे आहे, तरी त्या मुलीस वरू इच्छिणाऱ्या एकंदर तरुण क्षत्रियांनी आजपासून सात

दिवसांनी ठरलेल्या ठिकाणी यावे आणि आपल्या अंगचे युद्धकलादी गुण दाखवावेत. असे त्यांनी केल्यानंतर ज्याची इतर सर्वांवर सरशी होईल त्यास ती मुलगी वरील. मग मोठा रमणा करून जमलेल्या सर्व तरुणांनी आपापल्या अंगच्या कौशल्याची व बलाची अगदी शिकस्त केली; परंतु त्या सर्वांहून सिद्धार्थ वरचढ ठरून त्याने त्या मुलीशी विवाह करावा असे ठरले.

हे असे सिद्धार्थाचे अलौकिक युद्धकलानिपुणत्व व बलाढ्यत्व पाहून शुद्धोदनराजाचे सरदार व इतर प्रजाजन यांस मोठे समाधान वाटले. यापूर्वी ते राजापाशी नेहमी अशी कुरकुर करीत की, क्षत्रिय धर्मास आवश्यक असे युद्धादी कलांतले नैपुण्य सिद्धार्थाच्या ठायी अगदी कमी आहे. तो कोणतेही जवामर्दीचे खेळ खेळत नसतो किंवा मृगयादी व्यायाम करीत नसतो. यामुळे त्याच्या अंगी युद्धोपयोगी गुण मुळीच वृद्धी पावलेले नाहीत. असा राजा जर आम्हास आपल्या पश्चात प्राप्त झाला तर आम्ही काय करावे? हे त्यांचे गाऱ्हाणे ऐकून राजा नेहमी चिंतातुर असे; परंतु त्याला व त्याच्या प्रजेला हे ठाऊक नव्हते की, बुद्धासारख्या अलौकिक पुरुषास एकदा शिकलेल्या विद्येची किंवा कलेची उपस्थिती राखण्यास अभ्याससातत्यादि कृत्रिम उपायांची फारशी आवश्यकता नसते. तेथे कित्येक चरित्रकारांचे असे म्हणणे आहे की, राजापाशी लोक येऊन याप्रमाणे कुरकुर करू लागले तेव्हा सिद्धार्थाने आपल्या अंगचे बल व युद्धकलाप्रावीणत्व दाखविण्यासाठी सर्व तरुण योद्ध्यांना जमा करण्यास आपल्या पित्याला सांगितले आणि याप्रमाणे तरुण योद्धे जमल्यावर त्या सर्वांहून आपण श्रेष्ठ आहोत असे त्याने लोकांच्या प्रत्ययास आणून दिले. त्यांच्या मते, स्वयंवराच्या वेळी बुद्धाच्या अंगचे युद्धोपयोगी गुण कसोटीस न लागता ते वर सांगितल्यासारखा प्रसंग घडून येऊ लागले. आम्हाला या कल्पनेपेक्षा स्वयंवराचीच कल्पना विशेष ग्राह्य व स्वाभाविक वाटते. कारण क्षत्रियांच्या अशा विवाहपद्धतीची उदाहरणे पुराणांतरी पुष्कळ वर्णिली आहेत आणि पुरातन आर्यांच्या निरनिराळ्या शाखांतील क्षत्रिय जातीत अशीच विवाहपद्धती रूढ असल्याची साक्ष इतिहास भरपूर देत आहे.

येथे बुद्धाच्या पूर्ववयाची हकीकत संपते. येथून पुढे तो सुमारे एकोणतीस वर्षांचा होईपर्यंत त्याच्याविषयी काही एक माहिती मिळत नाही. त्याचा विवाह झाल्यावर तो आपल्यासाठी मुद्दाम बांधलेल्या मंदिरात राहून संसारसुखाचा अनुभव घेऊ लागला. एवढाच त्याच्याविषयी त्याच्या चरित्रकारांचा उल्लेख आहे.

# भाग तिसरा
# संसारत्याग

**अहं पुनर्भीरुरतीव विक्लवो जराविपद्यापधिभयं व्रिचिंतयन् ।।**
**लभे न शांती न धृतिं कुतो रतिं निशामयन् दीप्तमिवाग्निता जगत् ।।**

जरा, विपत्ती आणि व्याधी यापासून उद्‌भवणारे भय माझ्या मनात येऊन मी अगदी भिऊन व घाबरून जातो. हे जगत् दु:खरूप अग्नीने व्याप्त झालेले पाहून मला शांती व धैर्यही प्राप्ती होत नाही, तेथे मला सुख कोठून वाटायचे?

**–अश्वघोषकृत बुद्धचरित**

सिद्धार्थ राजपुत्रास संसार सुखाचा वाटावा म्हणून राजाने आपल्याकडून होण्यासारख्या सर्व गोष्टींची योजना केली होती, हे मागे सांगितलेच आहे. त्याचा विवाह झाल्यावर राजाने त्याच्याकरिता एक अतिरमणीय उपवन तयार करवून त्यात एक सुंदर मंदिर बांधून दिले. या स्थलाचे नाव विश्रामवन असे असून, बुद्ध नेहमी यात राहत असे. आपल्या पुत्रास परदु:ख पाहून उद्वेग प्राप्त होतो म्हणून त्याच्या दृष्टीस आंधळे, म्हातारे, रोगी, दरिद्री वगैरे लोक न पडावे अशी व्यवस्था त्याने केली होती. राजपुत्रास कोठे बाहेर न जाता वाटतील ते विहार करिता यावे व सर्व प्रकारची निसर्गशोभा पहावयास मिळावी अशी योजना त्याने विश्रामवनात केली होती. यामुळे सिद्धार्थास त्या उपवनाबाहेर जाण्याचे फारसे प्रयोजन वाटत नसे. तरी आपल्या विहारस्थानाबाहेरील जनस्थिती कशी काय असे, ते पाहण्याची उत्कंठा त्यास वारंवार होऊन तो पिताज्ञा घेऊन बाहेर फिरावयास जात असे. याप्रमाणे राजपुत्राची स्वारी नगरातून चालली म्हणजे त्याच्या दृष्टीस विषदग्रस्त जन न पडू देण्याविषयी राजाज्ञेने व्यवस्था होत असे. तथापि, कालेकरून त्याच्या अवलोकनातून निरनिराळी जनस्थिती येऊन त्याची अशी खात्री झाली की, मनुष्य वरवरून कितीही सुखी दिसला तरी वास्तविक व शाश्वत सुख या जगात कोणासही प्राप्त होणे नाही. त्याच्या मनात नेहमी असे विचार घोळू लागले की, कित्येकास काही काळपर्यंत सुखानुभव घडतोसा दिसला तरी तो शाश्वत नसून त्यात दु:खाचे मिश्रण नेहमी असतेच असते व हे दु:खमिश्रित सुखही सर्वांस लाभण्याची शक्यता वर्तमान स्थितीमध्ये मुळीच नाही. तेव्हा आपल्या आसपास आपले इतर बांधव विपत्तीत रखडताना जो विचारी पुरुष पाहतो त्याला स्वत:ला दैवयोगाने प्राप्त

झालेल्या ज्या जलबुदबुदवत क्षणिक सुखाचा उपभोग घेणे कसे रुचेल? याप्रमाणे जनस्थितीचे व इतर सृष्टीचे सूक्ष्म अवलोकन केल्यामुळे संसार असार आहे असे त्याच्या मनामध्ये वेळोवेळी येऊ लागले.

बुद्धाच्या ठायी संसारद्वेष दृढ होण्यास पुष्कळ गोष्टींचे अवलोकन कारणीभूत झाले हे निर्विवाद आहे. तथापि, त्या गोष्टीचे चार वर्ग कल्पून त्यापैकी प्रत्येक वर्गातील एक-एक गोष्ट त्याच्या दृष्टीस पडल्याचे वर्णन त्याच्या चरित्रकारांनी केले आहे. या चार वर्गातल्या चार गोष्टी येथे मासल्यासाठी देतो.

एके समयी राजपुत्राच्या मनात नगरामध्ये फिरावयास जाण्याचे येऊन त्याने राजाची आज्ञा मागितली. राजाने त्यास ही सहल करण्याची परवानगी देऊन त्याची स्वारी ज्या रस्त्याने जावयाची होती त्या रस्त्यावर कोणीही विपन्न स्थितीतले माणूस फिरू देऊ नये, सर्वांनी चांगली वस्त्रे परिधान करून अगदी आनंदवृत्तीने राजपुत्राच्या दृष्टीस पडावे अशी दवंडी पिटविली. मग सिद्धार्थ नेमलेल्या वेळी आपल्या रथात बसून नगरातून जाऊ लागला. तेव्हा त्याला सर्वत्र आनंदच आनंद दिसला; परंतु इतक्यात एक वृद्ध मनुष्य त्याच्या दृष्टीस पडला. त्याच्या अंगावर धड वस्त्र नसून सर्व अंग मलिन झाले होते. त्याच्या हातापायाच्या काड्या झाल्या असून अंगातले प्रत्येक हाड साफ दिसत होते, त्याचे सर्व दात पडले असून, अंगाच्या कातडीला सुरकुत्या पडल्या होत्या. त्याचे डोळे व गाल खोल गेले होते. तो अगदी वाकलेला असून चालताना थरथरा कापत असल्यामुळे त्याला एक-एक पाऊल टाकण्यास पराकाष्ठेचे सायास पडत. त्याच्या एका हातात काठी असून दुसरा हात पुढे करून तो मोठ्याने ओरडत होता की, 'मज दीन अपंगावर दया करून मला काही तरी द्या. मी आणखी दोन-चार दिवसांचा सोबती आहे,' असा आक्रोश करीत तो चालला असता त्याच्या नेत्रातून भळभळा अश्रुधारा वाहत होत्या. तो याप्रमाणे एकाएकी अवचित रस्त्यात आलेला पाहून राजाच्या सेवकांनी त्याला रस्त्याआड कोठेतरी लपून राहण्यास सांगितले. आपले सेवक त्या जरठ मनुष्यास ढकलीत-बुकलीत आहेत असे पाहून त्याने त्याला सांगितले की, अरे त्याला तेथेच राहू द्या. मला त्यास नीट पहावयाचे आहे. ती त्याची अतिशयित दीन दशा पाहून राजपुत्राच्या हृदयात पराकाष्ठेचा कळवळा उत्पन्न झाला आणि आपला सारथी छंद यास त्याने पुसले, 'अरे, हे माणसासारखे काय दिसते रे? हा प्राणी अगदी विपन्न व वाकलेला असून, याची स्थिती फारच भयंकर व दु:खकारक दिसत आहे. कधी कधी मनुष्य याच स्थितीमध्ये जन्मास येतात काय रे? 'मी दोन-तीन दिवसाचा सोबती आहे,' असा जो हा आक्रोश करीत आहे त्याचा अर्थ काय?

याला अन्न कधीच मिळत नाही काय रे? याची हाडे अशी दिसण्याचे कारण काय? याची ही अशी दुर्वह स्थिती कशामुळे झाली?' सारथ्याने उत्तर दिले, 'हे दयाळू राजपुत्रा, हा वृद्ध पुरुष आहे. काही वर्षांपूर्वी हा असा वाकलेला नसून चांगला ताठ उभा चालत असे. त्या वेळी याचे डोळे, गाल वगैरे चांगले असून, याचे सर्व अंग गुटगुटीत होते; पण आता जरेमुळे हा असा विद्रूप झाला आहे. याच्या शक्तीचा पात होऊन याच्या बुद्धीचा ऱ्हास झाला आहे आणि याच्या सर्व वृत्ती अगदी क्षीण झाल्या आहेत. याचे आयुष्यरूप स्नेह खलास होऊन याची प्राणज्योती मालवण्याच्या अगदी मार्गास आली आहे. म्हणून तो म्हणत आहे की, मी दोन-चार दिवसांचा सोबती आहे. वृद्धापकाळ प्राप्त झालेल्या मनुष्याची अशीच अवस्था होत असते. यात विशेष ते काय आहे? आणि याकडे लक्ष देण्याचे आपणास काय प्रयोजन आहे?' हे छंदाचे उत्तर ऐकून राजपुत्र म्हणाला, 'पण हे वृद्धपण इतरांस प्राप्त व्हावयाचे की यांच्यासारखी स्थिती लक्षावधी मनुष्यामध्ये एकासच प्राप्त व्हावयाची?' छंद म्हणाला, 'महाराज, याच्यासारखीच इतर जनांचीही अवस्था व्हावयाची. मात्र ते याच्याइतके जगले पाहिजेत.' राजपुत्र म्हणाला, 'मी, माझी पत्नी यशोधरा व माझे इतर संबंधीजन याच्या इतके जगलो तर आमचीही अवस्था अशीच व्हावयाची ना?' छंद म्हणाला, 'होय महाराज.' हे ऐकून राजपुत्र बोलला, 'माझा रथ माघारी फिरीव, मी पाहिले तेवढे पुरे, आणखी पाहण्याची मला इच्छा नाही.'

याप्रमाणे ती अत्यंत हृदयभेदक जरठावस्था पाहून व ती सर्वांस निश्चये प्राप्त व्हावयाची हे मनात येऊन तो अत्यंत खिन्न व उदास झाला. आपल्या मंदिरात परत आल्यावर तो एकांतपणे विचार करीत बसला. ऐहिक सुखोपभोगी मर्यादा अत्यंत संकुचित असून, जे विषय काही काळ मोठे आल्हाददायक व सुखोत्पादक वाटतात तेच थोडा वेळ लोटल्यावर अगदी नीरस व दु:खप्रद होतात, असे त्यास वाटून तो नित्याच्या सुखविषयाकडे मुळीच पाहिनासा झाला. गायन, वादन, नृत्य इत्यादिकांपासून त्याच्या मनास मुळीच करमणूक होईना. ही अशी त्याची उदास वृत्ती पाहून यशोधरा हिने त्यास विचारले, 'महाराज, आपण आज अगदीच उद्विग्न झाला आहात, याचे कारण काय?,' सिद्धार्थ म्हणाला, 'हे प्रिये, ही सारी सुखे लवकरच आपणास नाहीशी होणारी आहेत. यापैकी शाश्वत असे कोणतेही सुख नाही. तुझी माझी प्रीतीही काळाने विलय पावून आम्हास अत्यंत दुर्बळ असे वार्धक्य प्राप्त होईल आणि मग आमचे जीवित पराकाष्ठेचे कष्टमय होईल. प्रतिक्षणी आमचे आयुष्य क्षय पावत आहे. तेव्हा अशा अशाश्वत सुखाच्या व क्षणभंगुर जीविताच्या आशेस गुंतून मी

आपणास का म्हणून कष्टी करून घेऊ? यास्तव हे प्रिये, मला हे ऐशआराम विषतुल्य वाटून त्याचा त्याग करावेसे वाटते.'

हे वर्तमान शुद्धोदनराजास कळून तो अगदी अस्वस्थ झाला. तो आपल्या राजधानीत पूर्वीपेक्षा जास्त बंदोबस्त राखून सिद्धार्थाच्या दृष्टीस विपत्ती न पडू देण्याविषयी विशेष झटून प्रयत्न करू लागला. त्याचप्रमाणे त्याने आपल्या पुत्राचे मन संसारात गुंतावे म्हणून आणखी पुष्कळ नव्या योजना केल्या.

या गोष्टीस काही दिवस लोटल्यावर राजपुत्राच्या मनात पुन्हा बाहेर फिरावयास जावयाचे येऊन त्याने पित्याची आज्ञा मागितली. या प्रसंगी त्याने आपल्या पित्याची अशी विनवणी केली की, आपल्या राज्यातील लोकांची वास्तविक स्थिती कशी काय आहे हे पाहण्याचा माझा मानस आहे. याकरिता पूर्वीच्या प्रसंगी ज्याप्रमाणे आपण दु:ख व विपत्ती माझ्या दृष्टीस पडू न देण्याविषयी व्यवस्था केली होती, तशी या खेपेस काहीएक करू नये. लोक जसे नेहमीच्या व्यवहारात वागत असतात तसेच ते मला पाहावेसे वाटत आहेत. याप्रमाणे वास्तविक स्थितीचे अवलोकन केल्याने एक तर मला आनंद व शांती वाटेल, नाही तर निदान विशेष शहाणपण अंगी येऊन प्रजाजनावर आपल्या पश्चात चांगल्या प्रकारे सत्ता चालविण्याचे सामर्थ्य प्राप्त होईल. यासाठी मला उदत्रक नगरातून सेवकांसह वर्तमान मनास वाटेल तिकडे फिरण्याची परवानगी मिळावी. ही त्याची विनवणी ऐकून राजाने मनात असा विचार केला की, त्याला याप्रमाणे नगरात हिंडण्याची परवानगी दिल्यास कदाचित त्याच्या मनावर पूर्वी झालेला प्रतिकूल ग्रह नाहीसा होऊन त्याची ऐहिक सुखाविषयीची समजूत पालटेल. म्हणून त्याने त्याला त्याच्या इच्छेनुरूप नगरात फिरण्याची मोकळीक दिली. राजाज्ञा मिळाल्यावर सिद्धार्थ व्यापाऱ्याचा वेश धारण करून आपला सारथी छंद यासह नगरात फिरावयास गेला. या वेळी सर्व प्रकारच्या लोकांत मिसळून त्यांचे निरनिराळे रीतिरिवाज व वागणुकीचे प्रकार त्याने अवलोकन केले. याप्रमाणे त्याला सुख-दु:खाचे बहुतेक प्रकार पहावयास मिळून त्याची एकंदर जनस्थितीविषयी बरीच यथार्थबुद्धी झाली. याप्रमाणे तो सर्व प्रकारचे व सर्व दर्जाचे लोक पाहत चालला असता पुढील दु:खाक्रोश त्याच्या कानी पडला. 'धनीसाहेब मला साहाय्य करा. मला हात देऊन उभा करा. अहो मजवर दया करा की हो. मला तुम्ही मदत केली नाही तर मी आज आपल्या घरी पोहोचत नाही. वाटेतच माझे प्राण जाईलसे वाटते.' ते ऐकून सिद्धार्थ अगदी चपापला आणि तो दु:खकारक ध्वनी जिकडून आला तिकडे तो वळून पाहू लागला. तेव्हा

रोगाने अगदी पिळलेला असा एक मनुष्य त्याच्या दृष्टीस पडला. तो रस्त्यावरील धुळीत इवळत पडला होता. त्याच्या सर्व अंगास वेदना होत असल्यामुळे तो गडबळा लोळत होता. घरी जाण्याच्या इराद्याने तो उठावयास पाही; पण पुन्हा धाडकन जमिनीवर पडे. ही त्याची अत्यंत हृदयद्रावक अवस्था पाहून राजपुत्राचे हृदय अगदी कळवळून गेले. तो त्या रोग्याकडे धावत गेला आणि त्याला आपल्या कोमल हातांनी उचलून त्याचे मस्तक आपल्या मांडीवर ठेवले आणि तो त्याला आपल्या मऊ हातांनी चेपून म्हणाला, 'हे माझ्या बांधवा, तुला काय होत आहे? कोणती इजा झाल्यामुळे तुला येथून उठता येत नाही?' तो मोठ्याने कण्हत असून त्याला श्वास लागला आहे असे पाहून राजपुत्राने आपल्या सारथ्यास पुसले, 'अरे हा असा श्वास टाकीत असून, बोलताना गुदमरतो याचे काय बरे कारण?' सारथी म्हणाला, 'महाराज, याला काही तरी मोठा जबर रोग जडला आहे. याच्या अंगात तो अगदी विकोपास गेला आहे. याचे अंगात सपाटून ताप भरला आहे. याचा ऊर धडधड उडत आहे. याचे स्नायू अगदी ढिले पडून याच्या हातापायाचे व कंबरेचे सांधे कमकुवत झाले आहेत. रोगग्रस्त माणसाची, महाराज अशीच अवस्था होत असते. याला जडलेल्या रोगाच्या असह्य वेदनांमुळे हा असा डोळे फिरवीत आहे व दु:खाने विव्हळ होऊन हातपाय आपटीत आहे व दातओठ चावीत आहे. याचा श्वासही अगदी कोंडत चालला आहे. या रोगाने याचा लवकरच अंत होईल; परंतु तो होण्यापूर्वी याचे आणखी पुष्कळ वेळपर्यंत असेच हाल होत राहतील. महाराज, हा याला लागलेला रोग स्पर्शसंचारी आहे. यास्तव आपण याला असा धरून बसू नका. कदाचित याचा हा रोग तुम्हालाही पछाडील आणि मग तुमचीही अशीच दशा होईल.' त्याने त्यास असे भय घातले तरी ते मनास न आणून तो त्या रुग्ण मनुष्याची शुश्रूषा करीत बसला आणि त्याने पुन्हा सारथ्यास विचारले, 'याला जसा हा रोग झाला आहे तसाच तो इतरांसही होण्याचा संभव आहे काय? त्याचप्रमाणे या रोगासारखे दुसरे आणखी भयंकर रोग मनुष्याला होतात काय?'

**छंद –** महाराज, हा व अशाच प्रकारचे दुसरे नाना रोग मनुष्यास नेहमी पीडित असतात. त्यापासून मुक्त असा कोणीही नाही.

**राजपुत्र –** हे रोग मनुष्यास नकळत होतात काय?

**छंद –** होय महाराज, ते सर्पाप्रमाणे नकळत येऊन मनुष्यास घेरतात. ते एखाद्या व्याघ्राप्रमाणे मनुष्यावर घाला घालण्यास सदा टपलेले असतात. वर्षाकाळी विद्युत्पात

कोणावर होईल याचा जसा नेम नसतो, तद्वत या रोगांचे आहे. यांच्यापायी कोणाचा किती नाश होईल ते सांगवत नाही.

**राजपुत्र –** तर मग सर्व माणसास यापासून नेहमी भय असते?

**छंद –** होय, सर्वांना यापासून भीती आहे.

**राजपुत्र –** असे आहे तर 'मी सुखाने निजेन व निजून जशाचा तसा उठेन, मला काही एक अपाय होणार नाही' अशी खात्री कोणालाही नाही ना?

**छंद –** असे कोणालाही खात्रीने म्हणता येणार नाही.

**राजपुत्र –** या अशा अकस्मात प्राप्त होणाऱ्या अनेक दु:खकारक व्याधींपासून शेवटी या माणसासारखी मनुष्याच्या देहाची व मनाची स्थिती व्हावयाची ना? आणि त्यास असे वार्धक्यही प्राप्त व्हावयाचे ना?

**छंद –** होय महाराज. मनुष्य याच्या इतका जगला तर त्याची अशीच दशा व्हावयाची.

**राजपुत्र –** परंतु या अशा रोगांपासून होणाऱ्या वेदना जर मनुष्यास अगदीच असह्य झाल्या किंवा त्या सोसून या मनुष्यासारखी त्यांची हालअपेष्टा झाली किंवा यांच्या इतके ते वाचून जरेने व दु:खाने जर्जर झाले, तर शेवटी त्यांचा काय परिणाम होतो बरे?

**छंद –** हे राजपुत्रा, ते मृत्यू पावतात.

**राजपुत्र –** मृत्यू पावतात!

**छंद –** होय, शेवटी त्यास मरण येते. हे मरण कसे व केव्हा येईल याचा नेम नाही. अशा रोगांनी पिडलेले जन फार करून वृद्धदशा प्राप्त होण्यापूर्वीच मृत्युवश होतात. जे थोडे उतार वय होईपर्यंत जगतात ते नाना विपत्तींनी रंजीस आलेले असतात आणि अंती त्यांचे देहावसान होते. ते कदापि चुकणे नाही.

याप्रमाणे त्यांचा संवाद चालला आहे, तो तिकडून एक प्रेत जाताना त्यांच्या दृष्टीस पडले. त्याकडे बोट करून छंद म्हणाला, 'महाराज, मनुष्य मरण पावला म्हणजे त्याची अवस्था याप्रमाणे होऊन त्याचे संबंधीजन त्याला स्मशानभूमीप्रत नेऊन त्याचा अंत्यविधी करतात. सिद्धार्थाने वर डोके करून पाहिले तो त्याच्या नजरेत असे पडले की, एका माणसास ताटीवर बांधून चार इसम त्याला नदीतीरी वाहून नेत आहेत. मग त्याच्या मागून जाऊन त्याने त्या प्रेताचा एकंदर दहनविधी पाहिला. त्यावेळी त्या मृत

मनुष्याच्या संबंधीजनांचा दु:खाक्रोश व त्या मनुष्याच्या देहाची मरणोत्तर झालेली ती सारी अवस्था पाहून त्याचे चित्त अत्यंत खिन्न झाले. त्या मनुष्याची जिवंत असता कशी स्थिती होती आणि मृत्यू पावल्यावर त्याच्या देहाची कोणती दशा झाली, याविषयी त्याच्या मनामध्ये अनेक प्रकारचे विचार घोळू लागले. एकंदरीत त्याला असे वाटू लागले की, मनुष्याने जिवंत असता आपल्या देहाचा, आपल्या वित्ताचा, आपल्या स्त्री-पुत्रांचा आणि आपल्या संबंधीजनांचा अभिमान व प्रेम मनात वागवावे आणि अंती या सर्वांस सोडून अशा रीतीने विनाश पावावे, ही केवढी घोर आपत्ती! अशा प्रकारे मनन करून त्याने छंदास विचारले, 'हा असा अंत एकंदर जिवंत प्राण्यांचा व्हावयाचा काय?' छंदाने उत्तर दिले, 'असा शेवट सर्वांचा व्हावयाचा. तो कदापि चुकणे नाही. मनुष्याने आपल्या देहाचे कितीही जतन केले, एकंदर इंद्रियांचे विषय त्याने कितीही उपभोगिले, तरी शेवटी त्याच्या देहाची ही अशी राख खात्रीने व्हावयाची. देहावसान झाल्यावर एकंदर गात्रे निर्जीव होऊन सडू लागतात, सगळी ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रिये निर्व्यापार होऊन विगलित होतात. ज्यावर आपण जिवंतपणी पराकाष्ठेचे प्रेम केले असते, ती जिवाची माणसे आपली अंत्यअवस्था पाहून शोकाकुल होऊन मोठमोठ्याने आक्रोश करतात; परंतु त्या आक्रोशाचा एक शब्दही मृतास ऐकू जात नाही. अशा प्रकारे पंचत्वास पावणे हे समग्र जीवसृष्टीस कधीही चुकणे नाही. मनुष्य उच्च वर्णातला असो की नीच वर्णातला असो, सदाचारी असो की दुराचारी असो, त्याला ही अवस्था प्राप्त झाल्यावाचून राहावयाची नाही. बरे, ही अवस्था त्याचे एकदाच काय ती होऊन मग सर्व आटपते असे समजू नका. शास्त्रवेत्ते असे सांगतात की, प्राण्याचे येथे देहावसान झाल्यावर त्यास दुसऱ्या कोठे तरी पुन्हा जन्म घ्यावा लागून तेथे पुनरपि बाल्य, यौवन, वार्धक्य इत्यादी अवस्था प्राप्त होऊन नाना रोगांपासून पीडा सोसावी लागते आणि अशा विपत्तीत रखडता रखडता अखेरीस त्याला मरण प्राप्त होते. असे रहाटगाडगे एकसारखे सदाचित चालूच असते. त्यास खळ असा कदापि पडणे नाही.'

हे त्याचे भाषण ऐकून राजपुत्राची मुद्रा अगदी काळवंडून गेली. त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहू लागल्या. त्याचा कंठ सद्‌गदित झाला. एकंदर मानवजातीस ही महापत्ती सोसावी लागणार, ती कदापि चुकणे नाही, हे ऐकून त्याचे हृदय अगदी कळवळून गेले. त्याच्या मनात अनेक दु:खाचे विचार येऊन तो अगदी अस्वस्थ झाला. तो म्हणाला, 'हे माझे एकंदर ज्ञात व अज्ञात बांधव विपत्ती आणि मृत्यू यांच्या जालात सदैव गुरफटलेले पाहून मला मनस्वी खेद वाटतो. एकंदरीत मनुष्यास ऐहिक जीवनाविषयी

कितीही प्रेम वाटत असले तरी या लोकी त्यास प्रचंड विपत्ती व दु:खही भोगावे लागत आहे. जे विषय एक वेळ अत्यंत सुखकरसे भासतात ते परिणामी अगदी वीट आणणारे होतात. ज्या गोष्टी आपणास इहलोकी अत्युत्तमशा वाटतात त्यांचे ते उत्तमत्त्व केवळ भास असते. त्यात खरेपणाचा अंश यत्किंचितही नसतो. त्याचप्रमाणे कित्येक गोष्टी ज्या अत्यंत वाईटशा दिसतात त्यापासून आपणास रात्रंदिवस घोर लागलेला असतो. येथील सुखविषयांचा शेवट दु:खामध्ये होतो. तारुण्याच्या क्षयअंती वृद्धत्व प्राप्त होते. प्रेमाचा शेवट प्रेमविषयांचा विनाश होऊन होतो. या अत्यंत प्रिय वाटणाऱ्या जीविताचा शेवट भयंकर मरण प्राप्त होऊन होतो. याप्रमाणे एक वेळ मृत्यू प्राप्त झाला असता सर्वकाही आटोपले असे नाही; तर पुन्हा पुन्हा जन्म व मरणही प्राप्त होऊन हे संसृतिचक्र सदोदित फिरत आहे. यात भासमय व नश्वरसुख व हृदय पराकाष्ठेचे उद्विग्न करणारे दु:ख यांचा अनुभव सतत घडत असतो. मी आजपर्यंत अशा भ्रमात होतो की, ऐहिक जीवन अत्यंत सुखकर असावे आणि परिणामी अखंड शांतीचा लाभ मानवास प्राप्त होत असावा; परंतु ही माझी भ्रांती आज अगदी फिटली. माझ्या ज्ञाननेत्रांवरचे अज्ञानपटल आज दूर होऊन मला इहलोकाच्या वास्तविक स्थितीचे दर्शन होऊ लागले आहे. हे माझे बांधव मजप्रमाणेच या विपत्तीतून मुक्त होण्यासाठी आपापल्या देवांची करुणा भाकीत असतील; पण त्यांचा करुणारव ते देव ऐकत नाहीत, असे आहे तरी या विपत्तीचे निवारण होण्याचा काही तरी मानवास साध्य होण्यासारखा उपाय असावा असे वाटते. ज्या देवांची हे जन करुणा भाकीत असतात, ते स्वत: कदाचित दुर्बल असल्याकारणाने त्याला आपल्या उपासकांचे संकट निवारिता येत नसावे. ब्रह्मदेवाने अशी सृष्टी निर्माण करून तिला याप्रमाणे सदैव विपत्तीत रखडू द्यावे, हे काही चांगले दिसत नाही. तो सर्वशक्त असूनही जर अशी दु:स्थिती राहू देत असेल, तर त्यास चांगला म्हणवत नाही आणि ते सर्वशक्तिमान नसल्यास त्याला देव म्हणता येत नाही. तर हे छंदा, माझा रथ मागे फिरवून माझ्या मंदिरास परत चल. मी आज जेवढे पाहिले तेवढ्याने माझ्या नेत्रांचे पारणे फिटले. आता आणखी लोकस्थिती पाहण्याची इच्छा माझ्या मनात तादृश उरली नाही.''

याप्रमाणे राजमंदिराकडे रथ फिरवून सिद्धार्थ चालला असता एका सरदाराच्या कन्येने त्याचे ते तारुण्य, सौंदर्य व मर्दानीपणा पाहून व त्याच्या मुखचर्येवरून तो चिंताग्रस्त आहे हे तिच्या नजरेस येऊन ती मोठ्याने म्हणाली, 'ज्या पित्याच्या पोटी तुझा जन्म झाला, तो पिता धन्य होय; ज्या मातेने तुझे संगोपन करून तुला लहानाचा मोठा केला ती माता धन्य होय आणि तुजसारखा वैभवशाली पुरुष ज्या स्त्रीस प्राप्त

झाला आहे, ती स्त्री धन्य होय.' हे त्या युवतीचे अभिनंदनपर उद्‌गार ऐकून राजपुत्राने तिला उत्तर केले की, 'ज्यांना मुक्ती प्राप्त झाली आहे ते धन्य होत.' असे म्हणून त्याने आपल्या गळ्यातला बहुमोल मोत्यांचा हार तिला दिला. घरी आल्यावर तो अगदी चिंतातुर होऊन बसला. त्याच्या मनास शांती कशी ती मुळीच प्राप्त होईना. संसारमूलक विपत्तीतून पार पडण्याचा मार्ग त्यास काहीच सुचेना. राजमंदिरातील अपार संपत्ती, वैभव व ऐशआराम यांचा आता त्याला अगदी वीट आला. ही त्याची अवस्था पाहून यशोधरा हिने त्यास पुसले, 'महाराज, आपले चित्त आज पराकाष्ठेचे उद्विग्न झाले आहे व आपण असा खेद करीत निश्चल बसला आहा त्याचे कारण काय?' राजपुत्राने उत्तर केले, 'मजसभोवतातील सर्व वस्तू व माणसे यांच्या स्थितीमध्ये सर्वदा बदल होत चालला आहे. तो पाहून मी अतिशयित कष्टी झालो आहे. मनुष्य वृद्ध होतात, आजारी पडतात आणि शेवटी मरतात. अशी स्थिती ज्यांच्या लक्षात येते त्याला त्या जीवितात सौख्य कसे वाटेल बरे?'

हा राजपुत्रास प्राप्त झालेला आणखी विराग व उदासीनपणा शुद्धोदनराजाच्या कानी गेला, तेव्हा तो फारच अवस्थ झाला. त्याला मुळीच चैन पडेना. त्याने पूर्वीच्याहून अधिक बंदोबस्त राखण्याविषयी सेवकांस आज्ञा केली. याप्रमाणे त्याने आपल्याकडून होतील तेवढ्या तजविजी योजल्या, तरी गौतम बुद्धाच्या चित्तात उत्पन्न झालेली उदासीनता व वैराग्य उत्तरोत्तर वाढतच जाऊन शेवटी तो संसाराचा त्याग करून गेला.

याप्रमाणे सिद्धार्थाच्या चित्तवृत्तीत पालट होऊन त्याला संसाराविषयी पराकाष्ठेचा वीट वाटून तो गृहत्याग करण्याच्या अगदी बेतात आला होता. इतक्यात त्याला एक पुत्र झाला. तेव्हा शुद्धोदनराजास मोठा हर्ष होऊन त्याच्या मनातील चिंतेचे काहूर काहीसे कमी झाले. कारण त्याला वाटले की, आता सिद्धार्थाच्या ठायी पुत्रप्रेम निर्माण होऊन त्याचा संसाराकडे ओढा विशेष होईल आणि तो संसारत्याग करण्यास सहसा प्रवृत्त होणार नाही; परंतु राजाची ही निव्वळ भ्रांती होती. यशोधरा हिच्या पोटी हा पुत्र निर्माण झाल्यावर लवकरच राजपुत्राने गृहत्याग करण्याचा दृढनिश्चय केला आणि या निश्चयाप्रमाणे तो तत्क्षणीच वागला. हा शेवटचा निश्चय होण्याला एक गोष्ट कारण झाली ती अशी : एके दिवशी तो बागेत जंबुवृक्षाखाली संसारातील विपत्तीविषयी मनन करीत बसला असता तेथे अकस्मात एक यती त्याच्या दृष्टीस पडला. त्याचा तो उंच बांधा व भव्य मुखचर्या पाहून सिद्धार्थाने त्याला विचारले :

'तू कोठून आलास? आणि तू कोण आहेस?' तो यती म्हणाला : 'मी श्रमण आहे. या जगातील विपत्तीला व संकटाला त्रासून मी गृहत्याग करून मोक्षसाधनास लागलो आहे. येथील सर्व वस्तूंचा एकसारखा नाश होत चालला आहे. एक सत्य काय ते अविनाशी आहे. इतर सर्व वस्तूजात सतत बदलत असून ते केवळ नश्वर आहे. यास्तव ज्यास कदापि नाश नाही असे सुख प्राप्त करून घेण्याचा मी निर्धार केला आहे. अनाद्यनंत असे जीवन प्राप्त व्हावे अशी मला इच्छा आहे. यास्तव मी ऐहिक गोष्टींचा विचार अगदी मनात येऊ देत नाही. ही उदासीनता माझ्या अंगी पूर्णपणे बाणावी म्हणून मी अगदी निर्जन प्रदेशात एक गुहा शोधून काढून तीत राहून बहुतेक काळ मी एकांतात घालवीत असतो. मी भिक्षा मागण्यापुरता जनांत येत असतो. बाकी सगळा वेळ मी एकांतात बसून मनन व ध्यान करण्यात घालवीत असतो.'

**सिद्धार्थ –** या दु:खमय संसारामध्ये शांतता लाभ होणे अशक्य आहे. ऐहिक सुखविषयांची व्यर्थता माझ्या मनावर पूर्णपणे ठसली आहे आणि अत्यंत ग्राम्य असे जे विषयसुख त्याचा मला पुरता वीट आला आहे. या लोकांची स्थिती पाहून मला पराकाष्ठेचा खेद होत आहे. फार काय; पण विपन्मय जगामध्ये क्षणभरसुद्धा राहू नये असे मला वाटते.

**श्रमण –** जेथे उष्णता असते तेथे शीततेचाही संभव असतो. ज्या प्राण्यास दु:खानुभव घडत असतो, त्यांच्या अंगी सुखानुभव घेण्याचीही योग्यता असते. या जगात दु:ख निर्माण झाले आहे, त्यावरून असे वाटते की, येथे सुखही विस्तार पावेल. कारण उष्णता व शीतलता, सुख व दु:ख ही परस्परसावे आहेत. जेथे एकाचे अस्तित्व असते तेथे दुसऱ्याचाही संभव असतो. याच न्यायाने जेथे पुष्कळ विपत्ती अनुभवास येते तेथे सुखही पुष्कळ असेल. ही गोष्ट तू नीट पाहशील तर तुझ्या अवलोकनात सहज येईल. एकदा मनुष्य चिखलात फसला असता जसा तो जवळपास असलेल्या पुष्पकरणीचा आश्रय करून आपल्या अंगास किंवा वस्त्रास चिकटलेल्या मळाचे क्षालन करितो तद्वत त्या आपल्या ठायीचा पापमळ धुऊन टाकण्यासाठी मोक्षमार्ग रूप महासरोवराचा शोध केला नाही तर त्यात सरोवराचा काही एक दोष नाही. त्याचप्रमाणे मोक्षमार्ग सन्निध असता त्याचा अवलंब पापी जनांनी केला नाही, तर त्यात दोष कोणाकडे बरे? एखाद्या मनुष्यास रोगाने अगदी घेरले असता तो जर रोग बरा करणाऱ्या एखाद्या वैद्याचे साहाय्य घेणार नाही, तर तेथे या बिचाऱ्या वैद्याकडे काय दोष आहे? अशीच गोष्ट पापरूप रुजेने पिडलेल्या मानवाची आहे. तो जर सत्यज्ञानाचा उपदेश करणाऱ्या

धर्मगुरूचा शोध करून त्याचे साहाय्य घेणार नाही तर तो त्या धर्मगुरूचा दोष आहे असे कोण म्हणेल?

**सिद्धार्थ –** हा तुझा बोध फारच उत्तम आहे. आता माझा हेतू सिद्धीस जाईल असे वाटते. माझा पिता मला असा उपदेश करीत असतो की, या संसारातील सुखाचा मी अनुभव घ्यावा आणि या लोकीचे माझे कर्तव्य मी उत्तम प्रकारे बजावून माझा व माझ्या घराण्याचा लौकिक वाढवावा. तो म्हणतो की, मी अजून भरज्वानीत आहे. तेव्हा धर्मपरायणतेमध्ये आयुष्य घालविण्याजोगे माझे अद्यापि वय झाले नाही.

**श्रमण –** सत्यधर्ममार्गाचा शोध केव्हाही करण्यास प्रवृत्त व्हावे. त्याला अमूकच वय लागते किंवा अमुकच प्रसंग लागतो अशातला काही अर्थ नाही.

**सिद्धार्थ –** (हे त्याचे म्हणणे ऐकून राजपुत्राच्या मनास आनंद वाटून तो म्हणतो) धर्ममार्गाचा शोध करावयास निघण्याची हीच वेळ आहे. धर्माचे पुरे ज्ञान प्राप्त करून घेण्यास ज्या मोहपाशांनी प्रत्यवाय घडत आहे, त्या सर्वांचे छेदन करण्याचा हाच योग्य समय आहे. भिक्षुकवृत्तीचा अवलंब करून मोक्षमार्गसिद्ध्यर्थ वनात संचार करण्याची हीच संधी आहे.

**श्रमण –** हा तुझा निर्धार परम स्तुत्य आहे. तू आजपासून सदाचाराचे कडकडीत व्रत धारण करून धर्ममार्गाचा शोध अविश्रांतपणे कर. आपला हा स्तुत्य उपदेश क्षणभरसुद्धा विसरू नको. तो सदोदित मनात ठेवून त्याच्या सिद्धीसाठी योजवतील तेवढे योग्य उपाय योज. कितीही व कशीही संकटे आली तरी तू हा आपला निश्चय बिलकूल ढळू देऊ नको आणि धर्ममार्गप्राप्तीचा उत्साह यत्किंचितही कमी होऊ देऊ नये. म्हणजे तुला सत्यधर्मप्राप्ती होऊन तू अक्षय, अविनाशी सुखाचा अधिकारी होशील. तर आतापासून प्रयत्न करावयास लाग. काही झाले तरी उमेद खचू देऊ नये.

इतके म्हणून तो यती तेथून तात्काळ गेला आणि राजपुत्र त्याच्या बोधाचे मनन करीत जागच्या जागी बसून राहिला. या वेळच्या आपल्या मानसिक अवस्थेचे वर्णन बुद्धाने पुढे आपल्या शिष्यजनांस येणेप्रमाणे केले आहे.

'हे शिष्यजन हो, एवढे मोठे ऐश्वर्य मला अनुकूल असता माझ्या मनात असे विचार पुन्हा पुन्हा येऊ लागले. सामान्य स्थितीतील कोमल मनाचा मनुष्य जरा, रोग व मरण यास स्वत: पात्र असता व त्यापासून तो मुक्त होण्याचा कदापि संभव नसता, इतरांस या विपत्ती प्राप्त झालेल्या पाहून भयचकित होतो; त्याचा तो मनापासून तिटकारा करितो, त्याचा त्यास अतिशय त्रास वाटतो; परंतु मी मनात आणले की, या

भयंकर विपत्ती मलाही खचित प्राप्त व्हायच्या, त्या कदापि टळणे नाही तेव्हा इतरांस त्या प्राप्त झालेल्या पाहून त्याबद्दल विषाद, तिटकारा किंवा त्रास वाटू देणे मला उचित नव्हे. हे विचार माझ्या मनात एकसारखे घोळू लागल्यामुळे माझ्या चित्तास मुळीच स्वस्थता वाटेना. तारुण्यदशेत स्वभावत: वाटणारा उत्साह व उमेद ही माझ्या ठायीची विनष्ट झाली. या जीविताविषयीची माझी सारी आवड मनातल्या मनात जिरून गेली.'

याप्रमाणे वृद्ध, रोगग्रस्त, मृत व संन्यस्त मनुष्य त्यास दिसल्याचे जे वर्णन आम्ही येथवर केले त्याविषयी कित्येक चरित्रकारांनी अशी कल्पना केली आहे की, सिद्धार्थ आपल्या नगराबाहेरील उपवनात रथामध्ये बसून चालला असता मनुष्याच्या सदरील चार अवस्था निरनिराळ्या चार प्रसंगी अनुक्रमे त्याच्या दृष्टीस पडल्या. यापैकी कोणती कल्पना विशेष सयुक्तिक आहे याविषयी येथे वाद करणे अप्रस्तुत होय. मुख्य मुद्द्याची गोष्ट ही की, सिद्धार्थाच्या ठायी संसाराविषयी पुरी उपरती बाणून त्याने वानप्रस्थाची वृत्ती जी धारण केली ती काही एकाएकी केली नाही; तर जगाच्या विद्यमान स्थितीचे पुन्हा पुन्हा अवलोकन व मनन करून त्याच्या मनात संसार असार आहे, असे पक्केपणी बिंबले, तेव्हा त्याच्या वृत्तीत उत्तरोत्तर फेर पडत जाऊन शेवटी त्याने संसारत्याग केला. ही गोष्ट कोणीकडूनही पाहिली तरी असंभाव्य वाटण्याचे मुळीच कारण नाही. बुद्धाच्या वेळी अशा वृत्तीचे पुरुष सहस्त्र: निपजून त्याच्याप्रमाणेच या दु:खमिश्रित संसारसुखात पराङ्मुख होत्साते संन्यासवृत्तीचा अवलंब करीत असत. अशा लोकांस त्या काळी श्रमण अशी संज्ञा असे. राजपुत्रास जो यती भेटला म्हणून वर सांगितले आहे तो या श्रमणांपैकीच एक होता आणि बुद्धालाही त्या काळचे लोक श्रमणगौतम म्हणत.

ज्या दिवशी सिद्धार्थास यतिदर्शन झाले त्या दिवशी संध्याकाळी आपल्या वाड्यात परत आल्यावर त्याने गृहत्याग करण्याचा निश्चय केला आणि मध्यरात्र उलटल्यावर तो आपल्या पर्यंकावरून उठून सभोवताली पाहू लागला, तो महालातील दासी जिकडे तिकडे अस्ताव्यस्त पडून गाढ झोपी गेलेल्या त्याच्या दृष्टीस पडल्या. तेव्हा त्याने राजवाड्यातून निघून जाण्याची ही संधी उत्तम आहे, असे मनात आणून बाहेर पडण्याची सिद्धता केली; पण असे करण्यापूर्वी आपल्या नूतन जन्म पावलेल्या पुत्राचे मुख एक वेळ पाहावे, अशी त्याला इच्छा झाली. मग आपली स्त्री ज्या खोलीत होती तेथे तो हळूच गेला आणि पाहतो तो यशोधरा निद्रिस्त असून तिने आपला एक हात आपल्या परमप्रिय पुत्रावर टाकला आहे, असे त्याच्या दृष्टीस पडले. राजपुत्र आपल्या त्या सुंदर

स्त्रीकडे व पुत्राकडे काही वेळ एकसारखा पाहत उभा राहिला. त्या आपल्या पुत्रास उचलून त्याचे शेवटचे चुंबन घ्यावे असा त्याला मोह उत्पन्न झाला; परंतु असे करू गेल्यास यशोधरा जागी होऊन आपल्या संकल्पास कदाचित व्यत्यय आणील अशी त्याला भीती उत्पन्न झाली. अशा परमप्रिय पत्नीस व गोजिरवाण्या पुत्रास आपण सोडून चाललो, हा विचार त्याच्या मनात येऊन त्याचे चित्त शोकाकूल झाले. त्याच्या नेत्रातून टपटपा अश्रू गळू लागले. ते त्यास काही केल्या आवरेनात. इतका तो काही वेळपर्यंत मोहवश झाला. तरी त्याचा निश्चय यत्किंचितही ढळला नाही. ते प्रियजनवियोगाचे दु:ख तात्काळ गिळून तो तिच्या खोलीतून तसाच मागे परतला आणि राजवाड्याबाहेर पडून आपला विश्वासू सेवक छंद याजपाशी जाऊन त्याला म्हणाला, 'छंदा ऊठ, माझा घोडा सज्ज कर. मला आताच्या आता या नगरीतून निघून जावयाचे आहे.' ही राजपुत्राची आज्ञा ऐकून छंद अमळ घोटाळ्यात पडला. शुद्धोदन राजाची अशी सक्त ताकीद होती की, सिद्धार्थ राजपुत्रास आपल्या आज्ञेवाचून कोठेही जाऊ द्यावयाचे नाही. या राजाज्ञेचे उल्लंघन केल्यास आपणास शासन होईल असे त्याच्या मनात आले; परंतु त्याची भक्ती राजपुत्रावर विशेष होती. म्हणून त्याचा शब्द मोडणे त्याच्या जिवावर आले. मग त्याने असा निर्धार केला की, उदईक राजदंड काय होईल तो होवो; पण आता या माझ्या तरुण धन्याचे ऐकावे, असा विचार करून त्याने राजपुत्राचा घोडा तात्काळ सज्ज करून आणून त्याच्यापुढे उभा केला. त्यावर स्वार होऊन राजपुत्र घोड्याच्या टापाचा आवाज होऊ न देता हळूच नगराबाहेर निघून गेला. वेशीवरील दरवाजा ओलांडून तो बाहेर गेल्यावर मागे शहराकडे मुरडून पाहून बोलला, 'जन्ममरणाचा पार मला कळून आल्यावाचून मी कपिलवस्तूनगरात पुनरपि प्रवेश करणार नाही.' मग तेथून त्याने भरधाव घोडा काढला आणि अरुणोदय होण्यापूर्वी तो बराच दूर निघून गेला. सूर्योदयाच्या सुमारास तो भार्गवाश्रमाशी जाऊन पोहोचल्यावर घोड्यावरून खाली उतरून त्याने त्या जनावरास थोपटून म्हटले की, 'मी आता निर्भय झालो' आणि डोळ्यात अश्रू आणून तो मोठ्या प्रेमाने छंदास म्हणाला, 'हे छंदा, या घोड्यामागून तू असा धावत आल्यावरून तुझी माझ्या ठायी केवढी भक्ती आहे आणि तुझ्या अंगी किती बळ आहे त्याचा मला चांगला प्रत्यय आला आहे. माझे मन अन्य विचारांनी अत्यंत व्यग्र झाले आहे. तथापि, तुझी ही अलौकिक स्वामिभक्ती व बळ पाहून माझ्या चित्ताला समाधान वाटत आहे. मजपासून तुला इनाम मिळण्याची काही एक अपेक्षा नसता तू मजवर पूर्ण भाव ठेवून वागलास याबद्दल मला परम संतोष वाटत आहे. काहीतरी फलप्राप्ती होईल अशी आशा असल्यास कोण कोणाची शुश्रूषा

करणार नाही? पण मनुष्याला विपत्ती प्राप्त झाली असता त्याचे निकट संबंधीजनही त्याला प्रतिकूल होऊन सोडून जातात, असा तर जगाचा अनुभव आहे. आपल्या पुत्राचे संगोपन लोक करितात ते केवळ तो पुढे कुटुंबाचे पालन करील या आशेने. पित्याची परिचर्या जन करितात ती केवळ त्याच्याकडून कुटुंब भरण व्हावे म्हणून. याप्रमाणे या जगात एक दुसऱ्यावर माया किंवा प्रीती करितो ती केवळ काही तरी आशेने. निरपेक्ष बुद्धीने किंवा काही एक हेतू मनात धरल्यावाचून कोणी कोणाची पर्वा करीत नाही. तेव्हा तात्पर्य काय की, तू माझे केवळ निरपेक्षबुद्धीने बहुत प्रिय केले आहेस. तस्मात आता हा घोडा घेऊन माघारी जा. ज्या वनात मला यावयाचे होते ते वन हेच होय.'

हा राजपुत्राचा शेवटचा निरोप ऐकून छंदास अतिशयित दु:ख होऊन त्याचा कंठ दाटून आला. राजपुत्राने आपल्या अंगावरचे एकंदर दागिने व पोशाख काढून छंदास दिले. आणि आपल्या मुकुटातील एक दिव्य रत्न काढून ते हाती घेऊन तो सारथ्यास म्हणाला, 'हे छंदा, तू माझ्या पित्याच्या हाती हे रत्न देऊन त्यांना शतश: प्रणाम करून सांग की, आता तुम्ही मजबद्दल शोक करू नये. जरामरणनाशार्थ मी या तपोवनात प्रवेश केला आहे. ही गोष्ट मी स्वर्गप्राप्तीच्या आशेने किंवा तुम्हाविषयी मनात अप्रेम किंवा रोष येऊन केली असे मुळीच नाही. मी गृहत्याग केल्याबद्दल शोक करण्याचे मुळीच कारण नाही. तुमचा आणि माझा समागम कितीही दीर्घकाळ घडला तरी शेवटी कधी तरी तुमचा माझा वियोग नि:संशय व्हावयाचा. असा वियोग ज्यापेक्षा केव्हा तरी खास घडावयाचा, त्यापेक्षा आजच निराळे व्हावे असा मी निर्धार केला आहे. मी दु:खापासून मुक्त व्हावयाकरिता असा फटंग होऊन निघालो आहे. तेव्हा माझा शोक करण्याचे काही एक कारण नाही. सर्व शोकाचे मूळ वासनामध्ये आहे. वासना उच्छृंखल होऊन मनुष्य मोहपाशांत सापडतो. यास्तव या वासनाच्या दुर्जयत्वाबद्दल मानवाने शोक करावा. मनुष्याचे देहावसान झाले असता त्याच्या संपत्तीस कोणीतरी वारस असतो; परंतु त्याच्या पाप-पुण्याचा वारस कोणीही संभवत नाही. तुम्ही म्हणत असाल की, 'हा अकाली वनात गेला' तर धर्मप्राप्तीस कोणताच काळ अयोग्य नाही. तो साधण्यास मनुष्याने सर्वदा तत्पर असावे. कारण हे जीवित क्षणभंगुर आहे. म्हणून माझा असा निर्धार झाला आहे की, माझ्या मोक्षसिद्धीस मी आजपासून लागावे. ही गोष्ट पुढील काळावर लोटून उपयोग नाही. कारण आयुष्य खुंटून केव्हा मरण येईल याचा भरवसा नाही. हे व याशिवाय आणखी जे तुला सुचेल ते सांगून माझ्या पित्याचे सांत्वन कर. त्याला माझी अगदी आठवणसुद्धा होणार नाही

असे कर. त्याला सांग की, मी त्याच्या प्रेमाला अगदी अपात्र आहे. ही मजविषयीची अपात्रता त्याच्या मनात ठसली म्हणजे त्याचे मजवरील प्रेम उडेल. कारण जेथे पात्रता नाही तेथे प्रेम टिकत नाही आणि जेथे प्रेम नाही तेथे शोकास कारणच मुळी उरत नाही.'

हे राजपुत्राचे भाषण ऐकून छंद शोकाकुल झाला. त्याचा कंठ दु:खाने दाटून आला. त्याने मग हात जोडून राजपुत्रास म्हटले, 'महाराज, ही आपल्या मनाची स्थिती पाहून व आपल्या परमप्रिय संबंधीजनास आपण शोकसागरात लोटून निघाला आहात, हे पाहून मन अगदी खिन्न झाले आहे. हा आपला अढळ निर्धार पाहून कोणास खेद होणार नाही? कोणी केवढाही पाषाणहृदय असला तरी त्यालासुद्धा याबद्दल वाईट वाटेल. मग ज्याच्या चित्तात आपणाविषयी साद्र प्रेम वसत आहे, त्यांच्या चित्ताची काय अवस्था होईल बरे? महाराज, या आपल्या सुकुमार तनूस आजपर्यंत राजमंदिरातील पर्यंकावर शयन करण्याची सवय झाली आहे. यास्तव तपोवनातील दर्भांकुरांनी युक्त अशा भूमीवर आपणास अशी सुखनिद्रा येईल? मला आपण घोडा घेऊन येण्याविषयी आज्ञा केली, ती मी कोठची ऐकली असे मला आता झाले आहे. तर महाराज, आता हा घोडा मी कपिलवस्तू नगरीस रिकामा माघारी नेऊन तेथील एकंदर जनांस कसा दु:खसागरात लोटू? हे महाबाहो, त्या वृद्ध प्रेमळ राजास सोडून जाणे तुम्हाला उचित नाही. त्याच्या ठायी पुत्रप्रेम पराकाष्ठेचे वसत असल्याकारणाने तुमचा वियोग त्याला मुळीच सहन व्हावयाचा नाही. त्या तुमच्या द्वितीय मातेने पराकाष्ठेचे श्रम घेऊन आजपर्यंत तुमचे लालनपालन करून तुम्हाला हे दिवस दाखविले. तेव्हा तिला तुम्ही कदापि विसरता कामा नये. असे कराल तर तुम्हास जग खरोखरीच कृतघ्न म्हणेल. त्याचप्रमाणे ती तुमची कुलशीलसंपन्न, गुणवती व पतिव्रता स्त्री जिला नुकताच पुत्र झाला आहे तिचा त्याग तुम्ही सहसा करू नये. यशोधरेस जो सुगुण व सुरूप पुत्र झाला आहे, त्याच्याकडे तरी पाहा, त्याला तुम्ही असा टाकून जाणे शोभते काय? महाराज, आपला वियोग या आपल्या चरणाच्या दासाला तर कदापि सोसवणार नाही. आपले पाय अंतरल्यास मी केवळ निराश्रय होईन. महाराज, आपणाला या अटव्य रानात सोडून परत जाण्याला माझे पाय घेत नाहीत. माझ्या चित्तास परम उद्वेग प्राप्त झाला आहे. आपल्यावाचून मी नगरास गेलो असता राजे सरकार मला काय म्हणतील बरे? तुमच्या राणीस मी काय जबाब देऊ? आपण म्हणता की, मी आपली निर्भर्त्सना राजेसरकारापाशी करावी; परंतु महाराज, मी आपल्यासारख्या निर्दोष पुरुषास कसा विनाकारण दोष लावावा? यदाकदाचित आपल्या आज्ञेस्तव मी आपली निंदा त्याजपाशी करू लागलो तरी तसे करताना माझी

मलाच लाज वाटून माझी जीभ बोलताना अडखळू लागली म्हणजे माझ्या बोलण्यावर कोणीही विश्वास ठेवतील काय? महाराज, आपण मोठे दयाळू असून आपणास मनुष्यमात्राचा नेहमी कळवळा येत असतो, असे असता आपण आपल्या प्रियजनांस सोडून जाता हे असे? तर मजवर कृपा करून चला, फिरा मागे.'

राजपुत्र - हे छंदा, तुझा माझा जो हा वियोग व्हावयाचा आहे त्याबद्दल तू मुळीच शोक करू नको. पुन्हा पुन्हा जनन-मरण पावणाऱ्या या जड देहामध्ये सतत बदल होत आहे. तो कदापि थांबणे नाही. मोक्षसिद्धीच्या उद्देशाने मी आज माझ्या संबंधीजनास सोडून जात आहे. तो मी त्यांच्या प्रेमास्तव जाण्याचा राहिलो तरी अंती मृत्यूच्या योगाने त्यांचा माझा वियोग निश्चयाने व्हावयाचा. तो कदापि टळणे नाही. ज्या मातेने मला नऊ मास उदरी वागवून शेवटी मोठ्या प्रसववेदना सोसून जन्म दिला, ती आज कोठे आहे बरे? तिने माझा एवढा भार सोसून मजकरिता इतकी दगदग सोसली, तरी शेवटी तिचे तिला काय फळ मिळाले बरे? मी जन्मल्यावर लवकरच ती मला अंतरली आणि माझ्या प्रीतीचे सुख तिला यत्किंचितही अनुभवावयास सापडले नाही. या लोकी मनुष्य जो परस्परांच्या निकट वास करितात त्यांची अवस्था कशी आहे म्हणशील तर ज्याप्रमाणे आकाशामध्ये इतस्तत: भ्रमण करणारे मेघ क्षणभर एकत्र जमतात; परंतु वायूच्या सपाट्यासरशी पुन्हा एकमेकांपासून कितीतरी दूर निघून जातात, तद्वतच या लोकांच्या प्राणिमात्राचे परस्परसान्निध्य व परस्परवियोगही आहेत आणि ज्याअर्थी या लोकी एक दुसऱ्याला सोडून फसवून नेहमी चालला आहे, त्या अर्थी येथे परस्पराचा अल्पकाळ समागम घडला असता एकमेकांविषयीच्या ममत्वास गुंतून राहणे योग्य नव्हे. उदाहरणार्थ असे पाहा की, वृक्षाच्या पानाचा रंग पाहिला तर तो त्यास अगदी मूळारंभापासून असतो; पण तोच कालेकरून नष्ट होऊन त्या रंगाशी त्या पानाचा अक्षयी वियोग घडतो. अशा जर पानाशी एकजीव होऊन गेलेल्या रंगाची गती आहे, तर परस्पराहून विसदृश असे जे आम्ही मानव, त्यांचा एकमेकांशी वियोग झाल्यास त्यात नवल ते कोणते? तर हे छंदा, कष्टी होऊ नको. परत नगरास जा आणि माझी वार्ता माझ्या पित्यास विदित कर आणि जर करिता तुझ्या प्रेमाचा मजकडे विशेषच ओढा असला तर पुन्हा परत ये. कपिलवस्तुनगरीतील जनांस जाऊन सांग की, याप्रमाणे मी त्यास सोडून आलो म्हणून त्यांनी मला दोष देऊ नये. त्यांच्या मनात मजविषयी जे प्रेम असेल त्यांनी त्याग करावा. माझा निश्चय काय झाला आहे तो त्यास समजून सांगा. तो निश्चय एवढाच की, जरा, रोग व मृत्यू याचा नाश करण्यात

मला यश आले तर मी लवकरच परत येईन; परंतु जर करिता माझा उद्देश असिद्ध होऊन माझा अगदी नाइलाज झाला तर मी प्राणत्याग करीन.'

याप्रमाणे गौतमबुद्धाने आपल्या सारथ्यास निरोप सांगून व आपल्या घोड्यावर पुन्हा मोठ्या प्रीतीने थाप मारून आपल्या तलवारीने आपल्या मस्तकीचा मुकुट व केश याचे छेदन केले आणि ते दूर फेकून दिले. याप्रमाणे आपल्या अंगावरील बहुमोल दागिने व मस्तकीचे मुकुटरूप राजचिन्ह याचा त्याग केल्यावर त्याच्या मनात आपल्या राजवेशाऐवजी वनात शोभण्यासारखा एखादा वेश धारण करावा असे आले. इतक्यात तिकडून व्याध काषायवस्त्रे परिधान केलेला असा हातात धनुष्यबाण घेऊन चालला होता. तो त्याच्या दृष्टीस पडला. बुद्धाने त्याला हाक मारून म्हटले : 'तुझे हे काषायवस्त्र शांत अशा मुनीला शोभण्यासारखे आहे. याला हे घातकी धनुष्य तर मुळीच शोभत नाही. तरी हे वस्त्र परिधान करण्यात तुझा काही विशेष हेतू किंवा आग्रह नसल्यास ते मला दे आणि हा माझा पोषाख त्याच्याबद्दल तू घे.' हे ऐकून तो व्याध म्हणाला, 'हे वस्त्र परिधान केल्यामुळे मला शिकार चांगली मिळत असते. कारण त्यामुळे मी जवळ आहे, हे हरिणांना न उमगून ते निर्धास्तपणे इतस्तत: संचार करीत असतात. तरी हे दिव्यपुरुषा, तुला हे हवेच असेल तर ने आणि ही तुझी शुभ्र वस्त्रे मला दे.' याप्रमाणे त्या व्याधाला आपला बहुमोल पोशाख देऊन त्याच्याकडून ते त्याचे काषायवस्त्र त्याने घेतले. मग ते वस्त्र धारण करून व छंदाला घोडा घेऊन परत जावयास सांगून तो भार्गवाश्रमाकडे चालता झाला.

याप्रमाणे वेश पालटून आपला प्रिय धनी तपोवनात जाताना पाहून छंदाला पराकाष्ठेचे रडू कोसळले. तरी निरुपाय व निराश होऊन तो सर्व वाटभर विलाप करीत परत आला.

इकडे सिद्धार्थ राजपुत्र आपल्या कंथकनामक घोड्यावर बसून व आपला सारथी छंद यास बरोबर घेऊन नगरातून कोठे निघून गेला असे पाहून शुद्धोदनराजा, यशोधरा, महाप्रजापती आदिकरून संबंधीजन व इतर नागरिक यास अतिशयित दु:ख झाले, हे येथे सांगावयास नकोच. राजाने आपल्या सेवकांकडून त्याचा पुष्कळ शोध करविला; परंतु तो कोठेच सापडत नाही असे पाहून त्याने व्रतस्थ होऊन देवालयात बसून देवाराधना चालविली. नंतर सुमारे आठ दिवसांनी छंद नगरात परत आला. त्याला राजपुत्राचा घोडा रिकामा घेऊन येताना पाहून नगरातील लोक फारच हळहळले. छंदाला एकटा परत आलेला पाहून यशोधरा तर शोकाने अगदी विव्हल झाली. तिने मोठ्याने आक्रोश करून छंदास आपल्या पतीची हकीगत विचारली व राजपुत्र असा

एकटा जावयास निघाला असता छंदाने ती वार्ता कोणासच कशी कळविली नाही म्हणून ती त्याला दोष देऊ लागली. तेव्हा छंदाने सांगितले, 'बाईसाहेब, राजपुत्राने आपल्या शब्दाने मला इतके भारून टाकले की राजाज्ञा एकीकडे गुंडाळून ठेवून त्याच्या आज्ञेप्रमाणे वागण्याचा मला अनावर मोह पडला आणि मी सज्ज केलेल्या घोड्यावर राजपुत्र बसून निघाला तेव्हा मी त्याच्या मागून दौडत गेलो. याप्रमाणे सर्व रात्र भरधाव घोडा काढून तो दुसऱ्या दिवशी सकाळी भार्गवाश्रमापाशी जाऊन पोहोचल्यावर घोड्याखाली उतरला. तेव्हा मी त्याची नगरास परत येण्याविषयी नानापरी विनवणी केली; परंतु त्याने आपला निश्चय यत्किंचितही ढळू न देता मला घोडा घेऊन नगरास परत जा अशी सक्तीची आज्ञा केली. तेव्हा मी निरुपाय होऊन हा असा परत आलो आहे. राजपुत्रास नगरातून निघून जाण्यास मी कोणत्याही प्रकारे साहाय्य किंवा मसलत दिली नाही. तरी मज दीनावर आपला रोष नसावा. राजपुत्राने वेश पालटून तपोवनाप्रत गमन केलेले पाहून मी निरुपाय होऊन माघारी फिरलो.' हे छंदाने सांगितलेले वर्तमान ऐकून यशोधरा पराकाष्ठेचा शोक करू लागली.

याप्रमाणे सर्व नगरी शोकाकुल झाली असता राजाचे अनुष्ठान संपून तो देवालयातून उठून बाहेर आला. तेव्हा त्याला छंद घोडा घेऊन राजपुत्राशिवाय परत आला असे कळले. त्यावेळी तो निराश होऊन राजपुत्राचे गुण आठवून शोक करू लागला. राजा जसा फार खेद करू लागला तेव्हा त्याच्या कुलगुरूने व प्रधानाने त्याची अशी समजूत घातली की, 'महाजन, राजपुत्राचे चित्त या संसाराविषयी पूर्वीपासूनच अत्यंत विरक्त झाले होते. त्याच्या मनातून गृहस्थाश्रमात राहण्याचे मुळीच नव्हते. तरी आपल्या कडेकोट बंदोबस्तामुळे तो इतकी वर्षे आपल्या सन्निध राहिला. तो विरक्त होऊन वनात गेला, यात त्याने अलौकिक असे काहीच केले नाही. महाराज, आपणास ठाऊक आहेच की, याप्रमाणे विरक्त होऊन पुष्कळ राजे लोक आजपर्यंत वनात गेले आहेत. भेद इतकाच की, राज्याधिकार पुष्कळ वर्षे चालवून उतार वय झाले म्हणजे आपल्या पुत्राच्या स्वाधीन राज्यसूत्रे करून वनात जावे असा राजाचा पुरातन काळापासून क्रम चालू आहे. या सामान्य क्रमास सिद्धार्थाचे हे वर्तन अंमळ विरुद्ध आहे. त्याने वास्तविक पाहता आपल्यामागे पुष्कळ वर्षे राजपदाचा उपभोग घेऊन व आपल्या प्रजेचे दक्षतेने पालन करून उतारवयात वनाप्रत गमन करावयास हवे होते; परंतु असे त्याने न करिता ऐन उमेदीच्या वेळी कळविले आहे. त्याच्याकडे जाण्यास आम्हाला आज्ञा होईल तर आम्ही जाऊन त्याची समजूत घालून त्यास नगरात परत आणण्याचा

प्रयत्न करितो.' हे त्यांचे सुज्ञपणाचे भाषण ऐकून राजाने त्यास भार्गवाश्रमास त्वरित जाण्याविषयीची आज्ञा केली.

याप्रमाणे राजकुलगुरू आणि राजमंत्री यांनी भार्गवाश्रमास येऊन राजपुत्रास शोधून काढले. तो त्यांना एका वृक्षाखाली विचार करीत बसलेला आढळला. परस्परांची दृष्टादृष्ट होऊन कुलगुरू राजपुत्रास येणेप्रमाणे बोलला :

हे राजपुत्रा, तुझ्या वियोगाने राजा पराकाष्ठेचा शोक करीत आहे. त्याचा तुला असा निरोप आहे की, 'धर्मपरायण होऊन राहावे असा तुझा दृढनिश्चय झाला आहे, हे मला कळत आहे. त्याचप्रमाणे तुझा निश्चय काही केल्या ढळावयाचा नाही याविषयीही माझी खात्री आहे. तथापि, तू अकाली वनाचा आश्रय केल्यामुळे माझे हृदय शोकाग्नीने अगदी पोळून गेले आहे. तरी हे धर्मप्रिय राजपुत्रा, माझ्याकडे पाहून आणि स्वकुलास विहित अशा धर्माच्या सिद्धीसाठी ही जी वनवास स्वीकारण्याची तुला बुद्धी झाली आहे तिचा त्याग कर आणि मी शोकसागरात अगदी बुडालो आहे त्यातून मला वर काढ, नगरास परत येऊन काही वर्षे राज्यपदाचा उपभोग घे. मग शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे यथाकाली वनाप्रत जा. आपल्या अत्यंत प्रियजनांची अशी उपेक्षा करू नये. सर्व भूतमात्रावर दया करणे हाच खरा धर्म होय, हे मनात आण. वनातच जाऊन धर्मसिद्धी केली पाहिजे असे नाही. नगरात राहूनही विरक्त पुरुषास मोक्षसिद्धी करिता येते. धर्मासिद्धीस बुद्धीचा निश्चय व सत्य प्रयत्न याचीच आवश्यकता असते; तिच्यासाठी वनवास पत्करणे किंवा काही विशेष चिन्हे धारण करणे हे भित्र्या माणसाचे काम आहे. यापूर्वी मोठमोठ्या राजांनी गृहस्थाश्रमात राहूनच राज्यवैभवाचा यथोचित अनुभव घेत असता मोक्षधर्माची प्राप्ती करून घेतली आहे. उदाहरणार्थ बली, वज्रबाहू, वैभ्राज, अंतिदेव, जनक आदीकरून राजर्षींनी केवळ गृहस्थाश्रमात राहूनच मोक्षसाधक धर्मसिद्धी उत्तम प्रकारे केली. त्यांचे त्वा अनुकरण करून राज्याधिपत्याचा अनुभव घेत असता चित्ताधिपत्यही साधावे हे योग्य होय. तुला राज्याभिषेक करून सिंहासनारूढ झालेला व राजचिन्हांनी युक्त झालेला पाहून प्रेमाने आलिंगन द्यावे आणि मोठ्या हर्षाने वनास निघून जावे, असा माझा मानस आहे. तरी तू नगरास परत येऊन माझा हा हेतू पूर्ण कर.' याप्रमाणे हे राजपुत्रा, राजाने अगदी सद्‌गदित कंठ होऊन तुला हा निरोप सांगितला आहे. तुझ्या वियोगाने राजा अगदी शोकविव्हल झाला आहे. त्याचे तुजवर पराकाष्ठेचे प्रेम असल्यामुळे त्याचे चित्त अत्यंत उद्विग्न व अस्वस्थ झाले आहे. तरी त्याच्या त्या अप्रतिम प्रेमाकडे पाहून

त्वा आपला हा निश्चय अंमळ एकीकडे ठेवून त्याचे प्रिय करण्यासाठी नगरास परत येणे योग्य होय. पाहा पूर्वी गंगापुत्र भीष्म, दशरथी राम व भार्गवराम यांनी आपापल्या पित्याचे जसे प्रिय केले, तसे त्वा करणे उचित होय. त्याचप्रमाणे त्या राणीने तुझे बाळपणापासून पराकाष्ठेच्या ममतेने संगोपन केले आहे. तिची अवस्था तुझ्या वियोगाने काय झाली आहे ते मनात आण. ती दु:खाने विव्हळ होऊन गाय जशी वासरासाठी हंबरडे फोडते त्याचप्रमाणे मोठमोठ्याने शोक करीत आहे. तिची तरी तुला काही दया येऊ दे. त्याचप्रमाणे तुझी पत्नी, जिला तू जिवंत असता वैधव्यदशा प्राप्त झाली आहे आणि जी अहोरात्र तुझ्या वियोगास्तव शोक करीत आहे तिची तुला अवश्य करुणा यावी. तू परत नगरात येऊन तिच्या दृष्टीस पडल्याने तिच्या दु:खाचा परिहार होईल. तुझ्या त्या परमप्रिय पुत्राची तरी तुला ममता वाटून तू नगरास परत चलावे.

**राजपुत्र –** राजाची मजवर केवढी प्रीती आहे ते मला पूर्णपणे ठाऊक आहे. तरीपण रोग, जरा आणि मरण यांच्या भीतिस्तव मला त्या माझ्या परमप्रिय पित्याचा त्याग करणे प्राप्त झाले. मृत्यूच्या योगाने प्रियजनांचा वियोग होण्याची भीती नसती तर त्यांच्या दर्शनाची इच्छा मला अवश्य झाली असती. आता मी परत जाऊन त्यांना भेटलो तरी पुनरपि केव्हा तरी त्यांचा माझा वियोग खात्रीने व्हावयाचा. यासाठी त्या माझ्या प्रिय पित्याला मी सोडून आलो आहे; तरी पण राजाच्या शोकास मी कारण झालो आहे असे जे तुमचे म्हणणे आहे ते मात्र मला मान्य नाही; कारण या प्रियजनांचा स्वप्नप्राय समागम घडला तरी पुढे त्यांचा वियोग होईल ही भीती अंत:करणात अहर्निश वसत असल्याकारणाने त्यांच्या चित्तास संताप झाल्यावाचून कदापि राहणार नाही. या गोष्टीचा तुम्ही नीट विचार करून जगात काय चालले आहे हे लक्ष देऊन पाहाल तर तुमच्या बुद्धीचा असा निश्चय होईल की, पुत्र किंवा बंधू यापासून मनुष्यास दु:ख प्राप्त होत नसते; तर त्याच्या सर्व संतापाचे मूळ अज्ञानात आहे. मनुष्य परस्पराशी कितीही निकटसंबंधी असले तरी त्याचा कालेकरून निश्चयाने वियोग व्हावयाचा. उदाहरणार्थ असे पाहा की, प्रवासी जन काही कालपर्यंत एकमेकांच्या संगतीने चालत असले तरी अखेरीस ते एकमेकांस सोडून जातात. अशीच गती आपल्या प्रियजनांची व्हावयाची. तेव्हा आपला अतिप्रिय सुत किंवा बांधव आपणास सोडून गेला म्हणून त्याबद्दल कोणी शहाणा पुरुष शोक करील बरे? या लोकी जन्म पावलेले लोक आपले प्रियजन दुसऱ्या लोकी सोडून आलेले असतात; पुढे ते येथे प्राप्त झाले, प्रियजन सोडून तिसऱ्या लोकी जातात. तेथूनही पुन्हा असाच प्रियजनत्याग करून चौथ्या लोकी जातात. याप्रमाणे ही संस्कृती एकसारखी चालूच आहे. तेव्हा

त्याबद्दल हर्ष किंवा विशाद मानणे हे योग्याला उचित नव्हे. आणखी असे पाहा की, ज्याला गर्भसंभव घडतो त्याला मृत्यूही अवश्य घडावयाचा; असे असता राजाला आपला पुत्र अकाली वनाप्रत गेला म्हणून पुत्रवात्सल्यास्तव का बरे शोक व्हावा? कोणत्याही ऐहिकविषयक प्राप्त करून घेण्याच्या संबंधाने कालाच्या योग्यायोग्यत्वाचे विधान युक्त होय; परंतु मोक्षमार्गाचा अवलंब करावयास कोणताच काळ अयोग्य नाही. यास्तव माझ्या या कृतीस अकालिक म्हणणे रास्त नव्हे. राजाच्या मनात आपले राज्य माझ्या स्वाधीन करण्याचा उद्देश आहे; परंतु राज्याचा स्वीकार करणे मला मुळीच हिताचे वाटत नाही. ज्याप्रमाणे अपथ्यान्नाचे सेवन रोगी मनुष्याने केवळ इच्छातृप्तीसाठी केले असता त्याचा रोग दुणावून त्याचा त्या रोगात अंत होण्याचाही संभव असतो, त्याप्रमाणे मी राज्यलोभास्तव परत नगरास आलो असता माझी दशा होईल. राजपदाला लागून अनेक प्रकारचे मोह आहेत. जे ज्यास प्राप्त होते त्याचे मन नेहमी काही ना काही कारणाने चिंतातुर व उद्विग्न होत असते. अधिकारपदाने त्याच्या हातून अनन्वित कर्म होतात. नेहमी काही तरी दगदग त्याच्या पाठीशी असते. परक्या माणसाकडून आपली सेवा करून घ्यावी लागल्यामुळे अनेक प्रकारचे पाप शिरी येते. यामुळे राजमंदिरास जसा काय अग्नी लागला आहे असे मला वाटत आहे. तेथील स्वादिष्ट अन्नात विष कालविले आहे असा मला भास होतो. ते भव्य राजमंदिर विपत्ती व संकटे यांचे वसतिस्थान आहे. यास्तव त्यामध्ये शहाणा पुरुष कदापि राहणार नाही. यापूर्वी मोठमोठ्या कीर्तिमान राजांनी आपल्या मंदिरातील व राज्यातील जन पापरूप विषाने घेरलेले पाहिल्यामुळे ते अतिशय कष्टी होऊन व त्रासून चित्तास शांती प्राप्त व्हावी म्हणून वनाप्रत निघून गेले आहेत. धर्मपरायण होऊन एकांतात आयुष्यक्रमण करण्यात जी शांती आहे ती राजपदाचा स्वीकार करून तत्संबंधी सर्व प्रकारचा त्रास सोशीत राहण्यापेक्षा पुष्कळ श्रेष्ठ आहे. तत्स्मात गिरिकुहरामध्ये राहून वनपशूप्रमाणे कंदमुळे व पानेफळे खाऊन आयुष्य घालविणे मला इष्ट दिसते.

राजाच्या भव्य मंदिरात राहिल्याने मोठा धोका आहे. तेथे काळसर्प मनुष्यास खावयास टपला आहे. मला ते राजपद नको आणि इंद्रियांच्या विषयांची मला मुळीच अभिलाषा नाही. कारण त्यापासून दुःख व विपत्तीही प्राप्त न व्हावी म्हणून मी असा वानप्रस्थ होऊन वनातील डोंगरदऱ्या भ्रमण करीत आहे. या वनात संचार करू लागल्यापासून माझ्या चित्तास थोडीशी शांती प्राप्त झाली आहे. हे असे शांत स्थल सोडून मी तुमच्या म्हणण्याप्रमाणे पुनरपि नगरात जाऊन गृहस्थाश्रमाचा स्वीकार करून

पूर्ववत विषयोपभोग घेऊ लागलो तर माझी विपत्ती अहर्निश वृद्धीत होत राहील. यास्तव असे करणे मला मुळीच उचित नव्हे. गुरुराज, मी धर्मप्राप्त्यर्थ सर्वसंगपरित्याग करून व राजपदाचा अव्हेर करून केवळ फटिंग होऊन एक वेळ स्वपित्याच्या नगरीतून निघून आलो असता, राज्योपभोगाची किंवा ग्राम्य विषयसुखाची लालसा धरून आपला निश्चय सोडून पुनरपि नगरीत यावे, हे मला शाक्यकुलोत्पन्न पुरुषास मुळीच शोभत नाही. साक्षात देवलोकीचे राज्य जरी मला प्राप्त होण्यासारखे असले तरीदेखील माझ्या निश्चयापासून मी तिळप्राय ढळणार नाही हे तुम्ही खास समजा. मी सर्व विषयांचा जो एकवार त्याग केला आहे, त्यांचा पुनरपि स्वीकार करावयास आपण मला सांगता हे पाहून मोठेच नवल वाटते. महाराज, एखाद्या मनुष्याला वांती झाली असता त्या वमनावर त्याचे कधीतरी मन जाईल काय? एखाद्याच्या घरास आग लागल्यावर तो त्यातून युक्तीयुक्तीने एक वेळ बाहेर पडला असता, त्या जळत्या घरात पुनरपि काही केले तरी तो जाईल काय? असा मनुष्य गृहलोभ अनावर होऊन आगीच्या डोंबात उडी टाकण्याचे धाडस करील तर त्यास लोक वेडा नाही तर काय म्हणणार? त्याचप्रमाणे जननमरण-वार्धक्यादिकापासून उत्पन्न होणारे अनर्थ पाहून मी या विपत्तीपासून मुक्त होण्याच्या उद्देशाने वनवास स्वीकारिला असता, मी आपला उद्देश सोडून पुनरपि त्या विपत्तीतच रखडत राहावे हे कोणाला तरी नीट दिसेल काय? राज्यपदाचा उपभोग घेत राहून विपत्तीतून मुक्त होण्याची आशा धरणे केवळ व्यर्थ होय. अशी आशा धरणाऱ्यास राजमंदिरवास मुळीच हिताचा नव्हे. विपत्तीपासून मुक्ती व्हावी अशी ज्यास इच्छा असते त्यास ती शांती आणि स्वस्थता जेथे असेल तेथेच प्राप्त व्हावयाची. अशा मनुष्याने राजा होण्याची हाव धरिली तर त्याच्या विपत्तीस पारावार नाही. चित्तास शांतीचा अनुभव व्हावा अशी अपेक्षा करणाऱ्याने राज्यपदाची लालसा धरणे हे विसंगत होय. राजपद आणि मोक्ष ही गती आणि निश्चलता, अग्नी आणि उदक याप्रमाणे परस्परभिन्न असल्याकारणाने त्याचे एकीकरण केवळ असंभाव्य होय. तेव्हा सारांश काय की, मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्न करण्याचा ज्याने निर्धार केला आहे त्याला राजवैभवाचा उपभोग घेत राहणे योग्य नाही. आता मनुष्य राजपदाचा उपभोग घेत असताही स्वमोक्षाची त्याला तयारी करिता येईल असे जे आपले म्हणणे आहे, त्याचे समाधान एवढेच की, अशाप्रकारे दोन्ही गोष्टी साधतील याचा मुळीच भरवसा नाही. ज्याला मोक्ष निश्चयाने प्राप्त व्हावा असे वाटत आहे त्याने असला अनिश्चित मार्ग स्वीकारू नये. अशा या खोट्या विचाराने मनात चलबिचल होऊन एकदा गृहत्याग करून निघालेला मनुष्य पुन्हा संसाराचा आश्रय करितो आणि फसतो;

परंतु माझे मन असे फिरणार नाही. माझा निश्चय कदापि ढळणारा नव्हे. माझ्या संबंधीजनांच्या स्नेहाचे पाश तोडून, केवळ नि:संग होऊन, अढळ निश्चय मनी धरून मी गृहत्याग केला आहे. तर हे कुलगुरू, मी कसा बरे माघारी येऊ?

हे राजपुत्राचे विवेकशुद्ध व वैराग्यपरिपूरित भाषण ऐकून राजमंत्री म्हणाला, 'हा तुमचा निश्चय अत्यंत सुज्ञपणाचा आहे. तो सहसा अयोग्य नव्हे; मात्र तो या तुमच्या वयास योग्य नव्हे. तुम्हाला धर्माची चाड आहे म्हणता; परंतु आपल्या पित्यास शोकसागरात लोटून जावे यात धर्म नाही. तुमची बुद्धी सूक्ष्म आहेसे दिसत नाही; अथवा धर्म, अर्थ व काम याची योग्य विचक्षणा करण्याचे सामर्थ्य व कुशाग्रता तीत आहे असे वाटत नाही; नाही तर अदृष्टफलप्राप्तीचा हेतू धरून प्रत्यक्ष हिताचा त्याग करण्यास तुम्ही प्रवृत्त झाला नसता. पुन्हा कित्येक पुनर्जन्म आहे म्हणतात, कित्येक पुनर्जन्म नाही असे प्रतिपादन करितात. याप्रमाणे या गोष्टीसंबंधाने अद्यापि वाद आहे. यास्तव प्राप्त वैभवाचा उपयोग घेणे योग्य होय. मरणोत्तर काही स्थिती असेल तर ती जशी प्राप्त होईल तशी भोगण्यास आपण तयार असू; परंतु अशी स्थिती नसल्यास देहावसान झाल्यावर या जगतापासून आपण अनासाये मुक्त होऊ. कित्येकांच्या मते परलोक आहे; परंतु ते मोक्षप्राप्ती कशी होईल याविषयी काही एक सांगत नाहीत. ते म्हणतात की, उष्णता जशी अग्नीची प्रकृती आहे किंवा द्रवता जशी उदकाची प्रकृती आहे, तद्वत आपल्या कर्मप्रवृत्तीच्या ठायीही काही एक विशेष प्रकृती आहे. कित्येकांचा असा सिद्धांत आहे की, जगात जे काही शुभाशुभ उत्पन्न होत आहे किंवा विनाश पावत आहे ते सारे स्वभावसिद्ध आहे. याप्रमाणे सर्वकाही स्वाभाविकपणे चालले आहे. यास्तव आपण कोणताही प्रयत्न करणे व्यर्थ होय. इंद्रियाचे व्यापार निश्चित असून विषयाचे प्रियाप्रियत्व स्वभावसिद्ध आहे. यास्तव जरा व इतर विपत्ती यापासून जे क्लेश उद्भवतात, ते सारे स्वभावसिद्धच आहेत. तेव्हा ते पालटण्यासाठी केलेले प्रयत्न कसे सफल होतील. हे आपले शरीर निरनिराळी महाभूते एकवट होऊन केवळ स्वाभाविकपणे उत्पन्न झाले आहे. मातेच्या उदराच्या ठायी सूक्ष्म बीजापासून गर्भाचा विकास होऊन त्यास क्रमाक्रमाने हस्तपादादी अवयव फुटतात व त्यांशी आत्म्याचा संयोग होऊन प्राणी निर्माण होतो. हा सारा जननव्यापार केवळ स्वभावत: घडत असतो, असे कित्येक तत्त्ववेत्ते प्रतिपादन करितात. वस्तुमात्रेचे बरेवाईट गुणधर्म व पशुपक्ष्यादिकाचे निरनिराळे स्वभाव या सर्वांची उत्पत्ती स्वाभाविकपणे होत असते. कोणी काही विशेष इच्छा धरितो म्हणून ते उत्पन्न होतात अशातला काही अर्थ नाही.

कित्येकांचे असे म्हणणे आहे की, हे सारे चराचर विश्व जर ईश्वराने निर्माण केले आहे, तर त्यात पुरुषाने प्रयत्न करण्यात काय अर्थ आहे? जगातील एकंदर व्यापाराचे प्रधान कारण जर एकच आहे तर त्या व्यापारांचे निवारणही त्याच कारणाकडून व्हावयास पाहिजे. कित्येकांचा असा सिद्धांत आहे की, प्रत्येक वस्तू आत्म्याच्या योगाने अस्तित्वात आली असून तिचा विनाशही आत्म्याच्या योगानेच व्हावयाचा; परंतु त्याचे असे म्हणणे आहे की, प्राण्यांची उत्पत्ती जरी सहज होत असते तरी त्यास मोक्षप्राप्तीसाठी पुष्कळ प्रयत्न करावा लागतो. मनुष्य निर्माण झाला म्हणजे त्याच्या शिरी तीन प्रकारचे ऋण असते. एक पितरांचे ऋण. हे ऋण संतती उत्पन्न केल्याने फिटते. दुसरे ऋषीचे ऋण. हे ऋण वेदाध्ययनाच्या योगाने नाहीसे होते. तिसरे देवाचे ऋण. या ऋणातून यज्ञ केल्याने मुक्त होता येते. या तिन्ही ऋणातून जो मुक्त झाला तोच खरा मुक्त होय. शहाण्या पुरुषाचे असे म्हणणे आहे की, ही तिन्ही ऋणे क्रमाक्रमाने फेडण्याविषयी जो प्रयत्न करितो त्यास मोक्षप्राप्ती होते; परंतु हा क्रम सोडून जे मुमुक्षु प्रयत्न करितात, त्यास खेद व त्रास हे मात्र प्राप्त होतात. तर हे सौम्य राजपुत्रा, मोक्षप्राप्तीची तुम्हाला अपेक्षा असेल तर या शास्त्रोक्त विधीचे अनुसरण करा. म्हणजे तुमचा इष्ट उद्देश सिद्ध होऊन राजाच्याही संतापाचा परिहार होईल. तपोवनातून पुनरपि नगरास परत गेल्याने आपल्या जीविताचा वृथा नाश होईल अशी जी भीती तुमच्या चित्तास उत्पन्न झाली आहे, ती केवळ व्यर्थ होय. बाबा, यापूर्वी पुष्कळ लोक तपोवनाप्रत आलेले पुनरपि स्वगृहास गेले आहेत. उदाहरणार्थ पूर्वकाली अंबरीशराजा पुष्कळ वर्षे वनात राहिल्यावर पुनरपि स्वनगरीप्रत गेला. त्याचप्रमाणे रामानेही पुष्कळ वर्षे वनवास केल्यावर पुन्हा परत नगरीत येऊन आपल्या राज्याचे रक्षण केले. राजा द्रुमाक्षनामेकरून होता. तो आपल्या पुत्रासह वर्तमान काही वर्षे वनात राहून पुन्हा स्वनगरीत आपल्या पुत्रास घेऊन आला. अंतिदेवनामक एक राजा होता. त्याने तर वनात जाऊन दीर्घकाल तपश्चर्या करून ब्रह्मर्षित्व संपादन केले आणि मग पुन्हा आपल्या राजधानीत येऊन आपले राजपद स्वीकारले. तेव्हा तात्पर्य काय की, पूर्वकालीन मोठमोठ्या कीर्तिमान व धर्मशील पुरुषांनी वनाचा त्याग करून पुन्हा संसारात प्रवेश केला आहे. यास्तव धर्माच्या सिद्धीसाठी तपोवनातून पुनरपि नगरप्रवेशाने कोणताही दोष घडत नाही.'

याप्रमाणे त्या मंत्र्याने मोठ्या कळवळ्याने व खऱ्या हितबुद्धीने जे काही सांगितले ते सर्व त्याने ऐकून घेतले आणि आपला निश्चय यत्किंचितही ढळू न देता मोठ्या गंभीरतेने व सावकाशपणे येणेप्रमाणे प्रत्युत्तर दिले –

''कोणतीही गोष्ट अस्तित्वात आहे किंवा नाही, यासंबंधाच्या संशयाचा परिहार दुसऱ्याच्या सांगण्यावरून मी कदापि करणार नाही, तपश्चर्येच्या योगाने व शमदमादिकांच्या साहाय्याने तत्त्व जाणून घेऊन स्वत:च्या बुद्धीने मी सत्याचा निश्चय करून त्याचा स्वीकार करीन. ज्या गोष्टीच्या संबंधाने लोकांमध्ये मोठा वाद आहे आणि जिचे सत्यत्व अज्ञेय व अव्यक्त अशा तत्त्वांवर अवलंबून आहे, ती गोष्ट खरी मानणे मला उचित नव्हे. कोण ज्ञाता पुरुष परक्यांच्या अनुभवावर भिस्त ठेवून चालेल? सामान्यत: पाहता मनुष्यास असा क्रम आढळतो की, अंधकारामध्ये अंध मनुष्य दुसऱ्या अंध मनुष्यास वाट दाखवीत असतो. मला अद्यापि तत्त्व कळत नसले तरी शुभाशुभाविषयी संशय उत्पन्न झाला असता शुभाच्या ठायी मी माझे मन स्थिर करीन. जो शुभात्मा आहे त्याला वृथा खेद प्राप्त झाला तरी काही चिंता नाही; परंतु जो निंद्यात्मा आहे त्याला तत्त्व कळले तरी त्यात काही सुख नाही. तुम्ही सांगितलेली पूर्वापार पद्धती केवळ अव्यवस्थित आहे. आप्तपुरुषांनी जे सांगितले असेल तेच चांगले होय. ज्याचे आचरण निर्दोष असते त्यासच आप्त म्हणतात. असे निर्दोष आप्तपुरुष अनृत कदापि बोलणार नाहीत. रामप्रभृती राजे वनवास सोडून पुनरपि स्वनगरात आले असे सांगून मला परत घरी बोलावता; परंतु अशा पुरुषाचे प्रमाण घेऊन धर्मनिश्चय करणे युक्त नव्हे; का की जे आपले व्रत मोडून पुनरपि संसारात प्रविष्ट झाले, त्यांच्या आचरणावरून कसले प्रमाण घ्यावयाचे? तुम्ही हे खास समजा की, हा सूर्य महीतलावर पतन पावला किंवा हा हिमालयपर्वत आपल्या स्थिर स्थानावरून हलला, तरी मी तत्त्व जाणून घेतल्यावाचून विषयोपभोगाच्या ठायी आसक्ती न धरून वनाप्रत आलो आहे, तो सिद्ध झाल्यावाचून मी पुन्हा स्वगृही कदापि येणार नाही आणि हा माझा संकल्प सिद्ध झाला नाही तर मी प्रज्वलित अग्नीमध्ये प्रवेश करीन.''

याप्रमाणे मोठी गंभीर प्रतिज्ञा करून बुद्ध तेथून उठून कोणाविषयी किंवा कशाविषयी यत्किंचितही ममता न दर्शविता चालता झाला. त्याचा दृढ निश्चय ऐकून व त्याची ती नि:सीम वैराग्यवृत्ती पाहून त्या मंत्र्याच्या व कुलगुरूच्या नेत्रातून अश्रुधारा वाहू लागल्या. ते खिन्न व निराश होत्साते त्याच्या मागून काही पावले गेले; परंतु शेवटी निरुपाय होऊन ते मोठ्या दु:खाने माघारी फिरून नगरास आले. राजा त्यांची मोठ्या उत्कंठेने वाट पाहत होता. त्यांनी परत येऊन राजपुत्राचा दृढ संकल्प त्याला निवेदन केला, तेव्हा त्याला व इतर संबंधीजनाला किती दु:ख झाले असेल, याची कल्पना वाचकांस सहज होण्यासारखी आहे.

# भाग चौथा
# मोक्षमार्गप्राप्ती

तत: पर्यकमकंम्प्युमुत्तुमं बबंध सुप्तोरगभोगपिंडितं ।।

भिनझि तावद्रु वि नैतदापनं न यामि तावत्कृतकृत्यतामिति ।।१।।

मग तो आसनमांडी घालून व निजलेला सर्प जसा आपला फणा ठेवतो तसा आपल्या सर्व अंगाचा आकार करून अगदी निश्चल बसला आणि म्हणाला की, मी कृत्यकृत्य होईपर्यंत हे आसन सोडून येथून उठणार नाही.

**– अश्वघोष**

मागील भागात सांगितल्याप्रमाणे गौतमबुद्धाने राजमंत्री व राजगुरू यास आपला कृतसंकल्प निवेदन करून परतून लावल्यावर तो भार्गवाश्रमातील तपस्विजनांस भेटला. त्याचे ते तेज पाहून त्या तपोवनातील तपस्विजन अगदी चकित होऊन गेले. जो तो त्याला पाहतच उभा राहिला. मग त्यांचे ते तपश्चरणाचे निरनिराळे प्रकार पाहून बुद्धाने एका तपस्व्यास पुढीलप्रमाणे विचारले–

''महाराज, मी या आश्रमाचे दर्शन पहिल्यानेच घेत आहे. यास्तव तुमच्या या धर्मविधीचा हेतू मला कळत नाही. तरी कोणता हेतू मनात धरून आपण हे विधी आचरण्यास प्रवृत्त झाला आहात ते मला कृपा करून समजून सांगा.''

हा त्याचा मोठ्या विनयाचा प्रश्न ऐकून त्या तपस्व्याने त्याला निरनिराळ्या प्रकारच्या तपश्चर्या आणि त्यांची फले समजून सांगितली. तो म्हणाला –

''मनुष्य श्रमावाचून केवळ उदकाच्या आश्रयाने उत्पन्न झालेले धान्य, कंदमुळे, झाडांची पाने व पाणी यावर मुनींनी आपला निर्वाह करून तपश्चर्येचे निरनिराळे प्रकार आहेत. कित्येक तपस्वी पक्ष्यांप्रमाणे दाणे टिपून उदरनिर्वाह करितात; कित्येक हरिणांप्रमाणे तृण भक्षण करितात; कित्येक सर्पाप्रमाणे वायू भक्षण करून अंगावर वारुळे वाढवून घेतात. कित्येक दगडांपासून मोठ्या प्रयत्नाने आपले अन्न प्राप्त करून घेतात. कित्येक कच्चे धान्यच चावून खातात. कित्येक दुसऱ्यासाठी अन्न शिजवून स्वत: त्यांनी खाऊन उरलेल्या शेष अन्नावर निर्वाह करितात. कित्येक आपला जटाकलाप निरंतर पाण्यात भिजवून ठेवतात आणि मंत्र म्हणून प्रतिदिनी दोन वेळा अग्नीमध्ये

हवन करितात; कित्येक मत्स्याप्रमाणे उदकात अवगाहन करून राहतात. याप्रमाणे काही विवक्षित कालपर्यंत हे तपस्विजन तपश्चरण करितात. यापैकी जी श्रेष्ठ प्रकारची तपे असतात त्यांच्या योगाने त्यास पुनरपि नरलोक प्राप्त होतो. याप्रमाणे कष्टप्रद पद्धतीने हे सुखाची प्राप्त करून घेतात. दु:ख सोसणे हे धर्मप्राप्तीचे साधन आहे, असा यांचा सिद्धांत आहे.''

हे त्या तपस्व्याचे भाषण ऐकून राजपुत्र मनात म्हणाला की, या धर्मविधीत काही एक तथ्य नाही. मग त्याने त्याविषयी येणेप्रमाणे मनन केले. 'हे तपश्चरण दु:खप्रद असून अनेकविध आहे आणि याच्या योगाने फार तर स्वर्गप्राप्ती व्हावयाची; परंतु स्वर्गादी एकंदर लोक परिणामवंत आहेत. तेव्हा या आश्रमातील हे लोक अत्यल्प लाभासाठी एवढा श्रम व्यर्थ घेतात. जे स्वर्गप्राप्तीच्या हेतूने संपत्ती, स्त्री-पुत्र व इतर सुखविषय यांचा त्याग करून अशा यमनियमांचे आचरण करितात, ते उच्चतर लोकाप्रत गेल्यावरही तेथून पुन्हा सर्वसंगपरित्याग करून वनाप्रत जाण्यास उद्युक्त होत असतील. देहदंडनमूलक तपश्चरणाचा अवलंब जे करितात ते कामनावश होऊन पुनरपि प्रवृत्तिमार्गाचाच स्वीकार करितात. अशा जनांकडून संसारातील वास्तविक दोषांचे परीक्षण होत नाही. ते एवढे दु:ख सोसून पुनरपि दु:खच प्राप्त करून घेतात. इहलोकाच्या जनांस मृत्यूपासून सदोदित त्रास असता ते पुनरपि जन्म पावण्याची इच्छा करितात हे नवल होय. जो प्रवृतिमार्गाचा अंगीकार करून कर्मपर होतो त्याला मृत्यू अवश्य यावयाचा. कित्येकजण इहलोकासाठी विपत्ती सोसतात. कित्येक स्वर्गप्राप्त्यर्थ देहदंडन करितात. हा जीवलोक सुखाच्या आशेस गुंतून विनाकारण निराश व उदास होतो व अनर्थात पडतो. या तपस्विजनांचे प्रयत्न सदोष आहेत असे माझे म्हणणे नाही; कारण हीन स्थितीतून उच्चतर स्थितीप्रत जाण्याचा हा उद्योग आहे; परंतु शहाण्या मनुष्याने यांच्यासारखे श्रम करून अशी अवस्था प्राप्त करून घ्यावी की, जीत कोणतीच गोष्ट करण्याची आवश्यकता उरू नये. शरीरास पीडा देणे हा जर इहलोकी धर्म गणावयाचा तर शरीरास ज्या ज्या गोष्टींनी सुख प्राप्त होते, त्या साऱ्या गोष्टी अधर्ममूलक होत असे मानावे लागेल; परंतु येथे धर्माचरण केले असता परलोकी सुख प्राप्त होते असे म्हणतात. यावरून असे होते की, येथे धर्मानुसरण केल्याने परलोकी त्याचे फल अधर्मरूप होते. कारण सुख भोगण्यात अधर्म आहे असे यांचे म्हणणे आहे. शरीर मनाच्या स्वाधीन असून, मनात जे विचार व कल्पना येतात, तद्नुरूप शरीराचे व्यापार होत असतात. यासाठी मनाचे दमन करणे हेच योग्य होय. मनावाचून शरीर केवळ काष्ठवत आहे. आहाराची शुद्धी साधल्याने पुण्यप्राप्ती होते असे जर मानावे तर

वनातील मृगाससुद्धा पुण्य प्राप्त होते असे म्हणावे लागेल. त्याचप्रमाणे ज्यास कमनशिबामुळे सुखविषयांची प्राप्ती होत नसते तेसुद्धा पुण्यात्मेच होत असे मानावे लागेल. जर तपश्चरणमूलक दुःखाचा अंगीकार केल्याने पुण्य प्राप्त होते तर सुखविषयांचा अवलंब केल्याने ते का प्राप्त होऊ नये? सुखविषयांच्या योगाने पुण्यप्राप्ती होत नाही असे कोणी म्हटल्यास त्याला हे पुसावयाचे की दुःख सोसल्याने तरी पुण्य का घडावे? त्याचप्रमाणे हे पुण्यतीर्थ समजून येथले उदक आपल्या पापरूप मलाचे क्षालन करण्याकरिता आपल्या देहावर जे शिंपडतात, त्यांच्या चित्तास जे काही समाधान वाटत असेल तेवढेच. एरवी पाहता या उदकाच्या योगाने पापमुक्त होण्याची मुळीच शक्यता नाही. ज्या उदकास साधुपुरुषाचा स्पर्श झाला असेल, ते उदक या पृथ्वीतलावर महातीर्थ समजावयाचे. साधुपुरुषाच्या सद्गुणासच मी महातीर्थ समजतो. एरवी कोणत्याही ठिकाणचे उदक असले तरी त्यात म्हणजे काही अलौकिक गुण आहे असे मुळीच वाटत नाही.' याप्रमाणे मनन करीत बुद्ध बसला असता सूर्यास्त झाला तेव्हा तो पुनरपि त्या आश्रमात गेला. तेथे तपस्वी आपापले धर्मविधी आटोपून मोकळे झाले होते. ते त्याच्या सभोवती पुन्हा जमा झाले. मग त्यांच्यापैकी एक वयोवृद्ध तपस्वी पुढे सरसावून त्याच्याशी येणेप्रमाणे मोठ्या सौम्यपणाने बोलला.

''हे तेजस्वी पुरुषा, तू या तपोवनात पहिल्याने आलास तेव्हा हे वन जसे काय भरून गेल्यासारखे दिसत आहे. तेच तू येथून गेल्यापासून अगदी सुने दिसत होते. तर हे तरुण पुरुषा, हे तपोवन तू सोडून जाऊ नये. या आश्रमासमोर हा पहा हिमालय पर्वत आहे. या पर्वतावर मोठमोठे महर्षी, राजर्षी व देवर्षी वास करीत आहेत. त्यांचे सान्निध्य खरोखरीच मोठे पुण्यप्रद आहे. या आश्रमाच्या आसपास मोठमोठी तीर्थस्थानेही आहेत. या तीर्थांच्या दर्शनाने स्वर्गप्राप्ती होते. मोठमोठ्या धर्मशील ऋषिजनांस ही तीर्थस्थाने फारच प्रिय झाली आहेत. येथून उत्तरेकडे प्रयाण केले असता मोठेच पुण्य प्राप्त होते. यासाठी शहाण्या पुरुषाने येथून दक्षिणेकडे एक पाऊलही जाऊ नये. या तपोवनात राहण्याचा तुझा मानस दिसत नाही, याचे कारण काय बरे? येथे कोणी पतित किंवा अशुची मनुष्य तुझ्या अवलोकनात आला काय? किंवा कोणी भलतेच धर्मविधी आचरिताना अथवा कोणतेच धर्मविधी न करिताना तुझ्या दृष्टीस पडला काय? जे काही तुला येथे व्यंग दिसले ते स्पष्टपणे बोलून दाखीव. तुझ्यासारख्या तेजस्वी पुरुषाचा समागम व्हावा, अशी येथील तपस्विजनांची मनीषा आहे.''

हे त्या वृद्ध तपस्व्याचे ममतेचे शब्द ऐकून बुद्धाने आपल्या मनातले विचार येणेप्रमाणे निवेदन केले.

''हे धर्मपरायण मुनींनो, आपले मजविषयीचे प्रेम व आदरातिथ्य पाहून माझ्या हृदयात आपल्याविषयी प्रीती व आदरबुद्धी या वृत्ती उत्पन्न झाल्या आहेत. तुमचे हे ममतेचे व मनोहर भाषण ऐकून मी अगदी मोहून गेलो आहे. धर्मजागृती पहिल्यानेच जेव्हा माझ्या चित्तात झाली तेव्हा मला आनंद झाला आहे. तरीपण तुम्हासारख्या ममताळू व शरण जाण्यास योग्य अशा साधुजनांस मला सोडून जावे लागणार हा विचार माझ्या मनात येऊन माझ्या चित्तास खिन्नता प्राप्त होते. तुमचे हे धर्माचरण स्वर्गप्राप्तीसाठी आहे आणि माझी इच्छा अशी आहे की, मला पुनरपि जन्म पावण्याची दगदग नको आहे. या वनातील तपस्वी केवळ प्रवृत्तीपर आहेत आणि मला निवृत्ती साधावयाची आहे. यास्तव या वनात वास करणे मला उचित नव्हे. तेव्हा या वनातून जो मी जाऊ पाहत आहे, तो तुमच्याविषयी माझ्या मनात अप्रीती उत्पन्न झाली आहे किंवा कोणाच्या वर्तनातला दोष माझ्या अवलोकनात आला आहे म्हणून नव्हे, तुम्ही सर्व महर्षी असून पूर्वयुगीच्या धर्माचे अनुसरण करीत आहा.''

हे बुद्धाचे सत्य, यथार्थ व गंभीर भाषण ऐकून तपस्विजनांच्या मनात त्याच्याविषयी आदरबुद्धी उत्पन्न झाली. तेथे जवळच एका ब्राह्मणाने भस्मावर शयन केले होते. त्याच्या केसांच्या लांब जटा झाल्या होत्या. त्याने वल्कले परिधान केली असून त्याचे डोळे लाल झाले होते. तो मोठमोठ्याने म्हणाला, 'हे विचारशील पुरुषा, तुझा निश्चय फारच उदार आहे. तू तरुण आहेस, तरी तुला या संसृतीतील दोष चांगला समजून आला आहे. स्वर्गप्राप्ती व मोक्षसिद्धी याविषयी चांगला विवेक करून जो मोक्षसिद्धी करून घेण्यास प्रवृत्त होतो तोच खरा धैर्यवान पुरुष. लोक कामनावश होऊन यज्ञ, तप, नियम इत्यादिकांच्या योगाने स्वर्गप्राप्तीची आकांक्षा धरितात; परंतु जे सत्त्वशील पुरुष असतात ते कामनामूलक मोहाशी एखाद्या शत्रूप्रमाणे झगडून मोक्षप्राप्तीची अपेक्षा करितात. तुझ्या बुद्धीचा जर असा निश्चय खास झाला आहे, तर तू येथून लवकर निघून विंध्यकोष्ठास जा. तेथे अराडनामक मुनी राहत असतो. त्याला नैष्ठिक श्रेय काय ते कळत आहे. त्याच्याकडून तुला तत्त्वमार्ग ऐकावयास सापडेल आणि तुला सत्याची चाड असेल तर त्या मार्गाचा तू अवलंब करशील; परंतु मला असे वाटते की, त्याच्या उपदेशानेही तुझे समाधान होणार नाही. तू त्याला लवकरच सोडून जाशील. तुझे तेज आणि गंभीरता ही अलौकिक आहेत.'

हे त्या ऋषीचे शब्द ऐकून राजपुत्राने म्हटले, 'ठीक आहे, मी त्या ऋषीकडे जातो.' मग त्या मुनिवृंदास मोठ्या नम्रतेने प्रणाम करून तो तेथून निघाला आणि ते मुनीही त्याचा यथोचित आदरमान करून आपल्या आश्रमात परत गेले.

याप्रमाणे भार्गवाश्रमातील तपस्व्यांची स्थिती पाहून तो तेथून निघाला आणि फिरत फिरत राजगृह नामक नगरीत आला. तेथले लोक त्याचे ते विलक्षण तेज व गंभीर मुद्रा पाहून अगदी थक्क झाले. जो तो आपला कामधंदा सोडून त्याच्याकडे टकटका पाहत उभा राहिला. असा तेजस्वी व शांत मुनी त्यांनी पूर्वी कधीच पाहिला नव्हता. त्याचे दर्शन ज्या ज्या माणसास घडले त्याच्या चित्तात त्याच्याविषयी आदरबुद्धी उत्पन्न होत असे. त्याची ती अलौकिक कांती व अनुपम तेजस्विता पाहून लोकांस वाटे की, हा मुनी कोणातरी मोठ्या राजाचा पुत्र असावा. याप्रमाणे जो तो मोठ्या कौतुकाने व आदरबुद्धीने त्याच्याकडे पाहत असता, तो अगदी मौन धारण करून दारोदार भिक्षा मागत गेला. प्रत्येकाच्या दाराशी जाऊन खाली मान घालून तो उभा राहत असे. लोकही त्याला मोठ्या उत्साहाने व आदराने भिक्षा आणून घालीत. आपल्या घरी तो भिक्षा मागावयास आल्याने त्यास मोठी कृतार्थता वाटे.

त्या नगरीचा राजा बिंबिसार नामे करून होता. त्याने आपल्या राजवाड्याच्या गच्चीवर उभे राहून नगरात पाहिले तो नागरिकजन कोण एका मुनीच्या सभोवती जमा होऊन त्याच्याकडे कौतुकाने पाहत आहेत असे त्याच्या दृष्टीस पडले. तेव्हा त्याने तो मुनी कोण आहे याची चौकशी करण्याकरिता आपल्या एका सेवकास पाठविले. त्या सेवकाने परत येऊन राजाला असे कळविले की, महाराज, तो शाक्यवंशातला राजपुत्र आहे. त्याने नगरात अगदी मौनवृत्तीने हिंडून भिक्षा मिळविली आणि पर्वतावरून रानामध्ये जो नाला आला आहे, तेथे एकांतात जाऊन त्याने ते भिक्षान्न सेवन केले. मग तेथून तो पांडवगिरीवर चढून गेला. ही सेवकाने सांगितलेली हकीकत ऐकून बिंबिसार राजास मोठे नवल वाटले आणि असा हा अलौकिक पुरुष आहे तरी कोण हे आपण स्वत: जाऊन पाहावे या हेतूने आपल्याबरोबर थोडासा परिवार घेऊन तो पांडवगिरीकडे गेला. तेथे गेल्यावर पाहतो तो गौतमबुद्ध आसनमांडी घालून व आपली सर्व इंद्रिये अंतर्मुख करून ध्यानस्थ बसला आहे, असे त्याच्या दृष्टीस पडले. त्याची ती शांत, गंभीर व तेजस्वी मुद्रा पाहून बिंबिसारराजा अगदी चकित झाला आणि त्याच्याविषयी त्याच्या पोटात माया उत्पन्न होऊन तो मोठ्या आदरबुद्धीने त्याच्या सन्निध गेला आणि त्याला त्याने मोठ्या नम्रतेने विचारले की, 'आपली प्रकृती ठीक आहे ना?' बुद्धानेही तसेच नम्रतेने उत्तर दिले की, 'माझ्या चित्तास स्वास्थ्य असून माझा देह निरोगी आहे.' हे त्याचे शब्द ऐकून राजास धीर आला आणि तेथे जवळच एक शिळा होती, तीवर तो बसून त्याच्याशी येणेप्रमाणे बोलला –

''हे राजपुत्रा, तुझ्या कुलाचा व माझ्या कुलाचा पुष्कळ वर्षांचा स्नेह आहे. यास्तव तुझी अशी ही वृत्ती पाहून तुजशी प्रीतीचे दोन शब्द बोलण्याची मला इच्छा झाली आहे. तर हे राजपुत्रा, मी जे काही बोलत आहे ते चित्त देऊन ऐक. तुझा जन्म सूर्यवंशात झाला असून तुझ्या कुलाची कीर्ती सर्वत्र पसरली आहे. त्याचप्रमाणे तुझे वय अल्प असून, तुझी कांती देदीप्यमान आहे. असे असता सर्वसाधारण क्रमाविरुद्ध तुला ही अशी वृत्ती धारण करण्याची बुद्धी कोठून सुचली बरे? तुझ्यासारख्या महातेजस्वी पुरुषास ही भिक्षावृत्ती मुळीच शोभत नाही. तुझा हा सुंदर देह चंदनादिकाच्या लेपास योग्य आहे. त्यास हे काषायवस्त्र कसे सुखकर होईल? तुझे हस्त प्रजापालनास समर्थ आहेत. त्यांच्या ठायी कमंडलू येऊन परदत्त भिक्षान्न सेवन करण्यास तू मुळीच योग्य नव्हेस. हे सौम्य राजपुत्रा, स्वपित्याविषयी तुझ्या ठायी पराकाष्ठेचे प्रेम असल्याकारणाने जरकरिता त्याच्या राज्याची तू इच्छा करीत नसलास तर ती तुझी बुद्धी केवळ औदार्याची होय; परंतु माझे अर्धे राज्य मी तुला मोठ्या आनंदाने द्यावयास तयार आहे. तर त्याचा स्वीकार करून माझ्या सन्निध रहा. याप्रमाणे तू माझ्या अर्ध्या राज्याचा अंगीकार करून राहिल्याने तू आपल्या वंशाचा उपमर्द केलास असे कदापि होणार नाही. तुझ्यासारख्या सत्त्वशील पुरुषाच्या सान्निध्याने मला समृद्धी प्राप्त होईल. यासाठी मजवर कृपा करून तू माझ्या या म्हणण्यास मान्य हो; परंतु स्वकुलाभिमानास्तव तुला असे करणे पसंत वाटत नसल्यास इतके तरी कर की, तुझे कोणी शत्रू असल्यास त्यावर स्वारी करण्यास उद्युक्त हो, म्हणजे मी तुला आपल्या सर्व सैन्यानिशी मनोभावे साहाय्य करीन. शास्त्राज्ञा अशी आहे की, मनुष्याने धर्म, अर्थ व काम यांचे संपादन यथोचित विधीने क्रमश: करावे. या क्रमाचा व्यत्यास केल्याने मनुष्यास इहलोकी सुखलाभ होत नाही. तर हे राजपुत्रा, या तीन अर्थांचे संपादन उत्तम प्रकारे करून या तुझ्या सुंदर देहाचे सार्थक्य कर. जो पुरुष या अर्थांचे परिपूर्णपणे संपादन करितो त्यालाच खरा पुरुषार्थ साधला म्हणावयाचा. हे सुंदर पुरुषा, तुझ्या या विशाल बाहूचे काही तरी योग्य सार्थक्य त्वा अवश्य करावे. तुझ्या अंगी त्रैलोक्याचे राज्य जिंकण्याचे सामर्थ्य आहे. मग या भूलोकाची ती कथा काय? तुला मी जे सांगत आहे, ते केवळ स्नेहास्तव होय. तुझ्या साहाय्याने मला ऐश्वर्य प्राप्त व्हावे किंवा तुझ्या दर्शनाने चकित झाल्यामुळे तुझे कौतुक करावे म्हणून नव्हे. तुझ्यासारख्या तेजस्वी पुरुषाने हा भिक्षुवेश धारण केलेला पाहून माझे हृदय कळवळून गेले असून, माझ्या नेत्रांतून अश्रुधारा वाहत आहेत. हे तुझे वय भिक्षावृत्तीचा अवलंब करण्यास योग्य नाही. या वयात तू सुखानुभव घ्यावा आणि पुढे यथाकाली धर्माचरण करावे. धर्माचरणाचा योग्य काल

म्हटला म्हणजे वार्धक्यदशेतला होय. या दशेमध्ये रूप नष्ट होऊन सुखोपभोग घेण्यास मनुष्य स्वभावत: असमर्थ होतो. तेव्हा अर्थात तो धर्मसंपादनास योग्य होतो. शहाण्या पुरुषाचे असे म्हणणे आहे की, यौवनदशा कामनातृप्तीस योग्य होय; मध्यम वय वित्तार्जनास अनुकूल होय आणि वार्धक्यदशा धर्मप्राप्तीस अनुरूप होय. या जीवलोकी यौवन जे आहे ते धर्म आणि अर्थ याचे प्रतिरोधी आहे; कारण या वयामध्ये कामना अनावर असतात. त्याचे विषय उपस्थित झाले असता यौवनाढ्य पुरुषाचे मन तात्काळ मोहित होते. त्याचा निग्रह करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तो विफल होतो. जरठावस्थेमध्ये मनुष्याची विवेकाकडे प्रवृत्ती असते. त्याठायी गंभीरता व स्थिरता या उत्पन्न होतात. त्याच्या अंगी शमदमादी वृत्ती अल्पायासाने उद्‌भवतात व वयामध्ये या वृत्ती स्वभावत:च उत्पन्न असतात आणि या वृत्तीच्या उलट मनाची स्थिती असल्याने मनुष्यास मोठी लज्जा वाटू लागते. यौवनदशेमध्ये मनुष्य सुखोपभोगाविषयी लोलुप असतो. त्याची बुद्धी चंचल असून त्याचे चित्त आतुर व प्रमादयुक्त असते आणि दृष्टी अल्प असते. यास्तव तुझे हे यौवन प्रथमत: जाऊ दे. या वयात कामनावश होण्याचा संभव फारच असतो. हा इंद्रियग्रास या वयात अतिशय बलवान असतो. त्याच्या सपाट्यातून तरुण पुरुष सुटता सुटत नाही. बरे, तुझ्या मनातून सर्वकाळ धर्माचरण करावे असे असल्यास त्वा यज्ञ करावे. यज्ञ करणे हा तर तुझा कुलवैभवच आहे. यज्ञाच्या योगाने इंद्रादिदेवास जशी स्वर्गप्राप्ती झाली तद्वत तुलाही ती अवश्य होईल. जी गती महान ऋषींना दीर्घकाल तपश्चर्या करून मोठ्या श्रमाने प्राप्त झाली आहे, तीच गती राज्यवैभवाचा उपयोग घेत असलेल्या नृपतीस यज्ञ करून प्राप्त झाली आहे.''

याप्रमाणे मगधचा राजा बिंबिसार जे बोलला ते बुद्धाने चित्त देऊन ऐकिले; पण त्यामुळे आपल्या चित्ताची स्थिरता यत्किंचितही ढळू न देता त्यास मोठ्या गंभीर मुद्रेने त्याने येणेप्रमाणे प्रत्युत्तर केले –

''आपले हे मित्रप्रेम आपल्या विशाल कुलास अनुरूप असेच आहे. आपल्या पूर्वजांनी संपादिलेला एखाद्या कुलाविषयीचा स्नेह आपण पुढे अखंड चालवून तो वाढवावा, ते सत्पुरुषाचे शीलच आहे. आपल्या मित्रास विपत्ती प्राप्त झाली असता त्याच्याशी पूर्ववत प्रेमाने वागून त्याच्या त्या विपत्तीचा परिहार करण्याविषयी जो झटतो तो खरा मित्र होय. मनुष्याची भरभराट असता त्याच्याशी मित्रभावाने वागणारे पुष्कळ आढळतात; पण आपल्या मित्रास कोणतीही स्थिती प्राप्त झाली तरी ज्याचे मित्रत्व अखंड व अकृत्रिम राहते त्यासच मी खरा मित्र समजतो. त्याचप्रमाणे या

लोकी प्राप्त झालेल्या ऐश्वर्याचा विनियोग जे आपल्या मित्रजनांच्या हिताकडे आणि धर्माकडे करितात, त्यांच्या ऐश्वर्याचे सार्थक्य होते म्हणावयाचे. महाराज, आपण माझे खरे सुहृद असून परम उदार आहात. यास्तव आपण मजवर हे उपकार करण्यास प्रवृत्त झाला आहात. तरी मलाही आपणाशी केवळ स्नेहभावाने व परम आदराने बोलणे उचित होय. जरा, मरण व रोग याविषयी माझ्या ठायी पराकाष्ठेची भीती उत्पन्न झाल्यामुळे त्यापासून मुक्त होण्याची इच्छा धरून मी ही वृत्ती धारण केली आहे. माझ्या सर्व प्रिय संबंधीजनांचा व अनर्थमूलक विषयोपभोगांचा त्याग करून मी निघालो आहे. या लोकीच्या विषयकामनांची जितकी भीती मला वाटत आहे तितकी दुसऱ्या कशाचीही वाटत नाही. या कामना अनित्य, अप्रयोजक व भासमय असून मनुष्याच्या वास्तविक कल्याणाचा नाश करणाऱ्या आहेत. ह्या मनुष्याच्या मनास व्यर्थ आशा दाखवून मोहात पाडतात आणि त्यांचा पगडा एक वेळ त्याच्या चित्तावर बसला म्हणजे तर त्याला त्या अगदीच गुंतवून टाकतात. कामनावश पुरुषास देवलोकीसुद्धा सुख प्राप्त होत नाही. मग या मर्त्यलोकी त्यास ते कोठून लाभावयाला? कामनांविषयीची तृष्णा अनिवार झाली म्हणजे मग तिची कदापि तृप्ती होत नाही. या जगतामध्ये कामनांच्या योगाने जसा अनर्थ उद्‌भवतो तसा दुसऱ्या कशाच्याही योगाने उद्‌भवत नाही. मनुष्य त्यास केवळ मोहित होऊन त्यांची आसक्ती धरितो; परंतु ज्यास खरे तत्त्व समजून त्यापासून उद्‌भवणाऱ्या अनर्थाचे परिज्ञान होते, असा कोण ज्ञाता पुरुष त्यांचा अभिलाष धरील? समुद्रवलयांकित पृथ्वीचे राज्य प्राप्त झाले तरी कामनावश राजा तृप्त होत नाही, तर समुद्राच्या पलीकडील भूमी जिंकण्याची इच्छा त्याच्या ठायी उत्पन्न होते. आजपर्यंत मोठमोठ्या चक्रवर्ती राजांचा नाश केवळ या अनिवार राज्यतृष्णेने झाला आहे. फार काय पण मोठमोठे ऋषी केवळ वल्कले परिधान करून, लांब लांब जटा वाढवून व कंदमुळे आणि उदक यावर निर्वाह करून तपश्चरणात गढले असता, त्यास या कामनांनी घेरून टाकल्याचे वृत्तांत आपण ऐकतो. तर अशा या कामनारूप भयंकर शत्रूंचा संसर्ग कोण ज्ञाता पुरुष इच्छिल बरे? या कामनांचा नुसता विचार मनात आल्यानेही मनुष्याचा घात व्हावयाचा. मग त्यात आसक्त होऊन त्यांची यथेष्ट तृप्ती करू पाहणाराची दशा काय सांगावी? या लोकीच्या विषयांचा आस्वाद केवळ अल्पकाळ घडण्यासारखा असून त्यांच्या ठायी एक वेळ आसक्ती जडली म्हणजे त्यांची तृप्ती कदापि घडणे नाही. या विषयाच्या संसर्गामुळे मोठमोठ्या साधुपुरुषालासुद्धा दोष लागला आहे. त्यांची लालसा धरिल्याने खात्रीने पापाकडे प्रवृत्ती व्हावयाची. तेव्हा अशा या विषयकामनारूप विषाचा कोण बरे

अंगीकार करील? कामनावश होऊन या जगातील व्यवसायांमध्ये जे पुरुष मग्न होत असतात, त्याला कोणत्या प्रकारे विपत्ती प्राप्त होते व जे विषयकामनांची मुळीच परवा करीत नाहीत, त्यांच्या चित्तास कसे स्वास्थ्य प्राप्त होते, याविषयी जो विचार करितो त्याच्या ठायी खरी संयमशीलता वसत असल्यास त्याने या कामनांचा त्याग करणे उचित होय. कामी जनास विषयप्राप्तीच्या प्रयत्नात यश आल्यास त्यास मोठीच विपत्ती प्राप्त झाली म्हणून समजावे. कारण कामनासिद्धी झाल्याने ते प्रमत्त होऊन करू नये ते करितात आणि करावे ते करीत नाहीत. यामुळे त्यास अति दुर्गती प्राप्त होते. विषयकामनाची तृप्ती करण्यासाठी मोठे कष्ट करावे लागतात. बरे, त्या एकदा प्राप्त झाल्यावर फार वेळ राहतात काय? नाही. त्याचा संसर्ग केवळ अल्प काळ असतो. अशा कामनाच्या ठायी रत होण्याची इच्छा कोणा सुज्ञ व संयमशील पुरुषास होईल बरे? कामनाच्या तृप्तीसाठी जितका प्रयत्न करावा तितकी त्याविषयीची तृष्णा विशेषच वृद्धिंगत होते. या कामनाचा जो त्याग करीत नाही त्याला दुःख भोगावे लागते. तेव्हा अशा ह्या तृणासमान कामनाविषयी कोण संयमशील पुरुषाच्या ठायी प्रीती उत्पन्न होईल बरे?

मनोनिग्रहहीन पुरुषाच्या चित्तात ह्या कामनांविषयी प्रीती उत्पन्न झाली असता त्याचा नाश होतो, त्याला सुख कसले ते मुळीच लाभत नाही. या कामना केवळ रागाने खवळलेल्या उग्र सर्पाप्रमाणे घातक होत. तेव्हा अशा या अनर्थमूलक कामनास कोण निग्रही मनुष्य वश होईल? या कामनांची कितीही तृप्ती करीत राहिले तरी मनुष्यास समाधान असे कदापि वाटत नाही. ज्याप्रमाणे क्षुधाकुल श्वान अस्थीचे कितीही वेळ चर्वण करीत बसले तरी त्याची क्षुधा कधीही शमत नाही. त्याप्रमाणे त्याची अवस्था असते. तेव्हा अशा या शुष्क अस्थीसारख्या कामनास कोण आत्मसंयम करणारा पुरुष मोहून जाईल? त्यापासून नाना विपत्ती उत्पन्न होऊन त्यामुळे मनुष्याचा सर्वस्वी नाश व्हावयाचा. त्यास मोहून जाणारा मनुष्य चोहोकडून संकटात पडतो. त्यांच्या तृप्तीसाठी नाना प्रयत्नांमध्ये जे सर्वदा चूर असतात, त्यांना हरएक प्रकारची दुःखे भोगावी लागतात. या कामनांच्या तृप्तीचे विषय संपादण्याची किंवा प्राप्त विषय राखून ठेवण्याची किंवा त्यांची वृद्धी करण्याची कितीही खटपट केली तरी त्यापासून यत्किंचितही सुख प्राप्त होत नाही. या विषयकामनांच्या तृप्तीविषयी लालसा धरून आजपर्यंत मोठमोठे राजे अगदी धुळीस मिळाले आहेत. यांच्या नादास लागून धुंदी आल्यामुळे मित्र असतात ते परस्परांचे शत्रू होतात. प्रिय बांधव असतात ते एकमेकांचे दीर्घद्वेषी होतात. तेव्हा अशा या भयंकर व अनर्थावह कामनांविषयी कोणा सुज्ञ

पुरुषाच्या ठायी रती उत्पन्न होईल बरे? कामनांध पुरुषाच्या बुद्धीला भ्रंश होऊन त्याच्या हातून अनेक वाईट कर्मे होतात आणि त्यामुळे त्यास दु:ख किंवा मृत्यू प्राप्त होतो. कामनातृप्तीची आशा ज्याच्या ठायी अनिवार होते, त्याचा या जीवलोकी नाश होतो. मृग जसे मधुर गायनास मोहित होऊन नाश पावतात, पतंग जसे अग्नीच्या तेजास भुलून त्यात पतन पावून भस्मसात होतात; मत्स्य जसे गळास लावलेल्या आमिषाला लोलुप होऊन प्राणास मुकतात, तद्वत या अनर्थावह विषयकामनांच्या पायी मनुष्य नाशप्रत पावतात.

या कामना सुखदायी आहेत असे जे सामान्य जनांचे मत आहे त्यात काहीएक अर्थ नाही. कारण प्रत्येक विषयाचे सूक्ष्म दृष्टीने परीक्षण केले असता तो उपभोगार्ह मुळीच नाही असे आढळून येईल. उत्तम वस्त्रे, स्वादिष्ट पक्वान्ने वगैरे ही केवळ दु:खप्रतिकारार्थ योजावयाची. तृषाकांत मनुष्याला उदकप्राशनाची इच्छा होते. क्षुधादिष्ट मनुष्यास अन्नभक्षणाची आशा वाटते. शीत, उष्ण व वृष्टी यांच्या निवारणार्थ वस्त्राची अपेक्षा वाटते. निद्रानाश करण्याकरिता शय्या हवीशी वाटते. चालण्याचे श्रम वाचावे म्हणून वाहन पाहावे लागते. उभे राहून थकवा आला म्हणजे आसन शोधावे लागते. अंगाचा मळ जाऊन आरोग्य व बल कायम राहावे यासाठी स्नान करण्याची आवश्यकता वाटते. तेव्हा तात्पर्य काय की, हे सारे बाह्य विषय मनुष्याच्या दु:खाचा प्रतिकार व्हावा म्हणून योजण्यात येतात. यावरून ते उपभोगार्ह आहेत असे सहसा म्हणवत नाही. पित्तप्रकोप झाला असता शीतोपचार केल्याने सुख वाटते; परंतु या शीतोपचाराचा उपयोग पित्तदाहमूलक पीडा निवारणार्थ केवळ केलेला असतो. तेव्हा त्यास भोगार्ह म्हणता येत नाही. विषयकामना सर्वदा सारख्या असत नाहीत. त्यात नेहमी फेरबदल होण्यासारखा असतो. यास्तव त्यास भोग अशी संज्ञा देणे कदापि युक्त नव्हे. यापासून उद्भवणाऱ्या सुखाचे पर्यवसान सदोदित दु:खातच होत असते. शीतकाली उबदार वस्त्रे सुखदायक होतात; पण उष्णकाळी त्यापासून त्रास होतो. त्याचप्रमाणे उष्णकाळी चंदनाचा लेप सुखावह होतो; परंतु तोच शीतकाळी पीडाकारक होतो. लाभहानी, संपत्तीविपत्ती, जयापजय, रोगारोग इत्यादी द्वंद्वे सर्व प्राणिमात्रास लागून असल्याकारणाने या लोकी सर्वथा सुखी असा मानव कोणीही नाही. याप्रमाणे या लोकांची वसती सुख-दु:खमिश्रित असल्यामुळे राजा व दास्यही समान लेखितो.

राजा म्हटला म्हणजे तो सदोदित हर्षयुक्त असतो व दास म्हटला म्हणजे तो सदैव कष्टी असतो असे सहसा म्हणता येत नाही. राजपद प्राप्त झाल्याने पुष्कळावर अधिकार

चालवावा लागतो आणि जितकी राजसत्तेची मर्यादा मोठी तितके राजास दु:ख अधिक. आपल्या प्रजेच्या हिताप्रीत्यर्थ त्यास नानापरी कष्ट सोसावे लागतात. राजा राजपदास केव्हा मुकेल याचा नेम नसतो. तेव्हा अशा अशाश्वत राजपदावर भरवसा ठेवून जो राजा राहतो तो हतभाग्य समजावा. बरे, तो राजपदावर भरवसा ठेवीत नसला तर अशा भ्याड राजास सौख्य कोठून प्राप्त होणार? राज्यतृष्णेस वश होऊन राजाने समग्र महीतल जिंकिले तरी तो स्वत: एका नगरातच वास करितो. या नगरातलेही एकच मंदिर त्यास राहावयास पुरते. तेव्हा राजाची स्वसत्तावृद्धीची सारी खटपट केवळ इतरांसाठीच असते, असे म्हणावे लागते. त्याचप्रमाणे एक-दोन पेहराव असले म्हणजे राजाची गरज भागण्यासारखी असते. क्षुधातृप्तीपुरते अन्न त्यास प्राप्त झाले म्हणजे त्याच्या जीविताचे रक्षण होते; तसेच एक शय्या व एक आसन असले म्हणजे त्याच्या निजण्या-बसण्याची सोय होते असे आहे. त्यापेक्षा राजाचे इतर सर्व ऐश्वर्य केवळ गर्वास कारण होते. हे राजवैभव जर केवळ चित्तास संतोष प्राप्त व्हावा यासाठी असेल तर मला राजवैभवावाचूनच संतोषाची प्राप्ती होण्यासारखी आहे. ही संतोषप्राप्ती मनुष्यास एक वेळ झाली म्हणजे मग त्यास हे वैभव काय करावयाचे आहे? ज्याला सौख्यप्राप्तीचा योग्य मार्ग सापडला आहे तो विषयकामनास कदापि मोहून जाणार नाही. मी कोणावर रागावून किंवा माझा कोण्या शत्रूने पराभव केला म्हणून वनप्रवेश केला आहे असे आपण समजू नये. आपले म्हणणे मी मान्य करीत नाही, याचे कारण मला याहून विशेष लाभाची आकांक्षा आहे हे मुळीच नव्हे. मी जो एक वेळ विषयकामनाचा त्याग केला आहे, त्याचा अंगीकार पुन्हा करावा असे मला कदापि वाटणार नाही. खवळलेला भुजंग किंवा पेटलेली गवताची पेंडी एकदा हातची टाकल्यावर ती पुन्हा उचलण्यास कोण ज्ञाता पुरुष प्रवृत्त होईल बरे? डोळसाने अंधांच्या स्थितीची स्पृहा करावी; मुक्ताने बद्ध मनुष्याच्या स्थितीचा हेवा करावा, सधनाने निर्धनाची विपत्तीची इच्छा करावी; संयमनशीलाने उन्मत्तचित्ताची अवस्था प्राप्त होण्यासाठी खटपट करावी; या गोष्टी जशा अस्वाभाविक आहेत, तद्वतच वैराग्यशीलाने विषयासक्तीच्या स्थितीची स्पृहा करणे हे आहे. जो जरा व मृत्यू याच्या भीतीपासून मुक्त होऊन कृतकृत्य होण्याविषयी प्रयत्न करीत आहे तो भिक्षान्न सेवन करीत असला तरी त्याच्याविषयी हळहळणे उचित नव्हे. अशा पुरुषास इहलोकी शांतिसुख प्राप्त होऊन परलोकीही त्यास दु:ख प्राप्त होत नाही; परंतु जो मोठा लक्ष्मीवान असूनही तृष्णावश होऊन अधिक चित्ताची व ऐश्वर्याची अपेक्षा करितो, त्यास या लोकी शांतिसुख प्राप्त होत

नाही व परलोकी त्यास दु:ख प्राप्त होते. मजशी आपण जे हे अत्यंत मित्रत्वाचे व मायेचे भाषण केले, ते आपल्या सत्त्वशीलपणास व कुलशीलसंपन्नतेस अनुरूप असेच आहे आणि माझ्या प्रतिज्ञेप्रमाणे मी वर्तन करावे हेही माझ्या सत्त्वशीलपणास व कुलीनतेस अनुरूप आहे. संसारसुखाच्या अनुषंगाने असणाऱ्या पीडेने मी अगदी जर्जर झाल्यामुळे शांती प्राप्त व्हावी म्हणून स्वगृहत्याग केला आहे. स्वर्गाच्या ठायी अक्षयीचे राज्य प्राप्त झाले तरीदेखील ते मला नको; मग या मनुष्यलोकीच्या राज्याची ती कथा काय? हे राजाधिराज, आपण म्हणता की, मनुष्याने तीन प्रकारचे अर्थ प्राप्त करून घेणे योग्य होय आणि मी जो अर्थ साध्य करू पाहत आहे तो व्यर्थ आहे; परंतु वस्तुत: पाहता आपण म्हणता ते तीनही अर्थ क्षय पावणारे असून, त्यापासून तृप्ती होत नाही. जेथे जरा, भय, जन्म, मरण आणि चिंताही नाहीत व जेथे पुन्हा पुन्हा कर्म करण्याची आवश्यकता उरत नाही. तो पुरुषार्थ मी उत्तम समजतो. आपण म्हणता की, मी जरा प्राप्त होईपर्यंत संसारात राहावे. तारुण्यावस्थेत धर्मसंग्रह करण्याचा निश्चय केला असता तो सिद्धीस जात नाही. कारण या अवस्थेत मनाची चंचलता विशेष असते; परंतु मला वाटते की, धर्मप्राप्तीसाठी उद्योग करण्याचे लांबणीवर टाकावे हे काही नीट नाही. पुढे आपल्या मनाची स्थिती कशी होईल, ते आपणास आज निश्चयाने सांगता येत नाही. कदाचित असेही घडण्याचा संभव असतो की, वृद्धापकाळी मनुष्याच्या ठायी अधीरता उत्पन्न होऊन त्याच्या हातून कोणतेच सत्कर्म निश्चयाने पार पाडण्याची शक्यता अगदी कमी असते; परंतु तरुण वयात केलेला निर्धार मोठ्या धैर्याने शेवटपर्यंत कायम राखून सन्मार्गापासून सहसा च्युत न होणारे पुरुष पुष्कळ आढळतात. पुन्हा असे की, आपणास केव्हा मृत्यू प्राप्त होईल याचा नेम नसतो. कारण आपण व्यवहारात पाहतो की, लहान-मोठ्या सर्व वयाचे मनुष्य मृत्यू पावत असतात. तेव्हा अशा या अनिश्चित जीवितामध्ये शांती प्राप्त व्हावी अशी ज्याची इच्छा असते त्याने जरा येईपर्यंत संसारात राहावे असे मनात आणणे हे फारच अविचाराचे आहे. या संसाररूप अरण्यामध्ये कालरूप व्याध हातात जरारूप आयुध धारण करून रोगरूप बाण सर्वत्र फेकीत सर्वदा टपलेला आहे. त्याच्या पुढे मनुष्यरूप मृग इतस्तत: धावत आहेत. अशी स्थिती असता अगदी उतारवयात होईपर्यंत या संसारामध्ये राहण्याची इच्छा कोणाही सुज्ञ मनुष्यास कदापि व्हावयाची नाही. यास्तव आबालवृद्धांनी एक क्षणाचाही विलंब न लाविता धर्मानुसरण करून निवृत्तीमार्गाचे अवलंबन करावे.

आता आपण म्हणता की, मी स्वकुलास उचित असे यज्ञयागादी करून धर्मसंग्रह करावा व उत्तम फल प्राप्त करून घ्यावे; परंतु त्या यज्ञयागास नमस्कार असो. अन्य प्राण्याला दु:ख देऊन ज्या यज्ञादी क्रिया करावयाच्या त्यापासून प्राप्त होणाऱ्या सुखाची इच्छा मला मुळीच नाही. परलोकप्राप्तीची लालसा धरून गरीब अनाथ प्राण्याचे यज्ञामध्ये हवन करण्याची बुद्धी दयाशील पुरुषास होणे कदापि उचित नव्हे. अशा यज्ञाचे फल शाश्वत असले तरीदेखील त्याची अपेक्षा सत्पुरुषाने कदापि करू नये. परंतु वस्तुत: पाहता पशुहिंसामूलक यज्ञाचे फल कालेकरून क्षय पावणारे असते. मनोनिग्रह, सदाचार, विरक्तता इत्यादिकांच्या योगाने जो धर्मसंग्रह होतो त्याचा मार्ग अनुकूल नसता तरीदेखील पशुहिंसामूलक यज्ञफल प्राप्त करून घेण्याची इच्छा करणे ज्ञात्यास बिलकूल शोभले नसते; परंतु याहून श्रेष्ठ असा धर्ममार्ग सर्वांस साधण्यासारखा असता प्राणघातमूलक सुखलालसा का म्हणून करावी बरे? या प्रपंचामध्येदेखील परहिंसा करून प्राप्त होणारे सुख अत्यंत अनिष्ट होय असे दयार्द्रबुद्धी पुरुषास वाटत असते. तर जेथे या लोकी केलेल्या हिंसेचे फल अदृष्ट अननुभूत अशा परलोकी प्राप्त व्हावयाचे म्हणून सांगतात, तेथे ते अनुभवण्याची आकांक्षा कोणास होईल बरे? या भावी फलप्राप्तीस मी कदापि मोहून जाणार नाही; कारण पुन्हा पुन्हा जन्ममरण प्राप्त व्हावे अशी इच्छा मला लवमात्रही नाही. पुन्हा या यज्ञादी क्रिया आपल्या हातून यथाविधी पार पडतील याचाही भरवसा फारच कमी असतो.

''मी जो येथे आलो आहे तो अराडनामक एक महामुनी आहे त्याच्या दर्शनाकरिता होय. तो जनास मोक्षमार्गाचा उपदेश करीत असतो असे मी ऐकले आहे. मी आताच येथून त्याच्याकडे जावयास निघणार आहे. तर हे राजा, तुझे कल्याण असो. नि:सीम निरपेक्षत्वास्तव माझे भाषण तुला कठोर वाटले असेल, तर त्याबद्दल मला क्षमा कर. आपल्या राज्याचे, आपल्या लोकांचे, आपल्या सत्तेचे आणि आपल्या धर्माचे यथोचित परिपालन कर आणि ज्याप्रमाणे प्रचंड वणव्यात सापडून होरपळलेला पक्षी जलाशयामध्ये डुबी मारून स्वतापशमन करून घेतो, तद्वत तू या प्रपंचतापाने त्रस्त झालास म्हणजे कोणातरी सन्मार्गदर्शक सद्गुरूला शरण जाऊन स्वमोक्षसिद्धी करून घे म्हणजे झाले.''

हे गौतम बुद्धाचे अत्यंत नि:स्पृहतेचे नि निश्चयाचे भाषण ऐकून बिंबिसार राजा अगदी चकित झाला आणि हात जोडून त्याला त्याने अशी विनंती केली की, महाराज, आपण धर्मसिद्धीसाठी जो हा उद्योग आरंभिला आहे तो निर्विघ्नपणे शेवटास जावा अशी माझी उत्कट इच्छा आहे. आपण कृतकृत्य झाला म्हणजे मजवरही अवश्य अनुग्रह करावा, एवढेच माझे आपणापाशी मागणे आहे.

मग त्या राजास तसे करण्याविषयी अभिवचन देऊन गौतम बुद्ध तेथून वैश्यंतर आश्रमास जावयास निघाला. तो त्याप्रमाणे तेथून उठून चालला असता तो राजा विस्मित होत्साता त्याच्याकडे काही वेळपर्यंत टकमक पाहत उभा राहिला आणि तो दूर गेला असे पाहून मग आपल्या परिवारासह वर्तमान स्वनगरीस परत गेला.

अराड (आलार कालाम) व उद्रक (उददक रामपुत्त) या मुनीपाशी तत्त्वशोध

हे मुनी प्राचीन सांख्यमताचे अनुयायी होते. प्रथमतः अराड मुनीच्या आश्रमात गौतम गेला तेव्हा तो मुनी त्याला पाहून त्याने उच्चस्वराने स्वागत करून त्याच्या सन्निध गेला. परस्परास यथोचित कुशल प्रश्न विचारल्यावर ते दोघे स्वच्छ ठिकाणी पाट मांडून बसले. अराडमुनी गौतमबुद्धाचे ते अद्वितीय तेज पाहून चकित होत्साता काही वेळ त्याच्याकडे टकटका पाहता बसला आणि मग तो त्याशी येणेप्रमाणे बोलला –

''सौम्य राजपुत्रा, तू आपल्या संबंधीजनांचे स्नेहपाश तोडून व राजमंदिराचा व राजैश्वराचा त्याग करून निघाला आहेस हे मला कळले आहे. याप्रमाणे तू ऐश्वर्य विषवत लेखून त्याचा अनादर करून वनाप्रत प्राप्त झाला आहेस, यावरून तुझा निश्चय विलक्षण दिसतो आणि तू मोठा ज्ञाता आहेस असे सिद्ध होते. राजे वृद्ध म्हणजे आपली राजलक्ष्मी आपल्या अपत्यास देऊन वनाप्रत येतात, त्यात काही आश्चर्य मानण्यासारखे नाही; परंतु तू अगदी नवयौवनसंपन्न असता व राजलक्ष्मीचा लवमात्रही उपभोग न घेता विरक्त होऊन वनास निघून आलास हे माझ्या मते मोठेच नवल होय. यावरून मला वाटते की, धर्म जाणून घेण्याची पात्रता तुझ्या ठायी उत्तम प्रकारची वसत आहे. तरी सत्यधर्मज्ञान प्राप्त करून घेऊन त्वा हा दुःखार्णव लवकर तरून जावे. शिष्यास गुरूपासून ज्ञान प्राप्त झाल्यावर त्या ज्ञानाचा सुपरिणाम त्याच्या चित्तावर कालांतराने होण्याचा संभव असतो; परंतु तुझी गोष्ट अशी नाही. तुझे गांभीर्य व तुझे आजपर्यंतचे वर्तन पाहिल्यावरून तू माझ्या कसोटीस चांगला उतरला आहेस.''

हे त्या मुनीचे उत्तेजनपर भाषण ऐकून गौतमाने हर्षभरित होऊन त्याला येणेप्रमाणे उत्तर केले –

''आपण अत्यंत विरक्त असताही मजशी इतके कळवळ्याचे व प्रेमाचे भाषण केलेले ऐकूनच मला कृतार्थता वाटू लागली आहे. ज्याप्रमाणे अंधारात चाचपडत असणाऱ्या मनुष्यास दिवा सापडावा किंवा देशांतरास जाऊ इच्छिणाऱ्या चुकलेल्या वाटसरास वाटाड्या मिळावा किंवा समुद्राच्या पैलतीरी जाऊ पाहणारी नौका आढळावी,

तद्वत आपल्या दर्शनाने माझी अवस्था झाली आहे. तर हे गुरुराज, जरा, मरण व रोग यापासून या आपल्या दासाची मुक्ती कशी होईल ते मला सांगणे योग्य वाटल्यास कृपा करून सांगावे.''

याप्रमाणे राजपुत्राने मोठ्या विनयाने विचारल्यावरून अराडमुनीने स्वसंमत शास्त्राचे सिद्धांत त्याला संक्षेपत: निवेदन केले. त्यांचे सार येणेप्रमाणे होते –

''हे राजपुत्रा, हा संसार कसा उत्पन्न होतो व त्याचे परिवर्तन पुन्हा पुन्हा कसे होते याविषयी आमच्या शास्त्राचा सिद्धांत सांगतो तो श्रवण कर. प्रकृती, विकार, जन्म, मृत्यू आणि जरा ही आम्ही सत्त्वरूप आहेत असे मानितो. पंचमहाभूते, अहंकार, बुद्धी आणि अव्यक्त यास प्रकृती म्हणतो. बुद्धी, पंच ज्ञानेंद्रिये, त्याचे बाह्य विषय, पंच कर्मेंद्रिये आणि मन यास विकर म्हणतो, हे क्षेत्र म्हणजे शरीर जाणणारा जो त्याला क्षेत्रज्ञ असे म्हणतो, क्षेत्रज्ञ तोच आत्मा होय.

ज्याला जनन, वृद्धत्व, बंधन आणि मरणही प्राप्त होतात त्यास व्यक्त असे म्हणतो आणि ही ज्यास कदापि प्राप्त होत नाहीत त्यास अव्यक्त म्हणतो. अज्ञान, पूर्वार्जित कर्म आणि तृष्णा ही या संसाराची कारणे आहेत. या त्रयींमध्ये जो गुरफटलेला असतो त्याला तत्त्वज्ञान होत नाही. कारण विपर्याय, अहंकार, व्यग्रता, संदेह, अविवेक, अयोग्य उपाययोजना आसक्ती आणि पतितत्व इत्यादिकांच्या योगाने चित्तास व्यामोह होतो. विपर्यायाच्या योगाने सर्वकाही विपरीत भासते; कर्तव्य गोष्ट भलत्याच प्रकारे हातून घडते आणि विचारणीय गोष्टीसंबंधाने अन्यथा ग्रह मनास जडतो. अहंकारास वश झालेला मनुष्य म्हणत असतो की, मी बोलतो, मी जाणतो, मी उभा राहतो. ज्या वस्तूंचे वास्तविक स्वरूप ध्यानात येण्यास कठीण असते त्या समान आहेत असे जे अनुमान, त्यास संदेह म्हणतात. जेथे मन, बुद्धी आणि कर्म एवद्रूप आपण आहो असे मनुष्यास वाटत असते, त्या स्थितीस व्यग्रता असे म्हणतात. प्रतिबुद्ध कोण व अप्रबुद्ध कोण याविषयीचा विचार जेथे नसतो व प्रकृतीचे भिन्न भिन्न प्रकार जेथे लक्षात येत नसतात त्यास अविवेक असे म्हणतात. नमस्कार, वषट्कार, प्रोक्षण, अभ्युक्षण इत्यादी जे वेदविहित विधी त्या अयोग्य उपाय असे प्राज्ञ म्हणतात. मन, वाचा, कर्म आणि बुद्धी यांच्या योगाने बाह्य विषयांच्या ठायी जडबुद्धिस्तव आसक्त होणे असे म्हणतात. हे माझे, याचा मी, अशा ममत्वामुळे दु:ख पावून पुन्हा पुन्हा संसारामध्ये पडणे यास पतितत्व म्हणतात. आता अविद्या पाच प्रकारची आहे. ते प्रकार तम, मोह, महामोह आणि दोन प्रकारचे तामिस्त्र. तम म्हणजे आलस्य समजावे. जन्म व मृत्यू यास मोह

म्हणतात. महामोह म्हणजे काम होय. यास महामोह म्हणावयाचे कारण असे की, याच्या योगाने मोठमोठ्यांना मोह होतो. तामिस्त्र म्हणजे क्रोध होय आणि अंधतामिस्त्र म्हणजे विषाद होय. हे तामिस्त्राचे दोन प्रकार होत. या पंचविध अविद्येच्या योगाने या दु:खमय संसारामध्ये मनुष्य पुन्हा पुन्हा जन्म पावतो. मी पाहणारा, मी ऐकणारा, मी विचार करणारा, मी कर्ता व मी कार्य असा अहंकार धरून मनुष्य या संस्मृतीमध्ये, फेऱ्यामध्ये सापडलेला असतो. तेव्हा तात्पर्य काय की, अज्ञान, पूर्वार्जित कर्म आणि तृष्णा या कारणत्रयामुळे या संसाररूप सागरामध्ये मनुष्य गटांगळ्या खात असतो आणि जेथे ही कारणे उपस्थित नसतात तेथे त्यांचे कार्य जो संसार तो नाही. कारण जेथे कारणांचा अभाव असतो तेथे त्याच्या कार्याचा अभाव अवश्य असला पाहिजे. ज्यास मोक्ष प्राप्त करून घ्यावयाचा असेल त्याने प्रतिबुद्ध, अप्रबुद्ध, व्यक्त आणि अव्यक्त हे उत्तम प्रकारे जाणून घ्यावे. या चार गोष्टीचा यथार्थ विवेक ज्या क्षेत्रज्ञास होईल त्यास अविनाशी पद प्राप्त होईल. यासाठीच परब्रह्मवादी ब्राह्मण या लोकी ब्रह्मचर्य आचरितात.''

याप्रमाणे त्या मुनींचे भाषण ऐकून राजपुत्राने त्याला विचारले की, ''महाराज, अविनाशी पद प्राप्त करून घेण्याचा जो आपण ब्रह्मचर्यरूप उपाय सांगितला तो कसा, कोठे व कोठवर करावयाचा व त्याची मर्यादा तरी किती याविषयी आपण कृपा करून मला समजून सांगावे.''

मग अराडमुनीने स्वशास्त्रसंमत धर्माचे स्वरूप संक्षेपत: निरूपण केले. याचे सार येणेप्रमाणे: ''प्रथमारंभी गृहत्याग करून व भिक्षुवेश धारण करून आमरण सन्मार्गाने चालावे. कोणी जो काही भिक्षा घालील तीत पूर्ण संतोष मानून राहावे. एकांतवास सेवन करावा. शीतोष्ण, सुख-दु:ख इत्यादी द्वंद्वापासून हर्षविषाद पावू नये. सर्वदा शास्त्राभ्यास करावा. नेहमी समाधानवृत्ती राखावी. विषयप्रीतीत मोठे भय असते आणि वैराग्याच्या योगाने परम कल्याण होते, हे ध्यानात राखून इंद्रियांचा निग्रह करावा म्हणजे मनाला शांती प्राप्त होते. याप्रमाणे विषयकामना आणि दुर्वासना त्यापासून निर्मुक्त होऊन विवेकमूलक **पूर्वध्यान** प्राप्त होते. हे सुखमूलक ध्यान प्राप्त झाले म्हणजे प्रत्येक गोष्टीचा विवेक करण्याचे सामर्थ्य अंगी येते. याप्रमाणे अपूर्व सुखलाभ झाला असता बालिश जन त्यास मोहित होतात आणि मग या रोगद्वेषविवर्जित अशा शांत स्थितीमध्ये मनुष्यास ब्रह्मलोक प्राप्त होतो आणि एवढ्यानेच त्याला संतोष होतो; परंतु जे विद्वान असतात त्यांना असे समजून येते की, तर्कवितर्क करीत बसल्याने

चित्तक्षोभ होतो. यास्तव ते या स्थितीचा अव्हेर करून प्रीतीसुखान्वित **द्वितीय ध्यान** प्राप्त करून घेतात. या ध्यानात लुब्ध होऊन जो पुढे शोध करीत नाही, त्यास भास्करस्थान प्राप्त होते; परंतु या प्रीतिसुखापासून जो मन काढितो त्याला प्रीतिविरहित असे **तृतीय सुखध्यान** प्राप्त होते. याप्रमाणे सुख-दुःख परित्याग करून व मनाचे व्यापार कुंठित करून जी स्थिती प्राप्त होते तिलाच कोणी मोक्ष समजून स्वस्थ होतात. या सुखामध्ये मग्न होऊन जो याहून श्रेष्ठ स्थितीप्रत जाण्याचा प्रयत्न करीत नाही. त्याला शुभकृत्स्नदेवताचे सुख प्राप्त होते; परंतु हे असे सुख प्राप्त झाले असूनही जो त्यात आसक्त होत नाही, तर त्याची उपेक्षा करितो, त्याला सुख-दुःखविवर्जित असे **चतुर्थस्थान** प्राप्त होते. या ध्यानाच्या योगाने बृहत्फलदेवतांचे सुख प्राप्त होते. या फलास बृहत्फल असे मोठे प्राज्ञ पुरुष म्हणतात. पुढे या समाधीपासून व्युस्थित होऊन व शरीरी जो आत्मा त्याचे दोष पाहून शरीरनिवृत्तीसाठी ज्ञान प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न प्राज्ञ पुरुष करितो. हे ध्यान विसर्जन करून उच्चतर स्थिती प्राप्त करून घेण्याचा निश्चय करून प्राज्ञ पुरुष कामनाप्रमाणे रूपाचाही तिरस्कार करितो. प्रथम तो शरीराची जी नवद्वारे त्याचा विन्यास करितो आणि मग त्यातील घनद्रव्यास आकाशवत पाहतो. कोणी ज्ञाता पुरुष आपल्या आकाशमय आत्म्याचा संक्षेप करून याहूनही उच्चतर स्थिरताप्रत जातो. कोणी अध्यात्मज्ञानकुशल पुरुष आत्म्याचे आत्म्यानेच निवारण करितो. असे केल्याने काही एक नाही असे त्याच्या दृष्टीत येते. अशा पुरुषास **आकिंचिन्य** असे म्हणतात. याप्रमाणे त्याची स्थिती झाली म्हणजे पिंजऱ्यातून पक्षी सुटतो तद्वत क्षेत्रज्ञ देहापासून वेगळा होतो. असे झाले म्हणजे त्यास मुक्त म्हणतात. निर्लिग, ध्रुव, अक्षर असे परब्रह्म ते हेच होय. यालाच तत्त्वज्ञ पुरुष **मोक्ष** म्हणतात. हे राजपुत्रा, याप्रमाणे मोक्ष व मोक्षाचा उपाय तुला मी समजावून दिला आहे. हा जर तुला कळला असेल व आवडला असेल तर त्याप्रमाणे वर्तन कर. जैविषव्य, जनक, वृद्धपराशर व दुसरे पुष्कळ मुमुक्षु जन या मार्गाचे अवलंबन करून मुक्त झाले आहेत.''

याप्रमाणे त्या मुनीचे भाषण गौतमबुद्धाने लक्ष देऊन ऐकिले व त्यावर काही वेळपर्यंत मनन करून पुन्हा त्याने त्यास येणेप्रमाणे प्रत्युत्तर केले.

''हे महासाधू, आपले अत्यंत सूक्ष्म ज्ञान मी चित्त देऊन श्रवण केले. यावर मला अशी शंका येते की, ज्याअर्थी आपल्या म्हणण्याप्रमाणे क्षेत्रज्ञाची क्षेत्रापासून सुटका होत नाही त्याअर्थी हे आपले ज्ञान नैष्ठिक नव्हे, म्हणजे अर्थात परममोक्षदायी नव्हे.

प्रकृती व विकार यापासून क्षेत्रज्ञ मुक्त झाला तरी त्याच्याठायी जन्म पावण्याचा व जनकत्वाचा धर्म अवश्य उरतो, असे मला वाटते. आपल्या सांगण्याप्रमाणे विशुद्ध झालेला आत्मा निर्मुक्त झाला असे म्हणतात, तरी आत्मा जोपर्यंत अस्तित्वात असतो तोपर्यंत त्यास अत्यंत परित्याग घडला असे म्हणता येत नाही. प्रकृती, विकार व क्षेत्र या त्रयीचा त्याग कितीही केला तरी जोपर्यंत आत्मा कायम असतो तोपर्यंत ही त्रयी त्याच्या ठायी सूक्ष्मरूपाने तरी अस्तित्वात असते. याप्रमाणे दोष सूक्ष्म होऊन व चित्ताचे व्यापास्तब्ध होऊन दीर्घायुष्य प्राप्त झाले म्हणजे मोक्ष मिळाला असे कोणी समजतात; परंतु अशा प्रकारे अहंकाराचा परित्याग घडला असे म्हटले तरी आत्मा अस्तित्वात आहे तोपर्यंत अहंकाराचा परित्याग झाला असे मानता येत नाही. संख्या आदिकरून जे भेदभाव त्यापासून आत्मा मुक्त झाल्यावाचून तो निर्गुण झाला असे म्हणता येत नाही आणि जोपर्यंत आत्म्यास नैर्गुण्य प्राप्त झाले नाही तोपर्यंत त्यास मुक्त म्हणवत नाही. दुसरे असे की, जो गुणी असतो त्याच्या त्या गुणांचा व्यतिरेक संभवत नाही. उदाहरणार्थ असे पाहा की, आकार आणि उष्णता ही दोन्ही नसली तर अग्नी उपलब्ध होत नाही. देह नाही तर देही नाही आणि गुण नाहीत तर गुणी नाही. शरीरी जो 'आत्मा' तो प्रारंभी जर विमुक्त होता तर पुनरपि बुद्ध कसा झाला? क्षेत्रज्ञ शरीरविरहित असता प्राज्ञ असतो की अज्ञ असतो बरे? तो प्राज्ञ असतो तर त्याला ज्ञेय अशी दुसरी वस्तू असली पाहिजे आणि जर ती नसेल तर तो मुक्त असतो असे म्हणता येत नाही; परंतु जर आत्मा अज्ञ असतो असे मानिले, तर ही आत्म्याची कल्पना आपल्या काय कामाची? आपण म्हणतो त्याप्रमाणे क्षेत्रज्ञाकडून कितीही त्याग घडला तरी त्याच्या ठायीचे गुण जात नाहीत. यास्तव सर्व परित्यागापासून पूर्ण कृतार्थता प्राप्त होते असे आपल्याच्याने म्हणवत नाही.''

याप्रमाणे अराडमुनीच्या धर्मोपदेशावर गौतमबुद्धाने शंका घेतली व त्यामुळे त्याचे समाधान मुळीच झाले नाही. मग त्याचे ते तत्त्वज्ञान अपुरे आहे असे जाणून तो त्याच्याकडून निघाला आणि याहून अधिक काही तरी जाणून घ्यावे अशा उद्देशाने तो उद्रकनाशक मुनीच्या आश्रमात गेला. त्या मुनीकडून त्याला इतकेच कळले की, संज्ञा व संज्ञीय संबंधाचा दोष ध्यानात आणून मनुष्याने आकिंचन्याहून उच्चतर अशी जी नामरूपातीत स्थिती ती प्राप्त करून घ्यावी. उद्रकमुनीने आणखी पुष्कळ सूक्ष्म भेद त्याला सांगितले; परंतु तेवढ्यानेही बोधिसत्त्वाचे समाधान झाले नाही. त्याने आपणाशी असा विचार केला की, क्षेत्रज्ञ कितीही सूक्ष्म अवस्थेप्रत गेला तरी त्याला पुनरावृत्ती

चुकत नाही, तर या स्मृतीच्या फेऱ्यातून सुटण्याचा याहून चांगला असा काही मार्ग असल्यास पाहावा असा निश्चय करून उद्रकाचाही आश्रम सोडून तो पुढे चालता झाला.

## बोधिसत्त्व तपश्चर्या करितो

**(गौतम गृहत्याग करून धर्मज्ञानप्राप्तर्थ्य इतस्तत: भ्रमण करीत असता त्याला बोधिसत्त्व असे बौद्ध ग्रंथात म्हटले आहे. हेच विशेषण आम्ही या प्रकरणात पुढे जेथे तेथे योजले आहे.)**

उद्रकमुनीचा आश्रम सोडल्यावर बोधिसत्त्व गयराजर्षींच्या नगरी नामक आश्रमास गेला. तेथे तो नैरंजना नामक नदीच्या पवित्र तीरी एकांतवास करण्याच्या उद्देशाने राहिला. तेथे जवळच दुसरे पाच भिक्षू मोक्षसिद्धीच्या हेतूने तपश्चर्या करीत होते. त्यांच्याशी त्याची भेट झाली. त्यांनी आपला उद्देश व तत्सिद्ध्यर्थ चालविलेला उपाय बोधिसत्त्वास निवेदन केला. ते म्हणाले की, ''श्रुतिस्मृतींनी जो धर्ममार्ग विहित केला आहे, त्याहून श्रेयस्कर असा दुसरा मार्गच नाही, त्या मार्गाचा अवलंब केला असता ज्ञानकांडात वर्णिलेले निरवयव, अक्रिय, निर्विकार, निर्गुण, अव्यय, शांत सच्चिदानंदघन ब्रह्म प्राप्त होऊन मोक्षसिद्धी होते. या ब्रह्मप्राप्तीसाठी कर्मकांड विहित केले आहे. कर्माच्या योगाने सर्व वृत्तीचा जय होऊन पुरुष कर्मातीत होतो आणि शेवटी बंधमुक्त होऊन सर्वपरिच्छेदवियुक्त परब्रह्माच्या ठायी लीन होतो. याप्रमाणे असतापासून मानवाची सताप्रत गती होते आणि इंद्रिमूलक क्लेषांपासून निर्मुक्त होऊन शाश्वत शांतीचा जो अनुभव घेतो, ही स्थिती प्राप्त होण्यासाठी आम्ही येथे तपश्चर्या करीत आहोत. आपली इच्छा असल्यास आमच्या सन्निध राहून आमच्याप्रमाणे तपश्चरण करावे.''

हे त्यांचे भाषण ऐकून बोधिसत्त्वास वाटले की, हे म्हणतात ते कदाचित खरे असेल. देहदंडन केल्यावाचून मोक्षसिद्धी होणे नाही, असा जो यांचा सिद्धांत आहे तो कदाचित सत्य असेल, असे मनात आणून त्याने त्यांच्यापाशी राहून तीव्र तपश्चर्येस आरंभ केला. तेथे एकसारखी सहा वर्षे उपवासादि नानाविध खडतर व्रते व नियम करून त्याने आपला देह अगदी कृश करून घेतला. वनामध्ये कंदमूलादी जे काही खावयास सापडे त्यावर त्याने आपला निर्वाह चालविला. याप्रमाणे देहदंडनमूलन तपश्चरण करिता त्याचे केवळ अस्थिचर्म मात्र उरले. इतकी कष्टप्रद तपश्चर्या करून त्याने नाना प्रकारे क्लेश सोसले. तथापि, संसारमुक्त होण्याचा मार्ग त्यास काहीच सापडेना. तेव्हा त्याने असा विचार केला की, या तपश्चरणरूपमार्गाचे अनुसरण करून मला वैराग्य, धर्मबोध किंवा मुक्ती यापैकी काहीएक प्राप्त व्हावयाचे नाही. यास्तव

यात काहीच अर्थ नाही. मी जो धर्मशोध करावयास निघालो आहे, तो शरीरास दुर्बलता प्राप्त झाल्याने साध्य व्हावयाचा नाही असे मनात आणून त्याने स्वशरीराचे बल पुनरपि मिळविण्याचा बेत केला. त्याने आपल्या मनाशी आणखी असा विवेक केला की, क्षुधा, तृषा व इतर श्रम यांच्या योगाने देहास ग्लानी आली म्हणजे मनास क्लेश होऊन ते अस्वस्थ होते. अशी मनाची अवस्था झाली असता त्याच्या साहाय्याने धर्मशोध कसा होईल बरे? कारण मनास कोणत्याही प्रकारची व्यग्रता नसली तरच ते चिंतन व विवेक करण्यास समर्थ असते. मनाची निवृत्ती म्हणजे शांती जी आहे ती इंद्रियांचे सतत तर्पण केल्याने प्राप्त होते. कारण इंद्रियतृप्तीने मनाचे स्वास्थ्य प्राप्त होते आणि समाधीयुक्त चित्त झाले म्हणजे ध्यानयोग साध्य होतो. ध्यानसिद्धीचे चित्ताच्या ठायी असे धर्म उद्‌भवतात की, त्यांच्या योगाने दुर्लभ, शांत, अजर, अमृत, परमपद प्राप्त होते. तस्मात असे मी उपाय शोधीत आहे. तो उपासादिकांच्या योगाने देह जर्जर करून प्राप्त व्हावयाचा नाही. असा निर्धार करून बोधिसत्त्वाने निरंजना नदीत मोठ्या प्रयासाने उतरून स्नान केले आणि झाडाझुडपांच्या फांद्यास धरून तो एकदाचा बाहेर आला. त्याला तेथून पुढे एक पाऊलसुद्धा चालण्याचे सामर्थ्य नव्हते. इतक्यात तेथे गवळ्यांच्या राजाची नंदबालानामे करून कन्या प्राप्त झाली. तिने त्याची ती तशी अवस्था पाहून त्याला प्यावयास थोडेसे दूध आणून दिले. ते तो मोठ्या आनंदाने प्याला.

याप्रमाणे तो आपला तपश्चरणाचा क्रम सोडून पुनरपि इतर जनासारखा खाऊपिऊ लागला. तेव्हा त्याचा त्या पाच तपस्व्यांनी अव्हेर केला. मग तो त्यांची संगती सोडून त्या वनात एकटाच राहू लागला. तेथे अश्वत्थवृक्षाखाली बसून तो सर्वदा मनन करीत असे. याप्रमाणे विचार करीत बसला असता त्याला खाण्यापिण्याचे भान उरत नसे. ध्यानविसर्जन केल्यावर तो जवळपास जी काही फळेमुळे सापडत त्यावर निर्वाह करीत असे. कधी कधी जवळच्या गावात जाऊन तो थोडीशी भिक्षा मागत असे.

एके प्रसंगी बोधिसत्त्व बराच वेळ ध्यानस्थ बसून उठला. तो पोटात काही नसल्यामुळे त्याला पराकाष्ठेची ग्लानी आली आणि तो मूर्च्छा येऊन जमिनीवर पडला. इतक्यात तेथे एक धनगराचा मुलगा आला. त्याने त्याची अशी अवस्था पाहून व तो उन्हात होरपळत आहे असे पाहून झाडाच्या फांद्या तोडून आणून त्याला त्याने थंड छाया केली आणि आपली एक बकरी तेथे आणून तिची आचळे दाबून त्याच्या तोंडात दुधाची धार पडेसे केले. त्याने त्यास स्पर्श केला नाही. याचे कारण एवढेच की, आपण शूद्र असून हा कोणी उच्च वर्णाचा पुरुष असावा असे त्याच्या मनात येऊन

त्याला आपण स्पर्श केला असता विटाळ होईल असे त्याला वाटले. त्याच्या तोंडात थोडेसे दूध गेल्यावर तो सावध झाला आणि त्या धनगराच्या मुलाचे उपकार मानून तो त्याच्या लोट्यातून आणखी दूध मागू लागला. तेव्हा तो मुलगा म्हणाला, 'महाराज, मी शूद्र आहे. माझे भांडे आपण घेतल्यास माझा आपणाला विटाळ होईल.' हे त्याचे उत्तर ऐकून बोधिसत्त्व म्हणाला की, 'बाबा, ज्याअर्थी या जगात परस्परांची गरज असून दया येते त्याअर्थी ते परस्परांचे भाऊबंद होत. आपणा सर्वांच्या देहात जे रक्त खेळत आहे ते सारखेच आहे. त्यात गुणभेद किंवा रंगभेद असा काहीच नाही. त्याप्रमाणे आपल्या नेत्रातून जे अश्रू वाहतात, त्याचा धर्महही समानच असतो. त्यात कोठे भेदभाव आढळत नाही. बाबा, उच्च वर्णाचा मनुष्य म्हटला म्हणजे तो मस्तकीच्या तिलकासह किंवा गळ्यातल्या यज्ञोपवितासह निर्माण होतो अशातला काही अर्थ नाही. माझ्या बुद्धीचा तर असा निश्चय आहे की, जो सदाचारी असतो तो जन्मत: कोणीही असला तरी तो उच्च वर्णाचा होय आणि जो दुराचारी असतो तो जन्मत: कोणीही असला तरी अतिनीच होय. तर हे माझ्या बांधवा, मला तुझ्या लोट्यातून दूध प्यावयास दे. मी तुझे उपकार विसरणार नाही.' हे त्याचे भाषण ऐकून त्या धनगराच्या मुलाने त्याला पोटभर दूध पाजले.

एके समयी बोधिसत्त्व अश्वत्थ वृक्षाखाली मनन करीत बसला असता त्या वनातून नृत्यांगना सतार वाजवीत व गात चालल्या होत्या. त्याच्या गायनाचा आशय असा होता की, 'सतार फार उंच लावू नका व फार नीचही लावू नका, तर ती मध्य लावून वाजवा. म्हणजे आपणाला श्रोत्याची चित्ते हरण करण्यास उशीर लागणार नाही. सतारीची तार फार ताणल्यास ती तुटते व फार ढिली ठेविल्यास तिचा आवाज मंद होऊन त्याची मनोहरता नष्ट होते.' हे गायन बोधिसत्त्वाच्या कानी पडून त्यातला आशय त्याच्या तात्काळ लक्षात आला आणि आपली दृष्टी वर करून त्या स्वैरिणीकडे पाहत तो म्हणाला, 'कधी कधी अगदी मूढ मनुष्याकडूनही शहाण्या मनुष्यास बोध प्राप्त होतो. मी हा माझा जीवितरूप तंतू अतिशयित ताणिला आहे. ज्या चक्षूंच्या योगाने मला सत्यदर्शन व्हावयाचे ते माझे चक्षू मंद झाले आहेत. मला शरीरसामर्थ्याची सांप्रत पराकाष्ठेची आवश्यकता असता ते अगदी क्षीण झाले आहे. तरी मला असे मुळीच करिता कामा नये. मनुष्याच्या ठायी सामान्यत: जे सामर्थ्य असते ते मजमध्ये अवश्य असले पाहिजे.'

या वनाजवळील एका गावात एक मोठा जमीनदार राहत असे. तो मोठा धनाढ्य असून त्याची पुष्कळ गुरेढोरे व चाकरमाणसे होती. त्याच्या स्त्रीचे नाव सुजाता असे

होते. ती स्त्रीसुद्धा मोठी गुणी असून सुशील होती. त्यांची परस्परावर मोठी प्रीती असे; परंतु पोटी संतान नसल्यामुळे त्याला वारंवार खेद होत असे. त्यांनी पुत्र व्हावा म्हणून पुष्कळ नवस व अनुष्ठाने केली होती. पुढे काही वर्षांनी त्याला एक पुत्र झाला. तेव्हा सुजातेने देवास केलेले नवस एकूणएक फेडले. तिच्या गावाजवळील वनाच्या देवास तिने असा नवस केला होता की, मला पुत्र झाला म्हणजे मी वनदेवाला मिष्टान्नांचे भोजन घालीन. हा नवस फेडण्यासाठी अवश्य लागणारी सामग्री घेऊन सुजाता वनाप्रत निघाली. वनदेवाचे ठिकाण झाडून झडपून साफ करण्याकरिता तिने आपली दासी राधा हिला पुढे पाठविले होते. तिने बुद्धाला ध्यानस्थ बसलेला पाहिला आणि ते साक्षात वनदेवच आहे असे समजून ती आपल्या धनिणीस ती गोष्ट सांगण्याकरिता मागे धावत आली. वनदेव प्रत्यक्ष प्रकट झाला आहे असे सांगून सुजातेला घेऊन ती बुद्ध बसला होता त्या जागी आली. सुजातेने त्याचे ते विलक्षण तेज पाहून मनात आणिले की, आपल्या भक्तीने वनदेव प्रसन्न होऊन त्याने आपणास असे साक्षात दर्शन दिले आहे. मग त्याला साष्टांगप्रणिपात करून ती त्याच्या हातावर आपण आणिलेले गोड पदार्थ ठेवू लागली. ते सिद्धार्थाने मुकाट्याने खाल्ले. आपण अर्पण केलेला नैवेद्य देव खातो असे पाहून सुजातेचे हृदय भक्तिरसाने अधिकच भरून गेले आणि त्याला ती एकसारखे खाऊ घालू लागली. त्या देवाचे असे अपूर्व वर्तन पाहून त्या भाविक स्त्रीने त्याला असा प्रश्न केला की, 'महाराज, आपण खरोखरीच वनदेव आहात काय? आणि मी जे अर्पण केले आहे ते देवाला पावले काय?' हे तिचे प्रश्न ऐकून बुद्ध म्हणाला, 'हे तू मला काय म्हणून खाऊ घालीत आहेस?' सुजाता म्हणाली, 'मला पुत्र झाला म्हणजे मी वनदेवाला मिष्ठान्नाचे भोजन घालीन असा नवस केला होता. त्या नवसास पावून देवाने मला हा पुत्र दिला आहे.' असे म्हणून तिने कडेवरचे मूल बुद्धाच्या चरणी ठेविले. त्याने त्याच्या मस्तकास हस्तस्पर्श करून त्याला आशीर्वाद दिला आणि तो तिला म्हणाला, 'बाई, मी काही देव नव्हे. मी तुझ्यासारखाच मनुष्यजातीचा प्राणी असून तुझा बंधू आहे, असे समज. मी एक वेळ राजपुत्र होतो. सांप्रत मी धर्मशोधार्थ हिंडत आहे. जे जीवित अत्यंत कष्टमय आहे असे मला वाटत आहे, यास्तव या संसारातून मुक्त होण्याचा काही तरी योग्य उपाय मी शोधीत आहे. तर हे भगिनी, मला सांग की, तुला या संसारातले सुख पुरेसे वाटते काय?' यावर सुजातेने येणेप्रमाणे उत्तर दिले –

''महाराज, माझी समजूत कोती असून माझी हाव अगदी मर्यादित आहे. माझ्या प्रिय पतीला आरोग्य व दान यांची अनुकूलता सर्वदा असावी आणि हे माझे प्रिय

बालक सुरक्षित राहून आम्हास सर्वकाळ आनंद देणारे व्हावे, एवढीच माझी इच्छा आहे. मी सकाळी उठले म्हणजे पहिल्याने स्नान करून देवाची प्रार्थना करिते आणि दारातील तुळशीला पाणी घालून मग घरातील कामधंद्यास लागते. आमच्या पदरी पुष्कळ दासदासी आहेत. त्यांच्याकडून काम घेण्यात माझा सगळा वेळ जातो. मी माझ्या पतीच्या सेवेत सदैव तत्पर असते. रोज देवळात जाऊन देवदर्शन घ्यावे, असा माझा क्रम आहे. मला माझ्या संसारसुखात काही उणे आहे असे वाटत नाही. आम्ही मेल्यावर आमच्या या पुत्राच्या हस्ते आमचे उत्तरकार्य होऊन आम्हास स्वर्गप्राप्ती होईल. कारण शास्त्रात सांगितले आहे की, जो पांस्थांस मार्गात सावली मिळावी म्हणून वृक्ष लावितो व त्यास जागोजाग प्यावयास पाणी मिळावे म्हणून विहिरी खणतो व ज्याला पुत्रसंतान होते, त्याला मरणोत्तर स्वर्गप्राप्ती होते. या शास्त्रवचनावर माझी पूर्ण श्रद्धा आहे. कारण शास्त्र जे आहे ते मोठमोठ्या देवासमान पुरुषांनी लिहून ठेविले आहे. त्याला नीती काय अनीती काय, सुख काय, असुख काय हे चांगले समजत होते. देवाच्या कृपेने त्याला मंत्रतंत्र सारे मिळाले असे तेव्हा त्यांनी लिहून ठेविले आहे, ते खोटे कसे असेल बरे? माझी तर अशी खात्री झाली आहे की, आपण चांगले काम केले तर त्यापासून चांगला परिणाम होतो आणि वाईट काम केल्याने वाईट परिणाम होतो. या नियमात कोठेही व कोणत्याही काळी बदल व्हावयाचा नाही. जशी चांगल्या झाडास गोड फळे येतात व वाईट झाडास विषारी फळे येतात; तसेच आपल्या अंगच्या बऱ्यावाईट गुणांचे आहे. आपल्या मनात दुसऱ्याविषयी वैर असले तर तो दुसरा आपला द्वेष करितो आणि आपण कोणावर ममता केली असता तो आपणावर उलट प्रीती करितो. त्याचप्रमाणे एखाद्याने आपली आगळीक केली असता आपण तो सोशिल्यास कलहाचे कारण मिटून उभयतांमध्ये सलोखा होतो. याप्रमाणे जर या मर्त्यलोकी अनुभव आहे, तर हा लोक सोडून गेल्यावर आम्हास आमच्या योग्यतेप्रमाणे फळ खचित मिळेल असे मला वाटते. आता या संसारात दु:ख कधी येत नाही असे मी म्हणत नाही. असे प्रसंग मजवर वारंवार येतील हे मी जाणून आहे. हे माझे तान्हे बालक मला सोडून गेले तर मला पराकाष्ठेचे दु:ख होईल. तरी मी ते धैर्याने सोसून पतिसेवेत तिळप्रायही अंतर पडू देणार नाही. त्याची सेवा मी स्त्रीधर्मास अनुसरून आजन्म करीन. याप्रमाणे माझी समजूत असल्यामुळे मला कशाचेही भय वाटत नाही. मला या संसारात नेहमी सुखच वाटत असते. तरी जे हीनदीन आहेत त्यांची दया मला नेहमी येते. त्यांच्या उपयोगी पडण्यास मी सर्वदा तत्पर असते. जे मला चांगले आहेसे वाटते तेच मी करीत असते आणि शास्त्राने जे करावे किंवा करू

नये म्हणून सांगितले आहे, त्याप्रमाणे मी नेहमी वागण्याचा प्रयत्न करीत असते. जे काही घडावयाचे ते घडल्यावाचून कदापि राहत नाही आणि जे चांगले तेच सर्वदा घडावयाचे असे मनात वागवून मी स्वस्थ असते.''

हे तिचे भाषण ऐकून बोधिसत्त्व म्हणाला, 'बाई, तुझे हे साधे व सरळ भाषण बोधाने भरलेले आहे. यापासून मोठमोठ्या शहाण्या म्हणविणाऱ्या लोकांस बोध प्राप्त होण्यासारखा आहे. तुला धर्माचे खरे तत्त्व जरी कळत नाही तरी तुझे कर्तव्य तुला चांगले समजत आहे आणि तुला आपल्या स्थितीमध्ये समाधान वाटत आहे, हे फार चांगले आहे. तू आज माझ्यावर जो हा उपकार केला आहेस, तो मी कधीही विसरणार नाही. या संसारामध्ये लोकांस मोठी आशा वाटून त्याला गुंता का सुटत नाही याचे कारण मला आज तुझ्या भाषणावरून कळले आहे. तर तू आपल्या आयुष्याचे उरलेले दिवस सुखासमाधानाने काढ. मला याहून चांगला असा समाधानाचा मार्ग शोधून काढावयाचा आहे.'

'हा मार्ग शोधून काढण्यात तुम्हाला यश मिळो,' असे बोलून ती आपल्या घरी परत गेली.

याप्रमाणे बोधिसत्त्वाने उरुवेल (याच स्थानास सांप्रत बुद्धगया असे म्हणतात) येथील वनात धर्मतत्त्वाचे चिंतन करण्यात आणखी काही दिवस काढिले. आम्ही मागे सांगितलेच आहे की, देहदंडनमूलक तपश्चरणाने धर्मतत्त्वाचे ज्ञान होऊन चित्तास समाधान व शांतीही प्राप्त होतात, असा जो आर्य धर्म सिद्धांत आहे, त्यात काहीच तथ्य नाही असे त्याने स्वत: अनुभव घेऊन सिद्ध केले. त्याचप्रमाणे देहदंडनाच्या योगाने मानवास अमानुष शक्ती व दिव्यदृष्टीही प्राप्त होतात असा जो सांख्यादि मतवाद्यांचा सिद्धांत आहे तोही व्यर्थ आहे अशी त्याची खात्री झाली. त्याप्रमाणेच त्याला असेही दिसून आले की, मनाची सुस्थिती देहाच्या सुस्थितीवाचून कायम राहणे नाही आणि तपस्व्याचे किंवा सिद्ध म्हणविणाऱ्या पुरुषाचे अनुकरण करून देहाच्या स्वाभाविक गरजा भागविल्या नाहीत तर देहाचे स्वास्थ्य राहावयाचे नाही आणि देहाचे स्वास्थ्य नष्ट झाल्याने मनाचे स्वास्थ्य नष्ट व्हावयाचे. असे झाल्याने धर्मरहस्य समजून घेण्यास व स्वत:स समजलेले तत्त्व अन्य जनास विदित करण्यास अवश्य लागणाऱ्या विवेकादी मनाच्या शक्ती नष्ट होऊन सर्व जीवित व केलेले सर्व कष्ट व्यर्थ जावयाचे. असा विचार करून तो पूर्वोक्त प्रकारे पुनरपि शरीरास जपू लागला. तेव्हा त्याची गेलेली शरीरशक्ती त्यास पुन्हा प्राप्त होऊन बुद्धीची कुशाग्रता

त्याच्याठायी पूर्ववत उद्‌बोध पावली आणि तो निरंजना नदीतीरी एकांत व शांत अशा स्थली तासांचे तास बसून या संसारातील विपत्तीची वास्तविक कारणे कोणती याचे पुन्हा पुन्हा मनन करू लागला. असे सांगतात की, या नदीतीरी एक अश्वत्थ वृक्ष होता. त्याच्या तळी तो बसून हे धर्मचिंतन करीत असे. एके दिवशी एकसारखा अहोरात्र या वृक्षतळी बसून त्याने धर्मतत्त्वविवेक केला. तेव्हा त्यास वास्तविक रहस्याचा बोध होऊन त्याच्या चित्ताची अस्वस्थता नाहीशी झाली. एवढ्या काळपर्यंत त्याने जो शोध चालविला होता त्याला शेवटी यश आल्यामुळे त्यास मोठा आनंद झाला आणि यापुढे आपण काय करावे याविषयी त्याने काही काळ विचार करून शेवटी असा निश्चय केला की, आपणास जे धर्मरहस्यज्ञान झाले आहे, त्याचा उपदेश अन्य जनास करून त्यास संसारदु:खापासून सोडविण्याचा प्रयत्न करण्यात शेष राहिलेले आयुष्य वेचावे.

बोधिसत्त्व ज्या वृक्षाखाली बसला असता त्यास हे रहस्यज्ञान होऊन त्याचे ज्ञानश्च उद्‌बोध पावले, त्या वृक्षास बौद्धधर्मानुयायीजन बोधिवृक्ष (हा वृक्ष अवज्ञेष अद्यापि बुद्धगया येथील देवालयासन्निध आहे. हे देवालय अमरसिंह नामक प्रसिद्ध बौद्धधर्मानुयायी राजाने इ.स. ५०० च्या वर्षी सदरील वृक्षास्थानी बांधिले आहे. या वृक्षाची एक शाख नेऊन सिंहलद्वीपातील अनुराधापूर नामक शहरी इसवी सनापूर्वी तिसऱ्या शतकात लाविली असून, हा वृक्ष अद्यापि जिवंत आहे. या ऐतिहासिक वृक्षाइतका पुरातन वृक्ष दुसरा क्वचितच असेल असे म्हणतात. यास्तव हा वृक्ष त्या धर्माच्या लोकांस परत पवित्र वाटणे साहजिकच आहे. या वेळेपासून शाक्यराजपुत्रास बुद्ध ही संज्ञा प्राप्त झाली. त्याने धर्मतत्त्वबोध चालविला होता. तोपर्यंत त्यास बोधिसत्त्व ही संज्ञा बौद्धग्रंथात दिली आहे, हे आम्ही मागे सांगितलेच आहे.

बुद्धाने तत्त्वशोध करून अवशिष्ट आयुष्य लोकोद्धारार्थ वेचण्याविषयी निर्धार केला त्या समयी त्याच्या चित्तास मोठा मोह प्राप्त झाला. नि:सीम वैराग्यवृत्तीचा अवलंब करून शरीराची शक्ती क्षीण केल्याने काही एक निष्पन्न होत नाही, असे जेव्हा त्याच्या मनात आले तेव्हा अर्थात त्याला स्वगृही परत जाऊन ऐश्वर्यादिकांचा यथेच्छ उपभोग घ्यावा असे वाटणे साहजिकच आहे. भिक्षावृत्ती धारण करून व प्रियजनांचा त्याग करून सर्व आयुष्य रानावनामध्ये काढण्यात काहीएक अर्थ नाही असे त्याच्या मनात येऊन पुनरपि स्वजनसंगतीने आयुष्यव्यय करण्यात बहुत सुख आहे असे त्याला वारंवार वाटल्यामुळे त्याच्या मनाची चलबिचल झाली असावी,

यात संशय नाही; परंतु त्याने या सर्व मोहास यत्किंचितही वश न होता आपला धर्मतत्त्वशोध अप्रतिहतपणे चालविला आणि हा तत्त्वशोध त्याच्या बुद्धीप्रमाणे पूर्ण होऊन त्याच्या चित्तास शांती प्राप्त झाली असता त्याने पूर्वसंकल्पाप्रमाणे स्वनगरीत पुनरपि प्रयाण करावे; परंतु तसे न करिता स्वाभिप्रेत मोक्षमार्गाचा उपदेश अन्य जनास करण्यात शेष जीवित घालविण्याचा निर्धार केला आणि या निर्धाराप्रमाणे त्याने देहावसान होईपर्यंत स्ववर्तनक्रम अबाधित ठेविला. स्वकीयजनप्रेम किंवा ऐश्वर्योपभोगलालसा यांच्या मोहाने त्याच्या चित्तास कदापि व्यामोह झाला नाही. ही गोष्ट ध्यानात आणिली म्हणजे त्याच्या चित्ताची थोरवी व मनुष्यजातीविषयी त्याची अद्वितीय कळकळही चांगली दिसून येते. हा निर्धार करिताना प्रथमारंभी त्याच्या मनात नाना विचार व कल्पना येऊन भिक्षावृत्ती व अखंड वैराग्य वृत्ती आणि राज्याधिकार व ऐश्वर्यभोग यापैकी कोणत्या गोष्टीची निवड करावी याविषयी त्याला बरीच पंचाईत पडली असावी यात शंका नाही; परंतु त्याने राज्याधिकार व ऐश्वर्योपभोग यांचा सर्वस्वी त्याग करून स्वत: शोधून काढलेल्या धर्ममार्गाचा उपदेश इतर जनांस करीत फिरण्याचा जो एक वेळा निश्चय केला तो त्याने कदापि सोडला नाही. या मोहसमयाचे बौद्ध ग्रंथात पुष्कळ लाक्षणिक वर्णन केले आहे. या संसारात जे नानाविध मोहप्रसंग पदोपदी येऊन अनन्वित कर्मे करण्यास मनुष्य प्रवृत्त होतो आणि विपत्ती, रोग व मरण यास पात्र होतो, त्या सर्वांची प्रेरणा करणारी कोणी मारनामक एक व्यक्ती कल्पिली असून, या संसारातील पादमूलक सर्व वासना व दुर्वृत्ती यास या व्यक्तीचे संबंधीजन व सैनिक कल्पिले आहेत. हा मोक्षशत्रू व जगात विपत्ती उत्पन्न करणारा मार आपल्या अनुयायांसह वर्तमान येऊन बोधिसत्त्व बुद्धिद्रुमतळी बसला असता त्यावर हल्ला करितो; परंतु त्याच्या गुलकावण्यास तो मुळीच मोजीत नाही व त्याच्या सैनिकांनी व त्याने स्वत: केलेल्या शस्त्रप्रहरास तो लवमात्रही जुमानत नाही. याप्रमाणे मार याचे सर्व उपाय व्यर्थ होऊन तो निघून जातो आणि बोधिसत्त्व अश्वत्थ वृक्षतळी अढळ व निश्चल बसून धर्मतत्त्वविवेक करितो. शेवटी त्यास रहस्यज्ञान होऊन बुद्धत्व प्राप्त होते आणि मग सर्व जगाच्या गुरुत्वाचा अधिकार त्यास प्राप्त होतो. याप्रमाणे हे जे लाक्षणिक वर्णन केले आहे त्यावरून गौतमबुद्धाच्या मनात कोणकोणत्या परस्परविरुद्ध कल्पना येऊन त्यांचे युद्ध चित्तरूप समरभूमीवर होऊन शेवटी नि:सीम वैराग्य वृती, अखंड उज्ज्वल नीती आणि अप्रतिम परोपकार बुद्धी यांचा जय कसा झाला याचे निदर्शन होते. आजपर्यंत ते महान महान साधुपुरुष धर्म जिज्ञासेस वश होऊन तत्त्वशोध करण्यास प्रवृत्त झाले आणि स्व बुद्धयनुरूप ज्यांनी तत्त्वशोध केला, त्यांनी त्या

तत्त्वाचा बोध इतर जनांस करून देण्याचा निर्धार केला असता त्यांच्या चित्तात असेच संसारमूलक दुर्वृत्तीचे व वैराग्य वृत्तीमूलक सद्‌वृत्तीचे तुमूल युद्ध झाले आहे, असाच प्रकार बुद्धाच्या चित्ताचा झाल्यास त्यात काही नवल नाही. आता या आध्यात्मिक युद्धाचे भाविक जनांनी रूपकालंकारादिकांच्या साह्याने वर्णन करून सामान्य जनांच्या अचित्तवृत्तीस आल्हाद व बोध हे दोन्ही प्राप्त करून देण्याविषयी प्रयत्न केल्यास त्यात काही वावगे नाही. कवीच्या वृत्तीस ही गोष्ट केवळ अनुरूपच होय; परंतु या लाक्षणिक वर्णनास सत्यवत मानून स्वधर्ममार्गामध्ये वेडे वेडे आचार व कल्पना चालू देणे नीट नव्हे. असे आहे तरी जगातील बहुतेक मोठमोठ्या धर्मात हा अनिष्ट प्रकार पुष्कळ आढळतो. यापासून विवेकशील पुरुषांनी दूर राहावे हे इष्ट होय.

या धर्मत्वप्राप्तीनंतर गौतमबुद्धाच्या मनाची स्थिती कशी झाली याचे वर्णन पुढे एके समयी त्याने स्वशिष्यापाशी येणेप्रमाणे केले आहे – ''मला ही रहस्यप्रतीती घडून माझे ज्ञानश्च उन्मीलित झाले, तेव्हा माझा जीव वासनामूलक अनिष्टापासून मुक्त झाला. ऐहिक जीवनाच्या अनर्थापासून मुक्त झाला, अज्ञानमूलक क्लेशापासून मुक्त झाला, मनमूलक उद्वेगापासून मुक्त झाला. याप्रमाणे मुक्तता झाली तेव्हा या मुक्त स्थितीचे ज्ञान व महत्त्वही माझ्या चित्ताच्या ठायी पूर्णपणे प्रतीत झाले आणि माझी अशी खात्री झाली की, माझा संसृतिपाश भंग पावून माझ्या एरझारा आटोपल्या आणि मी कृतकृत झालो.''

या समयी त्याला जे धर्मरहस्य कळले त्याचा सारांश बुद्धाने आपल्या शिष्यजनांस पुढे एके प्रसंगी सांगितला. त्याचे निरूपण येथे संक्षेपाने करू. बुद्धाच्या एकंदर धर्ममतांचे व्यवस्थित व साद्यंत विवेचन पुढे एका स्वतंत्र भागात करावयाचे आहे.

त्याने आपल्या मनात असे आणिले की, 'सारे जग चक्राप्रमाणे परिभ्रमण करीत आहे. हा संसार केवळ नि:सार आहे. अखिल प्राणी बऱ्यावाईट कर्माच्या योगाने उच्च–नीच स्थितीप्रत जातात. जे सत्कर्म करितात ते सद्‌गती पावतात आणि जे दुष्कर्म करितात ते दुर्गती पावतात. या जगामध्ये जी नानाविध विपत्ती व पीडा दृष्टीस पडते, ती सारी पूर्वकर्माचे फल होय. कर्मप्रवृत्तीच्या व वासनामूलक बंधनाच्या योगाने प्राण्यास पुन्हा पुन्हा जन्म व मरणही प्राप्त होतात. ज्याला जन्म प्राप्त झाला त्याला व्याधी व मरणही अवश्य प्राप्त व्हावयाचे. जीवितप्रीतीच्या योगाने पुनरपि जन्म प्राप्त होतो. जीवितप्रीती तृष्णेमुळे उद्‌भवते. तृष्णा वेदनेच्या योगाने उद्‌भवते. स्पर्शाच्या योगाने उत्पन्न होते. स्पर्श हा इंद्रियाच्या योगाने उत्पन्न होतो. इंद्रिये नामरूपाच्या

योगाने निर्माण होतात. नामरूप विज्ञानाच्या योगाने उद्‌भवते. विज्ञान संस्कारांच्या योगाने उत्पन्न होते. संस्कार अविद्येच्या योगाने उद्‌भवतात. याप्रमाणे या जगातील सर्व दुःखाची कारणमीमांसा आहे. यास्तव रोग, विपत्ती व मरण यापासून ज्यास मुक्त व्हावयाचे असेल त्याने जन्मापासून मुक्त व्हावे. जीवितप्रीती नष्ट झाल्याने जन्म प्राप्त होत नाही. तृष्णेचा निरोध केल्याने जीवितप्रीती निर्मूल होते. स्पर्शनिरोध केल्याने वेदना उद्‌भवत नाही. षडिंद्रियनिरोध केल्याने स्पर्शनाश होतो. नामरूपनिरोधाने षडिंद्रिये उत्पन्न होत नाहीत. विज्ञानाच्या निरोधाने नामरूपाचा निरोध होतो. संस्काराचा निरोध केल्याने विज्ञान उत्पन्न होत नाही. अविद्येचा निरोध केल्याने संस्कार निर्माण होत नाहीत. यावरून पाहता सर्व दुःखसंबंधाचे मूळ अविद्येत आहे. यास्तव ज्यास संसृतीपासून मोक्ष व्हावा असे वाटत असेल, त्याने अविद्येचा निरोध करावा.'

याप्रमाणे तत्त्वशोध केल्यावर बुद्धाने बुद्धिद्रुमासन्निध आणखी अठ्ठावीस दिवस राहून मनन व चिंतन केले. असे सांगतात की, सगळे दिवस त्याने उपवास करण्यात घालविले. यावेळी त्याच्या मनात असा आणखी एक विचार आला की, आपणास जे हे तत्त्वज्ञान प्राप्त झाले आहे त्यात तृप्ती मानून कोठे तरी स्वस्थपणे राहावे आणि शेवटी हा लोक सोडून जावे. तरी पुन्हा त्याच्या मनात असे आले की, मी या संसृतिपाशापासून मुक्त होऊन निर्वाण पावेन; परंतु हे माझे बांधव, जे अविद्यावश होऊन निपत्तीत रखडत आहेत, त्यांची सोडवणूक कोण करील बरे? तर उरलेले आयुष्य त्यांच्या उद्धारार्थ वेचावे यातच आपल्या जीविताचे व आजपर्यंत केलेल्या धर्मशोधाचे सार्थक्य आहे असा संकल्प करून त्याने आपणास प्राप्त झालेल्या धर्मरहस्याचा बोध जनांस आमरण केला. त्याचे वर्णन पुढील भागात करू.

# भाग पाचवा
# धर्मोपदेश

**सुतृषित नरपरू जिनगुणरहिता । त्वयी मतिप्रतिबल अमृतरसददा ।।**
**दशबलगुणधर बुधजनमहिते । लघु त्वयि नरपति विभजति अमृत ।।१।।**

मर्त्यजन फार तृषित झाले आहेत. यांच्या अंगी बुद्धाचे गुण नाहीत. तुझ्या ठायी बुद्धी, प्रीती आणि बल ही वसत आहेत. तू धर्मरूप अमृतरस जनांस अर्पण करण्यास समर्थ आहेस. तुझ्या ठायी दहा गूढ शक्ती आहेत. तू बुधजनांत पूज्य आहेस. तर हे श्रेष्ठ पुरुष, मोक्षमार्गाचा लाभ या जनांस त्वरित करून दे.

**– ललितविस्तर**

मागील भागात सांगितल्याप्रमाणे गौतमबुद्धाने स्वसंमत धर्मतत्त्वाचा प्रसार करण्याचा संकल्प करून उरुवेल येथून प्रयाण केले. या समयी वय सुमारे पस्तीस वर्षांचे होते. तो पितृगृहत्याग करून निघाला तेव्हा त्याचे वय अठ्ठावीस वर्षाचे असावे असे म्हणतात आणि गृहत्याग केल्यावर धर्मतत्त्वशोधात त्याने सात वर्षे घालविली.

आपण शोधून काढलेला निर्वाणमार्ग केवळ सत्य असून त्याचे अनुसरण इतर जनांनी केले असता त्यास आपल्यासारखीच शांती प्राप्त होऊन निर्वाणसिद्धी घडेल, असे त्याला मनापासून वाटत होते. म्हणून केवळ जनहितबुद्धीने स्वमतप्रसार करण्यास तो प्रवृत्त झाला होता. आपला शिष्यसमुदाय वाढवून आपले स्तोम जनात माजविण्याची इच्छा त्याच्या मनात कधीही आली नाही. हे त्याच्या पुढील चरित्रावरून पूर्णपणे लक्षात येईल.

पूर्वोक्त प्रकारे स्वमतप्रसार करण्याचा निर्धार करून तो निघाला असता त्याची एका ब्राह्मणाशी गाठ पडली. तो ब्राह्मण मोठा उद्धट होता. त्याने गौतमबुद्धाशी काही वेळ वादविवाद करून शेवटी त्यास असा प्रश्न केला की, 'हे गौतमा, ब्राह्मण कोणास म्हणावे? व त्याच्या अंगी कोणकोणते गुण असावे लागतात?' बुद्धाने उत्तर केले, 'ज्याने आपल्या ठायीची पापवासना काढून टाकिली आहे, जो कोणाचाही कधी तिरस्कार करीत नाही, ज्याचे आचरण परम शुद्ध असते, ज्याने आत्मजय केला आहे, त्यास ब्राह्मण म्हणावे.' असे सांगून त्याने त्या ब्राह्मणास म्हटले की, 'तू ब्राह्मणपणाची

कितीही शेखी मिरविलीस तरी तुझ्या अंगी हे गुण आले नाहीत तोपर्यंत तुला मी ब्राह्मण म्हणणार नाही.' या उत्तरात बुद्धाने असे गर्भित केले की, मनुष्य कोणत्याही वर्णात उत्पन्न झाला असला व त्याने कितीही बाह्य धर्मविधी केले असले, तरी त्याचे अंत:करण शुद्ध होऊन त्याच्या ठायी नीतिमत्ता विकास पावल्यावाचून त्यास श्रेष्ठत्व प्राप्त होत नाही.

त्या ब्राह्मणास याप्रमाणे निरुत्तर करून गौतमबुद्ध पुढे चालला असता त्याला दोन मोठे धनाढ्य व्यापारी भेटले. त्यांनी त्याला साष्टांग प्रणिपात केला आणि आपणासाठी शिजविलेले अन्न त्यास खाऊ घातले. ते त्याने आपल्या कमंडलूत घेऊन खाल्ले आणि त्यास आशीर्वाद दिला. हा कोणी मोठा साधू आहे असे त्यास वाटून त्यांनी त्याच्यापाशी अशी विनंती केली की, 'साधूमहाराज, आम्ही अगदी मूढ संसारी जन आहोत. तरी आपण आम्हास धर्मोपदेश करून आपले शिष्य करावे. आपण जे काही सांगाल त्यावर आम्ही पूर्णपणे श्रद्धा ठेवून चालू.' याप्रमाणे त्यांनी स्वश्रद्धा निवेदन केली. तरी या वेळी बुद्धाने स्वधर्ममताचा उपदेश त्यास केल्याचे कोठेच लिहिलेले नाही. यावरून असे दिसते की, बुद्धाने लोकोपकारार्थ धर्मबोध करण्याचा निर्धार केला होता, तरी हा बोध सामान्य जनास कोणत्या प्रकारे केला असता सुगम होईल याविषयी त्याच्या मनात अजून निश्चय झाला नव्हता. त्याच्या मनाची यावेळी कशी काय स्थिती झाली होती, याचे वर्णन एके ठिकाणी स्पष्टपणे केले आहे. ते येथे उतरून घेऊ.

''बुद्धाने एकांतात बसून आपल्या मनाशी असा विचार केला की, हे जे गहन तत्त्व मला कळले आहे, ते इतर जनांस समजण्याची अडचण पडेल. हे शांतिप्रद आहे खरे; परंतु हे सामान्य जनाच्या विचारशक्तीस सहसा विषय होणारे नव्हे. हे केवळ ज्ञात्या पुरुषास समजण्यासारखे आहे. या संसारामध्ये निमग्न होऊन त्यात सर्वदा रमून जाणाऱ्या मनुष्यास हे चांगलेसे समजणे नाही असे आहे, त्यापेक्षा हे माझे मत त्याला शिकविण्याचा मी प्रयत्न करून तो व्यर्थ गेला असता मला विनाकारण शीण प्राप्त होईल. असा विचार त्याच्या मनात येऊन त्याला वाटले की, आपण कोठे तरी गिरीकुहरामध्ये स्वस्थ बसून उरलेले आयुष्य घालवावे. तरी पुन्हा त्याने असे मनात आणिले की, हे जग अज्ञानांधकारात निमग्न झाले आहे. याचा सर्वप्रकारे नाश होत आहे. तेव्हा याचा उद्धार करावा, हे माझे परम कर्तव्य होय. यापासून मला पराङ्मुख होता येत नाही.

पुढे त्याने आणखी असे मनात आणिले की, या जगामध्ये सर्वच जन काही पापाचारी नाहीत. जसे काही जन पापी आहेत; तसेच काही पुण्यवानही आहेत;

त्याचप्रमाणे जसे काही मूढ आहेत तसे काही बुद्धिवानही आहेत; जसे काही नीच वृत्तीचे आहेत तसेच काही उदारही आहेत; जसे काही वाईट श्रोते आहेत, तसेच काही सच्छेते आहेत, जसे काही धर्महीन आहेत तसेच काही स्वतःची भावी स्थिती व पाप याविषयी भीती बाळगणारे आहेत. यास्तव आपले धर्ममत सर्वांस सांगत राहावे हेच इष्ट दिसते. मोक्षाचे द्वार सर्वांस उघडून ठेवावे. ज्याला कान आहे ते सर्व माझा धर्मबोध खुशाल ऐकोत. ज्याला माझे सांगणे खरे वाटेल, ते मजवर हवा तर विश्वास ठेवून मोक्ष पावतील. याप्रमाणे सर्व संशयापासून मुक्त होऊन बुद्धाने स्वधर्ममताचा उपदेश करण्यास आरंभ केला.

आपण शोधून काढलेला मोक्षमार्ग प्रथमतः आपल्या दोघा गुरूंस विदित करावा असा त्याने बेत केला. हे दोघे गुरू अराट आणि उद्रक हे होत; परंतु हे दोघेही या वेळी मरण पावले होते. तेव्हा त्याने असा निश्चय केला की, पूर्वी उरुवले येथे ज्या पाच तपस्व्यांसहवर्तमान देहदंडनमूलक तपश्चरण आपण केले, त्यास हा आपला शोध कळवावा. ते तपस्वी त्यावेळी काशीस राहत असत. त्यांच्याकडे बुद्ध गेला. त्याला आपणाकडे येताना लांबून पाहून ते आपापसात कुजबुजू लागले की, ‘तो पाहा गौतम येत आहे. त्याने आपला धर्मशोध सोडून यथेच्छा आहारविहार करण्याचा क्रम चालविला आहे, तर आपण त्याचा मान मुळीच ठेवू नये. तो जवळ आला असता आपण त्यास उत्थापन देऊ नये. पूर्वी जसे आपण त्याची शुश्रूषा करीत असो, तसे आता काहीच करू नये. तो आला म्हणजे त्याला फार तर बसण्यासाठी दर्भासन देऊ. त्यावर तो पाहिजे असल्यास बसेल.’ परंतु बुद्ध त्यांच्याजवळ आला तेव्हा ते अगदी दिपून जाऊन आपले सर्व बेत विसरले. त्यांनी त्यास जवळ आलेला पाहताच खडी ताजीम घेतली. कष्टाने त्याच्या हातचा कमंडलू (भिक्षापात्र) व अंगावरचा झगा घेतला. दुसऱ्याने त्याच्यासाठी आसन आणून मांडले. तिसऱ्याने त्याला हातपाय धुण्यासाठी पाणी आणून दिले. बुद्धाने आसनावर बसून आपले पाय धुतले. मग त्यांनी त्याला कुशल प्रश्न विचारले व त्याची त्याने यथोचित उत्तरे दिल्यावर तो म्हणाला–

‘हे महंत हो, मला जन्ममरणापासून मुक्त होण्याचा मार्ग सापडला आहे. तुमची इच्छा असल्यास तुम्हाला माझा शोध मी निवेदन करितो. मी सांगतो त्याप्रमाणे वागाल तर तुम्हास अत्युत्तम फल प्राप्त होईल, की ते प्राप्त व्हावे म्हणून मोठमोठे धर्मशील पुरुष गृहत्याग करून व नाना क्लेश सोसून धर्मसंग्रह करीत असतात. मी सांगतो ते चित्त देऊन ऐकाल तर धर्माचे खरे रहस्य काय आहे ते तुम्हास याच जीवितात प्रत्यक्ष ज्ञात होईल.’

हे त्याचे भाषण ऐकून ते महंत म्हणाले, 'हे मित्रा गौतमा, तू पूर्वी आमच्याबरोबर राहून देहदंडन करून धर्मज्ञान प्राप्त करून घेण्याचा उद्योग चालविला होतास; परंतु त्यात तुला काही एक यश प्राप्त झाले नाही तर त्या मार्गाचा अव्हेर करून यथेच्छ आहारविहार करीत असता व पूर्वीचा सर्व देहदंडन क्रम त्वा अगदी सोडून दिला असता तुला धर्मरहस्य शोधून काढण्याचे सामर्थ्य व योग्यता ही कशी प्राप्त झाली बरे? या गूढ तत्त्वाचे चिंतन करण्याची बुद्धी तुला कशी प्राप्त झाली?

या त्याच्या प्रश्नास गौतमाने एवढेच उत्तर दिले की, 'तपश्चरण सोडल्यावर मी काही यथेच्छ आहारविहार करण्यात दिवस घालविले नाहीत. तर मी आजपर्यंत एकसारखा धर्मतत्त्वशोध चालविला होता. हा तत्त्वशोध मला लागला असून मला खरे रहस्य समजले आहे. ते तुम्ही समजून घेऊन तदनुसार स्ववर्तन ठेवाल तर मजप्रमाणे शांतिसुखाचा अनुभव घ्याल व या संमृतीपाशापासून सर्वस्वी मुक्त व्हाल.'

हे त्याचे खात्रीचे भाषण ऐकून ते मनात म्हणाले की, हा ज्याअर्थी एवढा आग्रह करीत आहे त्याअर्थी तो काय म्हणतो ते चित्त देऊन ऐकावे आणि ते यथार्थ वाटल्यास त्याप्रमाणे वागण्यास झटावे.

याप्रमाणे ते महंत त्याचा बोध ऐकण्यास तयार झाले. तेव्हा त्याने त्यांच्याशी येणेप्रमाणे संभाषण केले. तो म्हणाला–

''हे महंत हो, ज्याला धर्मशील व्हावयाचे आहे त्याने दोन परस्परविरुद्ध गोष्टींपासून दूर राहावे. एक अशी की, त्याने ग्राम्य सुखलालसा धरून विषयासक्त होऊ नये. असे केल्याने आपणास नीचता व हीनता प्राप्त होते. आपल्या आध्यात्मिक उन्नती यापासून प्रत्यवाय घडतो आणि हे सारे विषय केवळ असार असल्या कारणाने त्याचा हव्यास मुमुक्षजनांनी धरणे कदापि युक्त नव्हे. दुसरी गोष्ट अशी की, त्यांनी धर्मसिद्धीसाठी देहदंडन करू नये. असे केल्याने आपली चित्तवृत्ती उदास होते व आपल्या जातिस्वभावास हा क्रम सर्व प्रकारे प्रतिकूल असून त्यात काहीच तथ्य नाही. या दोन्ही गोष्टीपासून मी स्वत: दूर राहून त्याच्या मधला मार्ग शोधून काढला आहे. या मार्गाच्या योगाने ज्ञानश्च उन्मीलित होऊन चित्तभूमीवर सत्यरूप सूर्याचा प्रकाश पडतो आणि मग मनुष्यास शांती, ज्ञान व प्रकाश प्राप्त होऊन तो निर्वाणपदवीस जातो. हा मार्ग अष्टविध आहे. हे आठ प्रकार येणेप्रमाणे होत. योग्य विश्वास, योग्य संकल्प, योग्य भाषण, योग्य आचरण, योग्य जीवितक्रम, योग्य प्रयत्न, योग्य विचार आणि योग्य एकाग्रता. जन्म, जरा, व्याधी व मरण यापासून विपत्ती उत्पन्न होते. ज्या मनुष्याविषयी आपल्याठायी

स्नेहभाव उत्पन्न होत नाही त्याच्याशी संबंध घडून येणे ही विपत्ती होय. ज्याविषयी आपल्या चित्तात प्रेम वसत असते त्याचा वियोग घडल्याने आपले चित्त उद्विग्न होते. ज्याची आपण लालसा धरितो ते प्राप्त झाले नाही तर आपले चित्त क्लेश पावते. ही सर्व विपत्तीची कारणे होत.

''आता ही विपत्ती कशी उत्पन्न होते ते सांगतो. जीविततृष्णेमुळे पुन्हा पुन्हा जन्म प्राप्त होतात. ग्राम्य विषयोपभोगांविषयीची लालसा आणि वासना याच्यामुळे या संसृतिपाशात प्राणी गुरफटलेला असतो. विषयोपभोगतृष्णा, जीविततृष्णा आणि अधिकारतृष्णा यामुळे हा संसार प्रिय वाटतो.

आता या विपत्तीचा नाश कसा करावा हे सांगतो. वासनेचे निर्मूलन पूर्णपणे केल्याने तृष्णेचा नाश होतो. वासनात्याग करण्याविषयी सर्वदा प्रयत्न करावा. ती चित्ताच्या ठायी उद्‌भवली असता तिचा तेथून नायनाट करावा. तिचा आपणास यत्किंचितही संपर्क होऊ देता कामा नये. तिला चित्ताच्या ठायी मुळी अवकाशच राहू देऊ नये. याप्रमाणे वासनाक्षय करून तृष्णा व तन्मूलक विपत्ती यापासून मुक्त होण्याचा अष्टांगमार्ग आहे.

याप्रमाणे हे महंतहो, मला विपत्ती होण्याचा मार्ग सापडला आहे. हे मार्गज्ञान माझ्या ज्ञानश्चस स्पष्टपणे विषय झाले आहे, हे ज्ञान यापूर्वी कोणासही अवगत झाले नव्हते. या ज्ञानाच्या योगाने माझी विवेकशक्ती, माझी प्रज्ञा, माझी अंतर्ज्ञानशक्ती, माझे ज्ञाननेत्र विकास पावून उज्ज्वल झाले आहेत.

विपत्तीचे अस्तित्व, विपत्तीचे कारण, विपत्तीपासून मुक्ती आणि या विपत्तीपासून मुक्त होण्यासाठी अष्टांगमार्ग ही चार आर्य सत्ये होत. ही प्रत्येकास समजणे इष्ट आहे. मला ती समजली आहेत. हे महंत हो, याप्रमाणे माझा विवेक, माझी ज्ञानशक्ती, माझे अंतर्याम, माझे ज्ञानश्च उन्मीलित झाले आणि माझ्या बुद्धीचा निश्चय झाला की, मला या विश्वातील विपत्तीचे पूर्ण ज्ञान होऊन मी कृतकृत्य झालो. मला सत्यनिर्वाणाची प्राप्ती झाली.

या आशयाचे भाषण बुद्धाने केले असे म्हणतात. हा काशी येथील पहिला धर्मोपदेश म्हणून प्रसिद्ध आहे. येथून पुढे बुद्धाने स्वसंस्कृत धर्मचक्रपरिवर्तनास आरंभ केला. या उपदेशात बुद्धसंमत धर्ममार्गाचे सार अतिसंक्षेपाने निर्दिष्ट केले आहे. याच समयीचा बोध बुद्धचरित नामक ग्रंथामध्ये बुद्धघोषनामे करून एका बुद्धानुयायी पंडिताने तो

लिहून ठेविला आहे. त्याचे सार येथे निवेदन केल्यास बुद्धाच्या बोधपद्धतीचे अल्पमात्र दिग्दर्शन होऊन त्याच्या धर्माचे तत्त्व वाचकाच्या ध्यानात येईल. हे सार येणेप्रमाणे आहे–

''हे भिक्षुजनहो, इंद्रिये स्वाधीन ठेवण्याच्या संबंधाने दोन अतिशयित परस्परविरुद्ध असे मार्ग जनांत प्रचलित आहेत. एक असा की, ग्राम्य विषयसुखाचे अतिरिक्तपणे सेवन करून इंद्रियशांती करू पाहणे आणि दुसरा देहास नानापरी क्लेश व दु:ख होईल अशा व्रतोपवासादी तपश्चरणाच्या मार्गाचे अवलंबन करून इंद्रियदमन करू पाहणे; फरंतु हे दोन्ही मार्ग अत्यंत निषिद्ध व निरर्थक होत. यात खऱ्या ब्रह्मचर्यास, वैराग्यास किंवा इंद्रियनिग्रहास काही एक उपयोग होत नाही. यापासून निर्वेद म्हणजे औदासीन्य, निरोध म्हणजे मोहनिवृत्ती आणि मुक्तीही प्राप्त होत नाही. यापासून सत्यज्ञान, बोध व निर्वाण ही कदापि प्राप्त व्हावयाची नाहीत. तपश्चरणादिकांचे अवलंबन करून देहास क्लेश व दु:ख देण्यात यत्किंचितही अर्थ नाही अशी माझी खात्री झाली आहे. या संसारातील किंवा आमुष्मिक जे सुख–दु:ख त्याविषयी मी बेफिकीर झालो आहे. मला मोक्षाचा एक मध्यम मार्ग सापडला आहे. त्याचा बोध सर्व जगास करण्याचा मी दृढ संकल्प केला आहे.''

''मी जो धर्ममार्ग शोधून काढला आहे. त्यात प्रारंभी चार आर्य सत्य असून तो अष्टांग आहे. या मार्गाच्या योगाने मोक्षसाधक ज्ञान प्राप्त होईल. या मार्गाचे निश्चयाने अवलंबन व्हावयास मनोनिग्रहाची अत्यंत आवश्यकता आहे. आचरणासंबंधी सर्व निर्बंधाचा आधार मनोनिग्रहावर आहे. जीवित कायम आहे तोपर्यंत मी निर्दिष्ट अष्टांगमार्गाने केलेल्या धैर्याने व निश्चयाने चालावे, म्हणजे नि:संशय निर्वाणसिद्धी होईल.''

''कोणी म्हणतात की, स्वधर्माप्रमाणे वागले असता या संसाराचे सार्थक्य होते. कोणी सांगतात की, देहावसानानंतर आत्म्याचे रक्षण झाले असता त्यामुळे मोक्ष प्राप्त होतो. कोणी बोलतात की, हे सर्वकाही स्वाभाविक आहे. कोणाचे असे म्हणणे आहे की, हे पूर्वकृत कर्माचे फल आहे. कोणी तर असे प्रतिपादन करितात की, हे सारे ईश्वराधीन आहे. जर आत्म्याच्या दैवयोगाप्रमाणे पुण्य आणि पापही उत्पन्न होतात हे खरे म्हणावे, तर मनुष्य पुण्यकर्मा नसला तरी दैववान का असू नये? या संसारामध्ये रूपगुणसंपन्नता, धनाढ्यता, सुखानुभव इत्यादी गोष्टीच्या संबंधाने जो एवढा भेद आढळतो त्याचे कारण काय असावे बरे? पूर्वकर्म नाही म्हणावे तर येथे इष्टनिष्टांचा

अनुभव कसा घडतो? पूर्वकर्माच्या अनुरोधाने आपल्या हातून या संसारात बरी-वाईट कर्मे होतात असे मानण्यात कितपत तथ्य आहे बरे? इष्टापासून जर इष्ट उत्पन्न होते म्हणावे तर अनिष्टापासून अनिष्ट उत्पन्न होते म्हटले पाहिजे. तेव्हा दुष्कर व अनिष्ट असे जे तप त्यापासून इष्ट जो मोक्ष तो कसा प्राप्त व्हावा? कोणी अप्रबुद्ध जन असे म्हणतात की, या सर्व सृष्टीचे कारण ईश्वर आहे; परंतु ईश्वराने जर सर्व सृष्टी उत्पन्न केली म्हणावे तर ती इतकी विसदृश का असावी? कारण समान कारणापासून समानच कार्यसिद्धी झाली पाहिजे. याप्रमाणे आस्तिक व नास्तिक व्यर्थ वाक्कलह माजवून स्वतःच्या दुष्कर्माच्या योगाने या दुःखमय संसारामध्ये रखडत असतात. ज्यांचे विचार चांगले असतात व ज्यांचे आचरण शुद्ध असते आणि त्याचप्रमाणे जे काया, वाचा व मन यांचे संयमन करितात, त्यास सत्यज्ञानाचा लाभ होऊन ते चांगल्या लोकाप्रत जातात. या संसारात रमून जातात त्यास सहस्त्रशः क्लेश प्राप्त होतात याविषयी प्रतिपादन करणारे पुष्कळ आहेत; परंतु या संसारापासून सर्वतोपरी निवृत्त होऊन जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त होण्याचा उपाय एकासही ठाऊक नाही.''

''हा देह पंचस्कंधात्मक असून पंचभूतांपासून उद्‌भवला आहे. हा केवळ शून्यवत असून याच्या ठायी आत्मा नाही. या संसृतींची उत्पत्ती एका कार्यकारणसंघात (यास बौद्धसंमत धर्मग्रंथात प्रतित्यसमुत्पाद म्हटले आहे.) झाली आहे. या कार्यकारणसंघाचा निरोध करावा तेव्हा या संसारापासून निवृत्ती होऊन जन्ममरणादिकापासून अक्षयींची मुक्ती होते. आता या कार्यकारणसंघाचे यथाक्रम प्रतिपादन करितो, ते चित्त निर्मल व एकाग्र करून ऐका. या संसाररूप विषवृक्षाच्या मुळाशी अविद्यावासना आहे. ह्या अविद्यावासनेच्या योगाने संस्कार उत्पन्न होतात. संस्काराच्या योगाने काया, वाचा व मन ही उत्पन्न होऊन विज्ञान उद्‌भवते. विज्ञानाच्या योगाने पंच ज्ञानेंद्रिये व अंतरिंद्रिय जे मन ते अशी सहा इंद्रिये उत्पन्न होतात. यापासून नामरूप उत्पन्न होते. याप्रमाणे नामरूपात्मक शरीर उद्‌भवले म्हणजे सहा इंद्रियांची स्थाने उत्पन्न होतात. या इंद्रियांचा बाह्य विषयांशी संबंध झाला म्हणजे त्यास स्पर्श असे म्हणतात. या सहा इंद्रियांच्या स्पर्शाच्या अनुभवास वेदना असे म्हणतात. या वेदनेपासून तृष्णा उत्पन्न होते. तृष्णेमुळे उपादान म्हणजे सतत जीवन प्रीती उत्पन्न होते. प्रीतीमुळे कामनादिकांचा उद्‌भव होतो. उपादानापासून भव उत्पन्न होतो. हा भव काम, रूप किंवा अरूप एतद्रूप असतो. या भवामुळे नाना योनीप्रत जावे लागते. यास जाती असे म्हणतात. या जातीपासून जरा, मरण, शोक आदिकरून उद्‌भवतात. तेव्हा या अनिष्टांचे निवारण

करावयाचे असल्यास ह्या कार्यकारणसंघाचा क्रमाने निरोध केला पाहिजे, याप्रमाणे हे संसृतिचक्र आहे. हे पुन्हा पुन्हा परिवर्तन पावून प्राणिमात्रास रोगजरामरणादिकांपासून क्लेश सोसावे लागतात. तेव्हा यापासून योग्य मार्गाने मुक्त होऊन सर्व अस्तित्वापासून विराम पावावे. तर हे महंतहो, भवबंधापासून मुक्त होण्यास साधनीभूत असे हे ज्ञान प्राप्त करून घेऊन सर्व दुःखाचे मूळ जी अविद्या, तिचे प्रयत्नेकरून छेदन करावे. याप्रमाणे भवबंधनापासून मुक्तता होऊन तुम्ही निर्मल व्हाल. मग तुम्हास अर्हत ही पदवी प्राप्त होऊन तुम्ही निर्वाणाचे अधिकारी व्हाल.''

हे त्याचे धर्मतत्त्व ऐकून त्या महंताची चित्तवृत्ती प्रसन्न होऊन आपणास याच्यापासून मोक्षसाधक सत्यधर्मप्राप्ती खास होईल असे त्याला वाटले; फरंतु त्यांनी त्याच्या धर्ममार्गाचे अवलंबन करण्यापूर्वी त्याच्याशी पुष्कळ वादविवाद करून आपल्या संशयाचे निवारण करून घेतले असे म्हणतात. या पाच महंतांमध्ये **कौन्डिन्यनामक** एक महंत होता. त्याने बुद्धाचे शिष्यत्व पहिल्याने पत्करिले. म्हणून यास **प्रथम बुद्धशिष्य** म्हणतात. याला बुद्धाचा धर्मोपदेश उत्तम प्रकारे समजला असल्याकारणाने याला आज्ञातकौन्डिन्य असे म्हणत असत. या पाच असामींपैकी एकाने अशी शंका घेतली की, तपश्चर्या केल्यावाचून मोक्षसिद्धी कदापि व्हावयाची नाही. या शंकेचे समाधान बुद्धाने येणेप्रमाणे केले: ''तपश्चर्चा करण्यामध्ये काहीच अर्थ नाही, असे मला स्वानुभवावरून कळून आले आहे. तरीपण मनुष्याने याच्या उलट सर्व जगाच्या सामान्य प्रवृत्तीप्रमाणे ऐहिक सुखोपभोगामध्ये गुंग होऊन जाऊ नये. त्याचप्रमाणे ऐशआरामाचे विषय प्राप्त करून घेण्याचा किंवा द्रव्यादी संपादनाच्या खटपटीस बिलकूल लागू नये. तर या दोन्ही क्रमाच्या मधला मार्ग मनुष्याने धरावा हे उत्तम. केवळ मांसमत्स्यादियुक्त अन्नाचे सेवन करण्यापासून निवृत्त झाल्याने किंवा दिगंबरवृत्ती धारण केल्याने किंवा जटा वाढवून किंवा मुंडन करून काषायवस्त्रे परिधान केल्याने किंवा राख-माती वगैरे अंगास फासल्याने किंवा पंचाग्निसाधन केल्याने मनुष्याचे चित्त निर्मळ होईल असे कोणी कदापि समजू नये. तर केवळ अविद्यामूलक मोहापासून तो निवृत्त झाला पाहिजे. श्रुतिपठण केल्याने दक्षिणादिकेकरून ब्राह्मणतर्पण किंवा प्रज्ञादिकेकरून देवतार्पण केल्याने किंवा शीतोष्णादिकाच्या सेवनाने देहदंडन केल्याने किंवा अमरत्व प्राप्त होण्यासाठी इतर तपश्चर्या केल्याने मनुष्यास मोक्षप्राप्ती होत नाही तर तो अविद्यामूलक मोहापासून मुक्त झाला पाहिजे. क्रोध, अहंपणा, मोह, मत्सर, आत्मस्तुती , परनिंदा, उद्दामत्व, दुर्बुद्धी, दुराग्रह, दंभ, अमित, आहारविहार इत्यादिकांमुळे अमंगलत्तू उत्पन्न

होते. केवळ मांसाहार केल्याने ते प्राप्त होते असे कोणी समजू नये. तेव्हा तात्पर्य काय की, सदरील सांगितलेल्या दोन्ही मार्गाचा परित्याग करून मी सांगतो तसा मध्यम मार्ग स्वीकारावा. जो मनुष्य ह्या देहास विनाकारण दंडितो तो हतवीर्य होऊन त्याच्या चित्तास व्यामोह होतो आणि भ्रामक विचार त्याच्या मनात उद्भवतात. फार काय; पण देहदंडन हे या लोकीचे व्यावहारिक ज्ञानसुद्धा प्राप्त करून घेण्यास बिलकूल अनुकूल नाही. तेव्हा इंद्रियदमन या उपायाने होईल म्हणणे हे सहसा युक्त नव्हे. जो आपला दीप उदकाच्या योगाने पेटवू पाहतो त्याचा तमाचा नाश शक्य नव्हे किंवा जो कुजून-सडून गेलेल्या इंधनाच्या योगाने अग्नी प्रदीप्त करू पाहतो, त्याला तो कदापि पेटावयाचा नाही. देहदंडन हे पीडादायक, व्यर्थ व निष्फळ आहे. अत्यंत कष्टमय स्थितीत राहून जीवित कंठिले तरी मनुष्याच्या ठायीचा अहंभाव कदापि जात नसतो. हा अहंभाव जाण्यास वासनारूप अग्नीचा उपशम झाला पाहिजे. जोपर्यंत हा अहंभाव कायम राहून ऐहिक किंवा आमुष्मिक सुखाची स्पृहा मनुष्याच्या ठायी कायम असते तोपर्यंत नुसत्या देहदंडनाचा काही एक उपयोग होत नाही; परंतु ज्याचा अहंभाव निमाला असतो तो वासनामुक्त होतो. त्याला ऐहिक किंवा आमुष्मिक सुखाची इच्छा कदापि व्हावयाची नाही आणि तो निसर्गप्रवृत्तीस अनुसरून आपल्या गरजा भागवीत असला तरी त्यापासून त्यास कोणताही दोष जडत नसतो. यास्तव त्याने देहाच्या गरजेप्रमाणे अन्नोदिकादिकाचे नियमितपणे खुशाल सेवन करावे. पुष्करणीमध्ये उगवलेल्या कमलपुष्पास ज्याप्रमाणे उदक भिजवीत नाही, तद्वत अशा मनुष्यास दोषस्पर्श होत नाही; परंतु हेही लक्षात वागविले पाहिजे की, सर्व प्रकारची विषयासक्ती ही आपणास दुर्बल करणारी असते. विषयासक्त मनुष्य आपल्या वासनेचा दास बनतो. विषयसुखाची लालसा धरून तत्प्रीत्यर्थ प्रयत्न करणाऱ्या मनुष्यास हीनता व नीचताही प्राप्त होतात; परंतु जीवितरक्षणास ज्या वस्तूंची अपेक्षा असते, त्या मिळविणे यात काही अनिष्ट नाही. आपला देह निरोगी स्थितीत राखणे हा आपला धर्म आहे. या धर्माप्रमाणे आपण वर्तलो नाही तर आपला ज्ञानदीप चांगल्या प्रकारे पाजळणे आपणास दुष्कर होईल आणि आपले चित्त दृढ व शुद्ध राखण्यास आपण असमर्थ होऊ. येणेप्रमाणे माझा धर्ममार्ग केवळ मधला आहे. निरर्गल सुखोपभोग व नि:सीम देहदंडन हे उभय मार्ग माझ्या मते निषिद्ध होत.''

याप्रमाणे त्या भिक्षूंच्या संशयाचे निवारण करण्यास बुद्ध सर्वदा तत्पर असे. त्यांनी अवलंबिलेला तपश्चरणमार्ग व्यर्थ असून क्लेशमूलक आहे असे प्रतिपादन करून त्याने त्यास त्या मार्गापासून परावृत्त केले.

या महंतपंचकापैकी आणखी एका महंताने अशी शंका घेतली की, आत्मा अमर आहे, तेव्हा त्याला अक्षय सुखप्राप्ती होईल असे काही तरी आपणास या जीवितात करणे उचित होय; परंतु तुमच्या धर्ममार्गात तर अशाविषयी काहीच उपदेश नाही कसे? या शंकेचे समाधान करीत असता बुद्ध पुढीलप्रमाणे आत्मतत्त्वाची नश्वरता सिद्ध करितो.

''जे जे म्हणून उत्पन्न झाले आहे त्याला लय आहे. यास्तव आत्म्याविषयीची चिंता केवळ व्यर्थ होय. हे आत्मतत्त्व केवळ मृगजलवत आहे आणि जी पीडा त्यास होत आहेशी भासते ती सारी भासमय आहे. निद्रित मनुष्यास भयंकर स्वप्ने पडून आणि केवळ घोर विपत्तीत आहोत असा भास होऊन तो त्या स्वप्नसृष्टीत मोठमोठ्याने रुदन करीत असतो; तथापि तो जागृत होताच तो सर्व अनुभव तत्काल विनिष्ट होऊन आपल्या भासमय कष्टप्रद स्थितीबद्दल त्यास नवल वाटते. असाच प्रकार मानव आत्मतत्त्वाचा आहे. याविषयीचे वास्तव ज्ञान प्राप्त होऊन मनुष्य प्रबुद्ध झाला असता या आत्मतत्त्वाविषयीच्या ममत्वाचा तात्काळ निरास होतो. जो अज्ञानरूप निद्रेपासून जागृत होतो त्यास बुद्ध म्हणावयाचे. अशा मनुष्यास आपल्या चिंता, आशा व पीडा व्यर्थ आहेत असे वाटत असते. कोणा एका मनुष्यास गोष्ट अशी आहे की, तो स्नान करून चालला असता त्याचा पाय एका ओल्या दोरीवर पडला. तेव्हा तो सर्प आहे असे त्यास वाटून त्याच्या मनात भीतीची धडकी बसली. या भीतीने तो थरथरा कापू लागला आणि त्या भासरूप सर्पाने आपणास खास दंश केला असे वाटून तो अंगात विषप्रयोग झाल्यासारखे सर्व चाळे करू लागला. इतक्यात त्याला कोणी असे दाखवून दिले की, ज्यास तो भ्रमाने सर्प मानीत होता ती केवळ दोरी होती, तेव्हा त्याची सर्व भीती नाहीशी होऊन तो पूर्वस्थिती पावला आणि आपल्या भ्रमिष्टपणाचे त्याला नवल वाटले. ज्याला आत्मतत्त्वाची प्रसिद्धी पटली असून जो यासंबंधाने वाटणारी चिंता, दु:ख व आशा हे केवळ भासमय, स्वप्नवत किंवा मृगजलवत होत असे पाहतो, त्याच्या मनाची स्थिती सदरील रज्जूस सर्पभ्रमाने भिणाऱ्या मनुष्यासारखीच होते. ज्याची आत्मपरता विनष्ट झाली आहे तो पुरुष धन्य होय. ज्याची सर्व चिंता दूर होऊन ज्यास शांती प्राप्त झाली आहे तो पुरुष धन्य होय. ज्यास सत्यधर्मरहस्य समजले आहे तो पुरुष धन्य होय. ज्याला सत्य सापडले आहे तो धन्य होय. सत्य हे आहे ते उदास असून चारू आहे. सत्याच्या योगाने तुमची अनिष्टापासून मुक्ती होईल. या जगामध्ये सत्याव्यतिरिक्त अन्य काहीही मोक्षप्रद नाही. सत्याचे तुम्हास जातीने आकलन झाले

किंवा त्याचे चारुत्व तुम्हास उग्र आहेसे भासले किंवा ते तुम्हास प्रथमारंभी अग्राह्यसे वाटले, तथापि त्यावरची श्रद्धा सोडू नका सत्याहून दुसरे काही एक श्रेष्ठ नाही. त्यात फेरफार करण्याचे सामर्थ्य कोणासही नाही. त्यात सुधारणा करण्याची शक्ती कोणासही नाही. तस्मात सत्यावर भरवसा ठेवून तदनुसार स्ववर्तन ठेवावे. असत्याच्या योगाने मनुष्याच्या मनात भ्रांती होऊन तो सन्मार्गच्युत होतो. भ्रमाच्या योगाने नाना विपत्ती उद्‌भवतात. भ्रम मनुष्यास जालीम मद्याप्रमाणे प्रमत्त करितात; परंतु हे भ्रम फार वेळ टिकत नाहीत आणि तुम्हास त्यामुळे फारच त्रास व दुःख होते. अहंभाव हा सर्व संतापाचे मूळ आहे. हा क्षणात निरास पावणारा आभासवत किंवा स्वप्नवत आहे; परंतु सत्य जे आहे ते हितकारी असून परम उदात्त आहे. ते अविनाशी आहे. सत्याहून दुसरे काहीही शाश्वत नाही. कारण एक सत्यच काय ते अनंत काल कायम राहणारे आहे. मी जे हे धर्मचक्रपरिवर्तन करणार आहे, त्याच्या आरी शुद्धाचरणाचे नियम होत. न्याय ही त्या आरीची समान लांबी होय. ज्ञानदान हे या चक्राचे लोहवलय (धाव) होय. विनय आणि विचारशीलता ह्या या धर्मचक्राच्या नाभी होत. या नाभीमध्ये सत्याचा अचल अक्षदंड प्रतिष्ठित केला आहे. विपत्तीचे अस्तित्व, विपत्तीचे कारण, विपत्तीचे निवारण या चार आर्यसत्याचे परिज्ञान ज्यांना होईल, त्याला सन्मार्गावलंबन घडेल. या मार्गामध्ये योग्य मतेही त्याला मशालीप्रमाणे प्रकाशपद होतील. योग्य उद्देश हे त्याचे मार्गदर्शक होतील. योग्य भाषण हे या मार्गात सरळ उभे चालणे होईल. योग्य रीतीने चरितार्थास लागणारे पदार्थ मिळविणे हे या मार्गात ठेवावयाची पावले होतील. योग्य विचार हा त्याचा श्वासोच्छ्वास होईल आणि या धर्ममार्गातून जिकडे तिकडे शांतीचे राज्य होईल. यासाठी अष्टांगधर्ममार्गाचे प्रत्येक मुमुक्षूने अवश्य अवलंबन करावे.''

याप्रमाणे बुद्धाने त्या पाच महंतांस स्वसंमत धर्मपंथाचा उपदेश केला, तेव्हा त्यास तो पटून ते बुद्धाचे अनुयायी झाले. त्यांची आपल्याठायी श्रद्धा दृढ झालेली पाहून बुद्धाने त्यांना आणखी असा उपदेश केला की, 'अहो भिक्षूंनो, ह्या माझ्या धर्मपंथाचे पूर्ण ज्ञान मिळवून विपत्तीचा नाश करण्याचा संकल्प करा आणि या संकल्पाच्या सिद्धीसाठी आपल्या आचरणाची शुद्धता सतत राखा. हे माझे धर्ममत जो विचार करील त्यास पटण्यासारखे आहे. केवळ मी सांगतो म्हणूनच त्यावर श्रद्धा ठेवू नये. हे माझे धर्ममत जो समजून घेईल त्याचे निश्चयाने कल्याण होईल. या माझ्या मताच्या साहाय्याने मनुष्य सदाचारी होऊन तो प्रामाणिकपणाने आणि न्यायाने या जगात वर्तू

लागेल आणि त्याला सत्यास अनुसरून वागता येईल. तर हे महंत हो, आपण दया आणि धर्म याच्या स्नेहापाशाने परस्परांशी बद्ध होऊन परस्परांचे बंधू होऊ आणि सर्व जगास न्यायाने आणि नीतीने वर्तन करण्यास शिकवू.'

या पाच महंतास आपले अनुयायी केल्यावर बुद्ध काशीजवळील मृगदावनामक वनामध्ये राहू लागला. हे वन फार रमणीय असून त्यात पुष्कळ मोठमोठे वृक्ष होते. या वृक्षाखाली बसून बुद्ध आपल्या शिष्यजनांस स्वधर्मोपदेश करीत असे. आसपासच्या गावांतील लोकांत त्याची कीर्ती लवकरच पसरून त्याचा उपदेश ऐकावयास लोकांची नेहमी गर्दी जमत असे आणि त्याचे ते गंभीर व मनावर ठसण्यासारखे भाषण ते अगदी चित्त देऊन ऐकत असत. तो जे स्वसंमत धर्मसिद्धांत त्यास समजून सांगत असे, त्यावर श्रोतृजन शरण घेऊन प्रतिपृच्छा करीत. या शंकेचे निवारण बुद्ध मोठ्या उत्साहाने व शांतपणे करीत असे. ही अशी धर्मचर्चा त्या वनातील वृक्षाखाली बसून ते तासाचे तास करीत असत. त्याचे श्रोते काशीसारख्या पुण्यक्षेत्रातील विद्वान व शोधक ब्रह्मवृंदापैकी असल्याकारणाने हा ऊहापोह मोठा मार्मिकपणाचा होत असे. या अशा वादपटू ब्राह्मणांशी भवति न भवति वेळोवेळी करून बुद्धाच्या ठायी उत्तम प्रकारचे वाक्दुकत्व स्वसंमत धर्ममत समर्थनाचे सामर्थ्य त्याच्या ठायी विकसित होऊन उत्तम प्रकारे प्रतीत झाले. जो जात्याच मोठा बुद्धिवान असून त्याकाळी प्रचलित असलेल्या बहुतेक धर्ममताचे ज्ञान त्याने संपादन करून त्यात तथ्य आहे ते, सतत विचार करून व ती धर्ममते प्रतिपादन करणाऱ्या जनाशी प्रसंगोपात्त वादप्रतिवाद करून उत्तम प्रकारे पाहिले होते; यास्तव त्याच्या उपदेशाचा प्रभाव सामान्य जनांच्या मनावर उत्तम प्रकारे होत असे. त्याचा धर्मबोध अगदी साधा असे. त्याचे धर्मसिद्धांत सामान्य जनांस सहज समजणारे असत. वेदांतादी ज्या गहन तत्त्वज्ञानपद्धती त्यावेळी प्रचलित होत्या, त्या सामान्य बुद्धीच्या मनुष्यास सहज समजणाऱ्या नसत. त्याचे कित्येक सिद्धांत तर अत्यंत गूढ असून मोठमोठ्या ज्ञाते म्हणविणाऱ्या जनांसही ते पूर्णपणे समजत नसत. यास्तव या तत्त्वपद्धतीचा प्रसार सार्वत्रिक असा कधीच झाला नाही. पुन्हा या पूर्वकालीन धर्मपंथाचे ज्ञान प्राप्त करून घेण्यास काही अधिकार लागत असे. हा अधिकार सर्व वर्णाच्या व सर्व स्थितीतल्या लोकांस सारखाच साध्य नसे. कित्येकास तर हा अधिकार मुळीच नसे; परंतु बुद्धाच्या धर्ममताचा प्रकार असा मुळीच नव्हता. त्याचा प्रारंभापासूनच असा निर्धार झाला होता की, आपण जो मोक्षमार्ग शोधून काढला आहे त्याचे ज्ञान एकंदर मनुष्यजातीस करून द्यावयाचे. या निर्धाराप्रमाणे

वागताना त्याला आपल्या धर्ममताचे निरूपण जितके साध्या प्रकारे करवेल तितके करण्याविषयी तो सर्वदा प्रयत्न करीत असे. यामुळे त्याचा धर्ममार्ग सर्वांस सुलभ झाला. उच्च-नीच, अज्ञ-प्राज्ञ, स्त्री-पुरुष असा काहीच भेदाभेद न करिता बुद्ध आपला धर्ममार्ग जनांस समजून सांगत असल्याकारणाने त्याच्या जवळ सर्व प्रकारचे जन धर्मोपदेश ऐकण्यास जाऊ लागले.

सदरी सांगितल्याप्रमाणे ते पाच महंत बुद्धाचे अनुयायी झाल्यानंतर यश नावाचा श्रीमंत घराण्यातला तरुण पुरुष बुद्धाचा अनुयायी झाला. त्याची हकीकत तेथे थोडक्यात सांगतो. हा एक धनाढ्य वैश्याचा पुत्र होता. हा इतर लोकांप्रमाणे मृगदाववनात वेळोवेळी जाऊन बुद्धाचा उपदेश ऐकत असे. एके दिवशी रात्री तो बिछान्यावर पडून बुद्धकृत धर्मोपदेशाचे मनन करीत असता त्याच्या मनात या जगातील विपत्तीचा विचार येऊन त्याचे चित्त अत्यंत उद्विग्न झाले आणि तो तसाच उठून घरातील कोणाही मनुष्यास कळू न देता हळूच निघून बुद्ध होता तेथे आला आणि म्हणाला, 'गुरू महाराज, माझे चित्त शोकाकुल झाले आहे. मला ही संसारातील विपत्ती पाहवत नाही.' बुद्ध त्याला म्हणाला, 'माझ्याकडे ये म्हणजे तुझ्या सर्व शोकाचे व विपत्तीचे निर्मूलन होऊन तुला सत्य धर्माचे ज्ञान प्राप्त होईल. हे ज्ञान सर्व शोकाचा नाश करणारे आहे.' मग बुद्धाने त्याला मोठ्या ममतेने जवळ बसवून घेऊन बोध केला. त्याने त्यास असा उपदेश केला की, हे जे जीवन आपणास प्राप्त झाले आहे, त्याचे सार्थक लोककल्याणासाठी अहर्निश झटल्याने होण्यासारखे आहे. त्याचप्रमाणे आपण सर्वदा नीतीने वागले पाहिजे. संसारात ज्या वासना नियश: आपल्या चित्तात उद्भवून आपणास सदोदित त्रास देत असतात त्या केवळ व्यर्थ असून पापमूलक व अनर्थोत्पादक असतात. याप्रमाणे त्यास नानापरी बोध करून त्याने स्वसंमत धर्ममार्गाचे विवरण केले. हा सारा बोध यशाच्या हृदयात इतका पूर्णपणे बिंबला की, तो त्याचा तात्काळ शिष्य झाला. त्याचे ज्ञाननेत्र उन्मीलित होऊन त्याचा शोक व संताप सारा दूर झाला. त्याला मोक्षाचा सत्यमार्ग स्पष्ट दिसू लागला. याप्रमाणे त्याची वृत्ती पालटून संसाराविषयी त्याच्या मनात परत वैराग्य उत्पन्न झाले. त्याच्या अंगावर बहुमोल सुवर्णरत्नादिकांचे अलंकार होते. त्याकडे पाहून तो परम लज्जित होत्साता ते तो अंगावरून काढू लागला. तेव्हा बुद्धाने त्याचे मनोगत जाणून म्हटले की, ''हे तरुण पुरुषा, आपला देह रत्नादिकांनी अलंकृत असला तरी आपले चित्त इंद्रियदमनास समर्थ असते. बाह्य वेशाचा धर्माशी काहीएक संबंध नाही. त्याच्यामुळे चित्ताच्या ठायी कोणताच दोष

उत्पन्न होण्यासारखा नाही. जो महंतपणाचा मोठा डौल संन्यासवृत्तीस अनुरूप असा वेश धारण करितो, त्याच्या चित्तात संसार सुखलालसा वास करण्याचा संभव असतो. एकदा मनुष्य निर्जन अरण्यामध्ये वास करीत असूनही या संसारातील निरर्थक सुखाविषयीची लालसा धरू लागला तर तो केवळ संसारी समजावयाचा; फरंतु मनुष्य संसारात राहून इतर संसारी मनुष्याप्रमाणे अन्नवस्त्रादिकाचा उपभोग घेत असला व त्याचे चित्त मोक्षसाधक धर्माकडे वळून तो तत्संबंधी विचारामध्ये गर्क होत असला, तर तो योग्य पुरुष होय. ज्याच्या चित्तातून अहंभाव नाहीसा झाला आहे ते विरागी असो की संसारी असो; मला ते दोन्ही सारखेच वाटतात.''

याप्रमाणे सत्यधर्मबोध श्रवण केल्यावर यशाने संसारत्याग करून महंतदीक्षा धारण केली आणि पीतवस्त्र परिधान करून बुद्धाच्या महंतमंडळात तो सामील झाला.

इकडे यशाचा पिता त्याचा शोध करीत बुद्ध होता तेथे आला आणि बुद्धाला पुसू लागला की, 'हे गुरुराज, माझ्या पुत्रास आपण पाहिले काय?' बुद्ध म्हणाला, 'आत ये म्हणजे तुझा पुत्र तुझ्या दृष्टीस पडेल.' तेव्हा तो हर्ष पावून त्याच्या मागून गेला आणि जिथे ज्याचा मुलगा बसला होता तेथेच जाऊन बसला; पण त्याने आपल्या पुत्रास ओळखले नाही. मग बुद्धाने त्यास धर्मबोध केला, तो श्रवण करून त्याला तो सत्य वाटला आणि तो म्हणाला, 'हे महागुरू, आपण जे बोलला ते सत्य आहे. जी गोष्ट आजपर्यंत मनास कळली नव्हती ती आपण समजून सांगत आहा. आजपर्यंत आडमार्गात भटकत असणाऱ्या जनांस आपण हा सन्मार्ग दाखवीत आहा. आपण पेटविलेल्या या ज्ञानदीपाच्या योगाने ज्यास नेत्र आहेत त्याला आपल्या आसमंतात्भागी काय आहे ते स्पष्टपणे दिसण्यासारखे आहे. तर हे बुद्धगुरू, मी आपणास शरण आहे. आपण प्रकट केलेल्या धर्ममताचा मी आश्रय करितो. मी आपल्या महंतमंडळात सामील होऊ इच्छितो. तर हे भगवान, आजपासून मी आपला शिष्य होऊन आमरण सन्निध राहण्याचा निर्धार करितो.' इतके बोलून मग तो आसपास पाहू लागला तो त्याचा पुत्र यश त्याच्या जवळ बसलेला त्याच्या दृष्टीस पडला. त्याला पाहताच तो गहिवरून म्हणाला, 'बेटा यशा, तुझी माता तुझ्यासाठी शोकाकुल झाली आहे, तर तू माघारी जाऊन आपल्या मातेचे समाधान कर.' हे पित्याचे शब्द ऐकून यशाने बुद्धाकडे पाहिले. तेव्हा बुद्ध त्याच्या पित्याला म्हणाला, 'यशाने पुन्हा संसारी बनून इहलोकीच्या सुखविषयाचा उपभोग पूर्ववत घ्यावा अशी तुझी इच्छा आहे काय?' यावर त्याने उत्तर केले की, 'यशाला तुमच्याजवळ राहून हित वाटत असल्यास त्याने तसे करावे.

त्याला माझी हरकत नाही. या संसृतिपाशापासून तो मुक्त झाल्यास फारच चांगले आहे.' मग बुद्धाने त्या पितापुत्रास आणखी बोध करून त्यांचे चित्त प्रसन्न केले. हा बोध आटोपल्यावर तो वैश्य म्हणाला, 'गुरुराज, आपण आज माझ्या गृही सर्व शिष्यजनासह भोजनास चलावे आणि या माझ्या पुत्रासही बरोबर न्यावे.' हे त्याचे प्रेमाचे आमंत्रण स्वीकारून बुद्ध आपला झगा घालून व हातात भिक्षापात्र घेऊन यशासह वर्तमान त्या व्यापाऱ्याच्या घरी गेला. बुद्ध आपल्या घरी आलेला पाहून यशाची आई आणि स्त्री या धावून जाऊन त्याच्या पाया पडल्या आणि त्याच्याजवळ बसल्या. मग त्याने त्या दोन्ही स्त्रियांना अनुलक्षून पुष्कळ बोध केला. तो इतका सरळ व सोपा होता की, त्या स्त्रियांना तो सगळा समजला आणि त्या बोलल्या, 'हे भगवान, आपण ज्या सत्याचा बोध केला ते परम सौख्य देणारे आहे. यास्तव आम्ही तुम्हाला शरण आहो. आम्हास तुमचे धर्ममत कबूल आहे. आपल्या शिष्यवर्गात सामील होण्यास आम्ही तयार आहो.' या बुद्धाच्या पहिल्या स्त्रीशिष्य होत.

या यशाचे विमल, सुबाहू, पुण्यजित व गवापती असे चौघे मित्र होते. त्यांनी जेव्हा ऐकिले की, यशाने आपले केस काढून व पीतवस्त्र परिधान करून वैराग्य धारण केले तेव्हा त्यांनी आपल्या मनात असा विचार केला की, यशाने ज्यापेक्षा या धर्ममताचा अंगीकार करून वैराग्य धारण केले त्यापेक्षा ते असामान्य धर्ममत असले पाहिजे; कारण यश हा मोठा शहाणा व सद्गुणी आहे. तो अशा भलत्याच फंदात विनाकारण पडावयाचा नाही, असा विचार करून ते तो होता तेथे गेले. त्याला पाहून यश बुद्धाला म्हणाला, 'भगवान कृपा करून या माझ्या प्रिय मित्रास स्वधर्मामृत पाजावे.' या त्याच्या विनंतीप्रमाणे बुद्धाने त्यास धर्मोपदेश केल्यावरून त्याच्या मनाचा पालट होऊन ते त्याला शरण जाऊन बुद्धाच्या शिष्यसंघात सामील झाले.

याप्रमाणे बुद्ध एकामागून एक असे शिष्य मिळवीत गेला. जो तो त्याचा बोध ऐकण्यास मोठ्या उत्साहाने येऊन त्याचा शिष्य बनत असे आणि मग आपले आचरण शुद्ध करून या संसार तापापासून मुक्त होत असे. आपल्या शिष्यसंघाची संख्या साठापर्यंत आली असे पाहून त्याने त्यापैकी योग्य व हुशार अशांस इतर ठिकाणच्या जनांस बोध करण्यासाठी रवाना केले. तो त्यास म्हणाला : 'आपले सर्व बंधनापासून मोचन झाले आहे; परंतु इतर जन या संसारदुःखाने त्रस्त झाले आहेत. अशा जनांच्या कल्याणासाठी तुम्ही जागोजाग फिरत राहा. त्यांची तुम्हास दया यावी हे युक्त होय. तुम्हास जसा आनंद प्राप्त झाला आहे तसा त्यांसही प्राप्त करून देण्यास तुम्ही झटावे.

तुम्ही एक एक जण एका-एका वाटेने निरनिराळ्या गावी जा आणि माझ्या धर्ममार्गाचा त्याला बोध करा. हा माझा धर्ममार्ग सर्व प्रकारे शुद्ध व पवित्र आहे, अशी त्यांची खात्री करा. पवित्र चरणाची महती केवढी आहे आणि त्यापासून आपले किती कल्याण होण्यासारखे आहे, हे त्याला नीट समजून सांगा. कित्येक मन या संसारातील मोहजालापासून मुक्त झालेले असतील; पण त्यास मी शोधून काढिलेल्या निर्वाण मार्गाचे ज्ञान नसल्यामुळे ते अद्यापि संसारबंधनामध्ये रखडत असतील. अशा जनाला माझ्या धर्ममतांचे विवरण होईल तितके साध्या रीतीने करून त्यांची समजूत घाला; फरंतु जे कोणी माझ्या ह्या पवित्र व सत्य धर्ममार्गाची अवहेलना करितील व तो तुच्छ मानितील अशा जनाला माझ्या मतांचा कदापि बोध करू नका. कारण अशा जनांकडून माझ्या धर्ममार्गाची व्यर्थ निंदा व उपहास झाल्यास इतर जनांची त्यावर भक्ती जडावयाची नाही. हे भिक्षुजन हो, जेथे जेथे तुम्ही जाल तेथे तेथे जे योग्य पुरुष तुम्हांस आढळतील, त्यांना माझ्या धर्ममार्गाची दीक्षा देण्याची तुम्हाला मी परवानगी देतो. माझ्या धर्ममतांचा प्रत्येक शब्द हे सिद्धांत श्रोतृजनांस नीट मनापासून समजून सांगा. स्वधर्मपंथाचा उपदेश करीत फिरणे हे आपले परम पवित्र कर्तव्य आहे. हे बजावण्यास आपण यत्किंचितही आळस करिता कामा नये. या माझ्या धर्ममताचा बोध सर्व जातीच्या व पंथाच्या स्त्री-पुरुषांस करा. त्याच्या संबंधाने कोणताही भेदाभेद ठेवू नका आणि जनास जो बोध करावयाचा तो कोठे तरी एकांत ठिकाणी न करिता अगदी सार्वजनिकरीत्या सर्व लोक ऐकावयास जमतील अशा ठिकाणी करा. याप्रमाणे गावोगाव हिंडून सर्वांस सत्यधर्म बोधामृत पाजा. मीही येथे राहत नाही. मी येथून उरुवेला येथे जातो.''

ही स्वगुरूची आज्ञा शिरसावंद्य करून बुद्धाचे शिष्य गावोगाव हिंडत असत. हा हिंडण्याचा क्रम ते आठ महिने चालवीत आणि वर्षाकाळाचे चार महिने आपल्या गुरूपाशी सगळे येऊन राहत आणि त्याचा बोध पुन्हा श्रवण करून आत्मोन्नती करून घेत.

सदरी उल्लेख केल्याप्रमाणे गौतमबुद्धाने उरुवेला येथे जाऊन काश्यपनामक ब्रह्मकुळातील तीन महर्षी त्या स्थानी राहत असत; त्याला व त्यांच्या सुमारे हजार अनुयायांना स्वधर्मदीक्षा दिली. हा ऋषिसमुदाय वेदोक्तरीत्या होमहवनादी विधी करून सर्वदा व्रतस्थ असे. प्रथमत: या तिघा बंधूंपैकी एकाशी बुद्धाची गाठ पडली असता त्याचे ते अलोकसामान्य तेज, वैराग्य आणि ज्ञानबल पाहून तो काश्यप चकित झाला. हा काश्यप मोठा ज्ञाता व धर्मज्ञ आहे अशी त्याची सर्व भारतखंडात ख्याती झाली होती. बुद्धाचे दर्शन झाले तेव्हा त्याचे तेज फिके पडून तो त्याच्यापुढे अगदी नम्र

झाला. नंतर त्याने त्याला आपल्या आश्रमात नेले. तेथे त्याच्या यज्ञशालेत रात्रीची रात्र राहावे असा बुद्धाने आपला मानस प्रकट केला. तेव्हा काश्यप म्हणाला, महाराज या यज्ञशालेमध्ये आपण रात्रीचे राहणे धोक्याचे आहे. येथे रात्रीस एक महासर्प येत असतो. तो आपणास दंश करील; पण बुद्धाने फारच आग्रह धरिल्यावरून त्याने त्याला त्या यज्ञशाळेमध्ये राहू दिले. मग रात्रीस तो तेथे राहिला असता त्या तपोवनातील सकल ऋषिवृंदास मोठी काळजी लागून राहिली. ते मनात म्हणू लागले की, हा असा तेजस्वी व महाज्ञानी पुरुष आज सर्पाच्या विषाने भस्म होऊन जाणार हे काही चांगले नाही. इकडे मध्यरात्र उलटण्याच्या सुमारास तो भयंकर सर्प तेथे आला. बुद्ध अगदी जागरूकपणे स्थिर आसन मांडून मनन करीत बसला होता. त्याच्यावर त्या सर्पाची दृष्टी जाऊन तो त्याच्या अंगावर धावून आला; पण तो इतका क्रोधाविष्ट झाला होता की, बुद्धाकडे येऊन पोचण्यापूर्वीच आवेशाच्या भिरिरीत स्वत:च्याच विषाने तो मधल्या मध्ये मरून पडला. दुसरा दिवस उजाडताच ते ऋषी यज्ञशाळेकडे मोठ्या उत्कंठेने आले आणि आत जाऊन पाहतात तो बुद्ध सुखरूप असून तो विशाल सर्प मरून पडला आहे. तेव्हा त्यांना वाटले की, हा कोणी तरी मोठा सिद्ध पुरुष आहे. तरी काश्यपाला अशी घमेंडी होती की, हा मुनी केवढाही मोठा सामर्थ्यवान असला तरी तो इतका पवित्र नाही.

पुढे काही दिवस तो त्यांच्या आश्रमात वास करून धर्मचर्चा करीत राहिला. त्या समयास त्या आश्रमात महोत्सव प्राप्त होऊन पुष्कळ लोकांचा समुदाय तेथे जमू लागला. तेव्हा काश्यपास असे वाटले की, येथे जमणाऱ्या जनांच्या कानी बुद्धाचा धर्मबोध पडला तर त्यांची त्याच्यावर श्रद्धा बसून आपल्यावरील त्यांचा भाव कमी होईल आणि तेवढ्या मानाने आपले स्तोम कमी होऊन आपला अनुयायी संघ कमी होईल. यामुळे तो त्या महोत्सवप्रसंगी तेथे नसावा असे त्यास वाटू लागले. हा त्याचा मनोदय बुद्धास कळून तो उत्सवाच्या दिवशी त्या आश्रमातून निघून गेला. तो तेथून गेलेला पाहून काश्यप त्याच्याकडे गेला आणि त्यास म्हणाला, 'हे बुद्धगुरू, आपण उत्सवाच्या दिवशी माझ्या आश्रमातून का निघून आला?' बुद्धाने उत्तर दिले, 'हे काश्यप, उत्सवाच्या दिवशी मी तुझ्या आश्रमात नसावे अशी तुझी इच्छा नव्हती काय?' हे आपले मनोगत बुद्धाला कळलेले पाहून तो लज्जित झाला, तरी त्याचा स्वाभिमान नष्ट झाला नव्हता. त्याला वाटत होते की, हा शाक्यमुनी कितीही मोठा ज्ञाता असला तरी माझ्याइतका पवित्र खास नाही.

ही त्याची अभिमानवृत्ती ओळखून बुद्धाने त्याला संबोधून म्हटले की, 'हे काश्यपा, तू कितीही मोठा पंडित असलास तथापि तुझे आचरण शुद्ध झाले नाही तोपर्यंत तू पवित्र झाल्यास असे समजू नको. द्वेष-मत्सरादी चित्तास कलुषित करणाऱ्या वृत्ती तुझ्या ठायी उद्दाम झालेल्या आहेत, तोपर्यंत पावित्र्याचे खरे अधिष्ठान तुझ्या ठायी व्हावयाचे नाही, हे पक्के ध्यानात वागीव. कामक्रोधादी ज्या वृत्ती मनुष्यास पापकर्म करण्यास प्रवृत्त करीत असतात, त्यांचे निर्मूलन ज्याच्या ठायी होत असते तोच मोक्षाचा अधिकारी होतो; केवळ जपतपादी साधनांच्या बलावर कोणी कधी संस्मृतीपासून मुक्त होत नाही. तू वेदाक्त कर्मामध्ये कितीही मोठा प्रवीण असलास, तरी तुझ्या ठायी खऱ्या पावित्र्याचा लेशही बसणे नाही.' हा बुद्धाचा उपदेश ऐकून काश्यपाचा स्वाभिमान तत्काळ विगलित झाला. त्याच्या ठायीची मत्सरवृत्ती विलय पावली आणि तो अगदी नमाश होऊन बुद्धास म्हणाला : 'हे गुरुराज, मी आपला आजपर्यंत जो धर्मबोध श्रवण केला, जेणेकरून माझ्या ठायी सद्धर्मप्रकाश प्रविष्ट होऊन आपला शिष्य व्हावे अशी मला इच्छा झाली आहे, तर मला या क्षणी दीक्षा द्यावी.'

हे त्याचे नम्रतेचे भाषण ऐकून बुद्ध त्यास म्हणाला : 'हे काश्यपा, तू जटिलांचा प्रमुख आहेस. तेव्हा तू आपला उद्देश आपल्या अनुयायीजनांस विदित कर आणि त्यांचा कसा काय मनोदय आहे ते त्यांस विचारून पाहा.'

हे त्यांचे सांगणे ऐकून काश्यप आपल्या अनुयायांस जमा करून म्हणाला, 'आपल्या आश्रमात आलेल्या शाक्यमुनींच्या धर्मबोधाप्रमाणे वर्तन करावे अशी मला उत्कंठा लागली आहे. तुमचा मानस कसा काय आहे?'

हा आपल्या प्रमुखाचा निर्धार ऐकून ते जटिल म्हणाले : 'हे अधिगुरू, आमच्याही मनात शाक्यमुनीच्या संबंधाने पराकाष्ठेचे प्रेम उत्पन्न झाले आहे. त्यांचा बोध ऐकून आमच्याही मनाची वृत्ती अगदी पालटली आहे. आम्हास त्याचा धर्मपंथ खरा निर्वाणभूत वाटत आहे. तुमच्या मनातून जर त्याचा अनुयायी व्हावयाची इच्छा आहे, तर आम्हीही त्याचे अनुयायी व्हावयास सिद्ध आहोत.'

याप्रमाणे त्या सर्वांचा संकल्प होऊन त्यांनी आपले यज्ञकर्मसंबंधी सर्व उपकरण साहित्य निरंजरा नदीत फेकून दिले. हे साहित्य नदीतून खाली वाहून जाताना ह्या काश्यपाच्या दुसऱ्या दोघा बंधूंनी पाहिले. तेव्हा आपल्या बंधूवर व त्याच्या अनुयायी संघावर काही तरी वाईट प्रसंग गुदरला असावा असे वाटून ते आपापल्या शिष्यसंघासह उरुवेला येथे प्राप्त झाले. तेथे आल्यावर जेव्हा त्यांनी पाहिले की, आपला बंधू

आपल्या शिष्यांसह शाक्यमुनीचा अनुयायी बनला तेव्हा त्यांनीही बुद्धाशी काही वेळ वादविवाद करून व त्याचा धर्ममार्ग नीट समजून घेऊन त्याचे शिष्यत्व स्वीकारले.

हे दोघे काश्यपाचे बंधू निरंजरा नदीच्याच तीरी नादी आणि गया येथे राहत असत. ते उरुवेला येथे आल्यावर बुद्धाने त्यास अनेक प्रकारे बोध केला. एके प्रसंगी त्याने त्यास जे यज्ञकर्मनिषेधपर व्याख्यान दिले, त्याचे सार येणेप्रमाणे आहे–

''हे जटिल हो, या सृष्टीतील समग्र वस्तुजात एकसारखे दग्ध होत आहे. आपली ही चक्षुरादि इंद्रिये, आपले विचार, आपली सर्व गात्रे दहन पावत आहेत. वासनामूलक अग्नीमध्ये त्याचे दहन होत आहे. क्रोध, अज्ञान, द्वेष इत्यादी वृत्ती ह्या या अग्नीची इंधने होत. ही इंधने कायम आहेत तोपर्यंत हा अग्नी प्रदीप्त राहील. या मनोमय अग्नीस्तव जन्म, मरण, ऱ्हास, वृद्धी, शोक, चिंता, दुःख, पीडा, निराशा आणि उद्वेग ही कायम राहावयाची. या तापप्रद अग्नीतून ज्याला मुक्त व्हावयाचे असेल त्याने मी सांगतो त्या सत्यचतुष्ट्याचे ज्ञान प्राप्त करून घेऊन अष्टांग धर्ममार्गाचे अनुसरण करावे. असे जो करील त्याचे ज्ञानश्च उन्मीलित होतील, त्याची बुद्धी शुद्ध होईल, त्याची ज्ञानेंद्रिये भ्रमरहित होतील, त्याच्या वासना सर्व निर्मूळ होऊन तो मुक्त होईल; त्याच्या ठायीचे ममत्व नष्ट होऊन त्याला कैवल्यप्रद अशी निर्वाणपदवी प्राप्त होईल.''

हा असा स्पष्ट व खऱ्या कल्याणाचा धर्मबोध श्रवण करून त्या जटिलांची मने प्रसन्न झाली आणि त्यांनी बुद्धाचे शिष्यत्व अंगीकारिले.

याप्रमाणे काश्यप आदिकरून सुमारे हजार अनुयायी उरुवेला येथे मिळाल्यावर बुद्ध त्या स्थानी आणखी काही दिवस राहिला आणि त्यांच्याशी काही विषयांवर संभाषण करून त्यांची आपल्या ठायी दृढ निष्ठा असेल असे त्याने केले.

फुढे या नूतन अनुयायांसह बुद्धाने तेथून राजगृहनगरीकडे प्रयाण केले. या नगरीजवळील यष्ठिवनात त्याने आपल्या शिष्य संघासह मुक्काम केला. या नगरीमध्ये बिंबिसार नामेकरून एक मगध राजा राज्य करीत होता. त्याने शाक्यमुनीची कीर्ती यापूर्वी पुष्कळ ऐकिली होती. तो आपल्या राजधानीजवळील उपवनात स्वशिष्य संघासमवेत उतरला आहे असे ऐकून आपल्या पदरचे मोठमोठे अमीर-उमराव व उपाध्याय यासह वर्तमान बुद्धदर्शनास आला आणि बुद्धास साष्टांग प्रणिपात करून त्याच्यापासून अंमळ दूर आपल्या परिवारासह मोठ्या नमाश्भावाने बसला. त्या राजाबरोबरच्या लोकांनी काश्यपास बुद्धासन्निध बसलेला पाहिल्यावरून त्यांच्या मनात

असा विकल्प आला की, काश्यपाने बुद्धाचे शिष्यत्व स्वीकारिले आहे की बुद्धाने काश्यपाचे शिष्यत्व पत्करिले आहे हे काही कळत नाही. हा त्या लोकांच्या मनात आलेला विकल्प ताडून बुद्ध काश्यपास संबोधून बोलला : 'हे काश्यपा, तुला सांप्रत कोणते विशेष ज्ञान प्राप्त झाले आहे बरे? होमहवनादी वैदिक विधीचा व नानाविध कष्टप्रद तपश्चरणाचा त्याग त्वा का केला?' स्वगुरूच्या ह्या प्रश्नाचे धोरण ओळखून काश्यप पट्दिशी उठून बुद्धचरणी नमन करून हात जोडून म्हणाला : 'अग्नीची उपासना करून मला फायदा काय तो एवढाच होता की, संसृतिचक्रामध्ये मी भ्रमण करीत राहून दुःख व क्लेश यांचा मला सर्वकाळ अनुभव घडला असता. हा सर्व फेरा चुकविण्यासाठी मी यज्ञ व इतर व्रते यांचा त्याग केला असून, पात्र कैवल्याचे निदान जे निर्वाणमत त्याची प्राप्ती करून घेण्यास प्रवृत्त झालो आहे. पंचविषयवासनांचे निर्मूलन करण्याच्या हेतूने म्या अग्नीची उपासना सतत मोठ्या परिश्रमाने केली; परंतु माझ्या वासना निर्मूल होण्याऐवजी एकसारख्या वृद्धिंगत होत गेल्या. म्हणून या उपासनामार्गाचा मी अव्हेर केला आहे. वेदमंत्राच्या साहाय्याने मी अग्नीमध्ये हवन केले खरे; परंतु तसे करून जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त होण्याची आशा मला नव्हती; हा जन्ममरणाचा फेरा चुकला नाही तोपर्यंत दुःखापासून मुक्ती होणे नाही, असा विवेक मला प्राप्त होऊन मी यज्ञकर्माचा अव्हेर केला आहे. देहदंडनमूलक व्रतादिकांमध्ये मी प्रवीण होतो. माझ्या उपासनामार्गाचे अवलंबन पुष्कळांनी केले असून तो त्यास अत्युत्कृष्ट वाटत होता. तरीपण मी अत्युत्तम सत्यास केवळ पराङ्मुख झालो होतो. यास्तव या असत्य मार्गाचा मी अव्हेर करून निर्वाणप्राप्तीस प्रवृत्त झालो आहे. येणेकरून जन्म, जरा, रोग आणि मृत्यू यापासून मुक्त होऊन अक्षय शांती आणि स्वास्थ्य याचा मला अनुभव घडणार आहे. हे ज्ञान मला प्राप्त झाल्यामुळे मी यज्ञमार्गाचा अव्हेर केला आहे.' हे त्याचे भाषण ऐकून तेथे जमलेल्या नागरिकांच्या मनातला किंतु नाहीसा झाला. नंतर राजा व त्याच्याबरोबर आलेले इतर नागरिक आपला बोध श्रवण करण्यास उत्सुक झाले आहेत असे पाहून त्याने बिंबिसार राजास अनुलक्षून येणे प्रकारे उपदेश केला.

ज्याला आत्मज्ञान होऊन इंद्रियाचे व्यापार कसकसे चालत आहेत ते कळते, त्याच्या ठायी अहंपणास अवकाश उरत नाही. अहंपणा नष्ट झाला असता त्याला अक्षय शांतीचा लाभ होतो. जगाची प्रवृत्ती पाहिली असता जनाचा अहंभाव दृढ असल्यामुळे त्यांच्या चित्तास भाशंती होते. कोणी म्हणतात की, मरणानंतर हा आपला

आत्मा कायम राहतो. कोणी म्हणतात की, तो देहाबरोबरच नष्ट होतो; परंतु हे उभय मतवादी भ्रामिष्ट समजावयाचे. हा त्यांचा भ्रम फारच खेदप्रद होय. कारण जर ते म्हणत असतील की, हा आत्मा नाश पावतो तर ज्या फलहेतूने ते येथे कर्मे करण्यास प्रवृत्त होतात, ते फलही नष्ट झाले पाहिजे आणि मग परलोकाची वार्ता कशास बोलावी? ही अशी मोक्षप्राप्तीची हाव जे कोणी धरीत असतील ते मोठे पाजी असून त्यांची आत्मपरता परम निषिद्ध होय. आता जे कोणी असे प्रतिपादन करीत असतील की, आत्मा मरणोत्तर कायम राहतो त्यांनी हे जाणिले पाहिजे की, अज व अविनाशी असे हे आत्मतत्त्व असल्यास ते एकरूपच असले पाहिजे आणि ते केवळ अव्यंग असून त्यांची कर्मादिकेकरून आणखी उन्नती करण्याचे प्रयोजन नाही. पुन्हा हे अनादि व अविनाशी आत्मत्व कदापि विकार पावणारे नव्हे. ते केवळ स्वयं असून त्यावर कोणाची सत्ता चालावयाची नाही. असे असल्यास त्याची उन्नती करण्याचा विचार किंवा प्रयत्न केवळ व्यर्थ होय. मग सदाचार आणि मोक्षमार्ग याचे प्रयोजन मुळीच उरत नाही; परंतु या संसारात तर आपण आनंद व दुःख याचे परिणाम पाहतो. तेव्हा हे परिणाम तरी होतात कोणावर; आपण जर नानाविध कर्म करितो, ते या आत्म्याकडून होत नाहीत असे म्हणावयाचे तर मुळी आत्मा नाहीच असे म्हणणे प्राप्त होते. जे कर्म घडते त्याला कर्ता नाही, जे ज्ञान होते त्याला ज्ञाता नाही आणि जे जीवित आहे त्याचा अधिपती नाही असे म्हणावे लागते.

आता या जीविताविषयी माझा काय सिद्धांत आहे तो श्रवण करा. आपल्या ज्ञानेंद्रियांचा बाह्य वस्तूशी संपर्क होऊन वेदना निर्माण होते, या वेदनेपासून स्मृती उत्पन्न होते, या स्मृतीपासून ज्ञानाचा उद्भव होतो आणि या इंद्रियजन्य ज्ञानाच्या योगेकरून ज्यास इतर जन आत्मा असे म्हणतात, ते तत्त्व निर्माण होते. ते ज्याप्रमाणे सूर्यकांतमण्यावर सूर्याचे किरण पडून अग्नीचा उद्भव होतो त्याप्रमाणे होय. बीपासून जसा अंकुर उद्भवतो, तशी या आत्मतत्त्वाची अवस्था आहे; परंतु या अंकुरास जसे बीज म्हणता येत नाही तसेच या आत्मतत्त्वास जीविताचे मूलाधारभूत म्हणता येत नाही. ही दोन्ही एकरूप नव्हे. तथापि ती परस्परभिन्नही नव्हे ही अशी जीविताची उत्पत्ती आहे. जो कोणी या आत्मतत्त्वाचे दास बनले असून त्याची सेवा करण्यास अहर्निश झटत असतात आणि जे जन्म, जरा, रोग व मरण यांची सर्वदा भीती बाळगत असतात त्यांना माझे असे शुभवर्तमान सांगणे आहे की, हे आत्मतत्त्व मुळी अस्तित्वात नाही. हे आत्मतत्त्व अस्तित्वात आहे म्हणणे हे मोठीच भ्रांती आहे. जे कोणी ते आहे

असे म्हणतात ते केवळ मोहवश झाले असून स्वप्नातील अनुभव सत्यवत धरून चालत आहेत असे म्हणावयाचे. अशा जनांनी आपले ज्ञाननेत्र उघडून चांगले जागृत व्हावे आणि वस्तुमात्राचे वास्तव ज्ञान प्राप्त करून घेऊन चित्ताची तळमळ नाहीशी करावी; कारण जो जागृत असतो त्याला भयंकर स्वप्ने पडण्याचा संभव नसतो. रज्जू भ्रमाने सर्पवत भासला असता रज्जूचे खरे स्वरूप ध्यानात आल्याने हा रज्जुसर्पभ्रम विगलित होतो आणि सर्व भ्रमामुळे उत्पन्न झालेले भयकंपादी विकास नष्ट होतात. आत्मतत्त्व अस्तित्वात नाही असे ज्यांचे मत बनते, त्यांच्या ठायीचे ममत्व नष्ट होऊन सर्व वासना आणि विषय सुखलालसा याचा त्याग करण्याचे सामर्थ्य त्यास प्राप्त होते. या संसारातील वस्तूविषयीचे प्रेम, लोभ, इंद्रियसुखेच्छा ही सारी पूर्वजन्मापासून प्राप्त झाली असून ती या संसारातील विपत्तीस व मोहास कारण होत असतात. यास्तव ममत्वमूलक जी लोभवृत्ती तिचे दमन केले असता शांत व निर्दोष अशी अवस्था मनास प्राप्त होऊन पूर्ण स्वास्थ्य, चांगूलपणा आणि ज्ञानही प्राप्त होत असतात. हे सत्यज्ञान ज्यास प्राप्त होईल त्याने आपल्या चित्ताच्या ठायी सर्व प्राणिमात्राच्या संबंधाने नि:सीम प्रेम विकसित होईल असे करण्यास झटावे; कसे तर त्याप्रमाणे माता आपल्या एकुलत्या एक पुत्राचे रक्षण करण्यासाठी आपला प्राणही संकटात घालण्यास तयार होते तसे. अखिल विश्वावर आपणासारखे प्रेम करावे. त्यासंबंधाने भेदाभेद किंवा पक्षपात असा मुळीच चित्तास बसू देऊ नये. ही चित्ताची समता आणि दयार्द्रता आपण कोणत्याही अवस्थेमध्ये कमी होऊ देऊ नये. ही आपली चित्तवृत्ती सर्वोत्कृष्ट होय. ही खऱ्या निर्वाणाची संपादक आहे. इतरांस दुःख देण्याच्या बुद्धीचा सर्वदा त्याग करावा, सद्वर्तन करावे, अंतःकरणातील पापमळ धुऊन टाकावा. हा खरा कैवल्यप्रद धर्ममार्ग होय.''

याप्रमाणे गौतमबुद्धाने केलेला धर्मोपदेश बिंबिसार राजाने चित्त देऊन ऐकिला आणि त्याला येणेप्रमाणे बोलला –

''हे प्रभो, मी राजपुत्र असता माझ्या अंतःकरणामध्ये पाच इच्छा होत्या. माझी पहिली इच्छा अशी होती की, मला लवकरच राज्याभिषेक व्हावा, ही माझी इच्छा पूर्ण झाली. नंतर माझी दुसरी इच्छा होती की, मी या देशावर राज्य करीत आहे तोपर्यंत बुद्धगुरूने माझ्या राज्यात प्रवेश करावा. ही माझी इच्छा पूर्ण झाली आहे. माझी तिसरी इच्छा अशी होती की, बुद्धगुरूने माझ्या राज्यात प्रवेश केल्यावर त्याच्या दर्शनास जाऊन त्याला बहुमानपूर्वक व परम पूज्यबुद्धीने नमन करावे. हीसुद्धा माझी

इच्छा आज पूर्ण झाली आहे. आता चौथी इच्छा अशी होती की, भगवान बुद्धगुरूने मला आपल्या धर्माचा बोध करावा. ही माझी इच्छाही आता पूर्ण झाली आहे आणि माझी शेवटची अत्यंत महत्त्वाची इच्छा अशी होती की, मला बुद्धगुरूच्या धर्मसिद्धांताचे ज्ञान व्हावे. ही माझी इच्छा आता पूर्ण झाली आहे. हे भगवान, आपण जो हा सत्यधर्मबोध केला तो अत्यंत उत्तम व श्रेष्ठ आहे. जनास आजपर्यंत जो भ्रम होतो, तो बुद्धगुरूने नाहीसा केला आहे. जे सत्य आजपर्यंत गूढ असून दुर्ज्ञेय होते, ते आपण प्रकट करून चांगले विशद केले आहे. आजपर्यंत मनुष्य सन्मार्गच्युत होऊन भलत्याच मार्गाने भटकत आले आहेत, त्याला गुरुमहाराज, आपण सन्मार्ग दाखवून देत आहा. अज्ञान रूप अंधकारामध्ये हे सारे जन चाचपडत आहेत. त्यांच्यासाठी आपण हा ज्ञानदीप पेटविला आहे. ज्यांना नेत्र असतील त्यास सत्यमार्ग दिसून त्याचे ते अवलंबन करितील. हे गुरुराज, मी आपणास शरण आहे, आपल्या धर्माचा मी अंगीकार करितो, आपल्या संघाचा मी आश्रय करितो.''

याप्रमाणे बुद्धाचा धर्मोपदेश ऐकून आणि त्याचे अप्रतिम नीतितेज पाहून बिबिंसारराजा त्याचा अगदी अंकित झाला. राजाच्या चित्ताचा असा पालट झालेला पाहून त्याच्याबरोबर आलेले इतर नागरिकजनसुद्धा बुद्धाच्या धर्ममताचा मोठ्या आस्थेने विचार करू लागले आणि त्यापैकी पुष्कळांनी त्याच्या धर्माचा स्वीकार करून नीतीने वागण्याचा निर्धार केला. त्याप्रमाणे बिंबिसारराजाच्या राज्यात सर्वत्र बौद्धधर्माचा प्रसार होऊन सदाचारप्रवृत्तीचे बीजारोपण झाले. पुढे हा राजा बुद्धाच्या धर्माचा आमरण मोठा पुरस्कर्ता व अनुयायी बनून राहिला.

पूर्वोक्त प्रकारे बिंबिसारराजाने बुद्धाच्या धर्माचा स्वीकार केल्यावर त्याच्या चरणी मस्तक ठेवून तो तेथून स्वनगरीत परत गेला. जातेसमयी त्याने बुद्धास करद्वय जोडून अशी विनंती केली की, ''भगवान बुद्धगुरो, उदयिक आपल्या सर्व धर्मबांधवांसमवेत माझ्या मंदिरी पायधूळ झाडून मजबरोबर भोजन करावे.''

नंतर दुसरे दिवशी भोजनाची सिद्धता होताच राजाने बुद्धास निरोप धाडिला की, ''हे जगगुरो, काल विनंती केल्याप्रमाणे आपण आपल्या शिष्यसमुदायासह वर्तमान भोजनास यावे.'' हा राजाचा निरोप मान्य करून बुद्ध आपला झगा चढवून शिष्यसंघासमवेत राजमंदिरी जावयास सिद्ध झाला; परंतु त्याच्या दर्शनास आलेल्या नागरिकजनांची राजमार्गात एवढी गर्दी झाली होती की, त्याला व त्याच्या शिष्यांस एक पाऊलसुद्धा पुढे टाकवेना. मग एक मोठा बळकट ब्राह्मण शिष्य पुढे सरसावून

लोकास एकीकडे लोटून मार्ग करीत पुढे चालला आणि त्याच्या मागून बुद्ध व त्याचे अनुयायी मोठ्या श्रमाने एक–एक पाऊल टाकीत चालले. हा मार्ग करीत चालणारा ब्राह्मणशिष्य जनांस पुढीलप्रमाणे सांगत चालला होता, ''या जगद्गुरूने आपल्या सर्व वासनांचे दमन केले असून याच्याबरोबर जो भिक्षूसंघ चालला आहे त्यातील बहुतेक जन पूर्वी मोठे तपस्वी होते; परंतु त्यास सत्यधर्ममार्गाची प्राप्ती झाली नव्हती. सांप्रत त्यास जो धर्ममार्ग सापडला आहे त्याच्या योगाने त्याच्या चित्ताचे दमन होऊन ते निष्पाप झाले आहेत. हा जगद्गुरू स्वत: पापमुक्त होऊन जन्ममरणादिकाच्या उपाधीपासून सर्वतोपरी मुक्त झाला आहे. हा भवसागर तरून तो पैलतीरी गेला आहे आणि ज्याचे ज्यांनी अनुसरण केले आहे तेसुद्धा निष्पाप होऊन मोक्षाचे अधिकारी झाले आहेत आणि या भवसागरातून उत्तीर्ण झाले आहेत. याप्रमाणे बुद्ध आणि त्याचे सुमारे हजार अनुयायी बिंबिसारराजाच्या मंदिरात येऊन पोचले. भोजन आटोपल्यानंतर राजा बुद्धाच्या जवळ मोठ्या अदबीने बसला आणि हात जोडून म्हणाला, 'गुरुराज, माझे वेणुवन नावाचे विहारवन आहे. ते मी आपणास व आपल्या भिक्षूसंघास राहण्यासाठी देतो. त्याचा आपण कृपा करून स्वीकार करून तेथे राहावे.' हे राजाचे विनययुक्त भाषण ऐकून बुद्ध काहीच बोलला नाही; पण त्याच्या चर्येवरून त्याने ताडिले की, बुद्धास आपली विनंती मान्य झाली. म्हणून त्यास मोठा हर्ष झाला. मग बुद्धाने दरबारात जमलेल्या सर्व जनांस पुनरपि बोध केला आणि तेथून स्वशिष्यासह वेणुवनाप्रत गमन केले.

या वेणुवनात गौतमबुद्ध पुष्कळ दिवस राहत असे. हे उपवन राजधानीपासून फारसे दूर नसून, नगरातील लोकास हवे तेव्हा तेथे जाता येण्याजोगे असे. तरी लोकांच्या रहदारीपासून ते बरेच दूर होते. यामुळे तेथे लोकांची गर्दी किंवा गोंगाट होण्याजोगा नव्हता. ज्याला बुद्धदर्शनास जावेसे वाटे त्यास तेथे सहज जाता येत असे. राजा मनास वाटे तेव्हा येथे जाऊन बुद्धचरणापाशी बसून त्याच्या मुखांतून सदास्त्रवणाऱ्या बोधामृताचे यथेष्ट पान करीत असे. बुद्धदर्शनावाचून त्याचा एकही दिवस सुना जात नसे. या उपवनात राहून बुद्धाने केलेले पुष्कळ उपदेश प्रसिद्ध आहेत.

या समयी राजधानीजवळ सारिपुत्र आणि मौद्गलायन या नावाचे दोघे ब्राह्मण तपस्वी राहत असत. संजय म्हणून कोणी महातपस्वी होऊन गेला, त्याच्या शिष्यमंडळामध्ये हे प्रमुख होते. हे उभय तपस्वी मोक्षसिद्धीचा मार्ग शोधून काढण्यासाठी अहर्निश परिश्रम करीत होते. त्या दोघांनी परस्परात असे अभिवचन दिले होते की, ज्या कोणास मोक्षमार्गाचे ज्ञान होईल त्याने ते दुसऱ्यास विदित करावे.

एके दिवशी बुद्धाचा अश्वजितनामक शिष्य हातात भिक्षापात्र घेऊन मोठ्या नम्रभावेकरून जमिनीकडे पाहत शांत मुद्रेने भिक्षा मागत फिरताना सारिपुत्राने पाहिला. त्याची ती शांत व तेजस्वी मुद्रा पाहून त्याने मनात असा विचार केला की, हा साधू मोठा पवित्र असून मोक्षाचा मार्ग याला सापडला असावा. मग त्याला त्याने मोठ्या लीनतेने प्रणाम करून म्हटले, 'हे श्रमणा, तू जी ही संन्यासवृत्ती धारण केली आहेस ती कोणाच्या उपदेशावरून? तुझा गुरू कोण? कोणत्या पंथाचा त्वा स्वीकार केला आहेस?' अश्वजित म्हणाला, 'शाक्यराजवंशातील प्रख्यात श्रमण गौतमबुद्ध तो माझा परमपूज्य गुरू होय. त्याच्या पंथाचा मी स्वीकार केला आहे.' तेव्हा सारिपुत्राने त्याला पुन्हा पुसले, 'हे मित्रा, तुझ्या गुरूचा तुला काय उपदेश आहे बरे?' तो म्हणाला, 'मी केवळ नवशिक्या आहे. मी संन्यासवृत्ती धारण केल्यास अगदी थोडे दिवस झाले. मी त्याच्या पंथाचा नुकताच अंगीकार केला आहे. यास्तव त्याने उपदेशिलेल्या धर्ममतांचे विवरण मला पूर्णत्वेकरून करिता यावयाचे नाही; परंतु पाहिजे असल्यास त्यांचे रहस्य मी तुला अगदी संक्षेपाने सांगतो.' सारिपुत्र म्हणाला, 'हे मित्रा, तुजपासून मी ते रहस्यच जाणू इच्छितो. मला विस्ताराची अपेक्षा नाही.' यावरून अश्वजिताने त्याला पुढील साररूप सिद्धांत सांगितला.

'या विपन्मूलक संसृतीचे कारण काय व तिचा अंत कसा होईल हे आमच्या गुरूच्या धर्मपंथात स्पष्टपणे सांगितले आहे.'

हे रहस्य ऐकून सारिपुत्र लागलीच उमजला की, ज्याला उत्पत्ती आहे, त्याला निश्चयेकरून विनाश आहे आणि मग तो अश्वजितास म्हणाला, 'तू स्वीकारिलेल्या पंथाचे रहस्य एवढेच असल्यास तुला दुःखविरहित अशी स्थिती अवश्य प्राप्त होईल.'

इतका त्या दोघांचा संवाद झाल्यावर सारिपुत्र आपला पुत्र जो मौद्गलायन त्याजपाशी येऊन म्हणाला की, या संसृतीपासून मुक्त होण्याचा मार्ग गौतमबुद्ध नामेकरून एक श्रमण जनांस सांगत आहे, आपण त्याच्यापाशी जाऊन त्याचे काय म्हणणे आहे ते ऐकू. त्यांचा गुरू संजय याला त्यांचा उद्देश समजला, तेव्हा त्याने त्यांचे मन फिरविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण त्यांनी त्याचे मुळीच ऐकिले नाही. मग त्यांनी आपल्याबरोबर दुसरे पुष्कळ तपस्वी घेऊन बुद्ध होता त्या उपवनात प्रयाण केले आणि बुद्धास विनम्रभावे करून साष्टांग प्रणिपात करून आपला येण्याचा उद्देश कळविला. तेव्हा बुद्धाने त्याला यथोचित उपदेश करून आपल्या शिष्यसंघात सामील केले. या दोघांस बुद्धाने पुढे आपल्या संघात प्रमुख स्थान दिल्यावरून त्याच्या कित्येक जुन्या शिष्यांच्या

मनात वैमनस्य आले. तेव्हा गौतमाने आपल्या सर्व शिष्यांस एकत्र करून त्यांची सभा केली आणि त्यास उपदेश करून त्यांच्या मनातले किल्मिष काढून टाकिले. यावेळी बुद्धाने त्याला मोक्षसिद्धीस अवश्य लागणाऱ्या साधनांचा बोध केला. या बोधाचे सार पुढील वचनात संकलित केले आहे. ''कधी कोणास दुःख देऊ नये. सदाचाराचे अवलंबन करावे. चित्तातील पापवासना धुऊन टाकाव्या. हे माझ्या धर्माचे सार आहे.'' यावेळी आपल्या भिक्षुसंघाच्या नियमनासाठी त्याने काही नियमही केले. याप्रमाणे बुद्धाच्या अनुयायी संघास पहिल्यानेच व्यवस्थित स्वरूप आले. या शिष्यजनांच्या सभेस श्रावकसंनिपात असे म्हणतात.

बुद्ध वेणुवनात राहून राजधानीतील जनांस निरंतर धर्मोपदेश करीत असे. त्याच्या बोधाने पुष्कळ तरुण पुरुषांचे चित्त पालटून ते धर्माचरणाकडे वळले आणि आपले आचरण नीतिशुद्ध ठेवण्याविषयी अहर्निश झटू लागले; पण त्यामुळे त्या नगरीतील पुष्कळ कुटुंबे खराबीस आली. कोणाचे तरुण होतकरू मुलगे विरक्त बनून संसाराचा त्याग करून बुद्धाचे अंतेवासी झाले. कित्येक कुटुंबाचे भरणकर्ते संसाराचा व्याप सोडून बायकामुलांना सोडून गेले. कित्येक तर मुळीच संसारास आरंभ करावयाचा नाही असा निर्धार करून विरागी बनले. याप्रमाणे कुटुंबीजन संसारास त्रासून बुद्धाला जाऊन मिळाल्यामुळे पुष्कळ कुटुंबास मोठे हाल सोसावे लागले. यामुळे बुद्धाचे अनुयायी भिक्षा मागण्यास आले म्हणजे नगरीतील लोक त्यांचा तिटकारा करीत आणि म्हणत की, 'तुमच्या गुरूने शेकडो-हजारो लोक अगदी वेडे-खुळे करून सोडले आहेत. आज कोणावर धाड यावयाची आहे बरे? या मगध देशातील चांगले हुशार व होतकरू तरुण पुरुष विरागी बनल्यामुळे आमचे मोठेच नुकसान झाले आहे.' अशी बुद्धशिष्यांची जिकडे-तिकडे अवहेलना होऊ लागली व लोक त्यांच्यावर दात-ओठ खाऊ लागले. तेव्हा त्यांनी बुद्धाला ते सर्व वर्तमान कळविले. ते ऐकून बुद्ध त्यास म्हणाला, 'ते तुमचा तिरस्कार फार दिवस करणार नाहीत. ते तुमचा उपहास करू लागले असता तुम्ही त्याचे एवढेच उत्तर करा की, आमचा गुरू केवळ सत्यधर्माचा उपदेश जनांस करून त्यांची मने वळवितो. ज्ञान व सदाचार यांचे खरे महत्त्व आपल्या उपदेशाने व आपल्या आचरणाने तो जनांच्या चित्तावर ठसवितो. मनोनिग्रह करा; नीतीने वागा, आपले अंतःकरण शुद्ध राखा, असा आमच्या गुरूचा बोध आहे. या बोधामुळे जनांचे चित्त पालटले तर त्यात आमच्या गुरूचा काय दोष बरे? याप्रमाणे गुरू जनांत सदाचरण व पवित्रता यांचा प्रसार करण्यास झटत असता व केवळ

लोककल्याणाच्या अनन्य हेतूने मोठ्या कळवळ्याचा उपदेश करीत असता, त्यास तुम्ही का म्हणून दोष देता? तो काही कोणावर जुलूमजबरी करीत नाही; तर तो केवळ सत्याचा बोध जनास करीत असतो, ज्यास तो बोध खरा वाटतो, ते त्याच्या धर्मपंथाचा स्वीकार करीतात.'

हा असा जनापवाद बुद्धधर्मप्रसाराच्या संबंधाने लोकांत प्रसृत होणे स्वाभाविक होते. कारण पूर्वकालच्या वैदिक धर्माप्रमाणे पाहता ब्रह्मचर्य फक्त तरुण विद्यार्थिजनास व संसारातील सुख-दुःख अनुभवून श्रांत झालेल्या वयोवृद्ध जनास विहित केले होते आणि मोठमोठे तपस्विजन आपला तपोमार्ग कठीण व्रतादिकांच्या योगाने इतका बिकट करून सोडीत की, सामान्य जनास त्यांचे अनुकरण करणे केवळ अशक्य असे. यामुळे बहुजन समाज गृहस्थाश्रमाचा पूर्ण अनुभव घेत असे; परंतु बुद्ध जो जनास उपदेश करी, त्यात या संसारातील निरनिराळ्या विपत्तीचे वर्णन मोठे खुलवून करून, त्यांच्या चित्तात संसाराविषयी किळस व तिरस्कार उत्पन्न करी आणि संसाराचा सर्व व्याप सोडून आपल्या संघात सामील झाल्याने शांती व स्वास्थ्य यांचा अनुभव घडून संसृतिजन्य विपत्तीपासून त्यांची मुक्तता होईल असे तो त्यांस सप्रमाण दाखवून देई. यामुळे संसाराच्या तापाने त्रस्त झालेल्या जनांस त्याचा बोध उत्तम वाटून ते त्याच्या धर्मपंथाचा अवलंब करीत आणि ज्याप्रमाणे स्वत: बुद्धाने एवढ्या मोठ्या ऐश्वर्यास व संसारसुखास लाथ मारून भिक्षुवेश धारण केला व आपले शेष जीवित लोकांत सदाचार व पावित्र्य यांचा प्रसार करण्यात वेचावयाचे असा निर्धार केला, तद्वत आपणही करावे असे त्यांच्या मनात येई.

असो, तर याप्रमाणे प्रथमत: मगध देशातील लोकांच्या मनात बुद्धाविषयी अत्यंत आदरबुद्धी व पूजत्वभावही उत्पन्न झाला असून, पुढे कित्येक लोकांच्या लक्षात जेव्हा असे आले की, या नव्या धर्मगुरूच्या नादास पुष्कळ तरुण व प्रौढ वयातले कुटुंबीजन लागून सारा देश ओस पडण्याचा संभव आहे, तेव्हा ते त्याच्या पंथाचा उपहास करू लागले व त्याचा बोध ऐकण्यास फारसे लोक जातनासे झाले.

या समयास अनाथपिंडकनामे करून एक मोठा धनाढ्य गृहस्थ राजगृहनगरीस आला. हा गृहस्थ मोठा दयाळू असून पुष्कळ दानधर्म करीत असे. त्याच्या या स्वभावास्तव त्याला लोक पोरके व अनाथ यांचा वाली म्हणत असे. त्याने गौतम बुद्धाची कीर्ती पूर्वी पुष्कळ ऐकिली होती. तो राजगृहनगरीत आला तेव्हा लोकांनी सांगितले की, नगराबाहेर जवळच वेणुवनात गौतमबुद्ध आपल्या संघासह राहत असतो.

हे वर्तमान त्याच्या कानी पडताच तो त्याच्या दर्शनार्थ तात्काळ गेला. बुद्धाने त्याचा आदरमान करून त्यास आपल्या समीप बसवून घेतले आणि त्यास पुढीलप्रमाणे उपदेश केला–

''हे जग सर्वकाळ प्रपंचाच्या घालमेलीत गुंतले आहे. त्यास स्वास्थ्य कसे ते मुळीच नाही. सर्व विपत्तीचे कारण ते हेच आहे. तर अखंड अविनाशी शांतीच्या योगाने जे चित्तस्वास्थ्य लाभण्यासारखे आहे, त्याच्या प्राप्तीसाठी अहर्निश यत्न करावा. आत्मतत्त्व जे आहे ते विविध गुणांचे संघरूप असून ज्यास आत्मलोक म्हणतात ते केवळ आभासवत होय. हे आपले जीवित कोण निर्माण करितो बरे? याचा उत्पन्नकर्ता कोणी व्यक्तिभूत ईश्वर आहे अशी कल्पना केल्यास समग्र जीवसृष्टीने निमूटपणे त्या उत्पन्नकर्त्याच्या अगदी कह्यात राहिले पाहिजे. सारे जीव कुंभाराने घडविलेल्या घटाप्रमाणे समजले पाहिजेत. असे ते सर्वथा परतंत्र असल्यास त्यांच्या हातून सद्वर्तन व्हावे कसे? पुन्हा हे जगत ईश्वराने निर्माण केले असल्यास त्यास दु:ख, संकटे अथवा अनाचार यांचा लेशही नसावा; कारण ज्याअर्थी सर्वकाही त्याच्या हातून निर्माण होते त्याअर्थी सर्व शुद्धाशुद्ध कर्माचे कर्तृत्वही त्याच्या ठायीच आरोपिले पाहिजे. तर हे कर्तृत्व त्याचे नव्हे म्हणावे तर त्याहून अन्य कोणी तरी ह्या कर्तृत्वाचे कारण आहे असे मानावे लागेल. असे मानिल्यास ईश्वर स्वयंभू आणि अनन्य नाही असे म्हणावे लागून अनवस्थादोष उत्पन्न होतो. तेव्हा अर्थात जगत्कर्ता कोणी ईश्वर आहे ही कल्पना भ्रममूलक व निराधार आहे असे सिद्ध होते. आणखी असे की, निर्विकल्प निर्विकार ईशशक्तीने आम्हास निर्माण केले आहे असे म्हणतात; पण जी शक्ती निर्विकल्प असते ती कोणत्याही गोष्टीचे कारण होऊ शकत नाही. ती कारण आहे असे कल्पिल्यास तिचे निर्विकल्पत्व व निर्विकारत्व नष्ट होते. आपल्या आसमंतात असलेले समग्र वस्तुजात भिन्न–भिन्न कारणाचे कार्यरूप आहे. या साऱ्या वस्तूंचे अनन्य कारण एक निर्विकल्प ईशशक्तीच आहे असे मानणे रास्त नव्हे. कारण एका कारणापासून एवढी अगणित भिन्न कार्ये उद्भवणे शक्य नव्हे. पुन्हा ही ईशशक्ती अखिल वस्तुजातात अनुस्यूत आहे म्हणावे, तर ती त्यास निर्माण करीत नाही असे मानावे लागते.

''परमात्मा सर्व विश्वाचा कर्ता आहे, असे आहे तर त्याने हे विश्व आनंदमय का केले नाही. पुन्हा आनंद आणि दु:ख याची कारणे वास्तविक असून इंद्रियगोचर आहेत. तेव्हा ती परमात्मशक्तीने निर्माण केली असे कसे म्हणता येईल?'

''पुन्हा कोणी असे प्रतिपादन करितात की, विश्वाचा कोणी कर्ता नसून आपणास जी इष्टनिष्ट स्थिती प्राप्त होते ती सारी यदृच्छायोगे करून होय. ती केवळ अकारण आहे; परंतु हा कोटिक्रम गृहीत केल्यास मग आपल्या आचरणाचे नियमन करून केवळ सद्हेतू चित्तात वागवून, तत्सिद्ध्यर्थ प्रयत्नशील होण्याचे प्रयोजन कोठे उरले? यास्तव आमचे असे म्हणणे आहे की, विश्वामध्ये अस्तित्वात असलेल्या एकंदर वस्तूंची उत्पत्ती कारणावाचून नाही. ईश्वर, निर्विकल्प ईशशक्ती, परमात्मा आणि अकारण यदृच्छायोगे यापैकी कोणीही त्याचे कारण संभवत नाही. तर हा सारा विस्तार आमच्या कर्मापासून उद्‌भवला आहे. आम्हास घडणाऱ्या समग्र इष्टनिष्ट गोष्टी आमच्या कर्माचे परिणाम होत.

''हे समग्र विश्व कार्यकारणनियमांनी बद्ध आहे. ज्या कारणाच्या योगाने ही कार्यपरंपरा अस्तित्वात येत असते ती कारणे केवळ बाह्य नव्हेत, तर ती उपादान कारणे होत. उदाहरणार्थ ज्या सुवर्णाचा अलंकार बनतो तो त्या अलंकाराचे सर्वांग बनलेले असते. त्या अलंकाराचा कोणताही अंश घेतला तरी त्यात सुवर्ण नाही असे म्हणवेल काय?

''यास्तव ईश्वराची पूजाअर्चा व आराधना करण्याचा उपदेश ज्या धर्मात केला आहे, त्याचा आपण अव्हेर करू. ज्यात काहीच अर्थ नाही अशा सूक्ष्म व क्लिष्ट कोट्या काढण्याच्या नादी लागू नये, तर आपण आपला अहंभाव व स्वार्थपणा याचा त्याग करावा आणि ज्या अर्थी सर्वकाही कार्यकारणनियमाप्रमाणे घडत राहणार त्या अर्थी आपण सदाचार करावा म्हणजे आपल्या सत्कर्माचा परिणाम चांगला होऊन मोक्षप्राप्ती होईल.''

हा बुद्धकृत बोध श्रवण करून अनाथपिंडिक अतिनम्र भावाने बोलला, 'महासाधो बुद्धगुरो, आपण परमज्ञानी असून जनांच्या खऱ्या कल्याणाचा आपण बोध करिता, अशी आपली कीर्ती बहुत दिवस मी ऐकत होतो. आज माझे भाग्योदय होऊन मला आपले परम पावन दर्शन घडले, तर आता माझे हृदय मी आपणास प्रांजळपणे निवेदन करितो. माझी विज्ञप्ती श्रवण करून मला योग्य दिसेल तो बोध करा. मी आपले सारे जन्म उद्योगधंद्यात घालविले. मला पुष्कळ संपत्ती प्राप्त झाली असून बहुत गोष्टीच्या संबंधाने मी सर्वदा चिंतातुर असतो; तरी पण मला माझा धंदा मनापासून आवडतो आणि तो मी मोठ्या दक्षतेने व हुशारीने करीत असतो. बहुत लोक माझ्या पदरी नोकरीस असून त्याचे उदरपोषण केवळ माझ्या उद्योगावर चालले आहे. माझ्या

उद्योगात मला बरकत येईल त्या मानाने त्यास सुख लाभणार आहे. तुमचे शिष्य संन्यासाश्रमातील सौख्याची वाखाणणी करितात आणि ह्या जगातील विपत्तिमूलक जंजाळाचा निषेध करितात. महाराज, आपण आपल्या राज्याचा त्याग करून व पितृप्राप्त साऱ्या ऐश्वर्याचा अव्हेर करून, हा धर्ममार्ग स्वीकारिला आहे. हे आपले प्रत्यक्ष उदाहरण सर्व लोकांनी अनुकरण करण्यासारखे आहे. आपल्या सन्मार्गाचा निश्चयाने अंगीकार केला असता, आपण म्हणता ती निर्वाण पदवी मनुष्यास प्राप्त होईल यात किंचित संदेह नाही. माझ्याकडून सद्वर्तन व्हावे अशी मला अत्यंत उत्कंठा लागली आहे. माझे जीवित माझ्या देशबांधवांच्या उपयोगी पडावे अशी मला उत्कट इच्छा आहे. तर हे गुरुराज, मला सांगा की, धर्माचरण करून सौख्यप्राप्ती करून घेण्यासाठी माझे वित्त, माझे कुटुंब, माझे अर्थप्राप्तीचे उद्योग यांचा त्याग करून मी आपल्यासारखा फटिंग व्हावे काय?'

हा त्याचा प्रश्न ऐकून बुद्ध म्हणाला, 'जो कोणी माझ्या अष्टविध धर्ममार्गाचे अवलंबन करितो त्याला मी सांगतो त्या धर्माचरणमूलक सौख्याची प्राप्ती अवश्य घडेल. ज्याच्या हृदयाच्या ठायी वित्तप्रीती अनावर वसत असेल त्याने वित्ताचा सर्वस्वी त्याग करणे उचित होय; परंतु एखाद्या मनुष्याच्या ठायी वित्तभिलाष यत्किंचितही वसत नसून त्याच्यापाशी कितीही वित्तसंचय असला तरी त्याचा तो योग्य विनियोग करीत असेल तर तो आपल्या देशबंधूंच्या सुखास अनेक प्रकारे कारण होईल. तर हे वणिक श्रेष्ठा, तू सांप्रत ज्या सांसारिक स्थितीत आहेस तिचा त्याग करू नको. तू आपला उद्योगधंदा सुखे चालीव. त्यात लवमात्रही हेळसांड करू नको. मनुष्यास जो बंध प्राप्त होतो तो काही संसार, वित्त किंवा अधिकार याचा अनुभव घेत राहिल्यानेच केवळ होत नसतो; तर या गोष्टीविषयी चित्तात अमर्याद प्रेम वसू दिल्याने त्यास बंध आणि विपत्ती ही प्राप्त होतात. जो कोणी संसाराविषयी कर्तव्यास त्रासून भिक्षुवेश धारण करून निवृत्ती मार्गाचा आश्रय करितो आणि आपले जीवित कोठे तरी स्वस्थपणे पडून वेचितो, त्याला त्यात काही हितलाभ व्हावयाचा नाही. कारण काहीएक उद्योग न करिता केवळ आळसात ज्याचा काळ जातो त्याची ती स्थिती अत्यंत निंद्य होय. अशा मनुष्याच्या ठायीची नैसर्गिक शक्ती क्षीण होऊन तो सर्वथैव निरुपयोगी व तिरस्कारास पात्र होतो. मी ज्या धर्ममार्गाचा जनांस बोध करण्यास प्रवृत्त झालो आहे, त्याचा जो स्वीकार करू जाईल, त्याने गृहत्याग करून संसारापासून निवृत्त झालेच पाहिजे असे नाही; परंतु ही निवृत्ती साधल्यावाचून त्याच्या हातून धर्माचरण होण्याची

मुळीच शक्यता नसेल तर त्याने मात्र संसाराचा त्याग अवश्य करावा. ज्याला माझ्या धर्ममार्गाचे अनुसरण कर्तव्य असेल त्याने अहंपणाचा त्याग करावा. आपले हृदय शुद्ध करावे; सुखतृष्णेचा उच्छेद करावा आणि सदाचाराचा अवलंब करावा. कोणत्याही स्थितीत असला तरी माझ्या धर्ममार्गाचे अनुसरण करण्यास तो योग्य आहे असे मी समजतो; मग तो संसारातले निरनिराळे व्यवसाय करीत असला किंवा संसारत्याग करून, निर्जन अरण्यातील गिरिकुहरात बसून ध्यानधारणादी करीत असला, तो ज्या कार्यात निमग्न असेल ते कार्य त्याने मनापासून करावे. त्यात त्याने कुचराई किंवा हेळसांड मुळीच करू नये. कोणतीही चांगली गोष्ट करणे, ती उत्साहाने करावी. मात्र एवढेच की, उदकाच्या ठायी निर्माण झालेले कमलपुष्प जसे उदकाच्या संपर्कापासून दूर राहते, तद्वत त्याचे ह्या संसारामध्ये वर्तन असावे. स्वजीवितरक्षणासाठी त्याने कोणताही उद्योग करावा; पण तो करिताना दुसऱ्याचा द्वेष किंवा मत्सर करू नये; त्याने आपल्या स्वार्थपरतेस आळा घालून ही संसारयात्रा सत्यमार्गाने करावी. असे तो करील तर त्याच्या चित्तास ठायी आनंद, शांती व सौख्य याचे वास्तव्य निश्चयाने होईल.'

हा बुद्धाचा उपदेश श्रवण करून अनाथपिंडिकाचे हृदय हर्षभरित झाले आणि तो म्हणाला, 'गुरुवर्य, मी कोसलदेशाची राजधानी श्री श्रावस्तीनगरी येथे राहतो. महाराज, हा देश मोठा सुपीक असून तेथे सर्वत्र शांतता आहे. या देशाचा राजा प्रसेनजित नामेकरून आहे. हा राजा मोठा स्वप्रजाप्रिय असून त्याची कीर्ती आसपासच्या देशांत पुष्कळ पसरली आहे. आपल्या धर्माचे अवलंबन करून जे जन आपल्यासारखे संसारपराङ्मुख झाले असतील, त्यांच्यासाठी एक विहारस्थान त्या राज्यात स्थापावे अशी माझी उत्कट इच्छा आहे. तर हे अधिगुरू, दासाची ही अल्पमात्र देणगी कृपा करून अवश्य स्वीकारावी.'

त्या सावकाराची परोपकारबुद्धी बुद्धास चांगली अवगत होती आणि तो केवळ निरपेक्षबुद्धीने दानधर्म करितो अशी त्याची ख्याती त्याने ऐकिली होती. ह्याचे परम उदात्त वृत्तीस अनुसरून त्याने विहार स्थापण्याची गोष्ट काढिली आहे असे मनात आणून बुद्धाने त्याच्या त्या देणगीचा आदरपूर्वक स्वीकार केला आणि त्यासमयी त्याने पुढीलप्रमाणे भाषण केले –

''जो पुरुष अन्य जनास दानधर्म करितो, त्याच्यावर सर्व लोक प्रेम करितात. त्याचा स्नेह घडला असता तो मोठा अमोल लाभच समजावयाचा. अशा परोपकारी

मनुष्याचे चित्त मरणसमयी स्वस्थ व आनंदयुक्त राहते. कारण त्याला त्यावेळी कृतकर्माचे स्मरण होऊन अनुताप होत नसतो, तर त्याच्या हातून मनुष्याचे कल्याण आमरण झाले असल्याकारणाने त्याचे चित्त अंतसमयी प्रफुल्लित व शांत राहते. आपण भोजनास बसलो असता तेथे कोणी गरीब मनुष्य क्षुधाविष्ट होऊन आला तर त्यास आपल्या पुढे वाढलेले अन्न दिल्याने आपण अन्नसेवन न करूनही आपणास मोठी हुशारी आल्यासारखे वाटते व चित्त प्रसन्न होते. कोणी गरीब मनुष्य थंडीने काकडताना पाहून त्याला आपल्या अंगावरचे वस्त्र दिल्याने आपल्या अंगावर वस्त्र नसूनही आपण बहुमोल पेहराव केला आहे असे वाटू लागते. त्याचप्रमाणे जो कोणी पवित्र आणि सन्मार्गवर्ती जनाच्या सोईसाठी निवासस्थाने बांधण्यामागे स्ववित्तव्यय करितो, त्याला मोठाच धनलाभ झाल्यासारखे वाटू लागते.

''दानधर्म करणे हा योग्य समय पाहून योग्य रीतीने करणे इष्ट होय. शौर्य आणि वीर्ययुक्त असा पुरुष ज्याप्रमाणे स्वदेशावर परचक्र आले असता स्वत:च्या जीविताची किंवा सौख्याची पर्वा न करिता समरभूमीवर जाऊन शत्रूंशी रणसंग्राम करितो, तद्वतच दानशूर पुरुषाची कृती असते. कोणी विपन्न जन त्याच्या दृष्टीस पडले असता, त्यांची ती विपत्ती दूर करण्यास तो तात्काळ प्रवृत्त होतो. त्याचे चित्त पराकाष्ठेचे कळवळून गेल्यामुळे आपल्या जवळच्या वित्ताचा कितीही क्षय झाला तरी त्याची त्यास लवमात्रही क्षती वाटत नाही. खरा दानशूर पुरुष असतो तो दान करिते वेळी किंवा नंतर कधीही प्रतिग्रह करणाऱ्या जनांची यत्किंचितसुद्धा अवहेलना किंवा उपमर्द करीत नाही. त्यास जे काही साहाय्य करावयाचे ते तो मोठ्या प्रेमाने, सहृदय अंत:करणाने व दयार्द्रबुद्धीने करितो. त्याच्याकडे कोणी साहाय्य मागावयास आला असता, त्याचा त्याला राग येत नाही किंवा त्याचा तो तिरस्कार करीत नाही. असा दानशूर पुरुष मोक्षमार्गाचा अधिकारी होतो. तो जे परोपकृतिरूप वृक्ष लावितो त्याची आनंददायी छाया, मनोरम पुष्पे आणि सुखकर फले यांच्या योगाने पुढे कैक वर्षांपर्यंत इतर जन आराम पावतात. असा दानशूर पुरुष खरोखरी धन्य होय. अनाथ जनास केवळ शुद्ध मनाने, यथाशक्ती साहाय्य केल्याने त्याला प्राप्त होणाऱ्या आनंदास पारावार नाही. निर्वाणप्राप्ती अशा पुरुषास सहज होते जो दयाभूत अंत:करणाने अन्य जनास साहाय्य करण्यात आपले जीवित वेचितो, त्यास मोक्षमार्गाची सिद्धी घडते. दया आणि दानशूरता या सद्प्रवृत्तीचा त्याच्या ठायी विकास होऊन त्याच्या आत्म्याची उन्नती होते.''

याप्रमाणे बुद्धकृत उपदेशाचे ग्रहण करून अनाथपिंडिक स्वदेशी जावयास निघाला. जाते वेळी त्याने सारिपुत्र याला आपल्या बरोबर बोलाविले आणि त्याच्याकरवी

अत्यंत रमणीय असे स्थळ निवडून तेथे त्याने एक चांगले विहारस्थान तयार केले. हे स्थळ अनाथपिंडिकास जेतनामक राजपुत्रापासून मोठ्या कष्टाने विकत घ्यावे लागले. या स्थळी त्या राजपुत्राचे अत्यंत रमणीय उपवन असून ते त्याला अतिशयित आवडत असे. म्हणून पहिल्याने ते तो त्या सावकारास विकिना; फरंतु त्याचा फारच आग्रह पाहून राजपुत्र त्यास म्हणाला: 'ही जमीन आच्छादण्यास जेवढे सुवर्ण लागेल तेवढे मोल घेऊन ती मी तुला देईन, एरवी देणार नाही.' अनाथपिंडिकास ही अट कबूल होऊन तो त्या उपवनाच्या भूमीवर सुवर्ण पसरू लागला. हे त्याचे कृत्य पाहून राजपुत्र चकित झाला. त्याला वाटले की, त्या सावकारापाशी इतके द्रव्य नसेल; फरंतु त्याला लोकांनी सांगितले की, त्याचे वित्त मोठे प्रचंड आहे. तेव्हा तो राजपुत्र त्याला म्हणाला : 'तू हे सोने पसरण्याचे श्रम घेऊ नको. मी तुला एवढ्या मोलाला हे उपवन देणार नाही. द्रव्य घेऊन ते विकण्याची माझी खुशी नाही.' झालेला करार रद्द करण्याचा त्याचा हा असा मानस पाहून अनाथपिंडिकाने त्यास निक्षून सांगितले की, तुला आपला करार पाळलाच पाहिजे. तेव्हा त्या उभयतांमध्ये वाद पडून, तो तोडण्यासाठी त्यांनी राजापाशी जाण्याचे ठरविले; फरंतु पुढे त्या सावकाराच्या सद्वर्तनाची व सचोटीची ख्याती ऐकून व त्याला ते उपवन कशासाठी हवे आहे हे समजून तो राजपुत्र म्हणाला : 'अनाथपिंडिका, तुझा उद्देश परम स्तुत्य आहे. तुला हे माझे उपवन मी मोठ्या आनंदाने विकतो; पण ज्या अर्थी तू ते महागुरू गौतमबुद्ध यास अर्पण करणार आहेस त्याअर्थी या तुझ्या उदार देणगीत माझाही अल्पस्वल्प भाग असावा अशी माझी उत्कट इच्छा आहे. तर तुझ्यापाशी जे मोल मी मागितले आहे, त्यातले अर्धे मोल घेऊन या उपवनाची भूमी मी तुला विकतो आणि त्यातील सारे वृक्ष मी बुद्धगुरूस माझ्या वतीने अर्पण करितो.'

ते उपवन मिळाल्यावर अनाथपिंडिकाने ते सारिपुत्राच्या स्वाधीन केले आणि तेथे बुद्धाने सांगितले होते त्याप्रमाणे विहारस्थान तयार केले. ह्या विहारस्थानास पुढे जेतवन असे नाव पडले. या स्थानी बुद्धाच्या शिष्यसंघासाठी करवतील तेवढ्या सोयी त्या सावकाराने पुष्कळ वित्त खर्चून केल्या. या विहारस्थानी बुद्ध पुष्कळ वर्षे राहिला.

इकडे बुद्ध राजगृहनगरीत असता त्याचा पिता शुद्धोदन याने त्याला असा निरोप धाडला की, माझा अंतसमय समीप आला आहे; तरी माझ्या मनातून तुला एकदा पाहावे असे आहे. इतर जनास तुझ्या धर्ममार्गापासून लाभ झाला आहे. तो मी जो तुझा पिता त्याला आणि तुझ्या इतर संबंधीजनाला त्वा अवश्य करून द्यावे. कमलपुष्प जसे सूर्योदयाची प्रतीक्षा करीत असते, तद्वत मी तुझी मार्गप्रतीक्षा करीत आहे.

हा स्वपित्याचा निरोप ऐकून बुद्धाने कपिलवस्तू नगरीस जाण्याचा तात्काळ निश्चय केला. इकडे बुद्ध स्वनगरीत येणार असे ऐकताच तेथल्या नगरवासी जनास परम आनंद वाटला. त्याला कळलेच होते की, स्वनगरीचा त्याग करून वनाप्रत गेल्यावर सिद्धार्थाने धर्मशोध करून सत्य मोक्षमार्गाची निवड केली असून, त्या मोक्षैकभूत धर्ममार्गाचा उपदेश तो जनास करीत आहे. स्वपुत्र नगरीसन्निध आला असे ऐकून शुद्धोदन आपली प्रधानमंडळी व संबंधीजन घेऊन त्याला नगराबाहेर सामोरा गेला. त्याला त्याने दुरून पाहिले तेव्हा त्याचे मनोहर रूप व अलौकिक तेज पाहून तो चकित झाला आणि त्याचे चित्त हर्षभरित झाले. सिद्धार्थ जवळ आला पाहून राजा रथातून खाली उतरला आणि त्याला आलिंगन करून म्हणाला, 'तू मजकडून गेल्यास आज सात वर्षे झाली. तुझी भेट केव्हा होईल असे मला होऊन गेले होते.' नंतर ते नगराबाहेरील एका राईत एकमेकांच्या समोरासमोर बसले. राजा त्याच्याकडे एकसारखा टकमक पाहत राहिला. त्याच्याने एक शब्दही बोलवेना. त्याचे ते अप्रतिम तेज पाहून तो मनातल्या मनात कौतुक करू लागला. हा असा तेज:पुंज व कीर्तिमान पुरुष आपणाशी पुन्हा पुत्रधर्माने वागून आपल्यापाशी सतत राहील तर आपण किती धन्य होऊ, असा विचार त्याच्या मनात आला; परंतु बुद्धाची ती वृत्ती व निश्चय पाहून त्याच्याने आपल्या मनातला विचार त्याला उघडपणे बोलून दाखवेना. शेवटी राजा त्याला म्हणाला: 'हे सिद्धार्थ, मी तुला माझे राज्य अर्पण करण्यास तयार आहे; परंतु तू ते मृत्तिकेसमान लेखीत आहेस हे मी पूर्णपणे जाणून आहे'.

हे स्वपित्याचे प्रेमोद्‌गार श्रवण करून बुद्ध म्हणाला, 'आपले हृदय पुत्रस्नेहाने अगदी भरून गेले आहे. आपणाला स्वपुत्रवियोगास्तव पराकाष्ठेचा खेद होत आहे; हे मी पूर्णपणे जाणतो; फरंतु ह्या आपल्या पुत्रविषयक स्नेहभावाचा परिपाक अन्य रीतीने व्हावा अशी माझी उत्कट इच्छा आहे. मी ज्या व्यवसायामध्ये सांप्रत गुंतलो आहे, त्यात समग्र मानवजातीचे कल्याण होण्यासारखे आहे. तेव्हा आपल्या ठायी एकट्या मजविषयी जशी ममता वसत आहे, तद्वतच संसारासंबंधी क्लेशांनी कष्ट पावणाऱ्या इतर जनांचीही दया आपणाला अवश्य यावी. माझे शेष जीवित मनुष्यजातीच्या कल्याणात वेचावे असे आहे. अज्ञ जनाला सत्य ज्ञानाची प्राप्ती करून देऊन विपत्तीपासून मुक्त करावे हे माझे परम कर्तव्य आहे असे मी समजतो. त्यापासून परावृत्त करण्यास आपले मर्जीविषयीचे उत्कट प्रेम समर्थ होणार नाही.'

हे स्वपुत्राचे निश्चयाचे भाषण ऐकून आणि त्याचा परम उदात्त संकल्प समजून त्याचे नेत्र प्रेमाश्रूंनी भरले. त्याचा कंठ सद्‌गदित झाला आणि त्याने त्याला एवढेच

उत्तर दिले की, 'हा तुझ्या वृत्तीत झालेला पालट अत्यंत विलक्षण होय. तुझी नि:सीम निवृत्तिपरता आणि अखिल मानवजातीचे स्वबुद्धीप्रमाणे व स्वसामर्थ्यानुरूप कल्याण करण्याचा दृढ संकल्प पाहून माझ्या चित्तातील सारा शोक नाहीसा झाला आहे. माझ्यासारख्या य:कश्चित पुरुषाच्या उदरी असा लोककल्याणकर्ता पुरुष निर्माण व्हावा यातच मला मोठी धन्यता वाटत आहे. जगाची विपत्ती पाहून तुझे चित्त कळवळून, तू ती नाहीशी करण्याचा मार्ग शोधून काढून, त्याचा जनास उपदेश करण्यासाठी राज्याधिकाराचा व माझ्यासारख्या वृद्ध पित्याचा त्याग केलास त्याबद्दल मी तुला इत:पर यत्किंचितही दोष देणार नाही,' असे बोलून राजा स्वपरिवारासह तेथून निघून गेला आणि बुद्ध त्या राईतच स्वशिष्यांसह वर्तमान राहिला.

दुसरे दिवशी नित्यक्रमाप्रमाणे बुद्ध आपल्या हातात भिक्षापात्र घेऊन नगरीमध्ये भिक्षेसाठी फिरावयास निघाला. तो घरोघर भिक्षा मागत चालला असता, त्याला पौरजनांनी ओळखले आणि राजापाशी धावत जाऊन सांगू लागले की, सिद्धार्थ आपल्या हातात भिक्षापात्र घेऊन नगरात भिक्षा मागत फिरत आहे. हे वर्तमान ऐकून राजा तात्काळ बुद्ध फिरत होता तेथे आला आणि त्याला म्हणाला: 'हे असे भिक्षापात्राचे अवलंबन करून तू मला का बरे कमीपण आणीत आहेस? तुला आणि तुझ्या संघास लागणारी अन्नसामग्री पुरविण्याचे सामर्थ्य मला नाही काय?'

**बुद्ध –** ही आम्हा भिक्षुजनांची रीतच आहे.

**राजा –** तू राजकुळात निर्माण झाला आहेस. राजेलोक कधी भिक्षा मागून अन्न मिळवीत नसतात.

**बुद्ध –** महाराज, आपण आणि आपल्या वर्गातले दुसरे पुरुष राजकुळात उत्पन्न झाल्याचा अभिमान वाहोत; पण मला हा अभिमान मुळीच उरला नाही. मी सांप्रत वृत्ती व जे कर्तव्य अंगीकारिले आहे त्याला अनुरूप असाच हा अन्न प्राप्तीचा मार्ग आहे.

ह्यावर राजाने काहीच उत्तर केले नाही. तेव्हा बुद्ध आणखी म्हणाला, 'महाराज, एखाद्यास मोठा गूढ निधी प्राप्त झाला असता, त्यातील बहुमोल रत्ने त्यास आपल्या प्रिय पित्यास अवश्य नजर करावी अशी जनरीती आहे. या रीतीस अनुसरून मला प्राप्त झालेल्या धर्मज्ञानरूप निधीतून एक रत्न आपणास अर्पण करण्यास मला आज्ञा असावी आणि त्याचा आपण अवश्य स्वीकार कराल अशी मला पूर्ण उमेद आहे.' असे सविनय भाषण करून बुद्धाने आपल्या धर्ममार्गाचे पुढीलप्रमाणे अगदी साररूपाने निरूपण केले.

''जागृत व्हा. भ्रांत होऊ नका. हा संसार केवळ स्वप्नप्राय आहे. सत्य धर्माचे अवश्य श्रवण करा. सदाचाराचा अवलंब करा. जो नीतीने वर्तन करितो त्याला अक्षय सुख प्राप्त होते. तो इहपरलोकी सुखानंदाचा अनुभव घेतो.''

ह्यावर राजाने काहीएक उत्तर न करिता आपल्या पुत्राच्या हातचे भिक्षापात्र घेऊन त्याला स्वमंदिरात नेले. तेथे दरबारातील प्रधानमंडळीने व राजघराण्यातील इतर मनुष्यांनी त्याचा आदरमान केला; परंतु तेथे यशोधरा आली नाही. राजाने तिला बोलावणे पाठविले. तेव्हा तिने असे सांगून धाडिले की, 'मी आदरास पात्र आहे असे वाटल्यास सिद्धार्थ मजकडे येऊन मला दर्शन देईल.' नंतर बुद्धाने आपल्या साऱ्या संबंधीजनास भेटून यशोधरा कोठे आहे म्हणून विचारले. तेव्हा त्याला कोणी सांगितले की, तिने तेथे येत नाही म्हटले. हे ऐकून तो तात्काळ उठून तिच्या महालात गेला. तेथे जाते वेळी त्याने आपले शिष्य सारिपुत्र व मौदगलायन यास आपल्याबरोबर नेले. तो त्यास म्हणाला, 'तुम्ही मजबरोबर तिच्या महालात चला. मी सर्वथा बंधमुक्त आहे, तशी ती नाही. तिला माझ्या विरहास्तव पराकाष्ठेचे दुःख होत आहे. यासाठी मला पाहताच ती दुःखावेगाने कदाचित मला आलिंगन करील. तर तसे करण्यास तुम्ही तिला प्रतिबंध करू नका. कारण तिच्या हृदयात साचलेले सगळे दुःख बाहेर पडले नाही, तर तिचे चित्त शांत होणार नाही.' यशोधरा अगदी साधे वस्त्र परिधान करून बसली होती. आपला परमप्रिय पती आपल्या महालात जातीने चालून आलेला पाहून तिचे हृदय प्रेमरसाने भरून गेले आणि देहभान विसरून तिने तात्काळ धावून जाऊन त्याचे पाय घट्ट धरिले आणि ती मोठ्याने शोक करू लागली; पण इतक्यात आपला स्वशुर जवळ उभा आहे असे पाहून, लज्जायुक्त होऊन ती एकीकडे जाऊन उभी राहिली. तेव्हा राजा तिच्या वतीने येणेप्रमाणे बोलला–

'यशोधरेचे तुजवर पराकाष्ठेचे प्रेम असल्यामुळे तुला स्पर्श केल्याने तुझ्या व्रताचा भंग होईल ही गोष्ट तिच्या लक्षात आली नाही, याबद्दल तू तिला क्षमा कर. तुझा वियोग घडल्यापासून आज सतत सात वर्षे तिने विरक्तता स्वीकारिली आहे. तू आपल्या डोकीचे केश काढलेस असे वर्तमान तिच्या कानी आले तेव्हा तिनेही आपल्या डोकीचे केस काढले. त्याचप्रमाणे तू वस्त्रालंकारादी ऐशआरामाच्या वस्तूंचा अव्हेर केलास तेव्हापासून तिनेही त्याचा परित्याग केला. तू जसा विरागी बनून मृत्तिकापात्रातून अन्न सेवन करू लागलास तद्वत तिनेही तोच क्रम आरंभिला. उंच आसने, पर्यकादी शय्यास्थाने इत्यादी गोष्टीचा जसा तू त्याग केलास तसाच तिनेही

केला आहे. कित्येक राजपुत्रांनी तिच्याशी विवाह करण्याविषयी बोलणे लाविले असता, तिने त्यास असा निक्षून जबाब सांगितला की, मी अद्यापि सिद्धार्थाची धर्मपत्नी आहे. मी सर्वस्वी त्याची आहे. तर हे सिद्धार्था, ह्या परम योग व तुझ्याठायी सर्वथा अनुरक्त अशा आपल्या धर्मपत्नीला कृतापराधाबद्दल क्षमा कर.'

हे राजाचे भाषण ऐकून बुद्धाच्या मनात यशोधरेविषयी विशेष आदरबुद्धी उत्पन्न झाली आणि तिच्याशी मोठ्या प्रेमाने बोलून तिचे त्याने आश्वासन केले. त्याप्रसंगी तो तिला इतकेच म्हणाला की, 'तुझी ही वैराग्यशीलता तुझ्या पूर्वजन्मीच्या सत्कर्माचे फल आहे. तुला आज माझ्या वियोगाने पराकाष्ठेचे दु:ख होत आहे खरे. तथापि मी सांप्रत कोणत्या सत्कृत्यात गुंतलो आहे याचे तुला ज्ञान झाले असता, तुझा हा सारा शोक नाहीसा होऊन तू आपणास धन्य मानिशील आणि तू माझ्या धर्ममार्गाचा अवलंब केल्यास तुला अखंड परमानंदाचा अनुभव घडेल.' इतके बोलून तो तिच्या महालातून निघून गेला. नंतर त्या नगरीत बुद्ध जेथे जेथे बोध करीत असे तेथे तेथे जाऊन ती मोठ्या आस्थेने त्याच्या मुखातून स्रवणाऱ्या बोधामृताचे सेवन करीत असे आणि कालांतराने ती त्याच्या धर्मपंथात सामील झाली.

कपिलवस्तूनगरीतील पुष्कळ जन बुद्धाचे अनुयायी झाले. बुद्धाचा सावत्रभाऊ आनंद, त्याचा चुलतभाऊ देवदत्त, उपाली नावाचा एक नापीक आणि अनुरुद्धनामेकरून एक तत्त्ववेत्ता असे पुरुष त्याच्या संघात येऊन मिळाले. यापैकी आनंदावर बुद्धाचा लोभ फारच होता. हा आनंद मोठा बुद्धिवान असून त्याची वृत्ती पराकाष्ठेची सौम्य होती. पुढे बुद्धाचे देहावसान होईपर्यंत हा आनंद सर्वकाळ त्याच्या सन्निध असे.

कपिलवस्तूनगरीत येऊन जनास स्वसंमत धर्ममार्गाचा बोध करू लागल्यास सात दिवस लोटले असता, यशोधरेने आपला पुत्र राहुल यास चांगला पेहराव घालून म्हटले की, 'बाळा तू आपल्या पित्याकडे जाऊन आपले वडिलोपार्जित वित्त माग.' तेव्हा राहुल म्हणाला: 'राजावाचून माझा दुसरा पिता तो कोणता?' तेव्हा तिने त्याला उचलून खिडकीपाशी नेले आणि बुद्ध राजवाड्यापाशी बसून अन्न भक्षण करीत होता, त्याच्याकडे बोट दाखवून ती त्याला म्हणाला, 'तो परम तेजस्वी साधू हातात भिक्षापात्र घेऊन अन्न भक्षण करीत आहे, तो तुझा पिता होय. त्याच्यापाशी मोठे अलौकिक वित्त आहे. आम्हाला ते अद्यापि पहावयास मिळाले नाही. तू त्याचा पुत्र आहेस. तेव्हा त्याच्यापाशी जाऊन आपला वित्ताचा अंश माग. तो मागण्यास तुला पूर्ण अधिकार आहे. त्याला जाऊन सांग की, मी तुझा पुत्र आहे. त्वा संपादिलेले वित्त

मला अवश्य मिळाले पाहिजे.' आईच्या आज्ञेप्रमाणे राहुल बुद्धापाशी गेला आणि मोठ्या धीटपणाने; पण प्रेमाने, 'माझ्या बाबा,' अशी त्याने त्याला हाक मारिली; पण बुद्ध त्याच्याकडे पाहिले न पाहिलेले करून अन्न भक्षण करून तेथून जावयास निघाला. तेव्हा राहुल त्याच्या मागे गेला आणि त्याच्यापाशी वडिलोपार्जित वित्त मागू लागला. तो त्याच्या मागून चालला असता, त्याला बुद्धाच्या शिष्यांनी किंवा खुद्द बुद्धाने प्रतिबंध केला नाही. तो आपली लगट सोडीत नाही असे पाहून बुद्ध मागे वळून सारिपुत्रास म्हणाला: 'माझा पुत्र मजपाशी मी संपादिलेले वित्त मागत आहे. ज्या नश्वर वित्तामुळे दु:ख व चिंताही उत्पन्न होतात असे वित्त याला द्यावयास मजपाशी नाही; परंतु याला पवित्राचरणरूप वित्त देण्याचे सामर्थ्य मजमध्ये आहे. हे वित्त अविनाशी असून सर्वदा आनंद देणारे आहे.'

मग तो आपल्या त्या लहान मुलाला मोठ्या ममतेने म्हणाला, 'बाळा, मजपाशी सुवर्णरत्नादिकाचा संग्रह नाही. मजपाशी आध्यात्मिक वित्त मात्र विपुल आहे. ते तुला मजकडून प्राप्त व्हावे अशी इच्छा असल्यास व ते यथोचित रीतीने वागून सांभाळण्याचे सामर्थ्य तुजमध्ये असल्यास ते मी तुला देण्यास सिद्ध आहे. मजपाशी सत्यचतुष्टयरूप निधी आहे. ते तुला प्राप्त झाल्याने सदाचाराचा अष्टविध मार्ग समजेल. तर माझ्या या धर्ममार्गाचा अवलंब करून जे आपल्या जीविताचा विनियोग आध्यात्मिक उन्नती करण्यात आणि परम कल्याण प्राप्त करून घेण्यात घालवितात, त्याच्या संघात येऊन मिळण्याची तुझी इच्छा आहे काय?' राहुल म्हणाला, 'होय, आपण न्याल तिकडे येण्याची माझी तयारी आहे.' हा असा त्याचा दृढ निश्चय पाहून बुद्धाने त्याला आपल्या संघात घेतले.

राहुल बुद्धाच्या संघात जाऊन मिळाला असे ऐकून शुद्धोदन राजास फार वाईट वाटले. आपले दोघे पुत्र सिद्धार्थ आणि आनंद हे आपल्याकडून गेले; त्याचप्रमाणे आपला पुतण्या देवदत्त आणि नातू राहुल हेही आपणास सोडून गेले असे पाहून त्याला पराकाष्ठेचा खेद होणे साहजिकच होते. तेव्हा तो बुद्धाकडे जाऊन त्यास म्हणाला: 'तू अज्ञान मुलालाही आपल्या संघात घेऊ लागलास तर त्याच्या मातापित्यास मोठे दु:ख होईल. यासाठी त्वा इत:पर असा नियम करावा की, अज्ञान मुलास त्याच्या मातापितराच्या संमतीवाचून संघात घ्यावयाचे नाही.' हे आपल्या पित्याचे म्हणणे बुद्धाने मान्य करून त्या वेळेपासून त्याने तसा नियम केला. पुढे बुद्ध आपल्या पित्याच्या राजधानीत आणखी काही दिवस राहून मग तेथून निघून गेला.

इकडे अनाथपिंडिकाने मागे सांगितल्याप्रमाणे विहार तयार केल्यावर बुद्धाला श्रावस्तीनगरीस बोलावून आणले आणि जेतवनाचे दान केले. बुद्धाने त्या विहारात प्रवेश केला तेव्हा त्या भाविक सावकाराने पुष्पवृष्टी करून धूप आदिकरून सुगंधी द्रव्ये जाळली आणि सुवर्णपात्रातून पाणी सोडून म्हटले की, 'हे जेतवन मी बुद्धधर्मानुयायी जनास अर्पण करितो.' बुद्धाने त्याच्या देणगीचा स्वीकार करून म्हटले: 'या तुझ्या अर्पणाच्या योगाने सत्यधर्मप्रचारास सर्वदा साहाय्य होवो; जगातील अनाचाराचे निर्मूलन होवो आणि सर्व मानवजातीचे व तुझे स्वत:चे कल्याण होवो.'

श्रावस्तीचा राजा प्रसेनजित याला बुद्ध स्वनगरीसन्निध राहावयास आला आहे असे कळले, तेव्हा तो आपल्या परिवारासह त्याच्या दर्शनास आला आणि त्याला वंदन करून व हात जोडून म्हणाला: ''माझ्या या य:कश्चित व अप्रसिद्ध राज्यात आपण आल्याने माझा भाग्योदय झाला असे मी समजतो. आपणासारखे धर्मराज व सत्यमार्गदर्शक महागुरू माझ्या ह्या राज्यात वास करितील तोपर्यंत त्यावर संकटे आणि विपत्ती कदापि येणे नाही. आपल्या पवित्र दर्शनाचा लाभ परम दुर्मीळ आहे. आपल्या जीवनाधारभूत बोधामृताचे पान करावे अशी मला उत्कंठा लागली आहे. तरी तो लाभ या दासाला अवश्य व्हावा अशी माझी विनमाश्भावे प्रार्थना आहे. इहलोकाचे वित्त चंचल असून नश्वर आहे; परंतु सत्यधर्मज्ञान रूप वित्त स्थायी असून अक्षय राहणारे आहे. या मर्त्यलोकी मनुष्यास राजपद प्राप्त झाले तरी त्याला दु:ख व त्रास सहन करावा लागतो; परंतु ज्याचे आचरण पवित्र तो ऐहिक दृष्टीने कितीही विपन्न असला तरी त्याच्या मनाला शांतीचा चिर अनुभव घडतो.''

याप्रमाणे राजाचे हृदय धनतृष्णा आणि सुखाभिलाष यांनी जर्जर झाले असून त्यात उपरतीचा प्रवेश झाला आहे असे पाहून बुद्धाने त्याच्या त्या वृत्तीस अनुसरून येणेप्रमाणे बोध केला.

''जे पुरुष पूर्वजन्मी अनन्वित कर्म केल्याप्रमाणे नीच स्थितीमध्ये जन्म पावतात, त्याला सदाचारी पुरुषाचे दर्शन घडल्याने त्यांच्या हृदयातसुद्धा त्या पुरुषाविषयी आदरबुद्धी उत्पन्न होते. आपण तर राजकुळात निर्माण झाला असून आपल्या पूर्वजन्मीच्या सुकृतानुरूप आपल्या ठायी सद्‌वृत्ती वसत आहे. तेव्हा आपल्या हृदयात सदाचारप्रीती उत्पन्न व्हावी हे स्वाभाविक आहे. माझ्या धर्ममार्गाचे श्रवण करण्याची इच्छा आपण प्रकट केली आहे, तर तो मार्ग मी आपणास संक्षेपाने कथन करितो. त्याचे सावधान श्रवण करून मनन करावे आणि जे मी सांगेन ते आपणास यथार्थ वाटल्यास तद्‌नुसार

अवश्य वर्तन करावे. आपण केलेली सत्कर्मे किंवा असत्कर्मे आपल्याबरोबर आपल्या सावलीप्रमाणे सर्वदा येत असतात. ह्या जगात आपणास अत्यंत आवश्यक अशी गोष्ट कोणती म्हणाल तर आपले चित्त अत्यंत प्रेमळ असावे. तुम्ही स्वप्रजाजनास आपल्या एकुलत्या एक पुत्राप्रमाणे लेखा. त्याला पीडा करू नका किंवा त्याचा नाश करू नका. आपल्या देहाच्या साऱ्या गात्रांचा आणि इंद्रियांचा उत्तम प्रकारे निग्रह करा. अपवित्र आणि दुराचाराप्रत नेणाऱ्या मतांचा त्याग करून सन्मार्गाचा अवलंब करा. इतरांची पायमल्ली करून स्वोत्कर्ष करण्याची हाव धरू नका. जे दु:खी आणि विपन्न असतील त्यांच्या त्या दुर्वह स्थितीचे परिमार्जन करण्यास झटा आणि त्यांचे प्रेम संपादा. आपणास मोठा राज्याधिकार आहे ह्या घमेंडीत जाऊ नका. स्तुतिपाठकाच्या मोहक शब्दाला भाळून जाऊ नका. व्रतोपवासादिकांनी देहदंडन करण्यात काहीएक अर्थ नाही, तर मी जो नीत्याचरणाचा मार्ग सांगतो तदनुरूप स्ववर्तन ठेवण्याचा संकल्प करा. जन्म, रोग आणि मृत्यू एतद्रूप महाशिलानी आम्ही परिवेष्टित आहो. ह्या परम उद्वेगकारक महादुर्गातून सुटून जाण्याचा एकच मार्ग आहे, तो हाच की, मी सांगतो त्या नीतिनियमाचे मनन करून त्यांचे अनुवर्तन करावे. दुराचरणाने कदापि सौख्य लाभणे नाही. खरे ज्ञानी असतात ते देहाच्या ग्राम्य सुखाचा अव्हेर करितात. विषयवासनेचा त्याला पुरा तिटकारा वाटतो. ते आपल्या आध्यात्मिक उन्नतीला अहर्निश झटतात. ज्याप्रमाणे अग्नीच्या ज्वालांनी परिव्याप्त झालेल्या वृक्षावर पक्षी येऊन बसत नाहीत, तद्वत ज्याचे चित्त विषयवासनांच्या प्रकोपाने दग्ध होत असते, तेथे सत्यास कोठून थोरा व्हावयाला? हे ज्याला कळत नाही तो केवढाही पंडित असला व त्याच्या विद्वत्तेची केवढीही कीर्ती झाली असली तरी तो अज्ञच समजावयाचा. ज्याला हे कळते त्याच्या ठायी सत्य ज्ञानाचा उदय होतो. हे ज्ञान प्राप्त करून घेण्याचा प्रत्येक मनुष्याने संकल्प करणे अत्यावश्यक होय. जो या ज्ञानप्राप्तीकडे दुर्लक्ष करील त्याच्या जीविताचे काहीएक सार्थक्य होणे नाही. आजपर्यंत होऊन गेलेल्या सर्व ज्ञात्या पुरुषांनी सत्यज्ञानप्राप्ती करून घेण्याविषयीच जनास उपदेश केला आहे. कारण ज्याला ज्ञान नाही त्याच्या ठायी विवेकशक्ती विकसित होत नाही आणि जेथे विवेक नाही तेथे मनोनिग्रह व तन्मूलक सदाचारप्रवृत्ती आणि दुराचारनिवृत्ती यांचा अभाव असतो. मी ज्या सत्यधर्ममार्गाचा जनास उपदेश करीत आहे तो संसाराचा त्याग करून विरागी बनलेल्या जनांसाठीच केवळ नव्हे, तर तो सर्व मानवजातीसाठी आहे. जो माझ्या धर्ममार्गाचे अनुसरण करील तो विरक्त असला किंवा संसारी असला तरी त्याची योग्यता मी सारखीच समजतो. विरागी बनलेले जन पुनरपि दुराचारात मग्न होण्याचा

संभव आहे आणि गृहस्थाश्रमाचा अवलंब करून प्रपंचात वागणारे जन आपल्या सदाचाराबलेकरून उत्तम साधूच्या पदवीस पोहोचतात. विषयवासनारूप महापुरामध्ये सापडण्याचे भय सर्वांसच आहे. या पुराच्या प्रवाहात समग्र जगत सापडले आहे. या प्रवाहाच्या अगणित आवर्तात जे सापडतात त्यांची त्यातून मुक्तता होता होत नाही; इतका त्यांचा वेग प्रचंड आहे. तेव्हा अशा ह्या पुरातून पैलतीरी लागण्यासाठी जनांनी ज्ञानरूप नौकेचा आश्रय करून तिचे विवेकरूप सुकर्णाच्या योगाने नियमन करावे, हे उचित होय. माझे जनांस कंठरवाने असे सांगणे आहे की, बाप हो, सत्यधर्ममार्गरूप परम दुर्भेद्य दुर्गाचा आश्रय करून दुराचार प्रवृत्तिरूप प्रचंड शत्रूच्या माऱ्यातून अवश्य सुटा. आपल्या कृतकर्माच्या परिणामांची निष्कृती कदापि होणे नाही यास्तव यापुढे तरी आपण सत्कर्म करू या. दुराचारापासून निवृत्त होण्यासाठी आपण आपल्या मनातील विचार व कल्पना यांचे परीक्षण करू या. कारण जसे विचार तसे आचार, जसे पेरावे तसे पीक येते असा सृष्टिनियम आहे. प्रकाशातून अंधकारात आणि अंधकारातून प्रकाशात जाण्याचे मार्ग आहेत. त्याचप्रमाणे थोड्याशा अंधकारातून निबिड अंधकारात आणि थोड्याशा उजेडातून उज्ज्वल प्रकाशात जाण्याचे मार्ग आहेत. जो ज्ञाता असतो तो प्राप्त झालेल्या प्रकाशाच्या साहाय्याने अधिक प्रकाश मिळविण्याचा प्रयत्न करितो. अशा पुरुषाची सत्यज्ञानाकडे एकसारखी प्रगतीच होत असते. सदाचरण आणि विवेकशीलता यांच्या योगाने प्राप्त होणारे श्रेष्ठत्व परम इष्ट होय. ऐहिक सुखविषयांची व्यर्थता किती आहे त्याचे निरंतर मनन करा आणि हे जीवित किती चंचल आहे ते ध्यानात आणा. आपल्या मानसिक उन्नतीस झटा. सत्य धर्माचा मन:पूर्वक अंगीकार करून त्यावर दृढभाव ठेवा आणि त्यात सांगितलेल्या अनुज्ञांप्रमाणे स्ववर्तन राखण्याचा निर्धार करा. तुम्ही आपल्या राजधर्माचे उल्लंघन कदापि करू नका. बाह्य गोष्टींच्या अनुकूलतेवर स्वसुख अवलंबून आहे असे कदापि मानू नका. तर ते तुमच्या चित्ताच्या निर्मलतेवर व शांतीवर अवलंबून आहे असा तुमच्या मनाचा निश्चय होऊ द्या. अशा रीतीने तुम्ही आपल्या आयुष्यक्रमाचे नियमन कराल, तर तुम्हास निर्वाणपदवी प्राप्त होऊन तुमची कीर्ती अमर होईल''.

याप्रमाणे बुद्धाने केलेला बोध प्रसेनजित राजाने एकाग्र चित्ताने श्रवण केला. तो त्याच्या मनात उत्तम ठसून त्याचे पुन्हा पुन्हा मनन करीत तो आपल्या ठिकाणी निघून गेला.

# भाग सहावा

# बुद्ध धर्म संस्थापना

बुद्ध जगात प्रकट होऊन जनास धर्मबोध करू लागण्यापूर्वी आर्य लोकांमध्ये पुष्कळ निरनिराळे धर्मपंथ निघाले होते हे प्रारंभी उपोद्घातात सांगितलेच आहे. मोक्षप्राप्तीचे अचूक साधन म्हणजे देहदंडन करणे हे होय असा संसारनिवृत्त जनांचा समज होता. यास्तव ते नानाविध व्रतोपवास करून देहाचे दंडन करीत असत. त्यांचा असा निर्धार असे की, देहाच्या ज्या गरजा आहेत त्यांची आसक्ती आत्म्याने सोडून शेवटी देहाचाही परित्याग केल्यावाचून त्यास मोक्षप्राप्ती होणे नाही. यास्तव आहारविहार, वस्त्रप्रावरण, घरदार इत्यादिकांची गरज करवेल तितकी ते कमी करीत असत. ते मनुष्यवस्तीची स्थाने सोडून वनात वनपशूप्रमाणे संचार करीत. कित्येक तर दिगंबरवृत्ती धारण करीत असत आणि दुसरे कित्येक असत ते स्मशानभूमीत किंवा उकिरड्यावर लोकांनी फेकून दिलेली जीर्ण वस्त्रे घेऊन त्यांनी आपले देह झाकीत.

फरंतु बुद्धाने देहदंडनाची मुळीच आवश्यकता नाही असे सिद्ध करून तद्नुसार तो जनांस उपदेश करीत असे. तरी त्याचे अनुयायी भिक्षुजन स्मशानभूमीतील किंवा उकिरड्यावर फेकलेली वस्त्रे मिळवून अंगावर घेत असत; कारण बुद्ध स्वत: असली वस्त्रे परिधान करीत असे; परंतु या वस्त्रांमुळे भिक्षूंस नाना प्रकारचे रोग होऊ लागले. त्यास ते पहिल्या पहिल्याने औषधोपचार काही एक करीत नसत. त्यामुळे त्यांच्या धर्मप्रसाराच्या कामास व्यत्यय येऊ लागला. तेव्हा बुद्धाने त्याला अशी आज्ञा केली की, तुम्ही रोग झाला असता औषधोपचार अवश्य करावे. एकदा एका भिक्षूच्या पायास काही दुखापत झाली. तेव्हा त्याने एकंदर भिक्षूस पादत्राणे घालण्यास सांगितले.

एके समयी बुद्धाची प्रकृती बिघडली. तेव्हा आनंदाने जीवकनामक बिंबिसारराजाच्या वैद्यास बोलावून आणिले. त्याने त्याला औषध वगैरे देऊन लवकरच बरा केला. हा वैद्य बुद्धधर्माचा अनुयायी होता. त्याने प्रद्योतनामेकरून एका राजास झालेली काही विकृती बरी केल्यावर त्या राजाने त्याला एक उंची पोशाख बक्षीस दिला. तो त्याने बुद्धाकडे आणला आणि त्यास प्रणाम करून म्हणाला: 'गुरुराज, दासाचे एक मागणे आहे ते आपण अवश्य मान्य करावे.' बुद्ध म्हणाला: 'तुझे मागणे काय आहे ते आधी समजू दे. म्हणजे ते योग्य असल्यास मी ते आनंदाने मान्य करीन.' तेव्हा तो भाविक

वैद्य म्हणाला, 'गुरुमहाराज, आपल्या अंगावर स्मशानात किंवा उकिरड्यावर पडलेल्या चिंध्या मी नेहमी पाहतो. त्या आपणास मुळीच शोभत नाहीत. मला हा पोशाख प्रद्योतराजाने दिला आहे. हा आपणासच शोभण्यासारखा आहे. तरी याचा आपण अवश्य स्वीकार करावा आणि आपल्या भिक्षुसंघासही अंगात प्रपंचीजनासारखे झगे घालण्याची परवानगी आपण द्यावी.' बुद्धाने त्याचा तो पोशाख स्वीकारून त्या समयास उचित असा उपदेश केला आणि आपल्या भिक्षुसंघास झगे घालण्याची परवानगी दिली. याप्रमाणे बुद्धाने आपल्या अनुयायीसंघास झगे घालण्याची परवानगी दिल्याची वार्ता राजगृहनगरीतील लोकांस कळली तेव्हा त्यांस मोठा आनंद होऊन त्यांनी त्या भिक्षूंस झगे पुरविले. असे सांगतात की, भाविक लोकांनी हजारो झगे तयार करून बुद्धाच्या संघास आणून दिले.

या सुमारास शुद्धोदनराजा वृद्धापकाळामुळे अशक्त व आजारी झाला असल्या कारणाने त्याने बुद्धाला असा निरोप धाडला की, 'माझे देहावसान होण्यापूर्वी त्वा एक वेळ मला येऊन भेटावे.' हा आपल्या पित्याचा निरोप ऐकून बुद्ध तात्काळ कपिलवस्तूनगरीस येऊन आपल्या पित्याच्या बिछान्यापाशी त्याचा अंत होईपर्यंत बसून राहिला आणि मरणसमयी त्याच्या चित्तास शांतीचा अनुभव घडावा म्हणून त्याने त्यासी सत्यधर्मबोध केला आणि शेवटी त्याच्या वेगेमध्ये पडून शुद्धोदनराजाने प्राण सोडिला. ह्याप्रमाणे आपल्या स्वशुराचे देहविसर्जन झालेले पाहून यशोधरेने बुद्धापाशी अशी प्रार्थना केली की, 'मला आपल्या संघात घ्या.' ही अशी प्रार्थना तिने पूर्वी एक-दोन वेळा केली होती; पण बुद्धाने तिची विनंती मान्य केली नव्हती. या प्रसंगी त्याने तिचे म्हणणे मान्य करण्यास असे कारण झाले की, तिच्याबरोबर आणखी प्रजापतीनेही बुद्धाच्या संघात सामील होण्याची इच्छा प्रकट केली. हा त्यांचा सत्यधर्मानुसरणाचा निर्धार पाहून बुद्धाने त्यास आपल्या संघात विधिपूर्वक घेतले. येथून पुढे भिक्षुणीच्या संघास आरंभ झाला.

याप्रमाणे भिक्षुणीचा संघ स्थापन झाला तेव्हा बुद्धाने आपल्या भिक्षुसंघास स्त्रियांशी कोणत्या प्रकारे वर्तन करावे याविषयी येणेप्रमाणे बोध केला.

कोणत्याही स्त्रीकडे पापदृष्टीने न पाहण्याची खबरदारी ठेवा. एखाद्या स्त्रीकडे तुमची नजर गेल्यास तिला कधी पाहिले नाही अशी तुमच्या मनाची स्थिती व्हावी. स्त्रियांशी बोलण्याचा प्रसंग कधीही येऊ देऊ नका. यदाकदाचित एखाद्या स्त्रीशी बोलणे प्राप्त झाल्यास तिच्याशी जे काही बोलावयाचे ते शुद्ध अंत:करणाने बोला

आणि आपल्या मनाचा निर्धार करा की, आपण श्रमण आहो त्यापेक्षा कर्दमातून वरती आलेले कमलपुष्प जसे निर्मल असते तद्वत ह्या पापमय जगतामध्ये आपण निर्दोष राहावे. एखादी स्त्री तुम्हाहून मोठ्या उमरीची असल्यास तिला तुम्ही आपल्या मातेसमान लेखावे; ती तुम्हाहून अंमळ लहान वयाची असल्यास तिला आपल्या मुलीप्रमाणे समजावी. जो श्रमण एखाद्या स्त्रीकडे पापदृष्टीने पाहतो अथवा तिला स्पर्श करितो, त्याच्या व्रताचा भंग होऊन तो माझा शिष्य होण्यास मुळीच योग्य नाही. मनुष्याच्या ठायी विषयवासना अनिवार असल्याकारणाने त्यास त्याने सर्वदा भ्याले पाहिजे. या विषयवासनेचे निर्मूलन करण्यासाठी मनुष्याने उद्योगसातत्यरूप धनुष्यास ज्ञानरूप तीव्र शराचा अभिनियोग करून सर्वदा उद्युक्त राहावे. सुविचाररूप शिरस्त्राणाचे धारण करून पंचेंद्रिमूलक वासनापंचकाशी दृढ निश्चयाने संग्राम करावा. स्त्रीचे मनोहर लावण्य पाहून ज्याचे मन विषयलंपट होते त्याच्या चित्तास व्यामोह होऊन तो दुराचारनिमग्न होण्याचा दृढ संभव असतो. यास्तव विषयाभिलाषदृष्टीने स्त्रीच्या लावण्याकडे पाहून स्वचित्तात विषयवासना उत्तेजित होऊ देऊ नका. ह्याप्रमाणे स्त्रीच्या स्वरूपाकडे नेत्र जाऊ देण्यापेक्षा ते तापवून लाल केलेल्या सांडसांनी काढून टाकलेले पुरले. स्त्रियाच्या सन्निध राहून स्वचित्तात विषयवासनेचे विचार उच्छृंखल होऊ देण्यापेक्षा क्रूर व्याघ्राच्या मुखात पडणे किंवा मनुष्यवध करणाऱ्या मांगाच्या तीक्ष्ण सुरीखाली सापडणे बरे. विश्वयोषिता उठण्या-बसण्यात व हिंडण्या-फिरण्यात आपल्या स्वरूप लावण्याचे प्रदर्शन करून पुरुषाचे चित्त मोहित करू पाहतात. त्यांची ही चित्ताकर्षण करण्याची कला इतकी प्रबळ असते की, त्याच्या पाशात मोठे निश्चयी पुरुषसुद्धा सहज सापडतात. यास्तव अशा भयंकर स्त्रियांच्या तावडीत न सापडण्याची खबरदारी घ्या. त्याचे हास्यरोदनादी प्रकार हे आपले महाशत्रू होत. त्यांचे हावभाव आणि चालण्या-बोलण्याची ढब ही पुरुषाचे चित्त पाशबद्ध करणारी आहे, तर अशा स्त्रियांच्या संसर्गास कदापि जाऊ नये. त्याच्याकडे आपले चित्त सहसा जाऊ देऊ नये. मनोनिग्रहरूप रश्मींनी त्यास बळकट आवरून धरावे.

श्रावस्ती नगरीमध्ये विशाखा नामेकरून एक बलाढ्य स्त्री राहत असे. तिने बुद्धधर्माचा अंगीकार करून आपल्या वित्ताचा बुद्धधर्मानुयायीसंघाप्रीत्यर्थ विनियोग करण्याचा क्रम ठेविला होता. संघातील भिक्षूस व भिक्षुणीस वस्त्राची व औषधोपचाराची ददात कदापि पडू नये अशी व्यवस्था तिने ठेविली होती. ही स्त्री प्रपंचात वागत असून परम धार्मिक व सदाचारी होती. प्रपंचात वागणाऱ्या बुद्धधर्मानुयायी स्त्रीजनांपैकी ही स्त्री पहिली होती आणि तिच्या सद्वर्तनाचे अनुकरण इतर भाविक स्त्रिया परम उत्साहाने करू लागल्या.

मगधदेशाचा राजा बुद्धधर्मानुयायी होता. तो पुढे संसारत्याग करून धर्माचरणात कालक्रमणा करीत असता एके समयी बुद्धचरणी येऊन म्हणाला, 'गुरुराज, ब्राह्मणी धर्माच्या कित्येक पंथात अशी चाल आहे की, प्रत्येक महिन्याचे काही दिवस पवित्र गणून त्या पंथातले लोक आपापल्या देवालयात वगैरे धर्मोपदेश ऐकावयास जमतात. जेणेकरून लोकांची त्या पंथावरील श्रद्धा दृढ होऊन आणखी नवे लोक त्या पंथात सामील होतात. तर आपल्या ह्या पंथातही अशीच काही तरी व्यवस्था होऊन आपले धर्मबांधव एकत्र जमण्याचे काही दिवस ठरवावे असे आपणास वाटत नाही काय?' हे त्याचे म्हणणे बुद्धास मान्य होऊन त्याने आपल्या भिक्षूस अशी आज्ञा केली की, त्यांनी प्रत्येक पक्षाच्या अष्टमीस आणि अमावास्येस व पौर्णिमेस एकत्र जमून काहीतरी धर्मकृत्यात काळ घालवावा आणि या दिवसास उपवसथ असे नाव द्यावे. ह्या आज्ञेप्रमाणे सर्व भिक्षू नेमलेल्या दिवशी विहारामध्ये जमले; फरंतु तेथे त्याला धर्मोपदेश वगैरे काही एक ऐकावयास न मिळाल्यामुळे त्यांची थोडीशी निराशा झाली. हे बुद्धाने पाहून त्याला असे सांगितले की, ह्या एकत्र जमण्याच्या दिवशी सर्वांनी आपापले अपराध सगळ्या संघासमोर कबूल करावेत म्हणजे त्याच्या त्या अपराधमूलक पातकाचा बोजा कमी होऊन त्याचे हृदय शुद्ध होईल. ह्या पापनिवेदनविधीस प्रातिमोक्ष असे त्याने नाव दिले.

बुद्ध कौशांबी येथे असता एका भिक्षूने काही अपराध केला असून वरती सांगितलेल्या उपवसथाच्या दिवशी त्याने तो अपराध सगळ्या संघासमक्ष कबूल केला नाही. तेव्हा बाकीच्या भिक्षूंनी त्यास बहिष्कार घातला. हा बहिष्कृत भिक्षू मोठा विद्वान, ज्ञाता व बुद्धिवान असून विनयसंपन्न, पापभीरू आणि स्वधर्महित नियमाप्रमाणे वर्तण्यास सर्वदा तत्पर असे. आपणास बहिष्काराची शिक्षा झालेली ऐकून तो आपल्या धर्मबांधवांकडे जाऊन म्हणाला की, 'मी निरपराध आहे. मला तुमच्या संघात राहून धम्माचरण करण्यास साहाय्य करा.' त्याचे ते नम्रतेने भाषण ऐकून काही भिक्षूंनी त्याचा पक्ष घेतला आणि बाकीच्या भिक्षूंनी वाद आरंभिला. ह्याप्रमाणे आपल्या संघात दुफळी झालेली ऐकून त्या दोन्ही पक्षांकडे जाऊन त्यास पुष्कळ समजून सांगितले; फरंतु ते आपला हेका सोडीनात. तेव्हा त्याने त्या उभय पक्षास एकमेकापासून निराळे राहून धर्माचरण करण्याची परवानगी दिली. ह्याप्रसंगी त्याने त्या कलह करणाऱ्या भिक्षूंस येणेप्रमाणे बोध केला -

''कलहास काही तरी कारण उत्पन्न झाले असता नीच, अज्ञान जन विनाकारण पुष्कळ कोलाहल करितात; फरंतु जे ज्ञाते असतात त्यांच्यामध्ये कोणत्याही गोष्टीमुळे विरोध उत्पन्न झाला असता ते परस्पराशी सौम्य व सभ्य रीतीने वर्तून आपल्या

विरोधाचे कारण स्पष्ट करून सांगतात. अशा एकमेकांशी विरोध करणाऱ्या जनास कोण दोष देईल? अमुक एका मनुष्याने मला शिव्या दिल्या, माझी निंदा केली, माझे नुकसान केले असे विचार जो पुन्हा पुन्हा मनात आणतो त्याच्या ठायीचा द्वेषाग्नी कदापि उपशम पावावयाचा नाही; कारण द्वेषाने द्वेषाचे शमन होत नाही, तर आपला द्वेष करणाऱ्याच्या संबंधाने आपल्या चित्तात द्वेषवृत्ती यत्किंचितही उद्‌भवू दिली नाही तरच द्वेषाचे निर्मूलन होते. हा असा नीतीचा शाश्वत नियम आहे. कित्येकास मनोनिग्रहाची आवश्यकता वाटत नाही. असे जन कलहास प्रवृत्त झाले असता त्यांचे ते वर्तन क्षम्य होय; परंतु ज्यास मनोनिग्रहाचे माहात्म्य अवगत झाले आहे त्यांनी कलहापासून निवृत्त होऊन परस्परांशी एकचित्ताने वर्तावे हे उचित होय. ज्याचे आचरण पवित्र असते आणि ज्याची वृत्ती कदापि चंचल नसते, अशा मनुष्याशी स्नेह संपादिल्याने आपण निर्भय, सुखी व शांतचित्त होतो; फरंतु ज्याला असा सदाचारी मित्र मिळत नाही, त्याने एकांताचा स्वीकार करून कोठे तरी रानावनात भ्रमण करून कालक्रमणा करावी ते चांगले. मूर्खाची संगती करण्यात काहीच लाभ नाही. जे लोभी, अभिमानी, कलहप्रिय आणि दुराग्रही असतात अशा जनांशी सहवास करण्यापेक्षा एकांतात काळ घालविण्यात विशेष सुख आहे.''

याप्रमाणे त्याला त्याने बोध केला; पण त्यांचा कलह काही मिटला नाही. तेव्हा अशा हट्टी दुरभिमानी मनुष्यास बोध करून वाटेवर आणण्याचे काम काही सोपे नाही असे पाहून बुद्ध कौशांबीहून निघून फिरत फिरत पुन्हा श्रावस्तीस आला. बुद्ध कौशांबीहून गेल्यावर तेथल्या त्या भिक्षूंत त्या कलहास फारच कलहाग्नी माजला. तेव्हा बुद्धाचे प्रपंची अनुयायी त्यांच्या त्या कलहास फारच त्रासले आणि म्हणू लागले की, या अशा कलहाने आपणा सर्वांवरच मोठा गहजब गुदरण्याचा संभव आहे. बुद्धगुरू तर त्यांच्या या उद्दामपणास त्रासून येथून निघून गेले आहेत. तेव्हा या भांडखोर भिक्षूला आपण मुळीच मानू नये व त्याला कोणत्याही प्रकारचे साहाय्य करू नये. ह्याप्रमाणे लोक आपणास मानीनासे झाले. तेव्हा त्याला कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन ते आपल्या विरोधाचा निकाल लावण्यासाठी श्रावस्ती येथे बुद्धापाशी आले. ते आलेले पाहून सारिपुत्र बुद्धास म्हणाला, 'हे कलहप्रिय दुरभिमानी आणि दुफळी करणारे भिक्षू आले आहेत. त्यांच्याशी कोणत्या प्रकारे वर्तन करावे?' बुद्ध म्हणाला, 'त्याची निर्भर्त्सना करू नको; कारण कठोर शब्द कोणासही प्रिय वाटत नाहीत. प्रत्येक पक्षाला निरनिराळी जागा नेमून दे आणि सर्वांशी नि:पक्षपातीपणे वाग. उभय पक्षांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेऊ आणि प्रत्येकाच्या म्हणण्यात कितपत तथ्य आहे ते नीट विचार करून पाहू.

याप्रमाणे दोन्ही पक्षांनी आपले म्हणणे काय आहे ते स्पष्टपणे सांगितल्यावर मग सर्व संघाने मिळून जो काही निर्णय देणे योग्य वाटेल तो द्यावा. तेथपर्यंत त्यांच्याशी कोणत्याही प्रकारे विरोधाने वागू नये. सर्वांस सारख्या रीतीने वागवावे.' या भिक्षूंचा कलह मिटविण्याची एक युक्ती उपालीने अशी सुचविली की, दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय देण्यापेक्षा सर्व संघाने असे म्हणावे की, दोन्ही पक्षांनी परस्पर विरोधाचा त्याग करून पुनरपि एकचित्त व्हावे. बुद्धाला ही युक्ती पसंत वाटली नाही. तो म्हणाला, 'उभय पक्षाचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय त्यांचे ऐक्य करू पाहणे योग्य नव्हे. अशाने त्यांचे खरे ऐक्य व्हावयाचे नाही. खरे ऐक्य व्हावयास त्यांची योग्य रीतीने समजूतच पडली पाहिजे आणि ही समजूत पाडण्यासाठी त्यांचे म्हणणे साद्यंत ऐकून घेतले पाहिजे.' या प्रकरणी बुद्धाने त्याला एक गोष्ट सांगून त्याचा हा सदरील बेत त्याला सोडावयास लाविला. मग त्या महंताचे म्हणणे सविस्तर ऐकून बुद्धाने त्यांच्यात समेट केला.

यशोधरेचा बंधू देवदत्त याने बुद्धाच्या धर्माचा अंगीकार केला होता. हा मोठा कीर्तीप्रिय आणि महत्पदाभिलाषी होता. यास्तव तो बुद्धाचा मत्सर व द्वेष करू लागला. बुद्धाने घालून ठेवलेल्या नियमात तो दोष काढू लागला. हे नियम फारच सौम्य आहेत असे त्याचे म्हणणे पडले. ह्याप्रमाणे देवदत्ताच्या मनात विरोध उत्पन्न होऊन तो बुद्धास सोडून गेला आणि राजगृहनगरीत बिंबिसारराजाचा पुत्र अजातशत्रू राज्य करीत होता त्याच्याकडे जाऊन त्याने त्याला आपले काय म्हणणे होते ते कळविले. त्या राजाला त्याने आपलासा करून घेतले. ह्या राजाने त्याच्यासाठी एक विहार बांधून दिला. येथे देवदत्ताने पुष्कळ अनुयायी मिळविले आणि बुद्धाने घातलेल्या नियमांहून पुष्कळ कडक नियम पाळण्याच्या व देहदंडन करण्यासाठी व्रतोपवासादी साधने अंगीकारण्याच्या शपथा त्यांच्याकडून घेवविल्या. बुद्धाला हे वर्तमान कळताच तो स्वत: राजगृहनगरीत सन्निध वेणुवनात येऊन दाखल झाला. तो आला असे कळले तेव्हा देवदत्त त्याच्याजवळ जाऊन त्याला म्हणाला, 'गुरुराज, मी जे धर्माचरणाचे विशेष कडक नियम काढले आहेत त्यास संमती द्या. कारण हे नियम पाळल्याने विशेषज्ञ पवित्रता अंगी येईल असा माझा अभिप्राय आहे. हा देह केवळ जडपदार्थांधीन आहे. त्याचे बीजारोपण पापकर्माने झाले असून त्याचा उद्‌भव दुराचाराने झाला आहे. तो सर्वदा पीडेस पात्र असून नश्वरत्वास्तव विलय पावणारा आहे. आमच्या पूर्वसंचितानुरूप जे कर्म आमच्या पाठीस लागले आहे त्याचे संचयस्थान हा देह होय. तो पापकर्म आणि रोग यांचे वसतिस्थान आहे आणि त्याच्या निरनिराळ्या इंद्रियांवाटे

मुत्रश्लेश्मादी अगदी घाणेरडे पदार्थ स्त्रवत असतात. मरणाने त्याचा अंत व्हावयाचा आणि त्याचे देहावसान स्मशानभूमीत व्हावयाचे. ही देहाची निकृष्ट स्थिती असल्या कारणाने त्यास आपण सर्व प्रकारच्या वाणीने भरलेल्या प्रेताप्रमाणे गणावे आणि स्मशानभूमीत पडलेल्या चिंध्यांनीच त्यास सर्वदा वेष्टावे, हे उचित होय.'

यावर बुद्धाने असे उत्तर दिले की, 'देह सर्वप्रकारे अमंगळ असून स्मशानात अवसान व्हावयाचे आहे, हे खरे आहे. कारण तो नश्वर असून कालेकरून पंचत्वास मिळावयाचा. तरीपण तो कर्माचे अधिष्ठान असल्यामुळे त्यात पापकर्माचा संचय न करिता पुण्यकर्म व सदाचार यांचा संग्रह करणे आपल्या हाती आहे. ह्या देहाच्या सुखविषयांचा अभिलाष धरून तत्प्राप्त्यर्थ उद्योग करणे हे मनुष्यास उचित नव्हते हे खरे आहे; तरी त्याच्या नैसर्गिक गरजांकडे दुर्लक्ष करून त्याची सर्वप्रकारे आवळा करणे योग्य नव्हे. त्यावर मळ साचू देणे किंवा तो मलिन वस्त्रांनी वेष्टणे मनुष्यास शोभत नाही. दीप जो आहे तो स्वच्छ राखिला नाही व त्यात तेल घातले नाही, तर तो निश्चयाने विझावयाचा; तद्वतच आपल्या देहाची चांगली निगा केली नाही, तो धुऊन माखून साफ राखिला नाही आणि व्रतोपवासादिकांनी तो क्षीण केला असता त्यात सत्य ज्ञानाच्या प्रकाशाचा अभिनिवेश होण्यास प्रत्यवाय घडतो. तू जे नियम प्रचलित करू पाहत आहेस त्यांच्या साहाय्याने मी उपदेशिलेल्या मध्यम वर्गाचे अनुसरण योग्यप्रकारे व्हावयाचे नाही. कठीण नियमांचे अनुवर्तन करणे ज्यास आवश्यक वाटत असेल त्याला कोणाचा प्रतिबंध नसावा; फरंतु त्याचे बंधन इतरास विहित करणे इष्ट नव्हे. कारण ते सन्मार्गप्रवृत्तीस केवळ अनावश्यक होत.'

याप्रमाणे बुद्धाने देवदत्ताचे म्हणणे मान्य केले नाही. तेव्हा तो आपल्या विहारात निघून गेला आणि अगदी स्वतंत्रपणे धर्माचरण करू लागला आणि तो लोकांस असे सांगू लागला की, बुद्धाचा मोक्षसाधक धर्ममार्ग फार सौम्य प्रतीचा असून त्यापासून इष्ट सिद्धी होण्यासारखी नाही. देवदत्त आपली अवहेलना करून आपल्या धर्ममार्गास नाव ठेवितो असे बुद्धाच्या कानी आले तेव्हा तो आपल्या शिष्य संघास म्हणाला, 'ज्याला जन दोष देत नाहीत असा ह्या भूलोकी कोणी नाही. तो कितीही जपून वागत असला तरी त्याची निर्भर्त्सना करावी हा जनाचा क्रमच आहे. सर्वांस सोईचा आणि हिताचा असा मध्यम धर्ममार्ग मी जनास उपदेशीत असता तो नीट समजून घेण्याचा त्यांनी प्रयत्न करू नये, तर उलट त्याची निंदा करीत राहावे याला काय म्हणावे? देवदत्ताचे म्हणणे असे आहे की, भिक्षूंनी सर्वकाळ उघड्या हवेत राहावे, नगराच्या सन्निध कदापि राहू नये; लोकांनी टाकलेल्या जीर्ण वस्त्रांचे त्यांनी परिधान करावे.

सर्वदा भिक्षान्नावरच निर्वाह करावा; कोणी भोजनास बोलाविले असता जाऊ नये किंवा कोणी विहारास अन्न पाठविले असता त्याचे सेवन करू नये. मांसान्नाचे भक्षण करू नये. यावर माझे म्हणणे असे आहे की, माझ्या बोधाप्रमाणे मनुष्यास कोणत्याही स्थली वागता येईल. वैराग्याचे कठीण नियम ज्याला पाळावेसे वाटत असतील त्याने ते खुशाल पाळावे; पण सदाचरणास त्याची मुळीच आवश्यकता नाही आणि जे तरुण किंवा अशक्त आहेत त्यांच्याने अशा नियमांचे पालन व्हावयाचे नाही. आता अन्नभक्षणासंबंधाने माझा अभिप्राय असा आहे की, माझ्या संघातील जन ज्या देशी असतील तेथल्या लोकांच्या चालीप्रमाणे सापडेल तसले अन्न त्यांनी भक्षण करावे. मात्र इतकेच की, केवळ क्षुधाशमनास आवश्यक असेल तेवढेच अन्न त्यांनी खावे; एखादे पक्वान्न गोड लागले असता त्याचेच सेवन मनमुराद करू नये. मनुष्य वृक्षतळी बसला किंवा गृहाच्या छायेत बसला, लोकांनी टाकलेली जीर्ण वस्त्रे त्याने परिधान केली किंवा लोकांनी दिलेली नवी वस्त्रे परिधान केली, मांसान्नाचा अव्हेर केला किंवा ते भक्षण केले, तरी त्याच्या चित्ताची शुद्धी होण्याजोगी आहे. ह्यासंबंधाने सर्वांस सारखा नियम घालून दिल्याने त्यांचा अनन्य हेतू जो निर्वाणसिद्धीचा त्यास प्रत्यवाय घडेल.'

याप्रमाणे देवदत्त बुद्धास सोडून गेल्यावर त्याने अजातशत्रूला बुद्धास ठार मारण्याची मसलत दिली. ही दुष्ट मसलत त्या अविचारी राजाला मान्य होऊन त्याने बुद्धाला मारण्याकरिता मारेकरी पाठविले. ते त्यापाशी गेला असता त्याला त्यांचा घोर उद्देश कळून त्याने त्यास नीतिबोध केला. त्या बोधाने त्यांची कठोर हृदये मेणासारखी मऊ होऊन आपल्या धन्याचा हुकूम न मानिता ते त्यांचे अनुयायी झाले. हा असा त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न त्या दुष्ट राजाने तीन वेळा केला असे म्हणतात; पण तिन्ही वेळा बुद्धाने पूर्वोक्त युक्तीने आपल्यावरील संकटाचे निवारण केले. त्याच्या वाक्‌शक्तीचा आणि धर्मबोधपद्धतीचा प्रभाव एवढा विलक्षण होता!

बुद्धासारख्या परमपूज्य जगद्‌गुरूचा प्राण घेण्याचा यत्न करून तो व्यर्थ गेला असे पाहून तो राजा फारच खिन्न झाला. त्याचे मन त्याला खाऊ लागले. त्याला कोठेच चैन पडेनासे झाले. तेव्हा तो कृतकर्माबद्दल अनुताप पावून बुद्धास शरण गेला आणि अगदी दीन होऊन त्याची त्याने क्षमा मागितली. तेव्हा बुद्धाने परम सदय अंत:करणाने त्याचे आश्वासन करून त्याला स्वधर्माचा बोध केला. तेणेकरून त्याच्या चित्तास शांती प्राप्त होऊन तो बुद्धाचा अनुयायी बनला.

देवदत्ताने स्वतंत्र धर्मपंथाची स्थापना करण्याचा पुष्कळ उद्योग केला; पण त्यात त्याला यश आले नाही. त्याचे पुष्कळ शिष्य त्याला सोडून गेले. तेव्हा त्याची निराशा होऊन तो आजारी पडला आणि बुद्धास सोडिल्याबद्दल त्याला पश्चात्ताप होऊन तो एके दिवशी आपल्या बाकी राहिलेल्या शिष्यास म्हणाला की, ''मला डोलीत घालून बुद्धापाशी घेऊन चला. मी त्याचा अपराध केला आहे खरा, तरी मी त्याचा नातलग आहे यास्तव तो माझा अव्हेर करणार नाही.'' याप्रमाणे त्याला त्यांनी बुद्धापाशी उचलून आणिले. डोली वाहणाऱ्यांनी ती खाली ठेविली तेव्हा देवदत्त बुद्धदर्शनास आतुर होऊन वरती उठावयास गेला; पण तोल न सावरून तो खाली पडला आणि त्याचा प्राण गेला. प्राणान्तसमयी त्याच्या तोंडून बुद्धस्तव चालला होता.

देवदत्ताचा असा अंत झालेला पाहून बुद्धाने स्वशिष्यांस येणेप्रमाणे बोध केला, 'हे भिक्षुजनहो, जे सत्यचतुष्ट्य मी तुम्हास उपदेशिले आहे ते नीट न समजल्यामुळे व त्याचे मनास पूर्ण आकलन न झाल्यामुळे आम्ही आजपर्यंत असे सैरावैरा धावत आहो आणि ह्या क्लेशप्रद संततिजालनामध्ये भ्रांत झालो आहो. आपल्या चित्तात सत्यधर्मज्ञानाचा प्रकाश पूर्णपणे फांकला नाही तोपर्यंत आपला हा आत्मा निरनिराळ्या योनीमध्ये भ्रमण करीत आहे. भिन्नभिन्न प्रकारचे पाषाण, वृक्ष, कीटक, पशू, मानव यांचे देह त्याला प्राप्त होतात. अखिल जीवसृष्टीमध्ये जे स्थितिवैचित्र्य दृष्टोत्पत्तीस येते त्याचा उद्‍भव पूर्वकाली व वर्तमानकाली जीवांच्या हातून घडलेल्या कर्मापासून होतो. आपल्या ठायी विवेकशक्ती आहे. तिचा योग्य उपयोग केला तर आपणास दिव्य ज्ञानदृष्टी प्राप्त होते. ही एक वेळ प्राप्त झाली म्हणजे ती कदापि नष्ट होत नाही; परंतु ही दृष्टी प्राप्त व्हावयास प्राणी अत्यंत उच्च स्थितीप्रत गेला पाहिजे आणि ही उच्च स्थिती त्या संसृतीच्या योगाने क्रमाक्रमाने प्राप्त होते. पुन्हा पुन्हा जन्म-मरण प्राप्त होऊन त्याला अंती अनुपम ज्ञानप्रकाश प्राप्त होतो आणि तो साध्य झाल्याने त्याच्या हातून पवित्रचरण घडते. मला सत्यज्ञानाचा लाभ झाला आहे, या ज्ञानानुरूप जो उत्तम धर्ममार्ग त्याचे शाश्वतपालन जो करील त्याच्या चित्ताची तळमळ नाहीशी होईल. शांतीचा संपादक वाटला त्याचा उपदेश मी तुम्हास केला आहे. या माझ्या मार्गाचे अवलंबन केल्याने आपल्या ठायीच्या समग्र पातकाचे क्षालन होऊन आपणास पूर्ण समाधान प्राप्त होणार आहे. सत्यज्ञानदर्शनरूप अत्यंत सुखावह असे हे धर्मजीवन मी तुम्हास समर्पण केले आहे. त्याच्या सर्व मनोविकारांचा विलय होईल आणि त्याच्या ठायीची अनाचार प्रवृत्ती निर्मूल होईल. ह्याप्रमाणे मनोविकाररूप महासागरातून सत्यज्ञानरूप नौकेच्या साहाय्याने जो पैलतीरी लागला त्याच्या सौख्यास पारावार

नाही. कारण ज्याच्या चित्तापासून सर्व पापमलाचे क्षालन होऊन ते परम शुद्धी पावते आणि जो सर्व भ्रमापासून मुक्त होतो त्याला निर्वाण प्राप्त होते. असा मनुष्य ऐहिक प्रपंचात वागत असला तरी त्याचे चित्त निर्लेप राहते. ऐहिक वासनांचा मळ त्यास लागत नाही. कसे तर कमलपुष्प ज्या उदरातून वर येते त्याचा एकही बिंदू त्यावर असत नाही तसे. असा मनुष्य सर्व प्राण्यांशी मोठ्या प्रेमाने वागतो. ही मनाची वृत्ती त्याने अढळ राखावी. तो कोणत्याही स्थितीत असला तरी त्याने ती कायम राखण्यास जपावे; कारण ही मनाची अवस्था अत्युत्तम होय. मी उपदेशिलेल्या सत्यचतुष्ट्याचे ज्याला यथार्थ ज्ञान घडत नाही त्याचा स्मृतिपाश तुटत नाही. त्यास नाना योनीमध्ये पुन्हा पुन्हा भ्रमण करावे लागते. अज्ञानरूप अरण्यामध्ये त्यास अगणित काळ संचार करावा लागतो. ह्या अरण्यामध्ये भ्रमरूप मृगजलाच्या पाठीस लागून तो प्रारूप कर्दमभूमीमध्ये मग्न होतो; परंतु ज्याला या सत्यचतुष्ट्याचे परिज्ञान होते तो जन्म-मरणाच्या फेऱ्यातून सुटतो. त्याचा भ्रमजाल भंग पावतो. त्यास अभीष्टसिद्धी घडते. स्वार्थपरतामूलक दुर्वृत्ती त्याच्या हृदयात विनष्ट होतात आणि त्यास सत्य ज्ञानाची पूर्ण प्राप्ती होते हाच खरा मोक्ष होय. कैवल्यसिद्धी तो ह्यातच आहे. स्वर्ग आणि अमर जीवनाचे सौख्य यालाच म्हणतात.

बुद्धाचे आपल्या शिष्यास असे सांगणे आहे की, त्यांनी आपल्या ठायी काही अलौकिक सामर्थ्य आहे असे जनांस भासवून देऊन त्यांचे वंचन करू नये. हा बोध करण्याचे प्रयोजन त्यास एक-दोन गोष्टीवरून प्राप्त झाले. त्या गोष्टीचे येथे निरूपण करू. राजगृहनगरीत ज्योतिष्कनामेकरून एक गृहस्थ राहत असे. त्याने एके दिवशी आपल्या घराच्या दारासमोर एक उंच काठी रोवून तिच्या शेवटाला एक चंदनाचे रत्नखचित पात्र अडकविले आणि तो बुद्धाच्या शिष्यांस सांगू लागला की, तुमच्यापैकी जो कोणी श्रमण शिडी किंवा काठी घेतल्यावाचून केवळ मंत्रसामर्थ्याने हे पात्र खाली काढील त्याला मी तो सांगेल ते देईन. हे ऐकून बुद्धाचा शिष्य काश्यप तेथे गेला आणि त्याने काही युक्ती करून ते पात्र खाली काढले आणि ते मोठ्या विजयोत्सवाने आपल्या विहारात नेले. ही वार्ता बुद्धाच्या कानी आली तेव्हा तो काश्यपापाशी गेला आणि त्याने ते पात्र फोडून टाकून आपल्या शिष्यास असे निक्षून सांगितले की, असले चमत्कार करण्याचे तुम्ही कधीही मनात आणू नका.

या संबंधाची दुसरी गोष्ट अशी की, वृजिनामक प्रांतामध्ये बुद्धाचे काही शिष्य पावसाळ्यात राहिले असता, तेथे दुष्काळ पडून कोणास पोटभर अन्न मिळेनासे झाले. त्यामुळे त्या शिष्यास पुरेशी भिक्षा कोणी घालेना. तेव्हा त्यांनी तेथल्या लोकांस

फसविण्याची एक युक्ती काढिली. ते लोकांस सांगू लागले की, आमच्यापैकी अमुक एका श्रमणाला दैवी साक्षात्कार झाला आहे. त्याला तिन्ही काळच्या गोष्टी समजतात. दुसऱ्या एका श्रमणावर दैवी अनुग्रह झाला असून त्याला पाहिजे तो चमत्कार करिता येतो. हे त्याचे म्हणणे त्या भोळ्या लोकांना खरे वाटून ते कोणी तरी मोठे सिद्ध पुरुष आहेत असा त्यांचा समज झाला आणि असे महापुरुष आपल्या गावात पर्जन्यकाळी राहावयास आले हे आपले मोठे भाग्य समजून त्यांनी त्यांना खाण्यापिण्याचे पदार्थ पुरविले. अशा युक्तीने त्यांनी तो दुष्काळाचा कठीण समय ददातीवाचून घालविला व पुढे बुद्धालाही त्यांची लबाडी कळून आली तेव्हा त्याने आनंदाकरवी सगळ्या भिक्षूंस जमा करून त्यास पुढीलप्रमाणे प्रश्न केला, ''हे भिक्षुजन हो, भिक्षूचे भिक्षुत्व केव्हा नष्ट होते बरे?'' हा आपल्या गुरूचा प्रश्न ऐकून सारिपुत्र पुढे सरसावून म्हणाला: ''दीक्षा धारण केलेल्या शिष्याने कोणत्याही प्रकारचा अनाचार करू नये. जो कोणी अनाचार करील तो शाक्यमुनीच्या शिष्यत्वास मुकेल. दुसरे असे की, दीक्षा धारण केलेल्या शिष्याने कधी कोणाचे त्याने काही दिल्यावाचून घेऊ नये. जो शिष्य दुसऱ्याच्या एखाद्या वस्तूचा अव्हेर करितो, मग ती अगदी क्षुल्लक का असेना तो शाक्यमुनीचा शिष्य नव्हे. आणखी असे की, कोणत्याही निरुपद्रवी प्राण्याची हत्या त्याने समजून-उमजून किंवा द्वेषबुद्धीने करू नये. जो ती करील त्यास शाक्यमुनीचे शिष्यत्व साध्य नाही. हे तीन निषेध पाळले नाहीत तर भिक्षुत्व नष्ट होईल.

हे त्याचे भाषण आटोपल्यावर बुद्ध म्हणाला, 'या तीन निषेधाशिवाय आणखी एका मोठ्या महत्त्वाच्या गोष्टीसंबंधाने मला तुम्हास निषेध घालून द्यावयाचा आहे. तो असा की, दीक्षा धारण केलेल्या शिष्याने आपल्या ठायी काही अलौकिक सामर्थ्य आले आहे असा डौल घालू नये. जो कोणी लोभवश होऊन किंवा आपल्या ठायी चमत्कार करण्याचे सामर्थ्य आहे असे जनांस भासवून त्याला फसविण्याचा प्रयत्न करील, तो माझ्या शिष्यत्वास बिलकूल पात्र नाही. हे भिक्षुजनहो, तुझी मंत्रतंत्रादिकांचा हव्यास धरून जनांस भ्रमात पाडू नका. ती केवळ व्यर्थ होत. कारण हे सारे विश्व कार्यकारणरूप कर्माच्या नियमाने बद्ध आहे. त्यात यत्किंचितही पालट करण्याचे सामर्थ्य कोणाही मानवास नाही. जो कोणी माझा शिष्य अद्‌भुत चमत्कार करण्याचा आव घालील त्याला माझे धर्ममत समजले नाही असे समजावे.'

एके समयी मोठी महामारी उपस्थित होऊन सहस्त्रावधी लोक मरू लागले. त्यामुळे लोक अगदी घाबरून गेले. आपणास केव्हा मृत्यू येईल याचा नेम नाही असे वाटून ते उदास व अस्वस्थ झाले. त्यांच्या चर्येवर केवळ प्रेतकळा आली. कोणाला काहीएक

सुचेनासे झाले; परंतु कित्येक लोकांनी पाहिले की, आपल्या जीविताची शाश्वती मुळीच नाही, तेव्हा त्यांनी असा निर्धार केला की, देहात प्राण आहे तोपर्यंत यथेच्छ खाऊन-पिऊन घ्यावे व साधतील तेवढे ऐशआराम भोगावे. याप्रमाणे जो तो आपापल्या विचारात मग्न असता बुद्धाने आणि त्याच्या शिष्यांनी गावोगाव हिंडून लोकांना आपल्या हातून होईल तेवढे साहाय्य केले. कोणास औषधोपचार करावे, कोणी अनाथ किंवा नातलगांनी सोडलेला असा आजारी मनुष्य आढळल्यास त्याच्याजवळ राहून त्याची साधेल तेवढी शुश्रूषा करावी, त्याला उपदेश करून अंतसमयी त्याच्या चित्तास समाधान वाटेल असे करावे इत्यादी प्रकारच्या स्तुत्य उद्योगात ते एकसारखे गढले होते व उद्योग करिताना त्यांनी आपला जीव धोक्यात पडेल याची मुळीच पर्वा केली नाही.

सदरी सांगितल्याप्रमाणे चोहोकडे मनुष्यसंहार होत असता, एक मनुष्य बुद्धाकडे येऊन म्हणाला : 'माझ्या आसपास लोक पटापट मरत आहेत पाहून मी अगदी घाबरून गेलो आहे. दुसऱ्याविषयी माझ्या मनात मुळीच काही येत नाही. माझे काय होईल याच भीतीने मला ग्रासले आहे. तर गुरुराज, माझ्या चित्तातील ही भीती जाईल असा काही तरी बोध मला करा.' हे त्याचे भाषण ऐकून बुद्धाने त्याला व त्या एकंदर प्रसंगाला उद्देशून पुढीलप्रमाणे बोध केला.

'ज्यास दुसऱ्याची करुणा येते, त्याच्या चित्ताचे समाधान होण्यास काही तरी मार्ग आहे; परंतु मला समाधान प्राप्त होणे नाही. कारण तुझ्या चित्तात केवळ आपल्या पुरताच विचार वागत आहे. ही आत्मपरता तुझ्या हृदयातून जाईल तेव्हा त्यात समाधानाचा प्रवेश होण्याचा मार्ग होईल. आपत्काली मनुष्याच्या हृदयाची परीक्षा होत असते. आपत्कालीच्या योगाने त्याच्या ठायी सदाचारप्रवृत्ती व परोपकारीबुद्धी याचा उद्‌भव व विकास होण्याचा संभव असतो. अरे हे मनुष्या, तू आपल्या सभोवती अशी खेदजनक प्राणहानी होताना पाहत असता, तुझ्या हृदयात एवढी आत्मपरता वसावी ना? तुझे बांधव, भगिनी व इतर इष्टमित्र महामारीस पटापट बळी पडत असता, तुझ्या हृदयातील सुखतृष्णा व विषयवासना याचे निर्मूलन कसे होत नाही? ह्या ऐहिक प्रपंचातील सगळ्या वस्तूस आपण क्रमाक्रमाने नि:संशय मुकणार, त्याच्या संबंधाची चिंता वाहणे व त्या प्राप्त करून घेण्यासाठी अहर्निश उद्योगनिमग्न असणे हे मानवास उचित आहे. आपले हृदय शुद्ध होऊन त्यास शांतीचा अनुभव घडावा असे ज्याला वाटत असेल त्याने हा सारा उपद्‌व्याप सोडून मोकळे व्हावे. मनुष्य सुखतृष्णेस वश होऊन तिच्या तृप्त्यर्थ उद्योग करितात; पण तिची तृप्ती कदापि होणे नाही.

धनलोभाने ते उद्योग करितात; पण प्राप्त झालेल्या धनाने ते लवमात्रही तृप्त नसतात, अशा तृष्णावश जनाची अवस्था कळसूत्री बाहुल्याप्रमाणे असते. तृष्णारूपी सूत्राने ते इतस्तत: भ्रमण पावतात आणि हे सूत्र भंग पावले म्हणजे ते जागच्या जागी पडून राहतात. आता सांप्रत चालू असलेल्या मनुष्यसंहाराविषयी म्हणशील तर मृत्यूच्या दरबारात लहान-मोठ्यांचा विचार काही एक नसतो. ह्याच्यापाशी धनधान्य पुष्कळ आहे किंवा ह्याची योग्यता मोठी आहे, याला एवढ्यात नेऊ नये असे मृत्यू काहीच जाणत नाही. याप्रमाणे सहस्त्रावधी जन ह्या भूमंडलावर प्रतिदिवशी मरण पावत आहेत.

ह्यावरून आयुष्य क्षणभंगुर आहे हा बोध जनचित्तात अवश्य ठसला पाहिजे. हा पाहा, आता सूर्यास्त होत आहे. रात्र झाली म्हणजे तू सुखशयन करिशील; परंतु उदयिक पुन्हा तू जागृत होऊन नित्याचे व्यवहार करण्यास समर्थ होशील याचा काही नेम नाही, तर आजची घडी आहे तेवढीच केवळ आपली आहे असे ध्यानात वागवून स्वचित्ताची शुद्धी करण्यास आजच झटण्यासंबंधाने दिरंगाई अशी बिलकूल करिता कामा नये. आपले आचरण होईल तेवढे त्वरित सुधारण्यास मनुष्याने प्रयत्नशील असावे. आज काय घाई आहे, पुढे पुष्कळ काळ आहे, असे मनात आणून चालणार नाही. कारण काळ केव्हाच निघून जात असतो. मला आणखी थोडा प्रपंचाचा अनुभव घेऊ द्या अशी जी इच्छा असते ती केवळ व्यर्थ होय आणि ह्या जीवितातील सुखविषयीची जी लालसा ती केवळ विफल होय. हे सारे विश्व केवळ भासमय आहे. ते केव्हा दृष्टीआड होईल याचा नेम नाही आणि स्वर्गसिद्धीसाठी जे येथे कर्मपरायण होतात ते मृगजलामागे लागणाऱ्या हरिणासारखे होत. प्रपंची जन विषयाभिलाष धरून पिंजऱ्यात ठेवलेल्या पक्ष्याप्रमाणे आपली अवस्था करून घेतात. ह्या पक्ष्यांना काही वेळ अन्न प्राप्त होते खरे; पण छिन्नभिन्न होऊन चुलीवरील भांड्यात पडण्याची पाळी त्याला लवकरच येते. अशीच अवस्था सुखाभिलाषी जनाची होते. त्यास इच्छित सुखविषय काही वेळ प्राप्त होतात खरे, तरी अंती त्यास मरणवश व्हावे लागते. तर हे मनुष्या, माझ्या धर्माचे अवलंब करून मी घालून दिलेल्या नियमाप्रमाणे जो आपले वर्तन ठेवील त्याचा चिंताज्वर नाहीसा होऊन त्याच्या चित्तास समाधान व शांती प्राप्त होईल. माझ्या धर्माचा अंगीकार करून आपल्या वृती व कृती पवित्र होतील असे करण्यास जो झटतो त्यास खऱ्या निर्वाणाची सिद्धी सुगम होते. मनुष्यापाशी सुवर्ण-रत्नादिकाचा केवढाही मोठा निधी असला किंवा त्याची सत्ता केवढीही प्रचंड असली, त्याचे बुद्धिवैभव केवढेही अचाट असले, त्याचे आयुष्य कितीही दीर्घ असले, तथापि जर त्याचे आचरण पवित्र नाही, त्याचे चित्त शुद्ध नाही, तर त्यास खरे सौख्य प्राप्त होणे नाही. निर्वाणसिद्धीचा त्यास अधिकार नाही.''

बुद्धधर्माची दीक्षा ज्या तरुण जनांनी घेतली होती ते एके समयी बुद्धापाशी येऊन त्यास विचारू लागले की, गुरुराज, आम्ही कोणत्या प्रकारे वर्तन करावे ते आम्हास सांगा. तेव्हा बुद्धाने त्यास पुढीलप्रमाणे बोध केला–

''जे कोणी माझ्या धर्माची दीक्षा घेऊन माझ्या उपदेशाप्रमाणे सद्भावपूर्वक वर्तू इच्छित असतील, त्यांनी मुख्यत: चार गोष्टींकडे लक्ष पुरवावे. त्या चार गोष्टी ह्या होत– (१) सत्यमार्गात काळ दवडावा; (२) सर्वदा धर्मबोधाचे श्रवण करावे; (३) श्रुतधर्माचे अहर्निश मनन करून सत्यज्ञान प्रकाशाची प्राप्ती करून घ्यावी; (४) आणि सर्व काळ नीतीने वर्तावे. माझ्या धर्ममार्गात ह्या क्रमाने प्रवेश केला पाहिजे. आता तुम्हास मी दहा गोष्टींचा निषेध करितो. हा निषेध पाळिल्याने तुमच्या ठायी माझे शिष्यत्व उत्तम प्रकारे प्रतीत होईल. त्या दहा गोष्टी ह्या होत ` तुम्ही कोणत्याही प्राण्याची हत्या करू नका; कोणाची चोरी करू नका, देह व मन अपवित्र ठेवू नका; असत्य भाषण करू नका; मद्यपान करू नका; निषिद्ध वेळी अन्नभक्षण करू नका; नर्तनादी कर्मे करू नका व नाटकादी मनोरंजन प्रकार पाहू नका; पुष्पमाला, सुगंधी द्रव्ये, अलंकार, सुंदर वस्त्रे याचा उपयोग करू नका; उंच व रुंद शय्येवर निजू नका; सुवर्ण–रौप्यादी कोणाकडून घेऊ नका.''

दुसरे एके वेळी त्याने आपल्या भिक्षुसंघास येणेप्रमाणे बोध केला– ''साधू कोणास म्हणावे? तर जो धर्मशील तो साधू होय. धर्मशील कोण? ज्याचे चित्त, वाचा आणि क्रियाही सत्यज्ञानास अनुसरून असतात तो धर्मशील होय. समर्थ पुरुष कोण? जो सहनशील असतो तो समर्थ होय. कारण सहनशील पुरुष आत्मजय करून चित्तात सद्भावणाऱ्या सर्व विचारांचा निग्रह करितो यामुळे तो शांत, विविक्षू आणि निर्दोष असतो. ज्ञानी पुरुष कोण? तर ज्यास आपल्या वास्तविक स्वभावाचे परिज्ञान झालेले असते तो ज्ञानी होय. असा मनुष्य स्वचित्तास मळ लागू देत नाही; तो सर्वदा सद्वर्तन करितो.'' हे भिक्षुजन हो, तुम्ही कोणत्या गोष्टी प्राणांतसमय आला तरी करू नये ते सांगतो. तुम्ही कोणत्याही प्राण्याची हत्या करू नका; जे तुमचे नव्हे त्याचा अपहार करू नका. असत्य भाषण करू नका. मद्यपाने करू नका. व्यभिचार करू नका. हे पाच नियम मी तुम्हास घालून देत आहे. जे कोणी माझ्या धर्माची दीक्षा धारण करून माझ्या संघात येतात, त्यांनी हे पाच नियम अवश्य पाळिले पाहिजेत. ह्याशिवाय आणखी तीन गोष्टीसंबंधाने मी तुम्हास निषेध करितो. त्या गोष्टी अशा की, तुम्ही रात्रीस अन्न सेवन करू नका, पुष्पमाला किंवा सुगंधी द्रव्ये अंगावर घालू नका, मृदू

शय्येवर निजू नका तर जमिनीवर चटया अंथरून त्यावर निजत जा. आणखीन असेही, जो कोणी विशेष धर्मशील असेल त्याने उपवासाचा दिवस पाळावा आणि स्वसामर्थ्यानुरूप संघाची शुश्रूषा करून तो कायम राहील असे करावे.

आता एकंदर बुद्धधर्मानुयायी जनांनी पाळण्यासाठी बुद्धाने दहा नियम घालून ठेविले आहेत. एके समयी त्याला या प्रकरणी कोणी विचारल्यावरून तो म्हणाला, 'प्राणिमात्राच्या सर्व कृती दहा गोष्टींमुळे वाईट ठरतात. या दहा गोष्टी त्यांनी टाळल्या तर त्यांच्या सर्व कृती चांगल्या होतात. या दहा गोष्टी कोणत्या ते सांगतो. देहासंबंधी पातके तीन– प्राणघात, चौर्य आणि व्यभिचार, वाणीसंबधी पातके चार ¯ असत्य भाषण, परनिंदा, अपशब्द आणि व्यर्थ प्रलाप. मनासंबंधी पातके तीन– लोभ, द्वेष आणि भ्रम. यासंबंधाने तुम्हास माझा उपदेश असा आहे की, कोणाही प्राण्याची हत्या करू नका; तर तुमच्या चित्तात जीवमात्राविषयी सर्वदा आदरबुद्धी वसावी. कोणाच्या वित्ताचा अपहार करू नका; तर प्रत्येकास त्याच्या श्रमाप्रमाणे फलप्राप्ती व्हावी यासाठी आपल्याकडून होईल तेवढे साहाय्य करा. सर्व प्रकारच्या अपवित्र गोष्टीपासून दूर राहा. व्यभिचार करू नका. जितेंद्रिय राहा. असत्य भाषण करू नका. सर्वदा सत्य बोला आणि जे बोलावयाचे त्याचा चांगला विचार करून मग बोला. तुमच्या सत्यभाषणाने कोणास उपद्रव होईल असे करू नका. जे काही बोलावयाचे ते तारतम्य पाहून बोला. तुमचे भाषण प्रेमळ असून शहाणपणाचे कोणाच्या संबंधाने भलभलत्या गोष्टी लोकांत प्रसिद्ध करू नका. एखाद्याची निंदा तुमच्या कानी आल्यास ती इतरांस सांगून तिचा फैलाव करू नका. आपल्या बांधवांचे दोष काढीत बसू नका, तर त्यांच्या ठायी जे सद्‌गुण असतील तेच पाहा आणि त्यांचे शत्रू त्यांची निंदा करू लागले असता त्यांच्या चांगल्या गुणांची वाखाणणी करून त्यांच्यात काहीतरी चांगुलपणा आहे असे दाखवा. अपशब्दांनी आपली जिव्हा विटाळू नका. सभ्य रीतीस अनुसरून जे काही बोलणे ते बोला. त्यात आपला थोरपणा व संभावितपणा लोकांच्या दृष्टीस यावा अशी खबरदारी ठेवा. व्यर्थ प्रलाप करण्यात काळाचा अपव्यय करू नका. प्रसंगास उचित असे मित भाषण करा. उगीच बकवा करीत बसू नका. असे करून आपले अज्ञान किंवा नीचपणा प्रकट करण्यापेक्षा मुकाट्याने बसणे चांगले. दुसऱ्याची संपदा पाहून तिचा लोभ करू नका किंवा त्याचा हेवा करू नका, तर त्याची संपन्नता पाहून हर्ष पावा. परद्वेषरूप मलाचे स्वचित्तापासून क्षालन करा. क्रोध, द्रोह व दुर्बुद्धी ह्या वृत्ती चित्तातून काढून टाका. कोणाचाही द्वेष करू नका. तुमची कोणी निंदा केली किंवा तुमचे काही नुकसान केले तरी त्याचा द्वेष करू नका. सर्वांवर प्रेम करा आणि

त्यांचे कल्याण करण्याची बुद्धी सर्वदा चित्तात वागवा. आपल्या मनातील अज्ञान काढून टाकून सत्यज्ञानाचा बोध मिळविण्यास सर्वदा तत्पर राहा. वृथा संशयास किंवा भ्रममूलक विचारास आपल्या चित्तात थारा देऊ नका. सत्यधर्मज्ञानाविषयी तुमची वृत्ती साशंक झाल्याने तुम्ही त्याविषयी उदास किंवा बेपर्वा व्हाल आणि तुमचे मन भ्रमात पडले असता ते तुम्हास आडमार्गात नेऊन तुमचा नाश करील. अशाने तुम्हास सत्पथाचा लाभ होणार नाही. तुम्हास निर्वाणपदवी प्राप्त होणार नाही.'

त्याने आपल्या मागे आपल्या धर्माचा प्रसार कोणत्या प्रकारे करावा ते पुढील उपदेशात उत्तम प्रकारे सांगितले आहे. तो म्हणतो: ''माझे देहावसान होऊन मजपासून तुम्हास बोध प्राप्त होईनासा झाला म्हणजे तुम्ही आपणापैकी जे कोणी कुलीन, सुशिक्षित व नीतिमान असतील त्याला आपले गुरू करून त्याच्याकडून धर्मबोध श्रवण करा, माझा झगा त्याला परिधान करू द्या. माझ्या निवासस्थानात त्यास राहू द्या. माझ्या उपदेशपीठावर त्यास बसू द्या. माझा झगा म्हटला म्हणजे नि:सीम सहनशीलता आणि तितिक्षा एतद्रूप होय. माझे निवासस्थान अखिल प्राण्यांवर प्रेम आणि परोपकार यांचे बनलेले आहे. आता माझे उपदेशपीठ कशाचे आहे म्हणाल तर सद्धर्माचे रहस्य काय आहे व त्याचे नियम व्यवहारात कोणत्या प्रकारे पाळावे याचे ज्ञान प्राप्त होणे एतद्रूप ते आहे. जनास उपदेश करणाराने सत्यधर्मसिद्धांताचे प्रतिपादन कोणाचीही दिक्कत न धरिता करावे. त्याने धारण केलेल्या वृत्तीस जे नियम लागू आहेत त्याचे परिपालन उत्तम प्रकारे सद्भावपूर्वक करावे आणि सर्वदा सद्वर्तनरत असावे. अशा उज्ज्वल वृत्तीचा निरंतर अवलंब करून त्याने स्वसंमत धर्मतत्त्वाचा बोध परम प्रेमळ चित्ताने व अत्यंत मृदू वाणीने करून अन्य जनांची मने सत्यधर्माकडे वळतील असे करावे. उपदेशकाने आपला कमीपणा होईल असे कोणतेच कृत्य करू नये आणि आपला सत्यधर्मप्रसाराचा स्तुत्य क्रम सहसा सोडू नये. लोक ज्यास थोर म्हणतात त्यांच्याशी सहवास केल्याने आपली मान्यता वाढेल असा भाश्ममूलक समज त्यांच्या चित्तात कदापि वागू नये. त्याचप्रमाणे जे क्षुद्रबुद्धी आणि अनाचारी असतील अशांची संगती त्याने कदापि करिता कामा नये. कोणत्याही प्रसंगी प्रबल मोहप्रसंग उपस्थित होऊन त्याच्याकडून स्वव्रतभंग होण्याचा रंग दिसल्यास त्याने माझे आजपर्यंतचे चरित्र लक्षात आणावे आणि असला प्रसंग टाळण्यास मनापासून झटावे. त्याने केलेला धर्मबोध श्रवण करण्यास जे कोणी येतील, त्यांचे कल्याण त्याने सतत चिंतावे आणि आपल्या बोधामध्ये त्याने कोणाविषयी कदापि मत्सरभाव प्रकट करू नये; कोणाची अवहेलना करू नये; इतर उपदेशकाला दोष देऊ नये; कोणाची गर्हणा करू नये;

कठोर शब्दांनी कोणास ताडन करू नये. माझ्या इतर शिष्यांच्या नावाचा उल्लेख स्वबोधात करून त्यांची निर्भर्त्सना करू नये किंवा त्यांच्या दुर्वर्तनाचा प्रसिद्धपणे उल्लेख करून त्यांचा अधिक्षेप करू नये. त्याने निर्मल वस्त्रे परिधान करावी. देह व मन परम शुद्ध राखावे आणि अखिल जगाशी मित्रभाव चित्तात अहर्निश वागवावा. असे करील तरच तो माझ्या उपदेशपीठावर आरूढ होण्यास योग्य होईल. धर्मसंबंधी कलहप्रचुर वाद करण्याचा हव्यास त्याने कदापि करू नये; त्याचप्रमाणे अन्य जनाशी वादविवाद करून स्वबुद्धिमत्तेचे श्रेष्ठत्व स्थापन करण्याची हाव त्याने कधीही धरू नये; सर्वदा शांत व स्वस्थचित्त असावे. त्याच्या हृदयात कोणाविषयी यत्किंचितही शत्रुभाव वसू नये आणि अखिल प्राण्यांवर उपकार करण्याची बुद्धी तिचा त्याग त्याने कसाही प्रसंग आला तरी करू नये. समग्र मानवजाती पूर्ण सदाचारी होऊन माझी योग्यता पावेल असे करण्याच्या प्रयत्नात सर्वदा मग्न असावयाचे हा संकल्प त्याने चित्तात दृढ वागवावा. ह्या संकल्पापासून त्याने सहसा पराङ्मुख होऊ नये. याप्रमाणे त्याने आपले धर्मोपदेशाचे सत्कार्य निश्चयपूर्वक व परम उत्साहाने सतत करीत असावे. असे तो करील तर त्याचे जीवित धन्य होऊन त्याच्या सद्‌बोधमृताच्या योगाने अनंत जनास मोक्षाची प्राप्ती घडेल.

आता मी जो धर्म प्रवृत्त केला आहे त्याचे रहस्य अत्यंत स्पष्ट करून मी तुम्हास सांगितले आहे. त्याचा उपदेश जनास योग्य प्रकारे केल्याने त्याची माझ्या सद्‌धर्माकडे प्रवृत्ती व्हावयास विलंब लागणार नाही. माझ्या बोधाचे एखादे सुवचन जरी त्याला स्पष्टपणे व प्रेमळपणे समजून सांगितले तरी तेवढ्याने त्याच्या चित्ताचा योग्य पालट होऊन त्याची नित्याचरणाकडे प्रवृत्ती होईल. त्याच्या ज्ञानश्चचे उन्मीलन होऊन सत्यधर्मज्ञानाचा प्रकाश त्याच्या चित्तात फाकेल. त्याच्या ठायी ज्या दुर्वासना उच्छृंखल झालेल्या असतात त्याचे दमन होऊन त्याचे चित्त शांत होईल. द्वेषादी ज्या दुर्वृत्ती त्याच्या चित्तात उद्दाम झालेल्या असतात, त्याचे निर्मूलन होऊन अखिल प्राण्यांविषयी त्याच्या अंतर्यामी आदरबुद्धी व प्रेमही उत्पन्न होईल. माझ्या धर्माचा उपदेश करणाराच्या ठायी सतत उद्योग करण्याचे सामर्थ्य अवश्य असले पाहिजे. त्याने सर्वदा आनंदवृत्ती असावे. आपला सदुद्योग परिणामी असफल होईल अशी त्याच्या मनाची पूर्ण खात्री असावी. लोक आपला उपदेश ऐकत नाहीत, आपण सांगतो त्याप्रमाणे वर्तत नाहीत, असे पाहून त्याने निराश होता कामा नये. आपल्या स्तुत्य उद्योगापासून विराम पावू नये, तर स्वसंमत सत्यधर्माचा उपदेश भ्रांत जनाला अविरतपणे व अविश्रांतपणे पुन्हा करावा. असा तो दृढ निश्चयाने करील तर त्याला निःसंशय यश प्राप्ती होईल.

बागवान जसा उदकप्राप्तीसाठी कूप खणण्याचे काम निश्चयाने करितो तद्वत धर्मोपदेशकाने मनुष्याच्या चित्तात सद्‌बोध ठसविण्यास झटले पाहिजे. बागवानाने कोरडी रेती आणि माती पुष्कळ खणून काढावी तेव्हा त्याला एखादा झरा लागण्याचा संभव असतो. थोडीशी माती खणून त्याला पाणी मिळाले नाही तरी तो निराश होत नाही, तर आणखी माती खणीत खोलवर जातो आणि शेवटी त्याला अंमळ ओली माती लागली म्हणजे तो उत्साहयुक्त होऊन आणखी खणीत जातो; आणि अखेरीस त्याला उदक मिळते. अशीच गोष्ट उपदेशकाची आहे. अत्यंत कठोर हृदयाच्या मनुष्याशी त्याची वारंवार गाठ पडण्याचा संभव असतो. अशा जनास पुन्हा पुन्हा बोध करून त्याच्या अंतर्यामामध्ये खोलवर प्रवेश केल्यावाचून त्याची मने मृदू होण्यासारखी नसतात. आता निरनिराळ्या जमिनीत असे कमी-अधिक खणावे लागते. तद्वतच मनुष्याच्या हृदयाची अवस्था आहे. ही गोष्ट उपदेशकाने चांगली लक्षात ठेविली पाहिजे. हे कुलीन आणि ज्ञानसंपन्न मनुष्य हो, तुम्हापैकी जो कोणी धर्मोपदेशकाची वृत्ती धारण करील त्याच्या स्वाधीन माझा हा धर्मपंथ करीत आहे. त्याचे तुम्ही परम आदराने ग्रहण करून योग्य रीतीने परिपालन करा. त्याचे पुन्हा पुन्हा पठन करा. त्याचे वास्तविक रहस्य काय आहे ते जाणण्याचा प्रयत्न करा. त्याची जगात प्रसिद्धी करा आणि त्याचा उपदेश भूमंडलावरील एकंदर देशांमध्ये जाऊन करा. माझ्या ठायी कार्पण्य व अनुदारता याचा लवलेशही नाही, हे तुम्ही पाहत आहा. मला जे काही कळत आहे ते सारे इतर ज्ञानेच्छू जनास सांगण्यास मी सर्वदा तत्पर व उत्सुक असतो, तर ही माझी वृत्ती तुम्ही धारण करून जे कोणी सत्यजिज्ञासू जन तुम्हास आढळतील त्याला परम उदार बुद्धीने व अत्यंत प्रेमपुरस्सर सत्यज्ञानाचा उपदेश करा; त्याला प्रत्येक गोष्ट मनापासून नीट समजावून सांगा. आपल्यापाशी जो ज्ञानसंचय असेल त्याचे त्यास नि:शेष अर्पण करा. माझ्या परम सुखदायी धर्म नियमाचे श्रवण करण्यास उत्सुक अशा जनाचा उत्साह भंग करिता त्याला आपल्यापाशी बसवून घेऊन मोठ्या प्रेमाने आपणाला काय कळत असेल ते कथन करा. जे कोणी माझ्या धर्ममतासंबंधाने अश्रद्धा दर्शवितील त्याच्या ठायी आपल्या सदुपदेशबलाने सत्यज्ञानग्रहणेच्छा जागृत करण्यास झटा आणि त्याची चित्तवृत्ती प्रसन्न व आनंदयुक्त होईल असे करा. त्याच्या निश्चय चित्तास सुविचाराच्या योगाने चलन प्राप्त होईल असे करा. त्याच्या अंतर्यामी सत्यज्ञान प्रकाश फेकून त्याचे ज्ञानश्च उन्मीलित करा. त्याच्या बुद्ध्यादी मानसिक सच्छक्तीचे व शमदमादी हृदयाच्या सद्‌वृत्तीचे उद्दीपन करून त्या विकसित व उन्नत होतील असे करा आणि असा पुन्हा पुन्हा अविरतपणे व निश्चयाने प्रयत्न करून

त्याच्याकडून माझ्या धर्ममताचा अंगीकार करावा आणि तद्नुसार त्याचे सर्वदा वर्तन घडेल असे करा. या भूलोकी तुमची दुराचारी व दुर्बुद्धी प्रतिपदी गाठ पडेल, त्याच्याशी वैर न करिता किंवा त्याची अवहेलना न करिता त्यास सदाचाराचा मार्ग दाखवून द्या, त्याच्या ठायीच्या दुर्बुद्धीचे निर्मूलन करा. त्यास खरे सौख्य, नि:सीम शांती व अढळ समाधान कशाने प्राप्त होण्यासारखे आहे ते सांगा. याप्रमाणे सर्वदा प्रयत्नशील राहून सर्वत्र पवित्रतेचे साम्राज्य पसरा. शूर योद्धा जसा परचक्रनिवारणार्थ शस्त्रादिकांनी सज्ज होऊन समरांगणी उभा राहून प्राणाचीही पर्वा न करिता शत्रूशी सामना करितो, तद्वत तुम्ही दुराचार प्रवृत्तिरूप महाशत्रूशी शमदमादी सद्प्रवृत्तिरूप शस्त्रांनी चांगले सज्ज होऊन सतत संग्राम करा आणि पवित्रतारूप साम्राज्याचे वैभव आणि सत्ता सर्वत्र प्रस्थापित करा. या तुमच्या कामगिरीबद्दल तुम्हास अखंड निर्वाणरूप पारितोषिक प्राप्त होईल.

# भाग सातवा
# धर्म बोधपद्धती

येथवर जे निरूपण केले आहे, त्यावरून बुद्धाच्या बोधपद्धतीचे थोडेसे स्वरूप वाचकांच्या लक्षात आलेच असेल; तरी त्याविषयी आणखी थोडे या भागात सांगण्यासारखे आहे.

मागे सांगितलेच आहे की, बुद्ध आणि त्याचे शिष्य निरनिराळ्या प्रांतात हिंडून स्वसंमत धर्ममताचा उपदेश जनास करीत असत. हा त्यांचा क्रम वर्षाचे आठ महिने सतत चालत असे आणि पर्जन्यकाळ आला म्हणजे ते कोणत्या तरी विहारामध्ये येऊन राहत असत. या चातुर्मासामध्ये बुद्धाचा क्रम असा की, स्वशिष्यांनी जे संशय काढले असतील त्याची निवृत्ती करावी. ह्याप्रमाणे सतत क्रम चालल्यामुळे त्याच्या धर्ममतास बरेच निश्चित स्वरूप प्राप्त झाले, तरी त्याच्या वेळी त्याचा धर्मबोध कोणी लिहून ठेवण्याचा प्रयत्न केला होता असे दिसत नाही. बुद्ध आपला सारा बोध तोंडीच करीत असे, त्याने आपल्या हाताने किंवा स्वशिष्यांकरवी काहीएक लिहून ठेवलेले आढळत नाही. तो आपला बोध संक्षिप्त वचनाच्या रूपाने करीत असे. ही वचने त्याचे शिष्य लक्षात ठेवून त्याचे पुन्हा पुन्हा उच्चारण करीत असत. एखाद्या बोधवचनाचे त्यास विस्मरण पडले असता ते बुद्धाकडे येऊन त्याला त्याविषयी पुन्हा प्रश्न करीत. त्याचप्रमाणे एखाद्या सूत्ररूप वचनाचा अर्थ त्याच्या लक्षात आला नसला तर ते त्याचे स्पष्टीकरण त्याला विचारीत आणि बुद्ध त्याच्या सर्व संशयाचे व प्रश्नांचे समाधान करण्यास सर्वदा निरलसपणे तत्पर असे. शिवाय त्याच्यापाशी शेकडो लोक येऊन निरनिराळ्या प्रश्नासंबंधाने वादविवाद करीत असत. अशाप्रसंगी तो जे बोले ते त्याचे शिष्य चित्त देऊन ऐकत असत. ह्या प्रमाणे सतत चाळीस-पंचेचाळीस वर्षे क्रम चालला होता, त्यामुळे त्याचा एकंदर बोध त्याच्या जवळ सर्वदा असणाऱ्या शिष्यांच्या मनावर उत्तमप्रकारे ठसला होता आणि हा स्वत:स कळलेला बोध इतर जनास समजून सांगण्यास ते सर्वदा उद्युक्त असत. येणेकरून बुद्धाचा बोध जगात बहुतेक सगळा कायम राहिला आहे. ह्या प्रकरणी पुढे एका स्वतंत्र भागात काही लिहावयाचे आहे. प्रकृती त्याच्या बोधपद्धतीविषयीच थोडेसे लिहू.

वरती सांगितले आहे की, तो आपला बोध सूत्ररूपात करीत असे. तरी पण ह्या पद्धतीचा अवलंब सर्वच ठिकाणी तो करीत नसे. जसा श्रोता भेटे तसा तो आपल्या पद्धतीत पालट करीत असे. कधी कधी नुसते प्रश्न करून तो आपल्या श्रोत्यांच्या मनातील भ्रममूलक विचार काढून टाकी आणि मग स्वसमंत धर्माचा त्यास उपदेश करीत असे. व्यावहारिक गोष्टीचे दाखले देऊन बोध करण्यात तर त्याचा हातखंडा होता. कधी कधी तो कल्पित गोष्टींचे दृष्टांत देऊन आपल्या बोधवचनांचा अर्थ विशद करीत असे. ह्या अशा त्याने सांगितलेल्या शेकडो गोष्टी बौद्धधर्मग्रंथातून आज उपलब्ध आहेत. आता ह्या बोधपद्धतीचे स्वरूप वाचकांच्या ध्यानात यावे म्हणून व त्याच्या काही बोधाचे ज्ञान त्यास सहजी प्राप्त व्हावे म्हणून त्याच्या कित्येक बोधप्रसंगाचा व दृष्टांतरूप कथांचा येथे उल्लेख करितो.

## ब्रह्मप्राप्तीसंबंधाचे प्रश्न

एके समयी बुद्ध कोसल प्रांतातून जनास उपदेश करीत चालला. एका ब्राह्मण वसतीच्या गावापाशी प्राप्त झाला आणि तेथे गावाबाहेरील आंबराईत तो उतरला. त्या गावात दोघे तरुण विद्वान ब्राह्मण राहत असत. त्यांच्यात ब्रह्मप्राप्तीच्या मार्गासंबंधाने वाद पडला होता. बुद्ध आपल्या गावापाशी आला आहे असे पाहून ते त्याच्या दर्शनास आले आणि आपला वाद त्याच्या पुढे ठेवून ते म्हणाले, 'गुरुराज, आमच्या या वादाचा निर्णय सांगा. सन्मार्गाचे अवलंबन करून ब्रह्माप्रत पावण्याची आम्हाला उत्कट इच्छा झाली आहे.' ही त्याची वृत्ती पाहून व त्यांचा वाद ऐकून घेऊन बुद्धाने त्यास शांतपणे असा प्रश्न केला की–

'तुम्हाला निरनिराळे सगळे मार्ग सत्य आहेत असे वाटते काय?'

**ब्राह्मण –** होय, आम्हास ते सत्यच वाटतात. कारण आमच्या या गावाला येण्याचे मार्ग अनेक आहेत, कोणी कोणत्याही मार्गाने आला तरी तो आमच्या गावात येऊन पोहोचतो. अशीच गोष्ट ब्रह्मप्राप्तीच्या विविध मार्गांची आहे.

**बुद्ध –** तुमचे हे खेडे दृश्य आहे. तसे ब्रह्म जे काही आहे म्हणता, ते दृश्य आहे काय? जे कोणी ब्रह्माविषयी सांगतात किंवा वेदादी ग्रंथात लिहिलेले वाचितात, त्यांनी ते प्रत्यक्ष कधी पाहिले आहे काय?

**ब्राह्मण –** नाही, कोणी पाहिले नाही. ब्रह्मश्च आदी इंद्रियास विषय होणारे नव्हे.

**बुद्ध –** तर मग जे कधी कोणी पाहिले नाही त्यास जाऊन मिळण्याचे अनेक मार्ग आहेत व ते सारे सत्य आहेत असे प्रतिपादन करण्यात कोणते स्वारस्य आहे? कल्पना

करा की, एखाद्या मनुष्याने चोहोकडून आलेले चार रस्ते जेथे मिळतात अशा चव्हाट्यावर एक जिना तयार करून उभा केला आणि हा जिना तू कशासाठी येथे उभा करीत आहेस, असे त्यास लोकांनी पुसले असता, तो म्हणाला, हा जिना वरील मंदिरात चढून जावयासाठी आहे. त्यावर ते त्याला असा प्रश्न करितात की, तू म्हणतोस ते मंदिर आहे कोठे? वरती तर काहीएक दिसत नाही. त्यावर तो म्हणेल की, हे मंदिर कोठे आहे ते मला माहीत नाही. तेव्हा अर्थात ते त्याला वेड्यात काढून म्हणतील की जे स्थान कोठे आहे ते तुला माहीत नाही त्यात जाण्यासाठी हा जिना येथे रोवीत आहेस त्याला म्हणावे तरी काय? अशीच गोष्ट ब्रह्मवेत्त्या ब्राह्मणाची आहे. ज्या ब्रह्मास ते प्राप्त होण्याचा मार्ग धुंडाळीत आहेत, त्याचे लवमात्रही ज्ञान त्यास नाही. तेव्हा अर्थात चव्हाट्यावर जिना उभा करणाऱ्या मनुष्याप्रमाणे त्याचा वेडेपण व्यक्त होतो आणि ब्रह्मप्राप्तीविषयीचा त्यांचा सारा खटाटोप व्यर्थ आहे असे म्हणावे लागते.

वेदत्रयीमध्ये निष्णात असणाऱ्या ब्राह्मणाच्या अंगी ब्रह्मप्राप्ती करून देण्याची प्रतिज्ञा करितात त्याविषयी त्यास लवमात्रही ज्ञान नसते. ह्याप्रमाणे ते स्वत: अंध जनास मार्ग दाखविण्यासंबंधाने त्यांनी कितीही वल्गना केल्या तरी त्या केवळ व्यर्थ होत. त्याची ब्रह्ममीमांसा व तत्त्वप्राप्तीच्या मार्गासंबंधाचा ऊहापोहही निव्वळ शाब्दिक वादरूप होत. त्यात तथ्य असे यत्किंचितही नाही. दुसरे असे की, हे ब्राह्मण इंद्र, वरुण, सोम आदिकरून देवतांची किंवा ब्रह्मांची प्राप्ती व्हावी म्हणून त्याची प्रार्थना करितात; पण त्यांच्या त्या प्रार्थनांचा व स्तोत्रांचा काहीएक उपयोग होणे नाही. कारण उदाहरणार्थ असे पहा की, नदीच्या पलीकडील तीराला तुम्हाला जावयाचे असून तुम्ही त्वरित बसून न जाता तिच्या अलीकडच्या तीरीच बसून त्या पैलतीराने आपल्याकडे यावे अशी त्याची प्रार्थना केलीत, तर ते तीर तेथून कधीतरी हालेल काय? अशीच गोष्ट बह्मादिप्राप्तीची आहे. तत्प्रीत्यर्थ स्तोत्रपाठ करीत बसण्याचे सोडून मनुष्याने आपल्या ठायी सद्‌गुणांचा विकास करण्यास अहर्निश झटले पाहिजे. आपले आचरण शुद्ध राखण्यास सर्वदा जपले पाहिजे. म्हणजे वास्तविक मोक्षाने अविनाशी धाम त्यास प्राप्त होण्याचा संभव आहे. आता मला सांगा की, ज्या ब्रह्मास ते जाऊन मिळण्याची हाव धरितात ते इंद्रियाच्या विषयास मोहून जाणारे आहे काय? त्या बह्माच्या ठायी कामक्रोधादी विकारास अवकाश आहे काय? जर नाही तर ह्या विषयास आणि विकारांस सर्वथा वश होणाऱ्या ब्राह्मणांचा स्वभाव त्या ब्राह्मणाशी कसा सदृश असू शकेल बरे? आणि जेथे स्वभावसाम्य नाही तेथे सायुज्यता कोठून संभवायला?

यास्तव मला वाटते की, ब्राह्मणाचे हे ज्ञाननिधित्रय (वेदत्रयी) केवळ शुष्क अरण्यवत होय. ह्या अरण्यात तुम्हास कोणताही मार्ग सापडणे नाही. त्यात भ्रमण करणाऱ्या जनास काहीएक लाभ न होऊन त्याची निव्वळ निराशा मात्र होईल.'

**ब्राह्मण –** तर मग ब्रह्मप्राप्तीसाठी कोणत्या प्रकारे आम्ही प्रयत्न करावा ते आम्हास कृपा करून सांगा.

**बुद्ध –** माझा धर्ममार्ग अष्टविध आहे. त्याचे अवलंबन जो करील त्याच्या ठायीच्या सर्व भ्रमांचा निराशा होईल. त्यास ज्ञानप्रकाश प्राप्त होऊन कैवल्यप्राप्तीचा मार्ग स्पष्ट दिसू लागेल. त्याचे वर्तन सर्वदा सरळ असेल. ज्या गोष्टींनी त्याच्या ठायी अपवित्रता उत्पन्न होण्याचा संभव आहे, त्यापासून त्याचे मन सर्वथा पराङ्मुख राहील. नीतिनियमाचे अनुसरण त्याच्याकडून अहर्निश होत राहील. त्याचे मन सर्वदा निर्मळ राहून त्याची वाणी व कृती सदोदित निष्पाप असेल. सर्वथा निर्दोष अशा उपायांचे अवलंबन करून तो आपली प्राणयात्रा चालवील. तो आपल्या इंद्रियांचा निग्रह उत्तम प्रकारे करील. तो सर्वदा मनशील आणि स्वस्थचित्त असेल.

## सर्वविनाशविषयक प्रश्न

सिंहनामेकरून एक सेनापती बुद्धाची कीर्ती ऐकून व त्याने उपदेशिलेला धर्ममार्ग पसंत वाटून एके दिवशी बुद्धापाशी आला आणि त्याने आपल्या मनातील कित्येक शंका त्याला विचारिल्या. तो म्हणाला -

'गुरुराज, आपण कर्माच्या परिणामाचा निषेध करिता काय? प्राणिमात्राच्या हातून घडणाऱ्या कर्मापासून काहीएक फलनिष्पत्ती व्हावयाची नाही म्हणून कोणीही कर्मपर होऊ नये असा आपला अभिप्राय आहे काय? ऐहिक वस्तू तुच्छवत लेखून मनुष्याने आपल्या आत्म्याचा आणि अस्तित्वाचा नायनाट करावा असा उपदेश आपण जनास करिता काय?'

**बुद्ध –** हे सिंह, तू म्हणतोस ते काही अंशी सत्य आहे आणि काही अंशी असत्य आहे. माझे मत काय आहे ते मी तुला सांगतो. श्रवण कर. जी कायिक, वाचिक आणि मानसिक कर्मे अपवित्र असतात, ती करण्याविषयी माझा निषेध आहे. जेणेकरून हृदयवृत्ती सदोष होण्याजोगी असते त्या गोष्टी वर्जिण्याविषयी मी जनास बोध करीत असतो. सर्व दुष्ट कर्मे आणि अनाचारास प्रवृत्त करणाऱ्या गोष्टी निर्मूल व्हाव्या हे इष्ट होय. ह्या ज्याच्या ठायीच्या नष्ट झाल्या आहेत त्याचा अहंभाव विगलित झाला असे

समजावे. ह्या अहंभावाचा विनाश करावा असा मी जनास कंठरवाने बोध करीत असतो. त्याचप्रमाणे ग्राम्यविषयतृष्णा, दुर्बुद्धी आणि भ्रांती ही जनचित्तातून विनष्ट व्हावी असा माझा अभिप्राय आहे. सहनशीलता, प्रेम, परोपकार बुद्धी आणि सत्यप्रीती ही जनांच्या चित्तातून विनाश पावावी असे माझे मत मुळीच नाही. सर्व प्रकारचा कायिक, वाचिक व मानसिक अनाचार मी तिरस्करणीय मानितो; परंतु सदाचार आणि पवित्रता ही मला प्रशंसनीय वाटतात.

**सिंह –** गुरुराज, माझ्या मनात आणखी एक शंका आली आहे. तिचे समाधान करण्यास आपण समर्थ आहा. मला राजाने आपल्या सेनापती नेमिले असून त्याने विहित केलेले नियम प्रजाजनास पाळावयास लावण्याचे व परचक्र आले असता त्याशी युद्ध प्रसंग करण्याचे काम मजकडे दिले आहे. महाराज, आपण तर असा बोध करिता की सर्वांवर नि:सीम दया करावी आणि सर्व विपन्न जनांसंबंधाने चित्तात करुणा असावी. तेव्हा अपराधी जनास शासन करण्याविषयी आपले अनुमोदन आहे काय? त्याचप्रमाणे एखाद्या शत्रूने आपल्या देशावर स्वारी केली असता आपल्या लोकांच्या घरादाराचे व बायकामुलांचे रक्षण व्हावे म्हणून त्या शत्रूशी युद्ध केले तर ते गैरशिस्त होईल असा आपला अभिप्राय आहे काय? आणखी असे की, माझे अनिष्ट चिंतिणारा, मी केवळ निरपराध असता, माझ्या वित्तादिकांचा अपहार किंवा नाश करण्यास प्रवृत्त झाला तर मी त्यास कोणत्याही प्रकारचा प्रतिकार करू नये, तर तो जे काही माझे अहित करील ते मी मुकाट्याने सोसावे, असे आपले म्हणणे आहे काय?

**बुद्ध –** ज्याचे वर्तन शिक्षेस पात्र असेल त्याला अवश्य शिक्षा झाली पाहिजे आणि जो कृपेस पात्र असेल त्यावर अवश्य कृपा केली पाहिजे. माझा जनास असा उपदेश आहे की, कोणाही प्राण्यास व्यर्थ पीडा करू नये; तर सर्वांवर प्रेम व दया करावी. एखाद्याने अपराध केल्यावरून त्यास शासन घडले तर ते काही त्याचा न्याय करणाऱ्या न्यायाधीशाच्या द्वेषवृत्तीस्तव घडले असे होत नाही; तर ते त्याच्या दुष्कृतीचेच केवळ फळ होय. राजनियमांप्रमाणे जनाकडून वर्तन होत आहे किंवा कसे हे पाहणारा गृहस्थ जे शासन अपराध्यास करितो ते त्याच्या अपराधामुळे त्याला प्राप्त होते. आता अशा रीतीने लोकनियम करणाऱ्या जनांनी एवढे मात्र लक्षात वागविले पाहिजे की, ज्याला शासन करणे प्राप्त होते, त्यांच्या संबंधाने त्याच्या चित्तात द्वेषबुद्धी कदापि नसावी. आता युद्ध प्रसंगाविषयी म्हणशील तर मनुष्याने आपल्या बांधवांचा प्राणघात करण्यास प्रवृत्त व्हावे हे मोठेच उद्वेगजनक होय. तथापि एखाद्या राजाने किंवा सेनानीने युद्धप्रसंग

टळावा म्हणून आपल्याकडून होण्यासारखे सर्व प्रयत्न करूनही जर प्रतिपक्षाने हटाग्रह धरून युद्धाची सिद्धता केली तर त्याशी रणसंग्राम करणे प्राप्त झाले असता त्याबद्दल मी त्याला दोष देणार नाही. तर जो अशा युद्धास कारण होतो त्याचे आचरण सदोष समजावयाचे. मनुष्याने अहंवृत्तीचा सर्वथा त्याग करावा असा माझा जनास बोध आहे, हे खरे. तथापि जे कोणी दुराचारी जन विनाकारण त्रास देण्यास प्रवृत्त होतील त्यांचा प्रतिकार त्याने अवश्य करावा. असा हा कलह या संसारामध्ये नित्य चालावयाचा. कारण हे जीवित्व केवळ कलहरूप आहे. तरीपण जो कलहास प्रवृत्त होईल त्याने एवढे मात्र ध्यानात ठेवावे की, आत्महितास उद्युक्त झाल्याने त्याच्या हातून दुराचार घडू नये व त्याने सत्यपराङ्मुख होऊ नये. आपणास मोठी थोरवी, सत्ता, संपदा किंवा कीर्तीही प्राप्त व्हावी अशी इच्छा धरून मनुष्याने कलहनिमग्न होऊ नये, तर पवित्रता व सत्य यांच्या प्रीत्यर्थ त्यांनी कलह करावा. अशा रीतीचा कलह करणारास मोठे फल प्राप्त होते. प्रसंगी अशा कलहात त्याचा पराजय झाला तरी तो मोठाच विजयी म्हणून समजावे. आता रणसंग्रामामध्ये एकदा सेनापती विजयी झाला असता त्याने ऐहिक वस्तुमात्राची नश्वरता ध्यानात वागवावी. त्यास प्राप्त झालेला विजय कदाचित फार मोठा असेल; पण समयविशेषी कालचक्र फिरून तो विजयी सेनापती धुळीस मिळण्याचा संभव आहे. तस्मात विजयी मनुष्याने प्रतिपक्ष पराभूत होऊन दीन झाला असता आपला आवेश तत्काळ आवरावा आणि त्याच्या संबंधाचा द्वेषभाव मनातून नाहीसा करून त्या हतवीर्य प्रतिपक्षास म्हणावे की, ऊठ, आपण उभयता साम करू आणि इत:पर परस्परांशी बंधुवत वर्तन करू. अशारीतीने ज्याच्या हृदयीचा द्वेषाग्नी सर्वस्वी विझून तो स्वशत्रूवर प्रेम करण्यास सिद्ध होतो, त्याचा तो विजय क्षणिक वैभवास कारण न होता चिरस्थायी होतो आणि त्यास अत्यंत अभीष्ट अशा शांतीचा अनुभव घडतो. आता तुला मी आणखी एक गोष्ट सांगतो ती लक्षात ठेव. सत्य आणि न्याय यांच्या पक्षाने युद्ध करून प्राप्त होणारा विजय वाखाणण्यासारखा आहे हे खरे; तथापि ज्याने आत्मजय केला तो या महाविजयी सेनापतीहूनही श्रेष्ठ होय. हे सिंहा, मी आत्मजय करावा असे म्हणतो, त्याचा अर्थ कोणी असा करू नये की, मनुष्यांनी आपल्या आत्म्याचा नाश करावा. जो आत्मजय करितो तो त्याचे रक्षण करितो. आत्मजय करणाऱ्या मनुष्याची प्राणयात्रा आत्म्याचा सर्वस्वी दास झालेल्या मनुष्याच्या प्राणयात्रेहून विशेष सुखाची होऊन त्याचे इष्ट मनोरथ परिपूर्ण होतात. ज्याचे चित्त अहंकारमूलक भ्रमापासून मुक्त असते तो ह्या जीवनकलहामध्ये कदापि पतन पावावयाचा नाही. ज्याचे मनोरथ पवित्रता आणि न्याय याचे परिपोषक असतात, त्यांच्या चित्तास

पराजयमूलक उद्वेग कदापि शिवणार नाही. जे जे सत्कार्य ते हाती घेतील त्यात त्याला सर्वदा यशप्राप्तीच होत राहील आणि त्यास प्राप्त झालेले यश चिरस्थायी होईल. तर हे सेनापती, हा माझा बोध ध्यानात धरून तू आपले युद्धसंग्राम मोठ्या शौर्याने व उत्साहाने चालीव; पण तू सत्याचाही योद्धा व्हावे असे माझे तुला सांगणे आहे.

याप्रमाणे स्वशंकेचे निरसन करून घेऊन सिंह बुद्धाचा अनुयायी झाला.

एके दिवशी बुद्ध नित्यक्रमाप्रमाणे बोध करीत हिंडत असता एका नगरीतला एक मोठा विद्वान ब्राह्मण त्याच्यापाशी येऊन त्याला म्हणाला, 'हे श्रमणा, तुझे धर्ममत मला कळले आहे. त्याचा सूक्ष्म विचार करिता ते विसंगत आहे असे मला वाटते. तेव्हा तुझ्याशी वाद करून तुझा हा जनास भ्रमात पाडण्याचा क्रम साधल्यास बंद करावा असे माझ्या मनात फार दिवस होते. आज तुझी गाठ पडली आहे. तर तुजशी वाद करण्यास मी आलो आहे. तू मोठा विवेकशील, ज्ञानी व सज्जन आहेस, असा तुझा लौकिक माझ्या कानी आला आहे. यास्तव तू आपल्या व्रतास स्मरून माझ्या शंकांचे निरसन करशील अशी मला पूर्ण आशा आहे. मी ऐकतो की, तू जनास नीतिनियमांचा उपदेश करीत असतो; पण धर्माचा उच्छेद करीत असतोस. तुझे शिष्य धर्मविधीचा तिटकारा करितात आणि यज्ञकर्माचा अव्हेर करितात. ह्यामुळे देवांचा अनादर केल्याचे पाप माथी येते. धर्म म्हटला म्हणजे तो यज्ञ व उपासना यांच्या साहाय्याने साध्य व्हावयाचा.'

**बुद्ध** – गवादि पशूंचा मेध करण्यापेक्षा आत्मेध श्रेष्ठ होय. आपल्या ठायीच्या दुर्वासनांची आहुती जो देवाप्रीत्यर्थ करितो त्याला यज्ञस्थडिलापाशी पशुवध करण्यात काहीच अर्थ नाही असे दिसून येईल. निरपराध पशूंच्या रुधिराच्या योगाने पापाचे क्षालन होत नाही. पवित्रता प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य ह्या रुधिरामध्ये असत नाही; परंतु विषयवासनाचे निर्मूलन केल्याने चित्ताची शुद्धी साध्य होते. देवांची उपासना करण्यापेक्षा सदाचरणाच्या नियमाप्रमाणे वर्तन ठेवण्यास विशष श्रेय आहे.

**ब्राह्मण** – यज्ञकर्मासंबंधाचे हे तुझे प्रतिपादन यथार्थ आहे. मी आजपर्यंत पुष्कळ यज्ञ करून शतावधी प्राण्यांचे जीव निष्कारण घेतले. त्याबद्दल मला अनुताप वाटतो. पशूंच्या रुधिराने कृतकर्माचे प्रायश्चित्त घडत नाही, हे मला संमत आहे; पण, हे गुरू, तू म्हणतोस की, आत्म्यास पुनर्जन्म आहे तो संसृतिचक्रात सापडून क्रमाक्रमाने उन्नती पावतो आणि मनुष्यमात्रास त्याच्या कर्मानुसार गती प्राप्त होत असते; पण तोच तू

आत्मा नाही असा जनास उपदेश करितोस. तुझे मत जे की, स्वत्वनाश झाल्याने अविनाशी सुख देणारे निर्वाण प्राप्त होते, त्याची प्रशंसा तुझे शिष्य करितात; परंतु जर मी केवळ निरनिराळ्या संस्कारांचा संयोगरूप आहे, तर मी मरण पावल्यावर माझे अस्तित्व विलय पावेल. जर मी वेदना, कल्पना व वासना यांच्या मिश्रणाची मूर्ती आहे तर माझे देहावसान झाल्यावर मी जाणार कुठे? मग शाश्वत सुखाचे धाम ते कोठे राहिले? हे केवळ शाब्दिक असून तू आणि तुझे शिष्य केवळ भ्रांत झाले आहेत. सारांश, तुझ्या या मताचा विचार केला असता त्यात सर्व गोष्टींचा विलय प्रतिपादिलेला आहे असे दिसते.

**बुद्ध –** हे ब्राह्मणा, तू धर्मशील आणि आस्थायुक्त आहेस. तुला आपल्या आत्म्याची चिंता पराकाष्ठेची आहे; परंतु तुझा सर्व उद्योग व्यर्थ आहे. कारण एका गोष्टीची तुझ्या ठायी वाण आहे. मनुष्य अज्ञान व भ्रम यास वशहोत्साते अशी कल्पना करितात की, त्यांचे आत्मे त्यांच्यापासून भिन्न असून ते स्वयंभू व स्वतंत्र राहणारे आहेत. हे ब्राह्मणा, तुझ्या चित्तात अद्यापि अहंवृत्ती आहे. स्वर्गप्राप्तीविषयी जो तू आतुर झाला आहेस त्या तुला त्या लोकी प्राप्त होणाऱ्या सुखाची लालसा आहे. यास्तव तुला सत्यापासून प्राप्त होणारा आनंद आणि सत्याचे अविनाशित्व समजत नाही. मी तुला खचित सांगतो की, मी जनास मृत्यूविषयी बोध करीत नसतो. तर माझा सारा बोध जीवनाविषयी आहे. मरण आणि जीवन यांचे स्वरूप तुला समजत नाही. हा देह जो आहे त्याचे अवसान व्हावयाचे. तू कितीही यज्ञयाग केलेस तरी त्याचे रक्षण व्हावयाचे नाही. तर तू आपल्या अंतर्यामाचे जीवन प्राप्त करून घे. जेथे अहंभाव वसत असतो तेथे सत्याचा प्रवेश व्हावयाचा नाही आणि ज्याला सत्यप्राप्ती झाली त्याचा अहंभाव विगलित व्हावयाचा यास्तव तुझे अंतर्याम सत्याकडे लागले पाहिजे आणि ते प्राप्त झाले असता त्याचे परिपालन व प्रसारही तू जीवभावे करावा, सत्याच्या प्राप्तीने तुला अविनाशी जीवन साध्य होईल. अहंभाव हा मरणमूलक आहे आणि सत्य जीवनरूप आहे. जोपर्यंत अहंभाव आहे तोपर्यंत मरणरूप उपाधी मानवास चिकटलेली असते; परंतु ज्यास सत्यसिद्धी होते त्यास अनंतकालिक जीवररूप निर्वाण प्राप्त होते.

**ब्राह्मण –** हे निर्वाण आहे तरी कुठे?

**बुद्ध –** जेथे नीतिनियमांचे अनुसरण होत असते तेथे हे निर्वाण असते.

**ब्राह्मण –** तर मग निर्वाण म्हणून काही स्थान नव्हे? व ते जर स्थान नव्हे तर ते वास्तवरूप नव्हे असेच ना?

**बुद्ध –** मी काय म्हणतो ते तुला समजत नाही. तर आता चित्त देऊन ऐक. वायू कोठे वास करीत असतो?

**ब्राह्मण –** त्याचे निवासस्थान कोठेही नाही.

**बुद्ध –** तर मग वायू म्हणून काही नाही असे म्हणावयाचे ना? (त्याच्याकडून उत्तर न मिळाल्यावर त्याला दुसरा प्रश्न करितो) बरे, हे ब्राह्मणा, ज्ञान कोठे वास करीत असते ते सांग पाहू? ज्ञान म्हणून काही स्थान आहे काय?

**ब्राह्मण –** ज्ञानाचे अमुकच असे काही निवासस्थान नाही.

**बुद्ध –** तर मग ज्ञान म्हणून काही वस्तू नाही असा तुझा अभिप्राय आहे काय? आणि निर्वाण हे काही स्थान नव्हे म्हणून ज्ञानप्राप्ती, पवित्रता व मोक्षसिद्धी हीही नाहीत असे तू समजतोस काय? हे समग्र मानव प्रपंचातील अनेकविध विपत्तीच्या तापाने त्रस्त होऊन कासावीस झाले आहेत. अशा प्रपंचात रखडणाऱ्या जनास मी प्रेमळ व शांतिप्रद बोध करीत फिरत असतो. त्याचे जे मन:पूर्वक श्रवण करून तद्नुसार वर्तण्याचा अविरतपणे प्रयत्न करितात, त्याचे सार तापत्रय नष्ट होते. त्यांचा चिंताज्वर उपशम पावतो त्यांच्या चित्ताची अस्वस्थता नाहीशी होते, त्यांचे हृदय सर्व पीडादायक दुर्वसनापासून व अनर्थावह कल्याणापासून निर्मुक्त होते.

**ब्राह्मण –** हे गुरुराया, तू जे हे आपले परम उदात्त मत प्रतिपादन करीत आहेस त्याचे आकलन माझ्या बुद्धीला होत नाही तर मी तुला पुन्हा पुन्हा प्रश्न करितो याची क्षमा असावी. माझा आता असा प्रश्न आहे, जर आत्माच मुळी अस्तित्वात नाही, तर अमरत्व कसे संभवते? आपले अंतर्याम पाहिले तर त्याचे व्यापार केवळ नाशवंत होत. कारण आम्ही मरणादिकांच्या योगाने विचार करितनासे झालो म्हणजे आमचे अंतर्याम निर्व्यापार होते, किंबहुना ते देहाबरोबर विगलित होते.

**बुद्ध –** आमचे विचार करण्याचे सामर्थ्य नष्ट झाले तरी आमचे विचार कायम राहतात.

**ब्राह्मण –** असे कसे? विचार करण्याची शक्ती आणि ज्ञान ही एकच नव्हेत काय?

**बुद्ध –** हे तुला मी उदाहरण देऊन स्पष्ट करून सांगतो. आपणास रात्रीच्या वेळी एखादे पत्र लिहावयाचे असल्यास आपण दिवा पेटवून ते लिहितो आणि पत्र लिहून झाल्यावर पुन्हा दिवा विझवितो. दिवा मालवला; पण त्याच्या साहाय्याने लिहिलेले पत्र राहिले. याचप्रमाणे विचारशक्ती विराम पावली तरी ज्ञान बाकी राहते. अशीच

गोष्ट मनाच्या व्यापाराची आहे. मानसिक व्यापार बंद पडले तरी अनुभव, ज्ञान आदिकरून जी त्या व्यापाराची फले ती कायम राहतात.

**ब्राह्मण –** परंतु जर संस्कार विनष्ट झाले तर व्यक्तिमात्राचे स्वत्व कसे राहील? माझे विचार वृद्धी पावतात आणि माझा आत्मा अवस्थांतर पावतो असे म्हटल्यास हे विचार व हा आत्मा माझा असे कशावरून म्हणता येईल बरे? ही गोष्ट उदाहरण देऊन विशद करा. माझे स्वत्व कायम कसे राहते ते मला कृपा करून सांगा.

**बुद्ध –** रात्र झाली असता दिवा पेटविला तर तो सर्व रात्रभर पेटेल की नाही?

**ब्राह्मण –** होय, त्यात भरपूर तेल असल्यास तो रात्रभर पेटत राहील.

**बुद्ध –** तर मला सांगा की, रात्रीच्या पहिल्या प्रहरास जी ज्योती पेटत राहील तीच दुसऱ्या प्रहरास पेटेल की दुसऱ्या प्रहरी ज्योती पेटते आहे असे समजावयाचे?

**ब्राह्मण –** (काय उत्तर द्यावे याचा काही वेळ विचार करून) दोन प्रहराच्या दोन निराळ्या ज्योती समजल्या पाहिजेत.

**बुद्ध –** तर तुझ्या म्हणण्याप्रमाणे असे झाले की, एकाच दीपकाच्या निरनिराळ्या दोन प्रहरी दोन ज्योती असतात.

**ब्राह्मण –** नाही; असे नाही. एका अर्थाने पाहिले असता दोन्ही प्रहरी दीपकाची एकच ज्योती पेटत आहे असे मानणे योग्य नव्हे; फरंतु एका अर्थाने पाहिले असता ती एकच ज्योती आहे असे म्हणावे लागते. कारण त्या दीपकात एकाच जातीचा पदार्थ जळत असून एकाच प्रकारचा त्याचा प्रकाश पडत असतो आणि त्या दीपकाच्या प्रकाशाने होणारे कार्यही एकच असते.

**बुद्ध –** बरे तर मला आता असे सांग की, एकाच दिव्यामध्ये एकाच जातीच्या तेलाने व एका खोलीमध्ये पेटणाऱ्या कालच्या व आजच्या ज्योती तू एकरूप म्हणतोस काय?

**ब्राह्मण –** पण ह्या ज्योती उजाडून दिवस आला म्हणजे विनष्ट होतात, नाही काय?

**बुद्ध –** अशी कल्पना कर की, पहिल्या प्रहरी पेटत असलेली ज्योती दुसऱ्या प्रहरी विझविली आणि तिसऱ्या प्रहरी पुनरपि प्रदीप्त केली, तर ही तिसऱ्या प्रहरीची ज्योती पहिल्या प्रहराच्या ज्योतीहून भिन्न आहे काय?

**ब्राह्मण –** एका अर्थाने पाहता ती भिन्न आहे; पण दुसऱ्या अर्थाने पाहता ती भिन्न नाही.

**बुद्ध –** बरे, ज्योती मालवून मध्ये जो अवकाश जातो त्याच्यामुळे निरनिराळ्या काळाच्या ज्योतीचे भिन्नत्व किंवा अभिन्नत्व किंवा असिद्ध होते काय?

**ब्राह्मण –** नाही, मुळीच नाही. ज्योती एकदा पेटवून ती पुन्हा केव्हाही पेटविली तरी तिचे अभिन्नत्व व भिन्नत्वही समानच असतात. मग पहिली आणि दुसरी ज्योती यामध्ये कित्येक वर्षांचा किंवा एका पळाचा अवकाश लोटला किंवा मुळीच अवकाश गेला नाही तरी ती त्यांच्या साम्यात व विसदृशत्वात अंतर पडत नाही.

**बुद्ध –** तर मग तुझ्याच म्हणण्याप्रमाणे असे सिद्ध झाले की, आजची दीपज्योती कालच्या दीपज्योतीशी काही अंशी समान आहे, तरीपण दुसऱ्या दृष्टीने पाहता ती प्रतिपळी भिन्न आहे. आणखी असे की, एकाच प्रकारच्या ज्योती, एकाच परिणामाचा प्रकाश देणाऱ्या असून त्या एकाच खोलीमध्ये ठेविल्या असता काही अंशी त्यांचे परस्परसाम्य असते. हे जर तुला संमत आहे तर आता असे मनात आण की, एखाद्या मनुष्यास होणाऱ्या संवेदना व त्याच्या मनात येणारे विचार व कल्पना आणि त्याच्या हातून घडणारी कृत्ये ही तुझ्यासारखीच असली तर तो मनुष्य तुजशी एकरूप आहे असे नाही का म्हणावयाचे?

**ब्राह्मण –** नाही.

**बुद्ध –** या विश्वातील इतर वस्तुमात्रास जे तर्कशास्त्राचे नियम लावावयाचे तेच तुलाही लागू असावे हे तुला संमत नाही काय?

**ब्राह्मण –** मला नाही संमत. सर्व विश्वाला विवेकाचे नियम सारखेच लागत असले तरी माझ्या आत्मतत्त्वाचे स्वरूप काही निराळे आहे. या कारणास्तव ते इतराहून भिन्न आहे. अन्य एखाद्या मनुष्याचे विचार, आचार व वृत्ती या माझ्याशी सुदृढ असल्या तरी तो मजशी एकरूप आहे असे मला वाटत नाही.

**बुद्ध –** खरे आहे; तो आणि तू एकरूप नाहीत; फरंतु मला सांग की, एखादा मनुष्य शिक्षण प्राप्त व्हावे म्हणून शाळेत गेला व तेथे त्यास शिक्षण प्राप्त झाले; तर शिक्षणप्राप्तीपूर्वी जो तो होता तो शिक्षणप्राप्तीनंतर भिन्नत्व पावला की त्याचे एकत्व कायम राहिले? त्याचप्रमाणे जो अपराध करितो त्यास त्याबद्दल हातपाय तोडण्याचे शासन झाल्यावर त्याच्या रूपात फेर पडतो की तो मूळचाच असतो बरे?

**ब्राह्मण –** अशा मनुष्याचे स्वत्व एकरूपच राहील.

**बुद्ध –** तर मग स्वत्वाचे एकरूपत्व ते विराम न पावण्यावरच केवळ अवलंबून आहे काय?

**ब्राह्मण –** नाही; स्वत्वाचे एकरूपत्व त्याच्या सातत्यावरच अवलंबून असत नाही, तर त्याच्या स्वभावाच्या एकरूपत्वावर ते मुख्यतः अवलंबून असते.

**बुद्ध –** तर मग ते तुला संमत आहे की, जशा दोन एकाच जातीच्या ज्योती एकरूप असतात, तसे पुरुष एकरूप संभवतात. त्याचप्रमाणे अगदी तुझ्यासारख्याच स्वभावाचा दुसरा मनुष्य तुझ्यासारख्याच कर्मानुरूप स्थिती पावला असला तर तो तुजशी एकरूप आहे हे तुला मान्य आहे.

**ब्राह्मण –** होय, हे मला मान्य आहे.

**बुद्ध –** ह्याप्रमाणे तुझ्या स्वत्वाच्या एकरूपतेची गोष्ट आहे. आज जो तू आहेस तो तू पुढे कायम राहावयाचा. तुझे वास्तविक स्वरूप पाहता ज्या जड पदार्थाचा तुझा हा देह झाला आहे त्याचा तू बनलेला नव्हेस, तर तुझ्या ठायीच्या वेदना, भावना आणि विचार यांचा तू बनला आहेस. यापासून उद्‌भवणाऱ्या संस्काराचा जो संघ तो तुझा आत्मा होय. जेथे आणि जोपर्यंत हे संस्कारादी आहेत तेथे आणि तोपर्यंत तू आहेस. ह्याप्रमाणे प्रत्येक प्राण्याचे स्वत्व व जीवित त्याच्या संस्काराच्या एकीकरणावर व कर्मावर अवलंबून आहे. जोपर्यंत संस्कार व कर्म ही कायम आहेत तोपर्यंत त्याचे अस्तित्वास तू मरण म्हणणार की सतत राहणारे जीवित म्हणणार?

**ब्राह्मण –** अशा रीतीने राहावयाचे हे अस्तित्व ते सततचे जीवित होय; परंतु असल्या जीवित सत्याची मी मुळीच पर्वा करीत नाही. मला संशय मिळून एवढाच आहे की, हा माझा आत्मा स्वतंत्र व भिन्न राहतो की नाही?

**बुद्ध –** हा तुझा केवळ आत्मविषयक अभिमान होय. ह्या आत्म्याची तुला फारच लालसा दिसते; फरंतु हा तुझा भ्रम आहे. ह्या भ्रममूलक भावनेस्तव तू विनाकारण चिंतातुर होत आहेस; सर्व प्रकारचे अनन्वित कर्म, दुःख व शोकही तुला सोसावे लागत आहेत. ज्याच्या ठायी आत्म्याचा अभिमान वसत असतो, तो अखंड संसृतिपाशात सापडून पुन्हा पुन्हा जन्ममरणमूलक विपत्तीचा अनुभव येतो; कारण जन्म व मरण ही आत्मभावनेस लागून आहेत.

**ब्राह्मण –** हे कसे?

**बुद्ध –** तुझा आत्मा किंवा स्वत्व म्हणतोस ते आहे कोठे? ज्या ह्या आत्म्याचा तुला एवढा अभिमान वाटत आहे, तो सतत बदलत आहे. बाल्य, तारुण्य, प्रौढ, वय आणि वार्धक्य ह्या अवस्थांमध्ये तुझ्या स्वत्वात सर्वदा पालट होत आहे, त्याचे एकरूपत्व काही अंशी अमृते खरे तथापि दीपकाच्या पहिल्या प्रहराच्या ज्योती व दुसऱ्या प्रहराच्या ज्योतीत जेवढे साम्य असते तेवढेदेखील साम्य ह्या तुझ्या निरनिराळ्या अवस्थातील आत्म्यात असत नाही. कारण संस्कार जे आहेत ते हळूहळू उद्‌भवत

असतात. पूर्वजन्मी जी कर्मे आपण करितो त्यापासून उत्पन्न झालेल्या संस्काराचा जो समुच्चय तोच केवळ आत्मा किंवा स्वत्व होय. हे संस्कार कायम आहेत तेथपर्यंत तू जीवमान राहून पूर्वजन्मी जे कर्मरूप बीज तू पेरले असशील त्याचे फल तुला उत्तरजन्मी भोगावे लागेल. ते कदापि टाळता यावयाचे नाही. दुष्कर्माचे फल वाईट होऊन विपत्ती प्राप्त व्हावयाची आणि सत्कर्माचे फल चांगले होऊन सुख प्राप्त व्हावयाचे. कृत कर्माची निष्कृती यज्ञयागाच्या योगाने किंवा देवाची स्तोत्रे गाऊन व्हावयाची नाही. सर्व वेद मुखोद्गत केल्याने किंवा त्यात सांगितलेले कर्मकांड आचरिल्याने काही एक निष्पन्न व्हावयाचे नाही. खरे ज्ञान अशाने प्राप्त होत नाही. ते सदाचाराने प्राप्त होते. सत्यमार्गाचा अवलंब करून तद्नुसार अहर्निश वर्तावे. सर्व मानव येथून तेथून एकरूप आहेत असा बुद्धीचा दृढ निश्चय होऊन आपपरभाव समूळ नष्ट झाला पाहिजे.

ह्याप्रमाणे त्या ब्राह्मणाशी वाद करून बुद्धाने त्याला शिष्य केले.

## विश्वतत्त्वविषयक प्रश्न

एके प्रसंगी बुद्धाचा शिष्य काश्यप याने सर्व विश्वाचे तत्त्व समान आहे की काय? असे विचारिल्यावरून बुद्धाने त्यास येणेप्रमाणे बोध केला –

या विश्वातील अखिल वस्तूंचे तत्त्व एकच आहे. वस्तूचे विसदृशत्व जे दिसते ते त्यावर घडविणाऱ्या संस्कारामुळे आहे. असमान संस्कारामुळे त्यास भिन्न रूपे प्राप्त होतात. ह्याप्रमाणे जी रूपे त्यास प्राप्त होतात तद्नुसार त्याच्याकडून कर्मे घडत असतात आणि या कर्मानुसार त्याची गती होत असते. ज्याप्रमाणे कुंभकार एकाच मृत्तिकेची निरनिराळ्या प्रकारची पात्रे करितो तसा हा प्रकार आहे. त्याने केलेल्या काही पात्रात शर्करा ठेवावयाची असते; काही पात्रात धान्य साठवावयाचे असते; काही पात्रात दुग्धादी पदार्थ संग्रहित करावयाचे असतात; काही पात्रात पाकनिष्पत्यादी करावयाची असतात. असा ह्या पात्राचा निरनिराळा उपयोग होत असतो, तरी ज्या मूळद्रव्याची ती घडलेली असतात त्यात भिन्नत्व मुळीच असत नाही किंवा कुंभकाराच्या ज्या हस्तादी साधनांनी ती घडलेली असतात त्यात भिन्नत्व असत नाही. याप्रमाणे सर्व वस्तू एकाच तत्त्वापासून निर्माण झाल्या असल्या कारणाने त्याचा विकास व परिपाक एकाच नियमाच्या अनुरोधाने होत असतो आणि त्याचा परिणामही एकच व्हावयाचा. हा परिणाम अर्थात निर्वाणरूप होय. हे काश्यपा, तू प्राप्त ज्ञानानुसार वर्तन करशील व सर्व वस्तू एकाच तत्त्वापासून निर्माण झाल्या असून एकाच नियमाने बद्ध आहेत असे मानशील तर तुला निर्वाण प्राप्त होईल. हा विश्वाचा नियम सर्वांस सारखाच लागू

आहे. उच्च-नीच, अभिज्ञ-अज्ञ, सदाचारी-दुराचारी असा भेदाभेद तो काहीच जाणत नाही. उदाहरणार्थ असे पाहा की, भूतलावर उदकवृष्टी जी होते ती सर्वांवर होते आणि तिच्या योगाने निरनिराळे जीवजंतू व वनस्पती उत्पन्न होऊन पोषण पावतात आणि आपापल्यापरी फलपुष्पादिकांनी युक्त होतात; ह्याप्रमाणे त्याचा उद्भव व विकास होऊन ती प्रकृतीभेदास्तव भिन्न भिन्न प्रकारची परिणती पावतात. असा क्रम अविरतपणे चालून परिणामी ती निर्वाण पदवीप्रत जातात.

## राहुलास उपदेश

बुद्धाचा पुत्र राहुल हा बुद्धसंघात येऊन मिळाल्याविषयी मागे सांगितलेच आहे. हा राहुल सर्वदा सदुपदेश ग्रहण करीत असताही अंमळ दुर्वत्त असून दुर्भाषणी आहे असे पाहून बुद्धाने त्याला आपल्या जवळून जाऊन दूर कोठेतरी एखाद्या विहारात राहावयास सांगितले. याप्रमाणे तो एका विहारात जाऊन राहिला असता एके समयी बुद्ध तेथे गेला आणि त्याला त्याने येणेप्रमाणे उपदेश केला ˉ

त्याने राहुलास एका पात्रातून पाणी आणून आपले पाय धुवावयास सांगितले, त्याप्रमाणे त्याने केल्यावर तो राहुलास म्हणाला : 'या पात्रात उरलेले पाणी पिण्यायोगे आहे काय?' तो म्हणाला, 'नाही हे पाणी अशुद्ध झाले.' बुद्ध म्हणाला, 'तर मग तू यावरून आपल्या स्वत:च्या स्थितीचा विचार कर. तू माझा पुत्र असून संसारनिवृत्त होऊन श्रमण झाला आहेस; तरी तू आपल्या जिव्हेस असत्याचा व दु:शब्दाचा विटाळ होऊ न देण्यास असमर्थ आहेस. यामुळे तुझे चित्त अपवित्र झाले आहे. आता ह्या पात्रात पाणी टाकून दिल्यावर तरी हे पात्र उदकप्राशनामक योग्य आहे काय?' राहुल म्हणाला : 'हे पात्रही दूषित झाले आहे.' बुद्ध म्हणाला-

'तर मग तू यावरून आपल्या स्थितीचा विचार कर. तू हा पीत वस्त्राचा झगा धारण केला आहेस तरी तुझे चित्त ह्या पात्राप्रमाणे अपवित्र आहे, तोपर्यंत तू कोणत्याही उच्चप्रतीच्या कर्तव्यास योग्य नाहीस.' मग बुद्धाने ते रिकामे पात्र उचलून गरगर फिरवून म्हटले : 'हे असे फिरवीत असता खाली पडून फुटेल याचे तुला भय वाटत नाही काय?' राहुल म्हणाला : 'नाही. हे भांडे अगदी अल्प मोलाचे आहे; यास्तव ते फुटले तर त्यापासून फारसे नुकसान व्हावयाचे नाही.' बुद्ध म्हणाला: 'तर मग तू यावरून असे मनात आण की, तुझा हा देह नश्वर पदार्थाचा बनला असल्या कारणाने तो संसृती चक्रात सापडून भंग पावला तरी त्यापासून तुझे काही एक नुकसान व्हावयाचे नाही; पण तू जर असत्य वाणी मुखावाटे काढशील तर तुला ज्ञात पुरुष तुच्छवत

लेखतील. हे राहुला, मनुष्य आपली वाणी शुद्ध राखितील तर त्यास बरीच विपत्ती टाळता येईल. ज्याच्या ठायी नि:सीम सत्यप्रीती वसत असते तो दुराचारापासून निवृत्त होतो. ज्याच्या ठायी पवित्राचरणाविषयी अत्यंत पूज्यत्वबुद्धी वसत असते, तो ह्या संसारात कसाही प्रसंग आला तरी तो धैर्याने सहन करील.'

याप्रमाणे बुद्धाने केलेला उपदेश श्रवण करून राहुलास स्वकर्माबद्दल परम अनुताप वाटून त्याने आपले आचरण शुद्ध ठेवण्याविषयी यत्न करण्याचा निर्धार केला. तद्नंतर त्याचे वर्तन निर्दोष होऊन तो सर्वांस प्रिय झाला.

## बुद्धाची सहनशीलता

एके प्रसंगी एक मनुष्य बुद्धाचा धर्मोपदेश कर्णोपकर्णी ऐकून व त्याची क्षमाशीलता अलौकिक आहे अशी त्याची कीर्ती श्रवण करून त्याची परीक्षा पाहण्याकरिता त्याच्याकडे गेला आणि त्याला शिव्या देऊ लागला. बुद्धाने त्या मुकाट्याने ऐकून घेतल्या आणि मनात त्याच्या मूर्खत्वाबद्दल कीव करू लागला. त्याच्या शिव्या देऊन झाल्यावर बुद्धाने त्याला सौम्यपणे म्हटले: 'एखाद्या मनुष्याने मला मूर्खपणास्तव विनाकारण त्रास दिला असता त्याचा प्रतिकार न करिता त्याच्यावर मी प्रेमच करितो. जितके तो माझे नुकसान अधिक करील तितके मी त्याच्यावर अधिकच प्रेम करीन. अशाने माझ्या चांगुलपणाचा सुगंध मला प्राप्त होईल आणि त्याच्या दुष्टपणाचा दुर्गंध त्याला मिळेल. मला तू आता सांग की, एखाद्याने दुसऱ्यास काही पारितोषिक देऊ केले असता त्या दुसऱ्याने त्याचा स्वीकार केला नाही तर ते पारितोषिक कोणाकडे राहावे बरे?'

**मनुष्य –** त्या दुसऱ्याने ते घेतले नाही तर देणाराकडेच ते राहिले पाहिजे, हे उघड आहे.

**बुद्ध –** तर हे बाळा, मला तू ज्या शिव्या दिल्यास त्या मी ग्रहण केल्या नाहीत. त्या तुझ्या तुजपाशी राहू दे. ह्यात तुझेच कल्याण नाही काय? जसा ध्वनीपासून प्रतिध्वनी उमटतो, जशी पदार्थापासून छाया पडते, तद्वत कुकर्म करणारास त्याच्या कर्माबद्दल विपत्ती निश्चितपणे सहन करावी लागते. जो दुरात्मा सज्जनाची निर्भर्त्सना विनाकारण करितो त्याची अवस्था आकाशावर थुंकणाऱ्या मूढ मनुष्यासारखी होते. त्याची ती थुंकी आकाशावर जाऊन न पडता त्याच्याच अंगावर उलटून पडते.

हे बुद्धाचे भाषण ऐकून तो मनुष्य लज्जित झाला आणि त्यावेळी तेथून निमूटपणे चालता झाला; पण काही दिवसांनी परत येऊन त्याने बुद्धाचा बोध मन:पूर्वक श्रवण केला आणि तो त्याचा शिष्य बनला.

## एका सुखाभिलाषी श्रीमंत मनुष्यास उपदेश

एके समयी बुद्ध श्रावस्ती नगरीजवळील गावात धर्मोपदेश करीत असता एका श्रीमंत पुरुषाने त्याच्या सन्निध येऊन त्यास प्रणाम केला. त्याची अवस्था पाहून बुद्धास वाईट वाटले. त्याचा देह आहार-विहारांचा यथेष्ट उपभोग घेऊन केवळ रोगांचे माहेरघर होऊन पराकाष्ठेचा स्थूल झाला होता. तो अगदी मंद व उदास दिसत होता. ही आपली विपत्ती त्याने बुद्धास निवेदन करून म्हटले की, 'गुरुराज, यातून मुक्त होण्याचा मला काहीतरी उपाय सांगा.' बुद्ध म्हणाला : 'तुझी ऐकण्याची इच्छा असल्यास तुझ्या विपत्तीचे कारण काय आहे हे तुला सांगतो, श्रवण कर. ज्या ह्या तुझ्या विपत्तीविषयी तू एवढा कष्टी होत आहेस ती पाच कारणांनी उद्‌भवली आहे. ती पाच कारणे ही होत. सर्वदा मिष्टान्न भक्षण, अति निद्रा, विषयसुखाची लालसा, विचारशून्यता आणि आलस्य. तर आता असे कर की, आपले जिव्हालौल्य अंमळ आवरून धरून, आहारविहार मित कर आणि सर्वदा एखाद्या उपयुक्त कामात गुंतून राहा की, जेणेकरून तुझ्या हातून जनांवर काहीतरी उपकार व्हावा. याप्रमाणे तू वागशील तर तुझे आयुष्य दीर्घ होऊन तुझ्याकडून काहीतरी सत्कार्य होईल.'

बुद्धाने सांगितल्याप्रमाणे तो गृहस्थ वागू लागल्यापासून त्याची रुग्ण स्थिती जाऊन त्याच्या देहाची स्थूलता नाहीशी झाली आणि त्याला हुशारी व उत्साहही वाटू लागला. मग एके दिवशी तो बुद्धापाशी पुनरपि येऊन म्हणाला: 'गुरुराज, तुमच्या उपदेशाप्रमाणे मी वागू लागल्यापासून माझ्या शरीरास आराम येऊन माझे चित्त उत्साहयुक्त झाले. याप्रमाणे तुमच्या उपदेशाच्या योगाने माझ्या शारीरिक व्याधी नाहीशा झाल्या. आता माझे चित्त ज्ञानप्रकाशयुक्त होऊन मला शांती प्राप्त होईल असा बोध कृपा करून करा. ह्याप्रमाणे त्याला उपरती झालेली पाहून बुद्धाने त्यास ऐहिक सुखविषयाची नश्वरता व अनर्थवहता आणि सदाचार संपन्नतेपासून उद्‌भवणारे चित्ताचे खरे स्वास्थ्य व शांती याचे निरूपण करून त्यास आपला शिष्य केले.

## बुद्धाचे एका शेतकरी ब्राह्मणास उत्तर

एके प्रसंगी भारद्वाज जनक एक श्रीमान ब्राह्मण आपल्या शेतवाडीवर पीक चांगले आल्याबद्दल उत्सव करीत असता तेथे बुद्ध हातात कमंडलू घेऊन भिक्षा मागावयास आला. तेव्हा तेथे जमलेल्या काही लोकांनी त्याला ओळखून पुष्कळ मान दिला; परंतु भारद्वाज त्याच्यावर दातओठ खाऊन त्याला म्हणाला: 'हे श्रमणा, तू असा भिक्षा मागत फिरण्यापेक्षा काही तरी काम करून आपला उदरनिर्वाह करशील तर ते तुला

शोभण्यासारखे आहे. मी आपले शेत नांगरून पेरून मग हे असे कापितो आणि नंतर यथेच्छ बसून खातो. तू मजसारखे करशील तर तुलाही निर्वेधपणे खावयास मिळेल.'

**बुद्ध –** हे ब्राह्मणा, मीही नांगरीत व पेरीत असतो आणि ह्याप्रमाणे मी नेहमी नांगरीत-पेरीत आहे म्हणून मला खावयास मिळत आहे.

**ब्राह्मण –** काय? तू स्वत:ला शेतकरी म्हणतोस काय? तर मग तुझे बैल कोठे आहेत? तुझे बी आणि नांगरही कोठे आहेत?

**बुद्ध –** हे ब्राह्मणा, श्रवण कर. मी सत्यधर्म विश्वासरूप बी पेरीत असतो. हे बी सत्कर्मरूप दृष्टीने फलद्रूप होते. ज्ञान आणि विनय हे माझे नांगर होत. हे नांगर नीट मार्गाने चालविता येण्यास लागणारी दोरी कोणती म्हणशील तर ती चित्तरूप होय. नीतिनियम हा त्या नांगराचा दांडा होय. आस्था ही त्या नांगरण्याची मर्यादा होय. सर्वदा उद्यमशील असणे हा त्या नांगरास जुंपलेला बैल होय. हे नांगरण्याचे काम मी भ्रमरूप माजलेले रान नाहीसे करण्याकरिता सतत चालविले आहे. या नांगरण्या-पेरण्यापासून हंगाम कोणता मिळणार आहे म्हणशील तर सर्व दु:खाचा अंत होऊन शाश्वत जीवनरूप निर्वाण प्राप्त होणार आहे.

हे त्याचे भाषण ऐकून त्या ब्राह्मणाने त्याचा यथोचित मान करून त्याला भिक्षा घातली व पुढे तो त्याचा शिष्य झाला.

## पतित कोण

एके दिवशी बुद्ध भिक्षापात्र घेऊन एका ब्राह्मणाच्या द्वारी भिक्षा मागावयास गेला असता तेथे हवनविधी चालला होता. दारात भिक्षेकरी आला आहे असे पाहून तो ब्राह्मण त्याला म्हणाला, 'रे बोडक्या, नीच श्रमणा दूर उभा रहा, तू धर्मभ्रष्ट पतित आहेस.'

बुद्ध म्हणाला, 'पतित कोण बरे? जो क्रोधवश होतो, जो परांचा द्वेष करितो, जो दुष्कर्म करण्यास प्रवृत्त होतो, जो जगात दांभिकपणाने वर्ततो, जो भ्रामक मताचा स्वीकार करतो आणि जो जनाचे वचन करितो, तो पतित होय. जो दुसऱ्यास विनाकरण चिडवितो, जो लोभवश होतो, जो पापवासनेस वश होतो, जो लज्जाहीन असतो आणि जो पापकर्मे करण्यास यत्किंचितही भीत नाही तो पतित समजावा. कोणी अमुक एका कुळात जन्म पावला म्हणून पतित किंवा पवित्र होत नाही. मनुष्यास उच्च-नीचपणा प्राप्त होतो तो केवळ त्याच्या हातून घडणाऱ्या कर्मानुसार होय.'

## विहिरीवरील मातंग कन्या

एके समयी बुद्धाचा आवडता शिष्य आनंद एका गावाजवळून चालला असता त्यास तहान लागून तो जवळील एका विहिरीपाशी गेला. तेथे एका मातंगाची कन्या विहिरीचे पाणी काढीत होती. तिजपाशी तो प्यावयास पाणी मागू लागला. तेव्हा ती म्हणाली : अहो महाराज, मी अगदी हीन जातीची स्त्री आहे. मजकडचे पाणी तुम्ही प्याल तर तुमची पवित्रता नाहीशी होईल. आनंद म्हणाला: 'बाई, तुझी जात कोणतीही असो, तिची मला गरज नाही. मला पाणी हवे आहे.' तेव्हा त्या मातंगाच्या मुलीला हर्ष होऊन तिने त्याला पाणी प्यावयास दिले. ते पिऊन तो तिचे आभार मानून पुढे चालता झाला. पुढे त्या मुलीला कळले की, हा मनुष्य बुद्धाचा शिष्य आहे. मग ती बुद्धाकडे जाऊन म्हणाली, 'हे प्रभू, माझे साहाय्य करा. तुमचा आनंद जेथे राहतो तेथे मला राहू द्या. माझे प्रेम त्याच्यावर जडले आहे. त्याच्याजवळ राहून त्याची नित्य सेवा करावी असे माझ्या मनाने घेतले आहे.'

बुद्धाने तिचा हेतू ओळखून व तिची हृदयावृत्ती लक्षात आणून म्हटले : 'मुली, तुझे हृदय प्रेमरसाने उचंबळत आहे हे खरे; परंतु तुझ्या हृदयवृत्तीचे वास्तविक स्वरूप तू जाणत नाहीस. तुझ्या चित्तात जी प्रेमवृत्ती उद्‌भवली आहे ती आनंदाविषयी नव्हे, तर आनंदाने तुजसंबंधाने जी दयाशीलता प्रकट केली तिजवर तुझे प्रेम जडले आहे. तर हे मुली, तुजसंबंधाने जी दयाशीलता त्याने दर्शविली तिचे ग्रहण कर आणि तद्‌नुसार तू अन्य जनांशी वर्तत जा. तुझी स्थिती कितीही हीन असली तरी तुला अन्य जनासंबंधाने दयाशीलता प्रकट करण्याच्या बहुत संधी प्राप्त होतील. त्या व्यर्थ जाऊ देऊ नको. राजाने आपल्या दासावर दया केली असता त्यात त्याचे औदार्य प्रकट होते हे खरे आहे. तरी हा दास स्वत:स दुसऱ्याकडून सोसावी लागणारी दु:खे मनात न आणिता सर्व मानवजातीविषयी दया व प्रेमही चित्तात वागवील, तर त्याचे ते करणे विशेष स्तुत्य होय. अशा वृत्तीचा दास आपणावर जुलूम करणाऱ्याचा द्वेष करणार नाही आणि जुलमी लोक त्याचे वित्त व स्वातंत्र्य हरण करीत असता त्यास प्रतिकार करण्याचे सामर्थ्य त्यास नसले तरी तो त्या जुलमी लोकांचा गर्विष्ठपणा व उद्दामपणा पाहून त्यांची कीव करितो. हे मुली, तू धन्य आहेस. मोठ्या कुलीन म्हणविणाऱ्या स्त्री-पुरुषास तुझे हे वर्तन अनुकरणीय आहे. तू हीन म्हणविल्या जाणाऱ्या जातीची आहेस तरी तुझ्या ठायीची ही वृत्ती उच्चवर्णाच्या ब्राह्मणासही शिकण्यासारखी आहे. तू न्याय व सदाचाराच्या मार्गापासून च्युत होऊ नको आणि तू सद्‌वर्तन करशील तर तुझे तेज राजे व राण्या ह्यांच्याहूनही उज्ज्वल होईल.

## दोन राजास युद्धापासून निवृत्त करितो

एके समयी दोन राजामध्ये एका नदीच्या बांधासंबंधाने वाद उत्पन्न होऊन त्याचे युद्ध जुंपले. हे वर्तमान बुद्धाला कळले तेव्हा तो त्यांच्याकडे जाऊन त्यास म्हणाला, 'तुमच्या कलहाचे कारण मला सांगा.' मग उभय पक्षाचे काय म्हणणे आहे ते ऐकून घेऊन तो त्यास म्हणाला: 'मला वाटते ज्या बांधाविषयी तुमचा तंटा उत्पन्न झाला आहे तो तुमच्या काही लोकांच्या उपयोगाचा आहे. ह्यावाचून दुसरा काही विशेष महत्त्वाचा असा उपयोग आहे काय?' त्यांनी उत्तर केले : 'त्याचा आणखी विशेष महत्त्वाचा काही एक नाही.' बुद्ध म्हणाला, 'तर मग अशा अल्प उपयोगाच्या वस्तूसाठी तुम्ही युद्धास प्रवृत्त झाला असता तुमचे पुष्कळ सैनिक पतन पावतील आणि हे राजांनो, तुम्ही कदाचित स्वप्राणास मुकाल नाही बरे?'

**राजे –** होय, या युद्धात आमचे पुष्कळ शूर सैनिक पडतील आणि आमच्याही जीवास धोका आहे.

**बुद्ध –** तर मग मनुष्याच्या रक्ताची किंमत मातीच्या त्या बांधाहून कमी आहे असे तुम्हाला वाटते काय?

**राजे –** नाही, मनुष्याचे जीव आणि त्यातूनही राजाचे जीव केवळ अमूल्य होत.

**बुद्ध –** असे आहे तर मग जे अमोलिक आहे त्याचा जे क्षुल्लक आहे तत्प्रीत्यर्थ नाश करण्यास तुम्ही प्रवृत्त व्हावे हे विवेकशुद्ध आहे काय?

हे बुद्धाचे म्हणणे ऐकून ते उभय राजे निरुत्तर झाले आणि त्यांनी परस्परांविषयीचा क्रोध आवरून समेट केला.

येथवर बुद्धाच्या काही उपदेशप्रसंगाचे निरूपण केले. त्यावरून त्याच्या बोधपद्धतीचे स्वरूप वाचकाच्या ध्यानात येईलच. आता प्रसंगाविशेषी तो ज्या दृष्टांतरूप कथा सांगून आपला बोध श्रोत्यांच्या मनावर ठसवीत असे त्यातल्या एक-दोन येथे लिहितो. त्यावरून महामनस्क पुरुष स्वसंमत मताचा बोध जनास किती सुगम रीतीने करू जाणतात ते चांगले लक्षात येईल.

दृष्टांतरूप कथा सांगून उपदेश करण्याच्या या पद्धतीविषयी खुद्द बुद्धाचे उद्‌गार येणेप्रमाणे आहेत: 'मी हा सत्यधर्माचा बोध जनास करीत आहे, तो अगदी सुगम आहे, तथापि तो सामान्य जनास चांगलासा समजत नाही. यास्तव त्यांच्या व्यावहारिक भाषेतच मला बोलले पाहिजे. त्याच्या कल्पना व विचार यास साजेल अशाच रीतीचा बोध करावा हे उचित होय. सामान्य जनांची वृत्ती केवळ बालकांप्रमाणे असल्यामुळे

त्यास गोष्टी ऐकण्याचा नाद असतो. यास्तव गोष्ट सांगून माझ्या धर्माचे तत्त्व समजून सांगावे हे योग्य दिसते. तात्त्विक विवेक करून ज्या गोष्टी मला कळल्या आहेत त्या लोकाला दृष्टांतरूप कथांद्वारे समजून सांगाव्या हे बरे.

## जळते घर

एका धनाढ्य गृहस्थाचा वाडा फार जुना झाला असून त्याचे छप्पर, वासे वगैरे सामान अगदी कोरम झाले होते. यामुळे तो केव्हा कोसळेल याचा नेम नव्हता. एके दिवशी त्याला काही जळाल्याची घाण आली. त्यासरशी तो घराबाहेर धावत आला आणि शोधून पाहतो तो छपरास एके बाजूने आग लागली आहे. तेव्हा तो अगदी घाबरून गेला. त्याची लहान मुले आत खेळत होती. ती बाहेर कशी येतात याची त्याला चिंता लागली. त्यांना बाहेरून हाक मारून घराला आग लागली आहे म्हणून सांगावे तर ते त्यांना समजणार नाही. बरे त्यांना आणावयास आत धावत जावे, तर त्याला पाहून पळत सुटतील आणि एकास धरून बाहेर आणीपर्यंत घर कोसळून पडून बाकीच्यांचा संहार होईल अशा फिकिरीत तो पडला आहे. इतक्यात त्याला एक कल्पना सुचली. त्याच्या मुलांना खेळण्याचा फार नाद असे. तेव्हा त्यांना हाक मारून म्हणाला, 'मुलांनो धावत बाहेर या. ही पहा तुमच्यासाठी कशी सुंदर खेळणी आणिली आहे.' हे बापाचे शब्द ऐकून मुले दुडुदुडु बाहेर धावत आली. ती बाहेर येतात न येतात तोच घर कोसळून आगीचा एकच कल्लोळ उसळला. ते पाहून बापाने आपणास का बाहेर बोलावले ते त्यांच्या लक्षात येऊन आपले जीव वाचविल्याबद्दल त्याची ती स्तुती करू लागले.

या जगातील मनुष्ये ही केवळ बालके होत. इहलोकचे सुखविषय ही त्यांची प्रिय खेळणी होत. यास्तव सदाचरणापासून प्राप्त होणाऱ्या सुखानंदाचे वर्णन त्याला मोहक वाटेलसे केले पाहिजे. म्हणजे त्याच्या हृदयात नीतिप्रेम उत्पन्न होऊन ते दुर्गतीपासून मुक्त होतील आणि त्यास सत्यधर्माचे अमूल्य ज्ञान प्राप्त होऊन ते शाश्वत जीवनास पात्र होतील.

## सांडलेला मुलगा

एका गृहस्थाचा मुलगा आपल्या सोबत्यांच्या नादी लागून एका दूरच्या गावी गेला. तेथे तो फार विपत्तीत पडला. त्याला अन्नवस्त्र मिळण्याची पंचाईत पडू लागली. तेव्हा तो भटकत भटकत पुन्हा आपल्या बापाच्या गावी आला; पण त्याला आपल्या बापाच्या घरी जाण्याचे धैर्य होईना. तो परागंदा झाला असता त्याच्या बापाच्या

धंद्याचा उत्कर्ष होऊन तो मोठा धनाढ्य झाला होता. एके दिवशी तो वाटेने चालला असता आपल्या बापाच्या नजरेस पडला. त्याला पाहताच बापाने त्याला ओळखले आणि त्याची ही हीन स्थिती पाहून त्याला अत्यंत गहिवर आला. तरी त्याला आपली प्रत्यक्ष ओळख एकदम न दाखविण्याचा बेत करून त्याने आपल्या एका सेवकास सांगितले की, त्या तरुण मुलास आपल्या घरी घेऊन ये. तो सेवक त्या मुलाच्या मागे गेला आणि त्याच्या हातास धरून त्याने त्याला वरांड्यात आणिले. तो भव्य वाडा पाहून मुलगा घाबरून गेला. त्याला वाटले की, आपला कोणीतरी अधिकारी मनुष्यास संशय आल्यामुळे तो आपणास शासन करावयास नेत आहे. म्हणून त्याने त्या सेवकाचा हात सोडून तेथून पलायन केले; पण त्याच्या बापाने त्याच्या मागे पुन्हा सेवक दवडून त्याला धरून आणिले आणि त्याला आपल्या शेतावर कामास लाविले व आपल्या सेवकास असे सांगितले की, त्याच्याशी मोठ्या ममतेने वागा. ह्याप्रमाणे तो मुलगा आपल्या बापाच्या शेतात काम करू लागला. फुढे जसजशी त्याची हुशारी व प्रामाणिकपणाही बापाच्या नजरेस आला तसतसा त्याला त्याने चांगले चांगले काम सांगण्याचा क्रम ठेविला. अशी काही वर्षे लोटल्यावर त्याने एके दिवशी आपल्या मुलास आपल्याकडे बोलावून आणले आणि सगळ्या सेवकांस जमा करून त्यांच्या देखत त्याचे आपले खरे नाते प्रकट केले. तेव्हा त्या मुलास अतिशयित आनंद झाला.

या गोष्टीवरून असे तात्पर्य घ्यावयाचे की, मने सत्य ज्ञानाच्या ग्रहणास पात्र व्हावयासाठी ती क्रमाक्रमाने सुशिक्षित करण्यास झटले पाहिजे.

## बगळा व खेकडा

एक शिंपी बुद्धाच्या अनुयायास लागणारे झगे तयार करीत असे. या धंद्यात तो लोकांना नेहमी ठकवी; फरंतु एके समयी एक व्यापारी त्याला असा लबाड भेटला की, त्याने त्याला अगदी फसविले. त्यामुळे त्याचे अतिशय नुकसान झाले. हे वर्तमान बुद्धाला कळले तेव्हा त्याने त्याच्या या वर्तनाचा निषेध करण्यासाठी एक गोष्ट सांगितली ती अशी:

एका लहानशा तळ्यापाशी एक बगळा राहत असे. त्याने एके दिवशी त्या तळ्यातल्या माशांस म्हटले : 'अरे तुमचे पुढे काय होईल याची तुम्हाला चिंता वाटत नाही काय? उष्णकाळ सुरू झाला नाही तोच या तळ्यातले पाणी आटत चालले आहे. काही दिवसांनी तर यात मुळीच पाणी उरणार नाही. मग तुम्ही पटापट मरण पावाल. मला एक मोठे सरोवर माहीत आहे. त्यातले पाणी कधीही आटत नाही. तुम्ही राजी असाल

तर तुम्हाला मी चोचीत धरून त्या सरोवरात नेऊन सोडतो.' हे त्या बगळ्याचे म्हणणे त्या माशांस खरे वाटेना. तेव्हा बगळा त्यास म्हणाला, 'माझ्या बोलण्यावर तुमचा विश्वास पटत नसल्यास तुमच्यापैकी कोणाला तरी पहिल्याने त्या सरोवराकडे घेऊन जातो. म्हणजे ते तो आपल्या दृष्टीने पाहून तुम्हाला येऊन सांगेल.' हा बगळ्याचा विचार त्या माशांना पसंत वाटून त्यांनी एका वृद्ध माशाला त्याच्या स्वाधीन केले. त्याला त्या बगळ्याने नेऊन एक मोठे सरोवर दाखविले आणि त्याला त्याने पुन्हा सुखरूप आणून त्या माशांत सोडले. त्याला त्या वृद्ध माशाने सांगितल्यावरून बाकीच्या माशांचा बगळ्यावर भरवसा बसून ते त्याच्या चोचीतून त्या सरोवरात जाण्यास राजी झाले. मग बगळ्याने त्या भोळ्या माशांतला एक उचलून त्या सरोवरापाशी नेऊन एका झाडावर बसून यथेष्ट खाल्ला.

असा क्रम त्याने बहुतेक मासे खलास होईपर्यंत चालविला. मग त्या तळ्यात एक खेकडा राहत असे. त्यालाही खाऊन टाकण्याचा विचार करून बगळा त्याला म्हणाला: 'गड्या, मी तुझ्या सोबतीच्या सगळ्या माशांना येथून नेऊन एका मोठ्या विस्तीर्ण सरोवरात नेऊन सोडिले आहे. तर तूही तिकडे चलावे. मी तुला उचलून नेतो.' खेकडा म्हणाला: 'पण तू मला नेशील कसा? तू मला चोचेत धरशील खरा; पण नेता नेता मला वाटेत पाडशील, म्हणून मी तुजबरोबर येण्यास तयार नाही.' बगळा उत्तर करितो : पण मुळी भिऊ नको. मी तुला चोचीत घट्ट धरून नेईन. बगळ्याचा असा आग्रह पाहून खेकड्याने मनात म्हटले की, या बगळ्याच्या चोचीत जे मासे सापडले त्याला त्याने दुसऱ्या सरोवरात नेऊन सोडिले असेल ही गोष्टच बोलावयाला नको. कारण तो त्याला सहज खाऊन गेला असेल. माझी गोष्ट तशी नाही. मी त्याच्या चोचीत सापडलो तरी मला खाऊन टाकण्याचा त्याला मोठे प्रयास पडतील. तर आपण याच्या चोचेतून जावे. जर त्याने त्या सरोवरात मला नेऊन सोडिले तर बरेच झाले; परंतु जर करिता याने मजशी दगा करण्याचा घाट घातला तर मी आपल्या पंजांनी त्याचा गळा काढून टाकून प्राण घेईन.' मग तो बगळ्यास म्हणाला: 'गड्या, तू म्हणतोस ते खरे; पण तुझ्याने मला घट्ट धरवणार नाही; पण तू ऐकशील तर एक युक्ती आहे. आम्हा खेकड्याचे पंजे मोठे बळकट असतात. त्यांनी तुझ्या गळ्यास मला पकडू देशील तर मी तुजबरोबर जाण्यास तयार आहे.' हे त्याचे म्हणणे बगळ्याने कबूल केले. खेकडा आपणास ठकवू पाहत आहे हे त्याच्या ध्यानात आले नाही. मग खेकड्याने बगळ्याचा गळा आपल्या पंजांनी घट्ट धरून म्हटले: 'आता ठीक आहे, चल उड.' बगळ्याने त्याला या सरोवरापाशी नेऊन ते त्याला दुरून दाखविले आणि

तो तेथून परतू लागला तेव्हा खेकडा म्हणाला : 'गड्या, सरोवर तर तिकडे राहिले आणि तू इकडे कोणीकडे चाललास?' बगळ्याने उत्तर केले: 'तुला जो मी इतक्या दूर वाहून आणिला, तो मी तुझा गुलाम आहे असे तू मला समजतोस काय? तो त्या झाडाच्या बुध्यांशी माशांच्या हाडांचा ढीग आहे त्याकडे नजर फेक, त्या तळ्यातला एकूण एक मासा आणून मी खाल्ला आहे. त्याच ठिकाणी तुलाही नेऊन खाऊन टाकण्यास मी चाललो आहे.' खेकडा म्हणाला, 'ते मासे आपल्या मूर्खपणाने तुझ्या भक्ष्यस्थानी पडले; पण मी तुला असा माझा अंत करू देणार नाही, तर तुझाच नाश मी आता करितो पाहा. मी तुझ्या मानेला पंजांनी धरिले आहे ते व्यर्थ नव्हे. तू मूर्ख म्हणून असा फसलास. आता हे तुझे शिर कापून मी जमिनीवर पाडणार. त्यात तू तर प्राणास मुकशीलच; परंतु असे केल्याने कदाचित माझाही अंत होईल; पण त्याची मला पर्वा नाही. तुझ्यासारख्या दुष्टाचा संहार करण्यात मी मोठेच पुण्य समजेल.'

हे खेकड्याचे बोलणे ऐकून बगळा शुद्धीवर आला आणि मरणभीतीने कंपायमान होऊन व डोळ्यात आसवे आणून सद्‌गदित कंठाने म्हणाला, 'अरे हे काय भलतेच तू योजिले आहेस? माझ्या मनातून तुला खावयाचे नाही, तू मला जीवदान द्यावे.' खेकडा म्हणाला: 'बरे तर मला त्या सरोवरात नेऊन सोड.' बगळ्याने त्याला लागलीच सरोवराच्या तीरावर चिखलात नेऊन ठेवले; पण ठेवता ठेवता खेकड्याने त्याचा गळा पार कादून टाकला. ह्याप्रमाणे तो दुष्ट विश्वासघातकी बगळा प्राणास मुकला.

## मोहरीचा दृष्टांत

एका बाईचे एकुलते एक मूल एकाएकी मरण पावले. तेव्हा ती बुद्धापाशी जाऊन म्हणाली:'हे गुरुराज, माझे मूल मृत्यू पावले आहे. तर ते पुन्हा उठेल असे काहीतरी औषध सांगा.' बुद्ध म्हणाला, 'मला थोडीशी मोहरी आणून दे'. तेव्हा ती हर्ष पावून मोहरी आणावयास जाऊ लागली. जाताना तिला त्याने सांगितले की, 'बाई, मोहरी आणशील ती ज्या घरातले कोणीही मनुष्य कधीही मेले नसेल अशा घरातून घेऊन ये.' ते ऐकून ती बिचारी स्त्री मोहरीसाठी घरोघर हिंडू लागली. प्रत्येक घरी तिने असा प्रश्न करावा की, या घरात कोणी कधी मेले आहे काय? त्या तिच्या प्रश्नास 'नाही' असा जवाब कोठेही मिळेना. जो तो तिला सांगू लागला की, 'आमच्या कुटुंबात आजपर्यंत पुष्कळ माणसे मरण पावली आहेत.' याप्रमाणे पुष्कळ हिंडून ती थकली. तेव्हा तिला असा विवेक झाला की, मी केवढी स्वार्थी. माझ्या दु:खाचा मला एवढा का बरे बाऊ वाटतो? मरण कोणास कदापि चुकविता येणे नाही. तर हा मायापाश

तोडून आपल्या जीविताचे सार्थक करण्याचा मार्ग धरावा असा तिने संकल्प केला आणि मग आपल्या मुलास मूठमाती देऊन ती बुद्धापाशी आली आणि त्याच्या धर्मबोधाचे मनापासून श्रवण करून त्याची अनुयायी बनली. या समयी बुद्धाने येणेप्रमाणे बोध केला.

'या लोकीचे मानवजीवित अत्यल्प असून दु:ख व त्रास यांनी व्याप्त आहे. जे जन्म पावले त्याला कोणत्याही उपायाने मरण टाळता येणार नाही. मरण ही प्राण्याची प्रकृतीच आहे. कुंभकाराने घडवलेले घट जसे परिणामी भंग पावावयाचे, तद्वत या मर्त्यलोकीच्या मरणाधीन प्राण्याची गती व्हावयाची. वृद्ध, तरुण, अज्ञ, सुज्ञ, राव, रंक असा भेदाभेद मृत्यू काहीच जाणत नाही. त्याच्या तावडीतून कोणीही सुटणार नाही. जे मरणवश झाले त्याच्या जीविताचे रक्षण त्याच्या प्रिय मातापितराकडून किंवा इष्टमित्राकडून कदापि व्हावयाचे नाही. मृत जनाच्या नातलगांनी कितीही शोक केला तरी तो केवळ व्यर्थ होय. याप्रमाणे मृत्यू आणि विपत्ती यांनी युक्त असा हा संसार असल्याकारणाने ज्ञाते पुरुष त्यापासून क्लेश पावत नाहीत किंवा खेद करीत नाहीत. अमूक एक गोष्ट अमुक तऱ्हेने घडावी असा आपण आपल्या मनाशी कितीही संकल्प केला तरी तशी ती घडेलच याचा काही नेम नसतो आणि ती आपल्या इच्छेविरुद्ध घडल्यास आपली केवळ निराशा होते. हे निराशेचे प्रसंग या संसारात प्रतिक्षण प्राप्त होतात. यास्तव ज्ञात्याने त्याची क्षिती बाळगणे उचित नव्हे. अनिष्ट प्रसंगाबद्दल खेद किंवा विलाप केल्याने काही एक निष्पन्न होत नसते. असे केल्याने चित्तास शांती प्राप्त होत नाही, उलट मनुष्याचे चित्त विशेष संतापयुक्त होऊन दु:ख वृद्धिंगत होईल. त्याच्या देहासही आराम नाहीसा होईल. यास्तव ज्ञात्याने असा विवेक करावा की, मर्त्यजनास मरण हे अवश्य प्राप्त होणारे असून त्याची गती त्याच्या कर्मानुसार व्हावयाची तर ही कर्मे हातून चांगली होतील असा प्रयत्न मनुष्याने सर्वदा करावा. ऐहिक अनिष्ट गोष्टीमुळे प्राप्त होणारा शोक, खेद व अस्वस्थता यांस चित्तात थारा देऊ नये. याप्रमाणे जो संसारातील घडामोडीपासून अलिप्त राहतो त्याच्या चित्तास स्वास्थ्य प्राप्त होते; शांतीचा त्याला अनुभव घडू लागतो. जो शोकवृत्तीचे दमन करितो तो शोकमुक्त होऊन सुखानुभव घेतो.'

येथवर बुद्धाच्या बोधपद्धतीचे थोडेसे दिग्दर्शन केले. त्याने ज्या शेकडो दृष्टांतरूप कथा निरनिराळ्या प्रसंगी सांगितल्या आहेत त्यातील आणखी काही येथे लिहू लागल्यास या भागाची मर्यादा फारच वाढून एकंदर ग्रंथाचाही विस्तार मोठा होईल. या भीतीस्तव त्याचा येथे आणखी उल्लेख करीत नाही.

# भाग आठवा
# आयुष्यक्रम

बुद्धाने सुमारे पंचेचाळीस वर्षे सर्वत्र हिंडून जनास स्वधर्मास बोध केला हे मागे सांगितलेच आहे. ह्या सर्व वर्षांची हकीकत कोणीही संगतवारीने लिहून ठेविलेली नाही. तरी पहिल्या वीस वर्षांची तपशीलवार माहिती उपलब्ध आहे. ती येथे साररूपाने देतो. म्हणजे तीवरून त्याच्या एकंदर आयुष्यक्रमाचे स्वरूप वाचकांच्या लक्षात येईल.

बुद्धाने स्वसंमत निर्वाणमार्गाचा उपदेश जनाला करण्यास आरंभ केल्यावर पहिले वर्ष काशी येथे घालविले आणि पुढील दोन वर्षे तो राजगृह येथे राहिला. यानंतर प्रत्येक वर्षी त्याने काय काय केले ते तपशीलवार सापडते.

चौथे वर्ष – या वर्षी बुद्धाने एका दोरीवरून नाचणाऱ्या बहुरूप्यास बोध करून त्याला आपल्या संघात घेतले आणि मग भागीरथीच्या पैलतीरी वैशाली नगरीत जाऊन तेथे तो महावननामक राईत काही वेळ राहिला. या राईत असता शाक्य आणि कोलिया यांचा सीमेवरील नदीच्या पाण्यासंबंधाने वाद पडला आहे असे त्याच्या कानी आले. तेव्हा त्यांजकडे जाऊन त्याला त्याने बोधाच्या दोन गोष्टी सांगितल्या आणि त्यांचा वाद मिटविला आणि पुन्हा महावनात येऊन ह्या वर्षाचा पावसाळा घालविला.

पाचवे वर्ष – या वर्षी शुद्धोदनराजा आजारी झाला असे वर्तमान ऐकून बुद्ध कपिलवस्तू नगरीस गेला. तेथे आपल्या पित्याचा अंत होईपर्यंत तो राहिला आणि त्याचे देहावसान झाल्यावर त्याचा अंत्यविधी त्याने यथाशास्त्र केला आणि आपल्या नातलगाचे समाधान करून तो कुष्टागारनामक विहारामध्ये येऊन राहिला. येथे असता त्याची सावत्र आई प्रजापती, त्याची पत्नी यशोधरा आणि दुसऱ्या कित्येक स्त्रिया यांनी त्याच्यापाशी येऊन त्याला अशी आग्रहपूर्वक विनंती केली की, आम्हाला तुझ्या संघात घे. प्रथम तो त्यांना घेण्यास राजी नव्हता; फरंतु आनंदाने त्यांच्या वतीने फारच गळ घातल्यावरून त्याने आपल्या संघात सामील होऊ दिले आणि ह्या प्रसंगी त्याने भिक्षुणीच्या वागणुकीसाठी काही नियम केले. मग तो मकुलनामक टेकडीवर जाऊन राहिला.

**सहावे वर्ष –** अलाहाबादेजवळील मकुलनामक टेकडीवर पावसाळा घालविल्यावर बुद्ध राजगृहनगरीस परत आला. तेथे असता त्याने बिंबिसार राजाच्या पत्नीस आपल्या संघात घेतले. ह्या समयी आपल्या एका शिष्याने काही चमत्कार करून एक सुवर्णपात्र मिळविल्याचे ऐकून तो त्याच्यापाशी गेला आणि ते पात्र फोडून टाकून चमत्कार न करण्याविषयी त्याने आपल्या शिष्यास बोध केला.

**सातवे वर्ष –** ह्या वर्षी बुद्ध जेतवनामध्ये राहत असता त्याच्या कित्येक शत्रूंनी एका स्त्रीला काही द्रव्य द्यावयाचे करून तिच्याकडून असा आरोप आणविला की, त्याने तिच्या पातिव्रत्याचा भंग केला; पण ह्या स्त्रीचा खोडसाळपणा उघडकीस येऊन बुद्ध दोषमुक्त झाला.

**आठवे वर्ष –** ह्या वर्षी त्याने नकुलनामक आपल्या एका शिष्याच्या मातेस आणि मोगलीनामक शिष्याच्या मातापितरास आपल्या धर्मपंथाची दीक्षा दिली. मग तो अलाहाबादेजवळ कोशांबी येथे येऊन पावसाचे चार महिने राहिला.

**नववे वर्ष –** बुद्धाचा शिष्य मोगली हा त्याच्या विरुद्ध कट करण्यास प्रवृत्त झाला असता आनंदाने त्याला दुसऱ्या कोठेतरी जाऊन राहावयास सांगितले; पण बुद्धाने त्याचे ऐकिले नाही. पुढे बुद्धाच्या संघामध्ये कलह उत्पन्न झाला. तो मिटविण्याचा त्याने पुष्कळ प्रयत्न केला. त्याला त्याने नानापरी बोध केला. ऐक्य, सहनशीलता, दयार्द्रता इत्यादिकांचे महत्त्व किती आहे ते त्याने त्यास समजून सांगितले; परंतु ते आपल्या मनातले परस्परविषयीचे वैमनस्य सोडीनात, तेव्हा त्याला अत्यंत वाईट वाटून तो त्याला सोडून पारिलेयकनामक अरण्यात एकटाच निघून गेला.

**दहावे वर्ष –** सदरील अरण्यात त्याला जवळच्या गावकऱ्यांनी एक पर्णकुटिका बांधून दिली. तीमध्ये राहून त्याने पावसाळा घालविला. आपला गुरू आपणावर रुष्ट होऊन आपणास सोडून गेला असे त्या उद्दाम शिष्यास समजले. तेव्हा त्याला पश्चात्ताप वाटून ते त्याला शोधत ह्या पर्णकुटिकेपाशी आले आणि आपल्या कृतापराधाची क्षमा मागू लागले. तेव्हा बुद्धाला त्याची दया येऊन त्याने त्यास क्षमा केली. ह्या वेळी त्याने त्यास येणेप्रमाणे वाक्प्रहार केला : 'ज्याचे सोबती विचारी, शांत, अभिन्न असे असतात तो स्वत: विचारशील असल्यास त्याची ऐहिक जीवितयात्रा सुखाने होईल; परंतु तेच जर अज्ञानी व अविचारी असले तर त्यांची संगती सोडून त्याने एकटे मार्गक्रमण करावे हे चांगले. त्याच्या संगतीस राहून पापाचारात मग्न होऊन दुर्वासनावश व्हावे हे कदापि इष्ट नव्हे.' ह्याप्रमाणे बुद्धाने त्यास बोध केल्यावर त्यास पूर्ण अनुताप

होऊन त्यांनी त्याच्या आज्ञेप्रमाणे सर्वदा वागण्याचे वचन दिले. या अनुतप्त शिष्यासमवेत बुद्ध नगरीस परत आला आणि नंतर तेथून मगधप्रांती गेला.

**अकरावे वर्ष –** या वर्षी राजगृहनगरीजवळील एका खेड्यातल्या भारद्वाज नामक ब्राह्मणास बुद्धाने आपल्या धर्माची दीक्षा दिली. यावेळी त्याने पेरणाराचा दाखला दिल्याचे गेल्या भागात सांगितलेच आहे. येथे त्याने वर्षाकाळ घालविल्यावर तो कोसल प्रांतातील एका गावी आला.

**बारावे वर्ष –** सदरील ठिकाणावरून तो जवळच्या बेरंजानामक गावी गेला. येथे त्याने या वर्षाचा पावसाळा घालविला. फर्जन्यकाळ आटोपल्यावर तो दूरच्या प्रवासास निघाला. यावेळी तो दक्षिणेस मंतलप्रांतापर्यंत आला. वाटेत लागणाऱ्या प्रत्येक गावी तो स्वधर्मबोध करीत गेला आणि तेथून तो परत काशीवरून कोसल प्रांतात श्रावस्तीनगरीस आला. या प्रवासाहून आल्यावर राहुलाचे दुर्वर्तन त्याच्या कानी आल्यावरून त्याला त्याने उपदेश केला. हा बुद्धाचा पुत्र त्यावेळी अठरा वर्षांचा होता.

**तेरावे वर्ष –** मग बुद्ध शालिय येथे गेला. या वर्षाचा पर्जन्यकाळ त्याने ह्याच गावी घालविला. तेथून तो परत श्रावस्तीनगरीस आला.

**चौदावे वर्ष –** या वर्षी त्याने राहुलाचे वर्तन सुधारले आहे असे पाहून त्याला संघाची दीक्षा दिली आणि ह्या प्रसंगी त्यास उद्देशून बोध केला.

**पंधरावे वर्ष –** त्याने निग्रोधनामक नगरीजवळील राईत घालविले. तेथे असता त्याने महानामा यास उपदेश केला. शुद्धोदन राजाच्या गादीचा मालक झाला होता, त्याने बुद्धाला आपल्या कन्येचा त्याग केल्याबद्दल शिव्याशाप दिले; पण बुद्धाने त्याला दुरुत्तर केले नाही. पुढे हा राजा एकाएकी काही संकट गुदरून मरण पावला. सदरील बुद्ध जेतवनातील विहारामध्ये आला. ह्या वेळी त्याने दान करण्यापेक्षा नीतिधर्माचे महत्त्व केवढे आहे याविषयीचा बोध एका ब्राह्मणाच्या प्रश्नावरून केला.

**सोळावे वर्ष –** ह्या वर्षी तो आलवी मुक्कामी गेला आणि तेथल्या एका मनुष्याने दुष्ट मनुष्यास (अंगुलीमाल) स्वबोधसामर्थ्याने ताळ्यावर आणून आपल्या धर्माची दीक्षा दिली.

**सतरावे वर्ष –** ह्या वर्षाचा पर्जन्यकाळ बुद्धाने राजगृहनगरीत घालविला. पावसाळा संपताच तो श्रावस्तीपासून आलवी मुक्कामी जनास बोध करीत गेला. आलवी येथे असता एक क्षुधित पुरुष बुद्धाचा बोध श्रवण करण्यास आला असता त्याला आधी पोटभर जेऊ घातल्यावाचून बोध करीत नाही असे त्याने म्हटले.

**अठरावे वर्ष –** ह्या वर्षीचा पावसाळा त्याने पुन्हा शालिय मुक्कामी घालविला. येथे असता एका कोष्ट्याच्या हातून त्याच्या मुलीचा प्राण अपघाताने गेला. तेव्हा बुद्धाने त्याला उपदेश करून त्याचे समाधान केले.

**एकोणिसावे वर्ष –** वेलुवन विहारात पर्जन्यकाळ घालविल्यावर बुद्ध मगध प्रांतातील प्रत्येक खेड्यात उपदेश करीत हिंडला. एके समयी एक हरिण जाळ्यात सापडलेला पाहून त्याला त्याने बंधमुक्त केले आणि तेथे जवळील एका वृक्षाखाली बसून तो ध्यानस्थ झाला. इतक्यात ज्या पारध्याने ते जाळे मांडिले होते तो येऊन पाहतो तो हरिण सुटून गेला. तेव्हा ते ह्या ध्यानस्थ बसलेल्या माणसानेच सोडून लाविले असा तर्क करून तो त्याचा प्राण घेण्यास उद्युक्त झाला आणि त्याने आपल्या धनुष्यास प्रत्यंचा चढवून एक बाण आकर्ण ओढून त्याजवर सोडिला; परंतु तो दैवयोगाने चुकून बुद्धाच्या प्राणाचा बचाव झाला. तेव्हा तो दुसरा बाण धनुष्यास लावून सोडणार तोच बुद्ध ध्यान विसर्जन करून जागृत झाला आणि व्याधाचा तो उद्देश ओळखून त्याला त्या समयास उचित असा बोध केला. त्याचा परिणाम त्या व्याधावर व त्याच्या कुटुंबावर एवढा विलक्षण झाला की, त्यांनी आपली वृत्ती तात्काळ सोडून देऊन बुद्धाचे अनुयायित्व स्वीकारिले. येथून बुद्ध श्रावस्तीकडे गेला.

**विसावे वर्ष –** श्रावस्ती मुक्कामी त्याने ह्या वर्षीचा पर्जन्यकाळ घालविला. येथे असता त्याचा जो एक शिष्य त्याचे भिक्षापात्र घेऊन त्याजबरोबर हिंडत असे, त्याने त्याचा दोन वेळा उपमर्द केल्यावरून आनंदाने आपल्याबरोबर सर्वदा असावे असे त्याने ठरविले. येथून पुढे तो शालिग्रामजवळील उपवनात गेला. तेथे त्याला एक वाटमाऱ्या भेटला. त्याला त्याने उपदेश करून भिक्षुदीक्षा दिली.

या पुढली वर्षे बुद्धाने कोणत्या प्रकारे घालविली याविषयी क्रमवार माहिती कोठेही आढळत नाही. त्याच्या शेवटच्या काही महिन्यांचा वृत्तांत मात्र साद्यंत सापडतो, त्याचे येथे थोडक्यात दिग्दर्शन करू.

बुद्ध गृध्रकुटी राहत असता मगधदेशाचा राजा अजातशत्रू याने वृजी लोकांवर स्वारी करण्याचा बेत केला आणि आपल्या प्रधानास बुद्धाकडे पाठवून हा आपला बेत कळविला. तेव्हा बुद्ध त्या प्रधानास म्हणाला: 'जोपर्यंत वृजीलोक वेळोवेळी सभा भरून त्यात आपल्या हिताच्या गोष्टींचा विचार एकमताने करीत राहतील तोपर्यंत त्यांचा ऱ्हास कदापि व्हावयाचा नाही. त्यांचा सदोदित उत्कर्षच होत राहील. त्यांच्यामध्ये जोपर्यंत ऐक्य वसत आहे तोपर्यंत ते वडीलजनांचा मान राखितील, जोपर्यंत त्यांच्या

ठायी स्त्रीजनाविषयी आदरबुद्धी वास करील, जोपर्यंत ते धर्माचरणापासून च्युत होणार नाहीत, तर सर्व धर्मनियमांचे यथासांग अनुवर्तन करितील, जोपर्यंत ते पवित्र पुरुषाचे रक्षण व परिपालन योग्य मार्गाने करीत राहतील तोपर्यंत त्यांची अवनती कदापि व्हावयाची नाही तर त्यांची सर्वदा उन्नतीच होत राहील. मी जो धर्मबोध त्यास वारंवार केला आहे तद्नुसार जोपर्यंत ते काया-वाचा-मने करून वर्तत राहतील तोपर्यंत त्यास कोणाचेही भय नाही.'

येणेप्रमाणे त्याने केलेले भाषण ऐकून तो प्रधान निघून गेला. मग बुद्धाने आपल्या आसपासच्या सर्व भिक्षूंस बोलावून आणून त्यांस एकोप्याने व नीतीने वागण्याविषयी बोध केला.

गृध्रकुटीहून बुद्ध पाटलीपुत्र नामक नगरीस गेला. तेथे त्याच्या शिष्यांनी त्याचा यथोचित मान केल्यावर त्याने आपल्या गृहस्थाश्रमी शिष्यजनांस येणेप्रमाणे बोध केला :

'हे गृहस्थहो, जो मनुष्य दुराचरण करितो, त्याचे पाच प्रकारे नुकसान होते. दुवृत्त मनुष्य सदाचरणाच्या अभावास्तव आळसयुक्त होऊन दारिद्र्ययुक्त होतो. मग त्याची चोहोकडे अपकीर्ती होते. असे झाल्याने त्याला कोठेच मान नाहीसा होतो. अंतकाळी त्याचे चित्त उद्वेगयुक्त होते; ते आणि शेवटी मरणोत्तर त्याचे चित्त दुःखयुक्त होते. याप्रमाणे कृतकर्माचा परिणाम कायम राहून त्याला विपत्ती व दुःख याचा सतत अनुभव घडतो. आता जो सदाचरण करितो त्याचे पाच प्रकारे हित होते. सद्वर्तन करणारा मनुष्य आपल्या सदाचरणबलेकरून उद्यमशील असल्याकारणाने तो संपन्न होतो. अशाने त्याची सर्वत्र सत्कीर्ती पसरते. तो कोठेही गेला तरी त्याला सर्वजण मोठा मान देतात. मरणकाळी त्याचे चित्त चिंता व उद्वेग यापासून मुक्त असते आणि शेवटी त्याचे देहावसान झाल्यावर त्याच्या चित्तास सुखानुभव घडतो. त्याच्या सत्कामाचा परिणाम चांगला होऊन तो कोठेही असला तरी त्यास सौख्यप्राप्ती होते.'

नंतर बुद्ध वैशाली येथे मोठ्या शिष्यसमुदाया समवेत गेला आणि तेथे अंबापाली नामक एका धनाढ्य वेश्येच्या राईत त्याने मुक्काम केला. या समयी बुद्धाने आपल्या शिष्यांस येणेप्रमाणे बोध केला, 'हे भिक्षूंनो, आमच्या धर्मबांधवांनी सर्वदा सावध व विवेकशील असावे. या जगामध्ये शारीरिक भोगतृष्णा, इंद्रियभोगलालसा आणि असत्य तर्काच्या योगाने उद्भवणाऱ्या भ्रामक समजुती यापासून प्राप्त होणाऱ्या दुःखाचे निरसन यथोचित मार्गाने करण्यास झटणे हे आमच्या बांधवांचे परमपवित्र कर्तव्य आहे. जे काही सत्कृत्य करण्यास तुम्ही उद्युक्त व्हाल ते मनःपूर्वक करा.'

बुद्धगुरू आपल्या राईत येऊन राहिला आहे असे कळताच अंबापाली अगदी साधा पेहराव करून व अंगावर दागदागिना काही एक न घालता त्याच्या दर्शनास आली आणि मोठ्या अदबीने एका बाजूस हात जोडून बसली. ती स्त्री एवढी धनसंपन्न, रूपवती व तरुण असता अशी सौम्य, विवेकशील व विनयसंपन्न आहे असे पाहून बुद्धाला मोठे नवल वाटले. असल्या स्त्रिया जात्याच अप्रबुद्ध, उद्दाम व निर्लज्ज असतात. त्यास ऐशआरामीच्या विपुल पदार्थांची अनुकूलता असल्याकारणाने त्यांचे चित्त सर्वदा विषयासक्त असते. असे असता ही स्त्री विरक्त व धर्मशील आहे, असे पाहून बुद्धाला समाधान वाटून त्याने तिला स्वसंमत धर्मबोध केला. तो श्रवण करीत असता तिचे चित्त उत्साहयुक्त झाले, तिची मुखचर्या प्रसन्न झाली. सद्‌बोधश्रवणाने तिची वृत्ती सर्वथैव पालटून सद्‌वर्तनमहत्त्व तिच्या चित्तात पूर्णपणे ठसले आणि मग ती उठून हात जोडून म्हणाली : 'गुरुराज, उदयिक आपण आपल्या सर्व शिष्यांसह वर्तमान माझ्या घरी भोजनास येण्याची कृपा करावी.' हे तिचे आमंत्रण ऐकून बुद्ध उगी राहिला. त्यावरून त्याने ते स्वीकारिले असे मानून ती त्यास वंदन करून मोठ्या हर्षाने निघून गेली.

ती गेल्यावर त्या प्रांतातील नामक राजपुत्र बुद्धदर्शनास आले आणि त्यांनी त्याला भोजनाचे आमंत्रण केले. तेव्हा बुद्ध म्हणाला : 'अहो लिछवी, मी अंबापालीचे आमंत्रण स्वीकारिले आहे. यास्तव तुमचे आमंत्रण मला मान्य करिता येत नाही.' हे ऐकून ते निरुपाय झाले आणि बुद्धास नमन करून निघून गेले. दुसरे दिवशी अंबापालीने भोजनाची सिद्धता करून बुद्धाला बोलाविणे पाठविले, तेव्हा बुद्ध आपल्या शिष्यांसहवर्तमान तिच्या वाड्यात गेला. मग भोजन आटोपल्यावर अंबापाली बुद्धाला हात जोडून म्हणाली : 'गुरुराज, हा माझा भव्य वाडा मी आपल्या संघास अर्पण करू इच्छिते, तर आपण त्याचा स्वीकार करून दासीला कृतकृत्य करावे.' बुद्धाने अंबापालीची ती देणगी स्वीकारून तिला धर्मबोध केला. तो ऐकून ती वेश्या पूर्ण उपरती पावून सदाचरण करण्याविषयी तिने दृढ संकल्प केला. नंतर बुद्ध तेथून निघून तिच्या राईत येऊन राहिला.

येथे थोडे दिवस राहिल्यावर तो काही शिष्यांसमवेत वेणुवनात आला आणि तेथे त्या वर्षीचा पर्जन्यकाळ घालविला. ह्या समयी बुद्धाला काही विकृती जडून त्याची प्रकृती बरीच बिघडली. ह्या आजारात त्याला प्राणांत वेदना होत तरी त्याने आपल्या चित्ताची स्वस्थता तिळप्रायही ढळू न देता सर्व दुःख मोठ्या धैर्याने सहन केले. ह्या

वेळी बुद्धाच्या लक्षात आले की, आता आपणास केव्हा मरण प्राप्त होईल याचा नेम नाही. तर आपले देहावसान होण्यापूर्वी आपल्या शिष्यांस शेवटले बोधाचे दोन शब्द सांगावे असे मनात आणून दुखणे अंमळ कमी होताच त्याने आपल्या आसपासच्या सर्व भिक्षुसंघास बोलावून येणेप्रमाणे उपदेश केला : ''भिक्षुजन हो, माझ्या धर्माचे समग्र तत्त्व मी तुम्हास वेळोवेळी उपदेशिले आहे. एकंदर रहस्याचा बोध मी तुम्हांस निष्कपटपणे केला आहे, काहीएक मागे ठेविले नाही. आता माझी गरज तुम्हाला मुळीच उरली नाही. माझे आयुष्य आता पुरे झाले. मी अगदी वृद्ध झालो आहे. माझी या जगातली जीवितयात्रा समाप्त झाली आहे तर आता माझ्या साहाय्याची अपेक्षा करू नका. तुम्हास जो ज्ञानप्रकाश प्राप्त झाला आहे त्याचा यथोचित उपयोग करून आपला आयुष्यमार्ग ओळखा. ह्या अज्ञानतमोमय जगामध्ये तुम्हास प्राप्त झालेल्या सत्यज्ञानरूप दीपकाचा दृढ अवलंब करा आणि आपल्या मुक्तीचा मार्ग स्वीकारून ह्या जीविताचे सार्थक्य करा. ह्या देहात प्राण आहेत तोपर्यंत देहमूलक वासनामुळे उद्‌भवणाऱ्या विपत्तीचे निरसन विवेक व सदाचार यांच्या साहाय्याने करा. तुमच्या इंद्रियांचे व्यापार आणि मानसिक वृत्ती व विचार यांचे यथोचित नियमन करून एतन्मूलक सर्व विपत्तीपासून मुक्त राहा. सर्वदा सावध व जागरूक रहा. सदाचारापासून च्युत न होण्याचा प्रयत्न काया-वाचा-मने करून करा. या संसारात जो अनुभव तुम्हास अहर्निश प्राप्त होईल त्याचा योग्य विचार करून आपला वर्तनक्रम यथायोग्य राखण्यास झटा. माझ्या पश्चात तुम्हास स्वत:च्या ज्ञानबलावर व विवेकबलावर सर्वस्वी अवलंबून राहावे लागणार आहे. यास्तव जे मी तुम्हास आजपर्यंत वेळोवेळी सांगितले आहे त्याची उपस्थिती राखा आणि त्याचे मनन निदिव्याव करून सन्मार्गवर्ती व्हा. माझा आता भरवसा नाही. माझा-तुमचा सहवास लवकरच तुटेल.''

हे बुद्धाचे सकरून शब्द ऐकून त्याच्या सर्व शिष्यांस पराकाष्ठेचे वाईट वाटले. आपला गुरू आपणास आता लवकर सोडून जाणार हे मनात येऊन त्यांस गहिवर दाटून आला. तेव्हा आनंद पुढे होऊन हात जोडून म्हणाला, 'गुरुराज, आपण ह्या जगात आणखी बहुत दिवस राहून आम्हास धर्मबोध करावा अशी आमची मनापासून इच्छा आहे. आपले आयुष्य दीर्घ झाल्याने सर्व मानवजातीचे कल्याण होण्यासारखे आहे.' हे त्याचे सद्‌गदित होऊन केलेले भाषण ऐकून बुद्ध त्यास म्हणाला, 'हे आनंदा, आता माझे काम संपले, माझ्या हातून जेवढे जनहित होण्यासारखे होते तेवढे मी करून चुकलो आहे. मी ह्या जगात आणखी जगण्याची कितीही इच्छा केली तरी हा देह केव्हातरी नि:संशय मरणवश व्हावयाचा. जे उपजले ते आयुष्यमर्यादा संपताच

अंत पावावे, हा निसर्ग नियम आहे. तो तुला, मला व इतर कोणालाही टाळता येणे नाही. तेव्हा ते निसर्गसिद्धच आहे, त्याविषयी वृथा खेद करण्यात कोणता अर्थ आहे? मी तुम्हास सत्याचा बोध पुन्हा पुन्हा केला असून तुमच्या हृदयात ते पूर्णपणे बिंबले आहे. त्याची सर्वदा उपस्थिती ठेवून तदनुसार स्वतःचे वर्तन अहर्निश ठेवण्यास झटा. त्याचे मनन सदोदित करा आणि ते सर्वत्र प्रस्तुत करण्यास काया–वाचा–मने करून उद्यमशील रहा. माझ्या ह्या सत्यधर्मबोधाचे स्वरूप इहलोकी सर्वदा शुद्ध व शाश्वत राहील असा उद्योग तनमनधने करण्याचे तुमच्या हाती आहे. त्याचा साधेल तेवढा सर्वत्र प्रसार करण्यास तुम्ही सर्वदा झटाल तर त्याच्या योगाने जनांचे वास्तविक कल्याण होऊन त्यास शाश्वत सुखाचा लाभ होईल. तेव्हा जे तुमचे बांधव अद्यापि अज्ञानतिमिरात चाचपडत असतील त्यांना हा माझा ज्ञानदीप दाखवून सन्मार्गी लावा. अशा अज्ञ जनांची तुम्हास सर्वदा करुणा यावी. त्यास पुन्हा पुन्हा कोमल व दयार्द्र शब्दांनी बोध करून सत्यधर्माचा स्वीकार करावयास लावा. ह्याप्रमाणे मानवजातीच्या हितार्थ प्रयत्न करण्यात तुम्ही आपले आयुष्य वेचाल तर ते सार्थकी लागले असे होईल. तुम्ही जनास उपदेश करीत फिरत असता, त्याला भलभलत्या थापा देऊन भुरळ घालू नका. फलज्योतिष, शकुनविद्या किंवा भाकीत सांगण्याची दुसरी कोणतीही विद्या आपणास येते असा बहाणा करून लोकांत आपले स्तोम माजवू नका. जनास भ्रमात पाडणाऱ्या ह्या असल्या विद्या सर्वथा निषिद्ध होत. त्यांच्या नादी तुम्ही कदापि लागू नका. कोणत्याही प्रसंगी चित्ताची समता नष्ट होऊ देऊ नका. सर्वदा मनोनिग्रह करून ह्या संसारातील एकंदर मोहप्रद विषयांपासून सर्वथा निवृत्त राहा. चित्ताची शांती जेणेकरून अढळ राहील असा व्यासंग व उद्योग करण्यास सर्वदा तत्पर राहा. केवळ क्षुधातृषाशांतीपुरते अन्नोदकाचे सेवन करा. कोणत्याही इंद्रियाच्या तृप्तीचे विषय कितीही उपस्थित असले तरी त्याचा दृढ निश्चयाने सर्वथा अव्हेर करा. जो सदाचाराचा मार्ग मी तुम्हास निवेदन केला आहे त्याचे सर्वदा मनन करा. पापप्रवृत्तीचे निर्दालन करण्यास अहर्निश झटा. साधुमार्गाचा अवलंब निश्चयाने करून त्याचे अनुवर्तन मनःपूर्वक करा. स्वतःच्या ठायीच्या सद्वृत्तीचा विकास साधेल तेवढा करण्यास तत्पर असा. धार्मिक वृत्तीचे उज्ज्वलन जेवढे होईल तेवढे इष्ट आहे असे समजा. जड देहास लागून असलेले विषय केवळ नश्चर व विषन्मूलक होत. यास्तव त्यात कदापि आसक्त होऊ नका, तर शाश्वत सुखाचा असा जो पवित्राचरणाचा मार्ग त्याचा दृढ अवलंब करा म्हणजे तुम्ही निर्वाणसिद्धी पावाल.'

ह्याप्रमाणे आपल्या शिष्यांस अखेरचा बोध केल्यावर बुद्ध पावा येथे आला. ह्या गावी चंदनामे करून एक शिल्पी राहत असे. त्याच्या आंबराईत जाऊन बुद्ध राहिला. हे वर्तमान त्या शिल्प्याला कळले तेव्हा तो त्याच्या दर्शनास आला आणि त्याने बुद्धाला आपल्या घरी भोजनास बोलाविले. त्याप्रमाणे बुद्ध दुसरे दिवशी त्याच्या घरी स्वशिष्यांसह जेवावयाला गेला. ह्या शिल्प्याने त्याला तांदळाच्या पोळ्या व रानडुकराचे वाळलेले मांस शिजवून खाऊ घातले. कोणी जे कसले अन्न देईल ते भक्षण करावे असा बुद्धाचा नियम असल्यामुळे चंदाने वाढलेले ते अन्न त्याने खाल्ले. त्यामुळे तो आजारी झाला आणि त्याला पराकाष्ठेच्या वेदना होऊ लागल्या तरी त्या त्याने धैर्याने व मुकाट्याने सहन केल्या.

अशा स्थितीत असता तो तेथून निघून कुशीनगरास आला. वाटेने चालताना तो थकून एका वृक्षाखाली विश्रांती घ्यावयास बसला आणि आनंदाकरवी जवळच्या ओढ्याचे पाणी आणून प्याला. असा तो वृक्षतळी बसला असता, पुकाक्षनामक एक तरुण मल्ल त्या वाटेने जात होता. तो बुद्धाला पाहून जवळ आला आणि हात जोडून त्याच्या सन्निध बसला. त्याचा भाव ओळखून बुद्धाने त्याला बोध केला. तो श्रवण करून त्याची वृत्ती तात्काळ पालटली आणि त्याने आपल्या घरी जाऊन दोन उत्तम भरजरी झगे आणून बुद्धाला अर्पण केले. त्यातला एक झगा आनंदाच्या आग्रहावरून बुद्धाने परिधान केला.

ह्या दुखण्यातून आपण बरा होत नाही असे पाहून बुद्ध आनंदाला म्हणाला – 'माझी प्रकृती चंदाने दिलेल्या अन्नामुळे बिघडली असून या दुखण्यात माझा अंत होईल असे वाटते. ह्यास्तव कोणी चंदाला शिव्याशाप देतील व त्यामुळे त्या बापड्याच्या चित्तास मोठा उद्वेग होईल. तर तो न व्हावा म्हणून त्याला सांगा की, ह्यात त्याचा मुळीच दोष नाही. त्याने मला भक्तिपुरस्सर ते अन्न खाऊ घातले त्याबद्दल त्याचे उपकार मानिले पाहिजेत. श्रमणास अन्नदान करणे हे मोठे पुण्य आहे. ते चंदास अवश्य प्राप्त व्हावयाचे. त्यात यत्किंचितही न्यून व्हावयाचे नाही. माझी प्रकृती बिघडावी म्हणून काही त्याने मला भोजन घातले नाही. तेव्हा मी आजारी झालो यात त्याच्याकडे काय दोष आहे बरे?'

नंतर बुद्ध कुशीनगरातील उपवर्तननामक शालवृक्षाच्या राईमध्ये आपल्या मोठ्या शिष्यसमुदायासह गेला. ही राई मल्लांची होती. येथे गेल्यावर दोन शालवृक्षाखाली एक बिछाना तयार करून बुद्धाला त्यावर निजविले. त्याला यावेळी असह्य वेदना होत

होत्या; पण त्याने आपले दुःख यत्किंचितही प्रकट करून दाखविले नाही. सर्व निमूटपणे सहन केले आणि त्याचे चित्त शेवटपर्यंत लवमात्रही अस्वस्थ झाले नाही. ही अशी आपल्या परमप्रिय गुरूची अवस्था पाहून सर्व शिष्यसमुदायास फार वाईट वाटले. आनंदाला तर यावेळी अतिशयित दुःख झाले. तो स्फुंदून स्फुंदून रडू लागला. तेव्हा बुद्धाने त्याला जवळ बोलावून म्हटले, 'मजवरील तुमच्या प्रेमाचे प्रदर्शन करण्याची ही तऱ्हा मला मुळीच पसंत वाटत नाही. तर जे माझे शिष्य मी उपदेशिलेल्या सन्मार्गाचे अनुवर्तन सदोदित दृढ निश्चयाने व सद्भावपूर्वक करितील त्यांचे मजवर निष्कपट प्रेम आहे असे मी समजेन. मी तुमची जी कर्तव्ये तुम्हास दाखवून दिली आहेत, तदनुसार वर्तन करण्याचा संकल्प अढळ राखून सत्कर्मपर व्हा, म्हणजे त्यात मला समाधान वाटेल.' आनंद म्हणाला, 'गुरुराज, आम्हास आपणाकडून पुष्कळ शिकावयाचे आहे आणि आपण तर आम्हाला सोडून चालला. आम्हास आता धर्मज्ञानाचा उपदेश कोण करील? आमच्या आचरणास योग्य वळण कोण लावील? आपण प्रदीप्त केलेला हा ज्ञानदीप आपल्यामागे मालवण्याची भीती आहे. म्हणून आम्ही शोक करीत आहो.' बुद्ध म्हणाला, 'बा आनंदा, तुम्ही आपले चित्त असे उद्वेगयुक्त होऊ देऊ नका. अज्ञान बालकाप्रमाणे असा शोक करणे तुम्हास उचित नव्हे. मी तुम्हास यापूर्वी सांगितलेच आहे की, ह्या प्रपंचातल्या एकंदर वस्तूंचे स्वरूप असे आहे की, त्या आपणास कितीही प्रिय व स्पृहनीय वाटत असल्या तरी त्याचा आपला वियोग अवश्य व्हावयाचा. ममत्वभाव हा मूर्खत्वाचा द्योतक आहे. दुःखमूलक जो हा संसार तो ममत्वास्तव आपणास प्रिय वाटत असतो; पण तो केवळ व्यर्थ होय. सत्यज्ञानाचा उदय ज्याच्या चित्तात होतो त्याला असे समजते की, हा संसार नश्वर असून त्याचा विलय केव्हा होईल याचा नेम नाही. ह्या विश्वात शाश्वत असे एक सत्यमात्र आहे त्याहून अन्य सारे भासमय आहे. हे आनंदा, माझा हा रक्तमांसाचा जड देह विलय पावला तरी मी जगात प्रचलित केलेला धर्म चिरायु होईल. माझी या जगातील कामगिरी आटोपली. मला जे माझे कर्तव्यसे वाटले ते मी आजपर्यंत काया-वाचा-मने करून केले. आता मला विश्रांती अवश्य पाहिजे. हे आनंदा, तू आजपर्यंत माझ्या सन्निध राहून माझी शुश्रूषा जीवेभावे केली. तू मजवर अकृत्रिम प्रेम केलेस. त्याबद्दल मी तुझा ऋणी आहे. तर हे आनंदा, माझे तुला शेवटचे सांगणे एवढेच आहे की, तू सन्मार्गानुवर्तनाचा प्रयत्न सर्वदा उत्साहपूर्वक व खऱ्या आस्थेने चालू ठेव. असे करिशील तर तू विपत्तीपासून मुक्त होशील. दुर्वर्तन, आत्मपरताभ्रम व अज्ञान यापासून तुझे मोचन होईल. मी इहलोक सोडून गेल्याबद्दल तुम्हास वाईट वाटण्याचे

कारण नाही. माझा देह येथून नाहीसा झाला तरी माझ्या सत्यधर्मरूपाने मी सर्वदा तुम्हास सन्निध राहीन. माझे देहावसान झाले तरी मी उपदेशिलेले सत्य अमर राहील. ह्या लोकी मी जे हे सत्याचे राज्य स्थापिले आहे ते जगाच्या अंतापर्यंत अढळ राहावयाचे. आता ह्या सत्याच्या यथार्थ स्वरूपाविषयी जनाची चित्ते वेळोवेळी भ्रांत होतील; परंतु माझ्यासारखे सत्यबोध करणारे पुरुष पुढे निर्माण होऊन जन पुन्हा सन्मार्गवर्ती होतील.'

याप्रमाणे बुद्ध स्वशिष्यांस उपदेश करीत असता त्या राईचे मालक जे मल्ल नावाचे लोक त्यांनी बुद्ध आपल्या राईत आजारी होऊन पडला आहे असे ऐकून त्याच्या दर्शनास आले आणि त्याची ती अवस्था पाहून शोक करू लागले. तेव्हा बुद्धाने त्यांना आपल्या जवळ बसवून घेऊन येणेप्रमाणे उपदेश केला– 'माझ्या धर्ममार्गाचा जो अवलंब करील त्याने तद्नुसार वर्तन करण्यास सर्वदा प्रयत्नशील असले पाहिजे. माझे नुसते दर्शन घेतल्याने काही एक लाभ होणे नाही. तर मी जो धर्ममार्ग उपदेशिला आहे त्याचे अनवर्तन दृढनिश्चयाने करा; म्हणजे तुमचे ह्या विपत्तिजालापासून विमोचन होईल. माझा तुमचा चिरंतन वियोग घडला तरी त्यात तुमचे काहीएक अहित होणे नाही. कारण मी तुम्हास सत्यधर्माचा उपदेश करून ठेविला आहे. त्याप्रमाणे जो दृढनिश्चयाने वर्तेल त्याच्या सन्निध मी सर्वकाळ आहे असे समजावे.' ह्याप्रमाणे बुद्ध पडल्या ठिकाणावरून उपदेश करीत असता, सुभद्रनामेकरून एक भिक्षुक तेथे जाऊन आनंदाला म्हणाला ` 'माझ्या मनात काही शंका उद्‌भवली आहे, ती मी बुद्धास निवेदन करून तिचे निरसन करून घेऊ इच्छितो.' आनंद म्हणाला : 'आपल्या गुरूमहाराजांची प्रकृती अस्वस्थ झाली आहे. यास्तव तू त्याला त्रास न द्यावा हे योग्य होय.' हे त्याचे बोलणे बुद्धाने ऐकून आनंदास म्हटले, 'आनंदा, सुभद्राला मजकडे येऊन प्रश्न करण्यास प्रतिबंध करू नको. कारण तो जे काही विचारील ते खऱ्या धर्मजिज्ञासेने विचारील. प्रश्न विचारून मला निरर्थक त्रास द्यावा त्याचा मानस मुळीच नाही.' हे ऐकून आनंदाने त्या भिक्षूला बुद्धाकडे येऊ दिले आणि बुद्धाने त्याचा प्रश्न ऐकून घेतला आणि त्याला यथोचित बोध करून त्याचे समाधान केले.

आपले प्राणोत्क्रमण होण्याचा समय समीप आला असे पाहून त्याने आपल्या शिष्यांस शेवटी असे सांगितले की, 'माझ्या पश्चात तुम्हापैकी कित्येकांच्या मनात अशी कल्पना येण्याचा संभव आहे की, आमच्या गुरूचा अंत झाला, आता त्याच्या बोधाप्रमाणे वर्तले नाही तर चालेल; फरंतु ही अशी निषिद्ध कल्पना तुम्ही आपल्या चित्तात येऊ देऊ नका. माझा हा गौतमसिद्धार्थाचा देह नष्ट झाला, तरी बुद्ध ह्या रूपाने

मी सदोदित राहीन. मी जो सत्यधर्मबोध केला आहे तद्रूप मी आहे असे समजून त्याचा निदिध्यास तुम्ही अहर्निश धरा, म्हणजे माझ्या सान्निध्याचा अनुभव तुम्हास सर्वकाळ घडेल. तुमच्या मनात कोणत्याही गोष्टीसंबंधाने संशय असल्यास त्याचे निवेदन करा. मी गेल्यावर मग तुम्हास अनुताप होईल की, ही अमुक एक गोष्ट बुद्धाला विचारून घेतली असती तर बरे झाले असते, तर ते काही ठीक नव्हे. यास्तव जे काही तुम्हास मला विचारावयाचे असेल ते खुशाल बिनदिक्कत मोकळ्या मनाने विचारा.' तेव्हा आनंद हात जोडून म्हणाला : 'गुरुराज, आम्हास आपणाला काही एक विचारावयाचे नाही.' बुद्ध म्हणाला, 'तर मग तुम्हास माझा धर्म विपत्तीचे कारण व तीतून मुक्त होण्याचा मार्गही चांगला समजत आहे. आता माझे तुम्हास शेवटचे सांगणे एवढेच आहे की, ह्या विश्वातील एकंदर वस्तूंचा नाश व्हावा हा नियम आहे. ह्या जगात एक सत्य काय ते अविनाशी आहे त्यांचा अवलंब सद्भावे करून आपापला मोक्ष मोठ्या दक्षतेने साधा आणि इतर अज्ञ जनास तो साध्य करून देण्यास काया-वाचा-मने करून सदोदित झटा.'

याप्रमाणे आपल्या शिष्यांस शेवटचा बोध करून बुद्ध ध्यानस्थ झाला आणि त्या ध्यानातच बेशुद्ध होऊन त्याने प्राण सोडिला. तेव्हा त्याचे शिष्य अत्यंत शोकाकुल झाले. त्यावेळी अनुरुद्ध नामे एक भिक्षू इतरांचे समाधान करून म्हणाला, 'धर्मबांधव हो, असे शोक करीत बसणे आपणास उचित नव्हे. आमच्या गुरूने मरणसंबंधाने आपणास जो वेळोवेळी उपदेश केला आहे तो मनात आणा. त्याचे आपणास असे सांगणे आहे की, इहलोकी जे निर्माण झाले त्यास नाश अवश्य आहे. अमुक एक वस्तू किंवा मनुष्य आपणास कितीही प्रिय आणि आवश्यक असले तरी त्याचा-आपला वियोग हा निश्चयाने व्हावयाचा. तेव्हा अशा ह्या अबाधित सृष्टिनियमानुसार आमचा गुरू आम्हास सोडून गेला म्हणून का बरे कष्टी व्हावे? त्याने आपणास जो सद्धर्ममार्ग लावून दिला आहे त्याचे अनुसरण उत्साहपूर्वक करू तरच त्याच्यावर आपली निष्कपट भक्ती होती असे म्हणता येईल. तर प्रस्तुत प्रसंगी आपण हा परमप्रिय गुरूचा वियोग स्वस्थ मनाने व धैर्याने सहन करू आणि त्याने उपदेशिलेल्या सत्यधर्मरूपाने आम्हापाशी तो सर्वदा आहे असे कल्पून स्वतःच्या आचरणाचे नियमन करू.'

याप्रमाणे आपल्या धर्मबांधवांचे समाधान करून तो आनंदास म्हणाला, 'तू कुशीनगरातील मल्लास जाऊन सांग की, बुद्धगुरूचे देहावसान झाले. त्यांच्या

अंत्यविधीच्या संबंधाने तुम्हास काही विशेष व्यवस्था करणे असेल तर ती अवश्य करा.' आनंदाने मल्लास ही स्वगुरूच्या मरणाची वार्ता कळविली. तेव्हा त्यास पराकाष्ठेचे वाईट वाटले. त्यांनी लागलीच आपल्या सेवकांकरवी शेकडो पुष्पहार, उंची वस्त्रे, सुगंधी द्रव्ये आणि नानाप्रकारची वाद्ये मिळविली आणि ही सामग्री घेऊन ते त्या राईमध्ये आले. मग त्यांनी बुद्धाच्या देहाचे दहन एखाद्या मोठ्या सार्वभौम राजाप्रमाणे केले.

बुद्धाचा देह चितेवर जळत असता त्याच्या शिष्यांनी आपले प्रेमोद्‌गार अनेक प्रकारे काढीले. सर्वात महत्त्वाचा उद्‌गार एका शिष्याचा होता. तो म्हणाला, 'हे धर्मबांधवहो, आमच्या परमश्रेष्ठ गुरूच्या जडदेहाचा याप्रमाणे विलय तर झाला; परंतु त्याने आम्हास उपदेशिलेले सत्य आमच्या हृदयात वास करीत असून ते आम्हास पापापासून निवृत्त करील. तर आता आमचे काम मिळून इतकेच आहे की, आमच्या ह्या परमपूज्य धर्मगुरूने मनुष्यजातीच्या कल्याणासाठी जसा सदय बुद्धीने आमरण अविश्रांत उद्योग केला, तद्वत आम्हीही करणे उचित होय. आपण आज असा दृढ संकल्प करू की, देहात प्राण आहेत तोपर्यंत सर्वत्र हिंडून एकंदर मनुष्यजातीस सत्यचतुष्ट्याचा व अष्टविध धर्ममार्गाचा बोध करावयाचा आणि सारे मानव बुद्धधर्माचे अनुयायी होऊन मोक्षाचे अधिकारी होतील असे करावयाचे.'

बुद्धाची मरणवार्ता सर्वत्र पसरून एकंदर शिष्य समुदायास मोठे दुःख झाले हे येथे सांगावयास नको. कारण त्यांच्यावर एकंदर शिष्यजनांचे निस्सीम प्रेम होते. त्याच्या धर्माचा प्रसार त्याच्या मरणसमयी निरनिराळ्या आठ राज्यांमध्ये झाला होता. ह्या राज्यातील राजांनी आपले वकील पाठवून त्याचे चिताभस्म मिळविले आणि ते आपापल्या राज्यात ठेवून त्यावर मोठमोठे बुरूज बांधिले. ह्या बुरुजाला संस्कृत नाव 'धातुगर्भ' व प्राकृत नाव 'दागोबा' असे आहे. (त्यांना चैत्य, स्तूप अशीही संबोधने आहेत.)

येथे गौतम बुद्धाचे चरित्र समाप्त झाले. यात त्याच्या आयुष्यामध्ये घडलेल्या बहुतेक गोष्टांचे निरूपण संक्षेपाने केले आहे. ते करिताना त्याने केलेल्या बोधाचा सारांश बहुतेक येऊन गेला आहे. तरी त्याच्या एकंदर धर्ममताचे सार व्यवस्थित रीतीने दिल्याने वाचकांस ते विशेष ग्राह्य होईल असे वाटल्यावरून ते पुढील भागात देण्याचे योजिले आहे. ते वाचल्याने आर्यधर्माशी कोणत्या बाबतीत बुद्धधर्म सदृश-विसदृश आहे ते कळून येईल.

# भाग नववा

# बुद्ध धर्माचे संक्षिप्त निरूपण

गौतमबुद्ध जनास स्वसंमतधर्ममताचा बोध करावयास निघाला तेव्हा तो प्रारंभी आपल्या श्रोत्यांस सांगत असे की, मी काही नवे सांगण्याकरिता आलो नाही. जो पुरातन मानवधर्म मनुष्यांच्या अज्ञानामुळे बिघडून नामशेष झाला आहे, त्याचे संशोधन व पुनरुज्जीवन करण्याचा माझा संकल्प आहे. प्रारंभी उपोद्घातात दर्शविल्याप्रमाणे त्याने प्रचलित केलेले धर्ममत तत्कालीन अवांतर आर्यधर्ममतांपैकी एक असून त्यापासून ते फारच थोड्या गोष्टीत भिन्न होते. आर्यधर्मातील तात्त्विक व मानसशास्त्रासंबंधी बहुतेक विचार आर्यांच्या पूर्वकालीन तत्त्वपद्धतीत आढळतात. त्याचप्रमाणे त्याचा नीतिबोध आर्यांच्या ग्रंथातून पूर्वी नमूद झालेला आढळतो.

बुद्धाने विशेष केले ते एवढेच की, जो नीतिबोध इतस्तत: प्रकीर्ण स्थितीमध्ये होता, त्याचे एकीकरण करून त्यास विस्तृत व व्यवस्थित स्वरूप दिले आणि कित्येक नीतिसिद्धांताचे स्वरूप अंमळ उज्ज्वल केले. दुसरे असे की, त्याच्या पूर्वी होऊन गेलेल्या कित्येक मोठमोठ्या विचारी पुरुषाला जे नीतीचे व न्यायाचे सिद्धांत संमत झाले होते, त्यावरून अनुमित होणारे आचरणाचे नियम त्याने विहित केले. त्याच्यात आणि इतर धर्मबोध करणाऱ्या गुरूंमध्ये फरक काय तो इतकाच की, त्याला कळलेल्या सत्याप्रमाणे त्याने अत्यंत आस्थापूर्वक स्ववर्तन ठेवून इतरांस अज्ञानतमातून काढून सन्मार्गास लावण्याचा उद्योग केवळ परोपकारबुद्धीने आमरण चालविला. हा असा विशेष त्याच्या बोधात व आचरणात होता म्हणून तो त्या काळच्या ज्ञानसंपन्न ब्राह्मणास केवळ तिरस्काराई झाला होता असे वाटत नाही. कारण त्याचे मुख्य मुख्य शिष्य ब्राह्मण होते आणि त्याच्या भिक्षुसंघाचा आश्रय मोठमोठ्या विद्वान ब्राह्मणांनी केला होता. आता त्याचे मत जे की, मनुष्य अत्यंत हीन मानिलेल्या किंवा अत्युच्च मानिलेल्या जातीचा असला तरी तो निर्वाणप्राप्तीच्या मार्गाचा सारखाच अधिकारी आहे असे समजावे. त्यामुळे त्या वेळच्या कर्मठ अभिमानी ब्राह्मणास त्याचे म्हणणे अमान्य होणे स्वाभाविक होते. त्याचप्रमाणे बुद्धाने कर्मकांडाचा अधिक्षेप करून प्रत्येक मनुष्यास ह्या जीवितात सदाचरणाच्या योगाने स्वमोक्ष साधता येण्यासारखा

आहे असा जो सिद्धांत स्थापित केला. तो ब्राह्मणधर्माभिमान्यास कदापि मान्य होण्याजोगा नव्हता. हे एक निराळ्या प्रकारचे धर्ममत आहे असा त्यांचा अभिप्राय आहे, यास्तव ह्या मताच्या अनुयायांचा तिरस्कार, द्वेष किंवा छळ करण्याकडे त्या काळच्या लोकांची प्रवृत्ती झाली नाही. अशोक राजा होऊन गेल्यावर पुष्कळ काळ लोटल्यानंतर बुद्ध धर्म बराच बिघडून गेला. तेव्हा त्याच्या अनुयायांचा इतर लोक द्वेष करू लागले. सारांश काय की, बुद्ध धर्म आर्य धर्मापासून उद्‌भवला असून आर्यावर्तामध्ये तो पुष्कळ काळपर्यंत निर्वेधपणे नांदला. याचे कारण त्यातील बहुतेक सारी तत्त्वे आर्यलोकांमध्ये पूर्वकाली निर्माण झालेल्या इतर धर्ममतांतून व तत्त्वपद्धतीतून घेतली होती. हे पुढील निरूपणावरून अभिज्ञ वाचकांच्या ध्यानात येणारे आहे.

बुद्धधर्माचे ग्रंथ पुष्कळ आहेत. त्यात इतर धर्मग्रंथांमध्ये कालभेदाने व स्थलभेदाने पुष्कळ फेरफार झाले आहेत. मागे सांगितलेलेच आहे की, बुद्धाने स्वत: किंवा त्याच्या हयातीत त्याच्या कोणाही शिष्याने त्याचा धर्मबोध लिहून ठेवला नव्हता. तरी त्याने पुष्कळ वर्षे हयात राहून स्वशिष्यांस व इतर जनांस स्वसंमतधर्ममताचा बोध केला असल्याकारणाने त्याच्या एकंदर बोधास तो जिवंत असताच चांगले व्यवस्थित स्वरूप आले होते. फार काय; पण त्याने आपल्या धर्मबोधास आरंभ करण्यापूर्वीदेखील सतत मनन करून आपल्या मनाशी स्वमताची बरीच सुसंगत व्यवस्था त्याने लाविली होती आणि पुढे पंचेचाळीस वर्षे एकसारखा बोध करीत असता त्याला जो अनुभव आला व लोकांच्या मनातल्या ज्या शंका त्याला पदोपदी समजल्या त्याच्या योगाने त्याला आपल्या मताचा बहुतेक अंश सुसंगत व दृढ करिता आला. तो धर्मसिद्धांताचे निरूपण व्यवस्थित भाषणे पुन्हा पुन्हा करीत असे आणि त्याचे शिष्य त्याच्या प्रत्येक वचनाचे पाठांतर स्वत: सद्‌भावपूर्वक करीत असत आणि इतरांकडून करवीत असत. त्याचे कित्येक शिष्य मोठे विद्वान असून त्यांची बुद्धिमत्ता व स्मरणशक्ती वाखाणण्यासारखी असे. यास्तव त्याचा धर्मबोध ताडपत्रादिकावर लिहून ठेवला नव्हता, तरी त्याच्या शिष्यांच्या स्मृतिरूपपटावर तो उत्तमप्रकारे ठसलेला राहिला. पुढे इ.स.पूर्वी ४७७ ते बुद्धाचे देहावसान झाले तेव्हा त्याच्या काश्यपादी कित्येक शिष्यांनी आपल्या धर्मबांधवांपाशी अशी गोष्ट काढिली की, आपल्या गुरूने आपणास जो धर्मबोध करून ठेविला आहे त्याचे स्मरण आपणास कितपत आहे ते समजण्यासाठी सर्व भिक्षूंनी एकत्र जमून तो परस्परास पाठ म्हणून दाखवावा. ही गोष्ट सर्वांस मान्य होऊन बुद्धाचे

मुख्य मुख्य पाचशे शिष्य राजगृहनगरीत जमले आणि त्यांनी विनय आणि धर्म ह्या दोन अंगातील सिद्धांताची आवृत्ती करून पाठभेद व न्यूनाधिक भाग याची सर्वांच्या विचाराने व्यवस्था लाविली. हे बुद्धाच्या मागून जमलेले पहिले भिक्षुमंडळ होय. ह्यानंतर पुन्हा शंभर वर्षांनी म्हणजे इ.स.३७७ या वर्षी वैशाली येथे दुसरे भिक्षुमंडळ जमले. हे मंडळ जमविण्याचे कारण असे झाले की, कित्येक भिक्षूंनी संघाच्या वागणुकीच्या नियमांत काही फेरबदल केल्यावरून त्यांच्यामध्ये वाद उपस्थित झाला. ह्या वादाचा निर्णय लावण्यासाठी सातशे भिक्षू वैशाली येथे जमले होते. ह्या मंडळाचा परिणाम असा झाला की, ह्यावेळी बुद्धाच्या अनुयायांमध्ये दुफळी होऊन त्याचे दोन निरनिराळे पंथ झाले. ह्या मंडळाच्या वेळी पुन्हा बुद्धधर्ममताचे परस्पर पठन व संशोधन झाले असे म्हणतात. फुढे इ.स.पूर्वी २४२ साली अशोक राजाने पुन्हा एक वेळ भिक्षूचे मंडळ पाटणा येथे भरविले. ह्या मंडळात बुद्धाच्या वेळापासून प्रचलित झालेल्या एकंदर धर्मसिद्धांताचे पुन्हा एक वेळा एकीकरण होऊन त्याची कायमची व्यवस्था ठरली. ह्या मंडळात जे धर्मसिद्धांत साक्षात बुद्धापासून उपदेशाद्वारे प्राप्त झाले होते त्याचीच केवळ स्थापना झाल्यामुळे ह्यावेळी हे ग्रंथ कायम ठरले ते बुद्धधर्माचे खरे प्रतिपादक आहेत, असा सर्व बौद्ध लोकांचा समज आहे. जे धर्मग्रंथ त्रिपिटक या नावाने प्रसिद्ध आहे. त्रिपिटकाचा 'तीन पेट्या' असा अर्थ आहे. पहिल्या पिटकाचे नाव सूत्रपिटक असे असून त्यात बुद्धाच्या तोंडचा बोध जशाचा तसा नमूद केला आहे. प्रसिद्ध धर्मपद (धम्मपद) म्हणून जो बौद्धांचा उत्कृष्ट नीतिबोधाचा ग्रंथ आहे त्याचा ह्या पिटकामध्ये समावेश होतो. ह्या पिटकात एकंदर पंधरा ग्रंथ आहेत. यातील काही ग्रंथांची भाषांतरे 'सेक्रेड बुक्स ऑफ दि ईस्ट' नामक प्रोफेसर मॅक्समुल्लरने प्रसिद्ध केलेल्या ग्रंथमालिकेत छापून निघाले आहेत. दुसऱ्या पिटकाचे नाव विनयपिटक असे आहे. ह्यात भिक्षू व भिक्षुणी यांच्या आचरणाचे नियमन करण्याकरिता अगदी बारीकसारीक गोष्टीच्या संबंधाचेसुद्धा नियम सांगितले आहेत. बुद्धाच्या हयातीतच त्यांच्या संघात सामील झालेल्या शिष्यांची संख्या फारच वाढल्यामुळे त्याने हे नियम वेळोवेळी विदित केले होते. ह्या पिटकामध्ये तीनच मुख्य ग्रंथ आहेत. यातील काही भागांचे भाषांतर इंग्रजीत झाले आहे. तिसऱ्या पिटकाचे नाव अभिधर्मपिटक असे असून यात तात्त्विक सिद्धांचे विवेचन आहे. यात एकंदर सात ग्रंथ आहेत. आता ह्या ग्रंथावर मोठमोठ्या टीका लिहिल्या असून शिवाय अवांतर पुष्कळ ग्रंथ निरनिराळ्या पंथांच्या अभिमान्यांनी स्वमतपुष्ट्यर्थ लिहिले आहेत. असो, या धर्मग्रंथात सांगितलेल्या काही गोष्टींचे सार येथे पूर्वसंकल्पानुरूप देऊ.

## तात्त्विक बोध

हे समग्र वस्तुजात कसे निर्माण झाले आहे याविषयी बुद्धधर्मात काही एक सांगितलेले नाही. हे विश्व अनादि आहे की आदि आहे? असा बुद्धाला कोणी प्रश्न केला असता त्याला त्याने उत्तर दिले नाही. उत्तर न देण्यात त्याचा अभिप्राय असा होता की, ह्या असल्या जिज्ञासेपासून जनाचे मुळीच हित होणे नाही. बुद्धधर्माचा असा सिद्धांत आहे की, हे सारे विश्व कार्यकारणनियमाने बद्ध आहे. मृत्यू, स्वर्ग व नरक असे ह्या विश्वाचे त्रिविध लोक असून ते सारे एकाच कार्यकारणनियमाने बद्ध आहेत. स्वर्गलोकामध्ये देव राहतात. मर्त्यलोकी असता केलेल्या सत्कर्मानुरूप त्यास ही दिव्य योनी प्राप्त झाली आहे; परंतु ह्या देवाचे जीवित अल्प असून कालेकरून त्याच्या लोकांचाही विलय व्हावयाचा. त्याचप्रमाणे नरकलोकी असत्कर्म करणारास जावे लागते; परंतु कालांतराने जीवमात्राच्या ज्या दुराचार प्रवृत्तीस्तव हा नरकलोक अस्तित्वात आला आहे त्याचे निर्मूलन झाले असता हा भयावह लोक विनष्ट होईल.

हे त्रैलोक्यरूप विश्व सर्वदा रूपांतर पावत असून त्याचा उद्‌भव व प्रलय पुन:पुन्हा व्हावयाचा; फरंतु तो कसा व्हावयाचा याचे ज्ञान मानवास अगत्य आहे. ज्या शक्तीच्या संयोगाच्या योगाने हे अनंत वैचित्र्य व भिन्नत्व विश्वामध्ये दृग्गोचर होत आहे, त्याचा कालेकरून वियोग होऊन सर्व एकरूप होणार. यास्तव मी स्वतंत्र भिन्न प्राणी आहे अशी जी मनुष्यमात्रांची कल्पना होय तीत बिलकूल तथ्य नाही. उदाहरणार्थ अशी कल्पना करा की, एखाद्या अत्युच्च मनोऱ्यावरून मनुष्य खाली भुईवरून वेगाने धावणारा रथ पाहत असता त्याच्या दृष्टीस काय पडते बरे? रथ, सारथी, अश्व आणि भूमी हे चतुष्ट्य केवळ भिन्न असता ते त्यास परस्परापासून निराळे असे मुळीच भासत नाही. तद्वत ह्या विश्वातील वस्तुजातीचे आहे. ते एकएक पाहिले असता कितीही भिन्न आहेसे वाटले तरी त्याचे सामग्र्येकरून अवलोकन केले तर ते परस्परास सोडून नाही; तर ते एकमेकास केवळ संलग्न आहे असे दिसेल. आता हा व्यक्तिभाव कसा उत्पन्न होतो म्हणाल तर बाल्यावस्थेमध्ये मनुष्याचे चित्त आदर्शवत असून त्यात बाह्य जगातील व्यापाराची प्रतिमा एकसारखी उमटत असते आणि त्यास असा भास होतो की, आपण ह्या विश्वाचे मध्य असून आपणाभोवती हे समग्र विश्व भाश्मण पावत आहे. असे होता होता त्याच्या ठायी भाश्ममूलक अहंवृत्ती उत्पन्न होते. ह्या अहंवृत्तीस्तव तो वासना व चिंता यास वश होऊन जीवितयात्रा चालवीत असतो. ऐहिक विषयाची

लालसा धरून त्याच्या प्राप्तीसाठी तो अहर्निश उद्योग करितो. हे विषय प्राप्त झाले असता त्याला सुखलाभ तर होत नाहीच; परंतु आणखी वासना आणि चिंता त्याच्या हृदयात उत्पन्न होतात. ह्याप्रमाणे सर्वदा वासनावश होऊन काहीतरी कल्पित भासमय कल्याणाच्या प्राप्तीसाठी तो झटत असतो. ह्या वासना आणि चिंता बहुतेक लोकांच्या ठायी नीचता व क्षुद्रता उत्पन्न करून त्यास तिरस्कारार्ह करून सोडितात. आता जे कोणी विशेष उच्चतर उद्देश मनात धरून त्याच्या सिद्ध्यर्थ कसोशीने उद्योग करितात ते केवळ असार वस्तूच्या मागे लागून विशेष दु:खाचे वाटेकरी होतात आणि त्यांची निराशा अधिकच कष्टप्रद होते.

आता मनुष्याच्या अंतर्बाह्य स्वरूपाचे वर्णन ते येणेप्रमाणे करीत : मनुष्य जडगुण, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान ह्या पाच स्कंधाचा बनला आहे.

१. जडगुण अठ्ठावीस प्रकारचे आहेत. त्याची नावे ही होत– चार महत्त्वे ˉ पृथ्वी, आप, तेज आणि वायू, पाच ज्ञानेंद्रिये – चक्षू, कार्य, घ्राण, रसना आणि देह, जड पदार्थाचे पाच गुण – रूप, शब्द, गंध, रुची, आणि सत्त्व, दोन लिंगे – पुल्लिंग आणि स्त्रीलिंग. तीन आवश्यक अवस्था – विचार, जीवित आणि अवकाश. मनोभाव प्रकट करण्याची दोन साधने – अंगविक्षेप आणि वाचा, प्राण्याच्या ठायीचे सात गुण– चपलता, स्थितिस्थापकता, स्थित्यनुवर्तिता, संयोगशीलता, स्थायिता, विलयप्रणवता आणि स्थित्यंतरशीलता.

२. वेदना सहा प्रकारच्या आहेत. इंद्रियास होणाऱ्या पाच वेदना आणि सहावी स्मृतीद्वारा मनास होणारी वेदना. आता ह्या सहा वेदना प्रिय, अप्रिय किंवा उपेक्षणीय असतात, म्हणून त्याचे एकंदर अठरा प्रकार होतात.

३. संज्ञा सहा प्रकारच्या आहेत. प्रत्येक वेदनेस अनुरूप अशी भावना चित्तात उत्पन्न होते. यास्तव सहा प्रकारच्या वेदनांपासून उद्भवणाऱ्या संज्ञाही सहा जातीच्या असणे स्वाभाविक आहे.

४. संस्कार बावन्न प्रकारचे आहेत. यातील काहीकांची नावे पूर्वोक्त वर्गातल्या कित्येक नावांशी सदृश असल्यामुळे पुनरुक्तिरूप भासतील; पण येथे त्याचा पुनरुल्लेख अंतर्गुणाचे द्योतन करण्यास्तव केला आहे असे समजावे. हे संस्कार येणेप्रमाणे होते– स्पर्श, वेदना, संज्ञा, चेतना, मनसीकरण, स्मृती, जीवनत्व, एकाग्रता, वितर्क, विचार, वीर्य, दृढनिश्चय, प्रीती, छंद, उपेक्षा, निद्रा, मांद्य, मोह, प्रज्ञा, लोभ, अलोभ, भय,

साहस, लज्जा, निर्लज्जता, द्वेष, अद्वेष, विचिकित्सा, विश्वास, भ्रम, शारीरिक प्रशांती, मानसिक प्रशांती, शारीरिक चापल्य, मानसिक चापल्य, शारीरिक मृदुता, मानसिक मृदुता, मानसिक सुनम्यता, शारीरिक सुनम्यता, शारीरिक कुशलता, मानसिक कुशलता, शारीरिक सरलता, मानसिक सरलता, वाणीची यथायोग्यता, कृतीची यथायोग्यता, आयुष्यक्रमाची यथायोग्यता, करुणा, मुदिता, ईर्षा, स्वार्थपरता, दुर्मुखता वृथाभिमान आणि मान.

५. विज्ञान हा शेवटचा स्कंध होय. हा संस्काररूप स्कंधाच्या पुरणार्थ योजिला आहे. याचे प्रकार प्रत्येक मनोभावाच्या योग्यायोग्यत्वानुरूप एकंदर नव्वद कल्पिले आहेत. त्याचे येथे निरूपण करू गेल्यास पुष्कळ जागा अडून ते समजल्याने बुद्धाच्या धर्ममताचे रहस्यज्ञान होण्यास मोठेसे साहाय्य होईल असेही नाही. यास्तव त्याचा उल्लेख अप्रस्तुत होय.

या स्कंधपंचकात एकंदर शारीरिक व मानसिक धर्माचा समावेश होतो. ह्यापैकी कोणताही स्कंध चिरस्थायी नाही. पहिला जड स्वरूपाचा स्कंध पाण्यावरील फेसाप्रमाणे असून, तो हळूहळू बनत जातो व शेवटी विलय पावतो. दुसरा वेदनाचा स्कंध पाण्यावर नाचणाऱ्या बुडबुड्यासारखा आहे. तिसरा संज्ञाचा स्कंध सूर्यकिरणामध्ये भासमान होणाऱ्या मृगजळासारखा आहे. चौथा जो मनाच्या आणि हृदयाच्या संस्काराचा स्कंध तो केळीच्या दांड्यासारखा मृदू आणि पोकळ आहे आणि पाचवा विज्ञानाचा स्कंध इंद्रजालवत केवळ भासरूप आहे.

आता हे जे पाच स्कंध सांगितले त्यातल्या कोणत्यासही आत्मा म्हणता येत नाही, असे त्रिपिटकामध्ये पुन्हा पुन्हा प्रतिपादन केले आहे. मनुष्याचा देह सर्वदा बदलत असून त्याचे इतर धर्मही एकसारखे बदलत असतात. हे धर्म अर्थात सजीव देहाचे व्यापार होत. हे व्यापार देहाच्या निरनिराळ्या इंद्रियांचा बाह्य वस्तूंशी संपर्क घडत असल्यामुळे उद्‌भवत असतात. हा बदल इतका अविरतपणे चालत असतो की, लागोपाठ दोन पळातली मनुष्याची स्थिती सदृश असत नाही आणि त्याच्या ठायी काही शाश्वत अव्यय असे तत्त्व मुळीच नाही. अर्थात मनुष्य देहामध्ये आत्मा आहे असे मानणे भ्रममूलक होय. मनुष्यास जन्म, जरा, मृत्यू, दु:ख, शोक, पीडा, खेद आणि निराशा ह्या ज्या अनिष्ट गोष्टींचा अनुभव घडतो त्याची चार उपादाने सांगितली आहेत. त्यापैकी एक आत्मा. म्हणून काही शाश्वत तत्त्व मनुष्याच्या ठायी आहे असे

मानणे हे होय. आत्म्याचे अस्तित्व बुद्धाने अनेक उदाहरणे देऊन असिद्ध ठरविले आहे. त्याचप्रमाणे ईश्वरकल्पनाही केवळ निराधार आहे असा त्याचा जनास स्पष्ट बोध आहे.

मरणोत्तर आत्मा राहतो ही कल्पना बुद्धाने असिद्ध ठरविली आहे. तरी संसृताविषयी कल्पना त्याला मान्य असे. आर्यधर्मातील जे सिद्धांत त्याला असत्यसे वाटले त्याचा त्याने अव्हेर केला व जे असिद्ध ठरविता आले नाहीत त्याचा त्याने अंगीकार केला. ह्या जगामध्ये सुख-दुःख, सदाचार, अनाचार इत्यादी संबंधाने जे वैचित्र्य अनुभवास येते त्यांची मीमांसा संसृतीच्या योगाने जशी करिता येते तशी दुसऱ्या कशानेही करिता येत नाही. पूर्वजन्मी जशी कर्मे करावी तशी प्रस्तुत जन्मी स्थिती प्राप्त होऊन कृतकर्माचे फल भोगावे लागते आणि या जन्मी केलेल्या कर्माचे फल पुढे भोगावे लागणार, हा आर्यलोकांचा संसृतीविषयक सिद्धांत बुद्धास संपूर्णपणे संमत होता.

आता बुद्धधर्मास आत्म्याचे अस्तित्व मान्य नसल्याकारणाने एक वेळ मृत झाले की जीव पुन्हा निर्माण होतो कसा ते त्यात स्पष्टपणे सांगितले आहे. या त्याच्या मतास 'कर्म' अशी पारिभाषिक संज्ञा आहे. त्याचा सारांश येणेप्रमाणे आहे : जिवंत प्राणी मृत्यू पावताच त्यास त्याच्या कर्मानुरूप सुखमय किंवा दुःखमय देह प्राप्त होतो. हा नूतन देह त्यास तृष्णेमुळे प्राप्त होतो. देहाच्या इंद्रियाचा बाह्य जगातील वस्तूशी संपर्क होऊन वेदना उत्पन्न होतात. ह्या वेदनेच्या योगाने उत्पन्न झालेली वासना तृप्त करण्याची इच्छा उत्पन्न होते. या इच्छेला 'तृष्णा' ही पारिभाषिक संज्ञा आहे. ह्या तृष्णेमुळे इच्छातृप्तीच्या विषयाची लालसा उत्पन्न होते. या लालसेला उपादान ही संज्ञा आहे. या तृष्णामूलक उपादानामुळे नूतन जन्म प्राप्त होतो. हा जो नूतन देह प्राप्त होतो ती पूर्वोक्त स्कंधाचा समुच्चयरूप होय. पूर्वीच्या स्कंधसमुच्चयाने जन्मस्थान, स्वभाव आणि भाव स्थिती ही निश्चित होतात. आता हा निश्चय होतो कसा याविषयी बौद्धधर्मात काही एक सांगितलेले नाही.

हे परमरहस्य केवळ अज्ञेय गूढ आहे. याप्रमाणे जगात जो सुख-दुःखाचा अनुभव घडतो त्याच्या मुळाशी पूर्वसंचित म्हणजे मागल्या जन्मी केलेले कर्म आहे. यास्तव ते निमूटपणे सहन करावे. त्याबद्दल देवास किंवा दैवास दोष देत बसू नये. देव व दैव ह्याविषयीच्या कल्पना केवळ निराधार होत. सर्वकाही विवक्षित कारणाचे परिणाम आहेत. ही कारणे आपल्या कर्मापासून उद्‌भवतात. हा कार्यकारणभाव संबंध सर्वत्र

अबाधित आहे. त्यात कोणाच्यानेही फेरबदल करवणार नाही. जसे ज्याने पेरावे तसे त्याला फल प्राप्त होते. मनुष्यास ह्या जीवितात दु:ख, पीडा, निराशा ही जी प्राप्त होतात त्याचे कारण अर्थात असे की, त्याने पूर्वजन्मी आपले आयुष्य मूर्खपणात, भाश्मात व पापाचरणात घालविले असते. आता मरणोत्तर आत्मा राहत नाही तर हा पेरणारा तोच पुढे फलभोक्ता कसा संभवतो? या शंकेचे समाधान ते असे करीत की, देहावसान होते तेव्हा मनुष्य ज्या स्कंधाचा बनलेला असतो त्याचे नियोजन झाले तरी कृती, वाणी आणि विचार यापासून उद्भवणारा परिणामसमुच्चय, ज्यास कर्म असे म्हणावयाचे, तो नाश पावत नाही. हे त्याचे मत आधुनिक शास्त्रसिद्ध शक्तीच्या अविनाशित्वाशी समान आहे. ह्या कर्माची निष्कृती कोणाच्यानेही करवणार नाही. त्याचे बरेवाईट फल मनुष्यास अवश्य भोगिले पाहिजे. हा कृतकर्मपरिणामसमुच्चय सर्वदा एकत्र संलग्न राहतो आणि अंती ह्या परिणामसमुच्चयानुरूप नूतन जीव निर्माण होतो.

आता ह्या परिणामसमुच्चयात व तदनुसार प्राप्त होणाऱ्या गुणसमुच्चयात फेरबदल झाला तरी त्याचे तत्त्व, त्याचे अस्तित्व, त्याचे कर्तृत्व व त्याचे कर्म याच्या संबंधाने तो एकरूप होय. ह्याप्रमाणे प्रत्येक जीवाने जन्मजन्मांतरी केलेल्या पापपुण्यानुसार त्यास गती प्राप्त होते. तरी त्याचे सत्त्व कायम राहून त्याची क्रमाक्रमाने उन्नती व्हावयाला लागते. तरीपण पूर्वजन्मी आपली स्थिती कशी होती याची स्मृती त्यास असत नाही. ही अशी खऱ्या बोधाची दृढ भावना झाल्याकारणाने तो आपले वर्तन शुद्ध राखण्यास झटतो. ऐहिक जडविषयाधीन सुखाचा हव्यास तो सहसा धरीत नाही. इंद्रियतृप्तीच्या विषयापासून तो मोठ्या विग्रहाने निवृत्त राहतो. ह्याप्रमाणे जीवाची जाणीव विराम पावली तरी त्याने केलेला सदाचार कायम राहतो आणि ह्या सदाचाराच्या प्रवाहाने त्याची विपत्ती उत्तरोत्तर कमी कमी होत जाते. इहलोकी किंवा परलोकी सुख प्राप्त होईल या आशेने जे जन कर्मपर होतात ते केवळ भ्रांत होत. अहंभाव हा भ्राममूलक होय. मनुष्य ज्या तत्त्वाचा बनला आहे. ती काही अनंत काळ एकत्र राहणारी नव्हेत. ह्या तत्त्वाच्या संबंधाने त्याच्या ठायी ममत्व असल्याकारणाने तो पापकर्मास प्रवृत्त होतो आणि पापामुळे दु:ख उद्भवते. यास्तव मनुष्याने सुखानुभवाची लालसा सोडावी. ही लालसा अज्ञानमूलक असून मनुष्यास पापात पाडते आणि पापामुळे विपत्ती उत्पन्न होते. यास्तव बुद्धधर्माचा जनास असा बोध आहे की, ह्या विश्वात काही एक शाश्वत टिकणारे नाही. समग्र विश्व केवळ चल आहे. सर्वकाही एकसारखे व्यापार पावत

आहे. जी जी शारीरिक किंवा मानसिक गोष्ट आपण पाहतो ती इतर वस्तूप्रमाणे नष्ट होणारी आहे. आपण जे काही केले, बोललो व मनात आणले त्याचा एकंदर परिणाम मात्र कायम राहावयाचा. यास्तव आपली क्रिया, वाणी आणि मन ही शुद्ध ठेवावी. सर्वांवर दया करावी. सदोदित विवेकशील असावे. अहर्निश जागरूक राहून सर्व प्रकारच्या भ्रामापासून मुक्त राहावे आणि बुद्धाने उपदेशिलेल्या धर्ममार्गाचे दृढ निश्चयाने अवलंबन करावे. असे केल्याने आनंद आणि शांतीही प्राप्त होऊन आपण निर्वाणाचे अधिकारी होऊ. आता हा धर्ममार्ग कोणता ते पाहू.

१. दु:ख, दु:खाचे कारण, दु:खाचे निवारण आणि दु:खाचे निर्मूलन करण्याचा मार्ग यासंबंधाने बुद्धाने चार सत्यसिद्धांत स्थापित केले आहेत. ते येणेप्रमाणे होत–

व्यक्तिमात्रास प्राप्त होणारे जन्म, पाच स्कंध, जरा, रोग, मृत्यू, अनिष्ट गोष्टींचा संपर्क आणि इष्ट गोष्टींचा वियोग व तृष्णेची अतृप्ती या साऱ्या स्थिती विपत्ती व दु:ख यांनी युक्त आहेत.

२. वेदनांच्या योगाने लालसा आणखी उद्दीपित होते. या लालसेच्या योगाने चित्तास व्यामोह होऊन अहंभाव आणि जीवितप्रीतीही उद्‌भवतात. यामुळे प्राप्त विषयात सुख वाटू लागते किंवा मनात उत्पन्न झालेल्या लालसेची तृप्ती करण्याविषयी उत्कट इच्छा उत्पन्न होते. या उत्कट इच्छेस तृष्णा अशी संज्ञा आहे. ही तृष्णा वृद्धी पावून विषयासक्ती, आमुष्मिक जीविताची इच्छा किंवा ऐहिक संसाराविषयीची प्रीती उत्पन्न होते. ही तृष्णा सर्व दु:खाचे मूळ आहे. (ही तृष्णा पंचेंद्रियास घडणाऱ्या वेदनानुसार किंवा स्मृतीच्या योगाने उत्पन्न होणारी असल्यामुळे ती सहा प्रकारची आहे. आता ही प्रत्येक प्रकारची तृष्णा वरती सांगितल्याप्रमाणे तीन तऱ्हांनी उद्‌भवणारी असल्याकारणाने अठरा जातीच्या तृष्णा बाह्य किंवा अंतर्यामीच्या असल्याकारणाने तिचे छत्तीस प्रकार झाले. पुन्हा ही छत्तीस प्रकारची तृष्णा भूत, वर्तमान आणि भविष्य अशा तीन काळासंबंधाने होणारी असल्यामुळे एकंदर १०८ प्रकारची तृष्णा झाली आणि अर्थात इतक्या प्रकारे ती मनुष्याच्या विपत्तीस कारण होत असते.)

३. ही तृष्णा निर्मूलन होऊन जीवितप्रीती नष्ट झाल्याचे दु:ख आणि विपत्ती ही नाहीशी होतील. बुद्ध म्हणतो की, जो कोणी ह्या तृष्णेचा उच्छेद करितो त्याची विपत्ती कमलिनीच्या पत्रावरील उदरबिंदूवत दूर होऊन तो निर्वाणाचा अधिकारी होईल.

४. ही तृष्णामूलक विपत्ती नाहीशी करण्याचा एकच उत्कृष्ट मार्ग आहे. तो अर्थात असा की, मनुष्याने आपले आयुष्य विवेकाने व नीतीने घालवावे. हा सन्मार्ग अष्टविध असून त्याची चार पदे आहेत. सन्मार्गाचे आठ प्रकार येणेप्रमाणे आहेत. योग्य समजुती, योग्य संकल्प, योग्य भाषण, योग्य वर्तन, चरितार्थ, योग्य उद्योग, योग्य जागरूकता, योग्य मनशीलता आणि शांती.

आता ह्या सन्मार्गाची चार पदे आहेत, त्याचे कथन करितो.

१. हे सन्मार्गावलंब पुढील उपायांनी घडते. (१) सज्जनसहवास, (२) धर्मबोध श्रवण, (३) चित्त सत्यज्ञानाने सुप्रकाशित होऊन उत्पन्न होणारा विवेक आणि (४) नित्याचरण. ज्या मनुष्याचे चित्त पालटले नसते तो अज्ञ, पापिष्ट, द्रोहवश आणि अपवित्र असतो; परंतु सदरील सांगितलेल्या उपायांचे अवलंबन करून ज्याला पूर्वोक्त सत्यचतुष्ट्याचे ज्ञान प्राप्त होते, त्याची चित्तवृत्ती पालटून त्याला प्रथमपद प्राप्ती होते. या पदी त्याचा प्रवेश झाल्यावर तो क्रमाक्रमाने पुढील गोष्टींपासून मुक्त होतो : (१) अहंभावमूलक मोह, (२) बुद्ध आणि त्याचे धर्मसिंद्धात याविषयी शंका (३) धर्मविधी आणि आचार यापासून काही तरी लाभ आहे अशी भ्राममूलक समजूत. ह्या प्रथमपदप्राप्तीचे महत्त्व धर्मपदामध्ये असे केले आहे की, ही स्थिती ह्या भूमंडळावरील सार्वभौम राज्याहून किंवा स्वर्गप्राप्तीहून चांगली आहे.

२. पूर्वोक्त प्रकारे चित्ताचा योग्य पालट होऊन ज्याच्या मनातील सर्व संशय विनष्ट होतो व अहंभाव विगलित होऊन कर्मकांडावरून ज्याचा विश्वास सर्वस्वी उडतो, तो प्राप्त विषयलालसा, द्वेषबुद्धी व भ्रामक समजुती यापासून हळूहळू निर्मुक्त होत जातो आणि अशी त्याची स्थिती झाली म्हणजे त्याला द्वितीयपद प्राप्त झाले असे समजावे. अशा मनुष्याची ह्या भूलोकी आणखी एक वेळ पुनरावृत्ती व्हावयाची.

३. द्वितीय पदप्राप्तीनंतर मनुष्याच्या चित्तात इंद्रियसुखाविषयी जी अल्पस्वल्प लालसा शेष राहिलेली असते, तिचे निर्मूलन होऊन परद्वेषबुद्धी विनष्ट होते आणि मग त्याच्या ठायी स्वत: विषयीची क्षुद्र बुद्धी आणि इतरांविषयी कोणत्याही प्रकारची दुर्वृत्ती मुळीच वसत नाही. अशी त्याची वृत्ती झाली म्हणजे त्याचे ह्या लोकी पुनरागमन होत नाही. ह्या अवस्थेस तृतीयपद म्हणावयाचे.

४. ह्याप्रमाणे तृतीयपद प्राप्त झाल्यावर मूर्त किंवा अमूर्त स्थितीमध्ये राहण्याविषयीची इच्छा ज्याच्या चित्तातून निर्मूल होते आणि अहंकार, आत्मपवित्रता आणि अविद्या

ह्यापासून ज्याची मुक्तता होते त्याला चतुर्थप्राप्ती घडते. ह्या स्थितीत पावलेल्या मनुष्यास अर्हत अशी संज्ञा आहे.

या चौथ्या पदास पोचलेला मनुष्य सर्व भ्रामापासून मुक्त असतो. ह्या संसारातील एकंदर वस्तूंची वास्तविक योग्यता तो जाणत असतो. त्याच्या ठायीच्या सर्व दुर्वासांचे निर्मूलन झाल्या कारणाने, त्याच्या ठायी योग्य प्रकारचे स्वप्रेम वसत असते, पदांविषयी करुण आणि आदरबुद्धी त्याच्या चित्तात वसत असतात. सर्व प्राणिमात्रांविषयी अत्युन्नत प्रकारचे आध्यात्मिक प्रेम त्याच्या चित्तात उद्‌भवलेले असते. माता जशी निष्कपट प्रेमास वश होऊन स्वपुत्राचे रक्षण करण्यास आपले प्राणही वेचण्यास उद्युक्त होते तद्वत तो एकंदर जीवांविषयी सद्‌बुद्धी वागवितो. ही त्याची अवस्था एक वेळ कायम होऊन चिरस्थायी झाल्याने त्याची चित्तवृत्ती इहलोकी केवळ अप्रतिम होते.

ह्या ज्या चार अवस्था सांगितल्या त्यामध्ये मनुष्य क्रमाक्रमाने दहा बंधक गोष्टींचा उच्छेद करितो. त्या दहा गोष्टी येणेप्रमाणे होत – ममत्वमूलक मोह, विचिकित्सा, कर्मपरता, कामना, द्वेषबुद्धी ऐहिक जीवन– प्रीती, स्वर्गजीवनप्रीती, अहंकार, आत्मपावित्र्य आणि अविद्या. ह्यापैकी पहिली पाच बंधने पूर्णपणे तुटली म्हणजे बुद्धधर्मानुयायी पुरुष अर्हत होऊन चतुर्थपदास पावतो आणि बाकीची पाच बंधने तुटली म्हणजे तो अवेक बनतो. ही अवस्था त्याला प्राप्त झाली म्हणजे त्याच्या चित्ताचा सारा व्यामोह विगलित होऊन त्याच्या विपत्तीचा सर्वस्वी अंत होतो. ह्या स्थितीस पावलेल्या मनुष्यास निर्वाण प्राप्त होते.

आता निर्वाण म्हणजे काय ते पाहू. याचा शब्दश: अर्थ पाहिला असता मालवणे, नायनाट होणे असा आहे. हा नायनाट अर्थात आत्म्याचा नव्हे हे येथवर केलेल्या निरूपणावरून वाचकांच्या लक्षात येईलच. कारण आत्मा आहे असे बुद्धमतात सांगितलेले नाही. तर हा नायनाट केवळ मनाच्या आणि हृदयाच्या लालसांचा म्हणजे अर्थात तृष्णेचा होतो. ह्या तृष्णा आहेत तोपर्यंत कर्मांच्या गूढ नियमानुसार पुन्हा पुन्हा जन्म प्राप्त होतात. आता हे तृष्णानिर्मूलन मनाची आणि चित्ताची तृष्णास प्रतिकूल अशी स्थिती ज्या मानाने होते त्या मानाने हळूहळू होत असते; चित्ताची स्थिती तृष्णास अत्यंत प्रतिकूल होऊन जेव्हा त्यात कोणत्याही तृष्णास बिलकूल थारा मिळत नाही तेव्हा मनुष्यास निर्वाण प्राप्त झाले असे म्हणावयाचे. ह्यावरून पाहता निर्वाण म्हणजे चित्ताची निष्पाप, स्थिर व शांत स्थिती होय; म्हणजे अर्थात पूर्ण

पवित्रता समजावयाची. बौद्ध लोक या स्थितीचे वर्णन असे करितात की, तीत पूर्ण शांती, पूर्ण चांगुलपणा आणि पूर्ण ज्ञान यांचा अनुभव घडतो. ही स्थिती प्राप्त झाली असता संचित आणि प्राक्तन यांचा अंत होऊन कर्मापासून पूर्ण निर्मुक्तता होते. पूर्ण निष्पाप अवस्था प्राप्त होऊन व्यक्तिनिष्ठत्व नष्ट होते. उपादान म्हणजे क्लेश आणि तृष्णा यांचा पूर्ण अभाव होऊन केवळ ज्ञानमय अवस्था प्राप्त होते. आता ही अशी परम कैवल्याची अभीष्ट स्थिती अर्हतपदास पावलेल्या मनुष्यास जिवंत असताच प्राप्त होण्याचा संभव असतो. ह्या स्थितीचा अनुभव त्याला पूर्वकर्मानुसार प्राप्त देहामध्ये घडत असतो. आता जे क्रियामाण प्रस्तुत देहामध्ये घडते त्यापासून मात्र तो अलिप्त राहतो. देहात प्राण आहे तोपर्यंत हे क्रियामाण चालू राहावे हा कर्माचा नियम आहे; पण त्यापासून त्यास पुनरपि बंधन घडत नाही. हा निर्वाणविषयक सिद्धांत बौद्ध लोक पुढील समर्पक दृष्टांताने विशद करितात. जीविताची तुलना हे पणतीत पेटविलेल्या दिव्याशी करितात. एक पेटलेली पणती असली म्हणजे तिच्या योगाने जसे हवे तितके दिवे पेटविता येतात, तद्वत एक जीव असला म्हणजे त्यापासून दुसरे अनेक जीव उत्पन्न होतात. जर हा मूळचा दिवा नसेल तर दुसरे दिवे पेटणार नाहीत. आता हा दिवा तेलावाचून जसा राहणार नाही तसे हे एकएक व्यक्तीचे जीवित ऐहिक वस्तूविषयीची लालसा व चित्तातील पापप्रवृत्ती यावर अवलंबून असते. आता पणतीमध्ये तेल नसेल तर दिवा राहणार नाही; पण तो लागलीच मालवणार नाही. वातीने जे तेल ओढून घेतलेले असते, त्यामुळे तो काही वेळ जळत राहून मग मालवेल. त्याचप्रमाणे जो अर्हत पदवी म्हणजे अर्थात पूर्णत्व पावला त्याच्या ठायीच्या सर्व वृत्तीचा व शक्तीच ऱ्हास झाल्यावरही तो प्राक्तनरूप क्रियामाण आहे तोपर्यंत जिवंत राहील आणि ते आटोपले म्हणजे तो पुन्हा स्वतंत्र व्यक्तिरूपाने अस्तित्वात येणार नाही. जसा दिवा विझला म्हणजे त्याच्या योगाने दुसरा पेटविता येत नाही, तसे अर्हताचे जीवित आटोपले म्हणजे त्यास दुसरे जीवित प्राप्त होत नाही.

## नीतिबोध

आजपर्यंत बुद्धधर्माचे जे गौरव होत आहेत आणि त्याचे उत्कृष्टत्व जे अभिज्ञ जनास भासत आहे; त्याचे कारण पाहू जाता बुद्धाच्या नीतिबोधाच्या उज्ज्वल स्वरूपात सापडणारे आहे. ह्या बोधाचे थोडेसे स्वरूप बुद्धाच्या चरित्रात प्रसंगानुरूप व्यक्त झालेच आहे; परंतु त्यांचे एकीकरण येथे साररूपाने केले असता त्याची वास्तविक

उज्ज्वलता वाचकांच्या ध्यानात येण्यासारखी आहे असे वाटल्यावरून त्याचे तेथे अगदी संक्षेपाने कथन करितो.

प्रकृत निरूपणाच्या सोयीसाठी बुद्धाच्या नीतिबोधाचे आम्ही येथे तीन वर्ग कल्पिले आहेत. एका वर्गातील नीतिबोध सर्व लोकांस सामान्येकरून लागू होणारा आहे. दुसऱ्या वर्गातला उपदेश बुद्धाच्या संसारी अनुयायांसाठी आहे आणि तिसऱ्या वर्गातला उपदेश त्याच्या संघास सामील होऊन भिक्षुदीक्षा धारण करणाराच्या आचरणाचे नियमन करण्यासाठी आहे. त्याचे आता यथाक्रम दिग्दर्शन करू.

## सर्वसाधारण नीतिबोध

एका विद्वान ब्राह्मणाने बुद्धास वास्तविक सौख्यप्राप्तीचा मार्ग कोणता असे एके प्रसंगी विचारिल्यावरून त्याने येणेप्रमाणे बोध केला – 'सौख्यप्राप्तीची लालसा धरून अनेक लोकांनी अनेक गोष्टी सौख्याच्या साधक आहेत असे कल्पिले आहे. माझ्या मते सौख्यप्राप्तीचा मार्ग कोणता ते सांगतो. श्रवण करा : मूर्खाची परिचर्या करू नये तर शहाण्याची सेवा करावी. जे माननीय असतील त्यांचा मनोभावे मान ठेवावा. चांगले रम्य स्थल पाहून तेथे निवास करावा. अहर्निश सत्कर्म करावे. चित्ताच्या ठायी सद्वासना धरावी. धर्माचे वास्तविक रहस्य समजून घेण्याचा प्रयत्न करावा. मन चांगले सुसंस्कृत करावे. सर्वदा आत्मनिग्रह करावा. भाषण मधुर व आनंदजनक असावे. जे काही बोलावयाचे ते चांगला विचार करून रुचेल असे बोलावे. मातापितरांचा प्रतिपाळ करावा. पत्नी व पुत्र यांचे संगोपन करावे. काहीतरी शांततेचा उद्योग स्वीकारून चरितार्थ चालवावा. गरिबास दानधर्म करावा. सर्वदा न्यायानुवर्तन करावे. स्वकीय जनास प्रसंगोपात्त यथाशक्ती साहाय्य करावे. कोणी कदापि दोष लावणार नाहीत अशा कृती कराव्या. पापभय बाळगावे. पापकर्मापासून सर्वथा निवृत्त राहावे. मद्यपान कदापि करू नये. परोपकृतीस कधीही त्रासू नये. सर्वांशी आदरबुद्धीने व नमाश्तेने वर्तावे. सदोदित समाधानवृत्ती धरावी. पराने यत्किंचितही उपकार केला असता त्याबद्दल कृतज्ञता प्रकट करावी. धर्मोपदेश श्रवणात सर्वदा नियमित काळ दवडावा. केवढेही संकट प्राप्त झाले तरी धैर्याने राहावे. चित्तवृत्ती कदापि उद्दाम होऊ देऊ नये. जे विवेकबलेकरून नित्याचरणाने प्रशांत झाले असतील अशा महात्म्याच्या सन्निध राहण्यास झटावे. धर्मज्ञ पुरुष प्रसंगोपात्त धर्मबोध करितील त्याचं श्रवण करण्याची संधी कदापि व्यर्थ जाऊ देऊ नये. आपली कोणतीही मनोवृत्ती किंवा वासना उच्छृंखल

झाली असता तिचे दमन प्रयत्नाने करावे. चित्त, वाचा व क्रिया सर्वकाळ परम पवित्र राखण्याचा प्रयत्न करावा. या संसारातील कठीण प्रसंग प्राप्त झाले असता ज्याचे चित्त किंचित डगमगत नाही, तर ते शोक व खेद यापासून निर्मुक्त राहते, त्यास निर्वाणप्राप्ती सुलभ होते. सारांश काय की, जे कोणी माझ्या ह्या बोधाप्रमाणे स्ववर्तन ठेवितात ते कोठेही गेले तरी त्यास कशाचीही भीती नाही. शत्रूची त्यास मुळीच पर्वा उरणार नाही, तर ते जिकडे जातील तिकडे त्याची फत्तेच होईल.'

दुसऱ्या एका प्रसंगी बुद्धाने ऐहिक ऐश्वर्याची नश्वरता व असारता स्थापित करून पुढीलप्रमाणे संबोध केला.

'जो मनुष्य अन्य जनाशी वर्तन करविताना सर्व प्रसंगी मनोनिग्रह, मर्यादशीलता, दया व करुणा याचे निदर्शन करितो, त्याला मात्र खऱ्या ऐश्वर्याचे संपादन घडते असे म्हणावयाचे. वडधनाचा निधी जेथे साठवून ठेवावा तेथला एक तर कोणीतरी चोरून, लुबाडून नेईल अशी भीती असते, नाही तर तो जेथला तेथे ठेवून अंती देह सोडून जावे लागेल; फरंतु सदाचाररूप उत्कृष्ट धननिधी मनुष्याने किती संग्रहित केला तरी त्यास चोराचे किंवा अन्य कशाचेही भय नाही आणि अंतकाळी तो त्याला आपल्या बरोबर नेता येतो. यासाठी सज्जन पुरुषांनी सत्कर्म करण्यात स्वजीवित वेचावे म्हणजे त्यास वास्तविक सुखधारक असे ऐश्वर्य प्राप्त होईल.'

धर्मपद (धम्मपद) म्हणून एक उत्कृष्ट नीतिबोधाचा ग्रंथ आहे. त्यातून काही निवडक उतारे देऊन हे सर्वसाधारण बोधाचे प्रकरण संपवितो.

ह्या संसारामध्ये द्वेषाने द्वेष नष्ट होत नाही, तर दुसऱ्याच्या चित्तातील द्वेषाचे निवारण प्रेमाने होते, असा नियम आहे. ज्या झोपडीचे छप्पर चांगले नसते त्यातून जसे पर्जन्याचे पाणी खाली गळते, तद्वत ज्याचे चित्त सुशिक्षित नसते त्याच्या ठायी दुर्वृत्तीचा प्रवेश होतो. मूर्खजन असार वस्तूच्या पाठीस लागतात; कारण ते भाशंत झालेले असतात; परंतु जे ज्ञाते असतात ते सत्त्वशीलपणाचा अवलंब मन:पूर्वक करितात; कारण यातच त्याला सर्व ऐश्वर्याचा ठेवा आहे असे वाटते. असार वस्तूच्या प्राप्तीसाठी यत्न करण्यात घालविलेले जीवित व्यर्थ गेले म्हणून समजावे यास्तव ग्राम्य विषयसुखात रममाण होण्याची हाव सहसा धरू नये. सत्त्वशीलता आणि विवेकशीलता याच्या योगाने वास्तविक आनंद प्राप्त होतो. जो पुरुष सत्त्वशील असतो त्याची असार गोष्टीकडे प्रवृत्ती कदापि होत नाही. अशा पुरुषाचे ज्ञानरूप महागिरीच्या अत्युच्च

शिखरावर आरोहण होऊन तो खालील मूर्खजनाच्या व्यवसायाकडे अलिप्तपणे पाहतो. ज्ञाता पुरुष प्रत्येक सत्कृत्य आस्थापूर्वक करितो. अज्ञ जनाप्रमाणे जो निष्काळजी असतो. अन्य जन अज्ञानरूप निद्रेस वश झाले असता ते सर्वदा जागृत राहून आपली उन्नती साधितात. आपले चित्त अनावर, चंचल आणि उच्छृंखल असते. यास्तव त्याचे दमन करणे उचित होय. ज्याच्या चित्ताचे दमन झालेले असते त्यास खऱ्या सुखाचा अनुभव घडतो. ज्याच्या चित्तात दुर्बुद्धी वसत असते, तो आपल्या शत्रूशी वैर करून अधिकच शत्रुत्व वाढवितो, आपणावर रागावणारांवर उलट रागावून तो क्रोधाची अधिक वृद्धी करितो. ह्याप्रमाणे तो दुर्बुद्धीच्या योगाने अधिकाधिक अनर्थ जगात वाढवितो. मधुमक्षिका पुष्पाला कोणत्याही प्रकारे न दुखविता किंवा त्याचा रंग व सुवासही न बिघडविता त्यातून मधू तेवढे ग्रहण करून जशी निघून जाते, तद्वत ज्ञात्याने या भूतलावर आयुमर्यादा आहे तोपर्यंत वसती करून निघून जावे.

दुसरे कोठे चुकतात किंवा कोणती कर्तव्ये करीत नाहीत हे ज्ञात्याने पाहत बसू नये, तर आपल्या हातून कोणती कर्तव्ये घडत आहेत व कोणती अद्यापि घडावयाची राहिली आहेत, हे मनःपूर्वक पाहून तद्नुरूप स्ववर्तनाचे नियमन करावे.

पुष्पाचा बाह्य आकार कितीही सुंदर असला तरी ते सुगंधयुक्त नसल्यास जसे व्यर्थ होय, तद्वत एखाद्या मनुष्याच्या ठायी बोधपटुत्व असून जर तो स्वकृत बोधानुसार स्ववर्तन ठेवीत नाही तर त्याचा तो उत्तम बोध केवळ विफल होय. आता ज्या पुष्पाची आकृती सुंदर असून जे सुगंध व सुरंग यांनीही युक्त असते, ते जसे आल्हादप्रत असते, तद्वत जो मनुष्य स्वतःच्या उपदेशानुसार स्ववर्तन ठेवण्यास अहर्निश झटत असतो त्याच्या मुखावाटे निघणारा सुबोध श्रोतृजनास चित्तावर चांगला ठसतो.

पापकर्माचे फल प्राप्त झाले नसते तोपर्यंत मूर्खास त्यात मोठे सुख आहे असे वाटते; परंतु ते पापकर्म यथाकाळी फलद्रूप झाले म्हणजे त्यास विपत्ती व दुःखही प्राप्त होऊन त्याखाली तो अगदी दडपून जातो.

एकदा मनुष्य युद्धभूमीवर पराक्रम करून सहस्त्रावधी जनांवर विजय मिळवील; परंतु तो काही मोठा विजयी नव्हे. जो स्वचित्ताचा जय करितो तो सर्वश्रेष्ठ विजयी होय. मनुष्याने पापाविषयी बेदरकार राहू नये. ते आपल्या चित्तात सर्वस्वी ग्रासणार नाही असे त्याने मनात मानू नये. एक-एक उदकबिंदू पडत राहिला तरी जसे पात्र कालेकरून भरून जाते, तसे थोडे थोडे दुष्कर्म करता करता मूर्खाचे चित्त सर्वस्वी

पापमग्न होते. जोपर्यंत मनुष्याचे चित्त क्रोध, द्वेष व अज्ञान यांनी सर्वदा दग्ध होत असते तोपर्यंत त्यास आनंद व सुखही कसे प्राप्त व्हावे? हे अज्ञानतमग्रस्त जनहो, तुम्ही ज्ञानप्रकाशाची का बरे प्राप्ती करून घेत नाहीत.

जो दुसऱ्यास उपदेश करण्यात उद्युक्त होईल त्याने प्रथमत: स्ववर्तन सुधारावे. ज्याने स्वचित्ताचे दमन केले असता त्याला स्वबोधबलेकरून इतरांच्या चित्ताचे दमन करता येईल. दुसऱ्यास उपदेश करण्याचे काम सोपे आहे; परंतु स्वतःची सुधारणा करण्याचे काम महादुर्घट आहे.

एकदा मनुष्य पहिल्याने प्रमत्त असून पुढे सत्त्वशील झाला असता त्यामुळे अभ्राशतून बाहेर पडलेल्या चंद्राप्रमाणे तो जनास प्रकाशप्रद होतो.

जो मनुष्य नीतिनियमाचे उल्लघंन करतो, सर्वदा असत्य भाषण करितो, परलोक प्राप्तीची अवहेलना करितो, त्याच्या हातून घडणार नाही असा एकही अनाचार नाही.

जे आपला द्वेष करितात त्याचा आपण कदापि द्वेष करू नये. द्वेष-मत्सरादिकांनी युक्त अशा ह्या जनामध्ये आपण त्या वृत्तीपासून निर्मुक्त होत्साने नांदावे, तरच आपली ही जीवित यात्रा सुखाने होईल.

ऐहिक विषयांच्या ममत्वाचा त्याग करू तरच आपण सुखाचे अधिकारी होऊ.

एका मनुष्याने दुसऱ्यावर विजय मिळविला असता त्या दुसऱ्याच्या मनात विजयी मनुष्याविषयी द्वेष उत्पन्न होतो. यास्तव कलह टाळून आपण सर्वदा शांतचित्त होऊ. जयापजयाची आपण कदापि पर्वा करू नये.

अनिष्ट प्रकार पाहून उद्‌भवणारा क्रोध ज्याला आवरता येतो, तोच ह्या देहरूप रथाचा खरा सारथी. इतरांच्या हाती लगामा असल्या तरी त्या केवळ व्यर्थ होत.

मनुष्याने क्रोधाविष्ट मनुष्यास दयेने वश करावे; अपकार करणारास उपकाराने वश करावे; कृपण मनुष्यास औदार्याने वश करावे; असत्य भाषण करणारास सत्याने वश करावे.

सत्य बोलावे, क्रोधवश होऊ नये. आपल्यापाशी अगदी थोडे असले तरी त्यातून दुसऱ्याने याचना केली असता थोडेसे द्यावे.

जे कर्तव्यकर्मापासून पराङ्‌मुख होतात आणि असत्यकर्मास प्रवृत्त होतात, जे अभिमानी व आळशी असतात, त्यांची भाशंतावस्था उत्तरोत्तर वृद्धीच पावते.

अमुक मनुष्य जातीचा किंवा उच्च जातीचा आहे हे त्याचा जन्म कोणत्या जातीत झाला आहे हे पाहून ठरवू नये, तर त्याच्या हातून नीच कर्म घडत असल्यास त्याला हीन जातीचा म्हणावे व त्याच्या हातून सत्कर्म घडत असल्यास त्याला उच्च जातीचा म्हणावे.

दुसऱ्या एका बोधसूत्रामध्ये पुढीलप्रमाणे बोध केला आहे.

क्रोध, उन्माद, दुराग्रह, स्वमताभिमान, वंचकत्व, मत्सर, आत्मस्तुती, परनिंदा, गर्व, पिशुनत्व इत्यादी दुर्गुणांच्या योगाने मलिनता प्राप्त होते, मांसभक्षणाने प्राप्त होत नाही. मांसमत्स्य भक्षणापासून निवृत्ती, दिगंबरवृत्ती, मुंडन, जटाधारण, मलिन वस्त्रपरिधान, होमहवन इत्यादिकांच्या योगाने भाशंत जनास पवित्रता प्राप्त होत नाही.

वेदाध्ययन, ब्राह्मणतर्पण, देवतार्पण, शीतोष्णदिकांच्या योगाने देहदंडन करणे किंवा अशाच दुसऱ्या तपश्चर्या अमरत्व प्राप्त होण्याकरिता करणे, यापासून भाशंत जनास पवित्रता प्राप्त होत नाही. ग्राम्यसुखलालसेपासून निवृत्त राहा. मनाचा सत्संकल्प सोडू नका.

अपरिमित हास्यविनोदादिकांमध्ये आसक्त होऊ नका. नृपादिकांच्या अप्रयोजक कथा सांगण्यात किंवा श्रवण करण्यात कालाचा अपव्यय करू नका. शोक, क्षोभ, वंचन, दंभ, लोभ, हेवा, द्वेष, कठोरत्व आणि अज्ञान यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करा.

उठा, बसते राहा, स्वस्थ घोरत पडण्यात काय फल आहे? शोकरूप बाणांनी जे विव्हल झालेले असतात त्याला कोठून निद्रा प्राप्त व्हायला? आलस्य व प्रमत्तता यांच्या योगाने चित्तास मलिनता प्राप्त होते.

ह्या सार्वत्रिक बोधाचा उल्लेख येथे पुरा करू. हा असा नीतिबोध बौद्धग्रंथामध्ये पुष्कळच आहे. त्या सर्वांचे एकीकरण केले असता एक मोठा ग्रंथ होईल. असो. आता बुद्धाने स्वधर्मानुयायी संसारी जनांकरिता जे नीतिनियम घालून ठेविले आहेत त्याचे येथे साररूपाने कथन करितो.

## धर्मानुयायी संसारी जनास बोध

बुद्धानुयायी संसारी जनांनी कोणत्या प्रकारे वर्तन करावे असे एका प्रसंगी कोणी विचारल्यावरून बुद्धाने पुढीलप्रमाणे बोध केला -

गृहस्थाश्रम्याने कोणाही प्राण्याच्या जीवितास नाश कदापि करू नये किंवा कोणाकडून तो करवू नये किंवा जे कोणी असले हिंसाकर्म करण्यास प्रवृत्त होतील त्यास आपली

संमती देऊ नये. इतकेच नव्हे तर त्याने कोणाही प्राण्याला कदापि दुखवू नये. कधी कोणाची चोरी करू नये. जे कोणी इतरांच्या वित्तादिकांचा अपहार करितील त्यांच्या त्या दुष्कर्मास संमती देऊ नये.

व्यभिचारकर्म सर्वदा वर्जावे. हे कर्म अत्यंत घोर आहे असे समजावे. जो कोणी ह्या दुष्कर्मास प्रवृत्त होईल तो अग्निकुंडात पतन पावला म्हणून समजावे. ज्याला ब्रह्मचर्यव्रत पाळण्याचे सामर्थ्य नसेल त्याने त्या व्रताचे व्यर्थ स्तोम माजवून व्यभिचारकर्मास प्रवृत्त होऊ नये. राजदरबारी किंवा न्यायकचेरीत साक्ष वगैरे देण्याचा प्रसंग आला असता कदापि असत्य बोलू नये किंवा खोटी साक्ष देण्याचे कोणास उत्तेजन वगैरे देऊ नये. सर्व प्रकारचा खोडसाळपणा टाकावा.

ज्याला सदाचरण करावयाचे आहे त्याने मद्यपान कदापि करू नये किंवा दुसऱ्यास कैफी मद्य पाजू नये. त्याचप्रमाणे जे कोणी मद्यसेवन करीत असतील त्यांचे ते करणे पसंत ठरवू नये. कारण मद्यपानाच्या योगाने उन्माद होऊन मनुष्य वेडा होतो. ज्याला मद्याचे व्यंजन लागते त्याच्या हातून अनन्वित कर्मे घडतात. एक मद्यपी असला म्हणजे त्याच्या संगतीने दुसरे मद्यपी होतात. ह्याप्रमाणे मद्याच्या व्यसनाचा प्रसार होऊन मनुष्यजातीमध्ये दुष्कर्म, उन्मत्तता आणि अज्ञान यांची वृद्धी होते.

उपवसथनामक व्रत स्वशिष्यांनी पाळावे असा बोध बुद्धाने एके दिवशी केला त्याप्रसंगी त्याने सदरील सांगितलेल्या पाच आज्ञांचा उल्लेख करून आणखी दुसऱ्या तीन आज्ञा विहित केल्या. ह्या आठ आज्ञा येणेप्रमाणे होत.

१) प्राणनाश करू नये. २) चौर्यकर्म करू नये. ३) असत्य भाषण करू नये. ४) मद्यपान करू नये. ५) व्यभिचार करू नये. ६) रात्रीस अमेव्यवहार करू नये. ७) पुष्पमाला व सुगंधी द्रव्ये यांचे सेवन करू नये. ८) नृत्य, गायन, वादन व नाट्यही ऐकू किंवा पाहू नयेत.

या नियमांपैकी पहिले पाच सर्व बौद्धमतानुयायी जनांनी अवश्य पाळले पाहिजेत आणि बाकीचे तीन ज्याच्याने पाळवतील त्याने पाळावे.

दुसऱ्या एका स्थळी बुद्धाने बुद्धधर्मानुयायांस दहा गोष्टी पापरूप अतएव निषिद्ध आहेत असे म्हटले आहे. त्या दहा गोष्टी ह्या होत – प्राणनाश, चौर्य, व्यभिचार, असत्य, पिशनुता, अपशब्द, व्यर्थप्रलाप–लोभ, द्वेष आणि नास्तिक्य. ह्या पातकांच्या स्पष्टीकरणार्थ पुष्कळ ऊहापोह बुद्धधर्मग्रंथात केला आहे. पहिली नऊ पातके आहेत

याविषयी कोणाचाही वाद नाही व त्याचे स्वरूप सर्व नीतिशास्त्रज्ञांस विदितच आहे. तेव्हा त्याबद्दल येथे विशेष लिहिण्याची आवश्यकता नाही. आता नास्तिक्यादिवमीचे स्पष्टीकरण मात्र बौद्धलोकांनी कसे काय केले आहे त्याचा उल्लेख येथे करितो. जे कोणी बुद्ध व त्याने वहित केलेला धर्म याविषयी अश्रद्धा दर्शवितात, जे कोणी सदाचार व त्याचे परिणाम याविषयी अश्रद्धा प्रकट करितात, पुनर्जन्म, कृतकर्मानुसार प्राप्त होणाऱ्या भोगाविषयी ज्यांच्या मनात संशय असतो त्याला नास्तिक म्हणावयाचे, असा बुद्धधर्माचा सिद्धांत आहे.

एके प्रसंगी बुद्ध नित्यक्रमाप्रमाणे भिक्षा मागावयास चालला असता त्याच्या दृष्टीस एक गृहस्थ पडला. तो स्नान करून ओल्या वस्त्रानिशी हात जोडून उभा राहिला आणि त्याने चार दिशांना व स्वमध्य आणि अधोबिंदू याला नमन केले. बुद्धाने त्याची ही कृती पाहून त्याला असे करण्याचे प्रयोजन विचारिले. त्या गृहस्थाने उत्तर केले – 'मजवर काही अनिष्टपात होऊ नये म्हणून माझ्या पितरांचे ह्याप्रमाणे मी सातवन करीत असतो. ह्या सहाही दिशांकडून मजवर अनिष्ट प्रसंग येऊ नयेत म्हणून मी हे असे सहा दिशांना नमन करीत असतो. हे ऐकून बुद्धाने त्याला असा बोध केला की, 'ह्या सहाही दिशांकडून तुला अनिष्ट प्राप्त होऊ नये असे वाटत असल्यास तुझ्या सभोवतालील मनुष्यांशी त्वा नीतीने वर्तावे; पूर्वेस नमन करण्याऐवजी त्वा आपल्या मातापितरांशी खऱ्या पुत्रधर्माने वर्तावे; दक्षिण दिशेस नमन करण्याऐवजी आपल्या गुरूशी शिष्यधर्माने वर्तावे; पश्चिम दिशेस नमन करण्याऐवजी आपल्या बायकामुलासंबंधाची आपली कर्तव्ये करावी; उत्तर दिशेस नमन करण्याऐवजी आपल्या इष्टमित्रसंबंधाची कर्तव्ये बजवावी; स्वमध्यास नमन करण्याऐवजी जे कोणी ब्राह्मण किंवा श्रमण धर्मपरायण असतील त्यांच्याशी योग्य रीतीने वर्तावे; अधोबिंदूस नमन करण्याऐवजी आपल्या सेवक व आश्रित जनांच्या संबंधाची कर्तव्ये करण्यास चुकू नये.'

ह्याप्रमाणे त्या गृहस्थास बोध करून बुद्ध परत विहारात आल्यावर ह्या सहा प्रकारच्या कर्तव्याचा उपदेश त्याने आपल्या गृहस्थाश्रमी शिष्यांस येणेप्रमाणे केला.

## १. मातापितरे व बालके यांची कर्तव्ये :

मातापितरांची कर्तव्ये ` १. मातापितरांनी आपल्या बालकास दुराचारास प्रवृत्त होऊ देऊ नये. २. त्यांच्या ठायी सदाचार प्रवृत्ती उत्पन्न होईल असे त्यास शिक्षण द्यावे. ३. त्यास उपयुक्त कला व विद्या शिकवाव्या. ४. त्यांचा यथाकाली विवाहसंबंध जुळवून द्यावा. ५. स्वार्जित वित्ताचा लाभ त्यास होईल अशी तरतूद करावी.

**बालकांची कर्तव्ये –** १. बालकांनी आपल्या मातापितरांचा प्रतिपाल करावा, कारण त्यांनी त्यांचे लहानपणापासून संगोपन केलेले असते. २. बालकांनी आपल्या मातापितरासंबंधाची सर्व कर्तव्ये मनापासून करावीत. ३. त्यांनी आपल्या मातापितरांच्या वित्ताचे रक्षण करावे. ४. त्यांचे आपण योग्य वंशज आहो असे स्वतःच्या आचरणाने त्यांनी दाखवावे. ५. ती गत झाल्यावर त्याचे स्मरण प्रेमपूर्वक व आदरपूर्वक राखावे.

## २. गुरूशिष्यांची कर्तव्ये :

**शिष्यांची कर्तव्ये –** १. शिष्यांनी गुरू दृष्टीस पडले असता उठून उभे राहावे. २. त्यांची परिचर्या करावी. ३. त्यांची आज्ञा पाळावी. ४. त्यांस लागेल ती वस्तू पुरवावी. ५. त्यांनी केलेला बोध लक्षपूर्वक श्रवण करावा.

**गुरूंची कर्तव्ये –** १. जेवढे काही चांगले असेल तेवढे सारे गुरूंनी स्वशिष्यास शिकवावे. २. प्राप्त ज्ञानाची उपस्थिती त्यास चांगली राहिलसे करावे. ३. नाना विद्या आणि कला त्यास पढवाव्या. ४. त्यांच्या स्नेह्यांकडे आणि इष्टमित्रांकडे त्यांची तारीफ करावी. ५. त्यांच्यावर कोणतेही संकट न येईलसे करावे.

## ३. पती–पत्नीची कर्तव्ये :

**पतीची कर्तव्ये –** १. पतीने आपल्या पत्नीशी आदरपूर्वक वर्तावे. २. तिजवर त्याने माया करावी. ३. तिजशी एकपत्नीव्रताने वर्तावे. ४. अन्य जन तिचा मान ठेवितील असे करावे. ५. तिला योग्य वस्त्राभरणे द्यावे.

**पत्नीची कर्तव्ये –** १. पत्नीने आपल्या पतीची गृहव्यवस्था योग्य प्रकारे ठेवावी. २. त्याच्या इष्टमित्रांचा परामर्श चांगल्या प्रकारे करावा. ३. त्यांच्याशी पतिव्रताधर्माने वर्तावे. ४. त्याने मिळवून आणलेल्या द्रव्याचा विनियोग काटकसरीने करावा. ५. तिला जी जी गृहकृत्ये करावयाची असतात, ती तिने कुशलतेने आणि उत्साहाने करावीत.

## ४. मित्र व सोबती यांची कर्तव्ये :

**थोर पदवीच्या पुरुषांची कर्तव्ये –** १. थोर पदवीच्या पुरुषाने आपल्या मित्रास वारंवार पारितोषिके व नजराणे देऊन साहाय्य करावे. २. त्याने त्यांच्याशी मोठ्या अदबीने भाषण करावे. ३. त्यांच्या कल्याणासाठी झटावे. ४. ते आपल्या बरोबरीने आहेत असे समजावे. ५. आपल्या ऐश्वर्याने त्यास विभागणी करावे.

**अन्य जनांची कर्तव्ये –** १. अन्य जनांनी आपल्या थोर पदवीच्या मित्राकडून एखादे भलतेच काम गैरसावधपणामुळे होऊ लागले असता त्याचे त्यापासून निवारण करावे. २. तो स्ववित्ताविषयी बेफिकीर असला तरी त्याच्या वित्ताचा नाश होऊ देऊ नये. ३. त्याच्यावर एखादे संकट आले असता तो त्यात न सापडेल असे करावे. ४. त्याच्यावर एखादी महाविपत्ती आली असता त्यास सहसा सोडून जाऊ नये. ५. त्याच्या कुटुंबातील मनुष्यावर प्रीती करावी.

## ५. धनी व सेवक यांची कर्तव्ये :

**धन्यांची कर्तव्ये –** १. त्यांच्या मगदुराप्रमाणे त्यास कामे नेमून द्यावीत. २. त्यास योग्य वेतन व अन्नही द्यावे. ३. ते आजारी झाले असता त्यांची जोपासना करावी. ४. घरात उत्तम पक्वान्ने केली असता ती त्यास यथेच्छ खाऊ द्यावी. ५. त्याला कधी कधी सुटीचा दिवस द्यावा.

**सेवकांची कर्तव्ये –** १. धन्याला पाहून सेवकांनी उठून उभे राहावे. २. धनी निजल्यावर त्यांनी निजावे. ३. धन्याकडून जे काही मिळेल त्यात त्यांनी संतुष्ट राहावे. ४. धन्याचे काम त्यांनी उत्साहाने व बरोबर करावे. ५. त्यांनी त्याच्याशी आदरपूर्वक बोलावे.

## ६. गृहस्थ व धर्मपरायण जन यांची कर्तव्ये

**गृहस्थांची कर्तव्ये –** १. सद्गृहस्थांनी धर्मपरायण जनांशी मोठ्या भक्तीने वर्तन करावे. २. त्यांच्याशी मोठ्या आदरशीलतेने बोलावे. ३. त्यांच्याविषयी मनात पूज्यत्वबुद्धी वसू द्यावी. ४. ते आपल्या घरी आले असता त्यांचा यथोचित आदरमान करावा. ५. त्याला ज्या काही ऐहिक वस्तूंची गरज लागेल त्या त्याला अवश्य पुरवाव्या.

**धर्मपरायण जनांची कर्तव्ये –** १. धर्मपरायण जनांनी संसारी जनाला दुराचारापासून निवृत्त करावे. २. त्याला योग्य उपदेश करून सदाचारी करण्यास झटावे. ३. त्याजवर माया करावी. ४. त्याला वारंवार धर्मबोध करावा. ५. त्यांच्या संशयाचा परिहार करावा. ६. त्यास स्वर्गाचा मार्ग दाखवून द्यावा.

याप्रमाणे बुद्धाने आपल्या शिष्यांस म्हणून जो बोध केला आहे, तो सर्वांना मान्य होण्यासारखा असून तद्नुसार वर्तन केल्याने इहलोकी सौख्य व कीर्ती यांचा लाभ

अवश्य होणार आहे. येथपर्यंत जे विवेचन केले आहे त्यावरून वाचकांच्या लक्षात हे येण्यासारखे आहे की, बुद्धाने आर्यधर्मात जे भोळसटपणाचे आणि अप्रयोजक प्रकार माजले होते ते निषिद्ध ठरविले किंवा त्याकडे दुर्लक्ष केले आणि त्यात जे नीतिसिद्धांत व सत्य गोष्टी सांगितल्या आहेत, त्यांचे स्वरूप उज्ज्वल करून व त्यात योग्य तेवढी भर घालून त्यांचा जनास आमरण बोध केला. बुद्धाच्या एकंदर बोधाचे सार मिळून इतकेच आहे की, मनुष्यांनी योग्य, सत्य व कल्याणप्रद असे ज्ञान प्राप्त करून तद्नुसार वर्तन करण्याचा दृढ संकल्प करावा आणि कष्ट करून मनोनिग्रह करण्यास झटावे आणि एकंदर प्राणिमात्रावर दया करावी व त्यास स्वशक्यनुसार साहाय्य करण्यास सर्वदा तत्पर असावे. असे केल्याने मनुष्यास परमसौख्य लाभण्यासारखे असून त्याच्या जीविताचे सार्थक्य ह्यातच आहे.

येथवर बुद्धकृत बोधाच्या दोन अंगाचे निरूपण संक्षेपत: केले. आता त्याचे तिसरे अंग जे त्याच्या धर्माची दीक्षा घेऊन भिक्षुवेश धारण करणाऱ्यांसाठी विहित केलेल्या आचरणनियमांचे, त्याचा येथे उल्लेख करणे क्रमसिद्ध आहे खरे. तथापि हे धर्माचरणनियम सार्वत्रिक हिताचे किंवा सर्व लोकांनी पाळण्यासारखे नसल्यामुळे त्यांचे येथे सार दिले नाही तरी चालेल असे वाटल्यावर तो भाग वगळला आहे. तरी हा त्याचा बोध कोणत्या प्रकारचा होता हे जाणण्याची ज्याला इच्छा होईल त्यांनी मागे धर्मसंस्थापना प्रकरणात जे ह्या बोधाचे थोडेसे दिग्दर्शन केले आहे ते व अंतकाळी त्याने आपल्या शिष्यास केलेल्या बोधाचे जे सार मागल्या भागात दिले आहे ते पाहावे.

# भाग दहावा

# बुद्ध धर्मप्रसाराचा इतिहास

## बुद्ध धर्मप्रसाराचा इतिहास

बुद्ध आणि त्याचे शिष्य ज्या प्रांतातून धर्मबोध करीत हिंडत असत व वर्षाकाळी ज्या नगरासन्निध विहारांमध्ये राहत असत, त्यांच्या नावावरून पाहता बुद्धाच्या हयातीत त्याच्या धर्माचे अनुयायी हिंदुस्थानच्या पूर्वेकडील प्रांतातच विशेषकरून झाले होते असे दिसते. मुख्यत्वेकरून काशी, कोसल आणि मगध ह्या प्रांतात त्याच्या धर्माचा प्रसार पुष्कळ झाला होता. शिवाय अयोध्या व बिहार ह्या प्रांतातही त्याचे अनुयायी पुष्कळ झाले होते. आता काही ग्रंथांच्या आधारावरून असे कळते की, बुद्धाचे शिष्य पश्चिमेकडील मुलखातही धर्मबोध करीत वेळोवेळी हिंडत असत. बुद्धाच्या अनुयायांसाठी मगध व कोसल या प्रांतातील बहुतेक मुख्य नगराजवळ आणि श्रावस्ती (साहेतमाहेत) व राजगृह (राजघर) ह्या राजधानीच्या नगराजवळ विहार बांधून दिले होते. स्वत: बुद्ध या नगरांजवळील विहारात कधी कधी येऊन राहत असे. बुद्धाचे देहावसान झाल्यावर त्याच्या शिष्यांनी स्वगुरुंचा धर्मोपदेशक्रम सतत चालविला होता; पण बुद्धानंतर त्याच्या धर्माचा प्रसार हिंदुस्थानातील आणखी कोणकोणत्या प्रांतात झाला ते कळत नाही.

बुद्धाच्या अनुयायांनी त्याच्या पश्चात तीन भिक्षुमंडळे जमविल्याची हकीकत मागल्या भागाच्या प्रारंभी दिलीच आहे. यापैकी तिसरे मंडळ अशोकराजाने भरविले होते असे तेथे सांगितले आहे. या मंडळानंतर अशोक राजाने दूरदूरच्या देशांत धर्मोपदेशक पाठवून बुद्धधर्माच्या प्रसारास पुष्कळ साहाय्य केले. या धर्माचा आज जो इतका प्रसार झाला आहे त्याचे मुख्य कारण या राजाचा व कनिष्क राजाचा या धर्मास पूर्ण आश्रय मिळाला हे होय.

अशोकराजा इसवी सनापूर्वी २६० सालाच्या सुमारास मगधदेशाच्या गादीवर बसला. हा चंद्रगुप्त नामक राजाचा नातू होता. सिकंदर बादशहाने इसवी सनापूर्वी ३२७ व्या वर्षी हिंदुस्थानावर स्वारी केली, त्यावेळी जे राजे त्याच्याशी युद्धसंग्राम करावयास गेले होते, त्यामध्ये या अशोकाचा आजा चंद्रगुप्त प्रमुख होता. ह्याने मगध

देशाचे राज्य नंदाचा पराभव करून घेतले. या नंदाने हे मगधदेशाचे राज्य बिंबिसारराजाच्या वंशजाकडून बळकाविले होते.

चंद्रगुप्त किंवा त्याचा पुत्र बिंबिसार हे बुद्धधर्मानुयायी नव्हते; फरंतु अशोकाने या धर्माचा स्वीकार करून त्यातील उपदेशाप्रमाणे आपले वर्तन आमरण ठेविले. यामुळे त्याच्या राज्यातील एकंदर लोक सुखी झाले. या राजाचा अंमल पुष्कळ प्रांतावर होऊन तो हिंदुस्थानाचा सार्वभौम राजा आहे अशी त्याची ख्याती दूरदूरच्या देशात पसरली. पश्चिमेस रशिया देशातील वोलगा नदीपासून तो पूर्वेस जपानपर्यंत आणि उत्तरेस सैबिरिया देशापासून तो दक्षिणेस सिंहलद्वीपापर्यंत असलेल्या एकंदर मुलखात त्याची कीर्ती पसरली होती.

याच्या वेळी कित्येक लबाड लोक भिक्षुवेश धारण करून आम्ही बुद्धाचे अनुयायी आहो असे सांगत फिरत आणि जनास वाटेल तो स्वकपोलकल्पित धर्मबोध करीत. यामुळे मूळ धर्माच्या शुद्ध स्वरूपात पुष्कळ घोटाळा होण्याची भीती उत्पन्न झाली. हा घोटाळा दूर करून सत्य धर्माचे शुद्ध स्वरूप कायम करावे असे मनात आणून अशोकाने इ.स.पूर्वी २४२ व्या वर्षी पूर्वोक्त तिसरे धर्ममंडळ पाटणा येथे भरविले. यावेळी एक हजार भिक्षू एकवट होऊन त्यांनी सर्व धर्मग्रंथाचे पुन्हा पठण करून पाठभेद व इतर व्यंगे नाहीशी करून त्यास कायमचे स्वरूप दिले. हे धर्ममंडळ नऊ महिने बसले होते. येथून पुढे बुद्धधर्मग्रंथात म्हणण्यासारखा फेरफार झाला नाही. शिवाय अशोकाने हे मंडळ भरण्यापूर्वी व नंतर अनेक शासने काढून त्यात बुद्धधर्माच्या मुख्य मुख्य सिद्धांतांचे निरूपण करून ती आपल्या साम्राज्यात चोहोकडे शिलावर कोरली. वायव्येस पेशावरापलीकडील युसफझाईच्या दरावीपासून पश्चिमेकडे काठेवाडापर्यंत आणि नागपूर व मध्यप्रांत यापासून पूर्वेस ओरिसापर्यंत हे शिलालेख आढळतात. आजपर्यंत हे अशोकाने कोरविलेले शिलालेख चाळीस सापडले आहेत. त्यापैकी तेरा मोठ्या विशाल शिलावर कोरिले आहेत. सतरा गुहात कोरिले आहेत आणि दहा स्तंभावर कोरले आहेत. अशोकाने असे एकंदर ८४००० शिलालेख स्तंभादिकांवर कोरले होते असे म्हणतात.

सदरी निर्दिष्ट केलेले मंडळ भरल्यानंतर अशोकाने काही कामगार बुद्धधर्माचे स्वरूप शुद्ध राखण्यासाठी व त्या धर्माच्या प्रसारास साहाय्य करण्यासाठी नेमिले. या धर्मखात्यावर एक मुख्य अमात्य नेमून त्याच्या हाती सर्व व्यवस्था दिली. त्याचे

कर्तव्य धर्मप्रसार करण्याचे असून ज्या लोकांमध्ये धर्मप्रसारक जातील त्यांची ऐहिक स्थिती सुधारण्याचे उपाय योजण्याचे होते. उत्तरेपासून तो तहत सिंहलद्वीपापर्यंत एकंदर रस्त्याच्या बाजूवर अशोकाने वृक्ष लाविवले आणि विहिरी व तळी खणविली. त्याने मनुष्यास व प्राण्यास औषधोपचाराच्या सोयी जागोजाग करविल्या. लोकांच्या घरगुती आचरणावर व लौकिक व्यवहारावर नजर ठेवण्याकरिता व स्त्रिया आणि तरुण जन यामध्ये ज्ञानाचा प्रसार करण्याकरिता त्याने कामगार नेमिले.

अशोकाने बुद्धधर्म प्रसारासंबंधाने जी शासने काढिली आहेत, त्यामध्ये त्याने धर्मप्रसारकास निक्षून सांगितले आहे की, त्यांनी स्वधर्मप्रसार केवळ शांततेच्या उपायांनी करावा. लोकांवर जुलूम असा सहसा करू नये. आपल्या धर्माची तत्त्वे लोकांस पुन्हा पुन्हा नीट समजून सांगून त्यांची मने वळवावी. भिन्न मताच्या लोकांचा तिरस्कार किंवा अवहेलना कदापि करू नये. आपले काय मत आहे ते शांतपणे व कोणास राग न येईल अशा रीतीत समजून सांगावे. या अशा सौम्य उपायांनी स्वधर्मप्रसार करण्याची स्पष्ट सूचना सर्व धर्मप्रसारकास केल्यामुळे त्याच्या जोरावर कोणाही धर्मप्रसारकाला अन्य धर्माच्या लोकांवर जुलूमजबरी करण्याचे धैर्य झाले नाही. शिवाय स्वत: बुद्धानेही स्वशिष्यांस असाच बोध केला होता. या कारणास्तव बुद्धधर्माच्या अनुयायांचे स्वधर्मप्रसारार्थ आजपर्यंत जे प्रयत्न होत आले आहे ते असेच शांततेचे व सौम्य आहेत.

अशोकाने आपल्या सामाशज्यामध्ये चोहोकडे जी शासने शिलादिकावर कोरविली होती म्हणून वरती सांगितले आहे, त्यातल्या चौदा शासनाकडे कोणकोणत्या गोष्टीचा उल्लेख केला आहे ते एका युरोपियन पंडिताने साररूपाने सांगितले आहे. त्याचा येथे अनुवाद केल्याने अशोकाने बुद्धधर्म प्रसारास कोणत्या प्रकारे साहाय्य केले ते वाचकांस कळून येईल. गोष्टी येणेप्रमाणे आहेत –

१) कोणत्याही प्राण्याच्या यज्ञाप्रीत्यर्थ किंवा खाण्यासाठी वध करण्याची मनाई.

२) मनुष्यास आणि पशूस औषधोपचाराचे साहाय्य मिळविण्यासाठी व्यवस्था.

३) प्रती पाच वर्षांनी बुद्धधर्मानुयायी जनाची मानसिक स्थिती कशी काय आहे ते पाहणे आणि धर्माच्या मुख्य नीतिसिद्धांताची त्यास सुनावणी करणे.

४) प्रजाजनांच्या पूर्वीच्या स्थितीची अशोकाच्या वेळच्या स्थितीशी तुलना.

५) निरनिराळ्या देशात जाऊन तेथल्या लोकांस धर्मबोध करून स्वधर्मबोधाची दीक्षा देण्याकरिता धर्मप्रसारकाची योजना आणि कोणकोणत्या देशात त्यास पाठवायाचे त्यांची नावे.

६) प्रजाजन सदाचरण करतात की नाही ते पाहून राजास वारंवार कळविण्यासाठी कामगारांची नेमणूक.

७) आपल्या प्रजाजनांचा सर्वांचा एकच धर्म व्हावा आणि परस्परांमधील उच्चनीच भाव नाहीसा होऊन सर्वांची समान योग्यता व्हावी अशा इच्छेचे प्रदर्शन.

८) मागल्या राजांच्या ग्राम्यविषयासक्तीशी अशोक राजाच्या पवित्राचरणाची तुलना.

९) नित्याचरणाने वास्तविक सुखाची प्राप्ती होण्यासारखी असून स्वर्गसुखाचीदेखील सिद्धी नित्याचरणानेच व्हावयाची असा मोठ्या कळकळीचा बोध.

१०) ऐहिक नश्वर वैभवाची असारता लक्षात आणून अशोक भावी शाश्वत सौख्याची अपेक्षा करतो या गोष्टीचा उल्लेख.

११) जनास सत्यधर्मपरायण व सदाचरण संपन्न करणे यासारखे पुण्यप्रद परोपकारकृत्य दुसरे कोणतेही नाही, ह्या सिद्धांताचे प्रतिपादन.

१२) अश्रद्धावान लोकांस उपदेश.

१३) या शासनाचा पुरा अर्थ कळत नाही. हे केवळ अंशरूपाने आहे.

१४) पूर्वीच्या सर्व शासनाचा सारांश.

पूर्वोक्त भिक्षुमंडळ भरविल्यानंतर अशोकाने ज्या निरनिराळ्या देशांत धर्मप्रसारक पाठविले. त्यांची नावे एका ग्रंथात दिली आहेत, ती अशी– काश्मीर, गांधार, महीस (म्हैसूर), वनवास (राजपुताना), अपरांतक (पंजाबचा पश्चिमेकडील भाग), महाराष्ट्र, यवनलोक (बाक्ट्रिया आणि ग्रीक लोकांची राज्ये), हिमवंत (हिमालयाच्या पलीकडील प्रांत), सुवर्णभूमी (ब्रह्मदेश) व लंका.

एका शासनामध्ये असे सांगितले आहे की, चोल (मद्रासकडील प्रांत), पांड्य (मुदरा), सत्यपुरा (सातपुडा पर्वताच्या आसपासचे मुलूख), केरल (त्रावणकोर), सिंहलद्वीप आणि सिरिआच्या अँडिओकसनामक राजाच्या अमलातील मुलूख इत्यादी देशातले राजे अशोकाच्या आज्ञा शिरसावंद्य मानून तदनुसार आपल्या मुलखांची व्यवस्था ठेवीत. दुसऱ्या एका शासनामध्ये अशोक असे प्रसिद्ध करतो की, त्याने सिरिआ, इजिप्त, मासिडोनिया, ऐपिरॉस आणि सिरीन अशा पाच ग्रीक राष्ट्रांमध्ये आपले वकील पाठविले होते.

अशोकाने आपला पुत्र महिंद्र यास बरोबर पुष्कळ धर्मप्रसारक देऊन इ. स. पूर्वी २४२ व्या वर्षी सिंहलद्वीपास पाठविले. ह्या महिंद्राचा आणि त्या बेटातला त्या काळचा राजा टिस्सा याचा धर्मसंबंधी विषयावर झालेला संवाद ग्रंथरूपाने आज उपलब्ध आहे. महिंद्राच्या मागून त्याची बहीण बरोबर पुष्कळ भिक्षुणींचा मेळा घेऊन ह्या बेटात गेली. ह्या दोघा बंधुभगिनींनी तेथे स्वसंमत धर्माचा पुष्कळ प्रसार केला. पाटणा येथील धर्ममंडळाने निश्चित केलेल्या धर्मग्रंथाचे अशोकाने मागधी भाषेत भाषांतर करविले. हे मागधी भाषेतील ग्रंथ महिंद्राने सिंहलद्वीपात नेले असा इतिहास आहे. ह्या वेळेपासून आजपर्यंत सिंहलद्वीपात बुद्धधर्म चालू आहे. दुसऱ्या धर्ममंडळाच्या वेळी बुद्धधर्मात दुफळी होऊन जे दोन पंथ झाले म्हणून मागे सांगितले आहे, त्यातल्या एका पंथास अशोकाचे साहाय्य मिळून तो शेवटी सिंहलद्वीपात वर सांगितल्याप्रमाणे जाऊन आजपर्यंत कायम राहिला आहे. ह्या पंथाच्या बौद्धास दक्षिणेकडील बौद्ध म्हणतात. असे सांगतात की, बौद्धधर्माच्या त्रिपिटकाच्या लेखी प्रती सिंहलद्वीपामध्ये इ.स.पूर्वी ८८ साली पाली भाषेमध्ये केल्या आणि पुढे इ.स.६४० सुमारास बुद्धघोष नामक एका महाविद्वान बौद्धाने ह्या धर्मग्रंथावर समीक्षा टीका केल्या. त्या दक्षिणेकडील सर्व बौद्धांस मान्य आहेत. हा बुद्धघोष मूळचा मगध देशात राहणारा ब्राह्मण असून पुढे त्याने बुद्धधर्म स्वीकारून सिंहलद्वीपास प्रयाण केले. तेथे त्याला राजाश्रय मिळून त्याने पूर्वोक्त टीका लिहिण्याचे काम दीर्घकाळ परिश्रम करून शेवटास नेले. हा बुद्धघोष पुढे इ.स.६५० ते दुसऱ्या काही उपदेशकांसहवर्तमान ब्रह्मदेशास गेला आणि तेथे त्याने बुद्धधर्माचा पुष्कळ प्रसार केला. ह्यापूर्वी पाटणा येथील मंडळानंतर काही धर्मप्रसारक ह्या देशात गेले असून त्यांनी पेगू प्रांतात स्वधर्मप्रसार केला होता असे ब्रह्मदेशाच्या प्राचीन दंतकथांवरून कळते. शिवाय ते तेथे अशोकाच्या वेळी गेले होते याचा पुरावा तेथल्या काही स्थळांवरूनही मिळतो.

सयामदेशात बुद्धधर्माचा प्रसार इ.स.६३८ मध्ये झाला. ह्या सुमारास जावा बेटामध्ये बुद्धधर्मप्रसारक थेट हिंदुस्थानातून गेले असून यांनी तेथे स्वधर्मप्रसार केला. ह्या बेटातून पुढे हा धर्म वाली व सुमात्रा ह्या बेटात प्रसार पावला असे म्हणतात.

याप्रमाणे बुद्धधर्माच्या दक्षिणेकडील पंथाचा प्रसार हिंदी महासागरातील बेटांमध्ये व ब्रह्मदेश व सयाम ह्या देशांमध्ये झाला. आता उत्तरेकडील पंथाचा प्रसार कोठे कोठे झाला ते थोडक्यात पाहू. उत्तरेकडील बुद्धधर्मपंथाचा प्रसार इसवी सनापूर्वी दुसऱ्या

शतकामध्ये हिंदुस्थानच्या वायव्येकडील भागात पुष्कळ झाला होता. काश्मीरचा राजा पुष्पमित्र ह्याने या बौद्धपंथाच्या लोकांचा पुष्कळ छळ मांडिला असता मेनन्दर (मिलिंद) नावाच्या एका ग्रीक राजाने पुष्पमित्राचा पुत्र अग्निमित्र, जो आपल्या बापाच्या मागून गादीवर बसला होता, त्याच्याशी भागीरथीच्या तीरी सामना करून त्याचा मोड केला. (इ.स.पूर्वी १५०) आणि आपली सत्ता भागीरथीच्या काठच्या बऱ्याच मुलखावर बसविली. ह्याप्रमाणे परद्वीपस्थ राजाच्या सत्तेत उत्तरेकडील बौद्ध गेले तरी त्यापासून त्यास काही एक अपाय घडला नाही. ह्या ग्रीक लोकांच्या मिलिंदराजाशी नागसेन नामक एका विद्वान बौद्धाने वाद करून त्यास बुद्धधर्मास अनुकूल करून घेतले. हा त्याचा वाद ग्रंथरूपाने आज उपलब्ध आहे. मिलिंदराजाचा अंमल त्यावेळी हिंदुस्थानाच्या वायव्येकडील प्रांत व पंजाब आणि त्याच्या पलीकडील प्रांत यावर होता. तेव्हा अर्थात हा प्रांत उत्तरेकडील बौद्धास आपला धर्म पसरवण्यात पुष्कळ साधले.

दक्षिणेकडील बौद्धास जसे अशोकाचे पाठबळ मिळून त्याच्या पंथाचा चोहोकडे प्रसार झाला; तसेच उत्तरेकडील बौद्धास शकांच्या कनिष्क नामक राजाचे साहाय्य मिळाले. सदरील ग्रीक लोकांचे राज्य बुडवून शकांनी आपली सत्ता तेथे स्थापित केली तेव्हा ह्या शकांच्या राजांनी बुद्धधर्माचा स्वीकार केला. ह्या शकांचा कनिष्क हा महाप्रतापी राजा होय. ह्याने काश्मीर, राजपुताना, पंजाब, गुजरात, सिंध वगैरे हिंदुस्थानातील प्रांत आणि काबूल, यार्कन्द, खोकान वगैरे मध्य एशियातील प्रांत यावर आपला अंमल बसविला होता. हा कनिष्क कट्टर बुद्धधर्माभिमानी असल्याकारणाने त्याच्या साहाय्याने त्याच्या विस्तीर्ण राज्यामध्ये बुद्धधर्मप्रसारकास स्वधर्मप्रसार करण्यास उत्तेजन आले. ह्या कनिष्काने एक भिक्षुमंडळ भरविले. ह्या मंडळास उत्तरेकडील बौद्धपंथाचे ५०० भिक्षू जमले होते. ह्या मंडळात त्यांनी मूळ ग्रंथात काही विशेष फेरफार केले नाहीत; मात्र तीन मुख्य ग्रंथांवर टीका तयार केल्या. हे बुद्धधर्मानुयायांचे शेवटचे धर्ममंडळ होय. हे इ.स. ४० या वर्षी भरले. ह्या मंडळानंतर उत्तरेकडील बौद्धांचा पंथ मूळ बुद्धधर्माहून हळूहळू भिन्नत्व पावत गेला.

वरती सांगितले आहेच की, कनिष्कराजाचा पूर्ण आश्रय मिळाल्यामुळे उत्तरेकडील बौद्धांनी आपल्या धर्माचा प्रसार त्याच्या विस्तीर्ण राज्यात चोहोकडे केला. इसवी सनापूर्वी दुसऱ्या शतकामध्ये काश्मिराहून काही बुद्धधर्मप्रसारकांनी बुद्धधर्मग्रंथ चीनच्या बादशहापाशी नेले. इ.स. ६२ सालात चीनच्या गादीवर जो बादशहा होता त्याने आणखी काही बुद्धधर्माचे ग्रंथ मिळवून नेले. ह्या वेळापासून पुढे बुद्धधर्माचा प्रसार

चीन देशात झपाट्याने झाला आणि चौथ्या शतकामध्ये चिनी राष्ट्राचा हा मुख्य धर्म होऊन बसला.

चीन देशातून बुद्धधर्माचा प्रवेश कोरिआ प्रांतात इ.स.३७२ सालात झाला आणि कोरिआतून तो इ.स.५५२ सालात जपानमध्ये प्रसार पावला. चौथ्या व पाचव्या शतकामध्ये कोचीन, चीन, फोर्मोसा, चिंगोलिया इत्यादी प्रांतात बुद्धधर्म चीनमधून गेला आणि काबुलाहून गेलेल्या धर्मप्रसारकांनी तो यार्कन्द, बाल्क, बोखारा वगैरे ठिकाणी प्रसृत केला.

नेपाळमध्ये बुद्धधर्माचा सार्वत्रिक प्रसार सहाव्या शतकामध्ये झाला; परंतु या देशात या धर्माचा प्रवेश पूर्वीच झाला असे म्हणण्यास पुष्कळ आधार आहे. त्याचप्रमाणे तिबेटमध्ये तो याच सुमारास प्रसार पावून इ.स.६३२ मध्ये त्या देशाच्या राजाने आपले वकील हिंदुस्थानातून बुद्धधर्म ग्रंथ आणावयास पाठविले होते. एकंदरीत या उत्तरेकडील बुद्धधर्मपंथाचा प्रसार पश्चिमेस कास्पिअन समुद्रापासून तो पूर्वेस जपानपर्यंत झाला होता.

येथपर्यंत बुद्धधर्मप्रसारासंबंधाने जी हकीकत दिली आहे ती साधार आहे. ह्याशिवाय आणखी दुसऱ्या मुलखात ह्या धर्माचा प्रवेश झाल्याच्या काही खाणाखुणा सापडतात; फरंतु त्या संबंधाचा ऐतिहासिक पुरावा काहीएक सापडत नाही. म्हणून त्याचा येथे उल्लेख करीत नाही.

एका गोष्टीचा मात्र येथे उल्लेख करणे अवश्य दिसते. ती बुद्धधर्म आणि ख्रिस्तीधर्म यातील साम्यासंबंधाची होय. उभय धर्मातील बऱ्याच अद्‌भुत गोष्टी, दंतकथा, विधी, संस्था आणि नीतिबोध ह्यात सादृश्य आढळते. यापैकी काही सादृश्याचे प्रकार येथे संक्षेपाने कथन करितो.

बुद्धाच्या चरित्रातील अद्‌भुत भाग अविश्वसनीय म्हणून आम्ही अजिबात गाळला आहे. तरी बुद्धाच्या व ख्रिस्ताच्या चरित्रातील साम्य वाचकांच्या ध्यानात यावे म्हणून त्यांचा येथे थोडासा उल्लेख करितो. उभय जगद्‌गुरूच्या मातपितरास हे अद्‌भुत बालक त्यांच्या उदरी निर्माण होणार आहे अशा दैवी सूचना अगोदर झाल्या. दोघांचेही जन्म अद्‌भुत रीतीने झाले. म्हणजे अर्थात दोघांच्याही माता गर्भसंभवकाळी कुमारिकावस्थेत होत्या. बुद्धाची माता स्वपतीच्या आज्ञेने बत्तीस महिने ब्रह्मचर्य धारण करून व्रतस्थ असता तिच्या उदरी बुद्ध निर्माण झाला. दोघांच्याही जन्मकाळी एक नक्षत्र आकाशात दृश्यमान झाले. दोघांच्याही जन्मकाळी एका साधूने येऊन मुलास

पाहण्याची इच्छा प्रकट केली आणि त्यास पाहिल्यावर त्या साधूने असे भविष्य केले की, ही मुले सर्वत्र सदाचार व सद्‌धर्म यांची स्थापना व प्रसार करितील. दोघांच्याही जन्मकाळी मोठे चमत्कार घडले. उदाहरणार्थ अंधास दृष्टी प्राप्त झाली, बहिऱ्यास श्रवणशक्ती प्राप्त झाली, मुक्यास वाचा आली, पंगूस चांगले चालता येऊ लागले. फुढे सत्यधर्मज्ञानाची दिव्य दृष्टी प्राप्त झाली. तेव्हा दोघांसही सैतानाने भुरळ घालून पाहिली. बुद्धधर्मग्रंथात ह्या सैतानास मार ही संज्ञा. ख्रिस्ताप्रमाणेच बुद्धाचेही बारा शिष्य होते. देहावसान होण्यापूर्वी काही वेळ बुद्धाने येणेप्रमाणे म्हटले, ''केवळ माझ्याच धर्मामध्ये असे बारा शिष्य आढळतील की, जे स्वतःचे वर्तन अत्युत्कृष्ट नीतिनियमानुसार राखून उपदेश करून अन्य जनांची सदाचाराकडे प्रवृत्ती करण्यास काया-वाचा-मने करून झटतील.'' दोघांच्याही मनात आपल्या धर्माचा प्रसार सर्वत्र व्हावा अशी उत्कृष्ट इच्छा होती. बुद्ध म्हणतो, ''हे भिक्षुजनहो, ह्या माझ्या उज्ज्वल धर्माचा जनास अवश्य उपदेश करा. दोघे एकाच वाटेने जाऊ नका.'' दोघांचीही दृष्टांत देऊन बोध करण्याची पद्धती समान होती; किंबहुना त्यांचे पुष्कळ दृष्टांत बहुतेक सारखेच आहेत. हे व दुसरे असेच सादृश्याचे प्रकार दोघाही जगद्‌गुरूच्या चरित्रात पुष्कळ आहेत. त्याचा येथे उल्लेख करू गेल्यास ग्रंथविस्तार विनाकारण वाढविल्यासारखे होईल.

पुढे ख्रिस्ती धर्मात महंताची संस्था उत्पन्न झाली. तिचे आणि बुद्ध धर्मातील महंत संस्थेचे सादृश्य तर फारच विलक्षण आहे. डॉ. रिसडेविड्‌सनामक एक विद्वान शोधक प्राच्यविद्यापारंगत गृहस्थ ह्या सादृश्याचा उल्लेख करून म्हणतो की, हे सारे सादृश्य केवळ यदृच्छेने घडून आले असे मानिल्यास हा अत्यंत मोठा चमत्कार मानिला पाहिजे. आबीहक नामक एक रोमन कॅथलिक पंथाचा धर्मप्रसारक तिबेटात पहिल्यानेच गेला तेव्हा तेथील बुद्धधर्मानुयायांची महंतसंस्था पाहून तो पराकाष्ठेचा विस्मय पावला. त्याने आपल्या महंत संस्थेतील ज्या गोष्टीचे सादृश्य बौद्धांच्या महंतसंस्थेशी आहे असे पाहिले, त्याचा उल्लेख त्याने येणेप्रमाणे केला आहे : ''धर्मादिकाऱ्यांच्या हातातील वेत्र, मस्तकीचा मुगुट, अंगातील लांब झगा, शिराच्छादनासह तोकड्या हाताचा झगा, दुहेरी संघाने गाऊन उपासना करण्याची पद्धती, स्तोत्रमाला, मंत्र म्हणून भुते काढणे, धूप जाळण्याचे पाच साखळ्यांवर टांगत असलेले पात्र, लामाने (तिबेटातील बुद्धधर्म) भक्तिमान बुद्धधर्मानुयायांच्या मस्तकी उजवा हात ठेवून आशीर्वाद देण्याची रीत, स्मरणी, धर्मगुरूचे, ब्रह्मचर्यव्रत, पुरातन साधूंची पूजा, उपवास, पवित्रोदक

इत्यादी गोष्टींच्या संबंधाने रोमन कॅथलिक पंथाशी बौद्धधर्माचे सादृश्य आहे.'' आर्थर लिली म्हणतो की, ''आबीने ज्या सादृश्याच्या गोष्टीचा उल्लेख केला आहे, त्याहून आणखी पुष्कळ गोष्टीत सदरील पंथाचे आणि बुद्धधर्माचे सादृश्य आहे.'' उदाहरणार्थ– पापनिवेदन क्षौरविधी, मृत साधूंच्या शेषाची पूजा, पवित्र वस्तू ठेवलेल्या ठिकाणी व स्तंडिलपाशी दिवे व मूर्ती यांची योजना, क्रूसाचे चिन्ह, एकत्वाच्या ठायी त्रयीची कल्पना, स्वर्गदेवतेची पूजा, धर्मानुयायांनी जनास समजेल अशा भाषेत धर्मग्रंथ असणे, धर्मगुरूच्या मुखाभोवती प्रकाशकिरणांचे मंडल आहे असे दाखविणे, सपक्ष देवदूत, देहदंडनपूर्वक प्रायश्चित्तविधी, हातून अपराध घडल्यास फटके मारून घेणे, व्यजने, धर्मगुरूचे निरनिराळे दर्जे, देवालयाच्या रचनेतले पुष्कळ भाग इत्यादी आणखी सादृश्याचे अनेक प्रकार आहेत.''

हे सादृश्याचे प्रकार रोमन कॅथलिक धर्मप्रसारकांनी पाहिले तेव्हा त्यांच्या मनात स्वभावत: असा तर्क आला की, हे सारे प्रकार बुद्धधर्मानुयायांनी रोमन कॅथलिक पंथातून घेतले असावेत; फरंतु हा त्यांचा तर्क खोटा आहे. कारण येशू ख्रिस्ताचा जन्म होण्यापूर्वी बौद्धाच्या संघामध्ये हे सदरी निदिष्ट केलेले प्रकार प्रचलित होते असे म्हणण्यास पुष्कळ आधार आहे. उदाहरणार्थ – युरोपात मठांची स्थापना होण्यापूर्वी व ख्रिस्ती मंदिरे बांधण्यापूर्वी पुष्कळ वर्षे पाटणा येथे नालन्दनामक विहारामध्ये मोठा भव्य मठ असून बौद्धांचे प्रचंड देवालय होते व तेथे बुद्धधर्माचे शिक्षण देण्यासाठी प्रसिद्ध पाठशाळा होती. पुढे युरोपीय राष्ट्रावर रानटी लोकांनी केलेल्या स्वाऱ्यातून तिकडचे लोक निभावून त्यांच्यामध्ये जहागिरीची पद्धती स्थापित होण्यापूर्वी व रोमन कॅथलिक पंथातील संस्थास त्या पद्धतीस अनुरूप असे स्वरूप प्राप्त होण्यापूर्वी पुष्कळ वर्षे नेपाळ, तिबेट वगैरे देशातल्या बुद्धधर्मानुयायांनी सदरील नालंदासारख्या मठामध्ये येऊन तेथले विधी, धर्मप्रचार, धर्मसंस्था व देवालयाच्या रचना यांचे नमुने स्वदेशी नेऊन त्यांची तेथे हुबेहूब नक्कल केली. हेच नमुने जिकडे तिकडे कायम झाल्यावर शेकडो वर्षांनी तिबेटमध्ये आलेल्या पहिल्या ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी ते पूर्वोक्त स्थितीमध्ये पाहिले.

येथवर दर्शविलेले सादृश केवळ बाह्य गोष्टीच्या संबंधाने होते व त्याचे महत्त्व आम्ही इतके मानीत नाही; परंतु येशू ख्रिस्त जन्मण्यापूर्वी सुमारे पाचशे वर्षे गौतम बुद्धाने जो उत्कृष्ट नीतिबोध केला त्याचे ख्रिस्ताच्या बोधाशी पुष्कळ बाबतीत साम्य

आहे. रेनांनामक एका फ्रेंच विद्वानाने येशू ख्रिस्ताचे चरित्र लिहिले आहे, त्यामध्ये तो शेवटी येणेप्रमाणे आपला अभिप्राय देतो: मनुष्यजातीच्या कल्याणास सर्वस्वी वाहिलेला आणि तत्प्रीत्यर्थ स्वत:च्या क्षुद्र सुखाची बिलकूल पर्वा न करणारा असा पुरुष येशू ख्रिस्ताखेरीज दुसरा कोणीही ह्या भूलोकी आजपर्यंत निर्माण झाला नाही. जगाच्या कल्याणासाठी गृहसौख्य, ऐहिक सुख व संसारचिंता यांचा सर्वस्वी अव्हेर करणारा येशूवाचून दुसरा कोणीही आढळणार नाही. म्हणावयाला एक शाक्यमुनी (गौतम बुद्ध) काय तो येशूच्या जोडीस बसविण्यासारखा आहे. गौतम बुद्ध आणि येशू यांच्या बोधाचे सार मिळून इतकेच आहे की, जे तुम्हास अपकारक करितात, त्याजवर प्रीती करा. पवित्राचरणाप्रीत्यर्थ संसाराचा त्याग करा. आता बुद्धाच्या व येशूच्या वचनातले सादृश्य लक्षात यावे म्हणून येथे काही वचनाचा उल्लेख करू लागल्यास ह्या भागाची मर्यादा फारच वाढवावी लागेल. ज्या कोणास ह्या प्रकरणी खात्री करून घ्यावयाची असेल त्यांनी लिली, प्रिन्सेस, केरस वगैरे विद्वानांचे एतद्विषयक ग्रंथ पाहावे.

या प्रश्नासंबंधाने विद्वानांनी असा शोध लाविला आहे की, अशोक राजाच्या शासनावरून आपणास असे कळते की, त्याने इजिप्त आणि शिरिआ ह्या प्रांतामध्ये बुद्धधर्मप्रसारक पाठविले होते. ह्या धर्मप्रसारकांनी त्या प्रांतात राहून तेथे आपले पुष्कळ अनुयायी केले. अलेक्झांड्रिया येथील थेराप्यूट आणि पालेस्टाइनमधले एसेनी हे बुद्धधर्मानुयायी पंथ होते. ह्या पंथातील लोक बुद्धधर्माचे आचार, मते व नीतिबोध यांचा पश्चिमदेशी प्रसार करीत होते. डीन मॅन्सेल, डीन मिल्सन, शेलिंग, शॉपनहार यांच्यासारख्या विद्वानांचा सदरील दोन्ही पंथाच्या संबंधाने असा अभिप्राय आहे की, हे पंथ हिंदुस्थानातून आलेल्या बुद्धधर्मप्रसारकांच्या परिश्रमाने उत्पन्न झाले होते. हे धर्मप्रसारक अशोकराजानंतर तीन शतके ह्या प्रांतात राहिले असून त्यांनी आपल्या धर्माचा बोध जनास अव्याहतपणे चालविला होता. येशू ख्रिस्ताच्या जन्मकाळी एसेनी पंथाचा पॅलेस्टाइनमध्ये एवढा प्रसार चालविला होता की, त्याचे वर्णन त्या काळात प्रसिद्ध पुरुष प्लिनी याने स्वानुभवावरून केले आहे. तो म्हणतो, ‘‘हे एसेनी पंथाचे लोक मृत समुद्राच्या पश्चिम किनाऱ्यालगत राहतात. त्यांची वृत्ती गोसाव्याची आहे. त्याच्या संबंधाची सर्वांत विलक्षण गोष्ट म्हटली म्हणजे ते कडकडीत ब्रह्मचर्यव्रत पाळतात. हे द्रव्याला तर बिलकूल स्पर्श करीत नाहीत. त्यांचा उपदेश श्रवण करण्यास दररोज नव्या लोकांची गर्दी जमत असते. ह्या संसारातील कठीण प्रसंगास व जंजाळास त्रासलेले जन त्यांच्यापाशी जाऊन त्यांचा बोध श्रवण करून त्यांच्या वृत्तीचा अवलंब

करितात.'' ही ह्या पुरुषाची साक्ष मोठी महत्त्वाची आहे; कारण तो ख्रिस्तीशकाच्या पहिल्या शतकाच्या द्वितीय पादांत होऊन गेला असून त्याला सत्याचा अपलाप करण्याचे काहीएक कारण नव्हते. यावरून पाहता बुद्धधर्माचा पालेस्टाइनमध्ये येशूख्रिस्ताच्या जन्मवेळी बराच प्रसार झाला होता, असे दिसते.

दुसरे असे की, जॉन बापस्तित म्हणून जो एक यहुदी महासाधू पालेस्टाइनमध्ये येशू ख्रिस्ताच्या वेळी होऊन गेला. त्याने बाप्तिस्मा नावाचा विधी एसेनीपंथातल्या लोकांकडून घेतला असे म्हणतात. कारण यहुदी लोकांमध्ये असला विधी नव्हता. आता येशू ख्रिस्त ह्या जॉनकडे काही दिवस जाऊन राहिला होता हे इतिहाससिद्ध आहे आणि त्याने हा बाप्तिस्म्याचा विधी प्रथमत: ह्या जॉनकडूनच घेतला, हे प्रमाणसिद्ध आहे. त्याचप्रमाणे ख्रिस्ताने सदरील बौद्धपंथाच्या लोकांचा नीतिबोध पुष्कळ ऐकिला असावा असेही अनुमान कित्येक करितात. या विधीला बौद्ध लोक अभिषेक असे म्हणतात. बौद्धधर्माची दीक्षा घेणाऱ्यांना हा विधी करावा लागत असून तो करिताना श्रद्धावान मनुष्यास 'बुद्ध, धर्म आणि संघ ह्या त्रयीवर माझा पूर्ण भाव आहे' अशी प्रतिज्ञा करावी लागते. ही त्रयी ख्रिस्तीजनांच्या पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्या त्रयीशी सदृश आहे, हे मार्मिक वाचकांस येथे सांगावयास नकोच.

येथवर बुद्धधर्माचे जे सादृश्य ख्रिस्ती धर्माशी आहे असे प्रतिपादन केले आहे, ते ब्राह्मणविधी व नीतिबोध यापुरतेच आहे, हे येथे सांगितले पाहिजे. त्यांच्या धर्मसंबंधी मतात बिलकूल साम्य नाही. या संबंधाचे उभय धर्माचे सिद्धांत परस्परांशी अत्यंत विसदृश आहेत हे मागल्या भागात बौद्धांच्या तात्त्विक बोधाचे जे सार दिले आहे, त्यावरून वाचकांच्या लक्षात येण्यासारखे आहे.

शेवटी ज्या ह्या भारत खंडात हा असा अप्रतिम धर्मपंथ उपस्थित होऊन जगातील बहुतेक मनुष्याच्या विचारात व आचारात फेरबदल होण्यास कारण झाला, त्याची येथे कशी काय संभावना झाली त्याचे थोडक्यात निरूपण करून इतिहास प्रकरण समाप्त करितो.

मागे सांगितलेच आहे की, बुद्धधर्मास अशोक व कनिष्क ह्या दोन सार्वभौम प्रतापी राजांचा आश्रय मिळाल्यामुळे त्याचा प्रसार हिंदुस्थानात चोहोकडे झाला; परंतु बुद्धधर्मप्रसारामुळे ब्राह्मणी धर्माचा ऱ्हास झाला असे समजता कामा नये. हे दोन्ही धर्म अशोकराजाच्या वेळापासून इसवी सनाच्या आठव्या शतकापर्यंत सुमारे एक हजार

वर्षे एकमेकांशी चढाओढ करीत असत, असे फुष्कळ गोष्टीवरून मानण्यास आधार आहे. कित्येक राजे ब्राह्मणीधर्माचे अभिमानी निपजले. इ.स.३९९ पासून ४१३ पर्यंत फाहायम नामक बुद्धधर्मानुयायी चिनी यात्रेकरू ह्या स्वधर्मभूमीस येऊन चोहोकडे फिरला. त्याने स्वप्रवासवृत्त लिहून ठेवले आहे. त्यावरून असे कळते की, सदरील शतकात ब्राह्मणी धर्माचे गुरू व बुद्धधर्माचे गुरू यास सारखाच मान असून ब्राह्मणाच्या देवळालगत बौद्धाचे धर्ममठ असत. फुढे ह्युएनसँग नामक एक दुसरा चिनी बुद्धधर्मानुयायी यात्रेकरू इसवी सनाच्या सातव्या शतकामध्ये हिंदुस्थानात आला. ह्या भाविक यात्रेकरूने इ.स.६२९ पासून इ.स.६४५ पर्यंत हिंदुस्थानाच्या बहुतेक भागी प्रवास करून आपल्या ह्या प्रवासाची साद्यंत हकीकत लिहून ठेविली आहे. तीवरून त्या शतकातील बुद्धधर्माची स्थिती बरीच यथार्थ समजण्यासारखी असल्यामुळे तिचा येथे अगदी संक्षेपाने उल्लेख करितो.

ह्या यात्रेकरूला सर्वत्र असे दिसून आले की, बुद्धधर्म व ब्राह्मणी धर्म यांची स्पर्धा एकसारखी चालू होती. पंजाबच्या शिवेवर आल्यापासून अशोक व कनिष्क या राजांनी करून ठेवलेली स्मारके जिकडे तिकडे त्याच्या दृष्टीस पडली; फरंतु शिव व त्याची पत्नी पार्वती त्यांची देवालयेही त्याला जिकडे तिकडे दिसली. वायव्येकडील एकंदर प्रांतात त्याने बौद्धाचे मठ आणि बौद्धमहंत पाहिले; तसेच ब्राह्मणीधर्माचे अनुयायीही त्याने पुष्कळ पाहिले. ह्या प्रांतातले कित्येक राजे बुद्धधर्मानुयायी होते व कित्येक ब्राह्मण धर्माभिमानी होते. तरी बुद्धधर्मानुयायी राजांची सत्ता विशेष होती. अफगाणिस्तानात ह्या यात्रेकरून बौद्धांची दहा राज्ये पाहिली. पेशावर येथे कनिष्काने बांधलेला मोठा मठ बौद्धमहंत सोडून गेले होते. तरी तेथले लोक बुद्धधर्मानुयायी होते. काश्मीर येथील राजा आणि त्याची सर्व प्रजा बुद्धधर्माची कट्टर अभिमानी होती. ह्या राज्यात बुद्धधर्माचे पाचशे मठ असून त्यात पाच हजार महंत होते; परंतु जयपूर प्रांतातले लोक ब्राह्मणी धर्माचे असून त्यांचा बुद्धधर्मानुयायी राजांशी सर्वदा विरोध असे. यमुना आणि गंगा ह्या दोन नद्यांमधल्या सुपीक प्रांतात बुद्धधर्माचा प्रभाव ह्याकाळी बराच होता. ह्युएनसँगच्या वेळी गंगातीरी कान्यकुब्ज नगरीत (कनोज) शीलादित्यनाम (हर्षवर्धन) मोठा प्रतापी राजा राज्य करीत होता. हा बुद्धधर्माभिमानी असून त्याची सत्ता उत्तरेस हिमालय पर्वतापासून ते दक्षिणेत नर्मदेपर्यंत पसरली होती. ह्या राजाच्या राज्यात बौद्धाचे शंभर मठ असून त्यात दहा हजार बौद्धमहंत होते; परंतु हिंदुस्थानच्या पूर्वेकडील प्रांताच्या एका बुद्धधर्मद्वेष्ट्या राजाने शीलादित्यराजाच्या

बंधूचा एका युद्धात वध केला होता. दुसरे असे की, हा राजा अशोक राजासारखा बुद्ध धर्माभिमानी असता त्याच्या ताब्यातल्या मुलखात ब्राह्मणी धर्मातील देवतांची दोनशे देवालये होती आणि ह्या देवस्थानास ह्या राजाकडून आश्रय मिळत असे. स्वधर्माचा प्रसार करण्याच्या कामात आणि दीन व अनाथ जनास दानधर्म करण्यात ह्या राजाची कीर्ती अशोकाप्रमाणे पसरली होती. इ.स.६३४ सालात ह्या राजाने एक धर्ममंडळ भरविले होते. ह्या मंडळास शीलादित्यराजाचे वीस मांडलिक राजे आणि त्या वेळचे मोठमोठे विद्वान बौद्ध महंत व ब्राह्मणपंडित आले होते. ह्या मंडळात बुद्धधर्माचाच केवळ विचार झाला नाही, तर बुद्धधर्माभिमानी विद्वान महंताचा आणि ब्राह्मणधर्माभिमानी पंडितांचा पहिल्याने वाद झाला आणि नंतर बुद्धधर्माचे जे दोन पंथ पूर्वी सांगितले आहेत त्यांचा वाद झाला.

हा शीलादित्य राजा दर पाच वर्षांनी मोठा उत्सव करून आपला खजिना गोरगरिबास वाटून देत असे. ह्युएनसँगने त्याच्या एका समयीच्या ह्या उदार कृत्याचे वर्णन केले आहे. त्यावरून असे कळते की, गंगा व यमुना यांच्या संगमाशी अलाहाबादेस ह्या राजाने आपल्या सर्व मांडलिक राजांस व इतर लोकांस पंचाहत्तर दिवसपर्यंत भोजने घातली. ह्या समयी त्या राजाने आपला खजिना आणून तो बौद्ध महंत, ब्राह्मणास व इतर पंथाच्या साधूस दान दिला. हा महोत्सव आटोपल्यावर त्याने आपल्या अंगावरचा उंची पेहराव व अलंकार उतरून जवळच्या लोकास दान दिले आणि एका भिकाऱ्याच्या अंगावरील चिंध्या ल्याला. हा विधी त्याने बुद्धगुरूच्या सर्वसंगपरित्यागविधीच्या स्मरणार्थ केला.

ह्या राजाच्या राज्यात नालंद नामक एक महामठ होता. येथे निरनिराळ्या पंथांचे दहा हजार बौद्ध महंत राहत असत. शिवाय बुद्धधर्माच्या या वेळी झालेल्या अठरा पंथांचे नवशिके अनुयायी आपापल्या मतास अनुरूप ग्रंथाचे अध्ययन करीत असत. ह्या खेरीज आणखी त्या वेळी उपलब्ध असलेल्या इतर विद्याचे ते अध्ययन करीत असत. ह्या सर्वांचा निर्वाह राजाकडून चालत असे; फरंतु बौद्ध लोकांच्या ह्या महास्थानासंबंधाने हा चिनी यात्रेकरू जे सांगतो त्यावरून पाहता ब्राह्मणी धर्माचेही त्यावेळी त्या प्रांतात मोठेच वर्चस्व होते. तो म्हणतो, 'ह्या महास्थानाचा नाश बुद्धधर्माच्या शत्रूंनी थोडक्याच अवकाशात लागोपाठ तीन वेळा केला होता.' ह्या यात्रेकरूने पंजाब प्रांतातून गंगेच्या मुखापर्यंत व खाली दक्षिणेतही बराच प्रवास केला. जिकडे जिकडे

तो गेला तिकडे तिकडे दोन्ही धर्माची स्पर्धा सुरू असलेली त्याच्या दृष्टीस पडली. तो म्हणतो की, गया हे बौद्ध लोकांचे मुख्य पवित्र स्थान असता ते ब्राह्मणी धर्माचे मुख्य ठिकाण होऊन बसले आहे. बंगालच्या पूर्वेस आसाम जो प्रांत आहे तेथे बौद्धधर्माचा पुष्कळ प्रसार झाला नव्हता. बंगालच्या नैर्ऋत्येस ओरिसा म्हणून जो प्रांत आहे तेथे बुद्धधर्माचा पुष्कळ प्रसार झाला होता; परंतु हुगळी नदीच्या मुखाशी लुकनामक बंदराच्या शहरी बौद्ध लोकांच्या मठाच्या पाचपट ब्राह्मणी धर्माची देवालये होती. मद्रास प्रांतांच्या किनाऱ्यावर बुद्धधर्माचा बराच प्रसार झाला होता. दक्षिण हिंदुस्थानामध्येसुद्धा बुद्धधर्माचे पुष्कळ वर्चस्व होते, तरी त्याची ब्राह्मणी धर्माशी बरीच प्रतिस्पर्धा सुरू झाली होती.

ह्यापुढे ब्राह्मणी धर्माचे चोहोकडे पुनरुज्जीवन होऊन बुद्धधर्माचा हळूहळू ऱ्हास होत गेला. इ.स.७५० मध्ये बिहार प्रांतामध्ये कुमारिलभट्ट नामे एक मोठा विद्वान पंडित निर्माण होऊन त्याने ब्राह्मणी धर्मातील आत्मा व परमात्मा यासंबंधाच्या सिद्धांताचे ज्ञान लोकांत पसरून बुद्धधर्माचे एतद्विषयक नास्तिक्यमत केवळ तिरस्कारार्ह आहे असे स्थापित करण्याचा प्रयत्न केला. ह्या पंडिताने प्रांतोप्रांती हिंडून स्वसंमत सिद्धांताचा जनास बोध केला आणि बुद्धधर्माविषयी त्यांच्या मनामध्ये तिटकारा उत्पन्न केला. त्याने पुष्कळ राजाच्या भेटी घेऊन त्यास आपले शिष्य केले आणि त्या कित्येकांचा कल बुद्धधर्माकडे होता. त्याच्या समक्ष बौद्धमहंताशी वाद करून त्यांच्या धर्ममताचे खंडन केले. ह्याप्रमाणे ह्या एका मनुष्याच्या प्रयत्नाने बुद्धधर्माचा पुष्कळ मोड झाला. कित्येक राजांकडून तर त्याने बुद्धधर्माच्या लोकांचा छळ केल्याच्याही दंतकथा आहेत. त्यापैकी एक येणेप्रमाणे आहे : दक्षिण हिंदुस्थानात रुद्रपूरनगरीतील सुधन्वानामक राजाने आपल्या सेवकास अशी आज्ञा केली की, सेतुरामेश्वरापासून तो हिमालय पर्वतापर्यंत बुद्धधर्माच्या सर्व वृद्ध व तरुण पुरुषांचा वध करावा व ही दंतकथा अर्थात खरी नव्हे. कारण ह्या वेळी हिंदुस्थानात एवढी सार्वभौम सत्ता कोणाही राजाला प्राप्त झाली नव्हती. फार तर ह्या राजाने कुमारिलभट्टाच्या चिथावणीवरून आपल्या राज्यातील बौद्धांचा संहार केला असावा.

कुमारिलभट्टाच्या वेळी शंकराचार्य म्हणून एक विख्यात पंडित मलबार प्रांतात निर्माण झाला. ह्या पुरुषाने ब्राह्मणी धर्माचे सांग अध्ययन करून वेदविहित धर्म जो वेदांत दर्शनात समाविष्ट झाला आहे, त्याचे समर्थन व प्रकाशन आपल्या अलौकिक

बुद्धिबलाने उत्तम प्रकारे केले. ह्या आपल्या अभिप्रेत मताचे ज्ञान सर्व जनास प्राप्त व्हावे म्हणून त्याने हिंदुस्थानात सर्वत्र हिंडून पुष्कळ उपदेश केला. ह्या पंडिताने बौद्ध मताची अयथार्थता व असत्यता स्थापित करण्याविषयी अविश्रांत उद्योग केला.

ह्याप्रमाणे ह्या दोन ब्राह्मणधर्माभिमानी पंडितांच्या परिश्रमामुळे हिंदुस्थानातील बहुतेक लोकांच्या मनात बुद्धधर्माविषयी कायमचा तिटकारा उत्पन्न झाला. कारण उघडच आहे की, देव आणि आत्मा याविषयी ज्या धर्मात निषेध आहे असा धर्म त्या काळच्या भाविक भोळ्या लोकांना मान्य होण्याचा संभव नव्हता. अशा धर्माचे वास्तविक स्वरूप जेव्हा सदरील पंडितांनी उघड करून दाखविले तेव्हा त्याविषयी त्यांच्या मनात अश्रद्धा व किळस उत्पन्न होणे साहजिक होते. ह्यामुळे बुद्धधर्मात नवीन लोक सामील होण्याचे बंद पडून जे सामील झाले होते त्यांचा योगक्षेम चालणे कठीण झाले आणि ह्यापुढे बुद्धधर्माचा उत्तरोत्तर ऱ्हासच होत जाऊन, इसवी सनाच्या अकराव्या शतकामध्ये काश्मीर, नेपाळ, ओरिसा इत्यादी हिंदुस्थानच्या सीमेवरील प्रांतात काय तो हा धर्म कायम राहिला. बाकीच्या प्रांतातून त्याचे बहुतेक निर्मूलन झाले आणि मुसलमान लोकांची सत्ता येथे स्थापित होण्याच्या सुमारास तो केवळ नामशेष झाला.

हा असा बुद्धधर्माचा ऱ्हास आमच्या देशात झाला तरी त्याचा प्रसार आशियातील इतर देशांत किती झाला आहे हे मागे उपोद्घातात दर्शविले आहेच. जगातील जवळजवळ अर्धी लोकसंख्या ह्या धर्माची अनुयायी आहे आणि या भागात निरूपण केल्याप्रमाणे ख्रिस्तीधर्मावरही ह्या धर्माचा संस्कार घडला आहे असे जे कित्येक विद्वानांचे म्हणणे आहे ते खरे आहे असे मानल्यास जगातील बाकीच्या अर्ध्या लोकसंख्येच्या धर्मसंस्थांवर ह्या धर्माचा अप्रत्यक्ष रीतीने परिणाम झाला आहे असे म्हणावे लागेल. येथे बुद्धमताचे ब्राह्मणी धर्मावर कसे काय परिणाम झाले हे सांगावयास हवे होते; पण त्याचे येथे निरूपण करू गेल्यास ग्रंथविस्तार फार होईल. शिवाय ह्या परिणामाचे दिग्दर्शन प्रारंभी उपोद्घातात थोडेसे केले आहे. त्याचा सारांश मिळून इतकाच की, कर्मकांडाहून नित्याचरणाचे माहात्म्य मोठे आहे. प्राणिमात्रावर दया करावी, सर्व मानव समान असून ते आपले बांधव आहेत असे समजून त्यांच्याशी प्रेमाने वर्तन करावे इत्यादी गोष्टींचा जो बोध ब्राह्मणी धर्माच्या कित्येक पंथांत आढळतो तो बुद्धधर्मातूनच मुख्यत: घेतला आहे. शिवाय अनेक देवता कल्पून त्यांच्या तृप्त्यर्थ कर्मे व विधी करण्यात काही एक अर्थ नाही, हा बुद्धधर्माचा बोध घेऊन शंकराचार्यादी वेदांतमत प्रतिपादकांनी

त्यास उपनिषदादी ग्रंथांचा आधार दाखवून तो बोध आपल्या अधिकाराने लोकांत प्रवृत्त केला आहे, ह्यावरून कोणी शंकराचार्यास प्रच्छन्न बौद्ध असेदेखील म्हणतात. ह्या संबंधाने येथे एक गोष्ट अशी सांगण्यासारखी आहे की, उपनिषद्ग्रंथात जे तत्त्वविचार प्रकट झाले आहेत त्यास तर्कशुद्ध रीतीने अनुसरून स्वत:च्या आचरणाचे वास्तविक नियम सिद्ध करण्याचे श्रेय गौतमबुद्धासच दिले पाहिजे. तेव्हा अर्थात उपनिषदाचे मथित सार काढण्याचा प्रयत्न गौतमबुद्ध व शंकराचार्य यांनी सारखाच केल्यामुळे त्यांनी बहुतेक समान सिद्धांताचे प्रणयन केले तर त्यात काही आश्चर्य नाही आणि ह्याबद्दल शंकराचार्यास त्यांच्या प्रतिपक्षाने प्रच्छन्न बौद्ध म्हटले तर त्यात काही वावगे नाही. दुसरे असे की, अलीकडील ब्राह्मणी धर्माची ब्रह्मा, विष्णू व महेश ही त्रयी बुद्धधर्माकडून घेतली असावी असे वाटते. त्याचप्रमाणे ब्राह्मणी धर्मातील मूर्तिपूजेला बुद्धधर्मापासूनच प्रोत्साहन मिळाले असा कित्येक विद्वानांचा तर्क आहे.

याप्रमाणे ज्याने आपल्या अलौकिक बुद्धिबलाने व अप्रतिम नीतितेजाने सर्व जगास ऋणी केले आहे, त्या जगद्गुरूचा जन्म आमच्या या भारतभूमीत झाल्याबद्दल आम्हास मोठा अभिमान वाटणे साहजिक आहे आणि अशा अलौकिक साधुपुरुषाचा चरित्रमहिमा समजून घेण्याविषयी आमच्या मनात उत्कट इच्छा उत्पन्न झाली पाहिजे. ह्या हृदयवृत्तीस वश होऊन आम्ही हे जगद्गुरू गौतम बुद्धाचे चरित्र यथाशक्ती महाराष्ट्र जनांस साद्यंत कथन केले आहे. ते चित्तपूर्वक वाचून ह्या महापुरुषाविषयी ते आपली यथार्थ बुद्धी करितील अशी उमेद आहे.

वाय ६५५-११०५ पु.-५.२०१९

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर